# शिव--चरित्र--निबंधावली

शिव-चरित्र-कार्यालय,-पुणें.

Dhananjayarao Gadgil Librar
GIPE-PUNE-194421

त्रिशत-सांवत्सरिक-शिव-स्मारक-ग्रंथावली, शके १८५१

अनुक्रम २

GOKHALE INSTITUTE OF POLITICS & ECONOMICS
PUNE

# शिव-चरित्र-निबंधावली

फाल्गुन वद्य ३ शके १८५१

( रायगड-स्मारक-मंडळ आणि भारत-इतिहास-संशोधक मंडळ, पुणें
यांच्या सहकार्यानें चाललेल्या )

श्रीशिवचरित्रकार्यालयानें

प्रसिद्ध केलें.

ENTERED IN DATABASE

प्रकाशकः—
नरसिंह चिंतामण केळकर,
आणि
दत्तात्रेय विष्णु आपटे,
चिटणीस, श्रीशिव-चरित्र-कार्यालय,
३१४ सदाशिव, पुणें शहर.

V2315,K.K8
F9
194421

मुद्रक—
पृष्ठ १ ते २८८
श्री. वा. वा. अतीतकर, श्रीसमर्थ भारत छापखाना,
सदाशिव पेठ, पुणें शहर.
पृष्ठें २८९ ते ४००
गणेश काशिनाथ गोखले, सेक्रेटरी, श्रीगणेश प्रिंटिंग वर्क्स,
४९५-४९६ शनवार पेठ, पुणें शहर.
परिशिष्ट.
अ. वि. पटवर्धन, आर्यभूषण छापखाना,
भांबुर्डा, पुणें शहर.

# प्रस्तावना

१ या ग्रंथांत आलेले शिवाजी महाराजांचे चरित्रविषयक निबंध निरनिराळ्या लेखकांच्या लेखणींतून उतरले आहेत. असा श्रमविभाग होणें आवश्यक आहे. मात्र हें लेखन ठरलेल्या अल्प मुदतींत पुरें करावें लागलें, त्याऐवजीं चरित्रलेखनाचें काम जास्त सावकाशीनें झालें पाहिजे यांत शंका नाहीं. तो योग या ग्रंथाची दुसरी आवृत्ति काढावी लागली तर त्यावेळीं जमून येणें अशक्य नाहीं. परंतु तसा तो येईपर्यंत या पुस्तकाला 'चरित्र' हें नांव न देतां 'शिव–चरित्रविषयक निबंध' अशा अर्थाचेंच नांव दिलें आहे त्याचें औचित्य वाचकांना पटेल अशी खात्री आहे.

२ 'शिवाजी महाराजांचें चरित्र' हें नांव सार्थ होण्याकरितां दुसरीहि एक अशी उणीव आहे कीं, शिव–चरित्रांतील कित्येक मुद्दे अद्यापि वादग्रस्त स्थितींत आहेत. त्यामुळें कित्येक बाबतींत कोणत्याहि प्रकारचीं निश्चित विधानें करण्यासारखी आज परिस्थिति नाहीं. प्रस्तुत ग्रंथामध्यें आज उपलब्ध असलेल्या माहितीवरून, कित्येक परंपरेनें चालत आलेले जुने ग्रह कसे निराधार आहेत यांचें विवेचन करावें लागलें आहे. व बऱ्याच नवीन गोष्टी यांत प्रथमच मांडण्यांत आल्या आहेत. या सर्वांची शहानिशा विद्वानांनीं निर्मल मनानें चिकित्साबुद्धीनें केली पाहिजे.

३ अशी शहानिशा करण्याचीं साधनेंहि या ग्रंथाबरोबरच चिकित्सकांच्या हातांत देण्यांत येत आहेत हा मात्र या मालेचा विशेष आहे. 'शिवकालीन–पत्र–सारसंग्रह' व शिवचरित्र साहित्याचे खंड हे या ग्रंथाचे मूलाधार असून, ते जनतेपुढें ठेवण्यानें, एका अर्थानें, प्रस्तुत ग्रंथांतील लेखकांनीं आपला सर्व डाव उघडा करून मांडला आहे असें म्हणावयास हरकत नाहीं.

४ तथापि, या प्रसंगानें लोकांपुढें मांडलेल्या या सर्व साधनांचा सांगोपांग अभ्यास करण्याला सर्वच लेखकांना पुरेसा अवकाश मिळाला होता असें नाहीं, हेंहि या ठिकाणीं सांगून ठेविलें पाहिजे. आधारग्रंथ उत्सवाच्या पूर्वी निदान पांच सहा महिने तरी छापून लेखकांच्या हातांत पडावे व नंतर त्यांचा उपयोग यथावकाश त्यांचे हातून व्हावा ही मूळ योजना कित्येक अपरिहार्य कारणांनीं मागें पडून आधार–ग्रंथ व निबंध–ग्रंथ दोन्हीहि जवळ जवळ एकदम पुरे होण्याची वेळ आली. शिवाय, अद्याप फारसी साधनांच्या अभ्यासांत महाराष्ट्र बराच मागें

आहे. ही उणीवहि दोन तीन वर्षांत भरून निघाल्यास विश्वसनीय व विस्तृत असें शिव-चरित्र त्यानंतर लिहिलें जाईल, यांत शंका नाहीं.

५ परंतु हें सर्व शक्य व्हावयाचें तर, यंदांचे वर्षी शिवाजी-चरित्राचा अभ्यास करण्याची जशी सोय करितां आली तशीच ती पुढेंहि होऊन, निदान आणखीं दोन वर्षें हें अभ्यासाचें काम पुढें चालवितां आल्यास, महाराष्ट्रांत अधिकारयुक्त वाणीनें शिवाजीच्या चरित्राची माहिती सांगणारे लेखक निर्माण होऊं शकतील.

६ या ग्रंथाच्या छपाईसाठीं कऱ्हाडचे सद्गृहस्थ श्रीमंत पांडुअण्णा शिराळकर यांनीं निरपेक्षबुद्धीनें कांहीं रकम वापरावयास दिली आहे याबद्दल सर्व महाराष्ट्रीयांनीं त्यांचे आभार मानिले पाहिजेत.

न. चिं. केळकर.
द. वि. आपटे.

# अनुक्रमणिका.


| प्रकरण | नांव | लेखक | पृष्ठ. |
|---|---|---|---|
| १ | भोंसल्यांचा उदय | श्री. द. वि. आपटे | १ |
| २ | शहाजी व निजामशाही | ,, | १३ |
| ३ | शहाजहानच्या चढाईस शहाजीचें उत्तर | ,, | ६१ |
| ४ | महाराजांच्या बालपणाचा वृत्तान्त व शहाजीची कैद | ,, | १०२ |
| ५ | शिवाजी महाराजांच्या स्वतंत्र कर्तृत्वाचा प्रारंभ | श्री. शं. ना. जोशी | १२९ |
| ६ | स्वराज्याचा उदय | ,, | १४१ |
| ७ | अफजलखानाची स्वारी | प्रो. र. प. पटवर्धन | १६१ |
| ८, ९ | विजापूरकरांशीं सामना | श्री. दि. वि. काळे | १८० |
| १० | मोंगलाशीं सामना | ,, | २५५ |
| ११ | आग्र्याहून सुटका | रा. सा. गं. के. देशपांडे | २८९ |
| १२ | सुटके नंतरचीं तीन वर्षे | प्रो. रा. वि. ओतूरकर | ३०५ |
| १३ | चढाईचें युद्ध | श्री. द. वि. आपटे | ३३४ |
| १४ | राज्याभिषेक | प्रो. वि. ना. कुंभारे | ३५१ |
| १५ | दक्षिण दिग्विजय | श्री. वा. सि. बेंद्रे | ३६३ |
| १६ | जालनापूरची स्वारी | श्री. वि. वि. देशपांडे | ३८४ |
| १७ | उपसंहार | श्री. द. वि. आपटे | ३८९ |

परिशिष्ट—

भोसले घराण्याची पूर्व पीठिका श्री. चिं. वि. वैद्य.

# शिव-चरित्र-निबंधावली

हा ग्रंथ

**श्री. पांडुरंग केशव शिराळकर**

यांस

त्यांच्या श्रीशिवचरित्रकार्यालयावरील प्रेमाकरितां

**अर्पण करण्यांत आला आहे.**

## प्रकरण १ लें

# भोसल्यांचा उदय

**१. भोसल्यांचें रजपूतत्व**—शिवाजीमहाराजांचा जन्म ज्या भोसले कुळांत झाला त्या कुळाची पूर्वपीठिका सांगणारे फार जुने असे पुराव्याचे कागद आज आपणांस उपलब्ध नाहींत. तथापि शहाजी 'आम्ही रजपूत' असें सांगतो (ले. ७१०); भारतकार हें घराणें 'सूर्यवंशी' आहे (अ.१—४२) असें म्हणतो; जयराम व गागाभट्ट यांनीं या घराण्याचा संबंध शिसोद्याशीं असल्याचें लिहिलें आहे; आणि सभासदानें तर 'राजियांचे वंशाचा शोध करितां राजे शुद्ध क्षत्रिय, शिसोदे, उत्तरेहून दक्षिणेस एक घराणें आलें, तेंच राजियांचें घराणें असें शोधिलें' इत्यादि संशोधनात्मक माहिती आपल्या बखरींत (पृ. ८२) नमूद केली आहे. त्यावरून शिवाजी महाराजांच्या हयातींत, आणि त्यांतूनहि राज्याभिषेकाच्या सुमारास या बाबतींत चौकशी होऊन महाराष्ट्रांतील सुसंस्कृत व चिकित्सक लेखकांना तरी हें घराणें 'रजपूत' असल्याचें पटलें होतें असें निश्चयानें म्हणण्यास हरकत नाहीं. जयसिंगानें "बादशहांनीं संमति दिली तर, त्याच्या कुळाशीं शरीरसंबंध जोडण्याचें म्हणजे माझ्या मुलाला त्याची मुलगी करण्याचें बोलणें लावण्यास मी तयार आहें" (ले. ११५२) असें पत्रांत लिहिलें आहे. त्यावरून वरील विधानास पर्यायानें पुष्टी मिळते. आणि खुद्द राजपुतान्यांतील दलपतरायाच्या पदरीं असलेल्या लेखकानें जी दंतकथा नमूद केली आहे, तिच्यांत देखील हे भोसले 'उदेपूरच्या शिसोदे घराण्यांतील भीमसिंगाचे वंशज' (स्कॉट कृत भाषांतर पृ. ४) आहेत असें कबूल केलें आहे. त्याचप्रमाणें खाफीखानानें 'चितोडच्या राण्याशीं' या घराण्याचें मूळ जोडलें आहे (इलि.७-२५४). सारांश, भोसले घराणें क्षत्रिय व रजपूतवंशी असल्याबद्दल महाराष्ट्रीय, रजपूत व मुसलमानी लेखकांच्या म्हणण्यांत एकवाक्यता आहे.

तथापि, एकवाक्यतेबरोबर या बाबतींत मतभेद-निदर्शक मजकूर प्रत्येक लेखकानें जोडला आहे त्याचाहि विचार केला पाहिजे. कारण, या प्रकारचा मतभेद निरनिराळ्या लेखांत वारंवार आलेला असून शिवाजी-चरित्राच्या जुळ-णींत अशा प्रसंगीं ग्राह्याग्राह्यता कोणत्या तत्त्वानुसार ठरवावयाची याची कसोटी निश्चित केली पाहिजे. समकालीन पत्रव्यवहार अगर अवांतर लेख हे, विशिष्ट घडामोडींचें स्वरूप अगर त्यांचा काल इत्यादि ठरविण्यास, पहिल्या प्रतीचा पुरावा ह्मणून जमेस धरावे लागतात. पण त्यांत देखील लेखकाचा स्वार्थ अगर त्याच्या भोळेपणाच्या समजुती कोठें डोकावतात किंवा काय तें पाहण्याची खबरदारी घेतली पाहिजे. लेखक महाराष्ट्रांतला असला व महाराजांच्या पदरीं राहिलेला असला तर तो प्रशंसापर विशेषणांचें व गौरवपर कल्पनांचें प्रमाण जास्त ठेवील; आणि उलटपक्षीं लेखक मराठ्यांच्या विरुद्ध पक्षाचा म्हणजे रजपूत अगर मुसलमान असला तर माहिती नमूद करतांना मराठ्यांना निंदाप्रचुर विशेषणें लाऊन व त्यांच्या संबंधीं अनादर दर्शविणाऱ्या कल्पनांची पुस्ती जोडून तो आपलें लिखाण करील हें उघड आहे. निर्विकार मनानें 'इति ह आस' असें सांगण्यासाठीं लेखकानें हातांत लेखणी धरावी हें तत्त्व जाणणारा व तदनुसार आपण लिखाण करीत आहों अशी निदान प्रतिज्ञा तरी करणारा एकहि शिवकालीन इतिहास-लेखक आपणापुढें नाहीं. जे आहेत ते कोणत्याना कोणत्या तरी पक्षाचें मत प्रति-पादन करणारे आहेत. निःपक्षपाती इतिहासाची सिद्धी शिवाजीचरित्रापुरती तरी अद्यापपर्यंत अस्तित्वांत आलेली नाहीं व प्रत्येक ठिकाणीं लेखकाचें व्यक्तित्व प्राधान्यानें डोकावत आहे. तेव्हां पक्षपाती लेखकांच्या लिहिण्यांतून खरा मजकूर कसा निवडावा हें आपणांस पाहिलें पाहिजे.

महाराष्ट्रीय लेखकांपैकीं परमानंदानें भोसले कुल 'सूर्यवंशी' म्हटलें आणि जयरामानें प्रत्यक्ष 'वलीपास' म्हणजे अवनीपाश्व अथवा दिलीप याचें नांव घेतलें, गागाभट्टानें शिसोदे या शब्दाला लपेट मारून 'शिशुंग' रूप लिहिलें, संभाजीनें भोसले या ऐवजीं 'भृशबल' म्हटलें आणि राजा-रामानें दानपत्रांत 'कौशिक-गोत्री' असें कोरून ठेविलें; तरी यांतील कांहीं शब्द गौरवपर व कांहीं 'तत्कालीन समजुती' असें म्हणून त्यांची गणना ऐतिहासिक विश्वसनीय पुरावा या सदरांत आपण करूं शकत नाहीं. त्याप्रमाणें विरुद्ध पक्षानें देखील लिहिलेल्या मजकुराची वासलात लाविली

पाहिजे. शिवाजीमहाराजांच्या प्रयत्नानें स्वराज्य स्थापन झाल्यामुळें स्वराज्यांतील हिंदूंना ज्याप्रमाणें भोसलेकुलाचा गौरव करण्याचा उमाळा वाटला असेल, त्याप्रमाणें मुसलमान व त्यांचे अंकित रजपूत यांना शिवाजीची निंदा जितक्या प्रकारें करितां येईल तितक्या प्रकारें करण्याचा मोह आवरला नसला तर यांत आश्चर्य नाहीं. विजयी पक्षाला शिव्याशाप देऊन आपल्या मनाचें समाधान करून घेण्याची प्रवृत्ति पराभूत पक्षांत जगभर सर्वत्र आढळते, त्यांतलाच हा एक प्रकार आहे. हें लक्षांत ठेवलें असतां जयसिंग शिवाजीशीं शरीरसंबंध जोडण्याची गोष्ट लिहितांना "भोसल्यांचें घराणें आणि जातकुळी माझ्यापेक्षां इतकीं हीन आहेत कीं, आम्ही त्याचा स्पर्श झालेलें अन्नहि खाणार नाहीं; मग लग्नाची गोष्ट कशाला?" अशी जी पुस्ती जोडतो, तिचेंहि मर्म आपणांस समजतें. त्याचप्रमाणें भीमसेन व खाफीखान 'या घराण्याचा शिसोद्यांशीं संबंध होता' हें नमूद करतां करतां, त्याचें मूळक्षेत्र हीनजातीचें होतें अशा माहितीची भर घालून या संबंधाला कमीपणा आणण्याचा प्रयत्न करतात. पण इतिहासकाराला हीं द्वेषमूलक काल्पनिक विशेषणें व पुस्त्या जमेस धरण्याचें कारण नाहीं. सारांश, आदरोद्भूत ममत्व किंवा द्वेषमूलक शत्रुत्व या भावनांनीं प्रेरित होऊन लेखकांनीं जीं विशेषणें जोडलीं आहेत तीं सोडून दिलीं असतां 'या भोसले घराण्याचा संबंध उदेपूरच्या शिसोद्यांशीं पोचत होता' एवढा शिवकालीन समजुतीचा निष्कर्ष समजण्यास हरकत नाहीं.

**२. मालोजीचा पूर्वायुःक्रम**—या रजपूतवंशी भोसले घराण्यापैकीं मालोजी व विठोजी हे बंधू महाराष्ट्रांत भीमा नदीच्या कांठीं वडिलार्जित वतनवाडी उपभोगून निजामशाही राज्यांत रहात होते. हीं वतनवाडीचीं गांवें पांडेपेडगांवच्या आसपास चांभारगोंदें, वैजापूर, वगैरे होतीं. मालोजीच्या पदरीं घोडीं व शिपाई-प्यादे असत, त्यानें वेरूळ येथील घुसृणेश्वराच्या देवळाचा जीर्णोद्धार करून तेथें विहीर व धर्मशाळा बांधली आणि शिखरशिंगणापूरच्या डोंगरावर तलावाची भिंत बांधविली. यावरून त्याची सांपत्तिक स्थिती चांगल्या प्रकारची असून त्याचा स्वभाव देवधर्मनिष्ठ, श्रद्धाळू व खर्चिक होता असें म्हणतां येईल. मालोजीजवळचा हा पैसा वडिलार्जित असेल किंवा त्याला पुरलेल्या द्रव्याचा सांठा सांपडला असेल. पण तो त्यानें दरवडा घालून मिळविला असें समजण्याचें कारण नाहीं. ही दरवड्याची कल्पना मराठी, रजपूत अगर मुसलमानी लेखकांपैकीं एकानेंहि लिहिली नसून ती फक्त डफ्नें आपल्या

ग्रंथांत मांडली व तीहि केवळ तर्क ह्मणून मांडली आहे. त्याच्या मतें मालोजीनें जाधवरावाची मुलगी मिळविण्यासाठी जर शब्दच्छल करून त्या सरदारास पेंचांत धरण्यास कमी केलें नाहीं किंवा मशिदींत डुकरें टाकून निजामशहास घाबरविण्यास तो कचरला नाहीं तर तो लबाड ( Crafty ) व वाटेल तो बरावाईट उपाय योजून आपला हेतू सिद्धीस नेणारा असा असला पाहिजे; आणि हें बखरींतील मजकुराचें तात्पर्य सांगून 'साक्षात्कारामुळें द्रव्यप्राप्ती झाली ' ही थाप चोऱ्या करून मिळविलेलें द्रव्य पचविण्यासाठीं मालोजीनें उठविली असावी, असा दुसरा तर्क त्यानें दिला आहे. मात्र स्वमत-निर्देश करतांना डफनें ' बहुधा ' ( Probably ) हा शब्द योजून सोडवणूक करून घेतली आहे हेंहि सांगितलें पाहिजे. तथापि या प्रकरणांतला बखरींतला मूळ मजकूरच जेथें काल्पनिक ठरतो तेथें त्याची संगति लावण्यासाठीं डफनें सांगूनसवरून लढविलेली कोटी विचारांत घेण्याचेंच कारण रहात नाहीं. पण समकालीन लेखकांनीं काय लिहिलें आहे, नंतरच्या बखरकारांनीं कोणत्या दंतकथा नमूद केल्या आणि डफसारख्यांनीं त्यांत आपल्या कोणकोणत्या तर्कांची भर घातली याची चिकित्सा करण्याचें सामर्थ्य ज्यांच्या ठिकाणीं नसतें अशा विद्यार्थीवर्गांत डफचा इतिहास तीन चार पिढ्या शिकविला गेल्यामुळें त्यांतील तर्कवितर्कांचीं मूळें देखील फार खोलवर रुजलीं आहेत; आणि तोहि इतिहासाचाच भाग आहे असा पुष्कळांचा समज झाला असल्यामुळें त्याचें स्वरूप उघड करून सांगावें लागलें.

**३. दक्षिणेंतील शाहांचा अधःपात**—मालोजीजवळ द्रव्यबळ व मनुष्यबळ असल्यामुळें त्याला लष्करी पेशा पत्करून आपलें नशीब काढण्याची इच्छा होण्यास अनुकूल अशी परिस्थिति निजामशाही राज्यांत होती. थोडाबहुत स्वाभिमान कायम ठेऊन यावनी नोकरी पत्करावयाची तर ती आदिलशाही-पेक्षां निजामशाहींतच लाभण्याचा संभव अधिक होता. दोनहि ठिकाणचे बादशहा इस्लामी धर्माचे होते व दोघेहि विजयनगरचें हिंदू राज्य बुडविण्याच्या वेळीं शके १४८७ ( इ. १५६५ )मध्यें राक्षसतागडीच्या युद्धांत आपसांतले भेदभाव बाजूस ठेऊन लढले हें खरें. पण दक्षिणेंतील या मुसलमानी शाहांच्या अधिपतींना विध्वंसक कामासाठीं जूट करण्याची संवय होती तरी, विधायक कामांत किंवा शांततेच्या काळांत जुटीनें वागण्याचें पथ्य त्यांना माहीत नव्हतें. विजयनगरचें राज्य बुडविण्यासाठीं त्यांनीं जी प्रासंगिक जूट केली

तिनें हिंदु राज्य बुडविलें. पण त्याबरोबर ती जी स्वतः अंतर्धान पावली, ती पुनः केव्हांहि दृष्टीस पडली नाहीं. राक्षसतागडीच्या युद्धानंतर दक्षिणेंतील शाह्या एकजुटीनें वागल्या असत्या तर सर्व इतिहासाचें स्वरूपच पालटलें असतें. त्याऐवजीं त्यांनीं उलट एकमेकांशीं युद्धें करून आपली शक्ती आटविली; यामुळें प्रथम मोंगलांच्या आणि नंतर मराठ्यांच्या भक्ष्यस्थानीं पडण्याचा प्रसंग या शाह्यांच्या अधिपतींवर आला.

या शाह्यांच्या अधःपाताचें मुख्य कारण म्हटलें म्हणजे, राजकारण व धर्म यांची गुंतागुंत होऊं देऊं नये, हें तत्त्व त्या वेळच्या मुत्सद्यांना समजलें नव्हतें हें होय. शिया व सुनी हे पंथ आणि परदेशी व दक्षिणी हे भेद, धर्माच्या व सोइरिकीच्या विचारांच्या वेळीं लक्षांत घ्यावयाचे असतात व राज्यकारभार चालवितांना हे भेद जमेस धरल्यास राज्यशकट सुरळीतपणें चालू शकणार नाहीं, ही गोष्ट त्यांच्या लक्षांत आली नव्हती. राज्यसूत्रें हातीं आलीं म्हणजे त्यांचा उपयोग आपल्या धार्मिक व वांशिक कल्पनांना व्यावहारिक स्वरूप देण्यासाठीं केला पाहिजे अशी चुकीची कल्पना त्यांच्या डोक्यांत भिनल्यामुळें कोणताहि पक्ष अधिकारारूढ झाला तरी प्रकरण हातघाईवर आल्यावांचून रहात नसे. केवळ राजकीय विचारानें देखील मुत्सद्यांत अनेक पक्ष पडूं शकतात. त्यांतच आणखी धार्मिक व सामाजिक विचारांचीहि गुंतागुंत करून ठेवली म्हणजे पक्षभेदाच्या अनर्थाला कांहीं सीमाच रहात नाहीं. त्याचें पर्यवसान बेबंदशाहींत होतें व त्यांतून समाजाची व राज्ययंत्राची सुटका होणें कठीण पडतें.

विजयनगरचें जबरदस्त असें हिंदु राज्य अस्तित्वांत होतें तोंपर्यंत दक्षिणेंतील मुसलमानी शाह्यांचीं परस्परांशीं होणारीं युद्धें व पंथभेदानें माजणारे तट यांना मर्यादा पडली होती. पण तो मनु संपल्यावर मालोजी निजामशाही नोकरींत शिरला. त्यावेळीं विजापुरांत आदिलशाही गादीवर ‘ इभराइमाचा लेक ’ अलीशाह हा होता असें शिलालेखांत म्हटलें आहे ( पृ. ५ ). या अलीची कारकीर्द श. १४८०-१५०२ (इ. १५५८-८०) पर्यंत चालू होती व त्या २२ वर्षांत निजामशाही व अदिलशाही यांच्यांत अनेक संग्राम झाले; त्यांपैकीं कोणत्या तरी एका संग्रामांत मालोजीनें पराक्रम दाखविल्यामुळें त्याला मनसब मिळाली. तिचा श. १४९९ असा चिटणीसांनीं ( पृ. १५ ) दिला आहे.

त्यावरून पहिल्या मूर्तिजा निजामशहाच्या कारकीर्दींत मालोजी निजामशाही नोकर बनला असें म्हणतां येईल. त्यानंतर मूर्तजा ६ वर्षें जिवंत होता. तोंवर निजामशाही राज्यांत एका अर्थानें कांहीं धरबंद होता. कारण त्यावेळीं त्या राज्यांत यादवी युद्ध सुरू झालें नव्हतें. पण मूर्तजा मरण पावल्यानंतर मोंगलांनीं अहमदनगरला वेढा देईपर्यंतच्या १०।१२ वर्षांत बाह्य दडपण नसल्यामुळें निजामशाही व आदिलशाही राज्यांतील तंट्यांना फारच ऊत आला; व मारामाऱ्यांवांचून दुसरा विचारच सुचूं नये अशी परिस्थिति निर्माण झाली. निरनिराळ्या पक्षांनीं एकमेकांशीं लढावें; एकमेकांच्या कत्तली कराव्या किंवा प्रमुख सरदारांनीं एका बादशहाकडून निघून दुसऱ्याच्या आश्रयास जावें आणि तेथून अनेक भानगडीचे प्रश्न निर्माण करावे असें प्रत्यहीं घडूं लागल्या-मुळें सर्वत्र धामधूम माजली. या धामधुमीच्या काळांत विजापुरच्या गादीवर इब्राहिम आदिलशहा हा श. १५०२ ( इ. १५८० ) पासून ४७ वर्षें कायम असल्यामुळें तितका गोंधळ माजला नाहीं. पण निजामशाही गादीवर या १० वर्षांच्या अवधींत पांच बादशहा एका मागून एक बसण्याचे प्रसंग आल्यामुळें त्या राज्यांत धरबंद असा कांहींच राहिला नाहीं. प्रत्येक राज्याभिषेकाच्या वेळीं धराधर, धांवपळ व कत्तली यांसारखे प्रकार हटकून घडत. यामुळें लोकांना त्यांचें भय वाटूं लागलें.

**४. निजामशाहींतली धामधूम**—निजामशाही राज्याची मालकी एका विशिष्ट घराण्याकडे असावी व ती वंशपरंपरागत पद्धतीनें चालावी येथवर सर्वांची एकवाक्यता असे. पण त्या घराण्यांतल्या कोणत्या पुरुषानें बादशहा व्हावें हा प्रश्न अनिश्चित होता; यामुळें त्याचा निर्णय करण्याच्या वेळीं दरबारांतील प्रत्येक राजकीय व धार्मिक पक्ष, राजघराण्यांतला जो इसम आपल्या मतास अनुकूल असेल त्यास तक्तावर बसविण्यासाठीं इतर पक्षांशीं लढण्यास व त्यांची कत्तल करण्यास तयार असे. यामुळें राजघराण्यांतल्या लोकांचा परस्परांशीं असलेला नात्यागोत्याचा संबंध पार लयास जाऊन भाऊबंदकीपेक्षांहि आसुरी स्वरू-पाचे असे—बापानें मुलास अगर मुलानें बापास ठार मारल्याचे—प्रकार घडत असत. हें सामान्य सूत्र लक्षांत ठेवलें असतां पुढें दिलेला या वेळचा १०।१२ वर्षांचा दक्षिणेंतील राज्यांचा त्रोटक इतिहास समजण्यास अडचण पडणार नाहीं.

आदिलशाहींत दिलावरखान नांवाचा एक मुत्सद्दी इब्राहिमाच्या कारकीर्दींत वजिरीपदावर आठ वर्षें कायम होता. त्यानें विजापूरच्या बादशहाच्या बहिणीचें लग्न नगरच्या मूर्तिजा निजामशहाचा मुलगा हुसेन याच्याशीं करण्याचें ठरविलें. हेतु हा कीं, या सोयरिकीनें दोनही राज्यांतील शत्रुत्व कमी व्हावें. पण मूर्तिजानें प्रथम लग्नाची गोष्ट मान्य करून नंतर टाळाटाळ सुरू केली. अर्थात् विजापूरचें सैन्य चालून आलें व प्रत्यक्ष युद्ध सुरू झालें; तेव्हां कोठें मूर्तिजानें आपल्या मुलाचा लग्न समारंभ केला. पण त्याच्या मनांत याविषयीं फारच दंश राहिला. व त्यानें, या लग्नास मान्य होणाऱ्या आपल्या पोटच्या पोराचा सूड् घेण्यासाठीं, एक आसुरी उपाय योजला; तो असा कीं, मुलगा निजला असतां त्याचें आंथरूण पेटवून देऊन, त्याला आंथरुणावर जाळून टाकण्याची खटपट त्यानें केली. पण मुलगा वेळींच जागा झाला व बचावला. तेव्हां मुलानेंहि बापावर ताण करण्याचें ठरवून बापाला आधणाच्या हांड्यांत बुडवून ठार केलें आणि आपण बादशाहीपद धारण केलें. तथापि प्रत्यक्ष बापाला अशा क्रूरपणें ठार मारणाऱ्या हुसेनाची कारकीर्द कोणालाच मानवण्याजोगी नव्हती. यामुळें अनेक सरदारांनीं एकवटून त्याला कैद केलें व लौकरच ठारहि मारलें. हा प्रकार श. १५११ ( इ. १५८९ ) मध्यें झाला. त्यानंतर दरबारांतील अनेक पक्षांच्या परस्परांशीं हाणामाऱ्या होऊन नुकत्याच ठार झालेल्या हुसेनाचा पुतण्या, इस्माईल, यास जमालखान नांवाच्या जबरदस्त सरदारानें बादशाही पद दिलें. या इस्माईलाचा बाप बुऱ्हाण हा, निजामशाहींत राहणें धोक्याचें वाटल्यामुळें, कांहीं वर्षांपूर्वी अकबराच्या नोकरींत जाऊन राहिला होता.

जमालखानाच्या हातीं निजामशाहीचीं सूत्रें आलीं खरीं; पण त्यानें राज्यांत अधिकच बखेडा माजला. कारण तो महदवीपंथाचा असून शिया व सुनी या दोनहि पक्षांशीं एकसारख्या शत्रुत्वानें वागत असे. यामुळें निजामशाहींतल्या सरदारांनीं तर त्याच्या विरुद्ध उठाव केलाच. पण विजापूरच्या बादशहानें याच वेळीं आपल्या बहिणीची सुटका करण्यासाठीं निजामशाही राज्यावर चाल केली. पण यापेक्षां जमालखानाशीं निकरानें शत्रुत्व करणारा इसम म्हटला म्हणजे निजामशाही गादीवर असलेल्या इस्माईलाचा बाप बुऱ्हाण हा होता. ‘ मुलानें बादशहा बनावें आणि आपण मोंगलांच्या नोकरींत असावें ’ ही गोष्ट त्याच्या मनाला असह्य झाली आणि त्यानें खान-

देशाचा राजा अलीखान व विजापूरचा बादशाहा यांच्याशीं संगनमत करून एकाच वेळीं जमालखानावर हल्ला चढविला. जमालखानानें विजापूरच्या सैन्याचा पराभव केला; पण त्यानंतर लगेच उत्तरेकडे जमलेल्या शत्रूंशीं लढावें लागल्यामुळें त्याच्या सैन्याचा टिकाव लागला नाहीं व रोहणखेड येथील युद्धांत श. १५१३ (इ. १५९१) मध्यें जमालखान ठार झाला. यानंतर जेता या नात्यानें बुऱ्हाण हा निजामशाहीचा मालक झाला व त्यानें आपल्या मुलास (इस्माईलास) पदच्युत करून कैद केलें; आणि त्याच्या डोक्यांतली महदवीपंथाची भक्ती कमी होत नाहीं असें लक्षांत आल्यावर त्याला, आपल्या मागून देखील गादीचा वारसा सांगतां येऊं नये म्हणून, आपल्या हातानें ठार मारून टाकलें! तेव्हां दरबारांतल्या दक्षिणीपंथास अशी शंका आली कीं, परदेशीपक्षाच्या चिथावणीवरून बादशहानें ह्या मुलाचा खून केला असला पाहिजे. यामुळें परदेशीपक्षाची कत्तल करण्याचा कट दक्षिणी सरदारांनीं केला होता; तथापि तो यशस्वी झाला नाहीं. पण बादशाहाचा ओढा अल्पसंख्य परदेशीपक्षाकडे असल्यामुळें त्याला बंडखोर सरदारांशीं झगडण्याची फार यातायात करावी लागली व त्या दगदगीनें तो मरण पावला. यामुळें राज्याचीं सूत्रें पुनः दक्षिणीपक्षाच्या हातीं यावयाचीं तीं आलीं. पण दक्षिणीपक्षांत देखील नेमस्त, जहाल व हबशी असे पोटभेद असल्यामुळें अनेक भानगडी निर्माण होऊन विजापुरकरांशीं चाललेल्या युद्धांत नवा निजामशहाहि ठार झाला. त्यानंतर निजामशाही घराण्यांतला कोठला

---

१ या जमालखानानें केशव चैतन्यांच्या विद्यार्थ्यांना दिलेलें आतूर येथील एक चावर इनाम जमिनीचें खुर्दखत उपलब्ध आहे (ले. ५). तथापि त्याचा परदेशी शियापंथी मुसलमानांवर फार कटाक्ष असल्यामुळें त्यांचीं उत्पन्नें त्यानें जप्त केलीं व त्यामुळें निजामशाहींतले बरेच परदेशीपक्षाचे व शियापंथी लोक जीव बांचविण्यासाठीं निजामशाहींतून आदिलशाहींत जाऊन राहिले. त्यांतच सुप्रसिद्ध इतिहासलेखक फेरिस्ता हा होता. अशा रीतीनें शियापंथी म्हणजे कडव्या मुसलमानी पक्षाचा भरणा या वेळीं विजापुरांत झाला व निजामशाहींत सुनीपंथाचा दक्षिणीपक्ष राज्यसूत्रें चालवूं लागला. फेरिस्ता हा शियापंथी असल्यामुळें त्याच्या इतिहासांत ठिकठिकाणीं या पंथाच्या व परदेशीपक्षाच्या पराक्रमाची माहिती जशी खुलासेवार आली आहे, तशी दक्षिणीपक्षाची नाहीं. हिंदूंना तारतम्याच्या दृष्टीनें शियापंथापेक्षां सुनीपंथ बरा, असें वाटण्याजोगें असल्यामुळें भारत कारानें आदिलशहा 'यवनो यवनैर्वृतः' आणि निजामशहा 'धर्मात्मा' होता असें म्हटलें आहे.

तशी एक मुलगा हाताशीं घेऊन 'हा निजामशाही गादीचा खरा मालक व मी त्याचा वजीर' असा आग्रह धरणारे चार निरनिराळे पक्ष निघाले व त्यांपैकीं एकानें मोंगल बादशाहा अकबर याजकडे सैन्याची मदत मागितली. आणि त्या मागणीचें निमित्त पुढें करून मोंगलांचें सैन्य या दक्षिणी राज्यांत शिरलें. तेव्हां कोठें या भांडखोर पुढाऱ्यांना 'हीं दक्षिणेंतील राज्यें नष्ट होऊन त्यावर मोंगली बादशहांचा नांगर फिरणार,' या गोष्टीची अंधुक कल्पना आली. या आणीबाणीच्या प्रसंगीं चांदबिबीनें पुढाकार घेऊन कांहीं वर्षे मोंगलांशीं दक्षिणी सैन्यांकडून टक्कर देवविली व तात्पुरतें यश मिळविलें. पण अंतस्थ यादवीनें परस्परांविषयीं फार गैरसमज वाढलेला असल्यामुळें थोड्याच दिवसांनीं चांदबिबी एका सरदाराच्या हातून मारली गेली व निजामशाहीचा मालक बहादुरशहा यास कैद करून त्याच्या राजधानीवर मोंगलांचें निशाण फडकवण्याच्या कामीं अखेर अकबराच्या सैन्याला यश मिळालें.

**५. मराठ्यांच्या उदयास अनुकूल काल**—अशा धामधुमीच्या काळांत मालोजीनें निजामशाही लष्करांत नोकरी बजाऊन आपला भाग्योदय करून घेतला. या धामधुमींत दाक्षिणात्य मुसलमानांच्या अधःपाताचीं स्पष्ट चिन्हें दिसत होतीं हें खरें. पण हिंदूंच्या दृष्टीनें त्यांत एक गोष्ट लक्षांत घेण्याजोगी होती ती अशी कीं, या तंट्यांत हिंदु-विरुद्ध-मुसलमान अशा विचाराचा बिलकुल भाग नव्हता. सर्व पक्षांचे पुढारी मुसलमान होते; पण त्यांना बाहेरच्या शत्रूंशीं झगडावयाचें नसून एकमेकांशीं झगडावयाचें होतें व हा झगडा चालू ठेवण्यासाठीं हस्तक या नात्यानें मराठे सरदारांना जवळ करणें त्यांना इष्ट दिसलें. मराठे सरदारहि विशेष चिकित्सा न करितां त्यांचे हस्तक बनून 'पराक्रम गाजवावा आणि दिवसेंदिवस प्रबळ बनावें' या वैयक्तिक व मर्यादित स्वरूपाची महत्वाकांक्षा दृष्टीपुढें ठेऊन वागण्यास तयार असत. यामुळें मराठे सरदार व निजामशाही राज्यांतले पुढारी यांचें मेतकूट जमण्यास अडचण पडली नाहीं. त्यांतून निजामशाहींत पहिल्यापासूनच कडव्या उर्फ परदेशी शिया पंथाचें महत्त्व फार मर्यादित असल्यामुळें हिंदूंना धार्मिक दृष्टीनेंहि संकोच वाटण्याचें कारण नव्हतें; आणि मोंगलांची स्वारी निजामशाहीवर आल्यापासून तर 'हिंदु व मुसलमान हा भेद अजिबात विसरून सर्व पराक्रमी लोकांनीं जुटीनें शत्रूंशीं तोंड न दिल्यास निजामशाही मोंगलांच्या

भक्ष्यस्थानीं पडल्यावांचून रहात नाहीं ' ही जाणीव स्पष्टपणें सर्वांच्या मनांत उत्पन्न झाली होती. अशा प्रकारें हिंदु-मुसलमानांतील भेदभाव मागें पडला व दोघांनीं खांद्यास खांदा लाऊन एका राजकीय हेतूनें लढण्याची आवश्यकता पुढाऱ्यांना पटत चालली होती त्या वेळीं भोसले घराण्यांतील मालोजी निजामशाही लष्करांत दिवसेंदिवस महत्त्व पावूं लागला. मालोजीचा निजामशाही नोकरींत प्रवेश शके १५०२ च्या पूर्वी झाला हें मागें सांगितलेंच आहे. मालोजीच्या नांवें सुटलेलें श. १५१८ मधलें पत्र उपलब्ध आहे (ले. १०). व त्यांत वणगोजीच्या पुंडाव्याचा उल्लेख आहे. वणगोजी निंबाळकराचा हा पुंडावा श. १५१७ ते १५३२ पर्यंत चालू होता. पण त्या पुंडाव्याचा व मालोजीचा संबंध होता किंवा नाहीं हें सांगतां येण्याजोगें विश्वसनीय साधन आपणांपुढें नाहीं.

**६. मालोजीचा निजामशाहींतला आयुष्यक्रम**—श्रद्धाळू व पराक्रमी अशा मालोजीला निजामशाहींत शिरून योग्य संधी मिळाल्यामुळें त्याला आपल्या आंगचें पाणी लोकांच्या निदर्शनास आणतां आलें व त्याला दिवसेंदिवस महत्त्व प्राप्त झालें. तेव्हां त्यानें आपला धाकटा भाऊ विठोजी यालाहि निजामशाही लष्करांत जागा मिळवून दिली. पुढें परंपरागत वतनवाडीची व्यवस्था पाहण्याचें काम दुसऱ्याकडे सोपवून हे भाऊ निजामशाही दरबाराकडून मिळालेल्या नवीन जहागिरीचा उपभोग घेऊं लागले.

मालोजीसंबंधीं कौटुंबिक माहिती थोडीबहुत उपलब्ध आहे ती अशी. त्याच्या बायकोचें नांव दीपाबाई असें बऱ्याच बखरींतून दिलें आहे; पण तिचें नांव उमाबाई होतें असें शिवभारतांत ( अ. २-४९ ) व राधामाधव चंपूंत ( पृ. २६७ ) दिलें आहे. पेशवाईच्या प्रारंभीं केलेल्या एका यादींत देखील मालोजीच्या स्त्रीचें नांव ' उमाव्वा ' असेंच दिलें आहे ( खं. ८ ले. ७१ ). पण यापेक्षां निर्णायक असा पुरावाहि उपलब्ध आहे; कारण स्वतः शहाजीच आपल्या मातुश्रीचें नांव ' उमाई आवा ' असें ज्या पत्रांत सांगतो तें पत्र आपणांपुढें आहे ( ले. ४९८ ) व ती श. १५५१ च्या मार्गशीर्षपर्यंत हयात होती अशीहि माहिती त्या पत्रावरून मिळते. या उमाबाईला लौकर मूलबाळ झालें नाहीं; तेव्हां महादेवाला नवस केल्यानंतर तिच्या पोटीं शहाजी जन्मला; आणि पुढें दोन वर्षांनीं तिला दुसरा मुलगा

झाला त्याचें नांव शरीफजी असें ठेवण्यांत आलें. शहाजी व शरीफजी हीं नांवें मुसलमान फकिरांच्या नांवावरून ठेवण्यांत आलीं ( भा. अ. १-९० ) त्या अर्थी निजामशाही वातावरण हिंदु विरुद्ध मुसलमान या भावनेनें खळबळलेलें नव्हतें असें ह्मणण्यास हरकत नाहीं. अनेक हिंदु देवालयांच्या देणग्या या वेळीं निजामशाहींत चालू असल्याचें अस्सल पत्रांवरून दिसत आहे; त्यावरून देखील वरील अनुमानासच पुष्टी मिळते.

श. १५२५ (इ. १६०३ ) मध्यें चांदबिबीचा खून झाला; त्यानंतर मोंगलांनीं अहमदनगर काबीज करून बहादुर निजामशहास कैद करून नेलें. परंतु निजामशाहीचें सामर्थ्य तक्तावरल्या नामधारी व्यक्तीपेक्षां त्याच्या नांवानें राज्यकारभार करूं पाहणाऱ्या महत्त्वाकांक्षी सरदारांच्या कर्तबगारीवर अवलंबून असल्यामुळें त्यांनीं लगेच दुसरा निजामशहा उभा केला. त्याचें नांव मूर्तिजा किंवा बुऱ्हाण. या कामीं मलिकंबर व मियानराजू या दोन सरदारांनीं पुढाकार घेऊन मूर्तिजाची स्थापना केली; आणि मोंगली बादशहाशीं लढून या नव्या बादशहाचें संरक्षण करण्याची हिंमत बांधली. त्यांच्या नशीबानें या सुमारास अकबराचा मुलगा सेलीम यानें बंड केल्यामुळें व पुढें अकबर मरण पावल्यामुळें मोंगलांच्या सैन्याशीं तोंड देण्याचें काम पुष्कळ सोपें झालें. अशा संधिकालांतले, मालोजी व विठोजी यांच्या नांवें ‘सरगुऱ्हो’ हा लष्करी हुद्दा चालविण्यासाठीं जाफराबाद, दौलताबाद व कनरड परगणा यांतील कांहीं गांवांचा मोकासा मिळाल्याबद्दलचे श. १५२८ मधले कागद उपलब्ध आहेत (ले. २६–२९ ). त्यानंतर श. १५२९ च्या कागदांत मालोजीच्या मागें मारहम शब्द योजला आहे. त्यावरून मालोजी श. १५२८ अखेरीस वारला असावा असा तर्क करतां येईल. शिवभारतावरून असें दिसतें कीं, मालोजी इंदापूरच्या बाजूस बंडखोर शत्रूंशीं लढत असतां मरण पावला. बुऱ्हाण निजामशहाच्या आज्ञेवरून मालोजी या कामगिरीवर गेला होता ( भा. २–२ ) त्याअर्थी मालोजीच्या मृत्युसमयीं मलिकंबर निजामशाही मुलुखांत बस्तान बसवीत चालला होता; पण तो अद्याप सर्वसत्ताधारी बनून त्यानें निजामशहास बाहुलें बनविलें नव्हतें असें दिसतें.

६. **राजे या उपपदाची मीमांसा**—भोसले घराण्यांतील पुरुषांच्या नांवापुढें ‘राजे’ हें उपपद जोडलेलें आढळतें त्याचा विचार या ठिकाणीं

केला पाहिजे. अस्सल पत्रें तपासून पाहतां असें दिसतें कीं, भोसले घराण्यांतील इसमांच्या वतीनें पाठविण्यांत आलेल्या पत्रांतून व्यक्तिनामापुढें राजे हें उपपद जोडलेलें आहे आणि सरकारी अधिकाऱ्यांनीं अथवा दरबारानें पाठविलेल्या पत्रांत भोसले घराण्यांतील व्यक्तींचा उल्लेख करतांना त्यांच्या नांवापुढें 'राजे' शब्द लावलेला नाहीं. राजे हा शब्द बहुमानार्थी असून तो व्यक्तीच्या नांवापुढें लिहिण्याची परंपरा कांहीं विशिष्ट घराण्यांतच चालू असावी एवढें ह्मणतां येईल व इतर लोक या घराण्यांतील लोकांना हा शब्द आदर दाखविण्यासाठींच योजीत असावे. पण तो सरकारी मान्यतेचा निदर्शक नव्हे. कारण सरकारीपत्रांतून तो लावलेला नाहीं. 'अज रख्तखाने' या मायन्यानें ज्या पत्रांचा प्रारंभ होतो व ज्यांत पुढें भोसले घराण्यांतील व्यक्तीचें नांव असतें तीं पत्रें भोसल्यांच्या कचेरींतील कारकुनांनीं लिहिलेलीं असल्यामुळें त्यांत 'राजे' हा शब्द लिहिण्याची खबरदारी ते घेत असत. त्याचप्रमाणें यांनीं दिलेल्या खुर्दखतांच्या आधारावर पुढें इनाम चालू ठेवण्याविषयीं इनामदारांनीं केलेल्या अर्जांतहि अशा खुर्दखतांतील मजकूर उद्धृत करतांना भोसल्यांच्या नांवापुढें राजे हें उपपद लाविलेलें आढळतें. पण तें सरकारी अधिकाऱ्यांनीं भोसल्यांना उद्देशून लिहिलेल्या पत्रांत नसतें; त्याअर्थी त्यास सरकारी मान्यता नव्हती असें गृहीत धरणें योग्य दिसतें.

---

## प्रकरण २ रें.

# शहाजी व निजामशाही

**१. बखरी व संशोधन**—अलीकडे झालेल्या संशोधनानें शहाजीचरित्रासंबंधींच्या रूढ कल्पनेंत, तपशिलाच्या व तात्पर्याच्या अशा दोनही दृष्टींनीं, पुष्कळ बदल करणें आवश्यक झालें आहे. रूढ किंवा बखरींत दिलेल्या हकीकतीप्रमाणें शहाजीचें नांव उच्चारतांच रंगपंचमीचा खेळ, जाधव व भोसले यांचें वितुष्ट, शिवाजीजन्माच्या सुमारास जाधवरावानें शहाजीचा पाठलाग करणें, बालशिवाजीच्या भानगडीमुळें शहाजीवर कैदेचा प्रसंग येणें आणि शेवटीं तो शिकारीस गेला असतां मरण पावणें इत्यादि प्रसंग आठवतात आणि शिवाजी व शहाजी यांचा जन्मभर बारावा बृहस्पती होता असें तात्पर्य मनापुढें उभें राहतें; किंवा कांहीं बखरींनीं शेवटला गोड घांस म्हणून शहाजीला पालखींत बसवून शिवाजीमहाराज पायीं चालले इत्यादि वर्णन दिलें आहे त्याच्या आठवणीनें वरील तात्पर्यांत किंचित् बदल करण्याचीहि बुद्धि होते. पण समकालीन, माहितगार व विश्वसनीय लेखकांनीं दिलेली माहिती व अस्सल पत्रें बारकाईनें पाहिलीं म्हणजे शहाजीचरित्रासंबंधींच्या रूढ कल्पना फारच चुकल्या आहेत असें आपल्या लक्षांत येईल. यावर ' तपशील चुकला म्हणून शहाजीचरित्राचें बखरकारांनीं दिलेलें रहस्य चुकीचें असलेंच पाहिजे असें ठरत नाहीं. कारण, अगदीं काल्पनिक संभाषणांच्या व कावळ्याचिमणीच्या गोष्टींमधून इसापाला जर व्यावहारिक नीतीचें रहस्य उत्तम प्रकारें सांगतां आलें तर बखरकारांचें या संबंधींचें तात्पर्य चुकलेंच असेल असें कसें म्हणावें ? ' अशी शंका उपस्थित होण्याजोगी आहे आणि तिच्यांत सत्यांशहि आहे. बखरकार सद्भेतूनेंच प्रेरित झालेले होते. शिवाजीचरित्र समजून घेण्यासाठीं व त्याच्या थोरवीचें शब्दचित्र रेखाटण्यासाठीं आपल्या परीनें बखरकारांनीं खटपट केली व पुराव्यानें ग्राह्य ठरणारा भाग प्रत्येक बखरींत थोड्याबहुत प्रमाणानें सांपडतो. शिवाय शिवाजी महाराजांचें चरित्र अत्यंत अद्भुत व आदरणीय आहे ही भावना गेल्या दोन शतकांत महाराष्ट्रांत कायम

ठेवण्याचें श्रेय सर्वस्वीं बखरकारांना देणें न्यायाचें होणार आहे. किंब-हुना शिवचरित्राविषयीं आदर उत्पन्न करणें हें त्यांचें ध्येय होतें व तें त्यांनीं आपल्या काळापुरतें उत्तम रीतीनें साध्यहि केलें असें आपण ह्मणूं शकतों. पण सध्यांच्या चिकित्सेच्या काळांत ही भावना किंवा हें ध्येय यांचें स्वरूप पुष्कळच पालटलें आहे. राजारामानें आज्ञा केल्यावरून सभासद व प्रतापसिंहाच्या सांगण्यावरून चिटणीस हे जसे, मिळाली तेवढीच माहिती जमेस धरून महाराजांचें संपूर्ण चरित्र लिहिण्यास बांधले गेले होते व हरएक ठिकाणीं अद्भुतपणाची भावना प्रतिबिंबित करण्याचें ध्येय त्यांना दृष्टीपुढें सदैव कायम ठेवावें लागलें होतें, तसा प्रकार आजच्या लेखकाचा नाहीं. आधुनिक इतिहासकाराला सत्यसंशोधनाच्या वाटेनें आपलें ध्येय गांठावयाचें असतें; आणि त्या शोधनाचा पाया—ऐतिहासिक घडा-मोडी, व प्रसंग किंवा तपशील यांचें स्वरूप, उपलब्ध पुराव्यावरून, निश्चित करण्याच्या रूपानें—घालावा लागतो. यामुळें पुरेसा पुरावा नसेल तेथें निर्णय करतां येत नाहीं, असें सांगण्यास आजच्या लेखकास पूर्ण स्वातंत्र्य असतें. उदाहरणार्थ, शहाजीशिवाजीची भेट जेजुरीस थाटानें झाली असें ह्मणण्यानें शिवाजीची पितृभक्ति अगर इतर गुण कितीहि उत्तम रितीनें वर्णन करतां येत असले तरी विश्वसनीय पुराव्यानें जर ती भेट सिद्ध होत नाहीं तर त्या विषयीं आजच्या लेखकानें साशंकवृत्ती धारण केल्यास तो मुळींच दोषी ठरत नाहीं. बखरकाराप्रमाणें आधुनिक लेखकाला देखील कांहीं ठिकाणीं कल्पना चालविणें भाग पडतें हें खरें आहे. कारण, विश्वसनीय कागदांतून कितीहि माहिती मिळाली तरी तिला मर्यादा असतेच असते; यामुळें मागल्या तप-शिलावरून पुढच्या वृत्तांतावर पोंचण्यासाठीं कल्पनेचा पूल कांहीं ठिकाणीं तयार करावा लागतो. पण ही कल्पना केवळ सत्यशोधनाच्या खटपटींत सुचलेली आहे, आदर किंवा द्वेष इत्यादि पूर्वग्रहानें दूषित अशा मनांत उद्भ-वलेली नव्हे, हें पटवून देण्याची जबाबदारी आजच्या चरित्रलेखकाला पत्क-रावी लागते. आजच्या इतिहासलेखनांतहि जो रम्य व चित्ताकर्षक भाग असतो तो भाषेंत, रसभरित वर्णनांत अगर नीतिबोधांत नसून विश्वसनीय पुराव्याच्या आधारावर उभें राहून खरें चरित्ररहस्य आकलन करण्याच्या हेतूनें केलेल्या खटपटींत असतो. या शुद्ध हेतूंविषयीं यत्किंचित् संशयास जागा राहिली तर या खटपटींतील सर्व रमणीयता एकदम नाहींशी होते.

सारांश, सत्यशोधन हा इतिहासाचा आत्मा आहे, हें आज लक्षांत आल्यामुळें, बखरकारांच्या हेतूविषयीं आदर वाटत असून देखील त्यांनीं लिहिलेल्या शहाजीचरित्राची माहिती कांहीं ठिकाणीं अग्राह्य कां वाटते याचें दिग्दर्शन करीत, त्या ऐवजीं दुसरी माहिती कितपत उपलब्ध आहे हें सांगण्याचें काम सध्यां करावयाचें आहे. यामुळें जुनी परिचित व सुंदर इमारत कोसळावी आणि त्या जागीं नवी इमारत उभी करण्याचें अपुरें कामचालू असल्याचा देखावा दिसावा अशांतला प्रकार शहाजीचरित्रासंबंधानें आज दिसणार आहे. पण त्यास उपाय नाहीं; वस्तुस्थिती तशी आहे खरी.

**२. शहाजीचें बालपण**—शहाजी व जिजाबाई यांचा जन्मशक निश्चित करतां येत नाहीं. स्थूल मानानें अंदाज मात्र करतां येण्याजोगा आहे. शहाजीच्या पांचव्या वर्षी मालोजी मरण पावला व श. १५२९ (इ. १६०७) मधल्या (खं. १५ लें. ३७२) पत्रांत मालोजीच्या मागें मारहम म्हणजे कैलासवासी असें विशेषण आहे. त्यावरून श. १५२४* (इ. १६०२) मध्यें शहाजीचा जन्म झाला असावा असें म्हणतां येईल. विठोजीच्या आठ मुलांपैकीं एकाचें नांव मालोजी आहे; तें थोरला मालोजी मरण पावल्या-

---

* वरील अंदाज करण्यास खं. १५ ले. ३७२ या श. १५२९ मधल्या पत्रांतले "देणे मारहम मालोजी व विठोजी भोसले बा हुजती" हे शब्द आधारभूत धरले आहेत; आणि त्यांचा अर्थ 'कैलासवासी मालोजी यांनीं मूळ दिलेलें व विठोजी भोसले यांनीं दिलेल्या पत्रावरहुकूम चालू असलेलें' असा केला असून या ठिकाणीं कैलासवासी (मारहम=परमेश्वरी कृपा पावलेला) या शब्दाचा अन्वय मालोजी या शब्दाशीं घेतला आहे; विठोजी या शब्दाशीं घेतला नाहीं. याचें कारण श. १५३३ (इ. १६११) मध्यें विठोजी भोंसले हयात असून त्यास शिखर-शिंगणापूरची मोकदमी मिळाल्याबद्दलचें पत्र (खं. १५ ले. ३७७) आपणापुढें आहे. त्याच न्यायानें खं. १५ ले. ४०० मधल्या पत्रांतील "बा हुजती मालोजी व विठोजी भोंसले असर अलफ" या वाक्यांशांत देखील 'असर अलफ' हे शब्द विठोजी भोसल्याच्या पत्राचा कालनिर्देश करतात, मालोजीच्या पत्राचा करीत नाहींत असें गृहीत धरलें आहे. याचा निश्चित निर्णय करतां येण्यास सातारा येथिल राजोपाध्यांच्या संग्रहांतील कागद पाहण्यास मिळाले पाहिजेत. तथापि अनिश्चितपणाची मर्यादा दोन वर्षांपेक्षां अधिक नाहीं. श. १५३१ (इ. १६०९) नंतरचे उल्लेख एकटया विठोजीच्या नांवचे आहेत; त्यांत थोरल्या मालोजीचें नांव आढळत नसून धाकटयाचें आढळतें. त्याअर्थी वरील कालनिर्णयांत फारशी चूक असण्याचा संभव दिसत नाहीं.

नंतर थोड्याच दिवसांनीं जन्मलेल्या मुलाला विठोजीनें ठेवलें असण्याचा पुष्कळसा संभव आहे. हा धाकटा मालोजी मोंगलांकडे नोकरींत होता असें समकालीन बादशहानाम्यांत असून, श. १५४४ ( इ. १६२२ ) मध्यें तो इतर भावांपासून स्वतंत्र वांटणी घेऊन निराळा राहिला याविषयींचें वांटपपत्र ( खं. १५ ले. ३९५ ) आपणापुढें आहे. त्यावेळीं तो पंधरा वर्षांचा होता असें समजल्यास त्याचा जन्म श. १५२९ च्या सुमारास येतो व वर सांगितलेल्या शहाजीच्या जन्मशकाशीं त्याचा मेळ बसतो. बाप लहानपणीं वारल्यामुळें शहाजी व शरीफजी यांचें संगोपन करण्याचें काम त्यांची आई उमाबाई इलाच करावें लागलें. विठोजीनें देखील आपल्या परीनें थोडेंबहुत त्यांच्या व्यवस्थेकडे लक्ष दिलें असेल. पण विठोजीचा प्रपंच मोठा व तो भावापासून विभक्त असल्यामुळें त्याची साक्षात् मदत काय झाली असेल याविषयीं शंका वाटते. तथापि निजामशहानें मालोजीची जहागीर शहाजीच्या नांवानें चालविण्याचें ठरविलें व त्या कामासाठीं या दोघां भात्रांबरोबर विठोजीला बोलाऊन त्यांचा दरबारांत सन्मान केला व त्यांच्या संगोपनाचें काम विठोजीकडे सोंपविण्यांत आलें ( भा. अ. २-३५ ); यानंतर शहाजीचें लग्न प्रथम मोहित्यांच्या मुलीशीं म्हणजे तुकाबाईशीं झालें ( तं. शि. पृ. ६). व पुढें श. १५४२ मध्यें त्याला निजामशहानें मालोजीच्या वेळची जहागीर दिली. आणि 'सर्वेच' शहाजीचें बालपण संपून ' नवयौवन ' लागण्याच्या सुमारास म्हणजे १८ व्या वर्षांच्या सुमारास जाधवरावानें आपली मुलगी 'जिजा' हुंडयासह शहाजीला अर्पण केली. त्याच वेळीं विश्वासरावाची मुलगी दुर्गा इचा शरीफजीशीं विवाह झाला इत्यादि हकीकत देतांना परमानंदानें विठोजीचें नांव घेतलें नाहीं.

**३. खेळोजी व जाधवराव यांचें वितुष्ट**—विठोजी मरण पावल्यानंतर शहाजीला मार्गदर्शक अशी त्याची आईच काय ती राहिली होती. शहाजी २५-३० वर्षांचा होईपर्यंत ती हयात होती; परंतु तिच्या विषयीं आपणास विशेष माहिती नाहीं. तथापि तिच्या देखरेखीखालीं शहाजी व शरीफजी हे तयार झाले; निजामशहानें मालोजीची जहागीर शहाजीच्या लहानपणापासूनच त्याच्या नांवें चालू केली ( भा. अ. ३६ ), व पुढें मुलांचीं लग्नें होऊन शहाजीला आपल्या जहागिरीचें काम स्वतंत्रपणें पाहण्यास परवानगी मिळाली यावरून उमाबाई जिजाबाईप्रमाणें कर्तृत्ववान् असावी असें दिसतें. यानंतर भोसले व जाधव यांच्यांत वितुष्ट

वाढविणारा एक अकल्पित प्रसंग घडला तो असा. एकदां निजामशाही दरबारांत जाधवराव वगैरे सरदार यथानुक्रम बादशहास मुजरे करून आपापल्या घराकडे जलदीनें जाऊं लागले असतां सभागृहाच्या दारासमोर घोडयावरून, हत्तीवरून, पालखींतून व पायीं जाणाऱ्या लोकांची एकच गर्दी झाली; त्या गडबडींत खंडागळे नांवाच्या सरदाराचा हत्ती बेफाम होऊन पुष्कळ लोकांना तुडवीत चालला. तेव्हां जाधवरावाचा मुलगा दत्ताजी यानें त्या हत्तीवर चाल करून शस्त्रांच्या योगानें त्याला जर्जर केलें. या वेळीं विठोजीचे मुलगे संभाजी व खेळोजी हे खंडागळ्याच्या मदतीस धावून आले व हत्तीचा तंटा बाजूस राहून दत्ताजी जाधव व संभाजी भोंसले यांच्यांत युद्ध सुरू झालें. अर्थात् इतर लोकहि सुचेल त्याप्रमाणें या किंवा त्या पक्षांत सामील झाले व कित्येक लोक जखमी होण्यापर्यंत मजल गेली. या मारामारींत शहाजीला दोहींकडून संकट पडण्याजोगें होतें. कारण दत्ताजी हा मेहुणा व संभाजी हा चुलतभाऊ असा संबंध असल्यामुळें कोणाचीहि बाजू पत्करली तरी दुसऱ्याशीं मारामारी करण्याचा प्रसंग होता; तेव्हां 'यादवांच्या संबंधाकडे डोळेझांक करून शहाजीनें भोसल्यांची बाजू धरली' असें भारतकार म्हणतो (अ. ३–२९) तें लक्षांत ठेवण्याजोगें आहे. या दंगलींत संभाजी भोसल्याच्या हातून दत्ताजी जाधव मारला गेला. ही बातमी पुढें गेलेल्या थोरल्या जाधवरावास समजली तेव्हां तो संतापानें लाल झाला आणि संभाजीस ठार मारण्याचा निश्चय करून मारामारीच्या जागीं येऊन पोंचला. तेव्हां प्रथम शहाजीची व त्याची गांठ पडली आणि शहाजीस दंडावर तरवारीची जखम लागल्यामुळें तो बेशुद्ध होऊन पडला. नंतर जाधवरावानें निकराचा हल्ला करून खेळोजी व इतर हबशी शिपाई यांचा पराभव केला; आणि संभाजीशीं गांठ घालून त्याला ठार केलें. अशा प्रकारें भोसले व जाधवराव यांचें वैमनस्य केवळ आकस्मिक कारणानें उत्पन्न झालें. पण त्यांत दोघांकडीलहि महत्त्वाचीं माणसें प्राणास मुकल्यामुळें त्याचा दोघांसहि विसर पडणें अशक्य होतें. या चकमकीची बातमी बादशहास कळली तेव्हां त्यानें हा तंटा मिटविला व सर्वांना आपापल्या घराकडे जाणें भाग पाडलें. पण हें प्रकरण एवढयावर मिटण्याजोगें नव्हतें. भोसले व जाधव यांच्यांत उत्पन्न झालेल्या वैमनस्यांत बादशहा कोणाची बाजू घेतो हें पाहण्याकडे दोनहि पक्षांचे डोळे लागले; अशा वेळीं मूर्तजानें खेळोजीची बाजू घेऊन

जाधवरावाला पेंचांत आणण्याची कांहीं योजना केली. पण याची गुणगुण जाधवरावास कळल्यामुळें तो निजामशाही दरबार सोडून शके १५४३ च्या कार्तिकांत (इ. १६२१ ऑक्टोबर) मोंगलांच्या आश्रयास गेला (ले. १४३).

**४. मलिकंबराचें राजकारण**—या वेळीं निजामशाहानें भोसल्यांचा पक्ष उचलला असें म्हटलें आहे, परंतु खरें पहातां मलिकंबरानें विठोजीच्या मुलांचा पक्ष उचलला असें म्हटलें असतां त्या वेळच्या वस्तुस्थितीचें दिग्दर्शन योग्य रीतीनें केल्यासारखें होणार आहे. कारण या वेळीं मलिकंबर हा निजामशाहीचा खरा सूत्रचालक असून त्याच्या इच्छेनुसार सर्व उलाढाली होत होत्या. हा मलिकंबर हबशी जातीचा असून चांदबिबीच्या मृत्यूनंतर मोंगलांनीं बुडविलेल्या निजामशाहीचा पुनरुद्धार यानें केला. मूर्तजा किंवा बुऱ्हाण या नामधारी बादशाहाकडे आवशाच्या आसपासचा थोडासा मुलूख लावून देऊन मलिकानें सर्व निजामशाही मुलखाची व्यवस्था करण्याचें काम आपल्या हातीं ठेविलें होतें. प्रारंभीं कांहीं वर्षें मियानराजू हा दक्षिणी पक्षाचा पुढारी त्याला जबरदस्त असा प्रतिस्पर्धि भेटला होता व मोंगलांचा अहमदनगर किल्ल्यावरील अधिकारी खंजरखान निजामशाही मुत्सद्यांत तंटे लावण्याचें काम कसून करीत असल्यामुळें त्याच्या हातून पराभूत होण्याचेहि प्रसंग मलिकावर आले. पण योग्य वेळीं पड खाऊन त्यानें कधीं दिल्लीकरांचें तर कधीं विजापूरकरांचें साहाय्य मिळविलें व प्रथम निजामशाहींतील प्रतिस्पर्ध्यांची विल्हेवाट लाविली. ‘दिल्लीचे बादशाहा संधी साधून दक्षिणेंतील राज्यें बुडविणार’ ही गोष्ट या सुमारास स्पष्टपणें दिसूं लागली होती. तरी जहांगीर गादीवर आल्यापासून प्रथम कांहीं वर्षें उत्तरेकडे स्थिरस्थावर करण्यांत मोंगली मुत्सद्यांना लक्ष घालावें लागलें आणि त्यानंतर शहाजाद्यांचे भाऊबंदी डाव-पेंच सुरू झाल्यामुळें दक्षिणेंतील शाह्या बुडविण्याचें काम मोंगलांना नेटानें पुढें ढकलतां आलें नाहीं. तथापि याहि अवधींत आदिलशाहा व कुतुबशाहा हे मोंगलांना खंडणी पोंचवीत असत. म्हणजे दिल्लीकरांचें अंकितत्व मान्य करण्याची पाळी त्यांच्यावर आलीच होती. पण मलिकंबर मात्र या कामीं बरीच टाळाटाळी करीत असे आणि विजापूरचा इब्राहिम देखील त्याला या कामांत मनापासून साह्य करी. मोंगलांविरुद्ध दाक्षिणात्यांनीं जूट करण्याची कल्पना व्यवहारांत आणण्याचा प्रयत्न प्रथम चंगीजखान (स्कॉट् १-३८२) नांवाच्या निजामशाही मुत्सद्यानें केला व मलिकंबर या चंगीजखानाच्या तालमींत तयार

झाला असून तोच या तत्त्वाचा खरा पुरस्कर्ता होता असें मुसलमान लेखकांचें म्हणणें आहे. शिवाय हें तत्त्व गोव्याच्या पोर्तुगिजांनीं पद्धतशीर रीतीनें दक्षिणेंतील शहांना समजावून दिलें व तें अधूनमधून तरी अंमलांत आलें याचें कांहीं श्रेय त्यांना देणें योग्य आहे, असें पोर्तुगीज लेखांवरून दिसतें (ले.३४३). प्रारंभ कोठूनहि झालेला असो; मोंगलांशीं दाक्षिणात्यांनीं एकजुटीनें तोंड देण्याची कल्पना श. १५३५ पासून १५४३ पर्यंत (इ. १६१३ ते १६२१) आदिलशहा व मलिकंबर यांनीं प्रत्यक्ष अमलांत आणली होती खरी. या कामीं खर्चासाठीं निजामशाही मुलूख आदिलशाहीकडे कांहीं वर्षे लावून देणें व त्यानंतर तो मुलूख परत ज्याचा त्याजकडे, सलोखा कायम राहून, येणें वगैरे प्रकार झाल्याचें अस्सल पत्रांवरून सिद्ध होत असल्यामुळें या सुमारास दाक्षिणात्यांची राजकारणांत व्यापक दृष्टी होती असें म्हणण्यास हरकत नाहीं ( शि. च. सा. १ प्रस्तावना पृ. १५–१६ ). या काळच्या मुत्सद्यांत मलिकंबराचें नांव संघटनेच्या दृष्टीनें विशेष गाजत होतें व त्याच्या हयातींत दक्षिणेंतल्या राजकारणाला एक प्रकारचें तेज चढलें होतें, याचें कारण त्याची दृष्टी राजकीय असून स्वभाव धाडसी होता हें आहे.

विजापूरचा इब्राहिम आदिलशहा प्रथम बरींच वर्षे जुन्या मुत्सद्यांच्या तंत्रानें चालत असे; व या मुत्सद्यांच्या डोक्यांत केवळ एका विवक्षित पंथाचा अभिनिवेश होता. पण असल्या पंथांच्या नादीं लागून आपण राजकारणाची घडी किती विस्कळित करीत आहों हें अल्पवयी इब्राहिमाच्या लक्षांत येण्याजोगें नव्हतें. राज्य हें 'इब्राहिम' या व्यक्तीचें अगर विशिष्ट घराण्याचें आहे आणि माझ्या हातीं राज्याचीं सूत्रें आलीं आहेत तोंपर्यंत माझ्या ज्ञातीच्या अगर पंथाच्या हितासाठीं झटलें पाहिजे अशी मुत्सद्यांची विचारसरणी होती. यामुळें या मुत्सद्यांच्या विचारांत राजकारणापेक्षां संकुचित अशा धर्मपंथाच्या विचारास प्राधान्य मिळत असे. हा दोष पुढें पुढें इब्राहिमाच्या लक्षांत आला व त्यानें व्यापक राजकीय दृष्टी अंगिकारून निजामशाही राज्य जिवंत राहिलें पाहिजे असें धोरण पत्करलें. आणि मलिकंबराशीं ७।८ वर्षे सलोखा ठेवून मोंगलांचें पाऊल दक्षिणेंतील मुलखांत फारसें घुसूं दिलें नाहीं. तथापि हा सलोखा कायम टिकला नाहीं. शके १५४३ च्या सुमारास मलिकंबर व इब्राहिम आदिलशहा यांच्यामध्यें बेबनाव उत्पन्न झाला ( ले. १५२ ). याचें कारण त्यांचा सलोखा ज्या मोंगली सत्तेच्या भयामुळें उत्पन्न झाला होता तें भय कमी झालें. मोंगली राज्याचीं सूत्रें

नूरजहानच्या ताब्यांत आल्यापासून जहांगिराच्या मागून धाकटा शहाजादा शहारियार हा बादशहा बनावा या हेतूनें तिची खटपट सुरू झाली व ही खटपट हाणून पाडण्यासाठीं व स्वतः दिल्लीचा बादशहा बनण्यासाठीं शहाजहानानें बंडाचें निशाण उभारलें. यामुळें मोंगली राज्यांत शहाजाद्यांच्या भाऊबंदीचे तंटे माजून मोंगलांनीं दक्षिणेंतील राज्यें आक्रमण्याचा प्रश्न त्या वेळेपुरता तरी मागें पाडला. अर्थात् मोंगली संकटाच्या निवारणार्थ अस्तित्वांत आलेला (मलिकंबर व इब्राहिम यांच्यामधील) सलोखा देखील आपोआप निरर्थक भासूं लागला. मलिकंबर काय आणि इब्राहिम काय, त्यांना मोंगलांशीं लढण्याच्या निमित्तानेंच व्यापक राजकारणाची कल्पना सुचण्याजोगी होती. ज्या लाखों लोकांच्यावर ते राज्य चालवीत होते त्या हिंदु लोकांच्या आकांक्षा काय आहेत व त्यांचें सुखदुःख कशानें साधणार आहे याची विवंचना त्यांना केव्हांहि वाटल्याचें दिसत नाहीं; आणि त्यांच्या परधर्मीपणामुळें वाटणें शक्यहि नव्हतें. यामुळें युद्धाच्या व शांततेच्या सर्वच काळांत ‘लाखों लोकांच्या मनास समाधान देणारें ध्येय गांठण्यासाठीं मी झटत आहें’ या व्यापक विचारानें पुढाऱ्याला जें एक पवित्रपणाचें वातावरण उत्पन्न करितां येतें तें या दक्षिणेंतील शाह्यांना केव्हांहि उत्पन्न करितां आलें नाहीं. मोंगलांशीं भांडून संपावें; किंवा एकमेकांच्या उरावर तरी बसून क्षीणबल व्हावें याशिवाय उत्तेजक विचार कायम राहण्याला त्यांना मार्गच राहिला नव्हता. परकीपणाची भावना मनांत कायम ठेवून लाखों हिंदु लोकांच्या मोठ्या समाजावर शस्त्राच्या जोरावर राज्य करूं पाहणाऱ्या या दक्षिणेंतील शाह्यांना तत्कालीन समाजांत स्वाभाविक व टिकाऊ असें स्थानच नव्हतें. त्यांनीं हिंदु समाजांतला क्षात्रवर्ग स्थानभ्रष्ट केल्यामुळें त्या समाजांतलें एक महत्त्वाचें अंग नाहींसें केलें असेल व त्या समाजांत अत्यंत विस्कळितपणा आणला असेल; पण अशा विस्कळित समाजावर राज्य चालवूं पाहणाराहि संसर्गदोषानें विस्कळितच बनणें अपरिहार्य होतें. कोणत्या ना कोणत्या स्वरूपानें युद्धाचें उत्तेजक वातावरण निर्माण करून त्यांना आपल्या शक्तीचें प्रदर्शन अधूनमधून करितां येई. पण हा जोर आंगचा ह्मणजे टिकाऊ स्वरूपाचा नव्हता, उसना होता. यामुळें दिवसानुदिवस तो कमी पडत गेला; आणि बाहेरून मोंगलांच्या व आंतून वाढत्या हिंदु सरदारांच्या प्राबल्याचें असें दुहेरी संकट दक्षिणेंतील शाह्यांना अडचणी उत्पन्न करूं लागलें.

**५. हिंदु सरदार व मुसलमान मुत्सद्दी**—हिंदु सरदार डोईजड किंवा जबरदस्त बनूं लागले, या गोष्टीची जाणीव दक्षिणेंतील बादशहांना सहजासहजीं होण्याजोगी नव्हती आणि अशी जाणीव जेव्हां होऊं लागली तेव्हां या सरदारांच्या प्राबल्याला अडथळा करणें फारसें शक्य नव्हतें. दक्षिणेंतील किंवा उत्तरेंतील कोणत्या तरी बादशहाचा अंकित ह्मणून व त्याच्या नांवानें, प्रत्येक दरबारांतला राजकीय पक्ष आपल्या प्रतिपक्षास पाडण्याच्या खटपटींत गुंतला होता. उदाहरणार्थ, दिल्लीच्या गादीवर जहांगिराच्या मागून कोणीं बसावें या प्रश्नाचा निकाल करण्यासाठीं मोंगली साम्राज्यांत शहाजाद्यांनीं पुढाकार घेऊन आपलें सैन्य उभारलें होतें. विजापुरांत इब्राहिमाच्या चार बायका आपापल्या मुलाकडे आदिलशाहीचा वारसा यावा ह्मणून धडपडत होत्या आणि निजामशाहींत बुऱ्हाणाचा वजीर ह्मणून मलिकंबर उलाढाली करीत होता. या मोठ्या उलाढालींप्रीत्यर्थ प्रत्येकाला घोडेस्वार बाळगणाऱ्या पराक्रमी मराठे सरदारांची मदत आपल्या कामासाठीं नोकर या नात्यानें पाहिजे होती. आणि अशी मदत करून स्वतः फौजबंद व जबरदस्त बनावें आणि या बळावर थोडीबहुत मानाची जागा पटकवावी असा साधा विचार हिंदु सरदारांच्या मनांत या वेळीं होता. हिंदुधर्म किंवा हिंदुसमाज यांच्या संरक्षणार्थ आपण झटावें अशी जाणीव या वेळच्या हिंदु सरदारांच्या मनांत असल्याचा पुरावा आपल्यापुढें नाहीं; जी विश्वसनीय माहिती उपलब्ध आहे तिच्यावरून तरी त्यांचा आचार एकांडी शिलेदारी थाटाचाच विशेषेंकरून दिसतो. मुसलमानी समाज देखील अधोगतीला लागला होता, कारण त्यांची दृष्टि बादशाहीच्या व्यापक ध्येयावरून ढळून पक्ष किंवा पंथ अशा संकुचित कल्पनांवर येऊन बसली होती. शिवाय राजकारणानिमित्त त्यांनीं कौटुंबिक व नात्यागोत्याचे संबंध पार झुगारून दिल्यामुळें दरबारांत कोणालाहि आपल्या जिवाची शाश्वती वाटेनाशी झाली व राजकारण हा आगीशीं खेळण्यासारखा भयावह प्रकार आहे व त्यांत कोणींहि कोणाचा विश्वास धरूं नये इत्यादि तत्त्वें मुसलमानी राजनीतीचीं प्रधान अंगें होऊन बसलीं होतीं. अशा स्थितींत जाधवराव निजामशाहाची आपल्यावर गैरमर्जी झाली असें लक्षण पाहतांच तें राज्य सोडून मोंगलांच्या आश्रयास गेला याचें आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. मोठमोठे मुसलमान सरदार असेंच करीत होते आणि हिंदु सरदारांनाहि त्याच मार्गाचें अवलंबन करण्यावांचून गत्यंतर नव्हतें. नातेंगोतें अगर राजनिष्ठा यासारख्या विचारांवर विसंबण्याची

सोयच नव्हती. ' जीवन्नरो भद्रशतानि पश्येत् ' या न्यायानें जिवंत कसा राहीन हा विचार प्रथम करावा लागे. मिळून बादशाही कुटुंबांत वारसाचा तंटा, त्या खालच्या मुसलमानांत वजिरीचा तंटा आणि त्यांच्या नोकरींतल्या मराठे सरदारांत वैयक्तिक तंटे असे सर्वत्र तंटेच तंटे माजले होते. तरी शहाजादे व वजीर हे सत्ताधारी असल्यामुळें त्यांच्या तंट्यांतहि संघटना शिल्लक होती; आणि मराठे सरदारांना स्वतःचें असें स्वतंत्र राजकारण अगर पक्ष नसल्यामुळें त्यांच्या घालमिलीचें वरच्या वर्गाला भय वाटण्याचें कारण नव्हतें.

६. **मलिकंबराचा चढेल स्वभाव**—जाधवराव निजामशाही सोडून गेला तो खंडागळे प्रकरणावरून गेला. हत्तीच्या ह्या प्रकरणांत खेळोजी व शहाजी एका बाजूस व जाधवराव दुसऱ्या बाजूस असा देखावा दिसला खरा; पण तो फार दिवस टिकला नाहीं. खेळोजी व शहाजी यांचेंहि वैमनस्य यानंतर लौकरच उघडकीस आलें. खेळोजी व त्याचा भाऊ मालोजी ह्यांच्यांत भाऊबंदी माजून श. १५४४ अखेर वांटणी झाली. तेव्हां मालोजी स्वतंत्रपणें राहूं लागला व इतर भाऊ वयानें लहान असल्यामुळेंच खेळोजीबरोबर राहिले असें दिसतें. पुढें खेळोजीचें शहाजीशीं भांडण होऊन शहाजीला देखील निजामशाही सोडावी लागली. त्याची हकीगत अशी आहे. जाधवराव मलिकंबराचा पक्ष सोडून मोंगलांकडे गेल्यानंतर शहाजहानाचें बंड चांगलें रंगांत आलें. त्या वेळीं जाधवराव प्रथम कांहीं दिवस या बंडांत सामील झाला होता ( ले. १४६ ). पण शहाजहानाला अपयश येऊन दक्षिणेंत पळून जाण्याचा प्रसंग त्याच्यावर आला तेव्हां त्यानें बंडखोर शहाजहानाचा पक्ष सोडून जहांगीर बादशहाचा सेनापति महाबतखान याचा पक्ष स्वीकारला. यानंतर विजापूरकरांतर्फे मुल्ला महमद लारी महाबतखानाकडे बऱ्हाणपूर येथें गेला व ते दोघेहि शहाजादा पर्वीज त्याच्या भेटीस जाण्यासाठीं निघाले; तेव्हां महाबतखानाला हा उलाढाल्या जाधवराव काय काय भानगडी उपस्थित करील याचा नेम नाहीं असें वाटलें; कारण त्यानें जाधवराव व उदाराम यांना बऱ्हाणपुरास ठेवलें. पण जाधवरावाचा मुलगा व उदारामाचा भाऊ यांना त्यानें आपल्याबरोबर ओलीस म्हणून घेतलें ( इकबलनामा इलि. ६ पृ. ४१२ ). यावरून त्या वेळीं सर्व राजकीय व्यवहारांत एकमेकांबद्दल अविश्वास उत्पन्न झाला होता हें चांगल्या रीतीनें प्रत्ययास येतें. पुढें शहाजहान ओरिसा प्रांताकडे निघून गेला तेव्हां महाबतखानाच्या सैन्याला

फुरसत मिळाली व तिचा उपयोग त्यानें दक्षिणेंतील शाह्यांमधील तंटे वाढविण्याच्या कामीं केला. या वेळीं विजापूरकर व निजामशाही मलिकंबर यांच्यांतील सलोखा पूर्णपणें लयास जाऊन दोघेहि एकमेकांचा पाडाव करण्यासाठीं डावपेंच लढवीत होते; एवढेंच नव्हे तर या कामांत मोंगलांनीं आपल्या बाजूस मदत करावी या हेतूनें मोंगली सेनापतीची मनधरणी करण्यासाठीं दोघांकडील वकील बऱ्हाणपुरास गेले होते. महाबतखानानें प्रथम आपल्या मनाचा ठाव कोणासच लागूं न देतां दोघांच्याहि वकिलांशीं बोलणें चालू ठेवलें. आणि शहाजहान ओरिसा प्रांताकडे गेला अशी पक्की बातमी आल्यावर 'आम्ही आतां विजापूरकरांची बाजू घेणार' असें त्यानें एकदम जाहीर केलें. यामुळें मलिकंबरावर विजापूरकर व मोंगल यांच्या संयुक्त सैन्याशीं झगडण्याचा प्रसंग आला; तथापि लढाईच्या, डावपेंचांच्या व दंगलीच्या वातावरणांत त्यानें जन्म घालविला असल्यामुळें व स्वभावतः प्रत्युत्पन्नमति असल्यामुळें आणीबाणीच्या वेळीं त्यानें अशी नामी युक्ति योजली कीं, आदिलशाही व मोंगली अशा दोन्ही सैन्यांचा त्याला फन्ना उडवितां आला. या वेळच्या भातवडीच्या युद्धांत त्यानें काय डाव योजला व त्यांत शहाजीची एका मोंगली सरदाराशीं गांठ पडून शहाजीनें कसा पराक्रम गाजविला इत्यादि हकीकत अन्यत्र आली असल्यामुळें येथें देण्याचें कारण नाहीं. पण युद्धांत कुशल असून देखील मलिकाचा स्वभाव चढेल व बेफिकीर बनत चालला होता हें लक्षांत घेणें जरूर आहे. युद्धांत जय मिळत गेल्यामुळें त्याचा लौकिक व दरारा परराज्यांत वाढला, पण चढेल स्वभावामुळें निजामशाहींतली घडी विस्कळित होत चालली व भांडणें वाढलीं. विजापूरकर व जाधवरावांसारखे सरदार यांचा स्नेह तर त्यानें गमावलाच होता. पण भातवडीच्या युद्धानंतर हातांत सांपडलेल्या कैद्यांची त्यानें जी अप्रतिष्ठा व कत्तल केली तिच्यामुळें व्यक्तिशः मलिकंबराचा व निजामशाहीचा नायनाट करण्याची सुडाची बुद्धी त्यानें या वेळीं विजापूर व दिल्ली येथील दरबारांत उत्पन्न केली. विजापूरकरांचा सेनापती मुल्ला महमद हा जखमी होऊन मलिकंबराच्या हातीं सांपडला होता. त्याची मलिकंबरानें धिंड काढून व अत्यंत अप्रतिष्ठा करून त्याला फांशीं दिलें. यामुळें या मुल्लाचा जांवई मुस्तफाखान यानें निजामशाही व मलिक अंबर यांना धुळीस मिळविण्याची प्रतिज्ञा या वेळीं केली व पुढें मुस्तफाखान विजापूर दरबारांत अधिकारारूढ झाला तेव्हां त्यानें ती शब्दशः खरी करून दाखविली.

**७. आधार-निर्देश**—बखरकारांनीं लिहिलेल्या मजकुरावरून शहाजी-चरित्र लिहिणें योग्य नाहीं ही गोष्ट प्रथम डफ्च्या लक्षांत आली व 'आपण खाफीखानाच्या इतिहासांतील हकीकत जमेस धरून इ. १६०० ते इ. १६३६ पर्यंतचा भाग ( शहाजीचरित्राचा पूर्वार्ध ) लिहिला' असें त्यानें सांगितलें आहे (पृ. ८२ टीप). त्यानंतर प्रो. सरकार यांनीं १९१७ सालीं मॉडर्न रिव्ह्यूच्या सप्टेंबरच्या अंकांत 'शहाजी भोसल्याचा उदय' या मथळ्याखालीं एक लेख लिहिला. त्यांत 'बुसातिनुस्सलातीन' (= विजापूरचा इतिहास ) व 'पादिशाहनामा' (शहाजाहानच्या कारकीर्दीचा वर्षवारीनें लिहिलेला इतिहास ) या दोन फारसी ग्रंथांचा आधार घेतला आहे. पुढें श. १८४० मध्यें वासुदेवशास्त्री खरे यांनीं 'मालोजी व शहाजी' या निबंधांत जेधे-शकावलींत दिलेल्या मित्या विश्वसनीय दिसतात हा मुद्दा प्रामुख्यानें मांडला. आणि कै. राजवाडे यांनीं श. १८४४ ( इ. १९२२ ) मध्यें राधामाधव-विलासचंपूच्या प्रस्तावनेंत शहाजीच्या कर्तबगारीची आंखणी केली. 'ही आंखणी ( १ ) बृहदीश्वराच्या देवालयांतील शिलालेख, ( २ ) शिवदिग्विजय, ( ३ ) शिवाजीप्रताप, ( ४ ) बसातिने सलातीन व ( ५ ) साने-प्रकाशित शहाजी महाराजांची कैफियत या ग्रंथांवरून व इतर कांहीं टिप्पणां-वरून व पत्रांवरून करतों' असें त्यांनीं प्रस्तावनेंत विवेचनाच्या सुरुवा-तीस ( पृ. ३९ ) सांगितलें आहे. अलीकडे शिवजन्मतिथीचा वाद उपस्थित झाल्यानंतर श. १८४७ मध्यें शिवचरित्रप्रदीपांत 'शहाजी व शहाजहान' या मथळ्याखालीं ( पृ. २२८-२५० ) व श. १८४९ मध्यें शिवभारताच्या प्रस्तावनेंत प्रस्तुत लेखकानें जेधे-शकावली, शिवभारत व मराठींतलीं सम-कालीन पत्रें यांच्या आधारावर लेखन केलें असून, रियासतकार रा. सरदेसाई यांनीं 'शहाजीचा पूर्वायुःक्रम' या मथळ्याखालीं श. १८४९ ( इ. १९२७ ) मध्यें कांहीं मुद्यांची जुळवाजुळव केली आहे; पण एखाद्या आधाराकडे विशेष लक्ष वेधण्याचें काम त्यांनीं त्यांत केलें नाहीं. गेल्या शंभर वर्षांत शहाजीचरित्राचा पूर्वार्ध लिहिण्याच्या कामीं निरनिराळ्या लेखकांनीं केलेल्या आधारनिर्देशाची हकीकत ही अशी आहे. प्रत्येक लेखकानें पूर्वीच्या लेखकांची खटपट जमेस धरून नवीन आधाराकडे लक्ष वेधण्याची खटपट केल्यामुळें, अमूक मुद्यांवर पूर्वीच्या लेखकांशीं 'माझें मत जुळतें' व अमूक प्रश्नांवर 'माझा मतभेद आहे' असें सांगण्याचा पर्यायानें

प्रयत्न केला आहे. यामुळें कांहीं मुद्यांवर सर्वांचें ऐकमत्य झालें असून, इतर ठिकाणीं कोणता आधार कोणत्या मुद्यावर किती विश्वसनीय मानावा, म्हणजे आधारांचें तारतम्य कसें ठरवावें यासंबंधीं वादग्रस्त स्थिती राहिली आहे. उदाहरणार्थ शहाजी श. १५४९ ( इ. १६२७ ) नंतर निजामशाहींत होता, तेथून तो कांहीं दिवस मोंगलांचा मनसबदार बनला, पुढें मोंगलांचा आश्रय सोडून स्वतंत्रपणें नवी निजामशाही उभारण्याची त्यानें खटपट केली आणि श. १५५८ (इ. १६३६ ) मध्यें तो आदिलशाही नोकर बनला या गोष्टी डफ्‌पासून आजपर्यंतच्या वर सांगितलेल्या सर्व लेखकांना मान्य आहेत. यांतली एकहि गोष्ट बखरींतील वृत्तांतांत व्यवस्थितपणें नमूद नाहीं एवढेंच नव्हे; तर त्यांत दिलेल्या हकीकतीशीं सर्वस्वीं विरुद्ध आहे. तरी देखील त्यावर वरील आधुनिक लेखकांचें ऐकमत्य आहे. याचें कारण हीं त्रिधानें प्रत्यंतर व विश्वसनीय पुराव्यानें सिद्ध होत आहेत. यामुळें वादाचें क्षेत्र मर्यादित झालें आहे. श. १५५० ते श. १५५८ पर्यंतच्या शाहाजीचरित्रासंबंधीं वादाचा महत्त्वाचा असा मुद्दा राहिला नसून श. १५४९ अखेरपर्यंत शहाजी काय करीत होता याविषयींचा काय तो वाद राहिला आहे. त्यांतहि 'मलिकंबराच्या हयातींत शहाजी महत्त्व पावला नव्हता व फत्तेखानाच्या अमदानींत तो मोठ्या हुद्यावर पोंचला व त्याचा पहिला विश्वसनीय उल्लेख श. १५५० ( इ. १६२८ ) मधला सांपडतो ' इत्यादि विवेचन ( मॉ. रि. १९१७ सप्टेंबर व शिवाजीचरित्र आ. २ पृ. १८) करून शहाजीचें त्यापूर्वीचें चरित्र जमेस धरण्याजोगें नाहीं किंवा उपलब्ध नाहीं असें प्रो. सरकार यांनीं एकट्यांनीं मात्र गृहीत धरलें आहे. पण इतर सर्व लेखकांना हें अमान्य आहे. डफ्‌नें शहाजीची हालचाल श. १५४२ ( इ. १६२० ) पासून सांपडते (पृ. ८२) असें म्हटलें आहे व शहाजी खानजहान लोदीच्या बंडांत सामील होता (पृ. ८६) असें सांगून श. १५५० (इ.१६२८)च्या पूर्वींच्या महत्त्वाच्या राजकीय घडामोडींशीं त्याचा संबंध जोडिला आहे. कै. राजवाडे यांनीं चंपूच्या प्रस्तावनेंत या मुद्याचा विशेष विचार करून श.१५४२ पासून शहाजीची हालचाल मान्य केली व तंजावरच्या शिलालेखाच्या आधारें ( १ ) शहाजी श. १५४६ (इ. १६२४ ) तील भातवडीच्या युद्धांत होता आणि नंतर ( २ ) तो आदिलशाहींत गेला होता हे दोन मुद्दे नव्यानें प्रतिपादन केले. रा. सरदेसाई यांनीं यांपैकीं पहिला मुद्दा

मान्य करून दुसऱ्याविषयीं संशय प्रदर्शित केला आहे (' शिवसंस्मृति, ' पृ. १४८–४९). प्रस्तुत लेखकाच्या मतें राजवाडे यांचीं दोनहि विधानें साधार आहेत; परंतु शहाजी निजामशाहींतून आदिलशाहींत गेल्याचा काळ एकदां श. १५४७ ( पृ. ५४ ) व पुनः श. १५४८ अखेर असा ते निरनिराळा मानतात. तो एकदांच म्हणजे श. १५४७ च्या अखेरीस धरला पाहिजे. याखेरीज शहाजीचा जाधवरावानें पाठलाग केला असें कै. खरे, राजवाडे व सरदेसाई गृहीत धरतात; पण तें डफ् व सरकार ( आ. १, पृ. २३ ) यांना मान्य नाहीं. याखेरीज शिवजन्मतिथीविषयींच्या वादाचें स्वरूप मराठी वाचकांना तरी माहीतच आहे. येथवर शहाजीचरित्राच्या पूर्वार्धाची मांडणी करतांना कोणीं कोणते आधार घेतले, कोणत्या मुद्यांवर एकवाक्यता आहे व कोणते मुद्दे वादग्रस्त राहिले आहेत तें सांगितलें. आतां ह्या वादग्रस्त मुद्यांचा निर्णय कसा होऊं शकेल याचा विचार करूं.

८. **आधारांची निवड**—वादग्रस्त मुद्यांचा निकाल करावयाचा म्हणजेच कोणता आधार जास्त विश्वसनीय मानावा याचा निर्णय करावयाचा. वाद उपस्थित होतो तो दोन कारणांनीं होऊं शकतो. ( १ ) एका आधारांतील विधान दुसऱ्या आधारांत नसलें म्हणजे पहिला प्रकार संभवतो. आणि (२) एकाच मुद्यावर दोन लेखांत एकमेकांविरुद्ध विधानें असलीं म्हणजे त्यांपैकीं कोणाचें म्हणणें जास्त ग्राह्य मानावें असा प्रश्न उपस्थित झाल्या वेळीं दुसरा प्रकार संभवतो. संक्षेपासाठीं ' अनुल्लेख ' व 'मतभेद' या शब्दांनीं वर सांगितलेल्या कारणांचा निर्देश करण्यास हरकत नाहीं. पैकीं अनुल्लेखाला स्वतः-प्रामाण्य नाहीं; म्हणजे समबल अशा दोन ग्रंथांपैकीं एका ग्रंथांत विशिष्ट विधान नाहीं, त्या अर्थी ती गोष्ट झालीच नाहीं असें प्रतिपादन करतां येत नाहीं. एका विश्वसनीय ग्रंथांत विशिष्ट विधान असलें तरी तें संभाव्य कोटींतलें धरून त्यास प्रत्यंतर पुरावा आहे किंवा नाहीं व दुसऱ्या ग्रंथांत तें नसण्याचें कारण सांपडतें किंवा काय असे दोन प्रश्न स्वतंत्रपणें सोडविले पाहिजेत. उदाहरणार्थ, शहाजीची कर्तबगारी केव्हांपासून दिसूं लागली हा प्रारंभींचा मुद्दाच घेऊं. पादशहानाम्याची गणना विश्वसनीय आधारांत असून श. १५५० ( इ. १६२८ )च्या पूर्वींचा शहाजीचा उल्लेख त्यांत आढळत नाहीं. व डफूनें पाहिलेला मराठी कागद व शिवभारत यांत त्याच्या कर्तबगारीचा स्पष्ट उल्लेख आहे. अशा स्थितींत एका ठिकाणच्या अनुल्लेखानें दुसऱ्या ठिकाणचा उल्लेख

बाधित धरावा किंवा कसें याचें उत्तर मिळण्यास दोन निरनिराळे प्रश्न सोडवावे लागतात. असें न करतां पादशहानाम्यांत तसा उल्लेख आढळला नाहीं एवढ्यावरून शहाजी त्यापूर्वी किरकोळ शिलेदारांपैकीं असला पाहिजे असा तर्क प्रो. सरकार करतात; पण ही पद्धति बरोबर नाहीं. शहाजीची कर्तबगारी शोधून तिचें वर्णन करणें हा मुळीं पादशहानाम्याचा मुख्य हेतूच नव्हे. शहाजहानाची सालवारीनें हकीकत सांगण्यासाठीं हा ग्रंथ लिहिला गेला. यामुळें शहाजीचे सर्व उल्लेख त्यांत सांपडले पाहिजेत हें म्हणणें योग्य नव्हे. ज्या ठिकाणीं मोंगलांशीं शहाजीचा स्वतंत्रपणें संबंध आला तेथें पादशहानाम्यांत तो आढळला आणि इतर उल्लेख त्यांत न आढळले तरी यामुळें सदर ग्रंथाला कमीपणा येत नाहीं. उलटपक्षीं शहाजी व शिवाजी यांच्या चरित्रांतले महत्त्वाचे व गौरवपर प्रसंग वर्णन करण्यासाठींच जो ग्रंथ समकालीन लेखकानें लिहिला व ज्यांतील इतर विधानें प्रत्यंतर पुराव्यानें सिद्ध होत आहेत त्या ग्रंथांतली शहाजीसंबंधींची माहिती त्यांतील उल्लेखांवरून निश्चितप्राय कोटींतली आहे असें गृहीत धरून प्रत्यंतर पुरावा मिळतांच ती पूर्णपणें निश्चित मानली पाहिजे हें उघड आहे. सारांश, सरकार यांनीं अनुल्लेख हें स्वतंत्र प्रमाण धरलें आहे; पण वरील कारणामुळें तसें करणें चुकीचें ठरतें.

९. **मतभेद**—दुसरा प्रकार मतभेदाचा. तो उपस्थित झाल्यावेळीं एकंदरींत कोणता ग्रंथकार अधिक विश्वसनीय आहे व विशिष्ट मुद्याची विश्वसनीय माहिती त्यांपैकीं एखाद्याला मिळाली होती किंवा काय असे दोन निरनिराळे मुद्दे विचारांत घेऊन निर्णय केला पाहिजे. बऱ्याच ठिकाणीं ज्याचीं विधानें विश्वसनीयतेच्या कसोटीस उतरलीं त्याचीं इतर विधानें निश्चितप्राय (Probable) कोटींतलीं धरतां येतील; पण तीं पूर्णपणें निश्चित (Certain) असलीं पाहिजेत असें म्हणतां येत नाहीं. त्याचप्रमाणें बखरींतलीं बरींच विधानें चुकीचीं असलीं तरी त्यांतलें प्रत्येक विधान चुकलें असें म्हणतां येणार नाहीं; अगदीं बिनचुक माहिती एखाद्या विशिष्ट मुद्यावर त्या ग्रंथांत समाविष्ट झालेली असणें शक्य (Possible) आहे. हें लक्षांत घेऊन मतभेदाच्या ठिकाणीं सामान्यपणें ग्राह्याग्राह्यता व विशिष्ट माहितीची शक्यता पाहून नंतर उत्तर दिलें पाहिजे. उदाहरणार्थ, चिटणिसांच्या बखरीपेक्षां सभासदी बखर अधिक विश्वसनीय आहे हें सामान्य विधान खरें आहे; पण आग्र्याहून आल्यानंतर व सुरतेची लूट झाल्यावर शहाजी मरण पावला या सभासदाच्या विधानापेक्षां जयसिंग-

प्रसंगापूर्वींच शहाजी वारला हें चिटणिसाचें विधान प्रत्यंतर पुराव्यामुळें अधिक ग्राह्य मानावें लागतें. अशा प्रकारें अनुल्लेख व मतभेद या दोन कारणांनीं उद्भवलेल्या वादांचा निकाल लागण्यास कोणत्या पद्धतीनें गेलें पाहिजे याचें दिग्दर्शन केलें. यानंतर वादापैकीं एक बाजू प्रत्यंतर पुराव्यानें स्वतंत्रपणें सिद्ध झाल्यानंतर देखील अग्राह्य म्हणजे चुकीचें विधान दुसऱ्या ग्रंथकारानें कां केलें हा प्रश्न शिल्लक राहतो; आणि तो सोडवितां आल्यास जरूर प्रयत्न करावा. परंतु तो सुटला किंवा न सुटला म्हणून पूर्वींच्या ग्राह्या-ग्राह्यतेच्या निर्णयास बाध येऊं शकत नाहीं. उदाहरणार्थ, शिवजन्माचा काल जेधे-शकावलींत श. १५५१ व बखरींत १५४९ असा निरनिराळा दिला आहे. त्यांपैकीं प्रत्यंतर पुराव्यानें पहिला ग्राह्य ठरल्यानंतर बखरकारांनीं तरी दुसरा शक कां दिला याचें संशोधन करावयाचें काम शिल्लक राहतें. पण तें शिल्लक राहिलें म्हणून पहिला निर्णय त्यानें संशयित कोटींत घाल-ण्याचें कारण नाहीं. अमूक विधान चुकलें आहे किंवा नाहीं याचा शोध करणें हा प्रश्न निराळा आणि तें चुकलें असें ठरल्यानंतर त्या चुकीची व्युत्पत्ती लावीत बसणें हें निराळें. कारण, पहिलें विधान बरोबर ठरलें किंवा चुकीचें ठरलें म्हणून तेवढ्यावरून दुसरें चुकीचें किंवा बरोबर असलेंच पाहिजे असें ठरत नाहीं; कदाचित् दोनही चुकीचीं असतील किंवा दोन्हींत विरोध आहे हा समज चुकीचा ठरून दोनहि बरोबर असतील. सारांश, अनुल्लेख व मतभेद यांपैकीं कोणत्या सदरांत वादाचा मुद्दा पडतो हें प्रथम ठरविल्यावर त्याचा निकाल करण्यास कोणत्या पद्धतीनें जावें याची दिशा येथवर सांगितली. अर्थात् हा खटाटोप अस्सल व विश्वसनीय पत्राचा पुरावा ज्या ठिकाणीं नसेल तेथें करावयाचा असतो. विश्वसनीय पत्र मिळालें म्हणजे वादच रहात नाहीं; कारण अशा पत्रांतील विधानाला स्वतःप्रामाण्य असतें.

**१०. शहाजी व मलिकंबर**—शहाजी स्वतंत्रपणें आपल्या जहागिरीचें काम पाहूं लागला त्या सुमारास म्हणजे श. १५४२ (इ. १६२०–२१) मध्यें मोंगल व मलिकंबर यांच्यांत ( बालाघाटचें ) युद्ध चालू होतें व त्यांत प्रथम मलिकंबराचा जय झाला; पण शेवटीं मोंगली सैन्यानें अंबराची नवी राजधानी खिडकी उर्फ फत्तेनगर शहर हस्तगत करून त्याचा विध्वंस केला; तेव्हां ५० लाख खंडणी भरून व १४ कोस मुलूख देऊं करून अंबराला मोंगलांशीं

तह करावा लागला (जहांगिरचें आत्मचरित्र, खं. २, पृ. २०७।२०८). या युद्धांत लुखजी जाधवराव, शहाजी व निंबाळकर[1] हे हजर होते ही माहिती नमूद करतांना फलटणचे निंबाळकर विजापूरकरांचे अंकित असतां निजामशाही सैन्यांत मित्रत्वाच्या नात्यानें कसे सामील झाले याविषयीं डफनें आश्चर्य प्रदर्शित केलें आहे; कारण त्याच्या मतें दक्षिणेंतील शाह्यांनीं मोंगलांविरुद्ध एकजुटीचा सलोखा केला होता अशाबद्दल प्रमाण उपलब्ध नाहीं. पण त्याची ही शंका अनाठायीं आहे. कारण या वेळच्या राजकीय सरहद्दी पाहिल्या असतां निंबाळकरांचें फलटण हें निजामशाहीमध्येंच समाविष्ट झालेलें असावें असें दिसतें. वणंगपाळ पुंड होता हें विधान करण्यानें त्याच्या धोरणामध्यें सुसूत्रपणा असणें अशक्य होतें असें ध्वनित करण्याचें डफच्या मनांत असेल तर ह्या पुंडाव्याची मुदत अस्सल आधारावरून या युद्धाच्या पूर्वीं १० वर्षांपेक्षां अलीकडे येऊं शकत नाहीं. त्यांतून निंबाळकर हे आदिलशाही सरदार होते असेंहि डफच्या म्हणण्याप्रमाणें एक वेळ मानिलें, तथापि आदिलशाही व निजामशाही यांचा सलोखा असल्याची जी वर सात वर्षांची मुदत सांगितली तीमध्येंच हें युद्ध पडत असल्यामुळें या युद्धांत वणंगपाळ निजामशाहीच्या बाजूनें लढणें हें मुळींच अशक्य नाहीं.

बालाघाटच्या युद्धानंतर लौकरच खंडागळ्याच्या हत्तीचें प्रकरण घडलें. आणि पुढें श. १५४३ मध्यें लुखजी जाधवराव निजामशाही सोडून मोंगलांच्या आश्रयास गेला (ले. १४३ व १४६); आणि त्याच वेळीं मलिक व इब्राहिम यांमधील सलोखा संपून (ले. १५२) प्रत्यक्ष एकमेकांशीं युद्ध सुरू झाल्यामुळें मलिकानें मोंगलांशीं स्नेह जोडण्याचा प्रयत्न

१. या निंबाळकराचें नांव जगपाळ असें असून तो या वेळीं मारला गेला अशी तोंडी माहिती डफला बानराव नाईक निंबाळकरांनीं सांगितली (डफ पृ.८२). पुढें तो म्हणतो:—

'Though the Naiks of Phultun held their jagheer from the Beejapoor Government, this circumstance affords no satisfactory evidence of Ibrahim Adilshah's having assisted Mullik Umber or that there was a general confederacy against the Mughuls. From the character of Jugpal who according to the family legends, was always present where there was hunting or fighting, he may have joined without the authority of his government.'

केला. तेव्हां जाधवरावाला मोंगलांकडे राहणें धोक्याचें होऊं लागलें होतें. पण श. १५४४ मध्यें शहाजहानाचें बंड सुरू झाल्यामुळें मोंगलांत दोन पक्ष पडले. आणि जहांगिराचा पक्ष मलिकानें धरला त्या वेळीं जाधवरावाला बंडखोर शहाजहानाचा पक्ष धरतां आला. मलिकंबराला या वेळीं विजापूर-करांशीं युद्ध करावयाचें असल्यामुळें त्यानें मोंगलांचें शाब्दिक कां होईना पण अंकितत्वहि मान्य केलें होतें ( ले. १९७ ). यामुळें बंडखोर शहा-जहान आश्रयार्थ निजामशाही मुलखांत आला तेव्हां मलिकाला त्याला आश्रय देतां आला नाहीं म्हणून त्याला कुतुबशाहींत जावें लागलें (ले. १९९). मलिक व मोंगल यांमधील सलोखा अर्थात् विजापूरकरांना अत्यंत घातुक झाला असता. यासाठीं त्यांनीं खंडणी देऊन आणि भीड घालून मलिकाची बाजू सोडण्यास व आपली बाजू घेऊन उलट मलिकाशीं युद्ध करण्यास मोंगलांना प्रवृत्त केलें. याच सुमारास जाधवराव शहाजहानाचा पक्ष सोडून जहांगिराच्या म्हणजे मोंगलांच्या बादशाही पक्षास मिळालेला आढळतो [ वेणीप्रसाद, जहांगीर ]. यावरून तंजावरच्या शिलालेखांत सुचविल्याप्रमाणें मोंगल व विजापूरकर यांचा हा सलोखा घडवून आणण्यांत जाधवरावाचें अंग होतें असें म्हणण्यास हरकत दिसत नाहीं ( पृ. ८।९ ). या सलोख्याचें पर्यवसान भातवडीच्या युद्धांत झालें. या युद्धप्रसंगीं शहाजी मलिकंबराच्या बाजूस उभा असला तरी त्याची स्थिति मोठी अडचणीची होती. त्याचा सासरा जाधवराव मोंगलांना मिळाल्यामुळें शहाजीच्या निष्ठेविषयीं देखील निजामशाही दरबारांत शंका उत्पन्न होणें स्वाभाविक होतें. त्या काळीं मराठ्यांचा स्वतंत्र असा राजकीय पक्ष नव्हता. यामुळें नात्याच्या व भाऊ-बंदकीच्या संबंधांस त्यांच्या विचारांत प्राधान्य दिलें जात असे. अशा स्थितींत जाधवराव मोंगलांना मिळून निजामशाही मुत्सद्यांशीं शत्रुत्व करूं लागला व खेळोजी मलिकंबराच्या गळ्यांतला ताईत बनला. तेव्हां शहाजीचा ओढा सासऱ्याच्या बाजूस आहे किंवा चुलत भावाकडे आहे याचा निर्णय करणें कठीण होतें. स्वतः शहाजीच्या मनाची या वेळीं अनिश्चित स्थिति असावी असें प्रत्यक्ष घडलेल्या प्रकारावरून दिसतें. भातवडीच्या युद्धांत तो निजामशाहींत होता व नंतर आदिलशाहींत गेला त्या अर्थीं आदिलशाहीशीं

---

† Domestic affairs have great influence on the public conduct of Marathas ( डफ पृ. १०२. ).

त्याचें अंतस्थ राजकारण पूर्वीपासून चालू असलें पाहिजे असें अनुमान करण्यास हरकत नाहीं.*

**११. शहाजी विजापूरकडे जातो**—भातवडीच्या युद्धानंतर श. १५४७ मध्यें शाहाजी विजापूरकरांकडे गेला ही गोष्ट कै. राजवाडे यांनीं, चंपूच्या प्रस्तावनेंत शिलालेखाच्या आधारें, प्रथम दाखवून दिली (पृ. ५४). तथापि तिच्या सत्यतेविषयीं कित्येकांनीं संशय प्रदर्शित केला आहे. मलिकंबर मेल्यानंतर फत्तेखानाच्या अमदानींत इ. स. १६२८ च्या सुमारास शहाजी महत्त्वास पोंचला, व पुढें बलिष्ठ बनला. पण त्यापूर्वी तो किरकोळ पथक्या ( Petty Chieftain ) असला पाहिजे, असें प्रो. सरकार यांनीं बारा वर्षांपूर्वी आपलें मत मॉडर्न रिव्ह्यूच्या लेखांत प्रदर्शित केलें व शिवाजी-चरित्राच्या तिसऱ्या आवृत्तींत त्यांनीं पुनः तेंच मत कायम असल्याचें लिहिलें आहे. याचें कारण राजवाडे यांनीं लिहिलेला मजकूर बहुधा त्यांच्या लक्षांतच आलेला नाहीं असें दिसतें. रिसायतकार रा. सरदेसाई यांनीं मात्र शहाजी या वेळीं विजापुराकडे गेला हा मुद्दा पुढें आणून त्याविषयीं संशय प्रदर्शित केला आहे.

राजवाडे यांनीं शहाजी विजापुराकडे गेला असें सांगून नंतर जाधवरावाचा पाठलाग घडविण्यासाठीं त्याला निजामशाही मुलखांत परत आणलें आहे तेंहि निराधार वाटतें. याकरितां या वेळीं शहाजी विजापूरकरांच्या नोकरींत गेला किंवा नाहीं, गेला असल्यास कोणत्या हेतूनें गेला व आदिलशाही सोडून तो पुनः निजामशाहींत केव्हां आणि कोणत्या कारणाकरितां आला इत्यादि प्रश्नांचा साधकबाधक प्रमाणांच्या दृष्टीनें विचार केला पाहिजे. शहाजी श. १५४७ च्या सुमारास किरकोळ पथक्या नसून महत्त्वाचा सेनापती होता व तो इब्राहिम आदिलशहाकडे जाऊन मिळाला हे राजवाडे यांचे मुद्दे अस्सल पत्रांनीं सिद्ध होत असल्यामुळें त्यांविषयीं संशयास जागाच राहात नाहीं. खुद्द शिवाजीमहाराजांचेंच पत्र याविषयीं उपलब्ध असून त्यांत इब्राहिम आदिलशहाच्या कारकीर्दींत शहाजी विजापूरकरांकडे गेला असें स्पष्टपणें उल्लेखिलेलें आहे.

---

* 'हफ्त कुरसी' या अप्रकाशित फारशी शकावलींत हिजरी १०३३ त (१५४५ कार्तिक ते १५४६ आश्विन) 'शहाजी वजीर यावर अवळच्या दरबारी माणसाइतका विश्वास आहे' अशा अर्थाची नोंद आहे.

मालोजी घोरपड्याला पाठविलेल्या पत्रांत महाराज मागली हकीकत प्रसंगानुरोधानें सांगतांना म्हणतात " पूर्वीं निजामशाहींतून आमचे बाप कैलासवासी महाराज ( शहाजी ) इभराइम आदिलशहा पादशहाचे कारकीर्दीस इकडे आले. त्यास इभराइम आदिलशहानें पादशाही कारभाराचा मदार ( जबाबदारी ) महाराजाचे सिरी टाकिला. तेव्हां महाराजानें हा विचार केला कीं, ' पादशाही मदार आपले हातास आला असता आधीं तो आपले जातीचे लोक मराठे याला हातीं धरून सरदारकी करून पोटे भरतात ते पादशाही वजीर करावे. पादशाही कामें याजकडून करवून नामोश [ कीर्ती ] इज्जती थोर पावेत ते करावे. ' म्हणून तुमचे बाप बाजी घोरपडे सरदारकी करून होते ते आणून पादशहास भेटवून पादशाही वज़ीर केले. " [ ले. १९०१].

यावरून इब्राहिम आदिलशाहाच्या कारकीर्दींत शहाजी विजापुराकडे गेला याविषयीं शंका रहात नाहीं. अस्सल पत्रानें निश्चित होणारें हें शहाजीचें स्थलांतर इब्राहिमाच्याच कारकीर्दींत झालें ही माहिती शिवभारत व तं. शिलालेख यांतच दिलेली आहे. याचा उल्लेख उत्तरकालीन बखरींत व मोंगली इतिहासांत नाहीं. यामुळें डफ् व सरकार यांच्या लक्षांत तो आला नाहीं.

आतां शहाजीच्या या स्थलांतराचा कालनिर्णय करतां येतो तो असा. या अवधींतलीं शहाजीनें लिहिलेलीं ३ पत्रें उपलब्ध असून तिहींतहि त्याला ' सरलष्कर ' हें उपपद जोडलेलें आहे. हा किताब भातवडीच्या लढाईंत विजापूरकरांच्या बाजूनें आलेल्या मुल्ला महमद लारी या प्रमुख सेनापतीला होता ( मोडक पृ. १४७ ). व तो सेनापती या लढाईंत मारला गेल्यानंतर तो शहाजीच्या नांवापुढें आढळतो. त्यावरून असें म्हणतां येतें कीं, १५४७ च्या श्रावणांत शहाजीनें विजापूरकरांच्या सैन्याची मदत घेऊन पुणें परगणा व्यापला व कर्यात पाटसवर चाल करण्याचा रोख धरला होता ( ले. २२२ ). परंतु निजामशाही सैन्यानें साबाजी अनंताच्या आधिपत्याखालीं या विजापूरकरांच्या सैन्यावर चाल केली व ' साहाजी भोसला आदिलशाही ' याला गोसमाल दिली म्हणजे शिक्षा केली व ' गनीमाच्या ' ( विजापूरकरांच्या ) सैन्यास सालपा घांटांत कोंडलें; हा प्रकार मार्गशीर्षापूर्वी म्हणजे बहुधा अश्विनांत झाला (ले. २२५). पुढें शहाजी विजापूरच्या दरबारांत पोंचून त्याच्या मध्यस्थीनें मोहित्यांना कर्यात तळबीड

व पन्हाळा या बाजूचे हक्क मिळाले ( ले. २२६ ). यानंतर आदिलशाही व निजामशाही सैन्यांची खडाजंगी पुढील ५-६ महिन्यांत चालू होती तींत शहाजीनें मलिकंबराच्या सैन्याचा पराभव केला ( भा. ५-१४ ). माघामध्यें साबाजीपंताच्या सैन्यांत राहून ३०० लोकांनिशीं कानदखोऱ्याचा देशमूख चाकरी करीत होता त्याचा बाप कान्होजी या मसलतींत खर्चला ( ले. २२७ ). याच वर्षी मलिकंबरानें सोलापूर महाल कबज केला ( ले. २२४). किल्ला जिंकण्याच्या खटपटींतहि तो होता; पण तें काम पुरें न होतां तो मरण पावला ( ले. ४३१ ). त्यापूर्वी शहाजीच्या आधिपत्याखालीं विजापूरकरांच्या सैन्यानें निजामशाही सैन्याचा पराभव केला ( भा ५-१५ ). यानंतर मुधोजी फलटणकरानें आदिलशाही राज्यावर चाल केली होती त्याचा पराभव शहाजीनें केला ( भा. ५-१८ * ). याशिवाय केरळ प्रांतापर्यंत स्वारी करून शहाजीनें या वेळीं पुष्कळ लूट मिळवून आणिल्यामुळें इब्राहिम त्याच्यावर फार खूष झाला. तथापि शहाजीचें विजापुरांतलें आसन ज्या दोन पायांवर उभारलें गेलें होतें ते दोनहि पाय यानंतर ढासळून पडल्यामुळें शहाजीला पुन: आदिलशाही सोडून वणवण करीत हिंडण्याचा प्रसंग आला. समान शत्रुत्वाच्या भावनेमुळें इब्राहिम व शहाजी यांचें सूत जमलें होतें. पण ही शत्रुत्वाची भावना ज्या व्यक्तीच्या द्वेषावर उभारली होती तो मलिकंबर श. १५४८ च्या वैशाखांत मरण पावला. आणि त्यानंतर १। वर्षांनीं इब्राहिमहि मेला. यामुळें निजामशाहींतला शहाजीचा शत्रु व आदिलशाहींतला आश्रयदाता असे दोघेहि नाहींसे झाल्यामुळें आपण आदिलशाहींत रहावें किंवा परत निजामशाहींत जावें याविषयीं शहाजीच्या मनांत चलबिचल सुरू झाली. वैयक्तिक संबंधावर सर्व राजकारणाची इमारत त्या काळीं उभी करण्याची वहिवाट असल्यामुळें दोन महत्त्वाचे राजकारणी पुरुष मरण पावलेले पाहून शहाजीचें मन साशंक होणें साहजिक होतें. याखेरीज विजापुरांत परदेशी उर्फ कडव्या धर्मपंथाचें वर्चस्व पहिल्यापासून होतेंच. त्याला इब्राहिमानें मोठ्या शिकस्तीनें आळा घातला

---

* भातवडीच्या युद्धांत मुधोजी निजामशाही सैन्यांत होता. आणि या वेळीं देखील तो आदिलशाहीविरुद्धच आहे. यावरून फलटणकर निजामशाही राज्यांतले असावे असें वाटतें.

होता. तथापि त्या दरबारांतील शिष्ट मुत्सद्यांना इब्राहिमाचीं धर्मविषयक मतें बिलकुल मान्य नव्हतीं. गायनाच्या नादानें सरस्वतीची पूजा करणें, हिंदु सरदारांना महत्त्वाच्या लष्करी जागा देणें वगैरे प्रकारांमुळें ' अकबराप्रमाणें इब्राहिमानें महमदी धर्माचा परित्याग केला ' अशी ओरड,कडव्या पंथानें अनेक वेळां केली (मो. पृ. १४८). पण इब्राहिमानें या ओरडीला भीक घातली नाहीं. त्यानें आपल्या कारकीर्दीच्या उत्तरार्धांत हिंदूंशीं सलोखा राखण्याचें धोरण कायम ठेविलें. पण त्याच्या मागून आदिलशाही तक्तावर जो मुलगा बसावयाचा तो सर्वस्वीं या कडव्यापंथाच्या तालमींत तयार झालेला होता. धर्माप्रमाणें राजकारणांत देखील इब्राहिमाचें धोरण या कडव्या पंथास मान्य नव्हतें. मलिकंबराशीं इब्राहिमाचें अलीकडे व्यक्तिश: वांकडें आलें होतें व त्याला हाणून पाडण्यासाठीं तो खटपट करीत होता; पण निजामशाही राज्य बुडविण्याची मोंगलांची इच्छा तडीस गेली तर मात्र ती गोष्ट आपणांस घातुक होणार आहे हें इब्राहिम जाणून होता. हा बारीक भेद दरबारांतील पुढाऱ्यांच्या विचारांत दिसत नव्हता. दिल्लीकर व विजापूरकर यांनीं संगनमत करून ' निजामशाही राज्य साफ बुडवावें आणि तो मुलूख दोघांनीं वांटून घ्यावा ' असा विचार करण्यास कांहीं हरकत नाहीं, असें या कडव्या पक्षाच्या मुत्सद्यांचें मत असून त्यांचा पुढारी मुस्तफाखान हा होता. हा मुस्तफा शहाजीचा शत्रू असून त्याच्यावर विजापूरच्या युवराजाची बहालमर्जी असे. तेव्हां इब्राहिम मरण पावल्यावर युवराज महमद हा जेव्हां बादशहा बनला तेव्हां विजापूरचा आश्रय सोडून परत आपण निजामशाहींत जावें हा विचार शहाजीच्या मनांत सहजच बळावला. अशा वेळीं जहांगीर मरण पावून शहाजहान दिल्लीच्या पदावर आरूढ झाला. व तो निजामशाही राज्यावर हल्ला करण्याच्या विचारास लागल्याची बातमी आली. तेव्हां निजामशाही मुत्सद्यांनीं शहाजीला परत आपल्या राज्यांत येण्याविषयीं अंतस्थ रीतीनें बोलावणें पाठविलें. स्वत: शहाजीच्या मनांत निजामशाहीविषयीं आपलेपणाची भावना लहानपणापासून होती व आदिलशाहींतील परिस्थिती अनुभवल्यानंतर तिला अधिकच पक्केपणा आला. यामुळें शहाजी विजापुरांतून निजामशाही मुलखावर स्वारी करण्यासाठीं म्हणून जो गेला तों त्यानें पुणें परगणा प्रथम कबज केला ( ले. २६२ ). आणि नंतर तसाच पुढें जाऊन निजामशाही मनसबदार बनून त्यानें त्या परगण्याचा मोकासा

आपल्या नांवें करून घेतला ( ले. २७४, २८५ ). येथें शहाजीचरित्राचा पहिला भाग संपून दुसऱ्यास प्रारंभ झाला. पहिल्या भागांत शहाजीचा मलिकंबराशीं प्राधान्यानें संबंध आला; तसा दुसऱ्यांत शहाजहानाशीं आला. याकरितां त्याविषयींची हकीकत येथें दिली पाहिजे.

**१२. शहाजहानाच्या कारकीर्दीचा प्रारंभ**—बंडखोर या नात्यानें बापाच्या हयातींत शहाजहान निजामशाहीच्या आश्रयास भातवडीच्या युद्धानंतर आला, तो तेव्हांपासून २।३ वर्षें इकडेच जाऊन येऊन होता; यामुळें त्याला दक्षिणेंतील परिस्थिती खडान्‌खडा माहीत झाली होती. बापाच्या मृत्यूची बातमी ऐकतांच जुन्नर येथून तो बादशहा होण्यासाठीं निघाला व पुढें दावरबक्ष वगैरेंची कत्तल करून त्यानें दोन तीन महिन्यांत आपलें स्थान कायम केलें. तेव्हां या तीन महिन्यांत झालेल्या धडामोडीनें व शहाजहानानें मिळविलेल्या यशानें हिंदी राजकारणांत केवढ्या मोठ्या उलथापालथीची पूर्वतयारी होत होती याची कल्पना त्या वेळीं कोणासच आली नाहीं. निजामशाहींतला मलिकंबर, विजापूरचा इब्राहिम व दिल्लीचा जहांगीर या तिघांपैकीं कर्तृत्वानें मलिकंबर श्रेष्ठ असल्यामुळें त्यानें आपल्या हयातींत निजामशाहीवर इतरांचा शह चालूं दिला नव्हता. पण मलिक स्वतः कर्तबगार असला तरी त्याला मुत्सद्देगिरीची परंपरा निर्माण करतां आली नाहीं. खुद्द मूर्तजाच्या कर्तृत्वाला त्यानें फारसा वाव ठेविला नव्हता. शिवाय त्याच्या अंगीं तेवढी आवरशक्तीहि नव्हती. यामुळें निजामशाही जिवंत रहावयाची तर ती मूर्तजाच्या शहाणपणानें रहाणें शक्य नसून वजिराच्याच शहाणपणानें जगण्याचा काय तो संभव होता. पण मलिकाच्या अलीकडच्या वर्तनानें जाधवराव व शहाजी यांसारखे कर्ते लोक निजामशाही सोडून गेले व जे राहिले ते नाकर्ते होते. आतां दिल्ली दरबारांतील परिस्थिती पाहूं. जहांगिराच्या हयातींत दिल्लीकरांचा दरारा नाहींसा झाला होता, याचीं कारणें अशीं होतीं कीं स्वतः जहांगीर आळशी व स्त्रैण बनला असून नूरजहाननें राज्याच्या हितापेक्षां आपल्या जांवयाचा वारसा साधण्याच्या प्रश्नाकडे अधिक लक्ष पुरविल्यामुळें अनेक मतभेद माजले होते आणि राजपुत्र शहाजहान यानें तर स्वतः बादशहा बनण्यासाठीं बंडच उभारलें होतें. यामुळें मोंगलांची शक्ति त्या वेळीं आपसांतल्या भांडणांतच खर्च होत असे. पण जहांगीर मरण पावून नूरजहान कैद झाली व बंडखोर शहाजहान बादशाही पदावर कायम झाला;

त्याबरोबर मोंगली राज्ययंत्र पुन: एकदम व्यवस्थितपणें काम देऊं लागलें. त्या काळीं राज्ययंत्र किती व्यक्तिनिष्ठ होतें व एका माणसाच्या मृत्यूनें त्यांत किती बदल होऊं शके याचें उदाहारण, या वेळच्या घडामोडींत उत्तम रीतीनें सांपडण्याजोगें आहे. जहांगीर व मलिकंबर हयात होते तोंपर्यंत मलिकंबराची निजामशाही अशी जबरदस्त समजण्यांत येत होती कीं, तिच्या आश्रयास मोंगलाईंतल्या बंडखोरानें खुशाल येऊन निश्चितपणें रहावें व ' त्याला तुम्हीं आश्रय कां दिलात ? ' असा जबाब विचारण्याची ताकद मोंगली बादशाहाला होऊं नये. पण मलिक मरण पावतांच निजामशाही इतकी कमजोर झाली व शहाजहानाच्या राज्यारोहणानें मोंगलाई इतकी शिरजोर बनली कीं, मोंगलाईंतल्या बंडखोरास आश्रय दिल्याबद्दल निजामशाहीस प्रायश्चित्त तर घ्यावें लागलेंच; पण तेवढ्यानेंहि न निभावतां शेवटीं निजामशाहीला प्राणासच मुकावें लागलें. सारांश, त्या काळीं मोठ्या माशानें धाकट्या माशास गिळण्याचा न्याय रूढ असल्यामुळें कोणत्याहि गादीवर कर्ता पुरुष आला व इतर शाह्यांना तसा कर्णधार लाभला नसला म्हणजे त्यानें दुसरी शाही साफ बुडविण्यासाठीं झटणें हें त्याचें कर्तव्य होऊन बसे. राज्ययंत्राचा उपयोग सभोंवारचीं इतर राज्यें बुडविण्यासाठीं करणें म्हणजे मोठें शतकृत्य अशी सर्वच बादशहांची समजूत असल्यामुळें हें काम करतांना बलिष्ठ पक्षास मोठी हौस वाटे. पण बादशहांच्या या हौसेच्या झगड्यापायीं सामान्य लोकांवर किती जिवावरचीं संकटें येत व त्यांना किती हालअपेष्टा सोसाव्या लागत याची फिकीर दरबारी लोकांना नव्हती. सारांश, राज्ययंत्र सुरळित चाललें तर त्याचें श्रेय बादशहा किंवा कर्ता वजीर याच्या वांट्यास येई; आणि तें बिघडलें तर त्याचे दुष्परिणाम सर्वांनाच सोसावे लागत. पण त्यांचे बरे किंवा वाईट जे परिणाम होत ते हजारों लोकांना सोसावे लागत होते, तरी हें राज्ययंत्र एका विशिष्ट व्यक्तीच्या मालकीचें असावयाचें व ती व्यक्ती कर्ती असणें अगर नादान असणें ही केवळ योगायोगाची गोष्ट आहे; असा त्या काळच्या लोकांचा समज असल्यामुळें, मोठमोठ्या राज्यक्रांत्या होत असतांना लोकांना ज्या हालअपेष्टा सोसाव्या लागत त्या ते दैवावर हवाला टाकून मुकाट्यानें सोशीत. त्यांच्या प्रतिकारार्थ जुटीनें एकमुखी खटपट करण्याची कल्पना समाजांत उद्भवली नाहीं. तथापि स्वावलंबनाची प्रवृत्ति कांहीं ठिकाणीं वाढली यांत मात्र शंका नाहीं. विशेषत: मावळासारख्या डोंगराळ

प्रदेशांत कृष्णाजी बांदलासारख्यांनीं स्वतःच्याच जोरावर सभोंवारच्या लोकांपासून कर वसूल करण्याचा उद्योग आरंभला. व प्रतिक्रियारूपानें इतरांना त्याच्याशीं झगडण्याची तयारी करावी लागली. यामुळें निजामशाही जमीनदोस्त करण्याच्या कामांत शहाजहान व आदिलशहा गुंतले असतां कोणत्याच शाहीचा अंमल न मानतां अंगच्या जोरावर देशमुखी जगविणें किंवा हरविणें हा डाव खेळण्याचा प्रघात मावळांत पडत चालला ही गोष्ट त्या वेळीं फारशी महत्त्वाची भासली नाहीं. पण भावी काळांत ती फार महत्त्वाची ठरली. खडाजंगीचीं युद्धें व मोठ्या सैन्याच्या हालचाली दौलताबाद, औरंगाबाद वगैरे मैदानी मुलखांत होत; व त्याप्रीत्यर्थ होणाऱ्या हालअपेष्टा सोसण्याचा प्रसंगहि तेथील लोकांवर येई. पण एक बादशाही लयास जाते न जाते तों दुसरी बादशाही तेथें उभी होई, यामुळें तेथील लोकांच्या उरावर कोणत्या तरी बादशहाचें सैन्य नेहमीं खडें राहिलेलें असे. शिवाय वसूल मिळविण्यासाठीं अशा मुलखांत आपला अंमल शक्य तितक्या लौकर व्यवस्थितपणें चालविण्याची खबरदारी बादशाही अंमलदारांकडून घेण्यांत येई. पण मावळांत मात्र त्याच्या उलट प्रकार होता. तेथें सरकारी उत्पन्न बेताचें व मुलूख डोंगराळ; यामुळें शांततेच्या काळांत देखील सरकारी दाब जितक्यास तितका तांत्रिक स्वरूपाचा असे. राज्यांत दंगाधोपा सुरू झाला म्हणजे तर या डोंगराळ मुलखांत बेबंदशाही माजे; व राजधानींतला दंगा थांबला तरी मावळांतले दंगेधोपे चालूच असत. सारांश, मुसलमानी राज्याचा वरवंटा कमींतकमी फिरलेला प्रदेश कोठें शिल्लक आहे याची तपासणी त्या वेळीं केली असती तर तो प्रदेश म्हणजे मावळ असें उत्तर मिळालें असतें. मात्र याचें श्रेय मावळांतल्या लोकांना देण्याचें कारण नाहीं; कारण त्याची जाणीव त्यांनाहि नव्हती. हेतुपुरःसर पाहणी करणारा इसम अस्तित्वांत नसल्यामुळें मावळांतील लोकांचा कणखरपणा, जुन्नरपासून रायगडापर्यंतच्या मुलखाचा डोंगराळपणा व त्या भागांतील किल्ले या गोष्टींना त्या वेळीं कोणीं महत्त्व दिलें नाहीं. पण बादशाही सैन्याशीं झगडण्याची जरुरी उद्भवतांच वरील गोष्टींकडे लक्ष देण्याची बुद्धि प्रथम शहाजीला झाली आणि नंतर शिवाजीमहाराजांना झाली; व अनुभवाअंतीं या डोंगरी आश्रयाची महती फार मोठी आहे असें दोघांनाहि समजून आलें. निजामशाही राज्यांत ८४ किल्ले असून ८० हजार चलाख घोडा होता व बहिरी ससाण्याप्रमाणें आकस्मिक

झडप घालण्याची एक विशिष्ट युद्धपद्धति त्या राज्यांतील लोक जाणत होते (भा. ८।४१-४३); वगैरे गोष्टी खऱ्या असल्या तरी डोंगरी किल्ल्यांच्या जोरावरच बादशाही सैन्याशीं टक्कर देतां येईल व त्या कामीं या डोंगराळ मुलखांतील लोकांचें विशेष साहाय्य होऊं शकेल ही गोष्ट प्रथम शहाजीला सुचली आतां त्याच्या तरी लक्षांत ती कशी आली हें समजण्यासाठीं त्या काळच्या मोंगली व निजामशाही घडामोडी प्रथम लक्षांत घेतल्या पाहिजेत.

**१३. खानजहान लोदीचें बंड**—शहाजहान तक्तावर बसण्याची खटपट करण्यासाठीं जुन्नराहून उत्तरेकडे जाण्यास निघाला तेव्हां दाक्षिणेंत मोंगलांच्या तर्फे खानजहान लोदी नांवाचा सुभेदार होता. शहाजहानाचें व त्या लोदीचें पहिल्यापासून वांकडें असल्यामुळें त्यानें स्वतंत्रपणें दाक्षिणेंत आपलें राज्य प्रस्थापित करण्याचा विचार या वेळीं मनांत आणला असून शहाजहानाला दिल्लीच्या आसनावर कायम होण्यास बरेच दिवस लागतील व तेवढ्यांत माळव्याच्या बाजूस हातपाय पसरण्यास आपणास सवड सांपडेल असा त्याचा अंदाज होता. त्याप्रमाणें त्यानें निजामशाही वजीर हमीदखान याच्याशीं संगनमत करून कांहीं मोंगलाई मुलूख त्याला परत द्यावयाचें ठरविलें व त्याच्याकडून खर्चासाठीं बराच पैसाहि घेतला. पुढें त्या जोरावर सैन्य जमवून तो माळव्याकडे निघाला. इतक्यांत त्याला अशी पक्की बातमी समजली कीं, ‘ शहाजहान दिल्लीच्या गादीवर बिनहरकत बसल्यामुळें आतां त्याच्याशीं विरोध करण्याची कल्पना शेवटास जाण्याजोगी नाहीं.’ त्यामुळें अर्थात्‌च त्याचा बंडाचा विचार थंडावला. त्याबरोबर त्यानें बादशहाकडे पत्र पाठवून माफी मागितली आणि बादशहानें देखील माफी देऊन त्याला दक्षिणेंतील सुभेदारीच्या जागेवर कायम केलें. तेव्हां ही भानगड एवढ्यावर मिटेल असें वाटूं लागलें होतें. पण योगायोग निराळा होता. माफी मिळाल्यावर तरी लोदीनें राजनिष्ठा सिद्ध करण्यासाठीं आपण दिलेला निजामशाही मुलूख परत घ्यावयास पाहिजे होता; पण त्यानें त्यासंबंधीं प्रयत्न केला नाहीं. त्यामुळें ‘ लोदी हा वरून राजनिष्ठेच्या गोष्टी बोलतो; पण त्याच्या मनांत अद्याप निजामशाही मुत्सद्यांशीं संगनमत करण्याचा विचार कायम आहे ’ इत्यादि चहाड्या लोदीविरुद्ध करणाऱ्यांना आयतेंच फावलें. शहाजहानासहि त्या गोष्टी खऱ्या वाटल्या व त्यानें लोदीस अधिकारभ्रष्ट करून भेटीस बोलाविलें व सुभेदाराच्या जागीं महाबतखानाची नेमणूक केली. बोलावण्याप्रमाणें लोदी

निघून गेला व महाबतखानानें ताबडतोब निजामशाही वजिराकडे मोंगली मुलूख परत देण्याविषयीं मागणी केली. तेव्हां तगाद्याप्रमाणें त्या मागणीस मान देण्यासाठीं बीडकडील मुलूख परत देण्याची भाषा निजामशाहानें चालू केली. त्याप्रमाणें खानजमान, महाबतखानाचा मुलगा, बीड हस्तगत करण्याच्या खटपटींत असतांना निजामशहानें ६ हजार घोडेस्वार देऊन शहाजीला खानदेशांत स्वारी करून येण्यासाठीं परस्पर रवाना केलें. हेतू हा कीं, त्या स्वारीच्या गडबडीनें मुलूख परत देण्याची गोष्ट निकरावर येऊं नये. पण शहाजीला खानदेशांत फारसा दंगाधोपा करितां आला नाहीं व बसवाडयाचा जहागीरदार दर्याखान रोहिला या नांवाच्या अधिकाऱ्यानें सैन्य जमवून शहाजीला त्या भागांतून परत फिरण्यास भाग पाडलें ( बा. भा. १–२५१ ).

**१४. आदिलशाही व निजामशाही यांमधील संबंध**—इब्राहिम आदिलशहाच्या मागून महमद विजापूरच्या तक्तावर बसला त्या वर्षी म्हणजे शके १५४९मध्यें मूर्तिजा निजामशहा यानें विजापूरकरांचा मुलूख हस्तगत करण्यासाठीं सैन्य पाठविलें. त्याच वेळीं कोंकणांत दाभोळच्या बाजूस देखील निजामशहाची स्वारी येईल अशी बातमी होती. कारण मलिकंबराच्या हयातींत निजामशाही सैन्यानें छापा घालून दाभोळ बंदर घेतलें होतें, तें मलिक मेल्यावर तह होऊन परत द्यावें लागलें; तें पुन: परत घेण्यासाठीं निजामशाही सैन्य चालून येईल असें लोकांना वाटूं लागलें (ले. २५७). त्याप्रमाणें माघफाल्गुनाच्या सुमारास ही मोहीम सुरू झाली. तेव्हां हबसखान नांवाचा अधिकारी निजामशाही-तर्फे तळकोंकणचा हवालदार होता, त्याच्या मदतीस इब्राहिमखान व मिर्झा अबदुल फत्तेखान यांची रवानगी झाली व ते दाभोळपासून तीनचार कोसां-वर सैन्यानिशीं येऊन पोंचले. खत: हबसखानानें जंजिऱ्याच्या दंडाराजपुरीस वेढा देण्याचें काम सुरू केलें असल्यामुळें दाभोळच्या मसलतींत त्याच्या सैन्याची मदत होऊं शकली नाहीं. तथापि कान्होजी जेधे, खोपडे वगैरे माव-ळांतील देशमुखांनीं इब्राहिमखानाच्या मदतीस तांतडीनें जावें असे त्यानें हुकूम पाठविले होते (ले. २६४–२६८). दाभोळच्या आदिलशाही अधिकाऱ्यांनीं देखील रायारावामार्फत 'गुंजण मावळच्या देशमुखांनीं आपल्या पक्षांत सामील व्हावें' अशी खटपट चालविली होती (ले. २७१). तथापि या हालचालीं-तून म्हणण्यासारखी निष्पत्ति कांहींच झाली नसावी असें दिसतें. मावळांतील देशमुखांचा मात्र भाव चढला व ते आपण आदिलशाही पक्षास मिळावें

किंवा निजामशाही पक्षास मिळावें याविषयीं आपापल्या परीनें विचार करूं लागले. आणि शेवटीं १५५१मध्यें कान्होजी, वेदाजी अनंतामार्फत रणदुल्लास भेटून आदिलशाहाचा अंकित बनला ( ले. २९४ ). वांई प्रांताच्या अगदीं सरहद्दीवर जेध्यांचें गांव असल्यामुळें त्याला आदिलशाही सैन्याचा आश्रय करणें सोईचें वाटलें. पण नीरेच्या उत्तरेस असलेल्या पुणें प्रांतांत व सिंहगडच्या बाजूस विजापूरकरांना आपलें वर्चस्व प्रस्थापित करण्यास यापेक्षां किंचित् अधिक काळ लागला. कारण, शहाजीनें विजापूरकरांतर्फे म्हणून सरलष्कर या नात्यानें श. १५४९ अखेर पुणें प्रांत ताब्यांत घेतला (ले.२६२). पण पुढें तो स्वतःच आदिलशाहीची सरलष्करी सोडून निजामशाही बनला व त्यांच्या तर्फे पुणें परगण्याचा मोकासा त्यानें मिळविला ( ले. २८२ ). खुद्द विजापुरावर चालून गेलेल्या निजामशाही सैन्याच्या हातून म्हणण्यासारखा कांहींच पराक्रम झाला नाहीं. प्रथम त्या सैन्यानें सरहद्दीवरच्या कब्रसवार [?] या किल्ल्यास वेढा देण्याचा प्रयत्न केला. पण आदिलशाही सैन्यानें त्याला मागें फिरविलें. त्यानंतर पुनः त्यानें आकस्मिक हल्ला करून सादतखान व इतमादखान या आदिलशाही सरदारांना धरून नेलें; पण त्यांना कोणताहि अपाय न करतां परत जाण्यास परवानगी दिली; आणि त्यांच्या खटपटीनें तात्पुरतें युद्ध तहकूब होऊन आदिलशाही लष्कर परत कृष्णातीरास आलें [ मो.१५३].

तथापि निजामशाहीचीं सूत्रें या वेळीं ज्याच्या ताब्यांत आलीं होतीं त्या हमीदखानाला वरील तह पटला नाहीं. त्यानें तो नामंजूर करून आदिलशाही सैन्याचा पराभव करण्याचें काम आपल्याच अंगावर घेतलें. हा हमीदखान पूर्वी इब्राहिमाच्या कारकीर्दींत विजापूरकरांच्याच नोकरींत होता. परंतु कांहीं कारणामुळें त्याला निजामशाहीचा आश्रय करणें इष्ट वाटून तो तेथें गेला व महत्त्व पावला. या हबशी सरदारानें बुऱ्हाणाची मर्जी संपादण्यासाठीं भलत्या मार्गांचें अवलंबन केलें असें रसभरित वर्णन समकालीन मोंगल इतिहासकारानें केलें आहे.*

---

* He ( Hamid Khan ) married a poor woman who served in the female apartments of Nizamulmulk. She made herself useful in supplying the King secretly with wine and as a procuress in bringing "wives and daughters" for his gratification. By these means she obtained such an ascendancy over him that she was mistress inside the palace and her husband became master outside; but it must be added that he was a man of ability ( Ikbal Nama E. VI p. 433 note).

शत्रुपक्षानें केलेली निंदा शब्दशः खरी धरतां येणार नाहीं. पण या वेळीं निजामशाहीचीं सूत्रें फत्तेखानाच्या हातीं नसून हमिदाच्या हातीं आलीं होतीं व त्याला आदिलशाही सैन्याचा पराभव करण्याची हौस होती एवढें गृहीत धरण्यास हरकत नाहीं. त्याप्रमाणें निजामशाही सैन्य विजापुरावर स्वारी करण्यासाठीं निघालें. तेव्हां या सैन्याचें आधिपत्य हमीदखानाच्या बायकोनें पत्करलें होतें असें खाफीखान म्हणतो (भा. १. पृ. ३८५) पण ती बहुशः अतिशयोक्ती असावी. तथापि या निजामशाही सैन्यानें या वेळीं थेट विजापुरापर्यंत चालून जाण्यांत यश मिळविलें. पण कंदरीकनोर (कुदरीकुनूर) नजीकच्या मैदानांत दोन्ही सैन्यांची जी लढाई झाली तिच्यांत निजामशाही सैन्याचा पराभव झाल्यामुळें त्याला परत जाणें भाग पडलें. हा प्रकार श. १५५० मध्यें घडला. पुढें श. १५५१ मध्यें पुनः हें युद्ध सुरू झालें. त्यांत आदिलशाही सैन्यानें शिरवळ परगण्यांतले कांहीं गांव ताब्यांत घेतले व उलट पक्षीं निजामशाही सैन्य थेट विजापुरापर्यंत चालून गेलें (ले. ३००). या वेळीं कोंढाण्याचा हवालदार मावळांत व्यवस्था ठेवूं शकला नाहीं व किल्लेकरी मावळांतल्या लोकांचीं गुरेंढोरें वळून नेत आणि अनेक प्रकारें त्रास देत असें दिसतें (ले. २९८). मिळून विजापूरकरांचें पाऊल दिवसेंदिवस पुढें पडत चाललें आणि निजामशाही राज्यांत अव्यवस्था माजूं लागली. यामुळें या सरहद्दीवरच्या मावळ प्रांतांतील देशमुखांवर आपण कोणत्या पक्षाकडे रहावें याविषयीं विचार करण्याचा प्रसंग आला. तेव्हां ते दोहोंकडे अनुसंधान ठेवून रहात असत असें दिसतें. यानंतर हमीदखानाच्या सांगण्यावरून बुऱ्हाणानें फत्तेखानास कैदेंत टाकिलें व जाधवरावासहि मारिलें. यामुळें निजामशाही राज्यांत फारच धांवपळ सुरू झाली. या धांदलींत आपलें पाऊल पुढें ढकलण्यास हरकत नाहीं अशा विचारानें आदिलशाही सैन्य नीरानदीच्या उत्तरेस पुणें परगण्यांत येऊन पोंचलें व त्यानें पुण्याचा कोट पाडून शहाजीनें बांधलेले वाडे जाळले व लुटालूट केली. शहाजीनेंहि जाधवरावाच्या मृत्यूनंतर निजामशाही सोडून मोंगलांकडे आश्रयार्थ जाण्याचा विचार केला होता. त्यामुळें आदिलशाही सैन्याशीं झगडण्याच्या भानगडींत न पडतां तो प्रथम जुन्नरास आणि नंतर मोंगलांकडे गेला. तेव्हां पुण्याचें ठाणें आदिलशाही सैन्याला फार थोड्या श्रमानें पचवितां आलें. आदिलशाहीतर्फे या वेळीं मुरारपंतानें हा परगणा ताब्यांत घेऊन भुलेश्वरच्या डोंगरावर दौलतमंगळ नांवाचा किल्ला बांधला व तेथून पुणें परगण्याची व्यवस्था

पाहण्याचा परिपाठ पाडला (मो. १५६.; ले. ३३२). त्या कामावर रायारावाची नेमणूक करून दोन हजार स्वारांसह त्याला या किल्ल्यावर त्यानें ठेविलें. याखेरीज तळकोंकण हस्तगत करण्याचें काम मागल्या सालीं पुरें झालें नव्हतें; तें पुरें करण्यांसाठीं चंद्रावराजे यांची नेमणूक मुरारपंतानें दाभोळच्या स्वारीवर केली व बाजी दळवी यानेंहि या कामीं मदतीस जावें असा हुकूम दिला. त्याप्रमाणें आदिलशाही सैन्यानें महाड, कोरेगांव, निजामपूर वगैरे नाक्याचीं ठिकाणें हस्तगत केलीं. तेव्हां तळकोंकणचा निजामशाही सुभेदार सिद्दी मर्जान हा चौल येथून बाजी दळवी याच्या पारिपत्यासाठीं चालून आला. दोघांत चांगली निकराची लढाई होऊन निजामशाही अधिकारी ठार झाला व बाजी दळवी यशस्वी होऊन त्यानें चौलपर्यंतचा मुलूख हस्तगत केला. तथापि या वेळीं बुऱ्हाणानें सिद्दी मर्जान ठार झाल्याचें ऐकतांच सिद्दी साबा व एखलासखान यांना मोठ्या सैन्यानिशीं बाजी दळवीला घालविण्यासाठीं तांतडीनें रवाना केलें व त्यांच्या सैन्याशीं गांठ पडल्यावेळीं बाजी दळवी ठार झाल्यामुळें आदिलशाही सैन्य पळून गेलें. तेव्हां सिद्दी साबा याला चौल वगैरे ठिकाणीं पुनः निजामशाही अंमल बसवितां आला व तो कल्याणास येऊन राहिला. तात्पर्य, दोनतीन वर्षें निजामशाही व आदिलशाही सैन्यामध्यें जो झगडा चालू होता त्यांत शेवटीं पुणें परगण्यांतील कांहीं भाग आदिलशाही सैन्याच्या ताब्यांत गेला. पण तळकोंकणांतून निजामशाही अंमल उधळून लावण्याच्या कामीं विजापूरकरांना यश आलें नाहीं. या वेळीं महत्त्वाचे असे राजकीय धोरणाचे प्रश्न उपस्थित झाल्यामुळें, आपसांतले तंटे बाजूस ठेवून, दोनही शाह्यांनीं एकदिलानें मोंगलांशीं तोंड द्यावें ही बुद्धि विजापूरकरांना सुचली तो प्रकार असा.

निजामशाही व आदिलशाही सैन्यें श. १५५२ मध्यें एकमेकांशीं झगडत असतां मोंगलांना निजामशाहीबरोबर युद्ध पुकारण्याची आवश्यकता उत्पन्न झाली. कारण त्यांचा बंडखोर जो लोदी त्याला निजामशहानें आश्रय दिला होता. तेव्हां या वेळीं विजापूरकरांनीं आपल्याशीं दोस्तीचा तह करून निजामशाही बुडवावी व तो मुलूख मोंगल व विजापूरकर यांनीं वांटून घ्यावा असें बोलणें करण्यासाठीं मोंगलांचा वकील शेख मुगन्निया ( किंवा मैनुद्दीन ) हा विजापुरास दाखल झाला. तेव्हां विजापूरदरबारनें कोणतें राजकीय धोरण स्वीकारावें याविषयीं चर्चा सुरू झाली. मुस्तफाखानानें आपलें मत स्पष्टपणें

असें दिलें कीं, " मोंगलांचा स्नेह जोडण्याची व आदिलशाही राज्याची सरहद्द वाढविण्याची ही आयती आलेली संधी विजापूरदरबारानें दवडूं नये." उलट पक्षीं रणदुल्लाचा दरबारी वकील काजी सैद यानें असें प्रतिपादन केलें कीं, " केवळ मुलूख संपादन करण्यावर दृष्टी ठेविली तर निजामशाही राज्य बुडालें म्हणजे आदिलशाहीला मोंगलांचा शेजार घडेल. यामुळें मोगलांशीं रेटारेटी करण्याचे प्रसंग उद्भवतील; व तें जड जाईल. त्यापेक्षां मुलूख वाढविण्याची हौस आवरावी व निजामशाही वाचविण्यासाठीं खटपट करावी हें शहाणपणाचें दिसतें." या स्पष्टोक्तीबद्दल मुस्तफाखान काजी सैद याच्यावर बराच रागावला. पण शेवटीं मुस्तफाच्या म्हणण्याप्रमाणें आदिलशाही दरबारानें धोरण ठेवावें असा या वेळीं निर्णय कायम झाल्यामुळें दोन पक्षांतील मतभेद विकोपास गेला नाहीं. तथापि खवासखान व मुरारपंत यांना मुस्तफाचें हें धोरण मनापासून पसंत नव्हतें. पण पूर्वीं मुस्तफाशीं केलेले करार व महमदशहाची मर्जी यांवर नजर देऊन मोंगलांशीं मित्रत्वाचा तह करण्याचा विचार त्यांनीं तात्पुरता कायम केला. त्याप्रमाणें मोंगलांच्या वकिलाजवळ त्या अर्थाचें पत्र व पोषाख देऊन दिल्लीस जाण्यास विजापूर-दरबारानें निरोपहि दिला; आणि अंबरखान, अंकुशखान, सरजाराव घाटगे, फरहादखान व रणदुल्लाखान यांना मोंगलांच्या मदतीसाठीं म्हणून विजापुराहून रवाना केलें. पण विजापूरकर व मोंगल यांमधील दोस्तीचा तह या वेळीं व्यवहारांत न येतां उलट त्या दोघांत युद्धाचाच प्रसंग उद्भवला. याचें कारण निजामशाहींत या सुमारास अगदींच अकल्पित अशी उलथापालथ झाली; आणि त्यामुळें विजापूरकरांनाहि आपला विचार बदलण्यावांचून गत्यंतर राहिलें नाहीं.

**१५. निजामशाहींतल्या घडामोडी**—आतां या ठिकाणीं निजामशाहींतल्या घडामोडी लक्षांत घेतल्या पाहिजेत. श. १५५१ चे पहिले ५ महिने निजामशाहींत कांहींसे शांततेचे गेले. तेवढ्यांत बुऱ्हाणाजवळ हमीदाचें महत्त्व वाढून फत्तेखानावर कैद होण्याचा प्रसंग आला; व पुढें लौकरच जाधवरावहि मोंगलांचा पक्ष सोडून निजामशाहींत येऊन पोंचला. आणि त्यापेक्षां भानगडी उपस्थित करणारा खानजहान लोदी हाहि आला. कारण लोदी आग्र्यास शहाजहानाच्या बोलावण्याप्रमाणें गेला होता. पण त्या दोघांचीं मनें परस्परांविषयीं कित्येक वर्षांपासून दूषित झालेलीं असल्यामुळें संशयावरून संशय वाढत गेला आणि जीव बचावण्यासाठीं लोदीला आग्र्याहून पळ काढणें इष्ट

दिसलें. अर्थात् त्याचा पाठलाग करण्यासाठीं मोंगलांचें सैन्यंहि निघालें. अशा रीतीनें लोदी मोठ्या शिकस्तीनें बादशाही सैन्यास झुकांड्या देत गोंडवणांतून निजामशाहींत येऊन पोंचला. मोंगली राज्यांतील बंडखोरानें निजामशाही मुलखाचा आश्रय घेण्याचा शिरस्ता पूर्वीं शहाजहानानें घातला होता. त्यास अनुसरून लोदी आला व हमीदखान वगैरे वजिरांनीं त्याला आश्रय दिला. कारण, निजामशाही मुत्सद्यांची व लोदीची पूर्वींपासून चांगलीच जानपछान व घसट असल्यामुळें त्याला आश्रय देत नाहीं असें म्हणणें या मुत्सद्यांना शक्य झालें नसतें. पण या भिडेमुळें निजामशाही राज्यावर मोठेंच संकट ओढवलें. कारण लोदीविषयीं शहाजहानाच्या मनांत पक्की आढी असल्यामुळें त्यानें लोदीला व त्याबरोबरच त्याला आश्रय देणाऱ्या निजामशहाला, अशा दोघांनाहि 'इंद्राय स्वाहा, तक्षकाय स्वाहा' या न्यायानें धुळीस मिळविण्याचा निश्चय केला; व श. १५५२ च्या प्रारंभीं स्वतः बादशहा बऱ्हाणपुरापर्यंत येऊन पोंचला. यापूर्वींच, लोदीच्या पाठोपाठ मोंगली सैन्य येणार असा रंग दिसूं लागतांच श. १५५१च्या पौषांत निजामशाही अधिकाऱ्यांकडून मोंगलांना पायबंद देण्यासाठीं शहाजीची नेमणूक दर्याखानावर स्वारी करण्याच्या कामीं झाली होती. त्या कामगिरीवर निघण्यापूर्वीं त्याला एक गृहकृत्य करण्यांत थोडेंसें लक्ष घालावें लागलें. त्याचा वडील मुलगा संभाजी याचें, जुन्नर येथील अधिकारी विजयराघव याची मुलगी जयंती इच्याशीं लग्न करण्याचें याच सुमारास निश्चित झालें होतें. मागें सांगितल्याप्रमाणें जाधवरावहि याच वेळीं निजामशाहीतर्फें मोंगलांशीं लढण्याच्या कामांत साहाय्य करावें या हेतूनें आला असल्यामुळें शहाजी व जाधवराव असे दोघेहि निजामशाही वांचविण्याच्या कामीं एकदिल होऊन झटण्याचा योग जमून आला होता. अशा स्थितींत शिवनेरीच्या किल्ल्यावर संभाजीचा लग्नसमारंभ या वेळीं उकरण्यांत आला आणि जिजाबाईचे बाळंतपणाचे दिवस जवळ आल्यामुळें तिला व इतर मंडळींना तेथेंच व्याह्यांच्या संमतीनें ठेवून शहाजी दर्याखानाच्या स्वारीवर निघाला (भा. ८-१७,१८). पुढें ती स्वारी आटोपल्यानंतर तो परंड्याच्या बाजूस गेला.

**१६. जाधवरावाचा खून**—निजामशाहीवर या वेळीं आणीबाणीचा प्रसंग आला होता. मलिकंबराच्या मृत्यूनंतर बुऱ्हाण निजामशहानें आपल्या हातीं राज्याचीं सूत्रें घेऊन विजापूरकरांशीं युद्ध केलें. पण त्यांत

त्याला यश आलें नाहीं. तेव्हां अपयशाची जबाबदारी प्रधानांवर टाकून त्यानें प्रथम फत्तेखानास अधिकारभ्रष्ट करून राज्याचीं सूत्रें हमीदखान व तक्रीबखान ह्यांच्या हातीं दिलीं. त्यांनीं विजापूरकरांची कुरापत काढिली पण त्यांत त्यांना म्हणण्याजोगें यश आलें नाहीं. इतक्यांत इकडे लोदी निजामशाहीच्या आश्रयास आला व 'त्याला घालवून द्या' असा तगादा करण्यासाठीं मोंगलांचें सैन्यहि नाशिकपर्यंत येऊन पोंचलें. पावसाळा संपतांच मोंगलांचें सैन्य चालून येणार हें उघड दिसूं लागल्यामुळें व मोंगलांनीं निजामशाही दरबारांतले अनेक सरदार फितूर केले असा बोभाटा झाल्यामुळें आधींच घाबरलेला बुऱ्हाणशहा अगदीं गोंधळून गेला. त्याला आपल्या दरबारांतील मुत्सद्यांपैकीं व सरदारांपैकीं मोंगलांना आंतून फितूर झालेले कोणते व न झालेले कोणते याचा विवेक करतां येईना. अशा स्थितींत 'जाधवराव पुन: निजामशाही सोडून मोंगलांकडे जाणार' अशी बातमी कोणीं चुगलखोरांनीं बादशहाला सांगितली व ती त्याला सहज पटली. त्याबरोबर त्यानें जाधवरावाला कैद करविण्याचा विचार कायम केला. एके दिवशीं जाधवराव दरबारांत येऊन बसला असतां कांहीं कामाचें निमित्त करून बुऱ्हाणशहा तेथून उठून एकांतीं मसलत करण्यासाठीं म्हणून गेला. आणि दोघां खानांनीं जाधवरावाच्या अंगावर धावून येऊन त्याच्या व त्याच्या मुलांच्या हातांतल्या तलवारी हिसकावून घेतल्या. त्याबरोबर हें लक्षण ठीक दिसत नाहीं असें बापलेकांनीं ओळखून आपल्या कमरेच्या कट्यारी काढल्या व त्या खानांवर ते चालून गेले. तेव्हां मारामारी सुरू होऊन जाधवराव ठार झाला. या गडबडींत त्याचे दोन मुलगे अचलोजी व रघूजी आणि नातू यशवंत हेहि मारले गेले. ही बातमी ताबडतोब सर्वतोमुखीं झाली. जाधवरावाची मंडळी दौलताबादेंतील कुतलगच्या हौदाजवळ रहात होती, त्यांना ही बातमी समजतांच जीव वांचविण्याच्या विचारास त्यांना लागावें लागलें. ज्याला जो मार्ग दिसला तो त्यानें पत्करिला; व सर्वांनीं आपले प्राण वांचविले इतकेंच. जगदेवराव, बहादूरजी व गिरजाबाई वगैरे मंडळी धांवपळ करीत दौलताबादेहून सिंदखेडास गेली व तेथून मोंगलांच्या आश्रयास जाऊन पोंचली.

जाधवरावावरचा हा प्रसंग अनेक दृष्टींनीं फार महत्त्वाचा होता. जाधवराव म्हणजे त्या वेळच्या राजकारणांतील बडें प्रस्थ असे. मोंगलांनीं त्याला

२४ हजारांची जातमनसब व १५ हजार घोडेस्वारांची तैनात दिली होती; याशिवाय त्याची मोठी जहागीर होती ती निराळीच. यामुळें निजामशाही व मोंगलाई ह्यांच्या सरहद्दीवर एकाद्या स्वतंत्र राजासारखें ऐश्वर्य उपभोगीत जाधवराव रहात असे. आणि अशा ऐश्वर्यसंपन्न सरदारानें निजामशाहीवरील आणीबाणीच्या प्रसंगीं झटण्याचें कबूल केलें होतें. पण त्याचें ऐश्वर्य अगर हेतू निजामशाहाच्या लहरीपुढें कवडीकिंमतीचे ठरले. त्यानें चुटकीसरशी त्याचा जीव घेतला व स्वतःच्या प्राणनाशाचीहि तयारी केली. कारण, जाधवरावासारख्याच्या जिवाची जेथें शाश्वती नाहीं त्या दरबारांत इतरांनीं कोणत्या आधारावर विश्वासून रहावें हा मोठाच प्रश्न उपस्थित झाला. लोकांच्या मनाची अगदीं चलबिचल झाली. त्यांतल्या त्यांत शहाजीवर तर फारच अडचणीचा प्रसंग आला. निजामशाही मुत्सद्यांच्या नादीं लागून व स्वतःची हौस म्हणून त्यानें दोन वर्षांपूर्वीं आदिलशाही सोडली व मोंगलांशींहि अधूनमधून धडकी घेतली. पण ज्याच्या हितासाठीं तो झटणार तो निजामशाहाच पिसाळल्या कुत्राप्रमाणें वागूं लागल्यामुळें त्याला निजामशाहीचा संबंध तोडून टाकणें भाग पडलें. जाधवरावाचा खून झाला ही बातमी त्याला समजली तेव्हां तो परांड्याकडे होता. बातमी ऐकतांच तेथून तो निघाला; आणि प्रथम संगमनेराकडे जाऊन नंतर पुण्याकडे आला व सभोंवारच्या मुलखांत आपला अंमल प्रस्थापित करूं लागला. पांच वर्षांपूर्वीं मलिकंबराशीं वितुष्ट आल्यावेळीं त्यानें असेंच केलें होतें; पण त्या वेळीं आदिलशाहाचा त्याला पाठिंबा होता. आतांचा प्रसंग अगदींच निराळा पडला. आदिलशहा व निजामशाहा हे दोघेहि या वेळीं त्याचे शत्रू बनले होते; यामुळें अडचणींतून पार पडण्यासाठीं त्यानें मोंगलांचा सरदार अजमखान याच्याशीं बोलणें लाविलें आणि तेथून उत्तर येईपर्यंत कालहरण करण्यासाठीं तो प्रथम पुण्याकडे गेला आणि तेथून शिवनेरीस गेला. दर्याखानावर स्वारी करण्यासाठीं म्हणून गेलेला शहाजी शिवनेरीस अशा रीतीनें परत गेला तेव्हां त्याला बालशिवाजीचें प्रथम-दर्शन झालें. इकडे विजापूरकरांनीं ही संधी साधून त्याच्या जहागिरीवर हल्ला चढविला. या वेळीं मुरार जगदेवानें शहाजीच्या जहागिरीचे परगणे ताब्यांत घेऊन पुण्यांतले शहाजीचे वाडे जाळले व कोटहि पाडला ( ले. ३३२ ). व भुलेश्वराच्या डोंगरावर दौलतमंगळ हा किल्ला बांधून किंवा पूर्वीचा दुरुस्त करून या परगण्याचें काम दौलतमंगळच्या किल्ल्यावरून

विजापूरकरांतर्फे रायाराव करूं लागला ( मो. १५६) हें मागें सांगितलेंच आहे. हा प्रकार चालला असतां शहाजी कांहीं दिवस शिवनेरीस होता; आणि नंतर मोंगलांनीं आश्रय देण्याचें कबूल केल्यावर तो अजमखानास बीड परगण्यांत जाऊन भेटला. अजमखान वगैरे सरदार या वेळीं लोदीवर हल्ला करण्याच्या कामीं गुंतले होते. त्यांना शहाजीसारखा निजामशाही प्रांतांतला माहितगार इसम मदतीला पाहिजेच होता. त्यांनीं शहाजीला पंचहजारी मनसब व मानाचा पोषाख, रत्नखचित खंजीर, एक निशाण, घोडा, हत्ती आणि दोन लाख रुपये खर्चासाठीं दिले. या वेळीं शहाजींचे चुलतभाऊ मंबाजी व मालोजी व शहाजीचा वडील मुलगा संभाजी यांनाहि तीन चार हजारांच्या मनसबा देण्यांत आल्या. अशा प्रकारें गौरव करून शहाजीला जुन्नरसंगमनेरकडची बाजू ताब्यांत घेण्यासाठीं त्यांनीं परत पाठविलें. शहाजीला या वेळीं मोंगली मनसबेचा जो संस्कार घडला त्याचा उल्लेख फक्त मोंगलांच्या इतिहासांत मात्र आहे. विजापूरचा इतिहास अगर बखरी किंवा शिवभारत वगैरे इतर अनेक साधनें उपलब्ध असून त्यांत हा नाहीं. याचें कारण तो संबंध फार दिवस टिकला नाहीं हें होय.

निजामशाहानें मोगलांचा बंडखोर लोदी याला आश्रय दिल्यामुळें मोंगलांनीं विजापूरकरांची पायधरणी करून त्यांना निजामशाहीविरुद्ध उठविण्याचा विचार केला होता असें वर सांगितलेंच आहे. पण जाधवराव मारला गेला त्या सुमारास निजामशाही दरबाराची चलबिचलीची वृत्ति लक्षांत येतांच लोदी आपणहून दौलताबादेहून निघाला व १५५२च्या माघांत कलिंजरपासून चाळीस मैलांवर बुंदीकर मधुसिंगाच्या हस्तें मोठ्या निकराच्या मारामारींत ठार झाला. त्या सुमारास शहाजीप्रमाणेंच निजामशाहींतले कित्येक वजनदार सरदार मोंगलांना जाऊन मिळाले आणि दक्षिणेंतील राजकारणाचा रंग पालटला. अजमखानानें शहाजीला जुन्नर, संगमेश्वर, वैजापूर, चांभारगोंदें वगैरे भाग जहागिरीदाखल देण्याचें अभिवचन देऊन ते जिंकून घेण्याच्या कामगिरीवर रवाना केल्यावर तो निजामशाही प्रांतांत येऊन सैन्य जमवूं लागला व कांहीं मुलूखहि त्यानें घेतला. यामुळें शहाजी, मोंगल व विजापूरकर हें त्रिकूट निजामशाही बुडविण्यासाठीं एकवटण्याचा रंग दिसूं लागला. तेव्हां हें जूग फोडल्यावांचून निजामशाही वांचत नाहीं हें लक्षांत घेऊन निजामशाही मुत्सद्दी मुकर्रबखान यानें विजापूरदरबारानें आपणांस मदत करावी असें रणदुल्लाच्या मार्फत बोलणें लावलें. या मदतीसाठीं विजापूरकरांना आपण

सोलापूरचा किल्ला व परगणा देण्यास तयार आहोंत हें सांगून ' ' शहाजीला जहागिरीदाखल दिलेले प्रांत विजापूरकरांच्या सरहद्दीवरचे असल्यामुळें त्याचा जय होण्यांत विजापूरकरांचें नुकसान आहे' हा मुद्दा या मुत्सद्यानें रणदुल्लापुढें मांडला व शहाजीचे पुण्यांतील वाडे वगैरे विजापूरकरांनीं नुकतेच जाळले असल्यामुळें तो आपल्याविरुद्ध कसून लढेल ही गोष्ट रणदुल्लालाहि पटली. आणि मोंगलांशीं केलेला सलोखा मोडावा किंवा काय या विचारास रणदुल्ला लागला. इतक्यांत मोंगलांनींच विजापूरकरांची आगळिक केल्याचें वृत्त ऐकूं आल्यामुळें विजापूरकरांनीं कोणाची बाजू पत्करावी या प्रश्नाचा आपोआप निर्णय झाला. कारण लोदीच्या मृत्यूनें मोकळें झालेलें सैन्य घेऊन अजमखान भेदाभेद न मानतां निजामशाहीप्रमाणें आदिलशाही किल्लेहि घेण्याची उघड खटपट करूं लागला व मोंगली वकिलानें ठरविलेली सरहद्द न मानितां अजमखानाचें सैन्य आदिलशाही मुलखावर बेधडक चालून आलें. यामुळें मोंगलांशीं सल्ला घडणें अशक्य आहे असें दिसतांच मुस्तफाचें मत महमदशहानें बाजूस सारलें व तो खवासखान व मुरारपंत यांच्या तंत्रानें वागण्यास तयार झाला. मुस्तफालाहि मोंगलांच्या वागणुकीचें समर्थन करितां येईना; यामुळें त्याचा निरुपाय झाला. अशा रीतीनें मोंगलांशीं विरोध करण्याचें धोरण निश्चित झाल्यावर निजामशाही व आदिलशाही दरबारांचा दोस्तीचा तह घडून येण्यास कांहींच अडचण राहिली नाहीं. मोंगलांनीं परिंडा हस्तगत करण्यासाठीं सैन्य रवाना केलें होतें, यामुळें निजामशाही सैन्यास मोंगलांशीं लढणें भागच होतें; त्याच कामांत विजापूरकरांनींहि साह्य करावें असें ठरून त्याप्रमाणें रणदुल्लाची रवानगी या कामावर झाली. त्यानें मोंगलांची कही मारून त्यांच्या सैन्यावर उपासमारीचा प्रसंग आणला व एका महिन्याअखेर मोंगली सैन्याला वेढा उठवून निघून जाणें भाग पाडलें. पण कंधारच्या वेढ्यांत मात्र मोंगलांना यश आलें. कारण या किल्ल्याला मोंगली सेनापती नासिरीखान यानें वेढा देण्याचें काम जें एक वेळ सुरू केलें तें एकसारखें अत्यंत नेटानें रेटीत नेलें. किल्ल्यांत याकुत खुदावंदखान याचा मुलगा सादिक हा निजामशाही किल्लेदार दक्षतेनें वागत असून बाहेरून सर्फराजखान हा सेनापती त्याला मदत पोंचविण्यासाठीं झटत होता. आणि रणदुल्ला व मुकर्रबखान यांच्या संयुक्त सैन्यानें हरतऱ्हेनें त्याचा पाठपुरावा केला. पण नासिरीखानानें सुरुंगाचें काम व्यवस्थितपणें चालवून एकवीस सुरुंग जय्यत

केले. व ते उडतांच हल्ला चढविण्याचें निश्चित केलें. इतक्यांत अजमखानहि सैन्यानिशीं येऊन पोंचला. यामुळें आदिलशाही व निजामशाही सैन्याला त्यांच्यापुढें टिकाव धरवेना व तें मागें हटूं लागलें. हें पाहून किल्ल्यांतील लोकांचा धीर खचला व त्यांनीं मोंगलांच्या हातीं किल्ला देऊन जीव वांचविण्याचा विचार कायम केला. याप्रमाणें हा किल्ला ४ महिने लढविल्यानंतर निजामशाही किल्लेदारानें श. १५५३ च्या वैशाखांत मोंगली सेनापतीच्या स्वाधीन केला. यामुळें आदिलशाही सैन्यास नामोहरम होऊन परत जाणें भाग पडलें. पावसाळ्याचे दिवस जवळ आल्यामुळें मोंगली सैन्यासहि परत फिरावें लागलें.

**१७. बुऱ्हाणाचा खून**—पावसाळ्यानंतर निजामशाही व आदिलशाही सैन्यें पुनः एकदिलानें मोंगलांशीं लढण्याचें काम चालवितील असा उघड हिशेब दिसत होता, पण बुऱ्हाणाच्या धांद्रटपणाच्या वृत्तीमुळें अगदीं उलट प्रकार घडला. जाधवरावाच्या खुनानंतर मोंगलांचें सैन्य निजामशाही मुलखावर चाल करून येणार असें दिसतांच निजामशाही मुत्सद्यांची धांदल उडाली. मुख्य प्रधान मुकर्रबखान मागें सांगितल्याप्रमाणें विजापूरकरांशीं तह घडवून आणण्यांत गुंतला असतां विरुद्ध पक्षानें फत्तेखानाची सुटका करण्याविषयीं मूर्तजाकडे तगादा लाविला. हमीदखान व मुकर्रबखान यांच्या सांगण्यावरून मूर्तजानें फत्तेखानास कैदेंत टाकिलें व जाधवरावासारख्यास भर दरबारांत ठार केलें. यामुळें अमीर व कारभारी लोक भयभीत होऊन आपणांवर केव्हां काय संकट येईल याचा नेम नाहीं असें वाटून मोठ्या फिकिरींत पडले. शेवटीं याकूतखान व उदाजी-राम यांनीं धीर धरून बादशहास पत्र लिहून कळविलें कीं, 'फत्तेखानाची सुटका करून त्याची सल्ला आपण घेत जावी हें बरें. आणि असें न केल्यास या राज्याची स्थिती कोणत्या पल्ल्यास पोंचेल तें आम्हांस सांगवत नाहीं.' या पत्राचा परिणाम बुऱ्हाणाच्या मनावर झाला व त्यानें फत्तेखानाची सुटका करावी असें ठरविलें. हमीदखान वगैरेंना हें अर्थातच पटण्याजोगें नव्हतें. फत्तेखान गर्विष्ठ, खुनशी, स्वार्थी आहे आणि तो बंधमुक्त करण्यानें निजामशाही राज्याचें कल्याण होणार नाहीं वगैरे मुद्दे त्यांनीं बादशहापुढें मांडले. पण त्याचा उपयोग झाला नाहीं. 'फत्तेखानास कैदेंतून मुक्त करून दरबारांत घेऊन या' असा बुऱ्हाणानें हुकूम दिला. त्याप्रमाणें फत्तेखानास आणण्यासाठीं पालखी रवाना झाली. तेव्हां एखलासखान, फरहादखान व

सफदरखान हे या कामावर नेमिले गेले होते. त्यांनीं खानास पालखींत बसण्यास सांगितलें. तेव्हांच त्यानें सर्व प्रकार ओळखला आणि आपला करडा अंमल सुरू केला. खान पालखींत बसला तेव्हां पालखीचे पडदे सोडलेले होते; तेव्हां त्यांकडे बोट दाखवून खान रागानें म्हाणाला, "मला असा झांकून कां नेतां? पालखीचे पडदे वर बांधा." एखलासखान वगैरेंना देखील खानाचें म्हणणें ऐकावेंच लागलें. कारण, दुसऱ्याच दिवसापासून फत्तेखानास मुख्य प्रधानकीचीं वस्त्रें मिळणार हें त्यांना माहीत होतें. सारांश, कैदेंतून दरबाराकडे येतांनाच फत्तेखान रस्त्यांतून लोकांचे मुजरे घेत आला. मूर्तजानें आपणांस बंधमुक्त केलें ही त्याची मेहेरबानगी नसून ती बिनतोड गोष्ट म्हणून त्याला करावी लागली हें लक्षांत ठेवून फत्तेखान दरबारांत येऊन पोंचला. बुऱ्हाणानें त्याचा चांगला आदरसत्कार करून इमानानें वागण्याविषयीं व दौलतीचें कल्याण घडवून आणण्यासाठीं झटण्याविषयीं त्याच्याकडून शपथा घेवविल्या आणि नंतर त्याला मुख्य प्रधानकीचीं वस्त्रें दिलीं. फत्तेखानानें देखील प्रथम कांहीं दिवस सर्व सूत्रें हातीं येईपर्यंत माजी वजिराशीं व मुत्सद्यांशीं वरपांगीं गोडीगुलाबीचें धोरण ठेविलें, आणि आंतून मोंगलांशीं पत्रव्यवहार सुरू केला. विरुद्ध पक्षाला फत्तेखानाच्या खुनशी स्वभावाची कल्पना असल्यामुळें जोहारखान हबशी व शिद्दीजमाल हे खानाची प्रत्यक्ष सुटका होण्याच्या सुमारास निजामशाही सोडून मोंगलांकडे गेले होते. आणि खानाची सुटका होऊन त्याला 'वकील व सिपाहसालार' हे हुद्दे देण्यांत आले; हें प्रत्यक्ष पाहिल्यानंतर मुक्रबखानहि शहाजहानाच्या आश्रयास गेला. यामुळें बुऱ्हाणाच्या मर्जीतली व त्याच्याशीं प्रेमळपणानें वागणारी मंडळी नाहींशी होऊन फत्तेखानाच्या बाजूचे लोक दरबारांत चोंहोंकडे दिसूं लागले. तेव्हां बुऱ्हाण या नव्या देखाव्यामुळें गांगरून गेला. फत्तेखानाशीं खटके उडण्याचे प्रसंग अधूनमधून येऊं लागले. पण फत्तेखान या वेळीं सावध होता. दुधानें पोळलेला मनुष्य ताक देखील फुंकून पितो या न्यायानें त्यानें आतां बुऱ्हाणाची मर्जी व मत पाहण्यांत वेळ न घालवितां त्याला वेड लागलें आहे या सबबीवर एकदम कैदेंत टाकलें; व तेथें दोन महिन्यांत तो मरण पावला. बुऱ्हाण आजारानें मरण पावला किंवा फत्तेखानानें वीष देऊन मारला याविषयीं आदिलशाहि व मोंगली इतिहासकारांत मतभेद आहे. पण तो कोणत्याहि कारणानें मेला असला तरी फत्तेखान या वेळीं निजामशाही राज्याचा कारभार अनियंत्रितपणें चालविण्यास मोकळा

झाला हें खरें. त्यानें हुसेनशाहा नांवाचा मुलगा तक्तावर बसवून मोंगलांशीं तहाची वाटाघाट सुरू केली.

**१८. दुष्काळाचें स्वरूप**—ही वाटाघाट मोंगलांच्या चांगलीच पथ्यावर पडली. या वेळीं दख्खनमधील व गुजराथेकडील भागांत भयंकर दुष्काळ पडल्यामुळें सैन्यांची हालचाल दुष्काळग्रस्त भागांतून करणें अशक्य होतें. त्यांतल्या त्यांत दौलताबादेकडील भागांत दुष्काळाचा कहर झाला. अन्नपाण्यावांचून हजारों लोक प्राणास मुकले व जे जिवंत होते त्यांना घरदार, वतनवाडी, पागाघोडीं, मानमरातब जें असेल नसेल तें विकून अगर गहाण टाकून चार दिवस जीव कसा वांचवावा या एकाच विचारानें ग्रासून टाकलें. मोठमोठे धनिक व उदार गृहस्थ भिकारी बनून भाकरीच्या तुकड्यासाठीं याचना करूं लागले, पण तीहि मिळेना. कुत्र्याचें मांस व हाडाचें पीठ मिसळलेला आटा बाजारांत दुकानदार ठेवूं लागले; आणि शेवटींशेवटीं माणसानें माणसास खाण्याची, हें तर काय पण, आईनें प्रत्यक्ष आपल्या पोटचें पोर खाण्याची, वेळ आली असें, मोंगली इतिहासकार वर्णन करतो ( इलि. ७-२४ ). भारतकारानें देखील या दुष्काळाचें वर्णन करतांना

**पशून्वै पशवो जक्षुर्मानुषा अपि मानुषम्॥** ( अ. ८-५५ )

हे शब्द योजिले असून श्रीमंत लोक शेरभर रत्नें देऊन मोठ्या प्रयासानें शेरभर कुळीथ घेत; अशी वस्तुस्थिती सांगितली आहे; व 'धान्य महाग झालें आणि सोनें मात्र स्वस्त झालें ' हें अर्थशास्त्रांतलें तत्त्व जातां जातां त्यानें मार्मिकपणें नमूद केलें आहे. अस्सल पत्रांतून देखील " आपण दुकळाकरिता भोईस पडलों. या करितां मौजे मजकूरची निमे पाटीलकी २२॥ होनास विकली." असे उल्लेख ( ले. ३३० ) ठिकठिकाणीं आढळतात. तेव्हां या भयंकर दैवी आपत्तीनें फत्तेखानाचा धीर खचून त्यानें मोंगलांशीं तहाचें बोलणें लावावें यांत कांहीं नवल नाहीं. त्यानें आपला मुलगा अब्दुल रसूल * याला शहाजहानाकडे पाठवून असा करार केला कीं, " निजामशाही खजिन्यांतलें जडजवाहीर व हत्ती मोंगलानीं घ्यावे. आणि मोंग-

---

* फत्तेखानावर हल्ला करण्यासाठीं मोंगलांनीं वजीरखान याची रवानगी ता. २३ रजब १०४१ रोजीं केली ( बा. १-४१० ); हें ऐकून फत्तेखानानें तहजोडीचें बोलणें लावण्यासाठीं आपला वकील पाठविला व त्याच्या मार्फत करारमदार ठरवून फत्तेखानाचा मुलगा अबदुल रसूल प्रत्यक्ष शहाजहानाच्या भेटीस आला. या भेटीनंतर वजीरखानास

( पुढील पानावर पहा. )

लांनीं हस्तगत केलेले निजामशाही किल्ले फत्तेखानाच्या हवालीं करावे. ” करारांप्रमाणें फत्तेखानानें जवाहीर मोंगलांच्या ताब्यांत दिलें व तो दौलताबादच्या किल्ल्याची व राज्यकारभाराची व्यवस्था लावूं लागला. पण त्यापूर्वी आपल्या विरुद्ध असलेले कित्येक कारभारी व मुत्सद्दी काढून त्यानें आपल्या विश्वासांतील माणसें त्या जागीं नेमलीं होतीं; तेव्हां बेकार झालेले अनुभवी निजामशाही लोक मोंगलांच्या आश्रयास गेले त्यांत साबाजी आनंदराव, शिवाजीपंत मुत्सद्दी, सखाराम मोकाशी यांचीं नांवें आढळतात. या लोकांना मोंगलांनीं आश्रय दिला; पण आतां तह झाल्यामुळें यापुढें तरी निजामशाहींतील बंडखोरांना मोंगली दरबारांत आश्रय मिळणार नाहीं अशी फत्तेखानास आशा वाटूं लागली. ही आशा वाटण्यास एक कारण असें होतें कीं, या वेळीं मोंगलांनीं शहाजीला जहागिरीदाखल दिलेला कांहीं मुलूख त्याच्याकडून काढून तो फत्तेखानाला बक्षीस दिला. यावरून फत्तेखानावर म्हणून ज्या शहाजीला मोंगलांनीं एक वर्षापूर्वीं धाडिलें होतें त्या शहाजीपेक्षां आतां त्यांना फत्तेखानाचा स्नेह अधिक फायदेशीर वाटूं लागला. अर्थात् फत्तेखानाच्या मानानें शहाजी आतां मोंगलांना कस्पटाप्रमाणें भासूं लागला हें स्पष्ट झालें. यापुढें शहाजीनें मोगलांच्या आश्रयास रहावयाचें तर निर्माल्य होऊन रहावें किंवा त्यांचा आश्रय सोडून दुसरीकडे सोय पहावी; असा पेंच फत्तेखानानें उत्पन्न केला. तथापि शहाजीला जसा वर्षापूर्वी मोंगलांनीं हाताशीं धरून कामापुरता मोठा मनसबदार बनविला व काम संपतांच त्याला झिडकारण्यास ते मुळींच कचरले नाहींत; त्याप्रमाणें मोंगल आज आपणास जवळ करीत आहेत तरी ते आपणासहि केव्हां झिडकारितील याचा नेम नाहीं, हें फत्तेखान ओळखून होता. त्यानें मोंगलांशीं तह ठरल्यावर देखील दौलताबाद किल्ल्याची दुरुस्ती करून किल्ल्यांत भरपूर अन्नाचा सांठा केला व सभोंवार दुष्काळानें आकांत मांडिला होता तरी किल्ल्यांतील शिपायांना पोटभर अन्न व घोड्यांना नियमित

---

परत फिरण्याविषयींचा बादशाही हुकूम ८ शाबान रोजीं ( शु. १५५३ फाल्गुन शु. ९=१९ फेब्रु. १६३२ ) देण्यांत आला ( बा. १-४१७ ). या बादशाहनाम्यांतील हकीकतीवरून श. १५५३ च्या माघांत शहाजहानानें वजीरखानाच्या आधिपत्याखालीं दौलताबादेवर व असफखानाच्या आधिपत्याखालीं विजापुरावर अशा दोन मोहिमा पाठविल्या; पैकीं पहिलींत फत्तेखानानें पड घेतल्यामुळें मोंगलांना सहज जय मिळाला व दुसरींत त्यांना त्याच महिन्यांत म्हणजे फाल्गुनांतच अपयश आलें; असें दिसतें.

वेळीं चंदी पोंचविण्याची व्यवस्था केली होती ( मो. १६१ ). सारांश, परक्यांवर विश्वासण्यापेक्षां स्वावलंबन हेंच तारक असतें याची जाणीव फत्तेखानाला होती.

**१९. मोंगलांची विजापुरावर मोहीम**—याप्रमाणें फत्तेखान ह्या निजामशाही मुत्सद्याला नमविण्याच्या कामीं मोंगलांना यश आलें एवढेंच नव्हे तर, निजामशाही व मोंगली सैन्यें जूट करून विजापुरावर चालून येत आहेत अशी बातमी उठली ( ले. ३४५ ) तेव्हां विजापूर दरबारांत व गोव्यांत मोठी गडबड उडून गेली. निजामशाही वांचविण्यासाठीं मोंगलांशीं वैर करण्याचें धोरण ज्यांनीं नुकतेंच उघडपणें जाहीर केलें होतें ते खवासखान, मुरार जगदेव वगैरे मुत्सद्दी तोंडघशीं पडणार असें दिसूं लागलें. मूर्तिजा हयात होता तोंपर्यंत त्याच्याशीं करार करून विजापूरकरांनीं दाक्षिणात्यांची जूट मोंगलांशीं टक्कर देण्यास समर्थ आहे हें दाखविण्याची हिंमत धरली होती; व फत्तेखानानें देखील कैदेंतून सुटल्यावर या धोरणास संमति दिली होती. यामुळें परिंडा व कंधार या किल्ल्यांवर मोंगलांनीं हल्ला केला तेव्हां विजापूरकरांनीं निजामशाही सैन्याचा हरएक प्रकारें पाठपुरावा केला. एवढेंच नव्हे तर, मोंगल व विजापूरकर यांच्यांत सलोख्याचा करारनामा करून जाणारा मोंगलांचा वकील शेख मैनुद्दीन याला त्यांनीं बेदरच्या किल्लेदारामार्फत कैद करून त्याची अप्रतिष्ठा केली. मोंगली वकिलाचा हा अपमान म्हणजे मोंगली बादशहास उघड युद्धाचें आव्हान करण्यासारखें आहे हें विजापूरकरांना कळत नव्हतें असें नव्हे. पण निजामशाही व आदिलशाही सैन्यें एकजुटीनें वागतील अशी उमेद असल्यामुळें मोंगलांच्या मानपमानाची फिकीर करण्याचें कारण नाहीं असें खवासखानास वाटत होतें. यामुळें दोनहि शाह्यांवर मोंगलांनीं एकाच वेळीं सैन्यें रवाना केलीं तरी त्यांना आपण पुरून उरूं असा त्यांचा अंदाज होता. पण फत्तेखानानें मूर्तजास ठार करून ऐन युद्धाच्या वेळीं मोंगलांशीं तह केल्यामुळें या तहाची बातमी व मोंगलांचीं सैन्यें विजापुरांत एकाच वेळीं येऊन पोहोंचलीं. वकिलाचा अपमान झालेला ऐकून शहाजहानानें तर विजापूरकरांना चांगली जरब बसेल अशी शिक्षा करण्यासाठीं म्हणजे सूड उगवण्याच्या भावनेनें असफखानाच्या आधिपत्याखालीं सैन्य रवाना केलें; व तें कसून लढणार याविषयीं कोणास संशय नव्हता. पण ज्या निजामशाही मदतीच्या आधारावर या संकटाशीं झगडण्याची हिंमत

विजापूरकरांनीं धरली होती तो निजामशाही आधार आयत्या वेळीं ढासळला. तथापि खवासखान व मुरारपंत हे हिंमतबाज होते. त्यांनीं याहि अडचणीच्या वेळीं आपल्या सैन्याचा धीर खचूं न देतां मोठ्या हिकमतीनें वेळ निभावून नेली. मोंगलांचें सैन्य विजापूरच्या रोखानें येऊं लागलें असें समजतांच त्यांनीं विजापुरांत भरपूर सामग्रीचा पुरवठा करून किल्ल्याबाहेर कित्येक कोसांपर्यंतचा मुलूख आपणच बेचिराख करून टाकिला. यावरून मोंगली सैन्याला सरहद्दीवर न अडवितां थेट विजापुरापर्यंत येऊं द्यावें आणि तेथें त्याच्यावर उपासमारीचा प्रसंग आणून त्यास तडफडावयास लावावें असा खवासखानानें विचार केला होता असें दिसतें.

या वेळीं शहाजहान स्वतः दक्षिणेंत बऱ्हाणपुरास होता. त्यानें विजापुरावरील या मोहिमेचें सेनापतित्व नूरजहानचा भाऊ असफखान याला दिलें व त्याच्या मदतीस खोजा अबुल हसन बक्षी, अबदुलखा तजबक, खानेजादखा, आकीदतखान इरादतखान, बहादूरखान, राजा गजसिंग व राजाराम वगैरे नामांकित योद्धे दिले होते. हें सैन्य नांदेड, कंधार, भालकी या मार्गानें गुलबर्ग्यास आलें. गुलबर्ग्यास वेढा देण्याचा असफखानाचा प्रथम विचार होता, पण यांत वेळ मोडेल असें वाटल्यामुळें नुसती लुटालूट करून तो पुढें निघाला आणि त्याला विशेष अडथळा न होतां त्यानें विजापुरापर्यंत मजल मारली. तेथें नौरसपूर व शहापूर यांच्या दरम्यान असलेल्या रंगाऱ्याच्या हौदावर या मोंगली सैन्यानें तळ दिला व तेथून थेट विजापूरच्या किल्ल्यावर हल्ला चढविण्याच्या विचारास असफखान लागला. तेव्हां निजामशाही बुडण्याचा प्रश्न मागें पडून आदिलशाही या वेळीं संपते किंवा काय असें सकृद्दर्शनीं गोव्याच्या पोर्तुगिजांना वाटून व असें होण्यांत गोवेकरांच्या नाशाचेंहि बीज पेरलें जातें हें ओळखून, पोर्तुगिजांनीं विजापूरकरांना दारूगोळा पोंचविला व हरएक प्रकारें त्यांचा पाठपुरावा करण्याचा ठराव गोव्याच्या कौन्सिलांत झाला असें तेथील प्रकाशित पत्रव्यवहारावरून दिसतें ( ले. ३४३, ३४५ ). या मदतीचें महत्त्व कितपत मानावयाचें हा प्रश्न स्वतंत्र आहे; पण दाक्षिणात्यांची जूट असावी ही कल्पना मोंगलांच्या चढाईच्या धोरणामुळें पुनः या वेळीं मुत्सद्यांच्या दृष्टीपुढें प्रामुख्यानें येऊं लागली यांत शंका नाहीं. खवासखान व मुरार जगदेव हे तर या कल्पनेचे धुरीण असून त्यांनीं मागें सांगितल्याप्रमाणें विचारपूर्वक सर्व योजना आंखून ठेवून

व मोंगलांचा हल्ला ठिकठिकाणीं मारून काढून त्यांच्यावर उपासमारीचा प्रसंग आणिला. तथापि बाह्य शत्रूंशीं लढण्याची पराकाष्ठा करून त्याच्यावर खवासखान व मुरारपंत हे हल्ल्यावर हल्ले चढवीत असले तरी खुद्द विजापूरच्या किल्ल्यांतच मुस्तफाखान हा अंतर्गत शत्रू मोंगलांना आंतली बातमी देण्यास टपलेला होता ही गोष्ट त्यांना माहीत नव्हती. उपासमारीनें मोंगल जेरीस आलेले पाहून खवासखानानें तहाची वाटाघाट करण्यांत वेळ घालवावा आणि मोंगल अगदीं त्रस्त झाले म्हणजे त्यांवर जोराचा हल्ला चढवावा असा विचार केला होता. त्याप्रमाणें शुष्क वाटाघाट करण्यांत बरेच दिवस गेले पण तह मात्र घडून आला नाहीं. तेव्हां मोंगलांनीं मुस्तफाखानास आमच्याशीं बोलण्यासाठीं पाठवा अशी मागणी केली. त्यामुळें आणि खानाचीहि इच्छा असल्यामुळें त्याला या कामावर नेमण्यांत आलें. त्याप्रमाणें मुस्तफाखान व रणदुल्लाचा चुलता खैरियतखान यांनीं असफखानाकडे जाऊन ४० लाख रुपये खंडणी देण्याचा ठराव केला. तथापि महमदनाम्यांत सांगितल्याप्रमाणें महमद आदिलशहानें या तहावर सही करण्याऐवजीं ‘ त्याचा जबाब तलवारीनें दिला. ’ म्हणजे मोंगलांशीं जोराचें युद्ध करण्याचा हुकूम दिला. पण मोंगलांशीं तहाचें बोलणें चालू ठेवून अगदीं तयारी झाल्यानंतर त्यांच्यावर आकस्मिकपणें हल्ला चढवावा हें श्रेयस्कर वाटल्यामुळें असफखानाकडे वाटाघाटीसाठीं मनुष्यांची जा ये सुरूच होती. पण शेवटीं आदिलशाही मुत्सद्यांचा डाव मोंगलांच्या लक्ष्यांत*आला व असफखानानें सैन्यासह विजापुरांतून पाय काढला. वेढ्याचें प्रत्यक्ष काम फक्त वीस दिवस चाललें. पण सभोंवारचा मुलूख उध्वस्त करून व खुद्द विजापुरांत धान्याचा व लढाऊ लोकांचा भरपूर पुरवठा करून मोंगलांच्या सैन्यास वेढा चालविणें अशक्य होईल अशी तजवीज खवासखान व मुरारपंत यांनीं मोठ्या दक्षतेनें आगाऊ केली होती. यामुळें मोंगलांच्या सैन्यांत रुपयाला एक शेर धान्य मिळण्याची पंचाईत पडूं लागली व जनावरें तर दाणावैरणीच्या अभावीं खचत चाललीं. तेव्हां असफखानाला विजापुरांतून पाय काढण्या-

* तहाच्या वाटाघाटीसाठीं मोंगलांकडे जाणाऱ्या लोकांत मुस्तफाचा एक हस्तक होता व इतरांना न कळत त्यानें उठतां उठतां एक चिठ्ठी असफखानापुढें टाकली व त्यामुळें आदिलशाही मुत्सद्यांचे अंतस्थ सर्व बेत मोंगलांना कळले, असें बादशहानाम्यांत म्हटलें आहे ( इलि. व्हा. ७ पृ. ३० ).

वांचून गत्यंतरच राहिलें नाहीं. जातां जातां त्यानें रायबाग व मिरज या दोन व्यापारी पेठा लुटल्या व वाटेवरच्या गांवांत लूटमार केली. या मोंगली सैन्याचा पाठलाग करून त्याच्यावर छापा घालण्याचें काम विजापूर दरबारानें मुरार जगदेव याजकडे सोंपविलें होतें. त्यानें १५ हजार सैन्यानिशीं सोलापुरापर्यंत मोंगलांचा पाठलाग केला आणि तेथून मोंगली सैन्य आपल्या राज्यांत गेल्यावर विजापूरचें सैन्य परत फिरलें. ही मोंगलांची मोहिम इ. १५५३ च्या माघापासून दोन तीन महिने चालली होती. या मोहिमेंत असफखान अपयश घेऊन आलेला पाहून शहाजहानाची त्याच्यावर गैरमर्जी झाली. या वेळीं शहाजहान दक्षिणेंत बऱ्हाणपुरास राहण्यास कंटाळला असल्यामुळें चैत्रांत तेथून निघाला व श्रावणांत आग्र्यास पोंचला. आणि तेथें पोंचतांच असफखानास दक्षिणेच्या सुभेदारीवरून काढून त्याच्या जागीं त्यानें महाबतखान खानखानान यास नेमिलें. असफखानाबरोबर, अजमखान वगैरे शहाजीच्या विशेष परिचयाची मंडळीहि दक्षिणेंतून गेली; त्यामुळें मोंगली व निजामशाही संबंधांत एकदम बदल होऊन राजकारणास निराळें वळण लागलें.

२०. **मोंगली मुत्सद्दी**—शहाजीनें विजापूर सोडल्यापासून असफखानाची स्वारी होईपर्यंत तेथें काय काय राजकीय उलाढाली झाल्या तें येथवर सांगितलें. त्यावरून या चार वर्षांत शहाजीचा विजापूरकरांशीं संबंध नव्हता असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्याऐवजीं त्यानें प्रथम निजामशाहीचा आणि जाधवरावाच्या खुनानंतर मोंगलशाहीचा आश्रय केला होता. पण मोंगलांच्या आश्रयासहि तो लौकरच कंटाळला असें दिसतें. त्या वेळीं मोंगली दरबारांत स्वतः शहाजहान, असफखान व महाबतखान या तीन व्यक्ति प्राधान्यानें वावरत होत्या; आणि या तिघांचें वर्णन एका वाक्यांत करावयाचें असल्यास, ते उलट्या काळजाचे होते असें म्हणण्यास हरकत नाहीं. शहाजहान तर बापाला बाप न म्हणणारा, त्याच्या हयातींत बंडाचें निशाण उभारणारा व त्यांत यश न आल्यामुळें गुजराथेपासून ओरिसापर्यंत आश्रयार्थ मलिकंबर व कुतुबशहा यांच्याकडे विनवण्या करणारा आणि स्वतःच्या जिवास देखील कंटाळलेला असा भणंग माणूस होता. आणि जहांगीर मेला तेव्हां दैववशात् मुख्य सूत्रें त्याचा सासरा असफखान याच्या हातीं असल्यामुळें त्यानें अनेक हिकमती लढवून या भणंग माणसाला दिल्लीचें तक्त मिळवून दिलें. या हिकमती नीतिदृष्ट्या इतक्या निंद्य होत्या कीं त्यांचें वर्णन

-वाचून कोणाच्याहि अंगावर शहारे उभे राहतील. तो नूरजहानचा भाऊ असल्यामुळें तिनें मोठया विश्वासानें त्याला सर्वाधिकारी बनविलें होतें. पण जहांगिराचें प्राणोत्क्रमण होतांच त्यानेंच नूरजहानला कैद केलें, तिच्या जांवयाला युद्धांत पराभूत करून त्याचे डोळे काढले, आणि आपला जांवई शहाजहान जुन्नरकडे होता त्याला तांतडीनें निघून येण्याविषयीं गुप्तपणें निरोप पाठवून लोकांना फसविण्यासाठीं शहाजहानाचा पुतण्या दावरबक्ष याला, तो नको नको म्हणत असतां, सिंहासनावर बसविलें आणि शहाजहान येऊन पोंचतांच हा दावरबक्ष व त्याचे चार भाऊ अशा पांच राजपुत्रांना एका रात्रींत ठार मारलें ! आगि हीं राक्षसी कृत्यें केल्याबद्दल शहाजहानानें त्याला शाबासकी देऊन जास्तींत जास्त मोठा हुद्दा दिला. शहजहानाचा दुसरा अधिकारी महाबतखान. यानें जहांगिरास कैदेंत टाकून आपल्या हातीं सूत्रें घेतलीं होतीं. पण नूरजहान व असफखान यांच्या चलाखीमुळें जहांगीर त्याच्या अटकेंतून निसटला व महाबतखानाला जीव वांचविण्यासाठीं, भटकत जुन्नर येथें शहाजहानाच्या सोबतीस जाणें इष्ट वाटलें. आणि पुढें शहाजहान अजमीर येथें पोंचून लौकरच बादशहा होणार असा रंग दिसूं लागतांच त्याच्यापुढें कुराण ठेवून महाबतखानानें डोळ्यांत आंसवें आणून विनवणी केली कीं, " असफखान माझ्या जिवाला अपाय केल्यावांचून राहणार नाहीं. याकरितां मला मक्केच्या यात्रेला जाण्यास परवानगी तरी द्या; किंवा या मशिदींत कुराणावर हात ठेवून माझ्या जिवास अपाय होणार नाहीं अशी शपथ तरी वाहा. " अर्थात् शहाजहानानें तत्काळ शपथ घेतली व राज्यावर बसतांच या महाबतखानाला मोठी मनसब दिली. सारांश, शहाजहान व त्याचे मनसबदार स्वत:च्या फायद्यासाठीं वाटेल तो राक्षसी प्रकार करण्यास यत्किंचित् न कचरणारे असे होते. त्यांच्या मानानें निजामशाही व आदिलशाही मुत्सद्दी पुष्कळच पापभीरु होते असें म्हणावें लागेल. तथापि दिल्लीकरांची मगरमिठी दक्षिणेंतील राज्यांवर बसत चालल्याचें उघड दिसूं लागल्यामुळें त्यांच्याच नीतीचें अनुकरण इतरांनाहि करणें भाग होतें. विजापूरकरांवरील मोहिमेंत अपयश येतांच ज्यानें शहाजहानाला प्रत्यक्ष राज्यपद मिळवून दिलें होतें त्या असफखानावर बादशहाची मर्जी खप्पा झाली; मग इतरांच्या हातून चुका झाल्या असतां त्यांच्यावर कोणता प्रसंग ओढवेल आणि कोणता ओढवणार नाहीं याचा अंदाज कोणीं करावा? त्यापेक्षां, नेहेमीं ज्या शाहींत रहावयाचें त्याच्या शेजारच्या शाहीशीं आंतून

अनुसंधान ठेवणें हा उत्तम मार्ग होय असें त्या काळच्या मुत्सद्यांचें अनुभवानें बनलेलें मत दिसतें. राजकारणाला स्थिर पाया असूं शकत नाहीं; तें नेहेमीं धरसोडीचेंच असावयाचें, हें अपरिहार्य असल्यामुळें तत्कालीन मराठे सरदारांना त्याचेंच अवलंबन करावें लागे. शहाजीनेंहि गेल्या बारा वर्षांत तोच मार्ग स्वीकारिला होता.

**२१. राजकारण दुलग असावें**—शहाजीच्या या धोरणाचें वर्णन करतांना चिटणिसांनीं "राजकारण दुलग असावें" (चि. पृ. २४) या सूत्रमय वाक्याचा उच्चार केला आहे; आणि तें वाक्य त्या वेळच्या वस्तुस्थितीचें निदर्शक आहे यांत शंका नाहीं. निजामशाही मुत्सद्दी साबाजी अनंत चतुर यानें हें राजनीतीचें सूत्र शहाजीला सांगितलें असें चिटणीस सांगतात. त्यांत तथ्यांश कितपत आहे हें आपणांस माहीत नाहीं. पण शहाजी आपल्या जहागिरीचें काम पाहूं लागल्यापासून श. १५५४च्या प्रारंभीं त्यानें मोंगलांचा संबंध तोडून टाकला, तेथपर्यंतच्या बारा वर्षांतील राजकारणी मराठ्यांची हालचाल एकसूत्री नसून दुलग होती हें अनेक उदाहरणें देऊन सिद्ध करतां येण्यासारखें आहे. त्या वेळच्या मराठे सरदारांत संघटना नव्हती, त्यांना आपलेपणानें आश्रय देणारें राज्ययंत्र कोठेंहि अस्तित्वांत नव्हतें, लोकसमाज राजकीय बाबतींत पूर्णपणें उदासीन होता आणि मुसलमानी बादशहांनीं हिंदूंवर धर्माच्या नांवाखालीं जबरदस्ती करण्याचें पुढच्या काळांत स्वीकारलेलें धोरण, या बारा वर्षांत उद्भवलें नसल्यामुळें, 'धर्मासाठीं मारूं किंवा मरूं' असा निकराचा प्रतिकार करणाऱ्या सहधर्मीयांमध्यें उद्भूत होणारी कार्यप्रेरक सहानुभूती व तज्जन्य एकजूट यांचा या काळांत पूर्ण अभाव होता. अशा नानाविध कारणांनीं एकेकटे पण अनेक मराठे सरदार कधीं ह्या शाहींत तर कधीं त्या शाहींत असे कोणत्याहि एका तत्त्वाची अगर मालकाची कांस न धरितां इतस्ततः भ्रमण करीत असल्याचा देखावा दिसतो. आणि त्यांच्या पराक्रमाचें कौतुक करणारा स्वकीय राजा अगर मराठ्यांचा स्वाभिमान जागृत करील असा प्रसंग, धोरण, महत्त्वाकांक्षा अगर तत्त्व त्यांना न सांपडल्यामुळें ते केवळ साधेल त्या मार्गानें आणि जमेल त्याच्या उपयोगीं पडून, कसेंतरी कालहरण करीत असावेत अशी कल्पना होते ती वस्तुस्थितीला धरूनच आहे. त्या वेळच्या सत्ताधाऱ्यांच्या हुकमानें लढून त्यांना हरप्रसंगीं यश मिळवून देणारे फौजबंद पराक्रमी मराठे सरदार असे निर्माल्यवत् होऊन रहाण्याचें मुख्य कारण त्या वेळची

परिस्थिती होय. त्यांची एकांतिक निष्ठा खिळून राहील असें एकहि आदरस्थान त्यांना दिसत नसल्यामुळें, त्यांच्या अंतःकरणांतील उच्च भावनांच्या तारा छेडल्या जाण्याचा केव्हांहि संभव नव्हता. तेव्हां आपला जीव जगविणें हेंच काय तें प्रत्येकाचें महत्कृत्य होऊन बसलें. जाधवरावा-सारख्या बड्या प्रस्थांना एवढ्याशा क्षुद्र ध्येयासाठीं काय काय खटपट करावी लागली, कोणत्या यातना सहन कराव्या लागल्या आणि कोणत्या प्रकारची विलक्षण धांवपळ करावी लागली याची कांहींशी कल्पना मागें दिलेल्या हकीकतीवरून येण्यासारखी आहे. इतकें करूनहि शेवटीं ह्या जाधवरावावर मारेकऱ्यांच्या हातून मरण्याचा प्रसंग आला; हें लक्षांत घेतलें म्हणजे जाधव-रावाचें चरित्र हें तत्कालीन मराठे सरदारांचा पराक्रम, त्यांची लायकी, त्यांचें धोरण, त्यांचें राजकारण आणि त्यांच्या यशापयशाची किमान मर्यादा या सर्वांचा संपूर्ण आदर्शच होय असें म्हटल्यावांचून राहावत नाहीं. शहाजीला देखील याच अनुभवाच्या भट्टींतून जावें लागलें. श. १५४२ पासून १५४६ पर्यंत चार वर्षें तो निजामशाहींत होता. पण तेथें भाऊबंदकीमुळें व मलिकंबराशीं वितुष्ट आल्यामुळें त्या शाहीस रामराम ठोकून तो आदिलशाहींत गेला; तेथें २।३ वर्षें होतात न होतात तों त्याचा महमदशहानें अपमान केला; व ही बादशहाच्या भावी गैरमर्जीची धोक्याची प्रथम-सूचना मिळतांच तेथून तो श. १५५० मध्यें परत निजामशाहींत गेला. तेथें तर भरदरबारांत प्रत्यक्ष जाधवरावासारखा वृद्ध, पराक्रमी व अनुभवी सरदार ठार झाल्याचें दिसतांच जो तो हवालदिल झालेला पाहून शहाजीहि उठून मोंगलांकडे गेला; आणि त्या मोंगलांनींहि जेव्हां फत्तेखानाची कड घेऊन शहाजीला धुडकावून लाविलें तेव्हां मात्र शहाजीला तेथून दुसऱ्या शाहीकडे जाण्यास वावच राहिला नाहीं. चोहोंकडून तो कोंडींत सांपडल्यासारखा झाला. आणि दुलग राजकारणाचा डाव खेळत बसणें त्याला ह्यापुढें अशक्य झालें. विजापूरकरांनीं नुकतेंच एक वर्षापूर्वीच त्याच्याशीं युद्ध पुकारून त्याचा पुण्यांतील वाडा जाळून पोळून आपला संताप व्यक्त केला होता; फत्तेखान तर शत्रू म्हणूनच समोर उभा होता आणि मोंगलांनीं शहाजीला चार दिवस मनसब दिल्याचा आव आणून त्याचा खेळखंडोबा चालविल्याचें तो प्रत्यक्षच अनुभवीत होता. यामुळें दुलग राजकारणाची अनुभविलेली आणि शिळी पद्धति निकामी ठरून जिवंत रहावयाचें असेल व तेंहि थोडा बहुत शिपाईबाणा कायम ठेवून रहावयाचें

असेल, तर स्वावलंबनाच्या जोरावर राजकारणाची उभारणी करण्यावांचून गत्यंतर नाहीं; या परिस्थितीची जाणीव शहाजीला थोडी थोडी होऊं लागली असावी. त्यानें त्या वेळच्या शिष्टाचाराला अनुसरून तिन्ही शाह्यांची क्रमानें इमानेंइतबारें सेवा करून पाहिली. त्या सर्वहि ठिकाणीं आपण केलेल्या एकनिष्ठ कामगिरीचें चीज न होतां उलट प्रत्येक ठिकाणीं या दुलग राजकारणाचें भूत थयथयाट करीत होतें त्यामुळें कोणत्या वेळीं कोणाचा संक्षेप उडेल याची शाश्वती नव्हती. स्वतः शहाजीच्या सरळपणाचा इतरांनीं वेळीं अवेळीं फायदा घेतल्याचें स्पष्ट दिसतें. परंतु खुद्द शहाजीनें वक्र राजकारण केल्याचा इतिहासांत पुरावा मिळत नाहीं. तेव्हां शहाजीसारख्या पराक्रमी व एकमार्गी सरदाराच्या मनांत त्या वेळच्या सर्व सत्ताधीशांच्या बेमानीबद्दल तिटकारा उत्पन्न होऊन स्वतःच्या भवितव्यतेबद्दल विचार करतां करतां, वर सांगितल्याप्रमाणें इतर सर्वच मार्ग खुंटल्यामुळें, दिसणाऱ्या अंधारांतून चांचपडत असतां, एकदम स्वतंत्र प्रयत्नानें निजामशाही उभारण्याची कल्पना सुचावी आणि परिस्थितीनें, त्याच्या पराक्रमानें आणि त्याच्या नेकजात दानतीमुळें त्यामध्यें त्याला बरेंचसें यश यावें; ही गोष्ट त्या वेळच्या इतिहासांत जितकी अभूतपूर्व तितकीच आणि त्याच कारणामुळें नवयुगप्रवर्तक झाली यांत शंका नाहीं.

## प्रकरण ३ रें

# शहाजहानाच्या चढाईस शहाजीचें उत्तर

**१. फत्तेखानाची धरसोड**—विजापूरकरांवरील मोहिमेंत अपयश आलेलें पाहून शहाजहानास चीड आली व तांतडीनें बऱ्हाणपुराहून १५५४ च्या चैत्रांत निघून तो आग्र्यास आषाढांत पोंचला. तेथें पोंचतांच प्रथम त्यानें असफखान व अजमखान यांना दक्षिणेच्या सुभेदारीवरून काढून त्या जागीं महाबतखानाची नेमणूक केली. पण महाबतखानानें प्रथम स्वतः न येतांच आपला मुलगा खानजमान यास दक्षिणेंत पाठविलें. त्यामुळें मोंगलांचा दरारा दक्षिणेंत कमी झाला. स्वतः शहाजहान दक्षिणेंत हजर असूनहि विजापूरकरांवरील जी मोहीम त्याला यशस्वी करतां आली नाहीं ती शहाजहान निघून गेल्यावर महाबतखानाच्या अगर त्याच्या मुलाच्या हातून कितपत तडीस जाईल याविषयीं संशय वाटणें स्वाभाविक होतें. निजामशाहींत तर या वेळीं चांगलीच फाटाफूट सुरू झाली. मोंगलांच्या आश्रयानें वागणाऱ्या फत्तेखानानें बुऱ्हाणनिजामशाहास ठार मारल्यापासून अनेक निजामशाही सरदारांचीं मनें त्याच्याविषयीं विटलींच होतीं. मध्यंतरीं शहाजहानाशीं तहाचें बोलणें लावून मोंगली आश्रयाच्या जोरावर इतरांना दबकाविण्याचा त्यानें कांहींसा प्रयत्न केला. पण आतां तोहि आब नाहींसा झाल्यामुळें निजामशाही सरदारांनीं, आश्रय मिळविण्याच्या दृष्टीनें आदिलशाही व मोंगली बादशाहाशीं परस्पर बोलणें सुरू केलें. अशांपैकीं परिंडयाचा किल्लेदार आगा रिजवान हा एक होता. याला त्याच्या पराक्रमाबद्दल 'हैबतखानी' असा किताब (हैबत=भीती) निजामशाहींतून मिळाला होता. श. १५५२ मध्यें जेव्हां मोंगली सरदार अजमखान यानें त्याच्या किल्ल्यावर हल्ला केला तेव्हां त्यानें खवासखान व मुरारपंत यांच्या साहाय्यानें तो हल्ला परतविण्यांत यश मिळविलें. या अडचणीच्या वेळीं फत्तेखानाच्या हातून त्याला कांहींच मदत मिळाली नाहीं. व शिवाय, पुढें त्याचें धोरण मोंगलांशीं मिळून वागण्याचें दिसलें; तेंहि त्याला पटण्याजोगें नव्हतें. या कारणांमुळें त्यानें विजापूरकरांकडे बोलणें लावून किल्ला त्यांच्या हवालीं केला व आपण त्यांची सरदारी पत्करली. त्याबद्दल त्याला

१० हजार होन बक्षीस देण्यांत आले व विजापूरकरांतर्फे मुरारपंतानें जाऊन १५५४ श्रावण शु. १२ (१८जुलै १६३२) रोजीं परिंडा ताब्यांत घेतला.*(मह.) फत्तेखानाच्या कारभारास विटलेला दुसरा सरदार गाळण्याचा किल्लेदार महमूदखान नांवाचा होता. या वेळीं शहाजी नाशीक, त्रिंबक, संगमनेर, जुन्नर व कोंकणापर्यंतचा कांहीं भाग हस्तगत करून व जीवधन किल्ल्यांतील एक निजामशाही वंशांतला मुलगा हाताशीं घेऊन त्याच्या नांवानें कारभार करूं लागल्यामुळें फत्तेखानाच्या ताबेदारीपेक्षां शहाजीची ताबेदारी अधिक बरी असें महमूदखानाला वाटूं लागलें. नाशिकच्या बाजूस शहाजीनें या वेळीं दिलेलें आज्ञापत्र आपल्यापुढें आहे (ले. ३४९). त्यानें या वेळीं स्वातंत्र्याचें निशाण उभारलें होतें (Raised the banner of independence) असे शब्द बादशहानाम्यांत आहेत (इलि. ७-३५); तेव्हां स्वतंत्रपणें नवी निजामशाही उभी करूं पाहणाऱ्या शहाजीला आपण किल्ला द्यावा असें महमूदखानानें योजिलें असल्यास नवल नाहीं. पण महाबतखानाचा मुलगा खानजमान यानें या वेळीं ही गोष्ट घडूं दिली नाहीं. गाळण्याच्या शेजारीं अलंग नांवाचा किल्ला होता. तेथला किल्लेदार मीरकासीमखान हरावी याला पत्र लिहून त्याच्यामार्फत खानजमान यानें महमूदखानाचें मन वळविलें आणि शहाजीच्या ताब्यांत किल्ला देण्यापेक्षां मोंगलांच्या ताब्यांत देण्यानें त्याचा अधिक फायदा होण्याजोगा आहे ही गोष्ट पटवून दिली. पुढें मीरकासीम स्वतः त्याच्या भेटीस गेला व त्यानें महमूदखानानें गाळणा किल्ला मोंगलांच्या स्वाधीन करावा असें ठरवून त्याला मोठें बक्षिस देण्याविषयीं बादशाही अभिवचन मिळवून दिलें. अशा रीतीनें हा किल्ला मोंगलांनीं ताब्यांत घेतलेला पाहून शहाजीला तर संताप आलाच; पण

---

* यानंतर श. १५५६ च्या ज्येष्ठांत महाबतखान व शहाजादा शहासुजा यांनीं किल्ला घेण्याचा प्रयत्न केला. पण त्यांत त्यांना यश आलें नाहीं. पुढें दोन वर्षांनीं तह झाला त्या वेळीं हा किल्ला विजापूरकरांकडेच ठेवण्यांत आला. पण आपणांला हा किल्ला घेतां आला नाहीं याचें मोंगलांना मोठें वैषम्य वाटत होतें. शेवटीं श. १५८२ मध्यें विजापूरकर शिवाजीमहाराजांशीं लढण्यांत गुंतले असतां तेथील किल्लेदार गालीब याला फितूर करून शाइस्तेखानानें कहारतलबखानामार्फत हा किल्ला ताब्यांत घेतला. अशा रीतीनें या सरहद्दीवरच्या किल्ल्यासाठीं ३० वर्षें मोंगलांना खटपट करावी लागली. प्रसिद्ध मलिकमैदान तोफ याच परिंडा किल्ल्यावर होती; ती मुरार जगदेवानें विजापुरास नेऊन पोंचविली. ती नेण्यास ३० हजार माणसें व २००० हजार बैल लावावे लागले व भीमानदी ओलांडतांना ती नावेंतून नेत असतांना नदींत पडली; वगैरे माहिती महमदनाम्यांत आहे.

आपल्याविरुद्ध फितुरी करणाऱ्या किल्लेदारास मोंगल आश्रय देऊं लागले हें पाहून फत्तेखान देखील चपापला; आणि विजापूरकरांशीं बोलणें लावण्याच्या खटपटीस लागला. इतक्यांत शहाजी व विजापूरकर यांचा तह ठरून मोठ्या सैन्यानिशीं ते दौलताबादेवर चालून येणार अशी बातमी आली. तेव्हां त्यानें दुलग राजकारण चालविलें. खुद्द बुऱ्हाणाच्या खुनानें आपले हात विटाळल्यामुळें निजामशाही सरदारांचीं मनें आपल्याविषयीं कलुषित झालीं आहेत हें त्याला प्रत्यक्ष अनुभवानें कळून आलें होतें. अशा स्थितींत शहाजी व मुरारपंत एक झालेले पाहून फत्तेखानानें मोंगली सेनापतीला तावडतोब निरोप पाठविला कीं, "तुम्ही सैन्यासह वेळेवर येऊन मदत कराल तर दौलताबादचा किल्ला राखतां येईल; नाहींतर आदिलशाही सैन्यापुढें माझा निभाव लागणें कठीण दिसतें. तुम्ही लौकर येऊन पोहोंचाल तर किल्ला तुमच्या ताब्यांत देऊन मोंगलांची सरदारी पत्करण्याची देखील माझी तयारी आहे." हा निरोप पोंचतांच महाबतखान आपल्या मुलास पुढें पाठवून, स्वतः सैन्यानिशीं १५५४ च्या माघ शु. १ (१।१।१६३३) रोजीं दौलताबादच्या रोखानें निघाला. विजापूरकरांना ही कल्पना होतीच. त्यांनीं महाबतखानास अडविण्याचा प्रयत्न तर केलाच. पण त्यापेक्षां महत्त्वाची गोष्ट ही कीं, त्यांनीं फत्तेखानासच मथवून मोंगलांशीं लढण्यास प्रवृत्त केलें. "किल्ला तुझ्या ताब्यांत राहूं देतों; आणि खर्चास ३ लाख होन व अन्नसामग्री देतों; पण मोंगलांच्या हातीं किल्ला देऊं नको" अशा अर्थाचें त्यांनीं बोलणें लाविल्यामुळें फत्तेखानाला आयतेंच फावलें. त्यानें मोंगलांना दिलेलें अभिवचन रद्द करून विजापूरकरांशीं सलोख केला! ही बातमी मोंगली सेनापती महाबतखान याला जाफरनगर म्ह. जाफराबाद येथें समजली; तेव्हां फत्तेखानाच्या चंचल वृत्तीचा राग येऊन त्यानें आपला मुलगा खानजमान याला फत्तेखानाच्या शासनार्थ कसून मेहेनत करण्याविषयीं कळविलें. पण त्याच्या हातून काम निभत नाहीं असें दिसून येतांच तो स्वतः मोठ्या सैन्यानिशीं जाफरनगराहून निघाला व १५५५च्या चैत्र शु. १ स दौलताबादेस येऊन पोहोंचला. दुसऱ्याच दिवसापासून किल्ल्याजवळ निजामपुऱ्यांत खास निजामशहाचा एक वाडा होता तेथें त्यानें ठाणें दिलें. व किल्ल्यांतील 'कागदीवाडा' ज्या टेकडीवर होता त्या रोखानें एकसारखी सरबत्ती चालविण्याविषयीं खानजमान वगैरेंस हुकूम सोडले, आणि सुरुंग लावून कोट पाडण्याचीहि तयारी चालविली. इकडे फत्तेखानानें

निजामशहास, 'काळाकोटांत' ठेविलें; आणि स्वत:चें ठाणें महाकोटांत देऊन सिपाईप्यादे यांनीं मलिकंबरानें बांधलेल्या अंबरकोटांत रहावें असें ठरविलें.

याहि वेळीं विजापूरदरबारांत या सर्व घडामोडींचा विचार सुरू झाला. तेव्हां अनेकांचीं अनेक मतें पडलीं. मुस्तफाखान तर पूर्वीपासूनच मोंगलांची बाजू पत्करावी असें म्हणणारा होता. पण मोंगलांनीं गेल्या वर्षी आदिलशाही मुलखाची जी नासाडी केली होती तिच्या आठवणीनें मोंगलांचा शेजार आदिलशाहीला न घडण्यासाठीं खटपट केली पाहिजे हें महमूदशहानेंच ठरविलें असल्यामुळें त्याचा विचार मागें पडला; आणि खवासखानाच्या हातीं राज्याचीं सूत्रें येऊन रणदुल्लाखानास मोंगलांना अडविण्यासाठीं पाठविण्यांत आलें. पण रणदुल्लाबरोबर मुरार जगदेवहि होता. या दोघांच्या विचारसरणींत प्रारंभापासून बारीक भेद होता तो दिवसेंदिवस वाढतच गेला. मोंगलांना दौलताबादेकडे येऊं न देण्यासाठीं व तो किल्ला त्यांच्या हातीं पडूं न देण्यासाठीं आपण झटावें हें दोघांनाहि मान्य होतें. पण या अडवणुकीच्या कार्यक्रमाबरोबर जोरदार असें निजामशाही राज्य कशानें उभें होईल या प्रश्नावर एकवाक्यता होण्याजोगी नव्हती. रणदुल्ला व खवासखान यांच्या मतें, "फत्तेखान निजामशाही चालवीतच आहे. त्यालाच मदत केली म्हणजे आपली जबाबदारी संपली; तो निजामशाहीची अंतर्गत व्यवस्था कशीहि करीत असला तरी त्यांत आपणांस लक्ष घालावयाचें कारण नाहीं." पण मुरारपंताला हें म्हणणें संमत होण्यासारखें नव्हतें. "फत्तेखान व शहाजी असे जे दोघे प्रतिस्पर्धी निजामशाहीचें पुनरुज्जीवन करण्यासाठीं म्हणून पुढें आले आहेत त्यांपैकीं फत्तेखानाचा नाकर्तेपणा सर्वांना परिचित असून तो फितुरी करून मोंगलांना केव्हां मिळेल याचा नेम नाहीं; त्यापेक्षां शहाजीच्या शिपाइगिरीवर व मुत्सद्देगिरीवर विश्वासणें अधिक शहाणपणाचें होईल." असें मुरारपंताचें म्हणणें होतें. यामुळें अर्थात्च शहाजी व मुरारपंत यांच्या धोरणाशीं रणदुल्लाचें धोरण विसंवादी असें होऊं लागलें.

तथापि, प्रारंभीं मोंगलांना अडविण्याच्या बाबतींत शहाजी, मुरारपंत व रणदुल्ला यांचें ऐकमत्य असल्यामुळें मोंगलांना दौलताबादेपर्यंत येण्यास बराच त्रास पडला व फत्तेखानाकडे दाणावैरण आणि अन्नसामग्री पोंचूं शकली. पण महाबतखान व खानजमान यांनीं किल्ल्याच्या एका बाजूस तळ देण्यापर्यंत मजल मारली तेव्हां आदिलशाही सैन्याला सामग्री पोंचविण्यास अडचण पडूं

लागली. आणि किल्ल्यांत फत्तेखान, कोटाबाहेर आदिलशाही फौज त्या-खालीकडे कसब्यांत मोंगली फौज उभी असल्यामुळें मारामारीचा भर मधल्या आदिलशाही सैन्यावर पडूं लागला.

तथापि इतरत्र नानातऱ्हेचीं व्यवधानें उत्पन्न होऊन उपद्रव पोंचल्यामुळें मोंगलांनाहि ह्या वेढ्याचें काम निर्वेधपणें चालविणें शक्य झालें नाहीं. सोलापूरचा निजामशाही किल्ला सिद्दी रेहान याच्या ताब्यांत होता; तो त्यानें स्वतःच्याच नांवानें बळकावून दुरुस्त केला आणि निजामशाही राज्यांतले बेकार झालेले लष्करी लोक नोकरीस ठेवून सभोंवार लुटालूट करण्याचें धोरण पत्करलें. आदिलशाहींतील देवनगांव येथें मारझोड करून तेथील लोकांपासून त्यानें दहा हजार होन घेतले. नंतर निजामशाही राज्यांत पैसा मिळवून तो बीडच्या सरहद्दींत गेला. आणि दौलताबाद येथील मोंगली सैन्यासाठीं धान्य व सामग्री घेऊन जाणाऱ्या तुकडीवर जाफराबादेपासून थोड्या अंतरावर त्यानें जोराचा हल्ला केला, व त्या तुकडीची दाणादाण उडविली. अशा प्रकारें यदृच्छेनें उत्पन्न होणारे दंगे मोंगलांना बाधक होऊं लागले. हें पाहून मोंगलांना मिळालेल्या निजामशाही सरदारांतहि साहजिकपणें चलबिचल सुरू झाली. याकुतखान नांवाचा निजामशाही सरदार मोंगलांना मिळला होता त्यानें मोंगलांचा जोर कमी पडत चाललेला पाहून फत्तेखानाशीं संधान बांधलें; व त्याला अंतस्थ रीतीनें बातमी पुरविणें आणि धान्य पोंचविणें वगैरे गोष्टी सुरू केल्या. पुढें त्याची ही फितुरी उमगून आली तेव्हां याकूतखान मोंगलांना सोडून उघडपणें दक्षिणी सैन्यास सामील झाला. दक्षिणेंतील पुरातन सरदारांत या खानाची गणना होत असल्यामुळें तो सामील झाल्यापासून दक्षिणी सैन्यास हुरूप चढला. त्यानें परत आल्याबरोबर सर्व रस्ते रोंखून मोंगली सैन्यावर असा उपासमारीचा प्रसंग आणिला कीं, त्या लष्करांत एक होनास एक पायली धान्य मिळण्याची पंचाईत पडूं लागली. शेवटीं महाबतखानानें कंटाळून वेढा उठवून जाण्याचें ठरविलें; व तो दोन मजली निघूनहि गेला. परंतु, इतक्यांत त्याच्या सैन्यावर छापा घालण्याची बुद्धी दक्षिणी फौजांना होऊन जी मारामारी झुंपली तिच्यांत बंदेयाकुदखान जखमी झाला व त्याच्या भोंवतीं रणकंदन माजलें. शेवटीं बावीस जखमा लागून त्यांतच तो मरण पावला. तेव्हां सर्व सैन्याच्या वृत्तींत एकदम इतका बदल झाला कीं, महाबतखानानें परत जाण्याचा विचार सोडून पुनः

दौलताबादच्या वेढयाचें काम चालविण्याचें निश्चित केलें आणि दक्षिणी सैन्य पळत सुटल्यामुळें त्याला मोंगली सैन्य वेढ्यासाठीं पूर्वीच्या जागीं उभें करून मोर्चे बांधण्याचें काम हिंमतीनें चालविण्यास अडचण पडली नाहीं.

**२. महाबतखान दौलताबाद घेतो**—मोंगलांचा हा नवा दम पाहून फत्तेखानाचा धीर सर्वांपेक्षां जास्त खचला. दाणागल्ला संपून किल्ल्यांतील त्याचे लोकहि त्रस्त झाले होते. सभोंवारच्या मुलखांत चोंहींकडे दंगा माजल्यामुळें आपणांस अन्नसामग्रीचा पुरवठा होणें दिवसेंदिवस कठीण पडणार हें त्याला दिसूं लागलें. तेव्हां फत्तेखानानें आदिलशाहाकडे लिहून कळविलें कीं, "महाबतखान नव्या दमानें वेढा चालविण्यासाठीं कसब्यांत येऊन राहिला आहे. तेव्हां या वेळीं तुमची फौज व सामग्री येऊन पोंचेल तर मी किल्ला तुमच्या ताब्यांत देण्यास तयार आहें."

विजापूरच्या महमदशाहानें या वेळीं रणदुल्ला व खवासखान यांना फत्तेखानास सर्वप्रकारें मदत पोंचविण्याविषयीं हुकूम सोडले. त्याप्रमाणें प्रथम रणदुल्लाचे लोक दौलताबादेस पोंचले. पण खवासखानानें मुरारपंताकडे ही कामगिरी सोंपविल्यामुळें त्याला तेथें जाण्यास थोडे दिवस उशीर लागला. हा उशीर मुरारपंतानें मुद्दाम लावला नसून तो सहजासहजीं लागला. पण त्या उशिरानें आदिलशाही सैन्यांत घोळत असलेल्या विचारसरणीस तोंड फुटलें. मुरारपंत अन्नसामग्री घेऊन आला तेव्हां वस्तुतः तेथें असलेल्या आदिलशाही सैन्यास आनंद वाटावा. पण त्याऐवजीं त्यांना वाईट वाटलें. कारण 'आमच्या हातून जें काम तडीस गेलें नाहीं तें जर यापुढें सिद्धीस जाईल तर मोंगलांचा पराभव केल्याचें यश मुरारपंतास मिळेल; व आम्हांस कोणी विचारणार नाहीं' असें दौलताबादेंतील आदिलशाही लोकांच्या मनानें घेतलें; व मुरारपंत असेपर्यंत आपण युद्धच करूं नये असें त्यांनीं ठरविलें. याच वेळीं मुरारपंत व फत्तेखान यांच्यांत बोलाचाली झाल्याची हकीकत विजापूरच्या इतिहासांत नमूद आहे, ती अशी. फत्तेखानानें मुरारपंताकडे निरोप पाठविला कीं, "किल्ल्यांत एक दाणाहि शिल्लक नाहीं; यासाठीं आपण आणलेली सामग्री जरूर आम्हांकडे पाठवा." या निरोपाप्रमाणें मुरारपंतानें सामग्री न पाठवितां उलट कळविलें कीं, "तुला सामान मागण्याचें कांहीं कारण नाहीं. मुकाट्यानें मजकडे निघून ये आणि किल्ल्याच्या किल्ल्या माझ्या

स्वाधीन कर. मी आहें आणि तो किल्ला आहे; पाहून घेईन. जर तूं किल्ला माझ्या ताब्यांत दिलास तर ठीकच आहे, तुला मी योग्यतेस चढवीन. नाहीं तर तुझे हातपाय बांधून किल्ल्याच्या खंदकांत लोटून देईन." मिळून दोघांत बाचाबाची होऊन मुरारपंतानें फत्तेखानाच्या हातीं अन्नसामग्री देण्याचें नाकारलें. त्याचा ओढा शहाजीकडे होता. त्याला निजामशाही पाहिजे होती; पण ती शहाजीची पाहिजे होती, फत्तेखानाची नको होती; असा त्याच्या वागणुकीचा निष्कर्ष दिसतो. उलटपक्षीं मुरारपंत व शहाजी यांच्याविषयीं विजापूरच्या सैन्यांत एक प्रकारची आढी पडून या दुहीचा फायदा मोंगलांना मिळत चालला. मुरारपंत येण्यापूर्वी अधिक वैशाख शु. ११ रोजीं खानजमान व नासिरीखान यांनीं सुरुंगांची तयारी करून ते उडविले व अंबरकोटाच्या भिंती ढासळल्या. त्या वेळीं निकराचा हल्ला करून त्यांचें सैन्य चढून गेलें; तेव्हां विजापूरकरांच्या तर्फे काम करणारा रणदुल्लाचा चुलता खैरियतखान यानें अशा जवामर्दीनें युद्ध केलें कीं, शेवटीं जरी मोंगलांनीं अंबरकोट ताब्यांत घेतला तरी विजापुरी सैन्याची मर्दुमकी त्यांच्या चांगलीच प्रत्ययास आली; व हें काम पुरें होण्यास फार दिवस लागतील असें त्यांना वाटूं लागलें. शिवाय रणदुल्ला व शहाजी हे बाहेरून मोंगलांची रसद मारण्यासाठीं कसून मेहनत करीतच होते. तथापि महाबतखानाला या वेळीं अडचणीनें भिऊन मागें फिरण्याची सोय नव्हती. असफखानास परत बोलावून आपली नेमणूक शहाजहानानें दक्षिणेच्या सुभेदारीवर केली आहे ती टिकवावयाची असेल तर दौलताबादचा किल्ला हस्तगत करून दाखविलाच पाहिजे हें महाबतखानाच्या लक्षांत होतें. तेव्हां त्यानें अंबरकोट हातीं आल्यानंतर प्रथम महाकोट आणि नंतर कालाकोट हे ताब्यांत घेण्यासाठीं खटपट करण्याचा विचार कायम केला. त्यानें प्रथम महाकोटाच्या बुरुजाखालीं सुरुंग लावण्याची तयारी केली. तेथें तोंडाशीं खैरियतखान आदिलशाही सैन्यासुद्धां राहिला होता. त्याला मुरारपंत आल्याचें व त्यानें फत्तेखानाशीं बाचाबाची केल्याचें वर्तमान समजलें. तेव्हां बाहेरून आपला पाठपुरावा होणार नाहीं असें वाटून त्यानें मोंगली सेनापतीशीं तडजोडीचें बोलणें लावलें. "आम्हांला येथून बाहेर जाण्यास तुम्हीं हरकत करूं नये; म्हणजे आम्हीं मुकाट्यानें विजापुरास धन्याकडे चालते होतों" असें मालोजी भोसल्यामार्फत खैरियतखानानें महाबतखानास कळविलें. त्यानेंहि मोठ्या आनंदानें लेखी अभिवचन

पाठवून त्यांना सर्वप्रकारें प्रोत्साहन दिलें. त्याप्रमाणें मध्यरात्रीनंतर सुमारें दोनशें लोकांनिशीं हा विजापुरी सेनापती कोटाच्या भिंतीवरून शिड्यांच्या साहाय्यानें उतरून बाहेर आला व मोंगलांच्या सेनापतीस भेटून पुढें निघून गेला. या लहानशा घडामोडीनें मोंगलांचा दुहेरी फायदा झाला. खैरियतखाना-सारखे आदिलशाही सेनापती त्यांचे प्रतिस्पर्धी होते ते आतां मित्र झाले; आणि फत्तेखानाचा धीर खचणार याविषयीं संशय राहिला नाहीं. यापुढें मोंगलांनीं आपलें काम अधिक व्यवस्थितपणें व नेटानें चालविलें. आणि ज्या कोटांत फत्तेखान रहात होता त्या महाकोटाखालीं सुरुंग लावून त्याला बत्ती देण्याची तयारी केली. ही गोष्ट फत्तेखानासहि कळली. तेव्हां त्यानें मोंगली सेनापतीकडे निरोप पाठविला कीं " मी आदिलशाही मुत्सद्यांशीं कुराणाची शपथ घेऊन करार ठरविले आहेत, ते त्यांच्या संमतीवांचून मला मोडतां येत नाहींत. यासाठीं मुरारपंताकडे मनुष्य पाठवून, 'तहाच्या अटी ठर-विण्यासाठीं वकील धाडा' असें त्याला कळविण्यास मला एका दिवसाची फुरसत द्या. तेवढ्यांत आम्हीं व्यवस्था केली नाहीं तर मग सुरुंग उडवा." मोंगली सेनापती कांहीं भोळे नव्हते; त्यांना या बोलण्यांतील लबाडी समजण्यास अडचण पडली नाहीं. त्यांनीं उलट निरोप पाठविला कीं, " तह करावयाचा हें जर निश्चित आहे, तर तुम्हीं आपला मुलगा आज ओलीस पाठवा म्हणजे आम्ही एका दिवसाची मुदत देतों." फत्तेखानानें अर्थातच ही गोष्ट मान्य केली नाहीं. आणि मोंगलांनीं सुरुंगास बत्ती देऊन कोटाची भिंत ढासळली च महाकोटांत प्रवेश करण्याच्या कामीं यश मिळविलें. या वेळीं बाहेरून मुरारपंतानें मोंगलांवर हल्ला करण्याचा प्रयत्न केला; पण आदिलशाही सैन्याचा त्याला मनापासून पाठिंबा नसल्यामुळें त्या कामांत त्याला यश आलें नाहीं. शेवटीं काळाकोट देखील मोंगल घेणार असें दिसूं लागल्यावर फत्तेखानानें शहाजी व मुरारपंत यांना शिव्या देत आपला मुलगा अबदुल रसूल याला ओलीस देऊन एका आठवड्याची मुदत मागून घेतली. महा-बतखानानें देखील हत्ती, घोडे, पालख्या वगैरे सर्व प्रकारची वाहनांची सोय करून फत्तेखानाला आपला सर्व सरंजाम घेऊन कोटाबाहेर येण्यास मदत केली. शेवटीं श. १५५५ ज्येष्ठ वद्य ६ (१७।६।१६३३) रोजीं महाबत-खानाच्या हातीं दौलताबादचा किल्ला आला व त्यानें वर जाऊन शहाजहानाच्या नांवें निशाण लावून खुतबा वाचला.

**३. महाबतखानाचा विश्वासघातकीपणा**—फत्तेखान आपल्या परीनें कसून लढला हें वरील हकीकतीवरून स्पष्ट दिसण्याजोगें आहे. तथापि मोंगलांशीं करार करतांना त्यानें एका तत्कालीन बद्धमूल समजुतीचा उच्चार केला असें शहानवाजखानकृत 'मासरअल उमरा' (उमरावांचीं चरित्रें) या ग्रंथांत सांगितलें आहे तें लक्षांत घेण्याजोगें आहे ( शि. नि. पृ. ६३ ). विजापूरकरांना किल्ला देऊन मुरारपंताच्या सांगण्याप्रमाणें त्यांची नोकरी न पत्करतां मोंगलांनाच आपण किल्ला देतों याचें कारण फत्तेखानानें असें सांगितलें कीं, 'विजापूरकरांकडे वजिरी मिळत असली तरी ती पत्करण्यापेक्षां मोंगलांच्या दरबारीं झाडू झालेलें पुरवेल असा कानमंत्र माझ्या बापानें ( मलिकंबरानें ) मला सांगून ठेविला आहे.'

' दिल्लीश्वरो वा जगदीश्वरो वा ' हें वाक्य जेथें हिंदु कवीच उच्चारीत होते तेथें दिल्लीपतीची महती फत्तेखानास वाटावी यांत आश्चर्य नाहीं. पण या थोरांच्या आश्रयास जाणें किती भयावह आहे याची नीटशी कल्पना फत्तेखानाला आली नव्हती असें म्हणावें लागतें. कारण, मलिक कुतुब महमद गुजराथी व कृष्णाजी भास्कर यांच्या मार्फत महाबतखानानें फत्तेखानाशीं जो करार ठरविला त्याची हकीकत विजापूरच्या इतिहासकारानें अशी दिली आहे. फत्तेखान व महाबतखान यांत या वेळीं शपथपूर्वक असा करार ठरला होता कीं, " दौलताबादचा किल्ला फत्तेखानानें मोंगलांच्या हातीं द्यावा. आणि महाबतखानानें त्याला ४० हजार मोहरा देऊन हुसेन निजामशहास पुन: तक्तावर बसण्याची व फत्तेखानास त्याची वजिरी करण्याची परवानगी शहाजहानाकडून मिळवून देण्याची खटपट करावी. हा करारनामा पाहून फत्तेखानास संतोष वाटला; आणि बाल-बादशहा, त्याचें कुटुंब व सुमारें एक हजार स्वार बरोबर घेऊन तो महाबतखानाच्या लष्करांत येऊन राहिला. तेव्हां आपल्या मुलास शिबंदी व स्वार यांसह दौलताबादेंत बंदोबस्तासाठीं ठेवून महाबतखान, फत्तेखान व हुसेनशहा यांसह, बऱ्हाणपुराकडे निघाला. वाटेंत फत्तेखानानें चार पांच हजार नवे लोक आपल्या नोकरींत ठेविले; तेव्हां खानजमाल नांवाच्या महाबतखानाच्या हस्तकानें या लोकांत शिरून आपला तळ फत्तेखानाच्या लष्करांत दिला. पुढें जाफराबाद व मालेगांव यांच्या दरम्यान सर्व लष्कर पोंचलें असतां महाबतखानानें वाटेंतच डेरे दिले; आणि त्यासभोंवतीं कनाथी लावून त्यांमागें त्यानें रजपूत लोक बसविले आणि

फत्तेखानास डेऱ्यांत बोलाविलें. आणि फत्तेखान तेथें येतांच एकाएकीं तणावा तोडून सर्व बाड त्याच्या अंगावर पाडलें आणि फत्तेखानास धरून कैद केलें. त्याबरोबरच हुसेनशहालाहि छत्रचामरादि सरंजामासुद्धां महाबतखानानें पहारेकऱ्यांच्या स्वाधीन केलें* व त्याला कैदी या नात्यानें शहाजहानाकडे रवाना केलें.

**४. मुरारपंत व रणदुल्ला यांची बाचाबाची**—फत्तेखानानें शेवटीं आपणहून किल्ला मोंगलांच्या हवालीं केला म्हणून महाबतखानाची अब्रू कायम राहिली, नाहींतर आदिलशाही व निजामशाही राज्यांतील संयुक्त सैन्याच्या वीस हजार घोडेस्वारांनीं मोंगलांच्या शिपायांना अगदीं मेटाकुटीस आणिलें होतें. यामुळें महाबतखान बऱ्हाणपुराकडे जावयास निघाला तेव्हां दौलताबादेचें संरक्षण करण्यास किती सैन्य ठेवावें व आपणाबरोबर किती घ्यावें हें ठरविणें त्याला कठीण वाटूं लागलें. आपलें सैन्य दोहींकडे वाटलें गेल्यावर आदिलशाही सैन्य दोन्ही भागांवर छापा घालूं शकेल अशी त्याला भीति वाटत होती. अशा अडचणीच्या वेळीं नासिरीखान नांवाच्या सरदारानें किल्लयाचें संरक्षण करण्याची जबाबदारी शिरावर घेतली. तेव्हां कामापुरतें सैन्य तेथें ठेवून महाबतखान सैन्यासह जाफराबादेकडे जाण्यास निघाला असतां कांहीं मजली गेल्यावर रणदुल्लाचा बाप फरहादखान त्याच्या भेटीस आला. या खानाला मोंगली सेनापतीनें दोनच महिन्यांपूर्वीं दौलताबादेंतून रात्रीं गुप्तपणें निघून जाण्यास परवानगी दिली होती म्हणजे जीवदान दिलें होतें. त्या नात्यानें तो खानाकडे येऊन तहाच्या गोष्टी बोलूं लागला. 'मुरारपंत व रणदुल्ला यांनीं मला या कामानिमित्त पाठविलें आहे' असें त्यानें सांगितलें. पण महाबतखानाला ही वाटाघाट करण्यांत दिवस घालविण्याची सोय नव्हती. त्याच्या सैन्यावर दौलताबादेस उपासमारीचा प्रसंग आला होता; तेव्हां त्यांतून पार पडल्यानंतर बऱ्हाणपूर केव्हां एकदां गांठतां येईल असें त्याला होऊन गेलें होतें. यामुळें त्यानें लढण्याचा किंवा तह ठरविण्याचा प्रयत्न न करतां आदिलशाही लष्कराच्या हातापायां पडून व रोख पैसाहि पाठवून आपली सुटका करून घेतली व शेवटीं तो एकदांचा मोंगली राज्याच्या हद्दींत जाऊन पोंचला (मो. १६५). सारांश मोंगलांच्या

---

* शहाजहानानें हुसेनशहास ग्वालेरच्या किल्ल्यांत कैदेंत ठेविलें; आणि फत्तेखानास मात्र दरसाल दोन लाखांची नेमणूक करून दिली; व त्याला नोकरींत घेतलें (इलि. ७-४२).

ताब्यांत निजामशाही राज्यापैकीं फक्त दौलताबादेचा किल्ला गेला होता. पण तें सर्व राज्य हस्तगत करण्याची ताकद या वेळीं त्यांच्या सेनापतींत राहिली नव्हती. या वेळीं मुरारपंत, रणदुल्ला व शहाजी यांनीं दौलबादेस जाऊन तो किल्ला देखील हस्तगत करावा अशी कल्पना निघाली होती; पण पावसाळा जवळ आल्यामुळें तें काम लांबणीवर ढकलण्याचें ठरलें आणि दौलताबादेकडे असलेलें सैन्य परत बोलावून ते नाशिक-त्रिंबकच्या बाजूनें परत फिरले. पैकीं शहाजी या प्रांतांत राहिला आणि रणदुल्ला व मुरारपंत विजापुराकडे गेले. वाटेंत बोलणें निघालें असतां फत्तेखानाशीं बेमानपणा करून सर्व राजकारण बिघडविल्याबद्दल रणदुल्लानें मुरारपंतास दोष दिला व "तुझ्या गर्विष्ठ व मूर्खपणाच्या स्वभावामुळें दौलताबादेचा किल्ला महाबतखानाच्या स्वाधीन झाला; बादशाहाचें सर्व काम तूं बिघडविलेंस व बहुत खराबी केलीस. लढाईचे कार्यास बहुत द्रव्य खर्च होऊन व्हावयाचा तोहि फायदा झाला नाहीं" असे मर्मभेदक शब्द बोलून रणदुल्लानें मुरारपंताचा पाणउतारा केला. पण मुरारपंत कांहीं बोलला नाहीं (मो. १६५). याचा अर्थ मुरारपंत व रणदुल्ला यांचीं मनें या वेळीं परस्परांविषयीं पुष्कळच दूषित झालीं होतीं असें समजलें पाहिजे. या वैमनस्याचीच वाढ होऊन शेवटीं त्यानें शहाजीला आयत्या वेळीं कसा दगा दिला तें पुढें योग्य ठिकाणीं सांगण्यांत येईल.

**५. निजामशाहींतील चलबिचल**—महाबतखानानें दौलताबादचा किल्ला घेऊन निजामशाहास कैद केलें तेव्हां त्या किल्ल्याच्या आसपासचा प्रदेशच कायतो मोंगलांच्या ताब्यांत गेला हें मागें सांगितलेंच आहे. इतर निजामशाही मुलखांत सर्वत्र जबरदस्त फौजबंद सरदार नांदत होते. त्यांनीं तटस्थ वृत्ति स्वीकारिली होती. अगदीं पूर्वेस सोलापूरचा किल्ला सिद्दी रेहानच्या ताब्यांत होता. तेथून पश्चिमेस पेमगड वगैरे भागांवर शहाजीचा व जुन्नरवर श्रीनिवासराव याचा अंमल चालू होता. तळकोंकणांत सिद्दीसाबा सैफखान याची सत्ता असून सिद्दीसाबा अंबर यानें राजपुरीवर स्वतंत्र राज्यच उभारलें होतें. नीरथडी व मावळ प्रांत बहुतेक विजापूरकरांनीं व्यापिला होता. हे वर सांगितलेले सरदार निजामशाही राज्याचे अंकित होते व त्यांना आपण आदिलशाहाचे ताबेदार म्हणवावें किंवा मोंगलांच्या आश्रयास जावें याचाच विचार करावयाचा होता. परंपरागत निजामशाही यंत्र ज्याच्या हातीं होतें त्या फत्तेखानासारख्याचा जेथें निभाव लागला नाहीं तेथें इतरांना स्वतंत्रपणें

मोंगलांच्या माऱ्यापुढें टिकाव धरतां येणें अशक्य होतें; आणि स्वतंत्रपणें राज्य उभारण्याची कल्पनाहि त्यांच्यापैकीं कोणाच्या डोक्यांत असल्याचें दिसत नाहीं. शहाजीला मात्र स्वतंत्रपणें एक निजामशाही पोर हाताशीं घेऊन फौजबंद बनण्यांत कांहींसें यश आलें होतें; आणि विजापुरांतील खवास-खानाच्या पक्षास निजामशाहीचा हा आडोसा आदिलशाही व मोंगलाई राज्यांमध्यें उभा राहणें इष्ट वाटत होतें. पण त्यांतहि खरा आग्रह काय तो मुरारपंताचा मात्र होता. इतरांना निजामशाहीबद्दल तेवढी आस्था किंवा मोंगलाईसंबंधीं तितका परकेपणा वाटत नव्हता. अशा स्थितींत मुरारपंताला आदिलशाही मुत्सद्दी मनापासून पाठिंबा देतील तर आपण स्वतंत्र निजाम-शाही उभारण्याचा विचार कायम करावा असें शहाजीनें योजिलें होतें. तोंपर्यंत राजकारण दुलग ठेवणें त्याला इष्ट दिसलें. इतर निजामशाही सरदार काय धोरण स्वीकारतात हें यावेळीं त्याला पहावयाचें होतें. मोंगलांना दौलताबाद येथील यद्धाच्या प्रसंगीं त्रास देणारा सोलापूरचा किल्लेदार सिद्दी रेहान यानें आदिल-शाहाशीं सलोखा जोडण्याचा प्रयत्न केला. प्रथम आदिलशाहाकडे वकील पाठवून त्यानें विचारपूस केली आणि महमदशहाकडून त्याच्या पराक्रमाबद्दल अभिनंदनात्मक पत्रहि आलें; त्याअन्वयें सोलापूरचा किल्ला बादशहास देऊन व त्या वेळच्या शिरस्त्याप्रमाणें स्वत:साठीं एक लाख होनाचा मुलूख जहागिरी-दाखल मिळवून तेवढ्यांतच तो समाधान मानून राहिला.

शहाजीनें मात्र चाकण, बालेघाट, जुन्नर, संगमनेर, व नाशिक वगैरे प्रांत ताब्यांत घेऊन सहा हजार स्वार चाकरीस ठेविले. या वेळीं खानजमान दौलताबादेस होता. शहाजीची ही हालचाल त्याच्या लक्षांत आली व सर्वांपेक्षां हा डोईजड होणार त्या अर्थीं त्यालाच मोंगली सरदार बनवून सर्व निजाम-शाही राज्य खालसा करावें असा त्यानें डाव योजिला. शहाजीचा चुलतभाऊ मालोजी या वेळीं मोंगलांच्या नोकरींत होता. त्याचें शहाजीशीं अनुसंधान होतें. त्याच्या मार्फत शहाजीनें निरोप पाठविला कीं, " शहाजहानानें जर मला शहाजाद्याप्रमाणें मान देऊन बेवीस हजारी मनसबदार केलें तर मी मोंगलांच्या नोकरींत येण्यास तयार आहें. " हें ऐकून खानजमानानें बादशहाकडून खाशाच्या अंगावरील पोषाखासह मान्यतेचें पत्र आणवून शहाजीकडे पाठविलें व त्यानें आतां मोंगलांचा मनसबदार म्हणून काम करावें असें कळविलें.

तथापि शहाजीला मोंगलांचा विश्वास पटण्याजोगा नव्हता. तीन वर्षांपूर्वी त्यांनीं पंचहजारी मनसब दिली व फत्तेखानाच्या नादीं लागून ती काढून घेतली; त्याप्रमाणें या वेळीं ते पुनः करतील किंवा काय अशी शंका वाटणें स्वाभाविक होतें. याकरितां त्यानें हें प्रकरण तसेंच अनिश्चित ठेवून विजापूरकरांशीं बोलणें लावलें. मोंगलांनीं दौलताबाद घेतली तरी सर्व निजामशाही मुलूख मोंगलांच्या हातीं जाऊं न देण्याची खटपट आपण केली पाहिजे असें खवासखानाचें म्हणणें असल्याचें शहाजीला माहीत होतें. या आधारावर शहाजीनें त्याला मुरारपंतामार्फत कळविलें कीं, "निजामशाहींतील ८४ किल्ल्यांपैकीं एक दौलताबादचा किल्ला गेला म्हणून काय हरकत आहे ! जर जुन्नरसारखी तख्ताची जागा आपल्या स्वाधीन आहे तर—तुम्ही मात्र मला साह्य करा म्हणजे—आपण होईल तितकी मेहनत घेऊन निजामशाही राज्याचा झेंडा फडकवीत ठेवूं." याचा अर्थ निजामशाही राज्य उभें करण्याची जबाबदारी पत्करण्यास शहाजी तयार होता; आणि पूर्वी मलिकंबरास ज्याप्रमाणें इब्राहिम आदिलशहानें हरएक प्रकारें साहाय्य केलें व आपणावरचें मोंगली संकट टाळलें त्याप्रमाणें याहि वेळीं विजापूरकरांनीं धोरण स्वीकारावें अशी शहाजीची त्यांस सूचना होती. ती खवासखान व मुरारपंत यांना मान्य होती; परंतु मुस्तफाखानास ती संमत नव्हती. मोंगलांशीं स्नेह करण्याचें धोरण विजापूरकरांनीं पत्करावें असें त्याचें पहिल्यापासून मत होतें; पण त्याबद्दल कांहींच उच्चार न करितां प्रसंगाला शोभेल अशी म्हणजे "शहाजी मोंगलांच्या सेनापतीशीं आंतून बोलणें वारीत आहे व खानजमानाशीं त्याचें सख्य आहे; त्याअर्थी आपण मोंगलांशीं वैमनस्य वाढविण्यांत मोंगल व शहाजी या दोघांशींहि वांकडे होण्याचा प्रसंग येईल व तें जड जाईल" ही सबब या वेळीं मुस्तफानें पुढें आणिली. तथापि शहाजीनें सर्व संशयांचें निवारण करून 'आपण मोंगलांविरुद्ध लढण्यांत पुढाकार घेतों' असें प्रतिज्ञापूर्वक सांगितलें. तेव्हां ती गोष्ट सर्वांना पटली; व विजापूरदरबारानें त्याला साहाय्य करण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें शहाजीच्या सहाय्यार्थ फौजेसह मुरारपंताची रवानगी करण्यांत आली. मुरारपंत व शहाजी यांनीं एके ठिकाणीं जमून स्वतंत्र निजामशाहीची उभारणी करण्याचें जें धोरण कायम केलें त्याच्या सिद्धयर्थ त्यांना अनुकूल अगर प्रतिकूल अशा कोणत्या गोष्टी समोंवर दिसत होत्या त्या सांगितल्या पाहिजेत. त्यावांचून

शहाजीनें परावलंबी अथवा दुलग राजकारण सोडून स्वावलंबी राजकारणाचा डाव मांडण्याचें धाडस कां केलें तें स्पष्ट होण्याजोगें नाहीं.

६. **शहाजहानाचें धार्मिक धोरण** :—अकबर व जहांगीर यांच्या कारकीर्दींत मोंगली राज्याची जी टोलेजंग इमारत उभारण्यांत आली तिचा पाया राजकीय स्वरूपाचा असून धर्मास दुय्यम स्थान देण्यांत आलें होतें. अकबरानें रजपुतांच्या मुलींशीं लग्नें केलीं, पण रजपुतांनीं किंवा इतरांनीं मुसलमान झालें पाहिजे असा आग्रह धरिला नाहीं, एवढेंच नव्हे तर, हिंदुत्व हें दरबारांतील मोठमोठ्या महत्त्वाच्या जागा मिळविण्यास प्रतिबंधक होऊं नये असें धोरण ठेविलें. यामुळें मोंगली दरबारांत राजकीय बाबतींत हिंदु व मुसलमान बरोबरीच्या नात्यानें वागूं लागले व त्यांची दिलजमाई होत चालली. तथापि कडव्या मुसलमानी पक्षाला ही गोष्ट पटण्याजोगी नव्हती. त्यानें कांहीं काळ पड खाऊन शहाजहानाच्या मनांत लहानपणापासून आपलीं मतें भरविलीं आणि त्यांचेंच परिणत स्वरूप औरंगजेबाच्या वर्तनांत पुढें दिसून आलें. पण बीज पेरल्यापासून त्याचा विस्तीर्ण वृक्ष बनण्यास व पुढें त्याला कीड लागून तो मोडून पडण्यास कित्येक वर्षें लागतात. त्याप्रमाणें हिंदु-मुसलमानांमधील राजकीय समानतेच्या बीजारोपणानें अकबरानें वाढविलेला वृक्ष अकबराच्याच कारकीर्दींत काय तो फोंफावला व जहांगिराच्या वेळींच चैनबाजीच्या रोगानें त्यांत प्रवेश केला. शहाजहानानें ऐषआराम व उपभोग हे आपल्या बापाचे दुर्गुण घेऊन, दिल्लीच्या बादशहाचें ध्येय धार्मिक असावें या नवीन रोगबीजाची पेरणी केली. आणि राजकीय समानतेच्या बीजापासून झालेल्या वृक्षाची हलके हलके हयगय करून इस्लामी धर्मप्रीत्यर्थ राज्याची वाढ करावी ही कल्पना पुढें ढकलण्याची खटपट केली. यामुळें शहाजहानाच्या कारकीर्दींत समानता व कडवेपणा यांचा संमिश्र देखावा एकाच दरबारांत पाहण्यास मिळत असे. त्याच्या मुलांपैकीं दारा हा हिंदु लोकांशीं प्रेमानें वागणारा व संस्कृत ग्रंथांची आवडीनें भाषांतरें करवून वाचणारा होता; पण त्याचा धाकटा भाऊ औरंगजेब लहानपणापासून अगदीं विरुद्ध विचारसरणींत वाढत होता. स्वतः शहाजहान कडव्या इस्लामी पक्षाचा होता तरी त्याच्या सभोंवारचा परिवार समतेच्या तत्त्वांवर कित्येक वर्षांपासून चालत आल्यामुळें अनेक हिंदु पद्धतीचे रिवाज व समजुती त्याच्या अंगवळणीं पडल्या होत्या. त्या शेवटपर्यंत त्याच्यानें

सोडवल्या नाहींत. तक्तावर बसतांच त्यानें सौरपंचांग बंद करून इस्लामी धर्मीयांचें चांद्रपंचांग सुरू केलें; व राजशकाची मोजणी आणि राज्यकारभार या पंचांगाप्रमाणें व्हावी असा हुकूम दिला. पण शुभाशुभ पाहणें, दरसाल तुळा करणें व पाडव्याच्या दिवशीं उत्सव करणें वगैरे गोष्टी जुन्या पंचांगानुसार करण्यांत येत होत्या. याशिवाय सिद्ध पुरुषांना भेटून त्यांचे आशीर्वाद घेणें व आयुरारोग्याप्रीत्यर्थ दानें देणें इत्यादि परंपरागत आचार पाळल्यावांचून शहाजहानाला चैन पडत नव्हतें. त्यामुळें त्याच्या दरबारांत जगन्नाथ पंडितासारखे संस्कृत कवी व मुनीश्वरासारखे नामांकित ज्योतिषी आढळत होते. तथापि त्याच्या मनावर इस्लामी धर्ममताची छाप वाढत्या प्रमाणावर होती. दिवसेंदिवस त्या दरबारांत इस्लामी धर्माचें प्रस्थ फार माजलें; आणि त्याबरोबर वर सांगितलेले जुने आचार कमी झाले. तथापि दारा व औरंगजेब यांचा तो बाप होता; म्हणजे धार्मिक सहिष्णुता व असहिष्णुता या दोनहि वृत्तींचा त्याच्या ठिकाणीं संगम झालेला होता. त्यामुळें शहाजहानाच्या कारकीर्दींत जुनें धोरण व नवें धोरण यांचे परिणाम आपणांस एकाच वेळीं पाहण्यास अडचण पडत नाहीं. सक्तीनें हिंदूंना बाटवून मुसलमान करण्यांत पुण्य लागतें असें त्याला मनापासून वाटत होतें.

शहाजी व मुरारपंत पुढील धोरण निश्चित करण्यासाठीं एकत्र जमले त्या वेळीं म्हणजे श. १५५५ मध्यें शहाजहानानें हिंदूंचीं मनें क्षुब्ध होतील असा एक जाहिरनामा काढला होता; आणि यापुढील धोरणाचें स्वरूप कोणासहि दिसण्याजोगें होतें. अकबर व जहांगीर यांच्या कारकीर्दींत धार्मिक उदासीनतेचें धोरण रूढ असल्यामुळें काशीसारख्या पवित्र क्षेत्रांतून जुन्या देवळांचा जीर्णोद्धार व नव्यांची उभारणी चालू होती. हिंदूंची लोकसंख्या मोठी व अशा कामांत पैसा खर्च करण्यांत पुण्य लागतें ही श्रद्धा बलवत्तर असल्यामुळें देवालयांचीं कार्यें एकंदर राज्यांत मिळून बऱ्याच ठिकाणीं दिसूं लागलीं होतीं. अर्थात् नव्या दृष्टिकोनानें म्हणजे असहिष्णुतेच्या चष्म्यांतून हीं कामें जेव्हां पाहण्यांत आलीं तेव्हां त्यांची एकंदर बेरीज मोठी आहे असा अहवाल बादशहाकडे गेला; व त्यानें हीं कामें बंद करण्याचा व बांधलेलीं देवळें पाडून टाकण्याचा हुकूम सोडला. याप्रमाणें एका बनारसच्या पंचक्रोशींत ७६ देवळें पाडून उध्वस्त केलीं गेलीं व सरकारी जमिनीवर हिंदूंनीं नवीन देवालयें उभारूं नयेत असा सरसकट हुकूम

दिला गेला. याखेरीज बंडखोर हातीं लागले म्हणजे 'त्यांना प्राण वांचविण्यास धर्मांतर करणें हा एक मार्ग मोकळा असतो' हेंहि राजनीतीचें तत्त्व या वेळेपासून दिसून येऊं लागलें. काश्मिरांतील कांहीं बंडखोर सरकारी अधिकाऱ्यांच्या हातीं लागले, तेव्हां ज्यांनीं मुसलमान होण्याचें कबूल केलें त्यांना माफी मिळाली व इतरांचा अत्यंत क्रूरपणानें वध करण्यांत आला. काश्मिरांतील गांवांचीं हिंदु नांवें बदलून त्याऐवजीं इस्लामी पद्धतीचीं ठेवण्यांत आलीं. जलालाबादेपासून ४० कोसांवर हिंदु लोकांवर जिहाद म्हणजे धर्मप्रसारार्थ स्वारी काढण्याचें काम एका स्थानिक अधिकाऱ्यानें पत्करलें. हुगळी येथील ४०० फिरंगी ( रोमन कॅथॉलिक ) कैद्यांना 'धर्मांतरानें जीव वांचवितां येईल' हें समजावून सांगण्यांत आलें. पण त्यांनीं तें मान्य केलें नाहीं. यासाठीं कैदेंत खितपत मरण्याचा प्रसंग त्यांच्यावर आला; व त्यांच्या जवळील मूर्ती यमुनेंत फेंकून देण्यांत आल्या. राजा बख्तावर कछवा यानें इस्लामी धर्म स्वीकारतांच त्याला बक्षिस मिळालें; आणि बागलाणच्या हिंदु राजाचा मुलगा प्रेमजी मुसलमान झाला तेव्हां औरंगजेबाच्या शिफारसीवरून त्याला 'सदरमंद' हें नांव मिळून मनसब मिळाली. हीं सर्व उदाहरणें शहाजहानाच्या हुकुमानें लिहिण्यांत आलेल्या पादशाहनाम्यांत दिलेलीं आहेत व हा ग्रंथ सादुल्लाखान वजीर शहाजहानाला वाचून दाखवी व शहाजहान त्यांत योग्य त्या दुरुस्त्या करी इत्यादि माहिती श्रीयुत कानूनगो यांनीं आपल्या लेखांत सप्रमाण नमूद केली आहे.* ती लक्षांत घेतली असतां शहाजहानाच्या कारकीर्दींत १५५५ पासून हिंदूंचीं अंत:करणें खळवळून जातील अशा घडामोडी होऊं लागल्या होत्या याविषयीं संशयास जागा राहात नाहीं.

**७. शहाजीच्या योजनेचें स्वरूप**—शहाजहानानें जें चढाईचें धोरण पत्करलें त्याच्या धार्मिक व राजकीय अशा दोन शाखा होत्या. पैकीं धार्मिक चढाई हिंदु धर्माविरुद्ध असल्यामुळें तिचा परिणाम सर्व देशभर होण्याचा संभव होता; कारण सर्व देशभर हिंदुधर्मी लोक रहात होते. तथापि एका ठिकाणची बातमी दुसरीकडे पोंचण्याचीं साधनें त्या काळीं फारशीं उपलब्ध नसल्यामुळें शहाजहानाच्या धार्मिक चढाईची माहिती खुद्द मोंगली साम्राज्यभर तरी सामान्य लोकांना पोंचली असेल किंवा नाहीं याची शंका आहे. मग त्या साम्राज्याबाहेर म्हणजे निजामशाही अगर आदिलशाही मुलखांत या

* Journal of Indian, History, Vol. VIII, Part I, P. 45.

चढाईनें म्हणजे मोठीशी खळबळ उडविली असेल असें मानण्याचें मुळींच कारण नाहीं. त्यांतून ही धार्मिक चढाईची माहिती मिळाली तरी औदासिन्य, संघटनेचा अभाव आणि परिस्थितीचें अज्ञान इत्यादि कारणें सामान्य लोकांना दैववादी बनविण्यास पुरेशीं होतीं. परंतु शहाजीसारख्या राजकारणांत जबाबदारी पत्करणाऱ्या मराठ्याला या वेळीं चैन पडणें शक्य नव्हतें. मोंगलांनीं आपणांस झिडकारून दिलें, आदिलशाहींत दुमत असल्यामुळें बखेडा माजला आणि दौलताबाद मोंगलांनीं हस्तगत करून निजामशाही बुडविली; अशा वेळीं चालू राज्ययंत्रांत आपला मान राहणार नाहीं हें ओळखून शहाजीनें नवीन निजामशाही उभारून शहाजहानाच्या चढाईस उत्तर देण्याचें निश्चित केलें. तथापि हें राज्ययंत्र टिकविणें फार कठिण काम होतें. दिल्ली व विजापूर येथील बादशहांमधील तेढ कायम राहील तर आपली नवी शाही टिकवितां येईल, पण त्यांची जूट झाल्यास त्यांच्या विरोधापुढें आपला टिकाव लागणार नाहीं हें शहाजीच्या लक्षांत येण्याजोगें होतें. अर्थात् धर्मभावनेनें प्रेरित होऊन आपण ही नवी शाही उभारीत आहों अशी शंका येऊं न देण्याची खबरदारी घेणें त्याला भाग होतें; कारण हिंदूंची संघटना तयार नव्हती व जर नवीन तयार केली तर ती बाल्यावस्थेमुळें विरुद्ध पक्षाच्या धडकीपुढें टिकणें शक्य नव्हतें. राजकीय बाबतींत तरी बळी तो कान पिळी हा न्याय चालू होता; यामुळें कोणच्या शाहीनें जगावें आणि कोणत्या शाहीनें मरावें या प्रश्नाचा निर्णय युद्धाच्या कसोटीनें लागत असे. तथापि या न्यायाला देखील बलवानांतील परस्परांसंबंधींचा मत्सरभाव अपवाद उत्पन्न करतो. या मत्सरभावामुळें कमजोर राजांची दोस्ती अस्तित्वांत येते व ती शिरजोर राजाशीं टक्कर देण्यास त्यांना समर्थ करते. मलिकंबरानें तरी निजामशाही उभारिली ती दिल्लीपती व दक्षिणेंतील शाह्या यांच्या मधील मत्सराच्या आधारावर उभारिली. आणि पुढें दिल्लीकरांची शक्ति अंतर्गत भानगडींत बहुतेक खर्ची पडल्यामुळें मलिकाला नवी शाही पंचवीस वर्षें टिकवितां आली. त्याचप्रमाणें शहाजीला चोंहींकडून हुसकून लावण्यांत आल्या वेळीं आदिलशाही मुत्सद्यांनीं दुजोरा दिल्यामुळें नवी निजामशाही उभारण्याची कल्पना शक्य कोटींतली वाटली. आणि कांहीं भानगडी उपस्थित होऊन दिल्लीकर इतर कामांत गुंतून राहिले तर आपली शाही टिकवितांहि येईल; पण हा प्रयोग करून पाहण्यास हरकत

नाहीं असें शहाजीनें ठरविलेलें दिसतें. दिल्लीकरांना इतर व्यवधान उत्पन्न न होतां, शहाजीविरुद्ध मोहीम काढण्यास फुरसत मिळते किंवा नाहीं आणि मिळाली तर विजापूरकर त्यांत सामील होतात किंवा नाहीं हे प्रश्न मुख्यतः लक्षांत घेण्याजोगे होते. आणि या दोनहि बाबतींत अनुकूल परिस्थिति दिसतांच शहाजीनें नव्या मूर्तजास छत्रपती बनविलें आणि पुढें दोनहि बाजूंनीं प्रतिकूल परिस्थिति आलेली पाहतांच हा छत्रपतीचा खेळ त्यानें एकदम आवरला. सारांश, निरुपाय म्हणून, जमतें किंवा नाहीं हें प्रत्यक्ष प्रयोग करून ठरवावें या हेतूनें, आणि अपयश आलें तरी विशेष विधिनिषेध मानण्याचें कारण नाहीं अशा साध्या विचारानें शहाजीनें या कामाला हात घातलेला दिसतो. मारीन किंवा मरेन अशा निर्धाराचा जिव्हाळा पोटांत धरून त्यानें मूर्तजास शहा बनविलें असें दिसत नाहीं. किंबहुना शेंडी तुटो किंवा पारंबी तुटो अशा निकरानें राजकीय प्रश्न कसोटीस लावण्याचें धोरण शहाजीनें केव्हांहि स्वीकारिलें नाहीं असें म्हणण्यास हरकत नाहीं. वेळोवेळीं खडा टाकून परीक्षा पहावी, पण विशेष आग्रह कोणताच धरूं नये असा शहाजीचा स्वभाव होता. त्या स्वभावानुसार त्यानें विजापूरकरांकडे बोलणें लाविलें व त्यांच्याकडून मुरार जगदेव सैन्यासह मूर्तजाच्या राज्याभिषेकसमारंभास हजर राहण्यासाठीं रवाना झाला, तेव्हां ( जेधे शकावलींत सांगितल्याप्रमाणें ) 'भाद्रपद* मासीं शहाजी राजे यांणीं पेमगिरीस निजामशहावरी छत्र धरिलें;' किंवा गेल्या वर्षी केलेल्या योजनेचा या वेळीं जाहीर रीतीनें उच्चार केला. ज्या ठिकाणीं हा समारंभ करण्यांत आला त्या ठिकाणाचें नांव पेमगिरी असें शकावलींत दिलें आहे व वि. इ. त भीमगड उर्फ शहागड असें आहे; दोहोंचा अर्थ बहुधा एकच असावा. या भीमगडावरून मूर्तजाच्या नांवानें निजामशाही कारभार करण्यास शहाजीनें प्रारंभ केला व त्याला मुरार जगदेव

---

* हा भाद्रपद मास श. १५५४ चा किंवा १५५५ चा हें निश्चित करण्यास अस्सल पत्रांचें प्रत्यंतर मिळालें पाहिजे. बादशहानामा व जेधे शकावली यांत श. १५५४ दिला आहे; आणि विजापुरच्या इतिहासांतील हकीकतीवरून श. १५५५ असावा असें दिसतें ( हिं. पृ. ४७६ ). प्रो. सरकार यांनीं बादशहानाम्यापेक्षां विजा. इति. चें प्रामाण्य या ठिकाणीं बलवत्तर मानावें असें सुचविलें आहे तें विचारणीय आहे. तथापि श. १५५४ मध्यें मूर्तजाला शहाजीनें प्रथम पुढें आणिलें व पुढच्या वर्षी त्याचा मोठा समारंभ केला असें समजल्यास दोनही ग्रंथांतील विधानांचा मेळ बसण्याजोगा आहे.

यानें विजापूरकरांचा प्रतिनिधी म्हणून मान्यता दिली. पण निजामशाहींतला बराच मुलूख शहाजीच्या ताब्यांत नसून निरनिराळ्या जुन्या सरदारांच्या व मोंगलां-सारख्या सत्ताधीशांच्या ताब्यांत होता, तो जिंकून घेण्याच्या प्रयत्नास लागणें शहाजीला भाग होतें. एरवीं मूर्तजाची निजामशहा ही पदवी व शहाजीला प्राप्त झालेली वजिरी अर्थशून्य ठरली असती. निग्रहानुग्रहाचें सामर्थ्य असणें हेंच राजेपणाचें मुख्य लक्षण; यामुळें नव्या निजामशहाचें अंकितत्व मानील त्याची सर्फराजी व न मानील त्याचें शासन करण्याची शक्ती आपल्या ठिकाणीं आहे याचें प्रदर्शन करण्यावांचून शहाजीला गत्यंतर नव्हतें. त्याप्रमाणें निजामशाहीचा तळकोंकणांतला मुलूख हस्तगत करून कल्याणास ठाणें देऊन राहिलेल्या सिद्दी साबा सैफखान या सरदारास भेटीस येण्याविषयीं शहाजीनें फर्मान रवाना केला. हा फर्मान मुरारपंताच्या संमतीनें लिहिण्यांत आला असून "तुम्ही लौकर येथें हजर होऊन नव्या बादशहाची भेट घ्या व आमच्या हुकमतींत रहा" अशा अर्थाचा त्यांत मजकुर होता. परंतु सैफखानाला शहाजीच्या हुकमतींत वागणें पसंत पडलें नाहीं. आदिल-शाही नोकरींत राहण्यास तो राजी होता पण ही नवी निजामशाही त्याला मान्य नव्हती. तथापि मुरारपंतासारखा विजापूरकरांचा जबाबदार प्रतिनिधी शहाजीच्या पत्राला मान्यता देत होता त्या अर्थीं शहाजीचा हुकूम अमान्य करतांना सैफखानाला दूरवर विचार करणें भाग होतें. त्यानें शहाजीचें म्हणणें मान्य केलें नाहीं; पण अगदींच अमान्य केलें असेंहि नाहीं. 'तुमचा निजामशाही मुलूख तुम्ही ताब्यांत घ्या; पण विजापूरकरांच्या नोकरींत शिरावयाचें असल्यामुळें मी स्वतः मुरारपंतांकडे जाणार आहें' असा सैफ-खानानें जबाब पाठविला. पुढें जबाबाप्रमाणें तळकोंकणांतील जव्हारपर्यंतचा सर्व मुलूख (किल्ले खेरीज करून) ताब्यांत घेण्यास शहाजीचे लोक आले; तेव्हां त्यांच्या ताब्यांत त्यानें तो दिला; आणि स्वतः दोन हजार स्वारांनिशीं मुरारपंताकडे जाण्यास निघाला. अर्थात् हें काम बिनबोभाट मिटलें असें दिसलें. तेव्हां ५।६ हजार स्वारांनिशीं अंबरखान नांवाच्या सरदारास विजापूरकरांतर्फे शहाजीच्या मदतीसाठीं ठेवून मुरारपंतानें विजापुरास जाण्यासाठीं कूच केलें.

८. **मुरारपंताची तुळा**—वर सांगितल्याप्रमाणें व्यवस्था लावून मुरार-पंत भीमगडाहून विजापुरास परत जाण्यासाठीं म्हणून निघाला तो भीमा व इंद्रायणी यांच्या संगमावर येऊन पोहोंचला; तेव्हां भाद्रपद अमावास्येच्या

दिवशीं सूर्यग्रहणानिमित्त त्यानें सुवर्णतुलेचा मोठा धार्मिक समारंभ केला. त्या वेळीं हत्ती, घोडा, व शंभर गाई दान देऊन सोनें, रुपें वगैरे २४ पदार्थांनीं स्वतःची तुळा केली; व तें द्रव्य वाटण्यांत आलें; आणि ३०० होनांची जमीन अग्रहार करून २१६ होनांची जमीन १६ ब्राह्मण, पुरोहित व हळेगौड नांवाचा गवंडी अशा १८ जणांना वाटून दिली. यांत हत्तीची तुळा केल्याचें वर्णन कोठेंहि नाहीं. अशा दानसमारंभांत माणसाची तुळा निरनिराळे जिन्नस घालून करावयाची असते. हत्तीचें वजन करण्याचें कारण केव्हांहि पडत नाहीं. हत्ती दान द्यावयाचा असतो; हत्तीची तुळा करण्याचें विधान धर्मशास्त्रांत आढळत नाहीं; आणि मुरारपंताच्या दानपत्रांतहि त्याचा कोठें उल्लेख नाहीं. त्या अर्थी हत्तीची तुळा कशी करावी याविषयीं मुरार-जगदेवास पंचाईत पडली व ती शहाजीनें सूचविलेल्या नावेच्या युक्तीनें दूर झाली; इत्यादि बखरींतील हकीकत ऐतिहासिक सत्य नसून काल्पनिक दंतकथा असावी असें वाटतें.

मुरारपंतानें या वेळीं तुळापूर हें नांव ठेवून जो गांव इनाम दिला तो पुढें पुष्कळ वर्षें इनामदारांकडे चालला. म्हणून तुळेचा हा प्रसंग व त्याचा काल पेशवाईंत देखील सर्वांना बिनचूक माहित होता; यामुळें बखरींतून देखील ही तुळेची मिती बरोबर दिलेली आहे. पण इतर पूर्वापर संबंध सांगतांना बखरकारांनीं फारच घोटाळा केला आहे. त्यांनीं विजापूरकर आणि मलिकंबर यांच्यांत या वेळीं युद्ध चालू होतें वगैरे वर्णन दिलें आहे तें अगदीं चुकलें आहे. या वेळीं मलिकंबर अगर त्याची निजामशाही अस्तित्वांतच नव्हती.

९. **अडचणीचे प्रश्न**—मुरारपंत तुळापुरास दानसमारंभ करण्यांत गुंतला होता तेव्हां एक भानगडीचा राजकीय प्रश्न उपस्थित झाला आहे याची जाणीव त्याला होती किंवा नाहीं याविषयीं शंका आहे. सैफखान हा निजामशाही सरदार असून शहाजीची निजामशाही त्यानें अमान्य केली व आपण आदिलशाहाच्या आश्रयास जाणार असें जाहीर केलें; म्हणजे शहाजीला अनुकूल व प्रतिकूल असे जे दोन पक्ष विजापुरांत अस्तित्वांत होते त्यांपैकीं खवासखानाच्या विरुद्ध पक्षाचा हा सरदार विजापूरकरांच्या आश्रयास जाऊं लागला तेव्हां या बंडखोराला विजापूरकरांनीं आश्रय द्यावा किंवा नाहीं आणि त्याला वठणीवर आणण्याचें काम शहाजीच्या अधिकारांतलें होतें किंवा नाहीं याचा निर्णय करणें कठीण होतें. त्यांतून सैफखानानें तळ कोंकणांतला

मुलूख दिला, पण किल्ले दिले नाहींत; आणि शिवाय निजामशाही राज्यांतले हत्ती वगैरे सरंजाम बरोबर घेऊन तो दोन हजार स्वारांनिशीं मुरारपंतास मिळण्यासाठीं म्हणून जाऊं लागला. त्याला अशा रीतीनें जाऊं देण्यानें निजामशाही राज्यांतील इतर सरदारांना हेंच वळण उचलण्यास प्रोत्साहन देण्यासारखें होतें, हें लक्षांत आणून व अशा बंडखोरांना आपण शिक्षा करूं शकतों हें दाखविणें अवश्य आहे असा विचार करून शहाजीनें त्याच्यावर अचानक रीतीनें छापा घातला. दोनही सैन्यांत खेडकडूस नजीक निकराची लढाई झाली व दोनही पक्षांकडील पुष्कळ लोक कामास आले व जखमी झाले. सैफखानाचा सेनापती सिदी अंबर आतिषखनी हा जखमी होऊन शहाजीच्या हातीं कैदी म्हणून सांपडला; आणि स्वतः सैफखान दोन दिवस खेड येथें वेढला गेला होता. परंतु मुरारपंताचा मुक्काम तेथून जवळच ४।५ कोसांवर होता; त्याला ही बातमी कळतांच त्यानें मध्यें पडून त्याची सुटका करविली व त्याला घेऊन तो विजापुरास गेला. मुरारपंताच्या शिफारशीवरून या सैफखानास महमद आदिलशहानें दोन लाखांचा मुलूख जहागीर * दिला. अशा रीतीनें शहाजीच्या विरुद्ध मताच्या सरदारांस विजापूर दरबारांत आश्रय मिळूं लागल्यामुळें या दोघांतील एकोपा ढांसळण्यास सुरुवात झाली किंवा काय हा प्रश्न सोडविणें अवश्य आहे. विजापूरचा इतिहासकार एवढेंच म्हणतो कीं, "मुरारी संनिध असून त्याच्या हातून सैफखानाचें संरक्षण सुरुवातीसच झालें नाहीं; आणि सैफखान इमानानें सर्व मुलूख शहाजीच्या हवालीं करून विजापूरच्या दरबाराकडे जात असतां मुरारपंताची पर्वा न धरतां शहाजीनें त्याच्यावर हल्ला केला, याबद्दल मुरारपंत किंवा विजापूरचा बादशहा शहाजीला चकार शब्द बोलूं शकले नाहींत. यावरून शहाजीचें पारडें या वेळीं फार जड झालें होतें हें सहज दिसण्याजोगें आहे." ( मो. १६९ ). या वेळीं शहाजीचा अंमल नाशिक व संगमनेर ( ले. ३७५ व ३७६ ) या बाजूस कायम होता व त्याच्या हाताखालीं १२ हजारांपर्यंत सैन्य होतें.

---

* यानंतर हरपनहळ्ळीचा जमिनदार परवर नायक याच्यावर स्वारी करण्यासाठीं सैफखानाची रवानगी झाली व त्या प्रसंगीं बंदुकीची गोळी लागून एका चकमकींत तो मरण पावला.

मुरारपंताच्या तर्फें जे हुकूम सुटत त्यांत 'महाराज राजाधिराज मुरारीपंडितसाहेब' असा मायना असे (ले. ३३७). आणि दानपत्रांत 'धर्मावतारो राजाधिराजः महाराजः राजश्रीः पंडितः मुरारिः जगदेकप्रभुः सार्वभौमप्रतिनिधिः' हे शब्द योजिले आहेत. यावरून त्याची मान्यता पुष्कळ झाली होती असें म्हणण्यास हरकत नाहीं. पण महाराज, राजाधिराज हे किताब सरकाराकडून देण्यांत आलेले नव्हते हें लक्षांत ठेविलें पाहिजे. त्याचप्रमाणें सार्वभौमप्रतिनिधि व धर्मावतार हीं विशेषणें मुरारपंताच्या वर्णनास कांहीं अंशीं लागू पडत असलीं तरी तीं हें दानपत्र लिहिणाऱ्या तत्कालीन संस्कृत पंडिताच्या मनांतली मुरारपंतासंबंधाची भावना व्यक्त करितात एवढेंच समजतां येईल. प्रत्यक्ष मुरारपंताचे विचार समजण्यास यापेक्षां अधिक माहिती उपलब्ध झाली पाहिजे. तथापि सध्यां आपणांस एवढें म्हणतां येईल कीं श. १५५२ पासून १५५५ पर्यंत मुरारपंताचें वजन विशेष उत्कटत्वानें भासत होतें; तें यानंतर कमी होऊं लागलें. तो विजापूरकरांचा नोकर असल्यामुळें व हिंदुधर्मी असल्यामुळें त्याच्याविषयीं गैरसमज उत्पन्न होण्यास विजापूर दरबारांत यत्किंचित् कारणहि पुरेसें होण्याजोगें होतें.

हें ओळखून शहाजीनें स्वावलंबनावर जास्त भिस्त ठेवण्यास सुरुवात केली. श्रीनिवासराव नांवाचा जुन्नरचा एक अधिकारी होता त्याच्या मुलीस आपला वडील मुलगा संभाजी याच्यासाठीं त्यानें मागणी घातली व त्याच्याशीं या मिषानें दोस्तीचें संधान लावून त्याला पकडून कैद केलें; आणि अशा रीतीनें जुन्नर, जीवधन, सुंदा, भोरगड, परसगड, माहुल, खोज वगैरे किल्ले ताब्यांत येतांच शहाजी मूर्तजाला भीमगडाहून जुन्नरास घेऊन आला व तेंच त्यानें आतां राजधानीचें ठिकाण केलें. श्रीनिवासरावासारखा सरदार व इतर सावकार यांजकडून शहाजीला बहुत मालमत्ता मिळाली. तिच्या जोरावर बेकार झालेल्या जुन्या निजामशाहींतील लष्करापैकीं बारा हजार स्वार आपल्या लष्करांत ठेवून शहाजीनें आपली फार मजबुती केली (मो. १७०).

**१०. मोंगलांचा परिंड्यावर हल्ला**—शहाजी व विजापूरकर यांनीं निजामशाही मुलूख आक्रमण करण्याचा हा जो सपाटा चालविला त्याची बातमी मोंगलांचा सेनापती महाबतखान याला लागत होती. प्रथम सामोपचारानें शहाजीशीं बोलून हा प्रश्न निकालांत काढावा या हेतूनें त्यानें प्रयत्न केला; पण तो फुकट जाऊन उलट शहाजी जास्तीच डोईजड होऊं

लागला; आणि विजापूरकरहि त्याला उघडपणें मदत करूं लागले. तेव्हां त्यांच्यावर चालून जाऊन सैन्याच्या जोरावर मोंगलांची सत्ता निजामशाही मुलखांत प्रस्थापित केली पाहिजे, अशा विचारानें महाबतखानानें शहाजादा दारा शिको दक्षिणेंत येतांच बऱ्हाणपुरास त्याला न थांबूं देतां परिंड्याचा किल्ला वेढण्यासाठीं कुच करविलें. हा निजामशाही किल्ला पूर्वी मोंगलांचा सरदार अजमखान यानें वेढण्याचा प्रयत्न केला होता, पण त्या वेळीं त्याला यश आलें नव्हतें. तें आतां आपण संपादन करावें व दौलताबाद घेऊन निजामशाही बुडविली, त्याप्रमाणें परिंडा घेऊन विजापूरकरांची खोडकी मोडावी असा महाबतखानाचा बेत होता. त्याप्रमाणें शहाजाद्याचें सैन्य परिंडा किल्ल्यानजीक ओढ्यावर येऊन पोंचतांच दुसऱ्याच दिवशीं धमधमे बांधण्यास सुरुवात झाली व सुरुंगांचें काम तटापर्यंत पोंचविण्याची कामगिरी अल्ला वर्दीखान याजकडे सोंपविण्यांत आली. पण हें वेढ्याचें काम निर्वेधपणें चालणें अशक्य होतें. कारण या वेळीं शहाजी सैन्यासह अहमदनगरकडील मोंगलांचा अंमल उठविण्यासाठीं आला होता व दौलताबाद व बेदरकडे लुटालूट करून धान्याची वाहतुक त्यानें बंद पाडली होती; यामुळें त्याला तेथून पिटाळून लावण्यासाठीं मोंगली सैन्यांतले तीन हजार घोडेस्वार पाठवावे लागले; त्यांनीं भोंसल्यांचा मूळ गांव चांभारगोंदें हा लुटून उध्वस्त करावा आणि शहाजीस जुन्नराकडे घालवून आपण संगमनेरजवळ तळ देऊन रहावें असा महाबतखानानें १५५५ च्या पौषांत हुकूम दिला. पण मोंगली सैन्याच्या हातून हा कार्यक्रम पार पडला नाहीं. कारण शहाजीच्या मदतीस या वेळीं रणदुल्ला, पीरजंगखान, फरहादखान, अंकुशखान व मुरारपंत हे फौजबंद विजापुरी सरदार आले होते व त्यांनीं किल्ल्यासमोर तळ देऊन मोंगलांशीं जोराचें युद्ध केलें. किल्ल्यांतील लोकांनींहि वरून मोंगली सैन्याला चांगलाच मार दिला आणि तटास सुरुंग लावणें अशक्य केलें. चराचें काम थोडेंबहुत होतें न होतें तोंच त्यावर बेधडक हल्ले करून आदिलशाही सैन्य तें मोडून टाकी व कित्येक वेळां त्यांत पाणी सोडण्यांत येई. त्यांतून एक सुरुंग मोठ्या शिकस्तीनें तयार करण्यांत येऊन शहाजाद्यानें स्वतः त्यास बत्ती दिली. त्याबरोबर बुरुजाची एक बाजू कांहींशी ढांसळली; पण आंतील लोकांनीं त्याची डागडुजी ताबडतोब केली. पण यापेक्षां मुख्य अडचण म्हणजे महाबतखान व खानदौरान (=नासिरीखान ) या मोंगली सरदारांत या वेळीं फारच

वैमनस्य माजलें होतें. दौलताबाद हस्तगत केल्यावेळीं फत्तेखान व हुसेन निजामशहा यांना बऱ्हाणपुराकडे घेऊन जावयाचें होतें, तेव्हां महाबतखानास ' किल्ल्यांत किती सैन्य ठेवावें व बरोबर किती घेऊन जावें ' या विचारानें अडचण उत्पन्न झाली होती; त्या प्रसंगीं फार थोड्या फौजेनिशीं किल्ल्याचें संरक्षण करण्याचें काम नासिरीखानानें पत्करलें व महाबतखानास सर्व सैन्या-सह खुशाल निघून जा असें मोठ्या हिंमतीनें सांगितलें. यामुळें महाबतखाना-पेक्षां या नासिरीखानाचें शौर्य अधिक असें लोक बोलूं लागले व बादशहानेंहि त्याला या कामगिरीबद्दल खानदौरान हा किताब दिला होता. यानंतर आणखी एका आणीबाणीच्या प्रसंगीं महाबतखानाचा प्राण या खानदौराननें वांचविला. यामुळें या खानाचें बोलणें महाबतखानाला सोसून घ्यावें लागे. पण या परिंड्याच्या वेढ्याच्या प्रसंगीं हा खान, सेनापती महाबतखान याला, चार लोकांसमक्ष फारच टाकून बोलूं लागला व बोलाचाली वाढून दोघांत चांगलेंच वितुष्ट वाढलें. आणि शेवटीं महाबतखानानें सोडलेले गुप्त हुकूम बाहेर असलेल्या विजापुरी सैन्याला समजूं लागले. यामुळें मोंगली सैन्यावर त्यांना सहज मात करतां आली. शेवटीं या वेढयांत यश येणें शक्य नाहीं, ही गोष्ट महाबतखानाच्या लक्षांत आली व त्यानें शहाजाद्याला वेढा उठवून जाण्याचा सल्ला दिला. " पावसाळा जवळ आला व दाणा वैरण संपली असून १५।२० कोसांवरून ही सामग्री आणावी लागत असल्यामुळें सैन्याचे फार हाल होतात " इत्यादि कारणें महाबतखानानें दिलीं; पण तीं खरीं नव्हतीं. मोंगली सैन्यांत फूट पडली आणि उलटपक्षीं शहाजी व आदिल-शाही सेनापती यांनीं एक दिलानें काम केलें, यामुळें मोंगलांना ४।६ महिने वेढयाचें काम चालविल्यानंतर अपयश घेऊन परत जावें लागलें. दौलताबादचा किल्ला घेतल्यामुळें दक्षिणेंतील राज्यें बुडविण्याचें शहाजहानाचें चढाईचें धोरण महाबतखान यशस्वी करील असा संभव दिसूं लागला होता तो नाहींसा झाला. एकजुटीनें वागणाऱ्या दक्षिणेंतील सैन्यांपुढें मोंगलांना हात टेकावे लागतात हें पूर्वीं अनेक वेळां दिसलें होतें; तोच अनुभव या वेळीं शहाजीनें आणून दिला. शहाजादा शहासुजा १५५६ च्या ज्येष्ठांत परिंडयाचा वेढा उठवून बऱ्हाणपूरच्या रोखानें सैन्यासह परत निघाला. तेव्हां रणदुल्लानें त्या सैन्यावर जागजागीं हल्ले करून, मार्ग अडवून मोंगलांना अगदीं जर्जर केलें. ' पळत्या शत्रूस मारूं नये असें महमद आदिलशहाचें म्हणणें होतें,

पण रणदुल्लानें या वेळीं तें देखील लक्षांत न घेतां मोंगली सैन्यावर बेधडक हल्ले केले; आणि एक मुक्काम गांठतांच 'माफ करा असा विनवणीवजा निरोप रणदुल्लाकडे पाठवून व पैसे भरून पुढील मुक्कामाकडे जाण्याची धडपड महाबतखानाला करावी लागत असे' इत्यादि वर्णन महमदनाम्यांत पुष्कळ खुलासेवार दिलें आहे. तात्पर्य, दाक्षिणात्यांनीं मोंगलांना शह दिला याचें श्रेय केवळ आदिलशाही सैन्यास देण्याचा रोख सदर लेखकाचा आहे. पण तो चुकीचा आहे. दाक्षिणात्यांत म्हणजे शहाजी व आदिलशहा यांच्या सैन्यांत जूट असल्यामुळें हें यश लाभलें; या जुटीवांचून मोंगलांपुढें त्यांचा निभाव लागणें शक्य नव्हतें. पण हें मोंगलांचें संकट किंचित् दृष्टिआड होतांच विजापूरदरबारांतील मुत्सद्यांचे खासगी मतभेद बळावले व त्यांत शेवटीं शहाजीचा शत्रु मुस्तफाखान हा विजापुरांत अधिकारारूढ झाला. यामुळें निजामशाही व आदिलशाही यांमधील जूट तत्काळ विलयास गेली व शहाजीला आपला डाव आटपावा लागला. त्यासंबंधींची हकीकत देण्यापूर्वीं प्रथम मुस्तफाच्या कैदेचें एक उपाख्यान सांगितलें पाहिजे. त्याची हकीकत अशी.

**११. शांततेचें वर्ष**—परिंड्याचा वेढा उठवावा लागल्यामुळें मोंगली सैन्याची नाचक्की झालीच होती. त्यानंतर चारपांच महिन्यांनीं त्यांचा मुख्य सेनापती महाबतखान श. १५५६ कार्तिक व. ११ रोजीं मरण पावला. (इ. ७–४५). यामुळें मोंगलांचा दरारा कमी पडला. हें पाहून दौलताबाद परगण्यांत आपला अंमल बसविण्याचा शहाजीनें जोराचा प्रयत्न केला. परंतु मोंगलांचा नवा सुभेदार कामावर हजर होईपर्यंत दक्षिणेंतील काम पहाण्याचा अधिकार ज्याला प्राप्त झाला होता तो खानदौरान मोठा धाडसी होता. त्यानें एकदम दौलताबादच्या रोंखानें शहाजीवर चाल केली; तेव्हां त्याच्यापुढें शहाजीचा निभाव लागला नाहीं. त्याला रामदूद (रामडोह ? नेवाशाजवळ) पर्यंत हटावें लागलें. दौराननें तेथेंहि त्याचा पाठलाग केला तेव्हां शेवगांव, अमरपूरवरून मोहरीच्या घाटानें शहाजी जुन्नरकडे निसटला. त्यानें प्रथम माणिकदुदच्या घाटानें बाडबिछाड पुढें रवाना केलें होतें तें मात्र मोंगलांच्या हातीं सांपडलें. त्यांत धान्याच्या गोण्या लादलेले ८००० बैल व बाण आणि हत्यारेंपात्यारें वाहून नेणारे गाडे व ३००० कैदी दौरानाला मिळाले; अशा प्रकारें विजयी होऊन खानदौरान अहमदनगराकडे परत गेला (पा. १–६९).

अशा किरकोळ स्वरूपाच्या चकमकी सोडल्या असतां मोंगली सेनापती महाबतखान मेल्यानंतर एक वर्षभर शहाजीला मोंगलांकडून म्हणण्यासारखा त्रास पोंचला नाहीं, असें म्हणण्यास हरकत नाहीं. शहाजीनें चढाई केली तर स्वसंरक्षणापुरता खानदौरान तडफ दाखवी. पण शहाजीच्या नव्या निजामशाहीचें उच्चाटण करण्यासाठीं चढाई करण्याची हिंमत दौरानांत नव्हती; यामुळें मोंगलांनीं आपल्या इतिहासांत नमूद करावा असा उत्पात शहाजीला शत्रुविरुद्ध या वेळीं करतां आला नाहीं एवढाच अर्थ बादशाहनाम्यांतील शहाजीविषयींच्या अनुल्लेखाचा घेतला पाहिजे. एरव्हीं शहाजीची घडी बसत चालली व त्याची सत्ता उलथून पाडणें जड जाणार आहे ही गोष्ट मोंगलांनाहि पटली होती. तथापि मयूरसिंहासनारोहण व बुंदेलखंडांतील बखेडे वगैरे महत्त्वाच्या कामांच्या व्यग्रतेमुळें आणि शहाजी व विजापूरकर यांच्यांत फूट पडण्याचा संभव उत्पन्न झाला नसल्यामुळें शहाजहानानें या वेळीं शहाजीविरुद्ध मोहीम काढिली नाहीं. त्याचा फायदा शहाजीनें अर्थातच शक्य तितका घेतला व राज्यांत स्थिरस्थावर केली. या वेळीं शहाजीच्या ताब्यांत किती प्रदेश होता हें समजण्यास मोंगली अगर विजापुरी इतिहासांत चांगलेंसें साधन नाहीं. पण गोदावरी, प्रवरा, नीरा व भीमा या नद्यांमधील प्रदेशावर व सह्याद्रीपर्वताच्या आसपासच्या मुलखावर शहाजीनें आपला अंमल बसविला असें शिवभारतांत म्हटलें आहे (अ.९-४) त्यावरून बरीच कल्पना करितां येईल. तथापि या काळचीं अस्सल पत्रें शोधून काढल्यावांचून स्पष्ट नकाशा काढतां येणार नाहीं.

**१२. खवास व मुस्तफा यांचें वैमनस्य**—शहाजीचें बस्तान किंचित् बसत चाललें असें जें येथवर सांगितलें तें त्याच्या स्वावलंबनाचें फळ होतें. परंतु त्याच वेळीं विजापुरांत त्याचा पाठपुरावा करणारा मुरारपंत मात्र परावलंबी, म्हणजे खवासखानाच्या नोकरींत, असल्यामुळें त्याचें आसन डळमळीत होतें. मुस्तफा हा शहाजी व त्याची निजामशाही यांचा मनापासून द्वेष करी व महमदशहाला त्याचा सल्ला दिवसेंदिवस अधिक पसंत पडत चालला होता. हें पाहून मुरारपंताच्या सांगण्यावरून खवासानें मुस्तफास कैद करण्याचें ठरविलें. प्रथम त्यानें ‘ तुमच्या जवळचा शिक्का परत पाठवा ’ असा मुस्तफाकडे निरोप पाठविला; परंतु तो देण्याचें मुस्तफानें नाकारिलें. तेव्हां दोघांत मारामारी सुरू होऊन, ७ दिवस विजापुरांत या दोघांच्या सैन्यांत

चकमकी झाल्या व शेवटीं मुस्तफाला हार खावी लागली आणि तो कैदी बनला. त्याच्याबरोबर असदखान व मिरजा नुरुद्दीन महमद हेहि त्याच्या पक्षाचे म्हणून कैद करण्यांत आले. पुढें मुस्तफाची रवानगी खवासानें मोठ्या बंदोबस्तानें बेळगांवाकडे केली व तो मोठमोठ्या हुद्याच्या जागीं आपल्या विश्वासांतलीं माणसें नेमूं लागला. तेव्हां महमदशहाला ही गोष्ट असह्य वाटली. आधींच त्याच्या मनाचा ओढा मुस्तफाकडे होता. त्यांतून खवासखान खुद्द बादशहाची मर्जीगैरमर्जी न पाहतां जेव्हां नव्या माणसांच्या नेमणुका करूं लागला तेव्हां आपण या वेळीं हालचाल केली नाहीं तर खवासाची मगरमिठी आपल्या भोंवतीं कायमची बसणार ही गोष्ट त्याच्या लक्षांत आली. तेव्हां त्यानें रणदुल्लास गुप्तपणें भेटीस बोलावून खवासाचा बंदोबस्त करण्याविषयीं सुचविलें. रणदुल्लाचा विशेष राग मुरारपंतावर होता हें मागें सांगितलेंच आहे. तेव्हां त्यानें प्रथम त्याचा निकाल करण्याचें ठरविलें. त्यानें खवासाकडे उघड निरोप पाठविला कीं, ‘ मुरारी फार बडबड्या आहे, व त्याच्यावर सर्व लोक नाराज आहेत. यासाठीं त्याला कारभारांतून काढून काशीस पाठवा, आणि आपण स्वतः सर्व कारभार पहा म्हणजे आपल्याशीं कोणी वांकडेपणानें वागणार नाहीं.’ हा निरोप पोंचतांच सर्व गाडें उलटणार ही गोष्ट खवासाच्या लक्षांत आली. तेव्हां त्यानें एक युक्ति योजिली ती अशी कीं, आपण भ्यालों नाहीं हें दाखवून त्याच वेळीं त्यानें मोंगलांकडे अंतस्थ रीतीनें निरोप पाठवून मदत मागितली. रणदुल्लाच्या निरोपास त्यानें असा जबाब दिला कीं, ‘ आज जसे तुम्ही मुरारीचें ऐकण्यास नाराज आहां, तसे उद्यां माझेंहि ऐकण्यास तुम्ही नाराज होणार नाहीं हें कशावरून ? ’ अर्थात् रणदुल्लाच्या निरोपास आपण मुळींच भीक घालीत नाहीं हें खवासाच्या जबाबाचें तात्पर्य होतें. यामुळें खवासास वठणीवर आणावयाचें तर सामोपचारानें काम भागणार नाहीं, त्याकरितां सैन्यच जमविलें पाहिजे हें निश्चित होऊन रणदुल्ला त्या मार्गानें खटपट करूं लागला. उलटपक्षीं खवासानेंहि लढण्याची तयारी करून शेख मोहिद्दीन दबीर नांवाचा वकील शहाजहान बादशहाकडे पाठवून मोंगली सैन्याची मदत मिळविण्याची खटपट चालविली. त्या वकिलाबरोबर खवासानें असा निरोप धाडला होता कीं “ विजापुरांतील अमीर लोक आपसांत बखेडे करण्यांत गुंतले आहेत, व सर्वत्र फंदफितूर माजला आहे. अशा वेळीं आपली फौज माझ्या मदतीस पाठवावी. म्हणजे या फितुरी लोकांना

शिक्षा करून विजापूर मी आपल्या ताब्यांत देईन." अशा रीतीनें जिवावर बेतल्यावेळीं दिल्लीपतीकडे धांव घेण्याची प्रवृत्ती त्या वेळच्या मुसलमान मुत्सद्यांच्या रोमरंध्रांत खिळलेली होती याचा प्रत्यय या वेळीं आला. यामुळें मुरारपंतावर मात्र मोठीच आपत्ती ओढवली; तथापि मुरारपंत व खवासखान यांना सध्यां तरी एकदिलानें विरुद्ध पक्षास तोंड देण्यावांचून गत्यंतर नव्हतें, व त्याप्रमाणें ते दोघे सैन्य जय्यत ठेवून एकत्र राहिले. तेव्हां रणदुल्लानें या वेळीं त्यांना एकमेकांपासून अलग करून प्रत्येकास स्वतंत्र रीतीनें गांठून जमीनदोस्त करण्याची युक्ति काढली ती अशी. एतगीर(यादगिरी)कर हवालदार इमामखान खवासाच्या नोकरींत होता, त्याला रणदुल्लानें प्रोत्साहन देऊन बंड पुकारण्यास सांगितलें. आणि त्याप्रमाणें या हवालदारानें बंड पुकारतांच त्याच्या शासनार्थ खवासाला मुरारपंताची रवानगी १० हजार सैन्यासह करावी लागली. या सैन्यांत मुरारपंताबरोबर खवासानें पाठविलेल्या सरदारांत अंकुशखान, चांदखान निजामशाही, दर्विश महमद व मुस्तफाखान निजामशाही हे सरदार असल्याचें लिहिलें आहे ( हिं. ४८२ ); त्याअर्थी निजामशाही राज्यांतले बरेच सरदार विजापूरकरांच्या आश्रयास आले होते हें उघड आहे.

यांप्रमाणें मुरारपंतास एतगीरच्या बाजूस पाठविणें खवासाला भाग पाडल्यावर रणदुल्लानें खवासावर झपाट्यानें हल्ला करण्याची तयारी केली. रणदुल्लाच्या बाजूनें फरहादखान, खैरतखान, अल्ला खुदावंदखान, महमद याकुतखान, राघोपंत व खेळोजी भोसले व सर्जेराव घाटगे हे सरदार कलबुर्ग्याजवळ एकत्र जमले. इतक्यांत सोलापुराहून मलिक रेहान हाहि आपल्या फौजेनिशीं कमळापुराजवळ रणदुल्लास येऊन मिळाला. रणदुल्लानें रेहान व राघो पंडित यांना हुकूम दिला कीं, 'भीमा नदीस महापूर आला आहे; या वेळीं तुम्ही दोघे प्रथम नदीपार चला; म्हणजे आम्हांसही तिकडे मागाहून नदी उतरण्यास बरें पडेल.' त्याप्रमाणें राघो पंडित भागवडी येथें व मलिक रेहान टाकळीजवळ नदी उतरण्याच्या विचारांत होते. इतक्यांत खवासाचा रेहानास गुप्त निरोप आला कीं 'रणदुल्लाचें मुरारीशीं वांकडें असल्यामुळें त्यानें हा सर्व फितूर बादशाही कामांत उठविला आहे; तुम्ही आदिलशाहीचे खरे हितचिंतक आहां व माझे दोस्त आहां. तर रणदुल्लाच्या नादीं तुम्ही लागूं नये हें बरें.' रेहानाला खवासाचा हा सल्ला पटला व तो टाकळीहून मंद्रुपच्या बाजूनें सोलापूरच्या हद्दींत जाऊन राहिला. राघो पंडित मात्र देवनगांव येथें

नदीपार जाऊन ५।६ हजार स्वारांसह एका कोसाच्या अंतरावर तळ देऊन राहिला.

इकडे मुरारपंत खवासाच्या हुकमाप्रमाणें एतगीरच्या किल्ल्यावर चालून गेला तो तिकडे एक महिनाभर स्वस्थ राहिला. यामुळें विरुद्ध पक्षास सैन्याची मांडणी करण्यास चांगला अवसर सांपडला. त्यानंतर मुरारपंत राघो पंडितावर चाल करण्यासाठीं ५-६ हजार सैन्यानिशीं रातोरात ३२ कोसांची मजल मारून देवणगांवास आला. त्याचें बहुतेक लष्कर मागेंच होतें; आपण स्वत: मात्र थोड्या सैन्यानिशीं तो पुढें आला होता. तेव्हां सर्व सैन्य जमा होईपर्यंत वाट पाहून नंतर शत्रूशीं सामना करण्याचा विचार त्यानें कायम ठरविला असता तर तें शहाणपणाचें झालें असतें. पण त्याऐवजीं मुरारपंतानें जवळ असलेल्या लहानशा तुकडीच्या जोरावर राघो पंडिताच्या सैन्यावर तुटून पडण्याचें ठरविलें. उस्मान बकर कोठी नांवाच्या सरदारावर मुरारपंताची मोठी भिस्त होती व तो हजर असल्यावर इतर सैन्यासाठीं वाट पहात बसण्याचें कारण नाहीं असें त्याला वाटत असल्यामुळें त्यानें या वेळीं घाईनें युद्धास प्रारंभ करण्याचा हुकूम सोडला. पण सपाट्यासरसा प्रारंभींच तो उस्मान युद्धांत ठार झाला. यामुळें मुरारपंताचें सैन्य दशदिशा पळत सुटलें व राघो पंडित विजयी झाला. तेव्हां मुरारीला युद्धांतून पळून अवघ्या १५ स्वारांनिशीं सांतूर (सस्तूर) गांठतां गांठतां पुरेवाट झाली. तेथें मुस्तफाखान निजामशाही यानें त्याला सहाय्य करून बारकुंडीस पोहोंचविलें. तेथून तो मुडकी येथें आला. तो गांव रणदुल्लाच्या जहागिरीपैकीं होता; यासाठीं मुरारीनें त्याची लूट करून फार नासाडी केली. नंतर चिमलग्यावर कृष्णानदी उतरून त्यानें नाईक वाड्यांच्या विश्वासावर धारवाडचा रस्ता धरला.

इकडे रणदुल्लाला मुरारीचा मोड झाल्याचें वृत्त समजतांच तो भीमा नदी उतरून कमळापुरास आला ; तेव्हां खवासानें विजापूरच्या किल्ल्याचे दरवाजे बंद करून रणदुल्लाशीं शत्रुत्व जाहीर केलें. रणदुल्लानें मध्यस्थामार्फत तडजोड करण्याचा प्रयत्न केला पण त्याचा उपयोग झाला नाहीं. नंतर महमदशाहानेंच पुढाकार घेऊन खवासास ठार मारण्याची योजना केली. सिद्दी रेहान रोकारसान (=पत्रें पोंचविणारा ) याला बोलावून बादशहानें सांगितलें कीं ‘ फुरसत पाहून तुम्हीं आपलें काम करा. ’ या सांकेतिक वाक्याचा अर्थ त्या सिद्दीच्या लक्षांत आला व त्यानें राजनिष्ठा दाखवून

आपला भाग्योदय करून घेण्याची संधी साधण्याचें ठरविलें. नंतर एके दिवशीं करीम महालदार उर्फ करीम सर्जा आणि मियाजी. सरशलक याचा मुलगा हुसेनखा या दोघांच्या मदतीनें खवासखानाला ठार मारण्याच्या हेतूनें सिद्दी रेहान दरबारांत जाऊन टपून बसला. नंतर खवास दरबारांतील काम संपवून घरीं जाण्यासाठीं निघाला होता, इतक्यांत करीम सर्जानें पुढें होऊन खवासाच्या छातींत कट्यार खुपसली व तो एकीकडे वळला. इतक्यांत हुसेनखानानें पाहिलें कीं खवासखान इतकी जखम लागली असतां ती सोसून जात आहे, तेव्हा त्यानेंहि त्याला एक जखम केली. तरीहि खवासखान दाद न देतां पळत सुटला. तेव्हां सिद्दी रेहान यानें विचार केला कीं "हा या वेळीं सुटल्यास महत् संकटें उभारील; म्हणून यास आतांच्या आतांच ठार केलें पाहिजे." नंतर बाहेर जाऊन खासखेल म्हणजे हुजरातीचे लोक बरोबर घेऊन तो खवासाच्या पाठलागासाठीं तयार झाला; पण या अवधींत खवास आपल्या वाड्यांत जाऊन दरवाजे बंद करून राहिला. शेवटीं बादशहाच्या सूचनेवरून रेहान वाड्याचे दरवाजे फोडून आंत शिरला आणि त्यानें खवासाचें शीर धडापासून वेगळें केलें. या गडबडीच्या वेळीं रणदुल्ला सर्व सरदारांना जमवून विजापुरानजीक शहापूर येथें तळ देऊन राहिला होता. त्याच्याकडे खवास व मुबारक या दोघां खानांचीं शिरें एका पाटींत घालून पाठविण्यांत आलीं. अर्थात् रणदुल्लाला त्या पाटींतला माल पाहून समाधान वाटलें. हें सांगून विजापूरचा इतिहासकार म्हणतो कीं, त्या वर्षी पाऊस न पडल्यामुळें लोक चिंतातुर झाले होते; पण खवासाचा वध होतांच थोड्याच दिवसांत असा जोराचा पाऊस पडला कीं, सर्वत्र गारेगार होऊन गेलें. म्हणजे 'परमेश्वरानें लोकांना दुष्काळाच्या व (खवासाच्या) जुलमाच्या अशा दुहेरी संकटांतून एकदमच सोडविलें!' यानंतर दुसऱ्याच दिवशीं महमद बादशहानें मोठ्या थाटानें दरबार भरवून पदवीदानसमारंभ केला. सिद्दी रेहानाला अर्थातच 'इखलासखा' हा मोठा किताब व वजिरातीची मनसब दिली खुदावंदखाचा मुलगा अहमदखा याला सरनौबतीची मनसब मिळाली व इतर कारभार नबाब खानबाबा याजकडे सोंपविण्यांत आला. आणि मुख्य गोष्ट ही कीं, महमदशाहा या वेळेपासून स्वतः थोडाफार कारभार पाहूं लागला. त्या कारभारांत त्याला मनापासून मदत करणारा व त्याच्या विश्वासाचा मुत्सद्दी म्हणजे मुस्तफा हा बेळगांवच्या किल्ल्यांत कैदेंत होता; त्याला आणण्यासाठीं

हुसेनशहा फखराबादी याची रवानगी करण्यांत आली. त्यानें मुस्तफाला मोठ्या तांतडीनें व मानमरातबानें दरबारांत आणलें व महमदशहानें त्याच्याकडे सर्व मुलकी कामाचा बंदोबस्त सोंपविला.

**१३. मुरारपंताचा शेवट**—खवासखानाचा अशा रीतीनें शेवट लाग-ल्यावर मुरारपंताचा निकाल लावणें अगदींच सोपें झालें. तो पराभूत होऊन धारवाडास पोंचला, तेव्हां त्याच्या बरोबर ५ हजार स्वार होते. पण किल्लेदारानें त्याला आंतच येऊं दिलें नाहीं; पुढें मोठ्या मुष्किलीनें व करारमदार झाल्यावर दलपतराव व श्रीपतराव आणि नाईकवाडी मंडळी यांनीं किल्ल्याबाहेर त्याची भेट घेतली. पण या भेटींत बोलाचाली होऊन मुरारपंतानें त्यांना कैद केलें; व नंतर कांहीं शिपाई आले त्यांच्याशीं मारामारी केली. या गड-बडींत खवास ठार झाल्याची बातमी मुरारपंतास समजली; तेव्हां त्याचा धीर खचून तो रात्रींच्या रात्रीं धारवाडाहून पळत हल्याळच्या हद्दींत गेला. तेथील अधिकाऱ्यानें त्याला कैद करून विजापुरास हुजूरकडे पाठविलें. नंतर हुजूर-समोर उभा केल्यावेळीं जिवाची आशा नाहीं असें पाहून त्यानें बादशहास शिव्या दिल्या. तेव्हां त्याची जिभ कापून गाढवावरून धिंड काढविली व त्याच्या शरिराचे तुकडे तुकडे करून, हाल करून त्याला मारविलें. खवास-खानाची कत्तल झाल्यावर एक महिन्यानें मुरारीपंताचा शेवट झाला. या गोष्टीचा निश्चित काल समजण्यास मार्ग नाहीं. हि. १०४५ हें वर्ष व बुधवार असे उल्लेख बुसातिनेसलातीनच्या निरनिराळ्या प्रतींतून खवासखानाच्या खुनाची मिती म्हणून आलेले आहेत. पण महिना व तारीख यांच्या अभावीं वाराचा उपयोग होऊं शकत नाहीं. तथापि संदर्भावरून श. १५५७ च्या आश्विन-कार्तिकच्या सुमारास खवास व मुरार यांचा शेवट झाला इतकें निश्चितपणें म्हणतां येईल.

**१४. शहाजहानाचें दक्षिणेंत आगमन**—मागें सांगितल्याप्रमाणें खवासानें शेख मोहिउद्दीन दबीर याला दिल्लीदरबाराकडे पाठवून विजापुरांतील अंतस्थ याद-वीचा वृत्तांत कळविण्याची व्यवस्था केली होती. त्यामुळें विजापुरावर चालून जाण्यास अनुकूल काल आला हें शहाजहानाच्या लक्षांत आलें व तो स्वत: ५० हजार सैन्यानिशीं श. १५५७ माघ व. १० रोजीं दौलताबादेस येऊन पोंचला. कुतुबशहा, आदिलशहा व शहाजी या तिघांवरहि एकाच वेळीं मोहिम करण्याचा विचार त्यानें कायम केला, व तिघांही सत्ताधीशांना पत्रद्वारें युद्धास

आव्हान केलें. तेव्हां कुतुबशहानें तंटा न वाढवितां शहाजहानाच्या नांवें खुतबा वाचणें व दिल्लीकरांकडे खंडणी भरणें या दोनहि गोष्टी कबूल केल्या. आदिलशहाकडे पाठविलेल्या पत्रांतहि खंडणीची अट घातली असून निजामशाही मुलूख परत देणें व शहाजीचा पक्ष सोडणें या गोष्टी महमदशहानें कबूल कराव्या हा दिल्लीकरांचा मुख्य कटाक्ष होता. विजापूरच्या इतिहासांत मकरमतखानामार्फत शहाजहानानें पाठविलेला फर्मान व त्यास विजापूरकरांनीं दिलेलें उत्तर अशीं दोन पत्रें दिलीं आहेत. त्यांचा काल निश्चित करतां येत नाहीं; पण तीं या काळच्या आसपासचीं आहेत यांत शंका नाहीं. शहाजहानाच्या या पत्रांत दिल्लीश्वरोवा जगदीश्वरोवा ही कल्पना स्पष्टपणें मांडलेली आढळते. तो म्हणतो 'या पृथ्वींत चोहोंकडे तर्फे तर्फेत व विजापूर, गोवळकोंडें, भागानगर, लंका, पडलंका येथें खुतबा व शिक्का शहाजहान या नांवानें चालू करणें आम्हांस प्राप्त आहे. तुम्ही वर दिलेल्या शहरांतून हरएकजण बादशाहा म्हणवितां. पण आतां आमच्या सेवेची दोरी तुम्हीं आपल्या गळ्यांत घालून शहाजहान या नांवानें शिक्का व खुतबा सुरू करावा हें तुम्हांस योग्य आहे. नाहींतर तुमच्या अंगाचें मांस बाजपक्ष्यांकडून काढवून घारीकडून खाववूं' इत्यादि. यास आदिलशहाकडून गेलेल्या उत्तरांत "या पृथ्वींत अभिमान बाळगणारा धुळीस मिळतो. आम्हांस राज्याधिकाराचा मुकुट व बादशाहीपद ईश्वरानेंच दिलीं आहेत. शिवाय आम्ही पुरातन असून तुम्हीं कितीहि आढ्यता मिरविली तरी नवीन आहां. तेव्हां आमचें अकल्याण तुमच्या हातून कसें होईल ? खंडणी आजपर्यंत दिली तेवढी यापुढेंहि देऊं. तुम्हीं ईश्वरी आज्ञेचा भंग केल्यास तुमचा हुकूम कोणीहि मानणार नाहीं",* अशा प्रकारचा मजकूर होता. यावरून विजापूरकर दिल्लीकरांशीं दोन हात करण्यास या वेळीं तयार होते असें दिसतें.

राजकीय चढाईप्रमाणें धार्मिक चढाईचेंहि धोरण शहाजहानानें या वेळीं दक्षिणेंत उघडपणें चालू ठेविलें होतें. जाझरसिंग बुंदेल्याचीं मुलेंबाळें घेऊन खानदौरान चांद्याहून बादशहाच्या भेटीस आला. तेव्हां

* हीं पत्रें व अशा प्रकारचीं बरींच पत्रें, तत्कालीन समजुती लक्षांत घेण्यासाठीं जमेस धरण्यास हरकत नाहीं. वस्तुतः तीं कोणी तरी कल्पक माहितगारांनीं लिहून ठेविलीं व बीरबलबादशहाच्या गोष्टींप्रमाणें लोकांत रूढ झालीं असण्याचाहि संभव आहे. कदाचित् कांहीं भाग मूळचा व कांहीं प्रक्षिप्त अशी भेसळहि असणें संभवनीय आहे.

बादशाही आज्ञेनें त्या मुलांना मुसलमान करून इस्लाम कुली व अली कुली हीं नांवें देण्यांत आलीं व बायका जनानखान्यांत दासी म्हणून पाठविण्यांत आल्या ( इ. ७ पृ.५१ ). हा प्रकार पौष व. २ रोजीं झाला. जाझरसिंगाचे आणखी दोन मुलगे पळून गोवळकोंड्यास गेले होते त्यांना कुतुबशहानें कैद करून शहाजहानाकडे पाठविलें. तेव्हां धाकट्या मुलास मुसलमान बनविलें आणि मोठा उदेभान यानें धर्मांतर करण्याचें नाकारल्यावर त्याला देहांत शिक्षा करण्यांत आली. ही गोष्ट फाल्गुन शुद्धांत घडली.

शहजहानाची ही धार्मिक चढाई केवळ हिंदूविरुद्ध नसून शियापंथीयांविरुद्धहि होती. कुतुबशहानें मोंगलांशीं यावेळीं पड खाऊन तह केल्याचें वर सांगितलें आहे. त्याचा उल्लेख करतांना बादशाहनाम्यांत (पृ. १६९—७०) असें म्हटलें आहे कीं, कुतुबशहानें नवीन (शिया) पंथ सोडून सुनीपंथाचा स्वीकार केला व त्यानें पहिले चार खलीफ व शहाजान यांच्या नांवें खुतबा पढण्यास सुरुवात केली. यासाठीं त्याला दरसाल दोन लाख रुपये खंडणीची सूट देण्यांत आली.

शहाजहानासमोर या गोष्टी चालल्या असतां त्याचे सेनापती विजापूरकर व शहाजी यांच्या मुलखावर चालून जाण्यांत गुंतले होते. कारण दिल्लीकरांच्या धमकीस न जुमानतां विजापूरकरांतर्फे उदगीर व आवसें येथील किल्लेदारांच्या मदतीस खैरियतखान निघाला असून शहाजीच्या मदतीस जाण्यासाटीं रणदुल्ला सैन्यानिशीं चालून येत आहे अशी मोंगलांना बातमी समजली होती. तथापि मुस्तफाखान कैदेंतून सुटून बादशाही कारभारांत शिरला आहे तो तंटा विकोपास जाऊं देणार नाहीं ही मोंगलांना खात्री असल्यामुळें त्यांनीं युद्धाचा आविर्भाव आणला इतकेंच; पण विजापूरकरांच्या मुलखावर प्रारंभीं प्रत्यक्ष चढाई अशी केलीच नाहीं. सय्यद खानजहान, खानदौरान व खानजमान ह्या मोंगली सेनापतींनीं निरनिराळ्या दिशांनीं विजापूरकरांच्या सरहद्दीवर सावधगिरीनें रहावें व रणदुल्लाला शहाजीकडे जाऊं देऊं नये एवढाच शहाजहानानें हुकूम सोडला होता.

शहाजीच्या मुलखावर चालून जाण्याचें काम खानजमान व शाइस्तेखान या दोघांकडे सोंपविलें होतें. पैकीं खानजमान यानें अहमदनगर येथें सैन्यास लागणारी सामग्री बरोबर घेऊन जुन्नरकडे कूच केलें. वाटेंत त्याला बातमी समजली कीं, मंबाजी भोसले मोंगलांचा पक्ष सोडून शहाजीला मिळाला

व त्यानें माहुलीचा किल्ला त्याच्या ताब्यांत दिला; आणि ते दोघे मिळून पारगांवा ( पेडगांव ) वरून परिंड्यास जाण्याच्या विचारांत आहेत. खानजमानानें त्यांचा पाठलाग करण्याचा प्रयत्न केला; पण शहाजीनें भीमा उतरून लोहगांवचा रस्ता धरला; आणि हा गांव विजापूरकरांच्या ताब्यांत असल्यामुळें खानजहान तेथें थांबला; कारण विजापूरकरांच्या मुलखांत आपलें सैन्य नेऊं नका असें शहाजहानानें त्याला बजावून सांगितलें होतें. यानंतर खानाच्या एका तुकडीनें चांभारगोंदाचा किल्ला सर केला व खानालाहि विजापूरकरांच्या मुलखांत शिरण्याविषयींची शहाजहानाची परवानगी आली. त्याप्रमाणें खानानें आदिलशाही मुलखांतून जाळपोळ व लूट करीत चैत्रांत कोल्हापूर घेतलें; आणि नंतर मिरज व रायबाग या पेठा लुटून खान कृष्णाकांठीं तळ देऊन राहिला.

शहाजीवरील मोहिमेंत गुंतलेला दुसरा मोंगली सरदार शाइस्तेखान यानें संगमनेर परगण्यांतून संभाजी व इतर मराठे यांना घालवून तो ताब्यांत घेतला आणि शेख फरीद यास तेथें ठाणेदार नेमून तो संभाजी वगैरेंचा पाठलाग करण्यासाठीं नाशिककडे गेला. तेव्हां मराठयांचें सैन्य नाशिक प्रांत सोडून कोंकणांत शिरलें. शाइस्तेखानानें बकरखानास कोंकणप्रांतांत रवाना करून दीड हजारांचें पथक जुन्नरकडे पाठविलें. त्याप्रमाणें या पथकानें जुन्नर शहर ताब्यांत घेतलें व दुसरी एक तुकडी माहुलीच्या रोंखानें निघाली होती. इतक्यांत शहाजी व संभाजी हे चांभारगोंदाजवळ आपले लोक जमवून जुन्नर येथें असलेली आपल्या कुटुंबांतील मंडळी सोडविण्यासाठीं निघाले. संभाजीनें जुन्नरजवळ पोंचतांच मोंगलांच्या पथकावर हल्ला केला. तेव्हां दोनही पक्षांतले बरेच लोक कामास आले. शाइस्तेखानाला ही बातमी समजतांच त्यानें ७०० घोडेस्वार जुन्नर येथील लोकांच्या मदतीसाठीं पाठविले; त्यांना वाटेंत मराठयांनीं ठिकठिकाणीं अडविलें; पण शेवटीं त्यांनीं जुन्नर गांठलें. तेथेंहि मराठयांनीं सभोंवर घिरटया घालून त्यांच्यावर उपासमारीचा प्रसंग आणला होता. पण स्वत: शाइस्तेखानानें जुन्नरपर्यंत मजल मारून तेथील लोकांना वांचविलें. यामुळें मराठयांना भीमानदीकडे हटावें लागलें. इतक्यांत शाइस्तेखानाला बादशहानें भेटीस बोलावल्यामुळें त्याला तेथून दौलताबादेकडे जावें लागलें. तेव्हां जुन्नरहून निघण्यापूर्वी ' बकरखानानें कोंकणांतून जुन्नरकडे यावें ' अशी शाइस्तेखानानें व्यवस्था केली.

विजापूरकरांवरील मोहिमेंत यापुढें अधिक लक्ष घालणें शहाजहानाला अवश्यक वाटलें याचें कारण असें कीं, शहाजी व विजापूरकर यांच्या संयुक्त सैन्याविरुद्ध मोंगलांना टिकाव धरतां येणें शक्य नाहीं हें त्याच्या ध्यानांत आलें. या वर्षी तो दक्षिणेंत आला तो खवासखानाच्या बोलावण्यावरून आला. पण तो आला त्या सुमारास खवास मारला जाऊन ,विजापूर दरबारांत सर्वत्र खळबळ उडाली होती यामुळें खवासाचा पक्षपाती म्हणविण्यांत शहाजहानाचा हेतु साधण्यासारखा नव्हता. मुस्तफाला विजापूर दरबारांत महत्त्व प्राप्त झालें म्हणजे तो मोंगलांचा स्नेह व शहाजीचा पाडाव या गोष्टी घडवून आणील ही मोंगलांची खात्री होती. यामुळें मोंगली सैन्य आदिलशाही मुलखांत शिरूं नये, याविषयीं शहाजहान जपत होता. तथापि आदिलशाहींत मुस्तफापेक्षां या वेळीं रणदुल्लाचें वजन अधिक होतें व तो मोंगलांशीं लढण्याविषयीं उत्सुक होता. त्यामुळें त्याच्यावर सैन्य पाठविणें शहाजहानाला भाग पडलें. त्याप्रमाणें परिंड्याकडे रणदुल्ला होता त्याच्यावर सय्यद खानजहान, बेदरकडे बहलोलखान होता त्याच्यावर खानदौरान आणि अंबरखान व शहाजी यांच्या संयुक्त सैन्यावर खानजमान अशा नेमणुका शहाजहानानें केल्या. पैकीं खानदौरान यानें बेदरच्या बाजूनें विजापुरापासून १२ कोसांवर असलेल्या फिरोजाबाद नांवाच्या गांवापर्यंत लुटालूट करीत मजल मारली. तेथें त्याला अशी बातमी समजली कीं, 'विजापूरकरांनीं शहापूर तलाव फोडून पाणी सोडून दिलें व सभोंवारचे लोक किल्ल्यांत आणून मुलूख बेचिराख केला. यामुळें मोंगली सैन्य तेथें गेल्यास त्याला अन्नपाणी मिळणें शक्य नाहीं.' यामुळें पुढें जावें किंवा नाहीं याची खानदौरानला मोठी पंचाईत पडली होती. इतक्यांत विजापूरकरांनीं मोंगलांशीं तह केल्याची बातमी आल्यानें त्याच्यावरचें संकट टळलें.

विजापूरकर व मोंगल यांमध्यें झालेला हा तह अत्यंत महत्त्वाचा होता. शहाजी व विजापूरकर ह्यांची जूट आहे तोंपर्यंत आपण कितीहि खटपट केली तरी त्यांच्या संयुक्त सैन्यांवर जय मिळविणें अशक्य आहे, अशी शहाजहानाची खात्री होत चालली. त्यामुळें कसाहि तह करून विजापूरकरांना शहाजीची बाजू सोडण्यास लावावें अशी शहाजहानाची व विजापूरदरबारांतील मुस्तफाचीहि इच्छा होती. यास विरोध काय तो रणदुल्लाचा असे. तेव्हां मुस्तफानें काजी सैय्यद याच्यामार्फत रणदुल्लाचेंच मन

वळविण्याचा प्रयत्न केला. दरबारांतील इतर मुत्सद्दी व स्वत: महमदशहा हे तहाविषयीं उत्सुक असून तूं एकटाच युद्धाचा आग्रह धरीत आहेस यांत तुझें कल्याण नाहीं; इत्यादि मुद्दे काजीनें रणदुल्लास समजावून दिले. रणदुल्ला देखील प्रसंग पाहून वागणारा होता. आपलें मत निश्चित करणें व त्याच्याच सिद्धीसाठीं झटणें हा त्याचा स्वभावच नव्हता. शहाजीशीं त्यानें अलीकडे मनापासून सहकार्य केलें होतें व मोंगलांशीं लढण्याचें धोरण आदिलशाही राज्यास अधिक हितकर आहे हेंहि तो ओळखीत होता पण बादशहाच्या मर्जीचा रोख पाहून खवासखानावर हात टाकण्यास तो कचरला नाहीं. त्याप्रमाणें या प्रसंगीं दरबारांतील रागरंग पाहून अवश्य तर 'शहाजीचाहि मी सहकारी नव्हें' असें बोलण्याची त्याची तयारी होती. सारांश, दरबारचा निरोप येतांच रणदुल्ला विजापुरांत गेला. तेव्हां मुस्तफानें त्याची अशी बरदास्त ठेविली व आपल्या घरीं नेऊन मेजवानीचा असा थाट उडविला आणि आपली बाजू अशा शिताफीनें त्याच्या पुढें मांडली कीं, रणदुल्लाचेंहि मत १५ दिवसांत बदलून त्यानें तहास कबुली दिली. अशा रीतीनें भीमा नदीची सरहद्द ठरून हा तहनामा कायम झाला.* त्यांत ठरल्याप्रमाणें भीमा नदीच्या उत्तरेकडील निजामशाही मुलूख मोंगलांनीं व दक्षिणेकडील विजापूरकरांनीं ताब्यांत घेतला; आणि ही मोहीम संपली. यानंतर शहाजहानानें मेहरबानीदाखल 'परिंड्याचा किल्ला विजापूरकरांच्या ताब्यांत होता तो त्यांजकडेसच असावा आणि सर्व निजामशाही तळकोंकणहि आदिलशहाकडे रहावें' या गोष्टीस मान्यता दिली.

**१५. माहुलीचा वेढा**—वर सांगितलेल्या तहांत मोंगल व विजापूरकर यांच्या दरम्यान जी कलमबंदी ठरली त्यांत शहाजीनें उभारलेली निजामशाही मोडावी व ही गोष्ट शहाजीनें आपणहून न केल्यास मोंगल व विजापूरकर यांच्या संयुक्त सैन्यानें त्याच्यावर मोहीम करून त्याला तसें करणें भाग

---

* हा तहनामा सोन्याच्या पत्र्यावर लिहिला गेला व तो दौलताबादेहून विजापुरास नेऊन तेथें मुस्तफाची मान्यता घेऊन, परत शहाजहानाच्या सैन्यांत नेऊन पोंचविण्याचें काम परांडेकर नांवाच्या जासुदानें पांच दिवसांत करून दाखविलें. पण शहाजहानाला या वेळीं इतकाहि दम निघण्याजोगा नव्हता. धान्य संपल्यामुळें आपल्या सैन्याला दुष्काळाची अडचण भासेल असें त्यास दिसूं लागल्यामुळें परांडेकर परत येऊन पोंचण्याच्या आधीं शहाजहान दौलताबादेहून एक मुक्काम निघून गेला होता. या तहनाम्याची मिती श. १५५८ वैशाख शु. १२ (६।५।१६३६) ही आहे.

पाडावें अशा अर्थाचें एक कलम होतें. त्याप्रमाणें शहाजीला हें कलम कळविण्यांत आलें, पण तो निजामशाही मोडण्यास कबूल नाहीं असें मोंगली सेनापती खानजमान यास समजलें. तेव्हां तहांत ठरल्याप्रमाणें मोंगली व विजापुरी सैन्यें शहाजीवर मोहीम करण्यासाठीं एक झालीं. खानजमानानें प्रथम जुन्नरकडे जाऊन तेथील किल्ल्यास वेढा देण्याचें काम चालीस लाविलें आणि त्या वेळीं शहाजी पुण्याकडे गेला होता, त्याच्यावर स्वतः कांहीं सैन्यानिशीं तो चालून गेला. परंतु घोडनदीस पावसानें पूर आल्यामुळें त्याला एक महिना वाटेंत थांबावें लागलें. पाणी उतरल्यावर नदी उतरून इंद्रायणीच्या कांठीं लोहगांवास त्यानें तळ दिला. शहाजीचें सैन्य तेथून १७ कोसांवर होतें, तें कोंढाण्याकडील डोंगरी प्रदेशांत गेलें. या वेळीं शहाजीच्या सैन्यास गांठावयाचें तर खानजमानाला इंद्रायणी, मुळा व मुठा या तीन नद्या ओलांडून जाणें भाग होतें; अर्थात् पावसाळ्यांत या गोष्टी आपणांस झेपतील किंवा नाहीं यासंबंधीं त्याच्या मनांत शंका उत्पन्न झाली. तेव्हां रणदुल्लास भेटून त्यानें या बाबतींत त्याचा सल्ला घेतला. ‘ हें काम कठीण असलें तरी शहाजीला सवड मिळूं न देणें ही गोष्ट महत्त्वाची आहे. यासाठीं त्याचा पाठलाग भर पावसाळ्यांत देखील चालू ठेवला पाहिजे, ’ असें दोघांच्याहि मतें ठरलें. त्याप्रमाणें खानजमान नदीपार झाला. शहाजीनें खानास झुकांडी देऊन कुंभ्या घाटानें कोंकणांत प्रवेश केला. ‘ कोंकणांत जंजिऱ्याच्या शिद्दीकडे तो राहिला. पण मोंगलांच्या बंडखोराला आश्रय देण्याचा धीर सिद्दीला होईना व खानजमानहि कोंकणांत आला हें पाहून शहाजी पुनः कुंभ्या घाटानें परत आला. यामुळें खानजमान व रणदुल्ला यांच्या सैन्यांच्या कोंडीमध्यें शहाजी सांपडण्याची वेळ आली होती; पण तेवढ्यांत जलदी करून तो माहुलीच्या किल्ल्यांत जाऊन पोंचला. माहुलीचा किल्ला मोंगलांच्या तर्फे मंबाजी भोंसले याजकडे होता, तो आठ महिन्यांपूर्वीं मंबाजीनें शहाजीचा पक्ष स्वीकारल्यामुळें शहाजीला मिळाला होता. माहुलीहून शहाजी परत मुरंजनला जाऊन येत असतां खानजमानाच्या सैन्यानें त्याच्याशीं गांठ घातली; यामुळें बरेंच सामान वाटेंत टाकून शहाजीला घाईनें माहुलीस पोंचणें भाग पडलें. त्या वेळीं हें सामान मोंगलांच्या हातीं लागलें व शहाजीच्या सैन्यांतील लोकहि कैद झाले. शेवटीं इतर लोकांना रजा देऊन शहाजीनें लढाऊ सैन्य व कुटुंबांतील मंडळी यांच्यासह माहुलीच्या किल्ल्यांत प्रवेश केला व किल्ला लढविण्याचा विचार ठरविला.

शहाजीच्या हालचालीची बातमी खानजमानाला अर्थातच होती. त्यानें बारा कोसांची मजल एका दिवसांत मारून माहुलीच्या किल्ल्याजवळ आपलें सैन्य आणिलें; आणि तांबडतोब चर खणून सुरुंगांची तयारी चालविली. थोडयाच दिवसांत रणदुल्लाहि आला व वेढयाच्या कामीं मदत करूं लागला. तेव्हां या संयुक्त सैन्यापुढें शहाजीचा टिकाव लागणें कठीण झालें. 'माहुलीचा किल्ला देऊन तुमच्या नोकरींत येतों' असें शहाजीनें बोलणें लाविलें; पण खानजमानानें त्याला कळविलें कीं, "तुम्हांस या वेळीं निभावून जावयाचें असेल तर तुम्ही आदिलशाही नोकरी पत्करली पाहिजे" इत्यादि हकीकत पादशाहनाम्यांत आहे. तिच्यावरून ज्या विजापूरदरबारानें आपणांस तोंडघशीं पाडलें त्या दरबारच्या आश्रयास जाण्यापेक्षां मोगलांची नोकरी पत्करणें बरें अशी शहाजीची विचारसरणी असावी असें म्हणावें लागेल. विजापूरच्या इतिहासांत ही हकीकत दिलेली नसून 'शहाजीनें पराकाष्ठा केली; पण निभाव लागत नाहीं असें त्यास दिसलें, तेव्हां तो तहास कबूल झाला. त्यानें मूर्तिजा निजामशाहास खानजमानाच्या स्वाधीन केलें आणि माहुलीचा किल्ला आदिलशाहाकडे देऊन स्वत: त्याच्या नोकरींत गेला. त्यानंतर खानजमान दौलताबादेकडे व रणदुल्ला विजापुराकडे गेले' असें मोघम म्हटलें आहे.

शिवभारतांत शहाजीच्या या अयशस्वी मोहिमेचें वर्णन फारच त्रोटक आहे. पुढील अनुसंधानाच्या दृष्टीनें यासंबंधींची माहिती दहापांच वाक्यांत सांगितल्यावांचून गत्यंतर नव्हतें म्हणूनच ती नमूद केलेली दिसते. तथापि तेवढयांत शहाजीचरित्राच्या दृष्टीनें पांच सात महत्त्वाचे मुद्दे दिले आहेत ते असे:— ( १ ) दिल्लीपतीशीं सामना देण्यासाठीं शहाजीनें कंबर बांधली तेव्हां घाटगे, कांटे, गायकवाड, कंक, ठोमरे, चव्हाण, मोहिते, महाडीक, खराटे, पांढरे, वाघ, घोरपडे वगैरे एकजात मराठे सरदार मात्र त्याच्या पक्षांत शिल्लक राहिले; मुसलमान सरदार शहाजीकडे कोणी नव्हते, ( २ ) शहाजीला जिंकण्यासाठीं शहाजहानानें आदिलशाहाशीं तह केला, याचा अर्थ हिंदूंविरुद्ध मुसलमानी सत्ताधीशांची जूट झाली, ( ३ ) भीमानदी ही दोघांमधील राज्यांची सरहद्द ठरली, ( ४ ) शहाजीनें तीन वर्षें युद्ध चालविलें, ( ५ ) दिल्लीपतीचा पराजय तुझ्या एकटयाच्या हातून होणार नाहीं असा शहाजीला दृष्टांत झाला, ( ६ ) शहाजीनें आपला मुलूख वगळून निजामशाही राज्यापैकीं कांहीं भाग दिल्लीपतीला व कांहीं आदिलशहाला दिला, आणि ( ७ ) मोंगलांनीं आपल्यावर

हल्ला केल्यास त्यांच्याशीं लढण्याच्या कामीं शहाजी चांगलाच उपयोगी पडेल हें जाणून आदिलशहानें शहाजीला बोलावून पदरीं ठेवून घेतलें.

यावरून शहाजहानाच्या राजकीय व धार्मिक अशा दुहेरी चढाईच्या धोरणास ' शहाजीनें निजामशाहीची नवी उभारणी ' हें जें उत्तर दिलें होतें त्याचा परिणाम काय झाला तें पहाण्याजोगें आहे. दाक्षिणात्यांपैकीं कुतुबशहानें प्रारंभींच पड खाऊन मोंगलांना दोन लाख होन खंडणी कबूल केली. शहाजीनें धार्मिक विचारापेक्षां राजकीय विचारास प्राधान्य देऊन निजामशाही व आदिलशाही एक जुटीनें वागतील तर मोंगलांविरुद्ध त्यांचा निभाव लागेल, एरव्हीं त्यांच्यावर दिल्लीकरांचा वरवंटा फिरल्यावांचून रहात नाहीं असा अंदाज केला होता; आणि त्या अंदाजाप्रमाणें खवासखान अधिकारारूढ होता तोंपर्यंत मोंगलांना दक्षिणेंत आपलें पाऊल पुढें ढकलतां आलें नाहीं. पण मुस्तफाखान प्राधान्यानें धर्मभावनांनीं प्रेरित असा मुत्सद्दी होता. दिल्लीपतीशीं झगडण्यांत कालक्षेप करण्यापेक्षां त्यांना खंडणी देऊन दक्षिणेंतील हिंदु संस्थानें बुडविण्यांत आपली शक्ति खर्च करणें अधिक फायद्याचें व अधिक प्रोत्साहक होईल हा मुस्तफाचा अंदाज होता. महमदशहाचा देखील, राजकारणापेक्षां, धर्मभावनेस प्राधान्य देण्याकडेच अधिक कल होता. यामुळें 'दिल्लींद्राविरुद्ध दाक्षिणात्यांची जूट' या कल्पनेपेक्षां 'मुसलमानांची जूट' ठेवून हिंदु संस्थानिकांवर जिहाद म्हणजे धर्मयुद्ध पुकारण्याची कल्पना त्याला अधिक पसंत पडत चालली. तथापि मुस्तफाचें वजन महमदशहाच्या मनावर अद्याप पूर्णपणें बसलें नव्हतें. रणदुल्लाच्या सल्ल्यानें विजापुरांतील राजकारण या वेळीं तरी चाललें होतें; आणि तो शहाजीची योग्यता जाणत होता. यामुळें त्यानें व शहाजीनें कांहीं अंशीं सिद्धसाधकपणाचा डाव करून मोंगलांनीं यापुढें दक्षिणेंत आदिलशाही राज्यांत ढवळाढवळ करूं नये हें कलम तहनाम्यांत नमूद करून घेतलें व शहाजहानाची दक्षिणेंतील चढाई बंद पाडली. 'निजामशाही या नांवानें मध्यें एक धक्केखाऊ-राज्य अस्तित्वांत असावें ' हें शहाजीचें म्हणणें मान्य झालें नाहीं हें खरें. तरी पण पुणें परगणा शहाजीकडे ठेवण्यांत आला आणि मावळाची व्यवस्था देखील त्याच्याचकडे ठेविली होती. अर्थात् तो मोंगलांच्या ताब्यांत जाऊं न देण्याची जबाबदारी शहाजीकडेच सोंपविलेली असे. शहाजहानानें देखील यानंतर २० वर्षें तरी दक्षिणेंत ढवळाढवळ केली नाहीं; आणि त्यानंतर त्याचा मुलगा औरंगजेब यानें ढवळाढवळ केली तेव्हांहि शहाजीच्या मुलानें त्याला चूप बसाविलें.

ठिकाणीं या दोन भागांत कालनिर्णयाच्या बाबतींत बादशाहनामा व जेधे शकावली यांना मुख्यत्वेंकरून प्रामाण्य दिलें आहे. तथापि कांहीं ठिकाणीं दोहींतील नोंदींत एका वर्षाचा फरक पडतो; त्याचा निर्णय प्रस्तुत पुराव्यांवरून करतां येण्याजोगा नाहीं. अशा वादग्रस्त मुद्यांपैकीं कांहींचें स्वरूप असें आहे:– ( १ ) दुष्काळ श. १५५२ मध्यें पडला असें जे. श. त म्हटलें आहे. बाद. त ही गोष्ट जु. ५ मध्यें नमूद केली आहे व हक्लुयत सोसायटीच्या २ ऱ्या ( मंडीच्या प्रवासवृत्तविषयक ) ग्रंथांत पृ. ३३९ ते ३४९ पर्यंत जीं पत्रें दिलीं आहेत त्यांवरून असें दिसतें कीं इ. १६३० च्या ऑक्टोबरमध्यें ( श. १५५२ आश्विन ) खंबायत व मोंगली राज्य यांत अवर्षणामुळें दुष्काळ पडला. तेव्हांपासून १६३१ च्या एप्रीलपर्यंतच्या पत्रांत ही तक्रार आहे. नंतर १६३१ च्या सप्टेंबरमधील (श. १५५३ अश्विन) पत्रांत अतिवृष्टीनें ओढवलेल्या आपत्तीचें वर्णन आहे. पुढें डिसेंबरमधील व १६३२ च्या प्रारंभींच्या पत्रांत सांथीसारख्या रोगाची व दुर्भिक्षाची प्रखरता वाढून हजारों लोक मेल्याचें वर्णन आहे. यावरून इ. १६३० चा पावसाळा कोरडा गेला, व १६३१ च्या पावसाळ्याअखेर अतिवृष्टी झाली व नंतर सांथी सुरू झाल्या, असा निष्कर्ष निघतो. पैकीं मावळाकडे व पुण्याकडे श. १५५२ मधला दुष्काळ भासला. त्यानंतर अतिवृष्टी झाल्याचा उल्लेख आढळत नाहीं. अर्थात् दुष्काळाची जे. श. तली नोंद बरोबर ठरते. ( २ ) शहाजीनें नवी निजामशाही उभारण्याची नोंद जे. श. त १५५४ मध्यें आहे, व बाद. चा त्याच्याशीं मेळ आहे (इलि. ७-२५). पण सर ज. सरकार यांना हा शक मान्य नाहीं ( Mod. Rev. १९१७ सप्टें. पृ. २५२ ). ( ३ ) महाबतखानानें दौलताबादचा किल्ला घेतला त्याचा शक १५५४ चा ज्येष्ठ असा दिला आहे; व बाद. तील उल्लेखांवरून तो १५५५ चा ज्येष्ठ पाहिजे असें दिसतें. ( ४ ) शहाजहान बऱ्हाणपुराहून आग्र्यास १० जून १६३२ रोजीं पोंचला अशी मंडीनें (पृ.१९४) प्रत्यक्ष पाहिलेल्या गोष्टीची बारकाईची नोंद केली व बाद.तील ७ जिल्हेजशीं या तारखेचा मेळ आहे. त्या अर्थीं या तारखेविषयीं संशयास जागा रहात नाहीं. ( ५ ) विजापूरकर व शहाजहान यांमधील शहाजीविरुद्धचा तहनामा जुलूस ९ मध्यें म्हणजे शं. १५५८ मध्यें बाद. त वर्णिला आहे. व बुसा० मध्यें हि. १०४५ आहे त्याचा अर्थ जवळजवळ तोच आहे. पण बादशाहनाम्यांतच या तहावर आदिलशहानें

सही केल्याची मिती २५ जिल्हेज. सोमवार ( बा. व्हा. १ बी. १७० ) अशी आहे. या वाराचा मेळ हि. १०४५ शीं बसत नसून हि. १०४४ जिल्हेजशीं बसतो. यामुळें हा तह श. १५५७ ज्येष्ठ व. ११ (११-६-१६३५) च्या सुमारास झाला व नंतर लौकरच माहुलीचा वेढा झाला असें म्हणावें लागेल. जेधे शकावलींत श. १५५७ च दिलेल्या आहे. तथापि अत्यंतर पुरावा मिळेपर्यंत ही गोष्ट अनिश्चित समजली पाहिजे.

## प्रकरण ४ थें

# महाराजांच्या बालपणाचा वृत्तांत व शहाजीची कैद

**१. शिवजन्मतिथीचा निर्णयः**—भातवडीच्या युद्धापासून माहुलीच्या वेढ्यापर्यंतचें शहाजीचें बारा वर्षांचें चरित्र मागल्या भागांत सांगितलें, तें बखरीच्या आधारें न लिहितां शिवभारत, जेधे शकावली, बादशाहनामा वगैरे शिवकालीन लेख व बुसातिनेसलातीन ह्या ग्रंथांच्या आधारें लिहिलें. याचें कारण या कालांतील घडामोडींची बखरींतील माहिती अगदीं विपर्यस्त असून तिची संगती लागणें शक्य नाहीं. मलिकंबर, जाधवराव, मुरारजगदेव आणि माहुलीचा वेढा हीं चार नांवें बखरकार घेतात, पण यांचा शहाजी-चरित्राशीं संबंध सांगतांना त्यांनीं जीं वर्णनें दिलीं आहेत त्यांवरून विश्वसनीय माहिती नसतां केवळ कल्पनेच्या भरारीनें ऐतिहासिक लेखन केलें असतां तें किती चुकीचें होऊं शकतें याचा चांगला प्रत्यय येतो. मलिकंबर श. १५४८ मध्यें मरण पावला असून त्याची कारकीर्द बखरकार श. १५४९ पासून पुढें सुरू झाल्याचें सांगतात व पुढें ५।६ वर्षांनीं भीमेनें दुभंग होऊन पावसाळ्यांत त्याच्या सैन्याला वाट दिल्याची अद्भुत कथा वर्णितात. माहुलीचा वेढा श. १५५८ च्या सुमारास झाला असून व त्यापूर्वीं जाधवराव व मुरारपंत वारले असून या वेढ्यांत जाधवरावानें शहाजीचा पाठलाग केला व मुरारपंतानें शहाजीस इमान पाठविलें, इत्यादि वर्णन बखरकार देतात, त्याची संगति लावणें अशक्य आहे. उलटपक्षीं शिवभारत, शकावली व बादशहानामा वगैरेंच्या विधानांतून संगतवार हकीकत समजते व प्रत्यंतर पुराव्यानें त्याची सत्यता ठिकठिकाणीं पटते. त्यांतल्या त्यांत मोंगलांच्या हालचाली बादशहनाम्यांत, विजापूरकरांच्या महमदनाम्यांत आणि शहाजीच्या शिवभारतांत खुलासेवार दिलेल्या असल्यामुळें या तीनहि आधारांच्या मननानें तत्कालीन राजकीय घडामोडींचें स्वरूप व तपशील पडताळून पाहण्यास अडचण रहात नाहीं. आणि अशा पडताळ्यानें या बारा वर्षांतलें शहाजीचें चरित्र निश्चित केल्यानंतर त्याच अवधींत शिवाजीजन्माचा प्रसंग बखरींतला ग्राह्य, कीं शिवभारतांतला ग्राह्य याविषयीं विशेष विवेचन

करण्याचें कारण नाहीं. तथापि बखरींतील मितीचा इतिहास व जेधे मितीचा शोध यांविषयीं संकलित वृत्तांत येथें नमूद करणें अवश्य आहे.

पेशवाईच्या पूर्वार्धांत शिवाजीचरित्रासंबंधीं माहिती मिळविण्याचा प्रयत्न झाल्याचा पुरावा सांपडत नाहीं. पानिपतच्या सुमारास चित्रगुप्तादि बखरकारांच्या लेखनास विशेष चालना मिळाल्याचें व सवाई माधवरावांच्या कारकीर्दीत शिवाजीचरित्राविषयींची जिज्ञासा जागृत झाल्याचें प्रत्यक्ष प्रमाण आढळतें. राजवाडे यांच्या चौथ्या खंडांत छापलेली बखर, ९१ कलमी बखर, शिवापूरकर देशपांडे यांचीं टिपणें ( प्रदीप पृ.७ ) होनप देशपांडे यांच्या दप्तरांतील संशोधनविषयक प्रश्न (प्र.पृ.११०) व कुंडल्यांचा संग्रह इत्यादि या वेळची जी शिवचरित्रपर सामग्री पहावयास मिळते तीवरून १५४८ अगर १५४९ हा शक, क्षय अगर प्रभव संवत्सर, वैशाख शु. २ किंवा ५ ही शिवजन्माची तिथी व त्यास जुळणारी एक कुंडली इतकी माहिती त्या काळीं लोकांनीं लिहून ठेविली असें दिसतें. तथापि त्यांची माहिती फारच ठोकळ स्वरूपाची होती. अफजल, शास्ताखान, मिर्जा राजा, कर्नाटकची स्वारी वगैरे नांवें त्यांनीं घेतलीं आहेत; पण त्या प्रसंगांचे काल देतांना त्यांच्या हातून तपशिला-संबंधीं फार घोंटाळा झाला आहे व अफजलासारख्या महत्त्वाच्या प्रसंगाचा शक त्यांनीं १० वर्षांनीं चुकीचा दिला आहे. 'सिवाजी राजा यास बायका येक कीं दोन होत्या ? राजाराम व संभाजी राजे हे सखे बंधु कीं सावत्र बंधु हें कळलें पाहिजे' हें त्या वेळच्या संशोधकाच्या टिपणांतलें वाक्य (प्रदी. पृ.१११) त्यांच्या माहितीचा स्थूलपणा मापण्यास उपयोगी पडतें. अशा स्थितींत चिटणिसांनीं सप्तप्रकरणात्मक चरित्र लिहिलें व त्यांच्या हातांत आलेल्या टिपणांमधून श. १५४९ वैशाख शु.२ गुरुवार ही तिथिवाराचा मेळ नसणारी शिवजन्माची मिती त्यांनीं नमूद केली. तिच्याविषयीं कै. राजवाडे यांनीं प्रथम इ.स.१८९९ मध्यें विवेचन केलें व गणिताची कसोटी लावून चिटणिसांची मिती बनावट ठरविली व वैशाख शु. ५ ही ग्राह्य धरली. कै. लोकमान्यांनीं केसरींत (२४।४।१९०० ) या प्रश्नाची चर्चा गणिताच्याच कसोटीनें केली व पंचमीहि अग्राह्य ठरविली आणि या दोहींपेक्षां निराळी वैशाख शुद्ध १ (६।४।१६२७) ही तिथी सुचविली. पण याहून महत्त्वाचा असा त्यांनीं दिलेला निर्णय म्हणजे असा कीं शिवाजीमहाराजांची म्हणून जी (जुन्या बाडांतील) कुंडली छापली होती ती 'विश्वसनीय नाहीं; मागाहून कोणींतरी गणितज्योतिष

न जाणणारानें रचली असावी असें दिसतें ' हें कुंडलींतील ग्रहस्थितीचा गणिताच्या प्रमाणानें विचार करून दाखवून दिलें. मिळून जन्मतिथीचा विचार करतांना गणिताची कसोटी लाविली पाहिजे ही गोष्ट राजवाडे व लोकमान्य यांनीं ( इ. १९०० श. १८२२) सालीं सांगितली. त्यानंतर १६ वर्षांनीं भा. इ. सं. मं. च्या चतुर्थ संमेलनप्रसंगीं लोकमान्यांनीं जेधे शकावली लोकांपुढें मांडली. पण या शकावलींतील शिवजन्मतिथीस प्रत्यंतर पुरावा नसल्यामुळें " प्रसिद्ध व अप्रसिद्ध बखरींत या जन्मतिथीबद्दल अत्यंत विसंगतता आहे; सबब या बाबीचा जितका जास्त खल होईल तितका पाहिजेच आहे." असा शेरा मारिला.

असा खल करण्याचा योग यानंतर लौकरच प्रो. सरकार यांच्या मॉडर्न रिव्ह्यूंतील लेखामुळें आला. तारीख-इ-शिवाजी नांवाच्या फारशी बखरीचें भाषांतर करून तिच्या आधारें ' शके १५४९ मध्यें महाराजांचा जन्म झाला,' असें प्रोफेसरांनीं प्रतिपादन केलें होतें. त्यावर टीका करितांना धुळ्याच्या 'इतिहास आणि ऐतिहासिक' या मासिकानें (शके १८४० आषाढचा अंक) या वादास प्रारंभ केला. त्यांत लेखक म्हणतात "शिवाजी महाराजांचा जन्मशक शके १५४९ हा निश्चित असल्याचें प्रोफेसरांनीं आपले लेखांत नमूद केलें आहे. जेधे यांची शकावली नुकतीच प्रसिद्ध झाली असून तीमध्यें छत्रपतींचा जन्मकाल दिला आहे.....तरी या शकावलींत दिलेली मिती विचारांत घेण्यासारखी नाहीं असें ठरेतोंपर्यंत प्रोफेसरांनीं छत्रपतींचा जन्मकाळ शके १५४९ हा निश्चित असल्याचें बेधडक विधान कशाचे आधारावर केलें आहे हें समजत नाहीं. कदाचित्........त्यांना जेध्यांची शकावली ज्ञात नसावी, असें असण्याचा संभव आहे." यानंतर प्रोफेसर सरकार यांनीं इ. १९१९ एप्रीलमध्यें शिवाजीचरित्राची पहिली आवृत्ति छापिली. तिच्यांत बखरकार ६ एप्रिल १६२७ ही मिती देतात, व जे. श. फेब्रु. १६३० देते, असा मोघम उल्लेख करून स्वतःचें मत देण्याचें टाळलें आहे. त्यानंतर एक वर्षानें (१९२० जून ) दुसऱ्या आवृत्तीच्या प्रसंगीं जेधे शकावली चुकली असावी असें टीपेंत म्हटलें आहे, आणि १९२९ च्या दिसेंबरमध्यें काढलेल्या नव्या आवृत्तींत आधार न देतां १० एप्रील १६२७ ( पृ. २० व २२ ) असें मानण्याकडे, " माझा कल आहे " ( I am inclined ) इतकेंच म्हटलें आहे. त्यानंतर नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या शिवाजीचरित्राच्या

बंगाली भाषेंतल्या आवृत्तींत तारीख सोडून मोघम १६२७ हा सन दिला आहे. तिसऱ्या आवृत्तीच्या ४०९ पृष्ठावर महाराजांची जन्मतिथी दरसाल त्यांच्या दरबारीं पाळली जात होती, व त्या नोंदीवरून दत्ताजी वाकनीस व मल्हार रामराव या वंशपरंपरेच्या चिटणिसांनीं आपल्या बखरींत शिवजन्ममिती दिली, असें म्हटलें आहे. परंतु 'महाराजांच्या हयातींत जन्मतिथीचा उत्सव होत असे, या आपल्या म्हणण्यास आधार काय? आणि जर या उत्सवाचे कागद पाहण्यास मिळाले असते तर चिटणिसांनीं द्वितीया व मलकरे यांनीं पंचमी अशा निरनिराळ्या तिथी आणि प्रभव वं क्षय असे निरनिराळे संवत्सर अगर सोमवार व गुरुवार असे निरनिराळे वार कसे दिले असते ?' इत्यादि प्रश्न प्रोफेसरांना खाजगी पत्रांतून व जाहीर रीतीनें वर्तमानपत्रांतून केले असून त्यांचीं उत्तरें ते देऊं शकत नाहींत. अशी ही १५४९ हा शक शिवजन्माचा असें मानणारांची हकीकत आहे.

उलटपक्षीं शिवाजीमहाराजांच्या आज्ञेवरून लिहिण्यांत आलेल्या व विश्वसनीय माहितीनें भरलेल्या शिवभारताचें प्रकाशन रा. सदाशिवराव दिवेकर यांनीं १८४९ मध्यें केल्यापासून जेधेमितीस उत्तम प्रकारचा प्रत्यंतर पुरावा मिळाला आहे. आणि पं. गौरीशंकर ओझा यांच्या संग्रहांतील शिवकालीन लेखकाच्या हातची कुंडली उपलब्ध झाल्यामुळें या बाबतींत संशयास जागा राहिली नाहीं. ग्रंथाची एकंदरींत विश्वसनीयता, जन्मविषयक प्रसंगाची संगतवार हकीकत, गणिताच्या कसोटीस उतरणाऱ्या बिनचूक शब्दांत तपशीलवार जन्मकालाची मांडणी आणि समकालीन स्वतंत्र असा प्रत्यंतर पुरावा अशा चारहि बाजूंनीं भारतांतील मिती निर्दोष ठरत आहे. भारताची प्रत तंजावर येथें सांपडली एवढयाच कारणावरून तिच्याविरुद्ध क्वचित् आक्षेप घेण्यांत आला होता. पण छत्रपतींच्या परंपरागत कुलोपाध्यांच्या संग्रहांत असलेली—व शिवकालीन लेखकांनीं लिहिलेली भारताची जुनी प्रत भा. इ. सं. मं.च्या संग्रहांत आणून ठेवण्याचें श्रेय रा. देवधर व रा. दिनकरपंत काळे यांच्या खटपटीस लाभल्यामुळें किरकोळ आक्षेपासहि वाव राहिलेला नाहीं. बखरींतील यासंबंधींचीं विसंगत विधानें व जेधेमितीची संगती दाखवून देणारें विवेचन पं. गौरीशंकर ओझा यांच्या लेखांत स्वतंत्रपणें आलें असल्यामुळें ( शि. नि. पृ. १३३–४० ) येथें त्याची द्विरुक्ति करण्याचें कारण नाहीं.

**२. बालपण व शिक्षण**—मागें सांगितल्याप्रमाणें श. १५५० च्या प्रारंभीं शहाजी आदिलशाहीचा आश्रय सोडून निजामशाही सरदार बनला. नंतर पुढच्याच वर्षी मोंगलांची निजामशाहीवर मोहीम सुरू होण्याच्या सुमारास जाधवरावहि मोंगलांचा आश्रय सोडून निजामशाहींत आला. अशा वेळीं शहाजीचा वडील मुलगा संभाजी याचें लग्न शिवनेरी येथील एका अधिकाऱ्याच्या मुलीशीं ठरल्यामुळें शहाजी सर्व मंडळीसह शिवनेरी येथें गेला. लग्नाचा समारंभ झाल्यावर शहाजीला दर्याखानावर मोहीम करण्यासाठीं जावयाचें होतें व त्याच वेळीं जिजाबाईचे बाळंतपणाचे दिवस जवळ आले. तेव्हां व्याह्यांच्या सांगण्यावरून शहाजीनें सर्व मंडळी शिवनेरीस ठेविली व आपण मोहिमेवर निघाला. त्यानंतर श. १५५१ फाल्गुन व. ३ ( १९ फेब्रु. इ. १६३० ) शुक्रवारीं सूर्यास्तानंतर सिंह लग्नावर शिवाजी महाराजांचा जन्म झाला. पुढें या मुलाचें सूर्यदर्शन, उपवेशन आणि अन्नप्राशन हे संस्कार यथाविधि व यथाक्रम झाल्यानंतर दर्याखानावरची मोहीम संपवून परत आल्या वेळीं शहाजीनें या मुलाचें मुखावलोकन केलें व तत्कालीन पद्धतीप्रमाणें कांहीं दानें दिलीं.

पुढें निजामशाहींतला जाधवरावाचा खून व त्यानंतर विजापूरकरांच्या सैन्यानें पुणें परगण्यांत केलेली जाळपोळ यांमुळें या दोनहि शाह्यांचा आश्रय सोडून शहाजीनें मोंगलांची मनसब पत्करली. व तो त्यांच्या तर्फे पुनः जुन्नरकडे आला. तेव्हांपासून माहुलीचा वेढा संपेपर्यंत म्हणजे श. १५५८ पर्यंत जिजाबाई व बालशिवाजी यांचें राहणें शिवनेरी व माहुली येथें होतें. मध्यंतरीं दौलताबादचा वेढा चालू असतां त्रिंबकचा निजामशाही सुभेदार महालदारखान यानें मोंगलांची कामगिरी बजावण्याच्या हेतूनें शहाजीची बायको व कुटुंबांतील मंडळी यांना वैजापुरानजीक पकडलें व त्यानंतर सोयऱ्यांच्या मध्यस्थीनें जिजाबाईची सुटका होऊन ती कोंढाण्यास गेली, इत्यादि हकीकत डफनें दिली आहे ( पृ. ९२). आणि शहाजीची मुलगीहि या वेळीं पकडली गेली असें खाफीखान लिहितो. परंतु प्रत्यंतर पुराव्याच्या अभावीं ही हकीकत खरी धरतां येत नाहीं. खाफीखान पेशवाईतला लेखक असून बऱ्याच गप्पा ठिकठिकाणीं नमूद करतो, त्या अर्थी केवळ त्याच्या एकट्याच्या विधानावर विश्वास ठेवितां येत नाहीं; आणि तोच प्रकार डफपुढें असलेल्या कागदांचा आहे. यामुळें जिजाबाईचें व बालशिवाजीचें रहाणें

श. १५५८ पर्यंत शिवनेरीस व माहुलीस होतें हें बादशाहनाम्यांतलें विधान अधिक सयुक्तिक दिसतें.

त्या वेळचीं लहान मुलें मातीचे हत्ती, घोडे व गड घेऊन खेळत.आणि मोराच्या मोहक पिसाऱ्यामागें धावण्यास शिकवून किंवा पोपट, कोकिळा, वाघ यांच्या आवाजाचें अनुकरण करून दाया श्रीमंतांच्या मुलांना रमवीत आणि आंधळी कोशिंबीर, चेंडू व भोंवरा हे खेळ गडावर मुलें खेळत असावीं, इत्यादि कल्पना शिवभारतांतील ( ७ व्या अध्यायांतील ) वर्णनावरून येते. महाराजांच्या जन्मकाळीं ‘आपला हा मुलगा अलौकिक पुरुष होईल ’ असें शहाजीला त्या वेळीं वाटण्याचें कांहीं कारण नव्हतें. पण पुढें मोंगलांची मनसब मिळून त्याचें ऐश्वर्य वाढलें आणि पेमगिरी येथें नवी शाही उभारल्या-पासून तर त्याच्या दारांत प्रत्यक्ष हत्ती झुलूं लागले. गजांत लक्ष्मी या परं-परागत समजुतीप्रमाणें शिवजन्मानंतर हत्ती, घोडे, सैन्य, खजीना वगैरे ऐश्वर्य प्राप्त झालें व मोठमोठे गड ताब्यांत येऊं लागले हें पाहून शिवाजी सुलक्षणी व भाग्यसूचक असल्याचे विचार शहाजीच्या मनांत आले असें भारतकार म्हणतो ( अ. ९–६२ ते ६९ ).

यानंतर सातव्या वर्षी म्हणजे श. १५५७ च्या सुमारास महाराजांच्या शिक्षणास प्रारंभ झाला. इतर समवयस्क मुलांबरोबर त्या वेळच्या पद्धती-प्रमाणें त्यांना पंतोजीनें लिहिणेंवाचणें शिकविलें. हें शिक्षणाचें काम यापुढें १० वर्षें चालू होतें व तेवढयांत भारतभागवतादि पुराणें, व निरनिराळ्या भाषा वगैरेंचा परिचय आणि अश्वविद्या, कुस्ती, दांडपट्टा वगैरे मर्दानी बाण्याचे व्यायाम व रत्नपरीक्षा इत्यादि प्रांथिक व व्यावहारिक चतुरस्रपणा प्राप्त करून देणारें शिक्षण त्यांना मिळालें ( भा. १०-४० ). महाराज निरक्षर होते ही समजूत डफनें केवळ तर्क म्हणून प्रथम मांडली व तीच प्रो. सरकार यांनीं गृहीत धरली असून तिचा ते अद्याप अनुवाद करीत असतात. ( शि. च. ३ आवृ. पृ. ४१५). पण त्यांचा हा केवळ आग्रहाचा भाग दिसतो. शहाजी संस्कृत भाषेंत समस्या घालीत होता ( रा. मा. चंपू ), संभाजीनें रचलेलें बुधभूषण हें काव्य उपलब्ध आहे, आणि भारतकार महाराजांच्या लिपिग्रहणसंस्काराची व पुराणादिकांच्या परिचयाची सविस्तर हकीगत देतो. यांत कदाचित् कवीचें थोडेंबहुत लाघव आहे असें मानलें तरी महाराज जाडे संस्कृत पंडित नव्हते एवढें फार तर म्हणतां येईल; पण

ते मुळींच (un-lettered) निरक्षर असते तर कवीनें ही केलेली त्यांची स्तुति अप्रयोजकपणाची व उपहासास्पद ठरली असती. अर्थात् अशा प्रसंगीं कवीला अनुल्लेखाचा मार्ग मोकळा होता व त्यानें तोच पत्करला असता. तथापि संस्कृत कवींचें लिहिणें (worthless) कवडीकिंमतीचें मानून इंग्रजी वखारवाल्याचें लिहिणें प्रमाण धरण्याची जी पद्धति प्रो. सरकार यांनीं अंगिकारिली आहे ती मान्य केली तरी देखील इंग्रजी व फ्रेंच वखारवाल्यांनीं महाराजांच्या हातची लेखी मखलाशी करारनाम्यावर व पत्रावर झाल्याचें लिहिलें आहे (ले. ८४८, ९३०, १३५१, १६४०, १६४३), त्यांत chop शब्द (ले. ९१७) आला असून त्याचा अर्थ (jaw) किंवा (mouth) असा करून हे हुकूम तोंडी देण्यांत आले असले पाहिजेत असें प्रतिपादन (१९१८ मार्च मॉ. रि.) प्रो. सरकार यांनीं केलें होतें. पण तो अर्थ चुकीचा असून 'chop' म्हणजे छाप किंवा 'शिक्का' ही गोष्ट कै. राजवाडे यांनीं (इति. आणि ऐति. श. १८४० चैत्र) उत्तम रीतीनें दाखवून दिली आहे.

३. शहाजी व रणदुल्ला—शहाजहानाशीं मित्रत्वाचा तह ठरवून शके १५५८ मध्यें महमद आदिलशहानें शहाजीला आपल्या बाजूस वळवून घेतलें; याचें कारण मोंगलांसारख्या जबरदस्त सत्तेशीं झगडण्यांत शक्तीचा व्यय करण्यापेक्षां तुंगभद्रेच्या दक्षिणेस कर्नाटकापासून तंजावरापर्यंत जो अफाट मुलूख किरकोळ हिंदु संस्थानिकांच्या ताब्यांत होता, तो आदिलशाही राज्यांत सामील करणें अधिक फायदेशीर होईल असा त्याचा अंदाज होता. त्यांतून बेदनूर व बसवापट्टण येथील संस्थानें आपसांत चुरशीनें लढण्यांत गुंतलीं असल्यामुळें त्या भांडणाचा फायदा घेऊन दोघांनाहि धुळीस मिळविण्याची संधी आली असल्याची सुवार्ता विजापुरास या सुमारास येऊन थडकली व बसवापट्टणाच्या केंग नायकानें आपला प्रतिपक्षी जो वीरभद्र त्याचा पाडाव करण्यासाठीं विजापूरकरांची मदत मागितली. तेव्हां अशी मदत देण्याच्या मिषानें आदिलशाही सैन्य रणदुल्लाच्या सेनापतित्वाखालीं कर्नाटकाच्या स्वारीवर निघालें त्या स्वारींत शहाजीहि सैन्यासह सामील होता. या सैन्यांत फरादखान, याकुदखान, अंकुशखान, हुसेनी अम्बरखान, मसूदखान, वगैरे मुसलमान सरदार व पवार, घाटगे, इंगळे, गाढे, घोरपडे, इत्यादि मराठे सरदार सामील झालेले

होते ( भा. ९–३४, ३५ ). आणि या मुसलमानी व हिंदु सरदारांनीं कर्नाटकांतील ज्या संस्थानिकांना वश केलें, ते इक्केरी, बसवापट्टण, कावेरीपट्टण, तंजावर, जिंजी, मदुरा, पेनुकोंडा वगैरे ठिकाणचे संस्थानिक विजयानगरच्या नष्टप्राय सम्राटांचा वंशज श्रीरंगराज याचे मांडलीक म्हणविणारे होते. म्हणजे तात्त्विक दृष्ट्या श्रीरंगराज व महमद आदिलशहा यांच्यांत युद्ध सुरू झालें. तेव्हां प्रत्येक बाजूच्या सरदारांनीं आपल्या मालकाशीं निष्ठेनें वागून साम्राज्याचें कल्याण घडवून आणण्यासाठीं आपली आहुती द्यावयास पाहिजे होती असें गृहित धरून अनेक लेखकांनीं यासंबंधीं तात्त्विक विवेचन केलें आहे. आपसांत तंटे वाढवून व ( श्रीरंगाचें नामधारी वर्चस्व देखील अमान्य करण्याच्या ) भलत्या अहमहमिकेच्या भरीस पडून मदुरेच्या त्रिमलनायकानें हिंदु राज्यांचें फारच नुकसान केलें असा मुद्दा या लेखकांनीं उपस्थित केलेला आहे. या युद्धांत श्रीरंगाच्या बाजूची सैन्यसंख्या व जूट आदिलशाही व कुतुबशाही सत्ताधीशांच्या शक्तीच्या मानानें कमजोर ठरली हें निर्विवाद आहे. पण हिंदु राज्यें कां बुडालीं या व्यापक प्रश्नाचा विचार न करतां धर्म किंवा साम्राज्य यांच्या कसोटीनें शहाजीचरित्राकडे पहाणें योग्य आहे किंवा अयोग्य आहे याचीच तेवढी येथें तपासणी करावयाची आहे. समकालीन महमदनाम्यांत शहाजीच्या कर्तबगारीचा गौरवपर उल्लेख न करतां अपयशाचें खापर शहाजीच्या माथीं फोडण्याचें व त्यांच्या राजद्रोही वर्तनाबद्दल मुस्तफानें त्याच्याशीं केलेलें वर्तन तोडीस तोड या न्यायानें शहाणपणाचें होतें असें सुचविलें आहे. महमदनाम्याचा लेखक मुस्तफाचा पक्षपाती व त्याचा मिंधा होता; तेव्हां त्यानें शहाजीच्या कामगिरीचा गौरवपर उल्लेख न करणें व आपल्या धन्याच्या म्हणजे मुस्तफाच्या कामाचें स्वरूप उच्च नीतितत्त्वास धरून होतें असें प्रतिपादन करणें स्वाभाविक आहे. पण शहाजीच्या पराक्रमाचा या ग्रंथांतील अनुल्लेख सर्वस्वीं प्रमाण मानून कर्नाटकच्या स्वारींत शहाजी अव्वल किंवा दुय्यम सरदारांपैकीं नव्हता म्हणजे त्याला महत्त्व नव्हतें; तर "मुसलमानी सेनापतींच्या देखरेखीखालीं व हुकमतीखालीं नोकर या नात्यानें वागणाऱ्या अनेक विजापुरी सेनापतींपैकीं शहाजी हा एक होता" असें प्रो. सरकार* यांनीं ( मॉ. रि.

* Shahaji was not the supreme army chief nor even the commander of an independent division but only one of the many Bijapuri Generals serving under the eyes and orders of the Muslim generalissimo throughout the conquest of Mysore etc.

१९२९ जुलै, पृ. ९ ) प्रतिपादन केलें आहे. तें ग्राह्य धरतां येणार नाहीं. परमानंद हा जसा शिवाजी व शहाजी यांच्या कर्तृत्वाचा गौरवपूर्ण उल्लेख करून रणदुल्लाच्या पराक्रमाचें सविस्तर वर्णन देण्याचें टाळतो तोच न्याय महमदनाम्याचा कर्ता जहूर याच्या लिहिण्यास लाविला पाहिजे. समकालीन लेखकांचें महत्त्व त्या वेळची हकीकत व घडामोडी समजून घेण्याच्या दृष्टीनें मोठें असतें हें खरें. परंतु त्यांचीं मतें अनुकूल अगर प्रतिकूल अशा पूर्वग्रहानें दूषित असतात हें लक्षांत ठेवणें आवश्यक आहे. सारांश, महमदनाम्यांतील हकीकत क्रमानें दिली म्हणजे शहाजीच्या कामगिरीचें यथार्थ व प्रमाणबद्ध वर्णन होऊं शकेल व वाचकांची दिशाभूल होणार नाहीं. ( **The reader may not lose a proper sense of proportion** ) हें प्रो. सरकार यांचें म्हणणें चुकीचें आहे. ऐतिहासिकदृष्ट्या शहाजीच्या कर्तृत्वाचा खरा अंदाज करतां येण्यास केवळ महमदनामा किंवा केवळ शिवभारत जमेस धरून चालणार नाहीं; दोन्ही पक्षांचीं साधनें विचारांत घेऊन अंदाज केला पाहिजे. केवळ फारशी भाषेंतील एकतर्फी मजकूर वाचल्यामुळें शहाजीची महत्त्वाकांक्षा खोडकरपणाची होती व त्यांची कर्तबगारी म्हणजे केवळ धांगडधिंगा होता ( **His mischievous ambitions and disturbing activity; Shivaji, 3rd edi. p. 20** ) हा अभिप्राय समकालीन फारशी इतिहासाच्या वाचनानें भासमान होत असला तरी तो पक्षपातित्वाचा आहे. इतिहासकाराला तो ग्राह्य धरतां येणार नाहीं.

शहाजीनें जन्मभर कोणत्या ना कोणत्या तरी मुसलमानी शाहीची ताबेदारी पत्करली होती. यामुळें या मुसलमानी बादशहाच्या सरदाराला उजळ माथ्यानें हिंदुधर्माच्या रक्षणार्थ धावून जाणें अगर तें ध्येय धरणें शक्य नव्हतें किंवा सोईचें नव्हतें. उलटपक्षीं निजामशाही, मोंगलाई व आदिलशाही अशा अनेक शाह्यांची नोकरी आलटून पालटून पत्करणाऱ्याला राजनिष्ठेचीहि कसोटी लागू पडण्याजोगी नव्हती. त्याचप्रमाणें त्याच्या उद्योगाला 'भाडोत्रीपणाचा' (**mercenary**) हें विशेषणहि लावणें वस्तुस्थितीचें निदर्शक ठरणार नाहीं; कारण त्याची गणना क्षुद्र* ' पोटभरू ' सरदारांत होत

* इब्राहिम आदिलशहानें पादशाही कारभाराचा मदार महाराजाचे ( =शहाजीचे ) सिरी टाकिला, तेव्हां महाराजानें हा विचार केला कीं " पादशाही मदार आपले हातास आला असतां आधीं तो आपले जातीचे मराठे लोक यांना हातीं धरून सरदारकी करून पोटें भरतात. ते पादशाही वजीर करावे. पादशाही कामें यांजकडून करवून इज्जती थोर पावेत तें करावें (ले. १९०१ ).

नसून खुद्द शिवाजीमहाराजांनीं म्हटल्याप्रमाणें वजिरांत म्हणजे आदिलशाही दरबारांतील पहिल्या प्रतीच्या मुत्सद्यांत व लढवय्यांत होत होती किंवा व्हावी अशी त्याची महत्त्वाकांक्षा तरी होती; आणि बाजी घोरपड्यासारख्या मराठे सरदारांनीं देखील 'वजिरी'ची महत्त्वाकांक्षा धरावी असें त्याचें म्हणणें होतें. " आपण रजपूत लोक, अजी तलग पेशजीहि (पूर्वीं) दोहो चौ पादशाहींत खिदमत (=चाकरी) केली. अमा (=परंतु) गैरहिसाबी, जाजती (=अन्यायाचें, भलतें) सोसून कमइज्जतीन व गैरमेहेरबानीन पेशजीहि खिदमत केली नाही. व पुढेंहि न करूं" (ले. ७१०) असें स्पष्टपणें उघड रीतीनें बोलून दाखविण्यासहि तो कचरत नसे. यावरून त्याच्या अंतःकरणांत आपल्या शक्तीविषयीं विश्वास व मानापमानाची चाड वसत होती हें निर्विवाद आहे. तेव्हां शाहाजीच्या आयुष्यक्रमाचें रहस्य समर्पक रीतीनें वर्णन करावयाचें असेल तर त्याचा शिलेदारी बाणा' व 'अपमानाची चीड' हे विशेष लक्षांत घेतले पाहिजेत. शिलेदार व नोकर यांच्या मनोरचनेंत अंतर असे. मुस्तफानें सांगितल्याप्रमाणें "ज्या मालकाचें अन्न नोकर खातो त्या मालकाची सत्ता नोकराच्या जिवावर देखील असते; तेव्हां आप्त, सोयरेधायरे, भाऊ यांची, किंबहुना आईबापांचीहि पर्वा न करतां धन्यासाठीं सर्वस्वाची आहुती देणें हें नोकराचें कर्तव्य आहे" (भा. १–३०) इत्यादि विचारसरणी नोकरपेशांत वाढलेल्या बारगिरांना व सामान्य सरदारांना लागू पडण्याजोगी होती. पण स्वतःच्या पराक्रमानें ज्यानें नवें व स्वतंत्र असें निजामशाही राज्य उभें केलें व बारा हजारांपर्यंत सैन्य हाताखालीं वागविलें, खुद्द शहाजहानासारख्या दिल्लीपतीशीं बरोबरीच्या नात्यानें सामना केला, आणि लाखों रुपयांचा वसूल जमा करून ज्यानें व्यवस्थितपणें प्रत्यक्ष राज्यच चालविलें तो शहाजी रणदुल्लाच्या हाताखालचा सरदार म्हणून कर्नाटकांत गेला असला तरी त्याच्या अंतःकरणांत महमद आदिलशहाविषयीं राजनिष्ठेचा अगर सेवकत्वाचा विचार वसणें शक्य नव्हतें; किंवा रणदुल्लाच्या तरवारीची दहशतहि त्याला वाटणें शक्य नव्हतें. निजामशाहीचा सर्वाधिकारी या नात्यानें वागत असतां शहाजी रणदुल्लाला विजापूरकरांकडून मदतीस आलेला सहकारी म्हणून ओळखीत होता व माहुलीच्या वेढ्यांत प्रतिपक्षी म्हणून त्याच्याशीं त्यानें सामना केला होता, तेव्हां त्या रणदुल्लाला विजापूर दरबारानें 'रुस्तुमजमान' हा किताब देऊन कर्नाटकांत पाठविलें असलें तरी या

किताबामुळें शहाजीच्या मनावर या रुस्तुमाची छाप पडणें शक्य नव्हतें. उलट रणदुल्लाच त्याच्या तंत्रानें वागूं लागला. सारांश, या त्रैवार्षिक बसवापट्टणच्या मोहिमेंत शहाजीच्या पराक्रमाचा व मुत्सद्दीपणाचा उपयोग रणदुल्ला चांगलाच झाला असला पाहिजे. नाहीं तर केंपगौडापासून घेतलेलें बंगळूर शहर शहाजीला 'पारितोषिक' म्हणजे बक्षीस मिळणें व रणदुल्ला परतल्यावर तिकडील व्यवस्था शहाजीच्या स्वाधीन होणें या गोष्टींची संगती लागणार नाहीं. कर्नाटकच्या या स्वारीची हकीकत महमदनाम्याच्या आधारें प्रो. वर्मा यांनीं याच ग्रंथावलींत (शि. वि. इंग्रजी) स्वतंत्र रीतीनें दिली असल्यामुळें येथें त्याची पुनरुक्ती करण्याचें कारण नाहीं. पण शहाजी बंगळुरास राहूं लागल्यानंतर त्यानें पुण्याकडील जहागिरीच्या दृष्टीनें जी व्यवस्था केली तिचें स्वरूप येथें सांगितलें पाहिजे.

**४. बालशिवाजीची बंगळुराहून पुण्यास रवानगी**—शहाजी बंगळुरास राहूं लागला तेव्हां तेथील किल्ला व शहर यांचा देखावा किती मनोहर, ऐश्वर्यसूचक व लष्करी दृष्ट्या कडेकोट बंदोबस्ताचा होता याचें वर्णन परमानंदानें दिलें आहे (भा. ९-४५ ते ५५) तें वाचनीय आहे. त्याचप्रमाणें शहाजीची दिनचर्या सांगतांना मृगया, साधुसेवा, शंकराची पूजाअर्चा, काव्यचर्चा, नाचरंग, आयुधागाराची पाहणी, लष्कराची तपासणी, बागबगीच्यांतून हिंडणें, स्त्रियांशीं शृंगाररसाचा आस्वाद घेणें व योगासनें करणें वगैरे कार्यक्रम परमानंदानें दिला आहे व यानंतरचें जयरामानें केलेलें शहाजीचें वर्णन देखील त्याच्याशीं बरेंच जुळतें असें आहे; त्यावरून शहाजी हा पराक्रमी असला तरी कर्नाटकांत गेल्यापासून सुखलोलुप व चैनी प्रवृत्तीचा बनत चालला असें म्हणण्यास हरकत दिसत नाहीं. अनुकूलता असेल त्या मानानें आपण राजासारखें ऐश्वर्य भोगावें व सढळ हातानें खर्च करून चार मंडळी आपल्या आश्रयास ठेवावी अशी त्याच्या मनाची प्रवृत्ती होत चालली. यामुळें 'एका बाजूस शहाजहान तर दुसऱ्या बाजूस शहाजी' असें वर्णन करण्याचें जयरामास सुचलेलें दिसतें. या उपमेंत अतिशयोक्तीचा भाग असला तरी या दोन समकालीन पुरुषांची तुलना तत्कालीन समाजाच्या ऐश्वर्यविषयक व भाग्यविषयक कल्पना समजून घेण्यास उपयोगी पडण्याजोगी आहे. राज्य मिळवीपर्यंत व निजामशाही बुडवीपर्यंत जशी शहाजहानाची तडफ टिकली व पुढें त्याला चैनीनें ग्रासलें त्याप्रमाणें भातवडीच्या युद्धापासून

शके १५६३मध्यें बंगळूर ताब्यांत येईपर्यंत शहाजीची तडफ टिकली; त्यानंतर त्याची धडाडी कमी पडून तो कर्नाटकांत कांहींसा ऐषआराम करण्याच्या नादीं लागला असें दिसतें. मुसलमान बादशहांना ज्याप्रमाणें राज्याधिकार प्राप्त झाला म्हणजे चैन सुचत असे, प्रजेविषयीं आपलेपणाची भावना नसल्यामुळें केवळ जेतेपणाची भावना मात्र अंतःकरणांत वागत असे, तोच प्रकार शहाजीचा झाला. शहाजी पराक्रमी असला तरी तो मुसलमान बादशहाचा नोकर या नात्यानें कर्नाटकाच्या लोकांना परका वाटणें स्वाभाविक होतें; आणि त्यालाहि आपलें स्थान कायम ठेवण्यासाठीं तेथील हिंदु संस्थानिकांशीं अगर लोकांशीं पूर्णपणें समरस होणें शक्य नव्हतें. यामुळें माहुलीच्या डोंगरी किल्ल्यांत असतांना शहाजीच्या अंतःकरणांत आपलेपणाची भावना जागृत होण्यास जें अनुकूल वातावरण होतें व जें त्याला मोठमोठ्या बादशाही सैन्यांशीं झगडण्यास प्रोत्साहित करीत होतें त्याची जागा चार स्तुतिपाठकांच्या काव्यानें भरून निघण्याजोगी नव्हती. शिवनेरीस असेपर्यंत शहाजीच्या पराक्रमाचें कौतुक करणारे व त्याच्याशीं सहकार्य करणारे व प्रसंगोपात्त त्याला योग्य उपदेश करून राजकीय पुरुषाचें कर्तव्य सांगणारे विचारी पुरुष भेटणें शक्य होतें. पण ही शक्यता तो बंगळुरास राहूं लागल्यापासून नाहींशी झाली व त्याचा क्षात्रधर्मोचित कांटकपणा कमी होऊं लागला. अशा वेळीं बालशिवाजीला जवळ ठेवण्याऐवजीं त्याची रवानगी पुण्याकडे करण्याची बुद्धी शहाजीला सुचली ती शंकराच्या दृष्टांतामुळें सुचली असें शिवभारतांत म्हटलें आहे (अ.१०–१,२), त्याची चिकित्सा करण्याचें कारण नाहीं. त्या काळीं लोकांचा दृष्टांतावर भरंवसा होता व परमानंदाचें हें म्हणणें अशक्य नाहीं एवढें फार तर म्हणतां येईल.

पुण्यास जाण्यापूर्वी बालशिवाजी बंगळुरास होता हें निश्चित आहे, पण तेथें तो किती वर्षे होता याचा निर्णय करण्याचें साधन उपलब्ध नाहीं. दादाजी कोंडदेवानें बालशिवाजी व जिजाबाई यांना बंगळुरास नेलें व तेथून परत आणिलें असें सभासदी बखरीचें म्हणणें आहे. पण त्यावरून बंगळूर येथें बालशिवाजीचें रहाणें किती काळ होतें, म्हणजे महिना दोन महिने होतें कीं वर्ष दोन वर्षे होतें तें समजत नाहीं. श. १५६३ मध्यें शिवाजीला बारावें वर्ष लागलें तेव्हां त्याची रवानगी बंगळुराहून पुण्याकडे झाली. त्यापूर्वी

१५५८-१५६३ पर्यंत ५ वर्षें शिवाजी व जिजाबाई शहाजीबरोबर असण्याचा संभव आहे. संभाजी, तुकाबाई व इतर कुटुंबांतील मंडळी जर त्याच्या बरोबर होती तर त्याला जिजाबाई व शिवाजी यांचीच अडचण वाटण्याचें कारण नाहीं. तेव्हां पुण्याच्या जहागिरीकडे खाशांपैकीं कोणी तरी पाहिजे अशी मागणी दादाजी कोंडदेवानें केल्यावरून शहाजीनें ही योजना केली असावी असें दिसतें.

शहाजीच्या नांवानें पुणें प्रांतांतील इनामदारांना मिळालेलीं पत्रें शके १५६१ ज्येष्ठ (ले. ४५३) व १५६६ चैत्र (ले. ४९३) या मितीचीं सांपडतात व शिवाजीमहाराजांच्या नांवें मोकासा झाल्याचें पहिलें पत्र श. १५६७ मधलें आहे. त्यावरून श. १५५९ व १५६० हीं सालें कर्नाटकच्या मोहिमेंत घालवून शहाजी श. १५६१ मध्यें देशीं आला. त्यानंतर तो पुन: कर्नाटकांत गेल्यावर त्याला तिकडे श. १५६५ पर्यंत रहावें लागलें. या मधल्या अवधींत तो कर्नाटकांत असल्याबद्दल श. १५६४ मधल्या एका पत्राचा प्रत्यंतर पुरावाहि सांपडतो (विल्कस म्हैसूर, व्हा. १). सारांश, श. १५६३ मध्यें शिवाजीची रवानगी बंगळुराहून शहाजीनें केली त्यापूर्वींच त्यानें पुणें परगण्यांतील कर्यात मावळचा पोट-मोकासा शिवाजीच्या नांवें केला होता. त्यानंतर तीन वर्षें इकडील व्यवहार दादाजी कोंडदेवाच्या व इतर मंडळीच्या मदतीनें समजून घेतल्यानंतर शिवाजीच्या नांवानें सरकारी कामकाज करण्याचा प्रश्न उद्भवला. तेव्हां श. १५६६ मध्यें शहाजी देशीं आला होता व श. १५६७ मध्यें शिवाजीची कारकीर्द सुरू झाली. यावरून शिवाजी व शहाजी यांची या दहा वर्षांतील गांठभेठ ठोकळ मानानें अशी मांडतां येईल. श. १५५८ सालीं बापलेक एकत्र देशीं होते; तेथून दोन वर्षें शहाजी कर्नाटकच्या मोहिमेंत गुंतला होता तो श. १५६१ मध्यें देशीं आला. त्या वेळीं कर्नाटकांत जातांना त्यानें जिजाबाई व शिवाजी यांना नेलें होतें. श. १५६३ मध्यें दादाजी बंगळुरास गेल्यावेळीं शिवाजीला व जिजाबाईला पुण्याकडे पाठविण्यांत आलें. तेथून तीन वर्षें शिक्षणांत गेलीं आणि श. १५६६मध्यें शहाजी देशीं आल्यावर शिवाजीचीं एक किंवा दोन लग्नें झालीं आणि नंतर 'प्रतिपचंद्ररेखेव' या शिक्क्याचा व्यवहार शिवाजीच्या नांवें सुरू झाला. लग्नानंतर शिवाजीच्या नांवाचा व्यवहार सुरू झाला असें परमानंदाचें म्हणणें आहे, व राजव्यवहारकोशकारानें देखील

कृतोद्वाहः सोऽयं पितुरथ समादाय शिरसा।
निदेशं भूदेवैः कृतविजयदस्वस्तिवचनः॥
प्रतस्थे दिक्चक्रं यवनगणसंक्रांतमखिलम्।
विजेतुं निःसाणध्वनिबधिरिताशः सहबलैः॥ (प्र.पृ.१४१)

या श्लोकांत हेंच सुचविलें आहे. सारांश, शिवाजी महाराजांच्या बालपणचे उल्लेख करितांना ७, १२, १६, व १८ अशीं वर्षें कर्तबगारीचीं म्हणून आलीं आहेत. त्यांची संगती लावितां येते ती अशी:—

(१) सातव्या वर्षी श. १५५८ मध्यें कर्यात मावळचा मोकासा शिवाजीच्या नांवें करण्यांत आला.

(२) बाराव्या वर्षी श. १५६३ मध्यें बंगळुराहून पुण्यास रवानगी.

(३) सोळाव्या वर्षी श. १५६७ मध्यें प्रतिपच्चंद्राच्या शिक्यानिशीं व्यवहार सुरू.

(४) अठराव्या वर्षी श. १५६९ मध्यें दादाजीच्या मृत्यूनंतर सर्व जहागिरीचा कारभार हातीं घेतला.

**५. शहाजीची कर्नाटकांतील पहिली स्वारी**—बंगळुराहून शिवाजीची रवानगी पुण्याकडे केल्यानंतर शहाजीनें कर्नाटकांत आपला जम बसविला. कावेरीपट्टणचा जगदेव आणि मदुरा व म्हैसूर येथील राजे त्याच्या कह्यांत आले आणि रणदुल्लाच्या पहिल्या मोहिमेंत राज्यभ्रष्ट झालेला वीरभद्र बेदनूरच्या गादीवर पुनः बसला. अशा प्रकारें अनेक हिंदु राजांना शहाजीच्या पाठपुराव्यामुळें धीर वाटूं लागला. पण रणदुल्ला शहाजीची कर्तबगारी ओळखून त्याच्या तंत्रानें वागत असल्यामुळें विजापूरकरांच्या कर्नाटकांतील व्यवहारांत फारसा व्यत्यय आला नाहीं. पुढें रणदुल्ला मरण पावल्यावर खानखानान महमदखान याजकडे कर्नाटकांतील स्वाऱ्यांचें अधिपतित्व देण्यांत आलें, तोहि शहाजीच्या तंत्रानें वागत असे. यामुळें शहाजीचें वजन अधिकच वाढलें. हें ओळखून महमद आदिलशहानें त्याचें प्रस्थ कमी करण्यासाठीं मुस्तफाची रवानगी केली असें भारतकारानें सांगितलें आहे (अ. १-११).

रणदुल्ला कर्नाटकांतील दुसरी मोहीम संपवून परतल्यावर शहाजीहि देशीं पोंचला व त्या सुमारास अफजलानें चहाडी सांगितल्यावरून शहाजीवर राचेवार यांना अंतस्थ मदत केल्याचा आरोप आला; तेव्हां रणदुल्लाचा व

शहाजीचा सामना पंढरपुरानजीक होऊन त्यांत रणदुल्लाचा पराभव झाला ( भा. १५-६ ). हा प्रकार श. १५६५ मध्यें झाला असावा. त्यानंतर लिहिलेल्या ( ७ जमादिलाखर १०५४ हिजरी = श. १५६६ श्रावण शु. ८ = १आगष्ट १६४४ ) एका आदिलशाही फर्मानांत "शहाजी बंडखोर झाला आहे. त्याचा मुतालीक दादाजी, कोंडाण्यानजीक आहे. त्याच्यावर स्वारी करण्यास खंडोजी व बाजी घोरपडे यांना नामजाद केलें आहे." अशा अर्थाचा मजकूर असल्याचें ( रा. स. ग. जोशी यांच्या संग्रहांतील ) एका नकलेवरून दिसतें. नंतर शहाजीची चौकशी होऊन आरोप खोटा ठरल्याचा प्रकार झाला असावा.

आरोपांचा प्रकार असा—अफजल व शहाजी हे चंजीकडील मोहिमेंत गुंतले असतां 'चंदीस राचेवार मराठे होते. त्यांचा व महाराजांचा ( शहाजीचा ) घरोबा आहे; ( त्यांना ) सामान पुरवितात; ऐसी बदगोइ (= खोटी माहिती ) अफझलखान यानीं विजापुरास पादशहास मुस्तफाखानाकडून लिहिली. त्यावरून महाराजास धरून विज्यापुरास बोलाऊन नेलें. पादशाहानीं तहकीकात मनास आणितां तुफानी गोष्ट यैसें जालें. यावरी पादशहानीं महाराजांचा सन्मान केला. सदर बकसीस दिली. सिरपाव दिले. बंगरूळ प्रांत, पांचा लक्ष होनाची जहागीर देऊन, वेगळी मसलत सांगितली.' अशी हकीकत जेधे करीन्यांत आहे ( प्रदी. ४० ). ही कैद कोणत्या वर्षाची हें ठरविणें कठीण आहे. पण रणदुल्ला मेल्यानंतर ही गोष्ट घडली असें करीन्यांत म्हटलें आहे. रणदुल्ला श. १५६५ मध्यें मरण पावला ( ले.४८८ ), आणि श.१५६६ मध्यें शहाजी देशीं आहे ( ले. ४९३ ). त्यापुढें शहाजी कर्नाटकच्या स्वारीवर श. १५६७-८ मध्यें गेला, व दादाजी इकडील व्यवस्था पहात असे, आणि श. १५६८ च्या प्रारंभीं दादाजीनें शिरवळच्या रामाजी विठलास पत्र करून दिलें; नंतर 'महालांत धामधूम झाली व सवेच दादाजीपंत मृत्यू पावले,' असें ( सा. खं.१, पृ. ९५ ) म्हटलें आहे. यावरून दादाजीच्या हयातींत शिरवळ परगण्यांत धामधूम झाली. दादाजी वारला तेव्हां बंदोबस्तासाठीं मिया रहीम महंमद शिरवळास आला तों शिवाजीनें सिंहगड ताब्यांत घेतला. या मियानें श.१५७०श्रावण व.९ रोजीं शिरवळ परगण्यांत दिलेला कौल ( अभयपत्र ) उपलब्ध आहे. सिंहगडचा किल्ला दादाजीच्या मृत्यूनंतर शिवाजीनें ताब्यांत घेतला होता. सारांश,

दादाजीच्या हयातींत व शहाजीच्या संमतीनें पुणें प्रांतांतील व्यवस्था जबरदस्तीनें करण्याचें काम सुरू असून विजापूरच्या मुत्सद्यांना शहाजीला कर्नाटकच्या मोहिमेंत घेणें इष्ट वाटल्यामुळें दादाजी व शहाजी यांच्या हालचालीला दरबाराकडून विरोध झाला नाही असें वरील सर्व प्रकारावरून दिसतें. तथापि अधिक कागद मिळाल्यावांचून याविषयीं निश्चित बोलतां येत नाहीं.

आतां मागें सांगितल्याप्रमाणें शहाजी कर्नाटकच्या स्वारींत गुंतला असतां त्याला शेवटीं कैद व्हावें लागलें. ही कैद म्हणजे शहाजीच्या जिवावरचा प्रसंग होता व याच प्रसंगीं प्रथम शिवाजीचा पराक्रम गाजला; यामुळें ह्या कैदेची हकीकत निश्चित करणें आवश्यक आहे.

या कामीं शिवभारत व महमदनामा हीं अव्वल दर्जाचीं साधनें उपलब्ध असून त्यांतील माहिती कांहीं ठिकाणीं परस्परांस पूरक व कांहीं ठिकाणीं पोषक अशी आहे. शिवाय बु. स. व जेधे शकावली यांतहि याची हकीकत अंशतः आलेली आहे. बु. स. संबंधीं हें लक्षांत ठेवणें अवश्य आहे कीं, त्याला महमदनाम्याचा कांहीं त्रुटित भाग आणि याखेरीज इतर साधनेंहि पाहण्यास मिळालीं होतीं. यामुळें जेथें म. ना. ची नक्कल बु. स. नें केली आहे त्या भागांत महमदनाम्याचेंच प्रामाण्य बलवत्तर धरिलें पाहिजे; नकलेपेक्षां अस्सलाचें प्रामाण्य केव्हांहि बलवत्तर असतें, हा इतिहास-संशोधनांतला नियमच आहे. त्याच न्यायानें तंजावरच्या शिलालेखांतला जो भाग भारतांत आढळतो तेवढ्यापुरतें भारताचेंच प्रामाण्य श्रेष्ठ समजलें पाहिजे; कारण शिलालेखकारानें त्या भागांत भारतांतील लेखाची नक्कल करण्याचा प्रयत्न केला आहे. सारांश, विरोधाच्या जागीं अस्सल नकलेपेक्षां प्रमाण; आणि अस्सलांत नसलेला उल्लेख नकलेंत सांपडला तर त्या उल्लेखाची योग्यता एकंदरींत ऐतिहासिक संगति, व प्रत्यंतर पुरावा पाहून ठरविली पाहिजे. या पद्धतीनें शहाजीच्या कैदेची हकीकत निश्चित करतां येते ती अशी.

६. **मुस्तफाची पहिली मोहीम**—मुस्तफा कर्नाटकच्या स्वारीवर १ जमादिलावल ( श. १५६८ आ. शु.२, ५।६।१६४६ ) रोजीं निघाला. तेव्हां त्याला निरोप देण्यासाठीं स्वतः महमद आदिलशहा इब्राहिमपुरापर्यंत गेला होता. मुस्तफाबरोबर (रुस्तुमजमान रणदुल्लाचा मुलगा), फरहादखान व पीराजंगखान वगैरे सरदार होते. पुढें गदग—लक्ष्मेश्वरपर्यंत गेल्यावर मुस्तफाला रुस्तुमजमानच्या राजद्रोहाची बातमी समजली; आणि त्यानें त्याला

मोठ्या शिताफीनें म्हणजे विशेष रक्तपात होऊं न देतां कैद केलें व त्याची मालमत्ता जप्त केली. पण नंतर लौकरच त्याला माफी देऊन मालमत्ता त्याची त्याला परत देण्यांत आली. तथापि मुस्तफाच्या विरुद्ध पक्षांतला हा रुस्तुमजमान यानंतर फार सावध राहण्यास शिकला. आणि आपणावर बादशहाचा विश्वास नाहीं हें लक्षांत ठेऊन शहाजी व नंतर शिवाजी यांच्याशीं मित्रत्वाच्या नात्यानें वागूं लागला. रणदुल्ला मेल्यानंतर विजापूरदरबारांत धुमसत असलेली दुफळी उघडकीस आली व मुस्तफाच्या पक्षास प्रथम बादशहानें उचलून धरल्यामुळें त्यानें विरुद्ध पक्षाच्या सरदारांना कैद करण्याचें धोरण ठेविलें होतें. त्याप्रमाणें रुस्तुमजमान, मलिक रेहान व शहाजी या तिघांची आहुती त्यानें घेतली. त्यानंतर मुस्तफाखान मरण पावतांच विरुद्ध पक्षानें उचल केल्यामुळें श. १५७१ ते १५७६ पर्यंत शहाजीला अनुकूल असा पक्ष अधिकारावर आला. पुढें खानमहमद मारला गेल्यावर पुनः शहाजीचा विरोधी पक्ष अफजलाच्या नेतृत्वाखालीं अधिकारारूढ झाला. अशी या पक्षभेदाची ठोकळ मानानें हकीकत आहे. सारांश, खवासखान व मुस्तफाखान असे जे दोन पक्ष महमद आदिलशहाच्या कारकीर्दीत प्रारंभीं उद्भवले ते शेवटपर्यंत कायम होते व त्यांपैकीं मुस्तफापक्ष अधिकारावर असला म्हणजे शहाजीवर संकटें आलेलीं आहेत, हें सामान्य सूत्र लक्षांत ठेवण्यास हरकत नाहीं.

रुस्तुमजमानच्या बंडाचें प्रकरण मिटविल्यानंतर श. १५६९ आश्विन शु. १ (२२-९-१६४७) रोजीं मुस्तफाची व आसदखान आणि शहाजीराजे यांची भेट झाली. असाद व शहाजी हे त्या प्रांतांत पूर्वीच गेले होते व त्यांनीं अनुकूल प्रतिकूल संस्थानिकांची माहिती मुस्ताफस सांगितली व मुस्तफानें श्रीरंग ऊर्फ रायल याच्या मुलखावर चालून जाण्याचें ठरविलें. मदुरा, जिंती, तंजावर येथील संस्थानिकांचेहि वकील मुस्तफाकडे आले असून ते रायलविरुद्ध होते. रायलाचा वकील नकय सोमाजी हा मुस्तफास सांगूं लागला कीं 'मी रायलास नेलीपट्टण येथें आणून भेटवितों.' तेव्हां या वकिलास जाऊं देऊं नये व रायलावर एकदम चाल करावी असें मुस्तफाच्या मनांत होतें. पण शहाजीनें भीड घातल्यामुळें वकिलास मुस्तफानें जाऊं दिलें. वकील परत आल्यावर रायलानें तह करण्याऐवजीं युद्ध पुकारलें व तो लाख सैन्यासह किशनदुर्गाहून चालून आला. अर्थात् शहाजीचा अंदाज चुकला. पण त्याबद्दल मुस्तफा शहाजीला कांहीं बोलला नाहीं असें

महमदनामा म्हणतो. यानंतर रायलाचा सेनापती दामलवाड याच्यावर आदिलशाही सैन्यानें निकराचा हल्ला केला; तेव्हां उजव्या बाजूकडील सैन्याचें आधिपत्य आसदखान व शहाजी या दोघांकडे होतें. या युद्धांत रायलाचा पराभव झाला.

या वेलोरच्या विजयानंतर थोडयाच दिवसांनीं मुस्तफा विजापुराकडे परत गेला; तेव्हां जिंकलेले प्रांत सांभाळण्याचें काम आसदखान व शहाजी यांजकडे सोंपविलें होतें. यावरून शहाजीची कर्तबगारी व जबाबदारी उचलण्याची योग्यता मुस्तफालाहि मान्य करावी लागली हें उघड आहे.

**७. शहाजीची कैद**—यानंतर 'गोवळकोंड्याचा मुत्सद्दी मीरजुमला हा दक्षिणेंतील हिंदु संस्थानिकांना चिथवितो व विजापूरकरांविरुद्ध मोठा व्यूह तयार होत आहे' अशी बातमी विजापुरास आली. आणि दिल्लीकरांचा वकील विजापुरांतच होता त्यानेंहि ही बातमी खरी असल्याचें सांगितलें. तेव्हां मुस्तफाची रवानगी माघ शु. ३ (१७।१।१६४८) रोजीं जिंजीच्या कामगिरीसाठीं बादशहानें केली, आणि नंतर रुस्तुमजमान, खानखानान आणि अफजल यांनाहि कर्नाटकाच्या स्वारींत सामील होण्याचा हुकूम सुटला.

मुस्तफाचें सैन्य जिंजीस जाऊन पोंचल्यावर वेढयाचें काम सुरू झालें. पण किल्ला लौकर ताब्यांत येण्याचें लक्षण दिसेना. अशा वेळीं "लबाड शहाजीनें मुस्तफास निरोप पाठविला कीं 'माझ्या सैन्यास विसाव्याची जरूर आहे, यासाठीं मला माझ्या मुलखाकडे सैन्यासह जाण्याची परवानगी मिळावी.' मुस्तफानें कळविलें कीं, 'तुम्ही या वेळीं येथून जाल तर वेढयाच्या कामांत व्यत्यय येईल, यासाठीं जाऊं नका.' शेवटीं शहाजीनें पुनः निरोप पाठविला कीं, 'धान्याची फार महागाई झाल्यामुळें आमच्या शिपायांची उपासमार होत आहे; त्यांना यापुढें दम निघत नाहीं. यासाठीं [तुमच्या] परवानगीची वाट पहात न बसतां मला जावें लागेल.' या उत्तरानें मुस्तफाची खात्री झाली कीं शहाजीच्या मनांत दांडगाई करण्याचा विचार आहे; तेव्हां त्यानें शहाजीला इतक्या चातुर्यानें व व्यवस्थित रीतीनें पकडलें कीं, शहाजीच्या मालमत्तेची यत्किंचित् लुटालूट न होतां ती मुस्तफाला सर्वच्या सर्व जप्त करतां आली." अशी हकीकत महमदनाम्यांत आहे. ती अर्थातच मुस्तफाच्या हस्तकानें लिहिली असून सर्व दोष शहाजीकडे आणि राजनिष्ठा व चातुर्य मुस्तफाकडे अशी त्यानें वाटणी केली यांत आश्चर्य नाहीं. उलटपक्षीं मुस्तफानें जें चातुर्य दाखविल्याचें यांत मोघम वर्णन केलें आहे त्याचा खुलासा

भारतकारानें केला असून 'मुस्तफानें कुराणावर हात ठेऊन आपला मुलगा आतषखान याच्या नांवानें शपथ वाहिली होती' इत्यादि माहिती दिली आहे (भा. १२-११४); तिचा हेतु मुस्तफानें विश्वासघातानें शहाजीला पकडलें असें म्हणण्याचा आहे; तथापि या कृत्यामुळें मुस्तफानें आपल्या धन्याची कामगिरी बजावली व तो कृतकार्य झाला आणि शहाजी मुस्तफाच्या कपटास बळी पडला म्हणजे सावधानतेंत कमी ठरला याबद्दल भारतकारानें शहाजीला पर्यायानें दोषच दिला आहे. यावरून राजकारणांत सावधानपणाचें महत्त्व फार आहे हें समर्थांचें तत्त्व भारतकाराला मान्य आहे असें दिसतें.

सेनापतीचा हुकूम अमान्य केल्यामुळें शहाजीला कैद करणें भाग पडलें असें महमदनाम्यांत मोघम म्हटलें आहे. पण शहाजीला कोणत्या स्थितींत मुस्तफानें पकडलें याचा तपशील त्यांत दिलेला नाहीं. तो बु. स. मध्यें कांहीं आहे व शिवभारतांत सविस्तर आहे. शहाजीस कैद करण्याचें ठरविल्यावर मुस्तफानें आपल्या सैन्याचा तळ शहाजीच्या सैन्यानजीकच देण्याचा उपक्रम केला. तेव्हां शहाजीच्या मनांत संशय येऊन तो सावधपणें वागूं लागला. परंतु मुस्तफानें गोडीगुलाबीनें वर्तन ठेवून, हरएक कामांत शहाजीची सल्लामसलत घेण्याचा परिपाठ स्वीकारून व अनेक प्रकारें त्याला विश्वास दाखवून आपण स्नेही आहों असें भासविलें. यामुळें शहाजीचा सावधपणा कमी पडूं लागला. हें पाहून मुस्तफानें एके दिवशीं रात्रीं आपल्या हाताखालच्या सरदारांना बोलावून त्यांना पहाटें शहाजीच्या सैन्याभोंवतीं गराडा देण्याविषयीं व शहाजी जागा होण्यापूर्वीं त्याला गांठून कैद करण्याविषयीं बजावून सांगितलें. मुस्तफानें मध्यरात्रीं केलेल्या या खलबताची बातमी कोणी हेरानें शहाजीला सांगितली; तरी देखील शहाजीनें बंदोबस्त करण्याचें मनावर घेतलें नाहीं. याचा अर्थ हें खलबत आपल्या विरुद्ध असेल असें शहाजीला वाटलें नाहीं असा होतो.

मुस्तफाच्या संकेताप्रमाणें दिलावर, मसूद, याकूत, अंबर, फराद, खैरत, अजम, बहलोल, रेहान वगैरे खान व राघो मंबाजी, वेदाजी भास्कर, बाळाजी हैबत हे ब्राह्मण आणि सिधोजी पवार, मंबाजी पवार व मंबाजी भोसले हे मराठे सरदार पहाटेच्या वेळीं शहाजीच्या शिबिराभोंवतीं वेढा देण्यास गेले. तेव्हां शहाजीच्या लोकांना अर्थातच याची कांहींच कल्पना नव्हती, अगर त्याची युद्धाची तयारीहि नव्हती. रात्रींच्या जागरणामुळें लोक

झोपेंत होते व त्यांना आपल्यावर हल्ला आला हें कळतांच त्यांची धांदल उडाली. अशा धांदलींत त्यांच्यावर मुस्तफानें आपल्या आघाडीवरील लोकांना जलदीनें चालून जाण्याचा हुकूम सोडला. तेव्हां खंडोजी, अंबाजी व मानाजी हे बंधु व बाजी घोरपडे, यशवंतराव वाडवे, मालोजी पवार, तुळोजी राजे भोसले हे मराठे सरदार शहाजीच्या सैन्यांत घुसून त्यांनीं मोठा गोंधळ उडवून दिला. शहाजी जागा होऊन आपल्या सैनिकांना तयार होण्याविषयीं सांगूं लागला. पण शत्रुसैन्यानें त्यांना अवसर दिला नाहीं. फक्त खंडोजी पाटील यानें मात्र बाजी घोरपड्याशीं कांहीं वेळ युद्ध केलें; परंतु शत्रुपक्षाकडील सर्व सरदारांचा मारा एकट्यावर झाल्यामुळें खंडोजीचा टिकाव लागला नाहीं व तो ठार झाला. इतक्यांत दसोजी गवळी, योगाजी भांडकर, संताजी गुंजावटकर, मेघाजी ठाकूर वगैरे शहाजीच्या सैनिकांनीं कांहीं वेळ मारामारी केली; पण पुढें त्यांनाहि हार खावी लागली. शेवटीं शहाजीनें स्वतः कांहीं वेळ बाजी घोरपड्याशीं युद्ध केलें आणि तो थकून जमिनीवर पडला. तेव्हां स्वतः बाजी घोरपड्यानें त्याला कैद करून मुस्ताफाकडे नेलें ( भा. अ. १२ ). अर्थातच शहाजीच्या सैन्यांतील लोकांची दाणादाण उडून ते वाट फुटेल तिकडे पळून गेले, आणि त्याच्या तळावरचा सर्व माल मुस्तफाला विशेष श्रम न पडतां ताब्यांत घेतां आला.

शहाजीला कैद केल्यानंतर मुस्ताफानें जिंजीचें काम पुढें चालविलें व बादशहाकडे सर्व हकीकत कळविली. तेव्हां त्यानें खान महमद व अफजलखान यांना जिंजीस जाऊन शहाजीस विजापुरास घेऊन येण्याचा हुकूम सोडला. त्याप्रमाणें हे दोघे खान जिंजीस गेले. तेव्हां मुस्तफा मरणोन्मुख होता. त्यानें शहाजीला बंदोबस्तानें विजापुरास नेण्याविषयीं व वेढ्याचें काम दक्षतेनें चालविण्याविषयीं सर्वांना कळवळ्यानें सांगून प्राण सोडला. पुढें जिंजीचा वेढा नेटानें शेवटपर्यंत चालवून तो ताब्यांत घेण्याचें काम मुस्तफाच्या मृत्यूनंतर इतर सेनापतींच्या हातून घडलें. तेव्हां तेथें सांपडलेला मोठा खजीना व ८० हत्ती वगैरे माल विजापुरास पोंचविण्याचें काम आदिलशाही सेनापती खानमहंमद यानें अफजलखान याजकडे सोंपविलें; आणि त्याबरोबरच शहाजीस कैदी या नात्यानें जिंजीहून विजापूरपर्यंत बंदोबस्तानें नेण्याची कामगिरीहि सांगितली. या वेळीं शहाजीच्या पायांत बिडया घातल्या होत्या असें महमदनामा म्हणतो. अफजल व शहाजी यांच्यांत

यापुढें कायमचें वैमनस्य आलें व परस्परांच्या मनांत कायमची आढी बसली हें इतिहासांत नमूद आहे. त्याचें मूळ अफजलखानानें शहाजीविरुद्ध केलेली चहाडी व कैदी या नात्यानें शहाजीशीं त्यानें केलेली अपमानास्पद वर्तणूक या दोन घडामोडींत सापडण्याजोगें आहे असें दिसतें. शहाजी मानधन असल्यामुळें त्याच्या मनाला हा प्रसंग झोंबला व या कैदेच्या प्रसंगीं प्रमुखपणें वावरणाऱ्या बाजी घोरपडयाचा व अफजलखानाचा सूड पुढें शिवाजीनें अत्यंत कडक रीतीनें घेतला. हा योगायोग केवळ यदृच्छेनें घडला कीं, हेतुपुरःसर घडविला हें आपणांस निश्चितपणें ठरवितां येण्याजोगें साधन आज उपलब्ध नाहीं. तथापि अफजल शहाजीला कैदी या नात्यानें घेऊन पौषांत निघाला आणि विजापुरास चैत्रांत पोंचला; म्हणजे त्याला तेथें येऊन पोंचण्यास अंदाजें तीन महिने लागले. त्या अवधींत पुरंदर व सिंहगड या भागांत मोठी खळबळ उडून गेली व महमद आदिलशहाला एक नवाच अनुभव आला, त्याची हकीकत सांगितली पाहिजे.

शहाजीला कैद केल्यावर व त्याची मालमत्ता जप्त केल्यावर त्याच्या तर्फे काम करणाऱ्या त्याच्या हस्तकांनाहि कैद करणें त्या काळच्या पद्धती-प्रमाणें आवश्यक होतें. पण शहाजीचे हस्तक म्हणजे त्याचे मुलगे हे अत्यंत जागरूक व धडाडीचे असल्यामुळें विजापूरदरबारचा डाव आंगलट आला. बापाच्या कैदेची बातमी ऐकतांच संभाजी व शिवाजी यांना संताप येणें स्वाभाविक होतें; पण संतापानें डोकें भणाणूं न देतां त्यांनीं कसून युद्धाची तयारी केली व संभाजीनें बंगळूर येथें व शिवाजीनें पुरंदर व सिंहगड येथें आपल्यावर चालून येणाऱ्या आदिलशाही सैन्याशीं तोंड देण्याची तयारी केली. त्यामुळें मुस्तफाच्या हुकुमानें संभाजीवर फरादखान व महमदशहाच्या आज्ञेनें शिवाजीवर फत्तेखान हे जेव्हां सैन्यासह चाल करून गेले, तेव्हां दोनहि ठिकाणीं त्यांना माघार घ्यावी लागली. शहाजीला कैद करण्याच्या कामांत ज्याप्रमाणें मुस्तफाखान हा पाठीमागें व मराठे आणि ब्राम्हण सरदार प्रत्यक्ष मारामारीच्या जागीं आघाडीला पुढें होते, आणि शहाजीला कैद करण्याचें काम बाजी घोरपड्यानें करून देखील नांवलौकिकाला मुस्तफाखान हाच धनी झाला, तोच प्रकार संभाजी व शिवाजी यांच्यावरील मोहिमेंत झालेला दिसतो. बंगरूळ घेण्याच्या इच्छेनें मुस्तफानें जेव्हां फरादखानास

रवाना केलें तेव्हां त्याच्याबरोबर डुरे वंशांतला तानाजी राजे व विठ्ठल गोपाळ नांवाचा ब्राम्हण सरदार हे पाठविण्यांत आले होते. त्याचप्रमाणें शिवाजीवर रवाना झालेल्या सैन्यांत दोन फत्तेखान व मिनाद आणि रतन हे दोघे शेख व अशरफशहा हे पांच यवन सरदार असले तरी मताजी घाटगे, बाजी नाईक फलटणकर वगैरे सरदारांच्या हाताखालीं शेंकडों हिंदु लोक या मारामारींत काम करण्यास उत्सुक होते. यावरून नोकरी करितांना ती कोणत्या धन्याची करावी व धन्याचा हेतु अगर त्याच्या हुकुमाप्रमाणें वागण्यांत होणारे बरेवाईट परिणाम कसे पारखावे याविषयींचा विधिनिषेध त्या काळच्या आदिलशाही राज्यांतील हिंदु सरदारांच्या मनांत उद्भवलेला दिसत नाहीं. प्रमुख मुसलमान सरदार ज्याप्रमाणें बाप, भाऊ, स्नेही, सोबती इत्यादि कोणताहि विचार मनांत व आणतां, तरवारीशीं गांठ घालून वरची पायरी गांठण्यास केव्हांहि कचरत नसत त्याचप्रमाणें 'शिष्टांचा कित्ता कनिष्ठांनीं गिरवावा' या न्यायानें त्यांच्या हाताखालचे हिंदु सरदारहि एकमेकांशीं तसेच वागत. याचाच अर्थ त्यांना मानापमानाची चाड नसून वैयक्तिक स्वार्थसाधनाची अनावर तृष्णा होती. समाज अगर धर्म यांची आस्था धरणारे विचारी पुरुष त्या वेळीं हिंदुसमाजांत वावरत नव्हते असें नाहीं; पण त्यांचा उपदेश राजकारणांत जमेस धरून आपलें निभेल असा आत्मविश्वास या आदिलशाही नोकरींतल्या हिंदु सरदारांच्या ठिकाणीं वसत असल्याचें दिसत नाहीं. शहाजी देखील आदिलशाही नोकरच होता. पण त्याला मानापमानाची चाड होती व कांहीं काळ तरी त्यानें अत्यंत उच्च जबाबदारीच्या वातावरणांत घालविला होता. तथापि ज्यांच्या अंतःकरणांत कोणत्याहि कारणानें परकेपणाची व श्रेष्ठत्वाची भावना वसत आहे, अशा बादशहाची शिलेदारी अगर सरदारी आणि स्वाभिमान यांचा मेळ घालतां येईल असें त्यास वाटत होतें. हीच त्याची चूक व

**यथा ह्याकाशखननं यथा सलिलताडनम् ।**
**तथा परिश्रमायैव भवेदसदुपासनम्॥** भा. १३-३०

या नियमानें शहाजी पराक्रमी असून देखील त्याचें सर्व आयुष्य वायां गेलें, असे उद्गार शिवाजीमहाराजांनीं काढल्याचें भारतांत म्हटलें आहे.

**न विश्वसेदविश्वस्ते विश्वस्तेऽपि न विश्वसेत्**
**विश्वासाद्भयमुत्पन्नं मूलान्यपि निकृंतति ॥** भा. १३-१८

या व्यासवचनास अनुसरून भलत्या ठिकाणीं विश्वास ठेवण्याची चूक राजकरणी पुरुषानें करितां कामा नये हें तत्त्व शिवाजीमहाराजांनीं या वेळेपासून ओळखलें होतें असें परमानंदानें सुचविलें आहे. तें शिवकालीन स्थितीचें एक महत्त्वाचें अंग म्हणून ध्यानांत घेण्याजोगें आहे.

८. **शिवाजीचा पहिला पराक्रम**—फत्तेखान शिवाजी महाराजांच्या मुलखावर चालून आला तेव्हां त्यानें प्रथम एका बाळाजी हैबतराव या नांवाच्या सरदारास पुढें रवाना केलें व त्यानें शिरवळपर्यंतचा पल्ला गांठला. ही बातमी ऐकतांच महाराजांनीं आपल्या जवळच्या युद्धार्थ सज्ज होऊन राहिलेल्या वीरांना उद्देशून एक लहानसेंच पण प्रोत्साहनपर भाषण केलें. " मी पुरंदरावर व वडील बंधु ( संभाजी ) बंगळूर येथें युद्ध करून वडिलांस मुक्त करूं. महमदशाहाच्या सैन्याचा पराभव झाला म्हणजे तो वडिलांना आपोआप सोडील, आणि न सोडील किंवा त्यांना अपाय करील तर आम्ही त्याचें प्रायश्चित्त भोगण्याची पाळी महमदशाहावर आणल्यावांचून राहणार नाहीं. जावली येथें चंद्रराजाची स्थापना होण्यास मीं मदत केली आहे व फलटणच्या राजाचा पराभव करून पकडून सोडून दिलें, तेव्हां घोरपडे व फत्तेखान यांचा पराभव करण्यास मला मुळींच जड जाणार नाहीं. तुम्हीं मात्र आज शिरवळास जाऊन तेथें तळ दिलेल्या बल्लाळास हांकून द्या आणि शिरवळ ताब्यांत घ्या. म्हणजे उद्यां किंवा परवां आमची व फत्तेखानाची गांठ पडेल. त्याच्याशीं आम्ही झुंज घेऊं. " महाराजांच्या आज्ञेप्रमाणें गोदाजी जगताप, भिमाजी वाघ, संभाजी काटे, शिवाजी इंगळे, भिकाजी चोर वगैरे मराठे सरदार कावजीच्या आधिपत्याखालीं आवशीं गडावरून खालीं उतरले; आणि रात्रीं पायथ्याशीं राहून पहांटे कामगिरीवर निघाले. थोड्याच वेळांत हे घोडेस्वार शिरवळास पोंचले. तेव्हां आदिलशाही तुकडीचा सेनापती बाळाजी हैबतराव यानें आपल्या सैनिकांना कसून लढण्याविषयीं सांगून शिरवळच्या कोटांत जाऊन बसण्याचा हुकूम सोडला. त्याप्रमाणें तटाचा आश्रय करून आदिलशाही सैन्य आंत जाऊन बसलें. खरें पाहतां शत्रुपक्षाचें सैन्य चालून आलेलें पोहताच या लोकांना त्यांच्याशीं दोन हात करण्याची ईर्षा वाटावयास पाहिजे होती; पण त्याऐवजीं ते कोटाच्या आश्रयास जाऊन बसले. यावरून त्यांच्या कचदिलपणाची व त्यांच्यावर बेधडक चालून जाणाऱ्या मराठी सैन्यांतील वीरवृत्तीची मीमांसा

त्या काळच्या भावना समजून घेण्याच्या दृष्टीनें होणें आवश्यक आहे. त्या काळीं पराक्रमाचा व कर्तबगारीचा मुख्य विषय म्हणजे युद्धांत जय मिळविणें हा होता. त्यामुळें ' बायका, पोरें व प्रसंगीं प्राणहि खर्चीं घालावे लागले तरी चालेल पण युद्धांत यश मिळविण्यासाठीं झटणें हें आपलें कर्तव्य आहे ' असें बाळाजी हैबतराव तोंडानें सांगत असला तरी मागें पाय घेत होता; आणि कावजीचें सैन्य मात्र जिवाची तमा न धरितां सारखें पुढें जात होतें. याचें कारण हैबतराव व त्याचा धनी यांच्यांत परकेपणाचें नातें होतें आणि कावजी व त्यांचा धनी शिवाजी यांच्यांत आपलेपणाची समरसता वसत होती. सर्व नामांकित सेनापतींच्या ठिकाणीं आपल्या सैनिकांच्या अंतःकरणांत तेज व वीर्य यांनीं भारून टाकण्याची एक विलक्षण अशी आकर्षक शक्ति वसत असते, असें अनेक चरित्रकारांनीं वर्णन केलें आहे. तीच मीमांसा या ठिकाणीं घेतली पाहिजे. नाहीं तर बाळाजीला दोन हात होते आणि कावजीला चार होते अशांतला काहींच प्रकार नव्हता. फरक होता तो त्यांच्या धन्यांच्या अंतःकरणांत होता; आणि याच फरकानें त्यांच्या वर्तनांत एवढें अंतर पडूं लागलें.

बाळाजीचें सैन्य तटाच्या आश्रयास जाऊन राहिलेलें पाहतांच कावजीला त्याच्यावर मात करण्याची तोड सहज सुचली. कावजी शिरवळ मुलखांतला पूर्ण माहितगार. तेथील कोटाला बुरुज नाहींत व तटाची भिंत पक्की नसून मातीची आहे ही बारकाई त्याच्या लक्षांत होती. त्यामुळें गढींत शिरलेल्या शत्रुसैन्यास वेढून व खंदक बुजवून किंवा ओलांडून तटाची भिंत खणून पाडण्याचा त्यानें आपल्या शिपायांना हुकूम सोडला. ' हा किल्ला म्हणजे थोडीच लंका लागली आहे; या प्रसंगीं आम्ही कचरण्याचें कांहीं कारण नाहीं. ' असें म्हणत कावजीनें पुढाकार घेतला व वीरश्रीचें स्फुरण चढलेले शिपाई त्याच्या पावलांवर पाऊल ठेवीत थेट तटापर्यंत जाऊन पोंचले आणि तटावरून डोकावणाऱ्या लोकांचीं डोकीं उडवूं लागले. यामुळें आंतले लोक कोंडींत सांपडल्यासारखे झाले. शेवटीं कावजीच्या लोकांनीं लोखंडी सोव्यानें तटाची भिंत पाडून, कुदळींनीं खणून व कांहीं ठिकाणीं शिड्या लावून तटांत प्रवेश केला व आंतील लोकांशीं गांठ घातली; आणि हात-घाईची मारामारी करून सेनापती बाळाजी हैबतराव यास ठार केलें. इतकें होईतोंवर रात्र झाली. तरी युद्धाचा खणखणाट सुरूच होता. पण सेनापती

पडल्यावर आदिलशाही सैन्याचा धीर सुटला व तें शरण आलें. यानंतर हत्ती, घोडे, मोलवान वस्त्रप्रावरणें, पालख्या, शस्त्रें वगैरे लूट ताब्यांत घेऊन कावजी आनंदानें पुरंदरावर जाऊन महाराजांस भेटला. अशी ही मराठ्यांच्या अगदीं पहिल्या युद्धाची स्फूर्तिदायक हकीकत शिवभारतांत दिलेली आहे. ती वाचकांनीं मुळांतच वाचून पहावी. म्हणजे एका महत्त्वाच्या ऐतिहासिक प्रसंगाचे चित्र मना पुढें उभें रहाण्यास अडचण पडणार नाहीं.

**९. पुरंदरचें युद्ध**—हैबतरावाचा पराभव झाल्याची बातमी समजतांच शिवाजीमहाराजांनीं पूर्वी अंदाज केल्याप्रमाणें फत्तेखान सैन्यानिशीं पुरंदरावर चाल करण्याच्या इराद्यानें गडाच्या पायथ्याशीं येऊन पोंचला. त्याबरोबर गडावर रणशिंग फुंकण्यांत येऊन मराठ्यांचें सैन्य लढण्याच्या तयारीनें बाहेर पडलें. हें आव्हान स्वीकारून फत्तेखानहि तावडतोब सैन्यानिशीं गड चढूं लागला. तेव्हां आदिलशाही सैन्यास चढणीच्या वाटेनें चालावें लागलें. तेव्हां पिछाडीस फत्तेखान, आघाडीस मुसेखान, डाव्या बाजूस फलटणचा राजा आणि उजव्या बाजूस घाटगे अशी सैन्याची मांडणी होऊन चढाईस प्रारंभ झाला. वरील लोकांनीं प्रारंभीं बंदुकींतून गोळ्या व गोफणींतून दगड वगैरेंचा वर्षाव करून आणि वरून मोठमोठ्या शिला ढकलून चाल करून येणाऱ्या सैन्याची रचना विस्कटून टाकली; आणि त्यांतून कसेबसे थकून भागून गडाच्या वरच्या भागापर्यंत पोंचूं पाहणाऱ्या लोकांचा समाचार घेण्यास मराठ्यांचे पायिक सज्ज असल्यामुळें तेथेंहि त्यांचा टिकाव लागला नाहीं. यामुळें आदिलशाही सैन्यांतले बरेच लोक प्राणास मुकले किंवा पळत सुटले. त्यांना थोपवून धरण्याचा प्रयत्न फत्तेखान व अशरफखान वगैरेंनीं केला; व एक दोन वेळां फेरहल्ला चढविण्याचा प्रयत्न झाला. पण मराठ्यांच्या सैनिकांत विलक्षण वीरश्री चढली होती. त्यांनीं बेधडक हातघाई केली आणि मुसेखानास ठार केलें. तेव्हां घाटगे, शेख आणि अखेरीस फत्तेखान यांनींहि पळ काढला व मराठ्यांचा जय झाला.

**१०. शहाजीची सुटका**—या सुमारास शहाजीला कैदी या नात्यानें घेऊन अफजल विजापुरास येऊन पोंचला. तेव्हां बादशहानें त्याची भेट नौरोजचा समारंभ चालू असतां (मेषसंक्रमणाच्या तारखेस) कल्याण महालांत घेतली. अफजलानें मोठ्या बंदोबस्तानें आणलेल्या शहाजीला साध्या अटकेंत (जिंदाने इब्रत मध्यें) पाठविण्यांत आले. हें पाहून बादशहाच्या या उदार वर्तनानें लोक

आश्चर्यचकित झाले; आणि आपसांत बोलूं लागले कीं 'शहाजीला ठारच मारणें योग्य; त्याला नुसत्या अटकेंत ठेवणें योग्य नाहीं. पण आतां त्याला नुसत्या अटकेंत ठेवण्याचा हुकूम सुटला आहे. यावरून त्याला जीवदान मिळून तो मुक्त होईल असा अंदाज दिसतो.' शहाजी मुक्त व्हावा असें कित्येक सल्लागारांना मुळींच वाटत नव्हतें, कारण त्या लबाड माणसाला मोकळें सोडण्यांत आलें कीं तो पुन: कोल्ह्याप्रमाणें कांहींतरी लबाडी केल्यावांचून राहणार नाहीं. आणखी पुष्कळांचें असें मत होतें कीं, मुद्दाम उघड्या डोळ्यांनीं या हतभाग्य हरामखोराला मोकळीक देणें म्हणजे सापाची शेपटी तुडविणें, किंवा आपल्या हातानें विंचवाची नांगी सरळ करूं पाहणें अगर साळिंद्राला मातीचा ढीग समजणें यासारखें आत्मघातकीपणाचें आहे. आपलें डोकें, भुणभुणणाऱ्या गांधिलमाशीच्या पोळ्यावर टेकून निजण्याचा प्रकार कोणाहि शहाण्या मनुष्यानें करूं नये.

पण बादशाहा पडला मोठा उदार; अती मोठे अपराध देखील माफ करण्यास तो तयार होता. त्यानें सरनोबत अहमदखान याच्या हवाल्यांत शहाजीला देऊन असें सांगितलें कीं, "शहाजी जर कोंढाणा, बंगलूर व कंदर्पी हे किल्ले बादशहास देण्यास तयार असेल तर त्याला कैदेंतून सोडावें." अहमदखानानें बादशहाच्या हुकुमाप्रमाणें शहाजीला आपल्या घरीं कैदी ह्मणून नेलें आणि ही आनंदाची वार्ता सांगून त्याच्या मनास स्वस्थता येण्यासाठीं फार खटपट केली. शहाजीनेंहि बादशाही हुकूम मानण्याचें ठरविलें आणि आपल्या दोनहि मुलांना ( संभाजी व शिवाजी यांना ) 'पत्र पोंचतांच किल्ले ( बंगळूर व सिंहगड ) बादशाही अधिकाऱ्यांच्या ताब्यांत द्या ' असें लिहिलें. त्यांनीं तावडतोब बापाच्या सांगण्याप्रमाणें केलें. अशा रीतीनें शहाजीचीं अनेक दुष्कृत्यें बादशाही मेहरबानीच्या प्रवाहानें साफ धुतलीं गेलीं; त्यानंतर वजिरीचीं वस्त्रें देऊन त्याच्याकडे पूर्वीची जहागीर कायम करण्यांत आली.

महमदनाम्यांतील या हकीकतींत शिवाजीच्या लोकांनीं शिरवळ व पुरंदर येथें बादशाही सैन्याला नामोहरम केलें याविषयीं अक्षर लिहिलेलें नाहीं. परंतु भारतांतल्या या हकीकतीस दुजोरा देणारें 'शहाजी राजे धरिले तेव्हां त्याचा लेक शिवाजी पुरंदरी बैसोनु दिवाण नामजादीशी ( सरकारी पथकाशीं ) झगडले' वगैरे उल्लेखाचें अस्सल पत्र आपणांपुढें आहे. ( ले.५६२ ) यामुळें त्याच्या सत्यतेविषयीं संशयास जागा नाहीं.

यानंतर महमदनाम्यांत शहाजीविषयीं अवाक्षर लिहिलेलें नाहीं. याचें कारण हा ग्रंथ लिहिणारा जहूर हा शहाजीच्या विरुद्ध पक्षाचा म्हणजे मुस्तफाचा आश्रित होता. त्याला शहाजीची फजिती व त्याचे धिंडवडे निघाल्याचे प्रसंगच वर्णन करावयाचे होते. यामुळें कैदेंतून सुटल्यानंतर शहाजीचा दरबारांत जो सन्मान झाला व किताब मिळाला त्याची माहिती या ग्रंथांत मुळींच दिलेली नाहीं. पण ती भारतांत व अस्सल पत्रांत दिलेली आहे. शहाजीला सोडतांना दरबार भरला व त्याला बहुमानाचीं वस्त्रें देण्यांत आलीं असें म्हणून एका वाक्यांत महमदनामा आटोपतें घेतो. पण भारतकार त्या दरबारची इत्थंभूत हकीगत देतो. त्यांत महमदशहाचे आत्मगत विचार आहेत. दरबारांत आणिल्यानंतर "मुस्तफा व अफजल यांनीं केलेले अपराध माझेच आहेत असें समज, तुला कैदेंतून सोडलें आहे, तूं कुलीन आहेस, तेव्हां माझें प्रिय करण्यांत तत्पर राहशीलच. मात्र सिंहगड व पुरंदर हे किल्ले आम्हांस देण्याविषयीं मुलांना सांग" वगैरे विचार बादशहानें शहाजीला बोलून दाखविले व शहाजीची सुटका झाली. त्याच्या मुलांनीं किल्ले सोडले व शहाजी सैन्यासह पुनः स्वारीवर निघाला. या वेळीं शहाजीचा चांगला सन्मान झाला याचें प्रमाण अस्सल पत्रांतून म्हणजे बादशाही फर्मानांतून शहाजीला 'महाराज' ही पदवी लावण्यांत आली आहे हें होय. महाराज हें उपपद शहाजीच्या नांवामागें श. १५७० पर्यंतच्या एकाहि पत्रांत नाहीं; व १५७१ नंतरच्या प्रत्येक पत्रांत तें आहे. यावरून महाराज ही पदवी या वेळीं देण्यांत आली हें निश्चित विधान करण्यास हरकत नाहीं.

या वेळेपासून शहाजीला अनुकूल असा पक्ष विजापुरांत अधिकारावर असून शहाजीची गणना वजनदार व विश्वासू मुत्सद्यांत होत असे आणि शिवाजीलाहि जहागिरीच्या व्यवस्थेंत सुचेल ती सुधारणा करण्यास मोकळीक मिळाली. यामुळें पुढलीं ५।६ वर्षें शिवाजीनें व शहाजीनें बादशाही विरोध उद्भवूं न देतां पण मंजुरी मागत न बसतां जबरदस्तीनें पुणें, मावळ व सुपें या भागांत आपला अंमल प्रस्थापित केला.

# प्रकरण ५ वें

# शिवाजीमहाराजांच्या स्वतंत्र कर्तृत्वाचा प्रारंभ

१. शिवाजीमहाराजांच्या चरित्रांतील प्रत्येक हालचालीचा प्रसंग नवा व सर्वश्रेष्ठ असाच आहे. अशा त्या अद्वितीय चरित्राचा प्रारंभ कसा हें ह्या प्रकरणांत पहावयाचें आहे. ह्या प्रकरणाची कालमर्यादा श. १५७१ ते १५८१ ज्येष्ठ ह्या दहा वर्षांची आहे; आणि प्रसंगदृष्ट्या हा अवधी शहाजीमहाराजांच्या सुटकेपासून तों अफजलखानाच्या प्रयाणापर्यंतचा येतो. राजे शहाजीची कैद, हें पराक्रमाचें पहिलें पाऊल टाकणाऱ्या शिवाजीच्या कार्यांतील मोठें हार्दिक संकट होतें. परंतु त्यांतून मानार्ह शहाजीची अधिक सन्मानानें श. १५७१ ( ज्येष्ठ शु. १५ इ. १६४९ मे १६ ) त सुटका झाली. आणि तेव्हांपासून म्हणजे श. १५७१ पासून शिवाजीमहाराजांच्या आत्मख्यात अशा स्वतंत्र कारभारास प्रारंभ झाला. श. १५७१ ( इ. १६४९) च्या पूर्वी शिवाजीराजांच्या हातून कांहीं घडलें नाहीं असें नाहीं. तर जें घडलें तें शिवाजीकर्तृक असलें तरी शहाजीराजे व दिवाण दादाजी कोंडदेव एतत्प्रधान असून त्यांच्याच नांवें तें गणलें पाहिजे, व गणलें जाईहि. ह्याविषयीं किंचित् विस्तरपूर्वक विवेचन केलें पाहिजे.

२. निजामशाहीची वाटणी होऊन ती अस्तंगत झाली तेव्हां शहाजीराजांच्याकडे विजापूरदरबारकडून आलेला प्रांत व अधिकार लक्ष्यांत घेऊन आणि त्या वडिलार्जित प्रांतसीमेच्या बाहेर शिवाजीनें कांहीं हालचाल केली असेल तर ती किंवा वडिलार्जित प्रांतांतच पण केवळ वारसा हक्कानें येणाऱ्या अधिकारमर्यादेबाहेर विशिष्ट अधिकार चालविला असेल तर तो शिवाजीची स्वतंत्र हालचाल म्हणून समजणें भाग आहे. एऱ्हवीं पित्याच्या जागीं व पितृनियोजित म्हणून पुत्रानें जो कारभार करावयाचा तशा शिवाजीच्या कारकीर्दीस येथें स्वतंत्र म्हणून गणलें पाहिजे असें नाहीं. ह्याचें कारण म्हणून शहाजीचें कर्तृत्व येथें एका वाक्यांत सांगणें प्राप्त आहे कीं, आपली इच्छा पुरी करण्याच्या रूपानें अथवा आपल्याकडून जेथपर्यंतची तयारी झालेली आहे तिची पूर्तता करण्याच्या रूपानें, मुलांनीं अंगीं कर्तृत्व व

पुरुषार्थ असेल तर महाराष्ट्रांत व कर्नाटकांत स्वराज्य स्थापावें; निदान तितक्या कर्तृत्वाच्या अभावीं हें न झालें तर, एका मोठया जहागिरीचे धनी म्हणवून घेऊन सुखानें राहावें, अशी व्यवस्था शहाजीराजांनीं करून ठेविलीच होती. तेव्हां शिवाजीचें स्वतंत्र कर्तृत्व पहावयाचें तर, वडील शहाजीचा प्रांत व अधिकार कोणचा आणि त्यांत कोणच्या बाजूची शिवाजीनें काय वाढ केली हें लक्ष्यांत घेतलें पाहिजे.

३. श. १५५८ ( इ. १६३६ ) मध्यें शहाजास आदिलशाही-कडून भीमा ( ह्या नदीसच जेधे करिन्यामध्यें गोदावरीप्रमाणें गंगा म्हटलें आहे. ) व निरा ह्या दोन नद्यांमधील मुलूख तेवढा जहागीर म्हणून मिळाला. ह्या मुलखांतील किल्ले मिळाले नाहींत. ह्या काळच्या राज्यव्यवस्थेंत प्रांत आणि त्यांतील किल्ले ( किल्ला ह्या शब्दानें येथें गड, कोट, जंजिरा, गढी, दुर्ग, छावणी ह्या लढाऊ व संरक्षक राजस्थलांचा संग्रह केला आहे. ) असे दोन भाग स्वतंत्र असून त्यांतहि किल्ल्यांचें महत्त्व अधिक समजलें जात होतें. विशेषत: पश्चिमेकडील हा सह्याद्रिकांठचा मुऱ्हेखोऱ्यांचा मावळ भाग, तसेंच समुद्रकांठचा भाग ह्यांमध्यें तर गड-जंजिऱ्यांनाच सर्व महत्त्व होतें. प्रांतापेक्षां प्रांतांतील किल्ल्यांना असें विशिष्टत्व त्या वेळच्या परिस्थितीमुळें आलें होतें. शरिरांतील ( प्राण धारण करणाऱ्या बरगड्यादि ) हाडांची साम्यता शिवभारतकारानें ह्या किल्ल्यांना दिली आहे. सारांश, विजापूरदर-बारनें असे हे प्रांतांतील किल्ले आपल्याकडे ठेवून नुसता प्रांत जहागिरीदाखल सरदार शहाजीस दिला. म्हणजे कोंढाणा ऊर्फ सिंहगड, पुरंदर, चाकण, ह्या प्रमुख किल्ल्यांवर विजापूरच्या बादशहाचीच पूर्ण सत्ता असे. पण एवढें म्हटल्यानें शहाजीच्या प्रांताची व अधिकाराची पुरती व स्पष्ट कल्पना आली असें होत नाहीं. कारण, किल्ल्याविरहित प्रांताचा जहागिरदार जर शहाजी, तर त्याचा कारभारी जो दादाजी कोंडदेव तो कोंढाणा किल्ल्यावरील नामजाद अधिकारी व महालानिहायचा सुभेदार कसा? तात्पर्य, शहाजीचा प्रांत व अधिकार ह्यांच्या मर्यादेचें निश्चित रूप व सूक्ष्मता कळावयास पाहिजे, आणि ह्याकरितां हें येथें सांगणें प्राप्त आहे कीं, अद्याप तत्कालीन कागदांचें संशोधन होण्यावरच ही निश्चिती पूर्णपणें अवलंबून आहे. सध्यां इतकें ध्वनित करतां येतें कीं, शहाजीस ही जी जहागीर दिली ती, ज्या प्रांतांतील देशमुखादि मंडळी आपआपसांत व वरिष्ठ सत्तेशींहि बंडाळी करून

रुजुवातीनें म्हणजे सुसूत्रपणें राहात नाहींत असाच बराचसा भाग असलेल्या प्रांताची दिली आणि त्याकरतां शहाजीस जोड अधिकार दिले. एक जहागिरदारीचा व दुसरा मोकासदारीचा. हे दोनहि अधिकार प्रांताची व्यवस्था लावण्याच्या दृष्टीनें सारखेच आहेत. पण मोकासदार हा जितका सरकारी आहे तितका जहागिरदार नाहीं. तत्कालीन अस्सल पत्रांतून जेथें नुसतें ' अर्जानी जाला ' असें, अगर ' मोकासा अर्जानी जाला ' असें येतें तेथें मोकासदारीच्या जोडीला जहागिरदारीची कल्पना स्वीकारण्यानें कांहीं अर्थ लागतो. 'अर्जानी होणें' ह्या फारसी शब्दाचा अर्थ प्राप्त होणें, मिळणें, आधीन होणें असा आहे. पण म्हणून एकाद्या प्रांताचे वा गांवाचे नियोजित अधिकारी असतांना केवळ स्वतःच्या दंडेलीनें तो प्रांत अगर गांव घेणें; अशांचा अंतर्भाव ह्या अर्जानी होण्यांत होईल; विशेषतः अशा प्रकारानें मुलूख प्राप्त झालेल्याकडून स्थानिक वतनदार, इनामदार लगेच खुर्दखताची मागणी करतील असें दिसत नाहीं. तेव्हां, ' अर्जानी होणें ' म्हणजे पूर्वस्थापित सत्तेची मान्यता ज्या प्राप्त होण्यास आहे, असें अर्जानी होणें होय. इनाम अथवा वतन दिलें असतां तसा निर्देश त्या हुकमांत असतो. तेव्हां तें अर्जानी होणें नव्हे. केवळ स्वतःच्याच बळावर नव्हे; तर एकाद्या पातशाहीतर्फे म्हणून येऊन मग दंडेलीनें एकादा प्रांत घेतल्यास त्याच्याकडूनहि खुर्दखत घेतलें गेलें आहे. आणि हें खुर्दखत मागतांना ' हाली साहेब ए तर्फेसी येऊन परगणे मजकूर ( पुणे ) कबज जाहाले अथवा केले आहे ' असें तेव्हां स्पष्ट म्हटलें आहे ( ले. २२४, २६२ ). अशा रीतीनें मुलूख ताव्यांत घेण्याविषयीं स्पष्ट हुकूमच मिळत असत. असा हुकूम नसतांना मुलूख काबीज केल्यास तो ताबा दरबारमान्य म्हणजे सरकारमान्य तर नसेच, पण रयतमान्यहि नसे. एके ठिकाणीं लिहिलें आहे कीं, ' किलेकरी तपे मजकूर ( =कानदखोरे ) कबज केले ते एथिले हुकूमे नाहीं. मुलुकगिरीबदल कोरे सिकियाचें फर्मान हुजरून त्यानजीक पेसजी पाठविले आहेत त्यापैकीं दरम्यानच तपे मजकुराचें नाव घालून ऐसा अमल केला असेली. ' ( ले. ३१९ ). तात्पर्य, 'अर्जानी जाला' ह्याचा अर्थ इनाम अथवा वतन मिळणें असा नाहीं; केवळ स्वतःच्या बळानें घेणें असाहि नाहीं; मोकासा म्हणून मिळणें हेंहि नाहींच; तर वरिष्ठ सत्तेच्या संमतीनें आणि ह्या तीन चार प्रकारांविरहित म्हणून जहागीर ह्या नात्यानें प्राप्त होणें, असा समजणें प्राप्त वाटतें. कोठें

जागीर अर्जानी जाला असा प्रयोग नाहीं. अर्जानी होण्याच्या ह्या दोन प्रकारांत आणखी एक प्रकार नमूद करितां येतो. तो हा कीं, जो प्रांत मुख्य सत्तास्थानापासून दूर, कमी उत्पन्नाचा, डोंगरी आणि बंडखोर लोकांचा त्यावर मुख्य सत्तेचा तितका ताबा नसतो व त्याविषयीं ते उदासीनहि असतात. अशा प्रांतांतील कांहीं भाग एकाद्यानें विनाहुकूम घेतला तर हें परस्परांतील भांडण समजून, किरकोळ असल्यामुळें म्हणजे वरिष्ठ सत्तेचा बिघाड असा त्यांत होत नसल्यामुळें तो प्रांत घेणें, हेंहि अर्जानी होणें मानतां येईल. अर्जानी होणें ह्यांत व्यवस्थेचा भाग प्रधान असल्यामुळें मुख्य सत्तेशीं अमान्य नसणें आणि रहिवाशांची मान्यता असणें ह्या गोष्टी त्यांत आवश्यक आहेत.

४. ह्या विवेचनाबरोबर, शहाजीस मिळालेल्या अधिकाराची अधिक स्पष्टता येण्याकरितां, वर उल्लेखिल्याप्रमाणें शहाजीच्या मोकासदारीच्या अधिकाराबद्दलहि खुलासा केला पाहिजे. प्रांताचा मोकासदार म्हणजे सुभेदार. मोकासा हा राज्यव्यवस्थेच्या दृष्टीनें अधिकारनिदर्शक आहे, आणि सुभा हा प्रांतविशिष्ट आहे. मोकाशाचा अधिकार एका गांवापुरता मिळतो ( ले. ३०२ ), एकाद्या तर्फेपुरतां मिळतो ( ले. २९२ ), किंवा एकाद्या महालाचा अथवा प्रांताचा म्हणजे परगण्याचाहि मिळतो ( ले. ४१७ ). तसा सुभा हा कांहीं अधिकार आहे व तो गांव, तर्फ इत्यादि प्रांताच्या पोटविभागापुरता मिळतो असें नाहीं. तर सुभा हा प्रांत अथवा परगण्याचा वाचक शब्द असून त्यावरील मोकासदार तो सुभेदार. रणदुल्लाखानास वाई परगण्याचा मोकासा मिळतो (ले. २८४), आणि ह्याचाच उल्लेख जे. क. त सुभा म्हणजे सुभेदार म्हणून केला आहे. ह्याप्रमाणें शहाजीस श. १५५८ च्या अखेरीस पुणें परगणा मोकासदारीच्या अधिकारानेंहि मिळाला.

५. आतां, येथें जहागिरदार व मोकासदार यांमधील अधिकार-भेदाची कांहीं स्पष्टता करून घेणें आवश्यक आहे. म्हणजे त्यावरून शहाजी व दादाजी कोंडदेव आणि त्यानंतर शिवाजी ह्यांच्या कारभारांतील तफावत लक्ष्यांत येऊन त्यांचें विशिष्टत्वहि कळून येईल. त्या काळीं जहागिरीस राज्य हा शब्द लावण्याची पद्धत होती असें दिसतें. आणि त्यामुळें त्या जहागिर-दार घराण्यांतील मंडळींना राजे ही पदवी लाविली जात असे. शहाजीराजे यांनीं विजापूरच्या अली आदिलशहाला जें एक तेजस्वी व बाणेदार पत्र लिहून

आपण म्हणजे कोण आहों हें दिग्दर्शित केलें आहे; त्या पत्रांत त्यांनीं स्वत:च्या जहागिरीबद्दल मजकूर लिहिला आहे ( ले. ७१० ). आणि शिवाजीराजे यांनीं व्यंकोजीस जें अर्धा वांटा मागणीबद्दल समजुतीचें पत्र लिहिलें आहे त्यांत ह्या जहागिरीस राज्य म्हणून संबोधिलें आहे ( ले. २३३२ ). श. १५७५ मध्यें ' राज्यास अधिकारी जालों ' असें म्हणून जी सनद चाकणच्या उपाध्यांना दिली आहे ( ले. ६४२ ) तींतहि राज्य हा शब्द जहागीर ह्या अर्थीच योजिला आहे. जहागिरदाराखेरीज देशमुखांनाहि राजे हें उपपद लावीत असत. परंतु देशमूख हे जहागीरदाराप्रमाणें सरकार-नियुक्त नव्हत. राजे हें उपपद केवळ सरकारी अधिकाऱ्यांना लाविल्याचें आढळत नाहीं. जहागिरदार व मोकासदार ह्यांतील अंतर हें कीं, जहागिरदार हा आपला प्रांत लागवडीस आणणें, वसूल करणें, इत्यादि प्रांतव्यवस्था स्वत:करितां करील; आणि मोकासदारानें हीच सर्व व्यवस्था सरकारकरितां करावयाची ( ले. ७१२, ६४९ ). आणि ह्यामुळें जहागिरदारापेक्षां मोकासदार म्हणजे प्रांताचा सुभेदार ह्याचा अधिकार वरिष्ठ प्रतीचा समजला जाई. ' तानाजी हा हशमाचा सुभेदार ' असें म्हणून सुभेदार म्हणजे मुख्य असाहि अर्थ आहे. मोकासदार आणि जहागिरदार हे दोन्ही सरकार नियुक्त असत. तथापि, मोकासदारीपेक्षां जहागिरदारी ही वंशपरंपरेनें चालणारी होती. मोकासदाराची नेमणूक मध्यवर्ति सत्तेच्या इच्छेप्रमाणें केव्हां एक वर्षापर्यंत, तर केव्हां वीस वर्षेपर्यंतहि होत असे. क्वचित् अमान्य असलेल्या मोकासदाराविरुद्ध वरिष्ठ सत्तेकडे गाऱ्हाणेंहि गेल्याचें आढळतें. जहागिरदाराविषयींहि त्यानें अधिक वसूल केल्यास तक्रार केली जाई. ( ले. १२४७ ).

६. वरील विवेचनावरून शहाजीस मिळालेल्या जहागिरदार व मोकासदार ह्या दोन अधिकाराची कल्पना स्पष्ट होईल. आतां शहाजीस मिळालेला प्रांत केवढा व कोणता हें पहावयाचें आहे. शहाजीच्या कैफियतींत ( का. प. या. ले. ४३८ ) " पुणें व सुपें हे दोन महाल शहाजीमहाराजांस जहागिरींत दिले होते. तेथें ते जमेदारीप्रमाणें वतनदारी करून राहिले, " असें म्हटलें आहे. सभासदी बखरीमध्यें ' शहाजीराजे यांसी दौलतेमध्यें पुणें परगणा व........सुपे महाल होता असें सांगितलें आहे. स्वत: शहाजी महाराज 'भीमे अलीकडील मुलूख आपल्याकडे जहागीर जाला आहे.' असें

जेधे करिन्यांत सांगतात. आणि अस्सल पत्रांतूनहि ह्या बाजूचे परगणे पुणें (ले. ४१७) व सुपें (खं. २० पृ. ७०) शहाजीकडे असल्याचें स्पष्ट आहे. निजामशाहीचीं दोन शकलें होऊन त्यांपैकीं जो प्रांत आदिलशाहीकडे आला तो अर्थात् ह्या दोन्ही शाह्यांच्या सरहद्दीवरील व पश्चिमेकडील आला. कारण, पूर्वीं एक वेळ हाच प्रांत शहाजीकडे ह्या दोन्ही शाह्यांच्या तर्फे मोकासदारीनें होता. (ले. २२२ (श. १५४७); २६२ (श. १५४९). आदि; ले. २७४(श. १५५०) निजा.). ह्या पश्चिम सरहद्दीवरील प्रांतांखेरीज खुद्द आदिलशाहीच्या इकडील मुलखांतील मसूरपरगणाहि शहाजीस मिळाला होता. (खं. १५ ले. १,३; ले. ८८५). सारांश, हा एवढा प्रदेश शहाजीकडे होता. त्यांतील बारा मावळांचा स्वतंत्र परगणा समजला जाई. त्याची व्यवस्था कांहीं भागापुरती ठाणें, शिरवळ येथें असून बाकीच्यासह सर्व प्रांताच्या मुख्य व्यवस्थेची गादी कोंढाणा किल्ल्यावर असे. बारा मावळें हीं पूर्वीं म्हणजे मलिकंबर अखेर मामले रायेर खालीं होतीं. पुढें बारा मावळें हा एक स्वतंत्रच प्रांतविभाग मानला जाऊन त्यावर वेगळा अधिकारी (कृष्णाजी भास्कर श. १५८७) असे. अशा ह्या शहाजीसंपादित प्रांतांपैकीं प्रस्तुत व कार्यप्रारंभ ह्या दृष्टीनें शिवाजीसंबंधक असा प्रांत म्हणजे हा पुण्याकडील होय. ह्या प्रांतांत व वरील शहाजीच्या अधिकारांत शिवाजीनें स्वतंत्रपणें काय बदल अथवा वाढ केली हें पाहण्यापूर्वीं दादाजी कोंडदेव याचा अधिकार व त्याची कामगिरी कोणती हें थोडक्यांत पाहणें भाग आहे. कारण एका दृष्टीनें प्रत्यक्ष प्रांतावर अंमल शहाजीपेक्षां ह्या दादाजीपंताचाच होता; आणि शिवाजीच्या अमदानीला सुरुवात ह्या दादाजीपंतानंतरच झालेली आहे. दादाजीपंताचा उल्लेख दोन प्रकारांनीं येतो. एक 'माहाराज राजश्री शाहाजी राजेसाहेब याचे कारकून' म्हणून (खं. १ ले. ८१) व दुसरा 'मसुरल हजरती राजश्री दादाजी कोंडदेऊ सुभेदार व नामजाद किले कोंडाणा व महालानिहाय' असा (ले. ४३२,४५७ इ.). श. १५५८च्या अखेरीस शहाजीराजे यांस वरील प्रांत मिळाला आणि श. १५५९ त तेथें दादाजीपंताचा अंमल चालू असल्याचें पत्रांतून दिसून येतें.* शहाजीनें आपल्या प्रांताची व्यवस्था केल्याचें ले. २०९३ मध्यें असें सांगितलें आहे

* त्यापूर्वींचे पंतांचे उल्लेख विश्वासार्ह वाटत नाहींत. सनदा पत्रें पृ. १०२, ३. हेंच पत्र 'शिवाजी सोविनूर'मध्यें पृ. १२४ वर घेतलें गेलें आहे !

कीं, पुणें परगण्याच्या ७ तर्फा करून त्यांपैकीं शिवाजीकडे कर्यात मावळ ३६ गांवें, सांडस खुर्द मंबाजी राजे भोंसले ( शहाजीचा चुलतभाऊ ) यांजकडे गांवें २०. अशा दोन तर्फांचा अधिकार म्हणजे मोकासदारी दोघांकडे दिली. पुणें परगण्याचीं एकंदर गांवें २८८ पैकीं ह्या दोन तर्फा वगळल्या म्हणजे बाकीच्या २३२ गांवांचा म्हणजे ५ तर्फांचा अधिकार दादाजीपंतांकडे होता. आणि यास प्रमाण हें कीं, दादाजीपंत असेपर्यंत दादाजीच्या ताब्यांत असलेल्या गांवांवर ( खेडेबारें वगळून ) शिवाजीचे हुकूम नाहींत. आणि तेच दादाजी मृत्यु पावतांच त्याच सालापासून शिवाजीकडे पत्रांची मागणी येऊन त्याप्रमाणें पत्रें दिलीं गेलीं आहेत. सारांश, शहाजीकडे जहागीर म्हणून आलेल्या प्रांताची व्यवस्था शहाजीनें दादाजी कोंडदेव, शिवाजी, मंबाजी भोसले, ( सुप्याकडे ) संभाजी मोहिते यांजकडे सोंपविली होती. त्यांतहि मावळ भाग हा असा आहे कीं, जेथली बंडाळी मोडून सर्व व्यवस्था केंद्रीभूत अशी व्हावयाची आहे. मावळांतील ही बंडाळी निजामशाहींतला प्रसिद्ध मुत्सद्दी मलिकंबर याच्या वेळेपासून आहे. तशांत हा मावळ भाग एकदां आदिलशाहीकडे तर पुनः निजामशाहीकडे असा जातयेत असल्यामुळें तर त्या बंडाळीच्या आधींच्याच उल्हासाला मदत मिळे. शहाजीनें आपल्याकडे आलेल्या प्रांतांपैकीं ज्या प्रांताची व्यवस्था केल्याचें आज आढळून येतें त्या पुणें परगण्याशिवाय बाकीच्या परगण्यांच्या व्यवस्थेसंबंधानें प्रसिद्ध पत्रांवरून अनुमानानें नियम ठरविला पाहिजे. शहाजीनें जी पुणें परगण्याची व्यवस्था केली ती 'आपणांपासून मोकासा' देऊन केली. म्हणजे आपल्या तर्फे पोटमोकासदार नेमून केली ( ले. २०९३ ). अशा प्रकारें पोट मोकासदार एकादें गांव किंवा एकादें तर्फ अशा लहान विभागावर नेमिले तरी सर्व परगण्यांवर व वरिष्ठ म्हणून एकदा अधिकारी नेमणें व्यवस्थेच्या दृष्टीनें प्राप्तच आहे. त्यांतहि वर उल्लेखिल्यासारखा मावळ भाग ज्यांच्या जहागिरींत आहे, त्याकरतां तर असा वरिष्ठ व स्वतंत्र अंमलदार पाहिजे होता. आणि हा अंमलदार दादाजीपंत होता. हें त्याच्या सुभेदार महालानिहाये ( एकाहून अधिक महालांचा सुभेदार ) ह्या अधिकारनिदर्शक पदवीवरून उघड होत आहे. शिवाय, जी कामगिरी दादाजीपंतास करावयाची होती त्याकरतां त्या प्रांतांतील किल्ला, म्हणजे प्रांताच्या मुख्य ठाण्याची जागा, त्याच्या अधिकारांत असणें न्याय्य होतें. व त्याप्रमाणें दादाजीपंत हा कोंढाणा

गडावरील स्वतंत्र श्रेष्ठ अधिकारी आहे. हा दादाजीपंतांचा अधिकार शहाजी-कडे जे दोन अधिकार जहागीरदार व मोकासदार त्यांपैकीं मोकासदारीच्या म्हणजे सुभेदारीच्या नात्यानें विजापूरदरबारच्या मान्यतेनें शहाजीतर्फे होता असें वाटतें. दादाजी कोंडदेव हा, त्याच्या श्रेष्ठ पदवीवरून केवळ सरकारी अंमलदार म्हणून ठरतो; शिवाय दादाजीपंताच्या ह्या पदवीखेरीज त्यास 'मशरुल मशहूर अल् हजरती' हें जें प्रारंभीं विशेषण लाविलें जातें त्याहिवरून तो सर-कारनियुक्तच ठरतो. 'मशरुल हजरती' म्हणजे राजमान्य व 'मशरुल अनाम' म्हणजे लोकमान्य. मशुरुल अनाम हें विशेषण लोकनियुक्त जे देशमुख, देशपांडे व कुलकर्णी त्यांना लाविलें जातें. सारांश, दादाजी कोंडदेव हा, शहाजीकडे आलेल्या प्रांताचा विजापूरदरबारशीं जो संबंध त्या संबंधींचा मुख्य जबाबदार आणि स्वतः शहाजीच्या प्रांताचा कांहीं भागापुरता शहाजीस जबाबदार, असा होता. दादाजीपंतांची ही सुमारें नऊ वर्षांची कारकीर्द अनेक दृष्टींनीं महत्त्वाची झाली. तें सर्व वर्णन येथें अवश्य असलें तरी त्याचें स्वतंत्रच एक प्रकरण होणार असल्यामुळें सध्यां देणें अशक्य आहे. मात्र एका वाक्यांत एवढें सांगितलें पाहिजे कीं, शहाजीची जी पूर्व मांडणी शिवाजीच्या स्वरा-ज्याच्या उभारणीस अनुकूल झाली त्या मांडणींत ह्या दादाजीपंताचा कार्य-भाग मुलखास कौल देऊन वसाहत करण्यापासून तों किल्ले ताब्यांत घेण्या-पर्यंत सर्व प्रकारांनीं झाला आहे. ढमाले देशमूख ( पौड खोरें ) यांच्यापासून कुवारीगड दादाजीनें घेतला असा उल्लेख त्यांचे कैफियतींत आहे. ( निजाम विजय वर्तमानपत्र ). श. १५५९ मध्यें सुरूं झालेल्या दादाजीच्या कारकीर्दींत मावळांत शुद्ध अराजक माजलें असतांना तेथें हरएक रीतीनें वरिष्ठ व केंद्रीभूत अशी राज्यव्यवस्था मान्य करण्याची प्रवृत्ति पंतांनीं उत्पन्न केली हा दादाजीपंतांच्या कारभाराचा निष्कर्ष आहे.

७. एकंदर मजकुरावरून शहाजीसंपादित असा प्रदेश म्हणजे पुणें, सुपें, इंदापूर, चाकण, व बारा मावळें हा आणि त्यावरील अधिकार म्हणजे विजापूरकरांतर्फे कांहीं भागावर मोकासदारीचा व सर्व भागावर जहागिरदारांचा होता. त्यांत शहाजीनें आपल्यातर्फे निरनिराळे पोट अंमलदार नेमून दिले होते. त्यांपैकीं शिवाजीकडे कर्यातमावळ, इंदापूर, इत्यादि हा भाग वेळोवेळीं येत गेला. व सर्वांवरील वरिष्ठ अंमलदार म्हणून विजापूरकरांतर्फे आणि हा सर्व प्रांत शहाजीस जहागीरहि असल्यामुळें शहाजीतर्फे, दादाजी कोंडदेव

हा दिवाण व सुभेदार आणि कोंढाणा किल्ल्यावरील स्वतंत्र श्रेष्ठ अधिकारी ठेविला होता. शहाजीचा प्रांत व अधिकार एवढा असून या प्रांताचें उत्पन्न ४० हजार होन होतें. या मूळ उत्पन्नाचा उल्लेख त्याच्या आपण केलेल्या वाढीसह शिवाजीनें असा केला आहे. "राज्य म्यां शिवाजीनें चाळीस हजार होनांचा पुणे महाल होता.त्यावरी एक क्रोड होनांचें राज्य पैदा केलें. "(स. बखर).

८. आतां या मूळ प्रांतांत व अधिकारांत शिवाजीराजांनीं स्वतःच्या पराक्रमानें काय वाढ केली हें पाहावयाचें व तोच त्यांच्या स्वतंत्र कर्तृत्वाचा प्रारंभ होय. शिवाजीनें वाडिलार्जित मिळकतींत ही जी प्रथम वाढ केली ती प्रांताची नसून अधिकाराची होती. म्हणजे शहाजीराजांच्या जहागिरींत, व श. १५६७ पासून खुद्द शिवाजीच्याहि ताब्यांत असलेल्या खेडेंबारें या मावळ भागांत, असलेला पण अधिकारांत नसलेला कोंढाणा किल्ला प्रथम शिवाजीनें घेतला. हा किल्ला घेण्याचा स्वतःचा अधिकारच आहे हें, वडिलांच्या जहागिरीची त्या काळच्या पद्धतीप्रमाणें व्यवस्था पहात असतांना आधीं ४–५ वर्षांपासून इतक्या योग्य रीतीनें शिवाजी प्रस्थापित करीत आला होता कीं, त्यामुळें पूर्णपणें विजापूरदरबारच्या सत्तेखालीं असलेला हा कोंढाणा किल्ला, केवळ सुगमपणें व विनाविरोध शिवाजीच्या हातीं आला. या अधिकाराच्या प्रस्थापनेचें स्वरूप असें होतें कीं, ह्या भागांतील मुलखाची व्यवस्था पहाण्याच्या रूपानें शिवाजीनें त्या त्या खोऱ्यांत असलेले डोंगर कबज्यांत घेऊन त्यांवर किल्ले बांधले; कांहीं मूळचे किल्ले होतेच पण ते गैरसरंजामी असल्यामुळें आपल्या सत्तेखालीं आणिले व त्यांची दुरुस्ती वगैरे केली (काव्य. पत्रें-शहाजी कैफियत) तात्पर्य, मुलूख शिवाजीच्या अधिकारांतला हें विजापूरदरबार व जहागिरींतले लोक ह्यांना मान्य होतेंच; पण त्याबरोबर मुलखांतील किल्लेहि शिवाजीनें जुने नवे करून आपलेसे केले व त्याबद्दल विजापूरदरबारकडून ठपकाहि आला नाहीं, हेंहि त्या त्या किल्ल्याच्या घेऱ्यांतील मंडळींच्या व इतर वतनदार, अंमलदार यांच्या शिवाजीनें निदर्शनास आणून दिलें होतें. राजगड, तोरणा, रोहिडा, कुवारगड, इत्यादि किल्ले सिंहगड घेण्यापूर्वीं शिवाजीनें घेतले असतांना विजापूरकरांकडून विरोध झाला नाहीं. याचें कारण असें होतें कीं, नुकतेच आदिलशाहीकडे आलेल्या व अराजक असलेल्या या प्रदेशांत विजापूरदरबारची सत्ता शेवटपर्यंत पोंचली नव्हती. आणि यामुळें अंगच्या बलावर तेथें अशी कांहीं व्यवस्था करणारास वरिष्ठ सत्तेकडून हरकत

येण्याजोगी नव्हती व आलीहि नाहीं. फक्त हा व्यवस्था करणारा आपली सत्ता मानणारा असला पाहिजे, एवढीच विजापूरदरबारची अपेक्षा होती. आणि ही अपेक्षा शिवाजीनें शहाजीच्या तर्फे पुरविली होती. शिवाजीची ' प्रतिपच्चंद्र ' ही अद्वितीय मुद्रा स्वतंत्रच आहे.

असे हे किल्ले दादाजीच्या सहाय्यानें वा स्वतंत्रपणें शिवाजी ताब्यांत घेत असतांना अंतर्व्यवस्थेच्या दृष्टीनें मुलखांत शिवाजीनें आपल्या न्यायनिष्ठुर वागणुकीनें असा दरारा व आदर उत्पन्न केला कीं, सर्वांचें लक्ष्य शिवाजीकडे वेधलें जाऊन प्रसंगीं शिवाजी हा आश्रयस्थान आहे असेंहि त्यांना वाटूं लागलें. अशी मदत चंद्रराव मोरे यांना झाली ती हकिकत पुढें येईल. तूर्त येथें शहाजीचा प्रतिनिधी म्हणून इकडील व्यवस्थेची घडी बसवितांना घडलेले एकदोन प्रसंग सांगतों. श. १५६७ मध्यें खेडेबारेंसंज्ञक मावळांतील रांजे ह्या गांवचा पाटील बाबाजी बिन भिकाजी गुजर, ह्याच्या हातून मोकदमी करीत असतां कांहीं बद–अंमल घडला. ही हकीकत शिवाजीस विदित जाली. त्याजवरून आज्ञा करून बोलावून आणून शिवाजीनें बाजपूस केली, तेव्हां खरें असें ठरलें. याजकरितां त्याची वतनी मोकदमी सरकारजमा केली आणि बाबाजीचे हातपाय तोडून दूर केला. ही शिक्षा तेव्हांच इतरांना कळली. आणि पुरंधरचे सोनजी गुजरानें अर्ज केला कीं, ह्या बाबाजीस त्याच्या वतनासह आपले हातीं देणें. तेव्हां ह्या बाबाजी गुन्हेगाराबद्दल तीनशें होन घेतले आणि ' हे कुळींचे गुजर, पोटी संतान नाहीं ' म्हणून साहेबीं मेहेरबान होऊन मोकदमी सोनजी गुजर याचे दुमाला म्हणजे स्वाधीन केली ( ले. ५१७ ). ह्या गोष्टींत शिवाजीच्या ठिकाणचा पालक गुण सहज चांगला निदर्शनास येतो. हातून घडलेल्या चुकीबद्दल दंडहि केला आणि शेवटीं दयार्द्र होऊन त्याच्या संगोपनाचीहि व्यवस्था केली. ह्या वेळीं कचेरीची व्यवस्था कशी होती आणि शिवाजीप्रमाणेंच जहागिरींत इतरत्र नेमलेल्या व्यवस्थापकांकडून एकेक गांव शिवाजीकडे येऊं लागला त्याचेंहि दिग्दर्शन करतों. ह्याच वर्षी म्हणजे श. १५६७ ( इ. १६४५ ) त शिवाजीकडे सुपें परगण्यापैकीं बारकडींयाची लोणी हें गांव जहागिरीदाखल आलें. वस्तुतः सुपें परगण्यावर अंमल, शहाजीनेंच नेमलेल्या संभाजी मोहित्याचा आहे. तथापि शिवाजीकडे ह्या गांव वहिवाटीस आल्याबरोबर खुर्दखताची मागणी आली. ही मागणी

मोरगांवच्या इनामाबद्दलची होती. मागणीप्रमाणें शिवाजीच्या कचेरींतून खुर्दखत दिलें. पण ताबा आणि भोगवटा ह्या दोन कारणांचा निर्देश करून जें खुर्दखत द्यावयाचें तसें दिलें नाहीं. म्हणजे मिळकत मालकीची असणें वेगळें व प्रत्यक्ष त्या मालकीपणाचा भोगवटा चालू असणें वेगळें. त्या प्रमाणें हें पहिलें खुर्दखत ' इनाम दुमाला करणें ' एवढ्या पुरतेंच दिलें गेलें. अर्थात् भोगवटयाकरतां म्हणून दुसरें खत पुन्हां मागितलें व दिलें. कारण, भोगवटयाचीं खतें गलबल्यांत नाहींशीं झालीं होतीं. पुढल्या वर्षी शिवाजीराजांना इंदापूरचा मोकासा मिळाला. त्याहि कालांतील तिकडील व्यवस्थेचीं अशींच पत्रें आहेत. ( ले.५२०–५२२ ). ह्याप्रमाणें ह्या अंतर्व्यवस्थेसंबंधाचीं दादाजी, शहाजी ह्यांचींहि कांहीं पत्रें आहेत. सारांश, अशा प्रकारें किरकोळ किल्ले घेऊन शिवाजी मुलखाची व्यवस्था पाहात असतां श. १५६८ च्या अखेरीस दादोजी कोंडदेव मृत्यू पावला व दादाजीच्या जागीं शिवाजीचा अधिकार सर्वांनीं मान्य केला. ह्या भागांतील मुलखावर शिवाजीचाच सर्वस्वीं व संपूर्ण अधिकार येण्याला राजसत्तेचें मुख्य ठाणें जो कोंढाणागड तो ताब्यांत असणें आवश्यक होतें. हा किल्ला ताब्यांत घेणें म्हणजे विजापुरकरांचा अंमल उघड-पणें झुगारून देण्यासारखें होतें. अर्थात् तसें केल्यास त्यापासून येणाऱ्या संकटाची जाणीव ठेवून शिवाजीराजानें हा किल्ला घेण्याचें साहस केलें. हें साहस किल्ला घेतल्यानंतरच्या परिणामांत होतें, घेतांना नव्हतें. कारण, किल्ला घेतांना शिवाजीचें धोरण व कर्तृत्व इतकें व्यवस्थित व अचूक होतें कीं किल्ला घेतल्यानंतर विजापूरदरबारचा विरोध आला, आधीं नाहीं. किल्ला घेतांना शिवाजीची दिसून येणारी योजकता त्याच्या भावी मुत्सद्दी-गिरीचा पूर्ण अंदाज करून देणारी आहे.

वर सांगितल्याप्रमाणें मुलखाबरोबर किल्लेहि घेण्याचें आपल्या अधि-कारांत आहे ही समजूत प्रथमतः शिवाजीनें सर्वांची करून दिलीच होती. अशा स्थितींत ज्याच्या मार्फत हा कोंढाणा घेण्याचें राजकारण केलें तो पुण्याचा हवालदार बापूजी मुद्गल व ज्याच्याशीं केलें तो दादाजीच्या मागें मुख्याप्रमाणें बनलेला कोंढाण्याचा हवालदार सिद्दी अंबर. हे दोघेहि अधिकारी शिवाजीचे चांगले परिचित व आत्मीय. बापूजी मुद्गल हा शिवाजी राहात असलेल्या खेडेबाऱ्याच्या देशपांडे घराण्यापैकीं असून यानेंच शिवाजीकरितां तेथें वाडे वगैरे बांधले. आणि सिद्दी अंबर हा किल्ल्यावरच्या हवालदारीमुळें परगण्या-

चाहि हवालदार होता. ह्या परस्परांत शिवाजीनें राजकारणी मसलत करविणें व त्याचें फल किल्ला हातीं सुगमपणें येणें हें सरळच होय. इतकेंच नव्हे तर पुढें जरी हा किल्ला शहाजीकरतां विजापूरकरांस दिला गेला तरी सिद्दी अंबर हा हवालदार म्हणून राहिलाच आहे. तर केवळ आपल्याविषयीं वाटणारा दरारा व आदर ह्यांवर शिवाजीनें कोंढाणा किल्ला घेतल्यावर सहजच विजापूरदरबाराकडून मिया रहीम महंमद यास तो घेण्याकरतां पाठविलें. हा मिया रहीम शिरवळ परगण्याचा ठाणेदार म्हणून जवळच होता. त्याचीच बढती करून ही कामगिरी त्याजकडे सोपविली. कारण, शिवाजीची ही महत्त्वाकांक्षा किंवा अधिकारातिक्रमण विजापूरदरबारला सहन होणें शक्य नव्हतें. पण ह्या वेळीं इतक्या भानभडींत हें दरबारमुत्सद्दी व सेनापती आणि त्यांचें सैन्य गुंतलें होतें कीं, एव्हां ह्या गोष्टीचा पुरता विचारहि करणें त्यांना शक्य नव्हतें. कर्नाटकाकडे त्यांचें सारें लक्ष्य लागून राहिलें होतें. त्यांपैकींच शहाजी महाराजांची कैद हें एक प्रकरण. ह्याचा विचार स्वतंत्रच प्रकरणांत झाला असल्यामुळें येथें तो भाग सोडून शिवाजीपुरतें म्हणजे शहाजीराजांच्या सुटकेपासून पुढील हकीकत पाहूं. राजकारण करून शिवाजीनें कोंढाणा किल्ला घेतला. पण तो त्यास पचला नाहीं; म्हणजे विजापूरकरांस तो परत द्यावा लागला आणि विजापूरकरांनींहि तो शिवाजीशीं लढून परत घेतला असेंहि नाहीं. तर शहाजीच्या सुटकेचे वेळीं हा गड शिवाजीस सोडावा लागला. शिवाजीनें गड घेतला तरी सुलतान महमदशहानें त्याची जबाबदारी शहाजीवरच टाकली व बंधमुक्त होतांना किल्ला सोडण्याची अट शहाजीस घालून ती पुरी केली शिवाजीनें. ह्याचा अर्थ श. १५७१ पर्यंत शिवाजीची कारकीर्द आत्मख्यात नव्हती, आणि, एव्हांपासून मात्र शिवाजीच्या हालचालींत स्वायत्तता दिसून येऊं लागली.

९. आणखी एका प्रकारानें शिवाजीचें स्वतंत्र कर्तृत्व केव्हांपासून, हें पहातां येतें. तें असें कीं, उपलब्ध साधनसामग्रींत स्वतः शहाजीशिवाजींचें ह्याविषयींचें म्हणणें, वतनदार इत्यादि रयतेचे उद्गार, शिवाजीचा पहिला उल्लेख कोणीं, केव्हां, कसा केला हें पाहणें. त्या तिन्ही प्रकारांनीं पाहतां श. १५७१ नंतरच शिवाजी स्वयंख्यात आहे. हे तिन्ही प्रकार येथें दिल्यास विस्तार होईल. सबब आटोपतें घेऊन शिवाजीराजांची पुढील हालचाल पाहूं.

# प्रकरण ६ वें

# स्वराज्याचा उदय

**१. अफजलखानाची जावलीवर स्वारी :—**शिवाजीची जावलीवर स्वारी होण्यापूर्वी सहा वर्षें अफजलखानानेंहि अशीच एक मोहीम जावलीवर सुरूं केली होती. ह्या मोहिमेची वार्ता मुसलमानी अथवा इंग्रजी आधारग्रंथांत नसल्यामुळें तसेंच मराठींतील शिवाजीविषयक बखरग्रंथांतहि नसल्यामुळें, केवळ एवढ्याच आधारांवर लिहिलेल्या शिवाजीचरित्रांत ( मराठी व इंग्रजी ) अर्थात् ही स्वारी नमूद होण्याचें राहिलें. मराठींतील तत्कालीन अस्सल पत्रांतच ( हीं पत्रें श. १८३४ तच प्रसिद्ध झालीं आहेत. ) ह्या स्वारीची माहिती मिळत आहे. तेव्हां मिळाली तेवढी ती माहिती येथें संकलित करितों.

अफजलखानाची वाई परगण्यावर सुभेदार म्हणून नेमणूक श. १५७१ त झाली ( ले. ५५३ ). खानास ह्या परगण्यावर नेमण्याचीं दोन कारणें आहेत. एक, ह्या परगण्याचा रणदुल्लाखान सुभेदार असतां ( श. १५५० —१५६५ ) रणदुल्लाचे हुकूम चालू करण्याचें कामहि ह्या अफजलनें केलेलें असल्यामुळें तो पूर्ण माहितगार होता; आणि रणदुल्लानंतर कर्नाटकांत शहाजीबरोबर ह्याचीच नेमणूक होऊन शहाजी व खान ह्यांत पुढें वैमनस्य उत्पन्न झालें व त्याचा परिणाम शहाजी अटकबंद झाला. याप्रमाणें बापापासूनचा हा शिवाजीराजांचा द्वेष्टा असल्याकारणानें, शेजारींच चाललेल्या शिवाजीच्या हालचालींस आळा बसावा; हें दुसरें कारण खानाच्या नेमणुकीचें होय. खान अधिकारारूढ होतांच त्यानें आपल्या परगण्याच्या अंतर्व्यवस्थेला सुरुवात केली. म्हणजे इनामदारवतनदारांचीं इनामें व वतनें चालविण्याविषयीं अधिकाऱ्यांना हुकूम देणें, योग्य वारस ठरवून त्याचें इनाम चालवणें, पड जमीन लागवडीस आणण्याच्या कामीं देशमूख-देशपांड्यांना उत्तेजन देणें, कालव्याचें पाणी देण्याविषयीं व्यवस्था करणें; कोणी बंडावा करीत असल्यास अथवा केला असल्यास त्याचा बंदोबस्त करणें, प्रसंगीं वतनें अमानत वा मोकळीं करणें इ. इ. कार्यभागास खानानें प्रारंभ केला.

पैकीं बंदोबस्ताचा भाग ह्या नात्यानें ही जावलीवरील मोहीम खानानें श. १५७१ च्या आषाढांत (इ. १६४९ जुलै) सुरू केली (ले.५५७).

ह्या मोहिमचें कारण थोडक्यांत असें आहे कीं, जावलीचा प्रसिद्ध व मुख्य चंद्रराव मोरे वारल्यानंतर ( अफ.च्या मतानें ) ' गैरी लोकीं म्हणजे भलत्याच लोकांनीं ह्या मुख्य मोऱ्याची जहागीर बळकाविली. मोऱ्यांच्या ह्या जहागिरीचा प्रांत बराच मोठा असल्यामुळें पुण्याजवळच्या मावळभागांत तेथील सृष्टिरचनेमुळें ज्याप्रमाणें मावळाचे बारा वेगवेगळे भाग पडले आहेत; तसेंच वाईजवळील त्या जावलीप्रांतांतहि जांभूळखोरें, जोरखोरें, शिवतरखोरें, कांदाटखोरें, साममहाल, बामणोली, आटगांव किंवा चतुर्बेट, सोलसखोरें इत्यादि अठरा महाल आहेत. मुख्य चंद्ररावाच्या मृत्यूनंतर ह्या अठरा महालांत विशेषत: उत्तर बाजूकडील जोरखोरें, शिवतरखोरें ह्या खोऱ्यांत बरीच उलथापालथ होऊन बंडाळी माजली. ही अव्यवस्था मोडून दरबारच्या सत्तेखालीं सर्व प्रांत व लोक आणण्याच्या महत्त्वाकांक्षेनें सुभेदार अफजलखानानें ह्या स्वारीचा उपक्रम केला; आणि कान्होजी जेधे यास सहाय्यार्थ बोलावणें केलें. ह्या ठिकाणीं हीहि गोष्ट लक्षांत घेतली पाहिजे कीं, मुसलमानांनीं आपली सत्ता दक्षिणेंत स्थापन केल्यापासून, देशावर आणि सपाटीच्या मुलखांत जसे त्यांचे म्हणजे मुसलमान सत्ताधारी वा सैनिक प्रत्यक्ष अंमल चालवूं लागले आणि लढले; तसे ह्या सह्याद्रीलगतच्या पश्चिमकांठच्या मुलखांत त्यांचा अंमलहि बसला नाहीं किंवा ते ससैन्य येऊन लढूंहि शकले नाहींत. कारण हा प्रांतच तसा अगम्य आहे. ह्यांतील ठिकठिकाणची झाडी दाट, कांटेरी जाळ्यांनीं इतकी गुंतागुंतीची झालेली असते कीं, परका तेथें आला एवढ्यानेंच तो अडकला जावा आणि तेथें राहणारा तेथें आहे एवढ्यानेंच तो दबा धरून बसल्याप्रमाणें विजयी व्हावा. शिवाय, तेथील सतराशें प्रकट व गुप्त वाटा, आडवळणें, पाण्याच्या कोंडी, डोंगरांतील घळी, पाणलोट, नाळकीं, उंच व खोल, पहाड आणि दरीं इत्यादि अडचणींच्या प्रकारांमुळें हा प्रांत सपाटीवरील माणसास, तो तेथें कितीहि शूर, धाडसी व सावध असला तरी, केवळ दुर्गम होता. जेव्हां जेव्हां ह्या प्रांतांत जाऊन लढण्याचा किंवा तेथील व्यवस्था करण्याचा प्रसंग मुसलमानास आला तेव्हां तेव्हां ह्या भागांतील राहणाराच हाताशीं घेऊन तें कार्य त्यांना करावें लागलें आहे. पासलकरांच्या पोवाड्यांत सांगितल्याप्रमाणें बारा मराठेसुद्धां धैर्य धरून ह्या जावलींत कधीं येत नसत.

पुण्याकडील बारा मावळें काय अथवा हा अठरा महालांचा जावलीप्रांत काय अशा वेळीं परकीयाला जाचकच झालेला आहे. ह्या प्रांताच्याहि दुर्गमतेला साजेल असें शिवाजीनें एके ठिकाणीं म्हटलें आहे कीं, आमच्या ह्या कठीण प्रदेशांत नुसत्या कल्पनेचा सुद्धां घोडा नाचविणें कठीण आहे, मग तो प्रदेश काबीज करण्याची गोष्ट कशाला ? ( ले. ९८२ ). तात्पर्य, असा हा प्रांत विकट असल्यामुळें कोणचाहि मुसलमान सरदार केवळ आपल्या बळावर ह्या भागांत जाण्यास धजत नसे. त्याप्रमाणें अफजलखानानेंहि आपल्या ह्या जावलीवरील मोहिमेस कान्होजी जेधे देशमूख यांस गौरवानें व आतुरतेनें पत्रांवर पत्रें पाठवून, इनामें देण्याचें कबूल करून साहाय्यार्थ बोलाविलें. अफजलखान कान्होजीस लिहितो. 'चंद्रावावरी नामजादी केली आहे. तुम्ही दौलतख्वाह (हितेच्छु) राजनिष्ठ आहां. याच कामावरून तुमची सरफराजी ( बढती ) आहे. कागद पावतांच, तुम्ही हशमलोक मेळवून आपले तर्फेनें सुरू करून खबर लिहिणें' ( ले. ५५७ ).

खानाचें असें हें निमंत्रण पत्र कान्होजीस येतांच तो मोठा बुचकळ्यांत पडला. कारण, दोनच महिन्यांपूर्वी शहाजीराजांनीं "तुम्ही घरोबियांतील मायेचे लोक अहां, तुमचा भरोसा मानून रवाना करतो, इमानें वर्तावें. चिरंजीव राजश्री सिऊबाशी रुजू होऊन जबरदस्तीनें रहावें. एखादी मोंगलाईकडील फौज व आदिलशाहीकडील फौज आली तरी आपण इमान राखावें;" असें सांगितलें व त्याप्रमाणें वागण्याची आपण बेलरोटीवर हात ठेऊन इमानपुरस्सर शपथहि घेतली. ही कान्होजीच्या स्मरणांतून जाणें शक्य नव्हतें. शिवाय शहाजीच्या अथवा आतां शिवाजीच्या जहागिरींत आपलें मुख्य वतन असून शिवाजीहि दिवसानुदिवस स्वसामर्थ्यानें वाढता होत चालल्याचें कान्होजी पहात होता. तेव्हां निमंत्रणाप्रमाणें खानाकडे जाणें म्हणजे ही नुकतीच दिलेली शपथ मोडून शहाजीशिवाजींचा रोष पत्करणें होय. बरें, अफजलखानाकडे न जावें तर त्याच्याहि ताब्यांतील मुलखांत आपला पाटिलकीचा गांव आहे. सारांश, खानाच्या मदतीस जावें तर शिवाजी रागावणार व न जावें तर खान रागावणार अशा पेंचामुळें कान्होजीची स्थिति मोठी केविलवाणी व अडचणीची होऊन बसली. वस्तुत: कान्होजीनें शहाजीशीं जी शपथक्रिया केली, त्या शपथेनें उत्पन्न होणारें बंधन शिवाजीपुरतें होतें; आणि ही खानाची स्वारी कांहीं शिवाजीवर नव्हती. परंतु ह्या शपथेंत अथवा खानाच्या ह्या बोलावण्यांत केवळ शब्दार्थानें वरवर दिसून येणारें धोरण जरी सामान्य असलें तरी अंतस्थ प्रकार भिन्न होता.

अफजलखानानें ज्या चंद्रावाला तो ' गैर लोक ' म्हणजे भलतांच कोणी आहे असें समजून ही स्वारी काढली तो चंद्रराव श. १५७० च्या पूर्वी शिवाजीराजाच्या सहाय्यानें जावलीच्या गादीवर बसला होता. तेव्हां त्यास हुसकून लावण्यानें शिवाजीच्या सत्तेचें किंवा मान्यतेचें वैय्यर्थ्य लोकांच्या निदर्शनास आणणें हा खानाचा अंतस्थ हेतु होता व त्याकरतां कान्होजी जेध्यालाच बोलावणें करण्यांत, शिवाजीचा मुख्य हस्तक फोडून आपल्या लगामीं लावणें, असा खानाचा दुसरा मतलब होता. खानाची व कान्होजीची ओळख कर्नाटकांत कान्होजी शहाजीबरोबर असतांनाच झालेली होती. कान्होजीहि शहाजीबरोबर कैदेंत होता व सुटल्यानंतर वरील प्रमाणें उभयतांचें संगनमत होऊन कान्होजी इकडे आला होता. आपल्या जमेतीसह कान्होजीस बोलावण्यांत दुसरें एक कृत्य खानाच्या डोळ्यांसमोर नुकतेंच घडलें होतें कीं, कान्होजीचा मुलगा बाजी हा शिवाजीच्या बाजूनें खळदबेलसरच्या लढाईंत आपल्या म्हणजे विजापूरच्या सैन्याशीं मोठ्या शर्तीनें लढला होता. म्हणजे हेंहि एक वैषम्य खानाच्या मनांत होतें. खानाच्या या स्वारीचा अंतस्थ प्रकार हा असा होता.

हें सर्व लक्ष्यांत घेतलें असतां अफजलखानाच्या ह्या निमंत्रणानें कान्होजीच्या मनांत किती गोंधळ उत्पन्न झाला असला पाहिजे ह्याची कल्पना येईल. बरें, अशा वेळीं केवळ गोंधळून जाऊन स्वस्थ बसणेंहि अशक्य. तेव्हां कान्होजीनें खानाच्या ह्या पत्रास कसलेंच उत्तर एकदम न पाठवितां, शहाजीला दिलेलें वचन लक्ष्यांत आणून ह्या बाबतींत शिवाजीचा विचार घेण्याचें ठरविलें आणि शिवाजीकडे ही निमंत्रण-वार्ता कळवून, काय करावें हें विचारिलें. हें कान्होजीचें पत्र पोहचतांच शिवाजीच्याहि मनांत विचार आला कीं, ज्याअर्थीं शहाजी व कान्होजी यांमध्यें इकडील वागण्याविषयीं इमानप्रमाण झालें असतां, हा कान्होजी खानास काय उत्तर द्यावें हें अद्यापहि मला विचारीत आहे त्याअर्थीं ह्याच्या मनांत कांहीं संशय उत्पन्न होऊन चलबिचल झालेली दिसते. तेव्हां आपणहि ह्याच्या मनाच्या पक्केपणाचा ठाव घेतला पाहिजे. आणि त्या दृष्टीनें शिवाजीनेंहि कान्होजीच्या पत्रास मोठ्या मुत्सद्देगिरीनें पुढील उत्तर लिहिलें. " तुम्ही पत्रिका पाठविली त्यावरून सकल अभिप्राय कळो आला. लिहिलें कीं, 'खान अलीशान खान अजम ( अफजलखान ) येहि लिहिलें कीं, जावलीवरी सुरूं केलें

आहे तरी तुम्ही आपले जमेतीसी सिताब ( सत्वर ) येणें.' तरी तुमचा त्यांचा पहिलेपासून घरोबा आहे, गेले तरी पाहिजे. आमा ( परंतु ), खासा अगर पुत्र पाठवावयाचे जाले तरी त्याचा बोलभाक बरवे रीतीनें घेउनु मग जाणें. दगा होये ऐसे न करणे. एक भले माणूस दरम्यान देउनु मग जाणे. तुमचे नजरेसी पडत असले की खासाच जावे. जरी तुमचे मन बार देत नसिले तरी कौलबोल घेउनु पुत्राबराबरी लोक देउनु पाठविजे. हरयेक बाहाणा करुनु तुम्ही राहाणे. दोन्ही गोस्टी तुम्हास लिहिल्या आहेती. यात तुम्ही स्याहाणे असा, बहुत लिहिणे नलगे. " ( ले. ५५८ ) ह्या पत्रांत पुढारीपणास आवश्यक असलेल्या सावधगिरीचे व मुत्सद्दिगिरीचे शिवाजीच्या आंगचे गुण उत्तम दिसून येतात. खान दगा करणारा आहे, हा इशारा देऊन कान्होजीस सावध तर केलेंच आहे; आणि खानाकडे जावें कीं न जावें ह्या बाबतींतहि योग्य सल्ला देऊन कान्होजीचीच पुन्हां पारख करण्याकरतां संदिग्ध लिहून कसोटी लाविली आहे. शिवाजीचें हें उत्तर कान्होजीस मिळतांच, त्यानें त्यापासून घ्यावयाचा तो बोध लक्षांत घेऊन खानाशीं पुढीलप्रमाणें वागणूक केली. खानाच्या निमंत्रणास उत्तर म्हणून कान्होजीनें आपला हेजीब ( म्हणजे वकील ) आबाजीपंत यास खानाकडे पाठविलें व 'ज्या जोहरखोऱ्यांतून हणमंतराव मोऱ्यास हांकलून द्या म्हणून म्हणतां तें खोरें नंतर मला मिळालें पाहिजे. तसेंच जावली येथें दोनशें लोकांची नायकी मला मिळाली पाहिजे आणि हे दोनशें लोक माझ्या पाटिलकीच्या वेलंगगांवचे मी ठेवीन ' ह्या तीन मागण्या केल्या. खानानें पहिल्या दोन मागण्या कबूल केल्या पण वेलंगच्या ऐवजीं वाईचे लोक चाकर ठेऊं ( ले. ५६७ ), असें कळविलें. ह्या पत्रव्यवहारांत चार महिने गेले. आणि वाटतें कीं, ह्या पुढें ही मोहीम सुरू न होतां एव्हां थांबली. आणि ती निराळ्या रूपानें पुढें पांच सहा वर्षांनीं रंगारूपाला येऊन संपली.

**२. जावलीकर चंद्रराव मोरे व शिवाजी राजे**—मागील रकान्यांत अफजलखानानें जावळीवर सुरू केलेल्या मोहिमेची हकीकत देतांना असें म्हटलें आहे कीं, ही मोहीम एव्हां बंद पडून ५।६ वर्षांनीं निराळ्या रूपानें उद्भुत होऊन संपली. ती कशी हें आतां येथें सांगावयाचें आहे. एक बादशहा मेला असतां त्याच्या जागीं दुसरा येऊन बसावयाचा म्हणजे त्या कालीं मोठा घालमेलीचा आणि बंडाळीचा प्रसंग

उद्भवे. ह्याचें कारण, एकमुखीं व्यवस्थेमुळें स्थानापन्न व्यक्तीला महत्त्व आलेलें; आणि स्थानावर अधिकार सांगणाऱ्या मात्रांत प्रत्येकाचा अधिकार व भाग मानलेला. एरव्हीं पाटलाची होळीची पोळी, देशमुखीचा नांगर किंवा जोशाची घटपूजा ह्यांबद्दल एवढे तंटे होतेना. असो. हीच गोष्ट मोठ्याप्रमाणें लहानलहान जहागिरी, देशमुखी ह्यांनाहि त्यांच्या मानानें लागू आहे. चंद्रराव मोरे यांच्यासंबंधीं तितकी विश्वासार्ह अशी जुनी माहिती आज प्रसिद्ध नाहीं. पण जी आहे त्यावरून असें म्हणतां येतें कीं, श. १५७० च्या पूर्वीं (दौलतराव या नांवाचा) जावलीचा मुख्य मालक चंद्रराव हा निपुत्रिक असतांना मेला. चंद्ररावाची जहागीर मागें सांगितल्याप्रमाणें फार मोठी व त्याच्या घराण्याचा विस्तारहि मोठा होता. ह्या चंद्ररावाचा अधिकार व दरारा केवढा मोठा असे हें एका पत्रांत त्याच्याविषयीं काढलेल्या उद्गारांवरून कळून येईल. हें पत्र चंद्ररावालाच लिहिलेलें आहे, त्यांत म्हटलें आहे ‘ गोसावियांमधें व हजरतीसाहेबामधें वेगलीक नाहीं. ’ ह्याच पत्रांत दुसरीकडे गोसावी म्हणजे चंद्रराव असें ध्वनित केलें आहे (ले. ५१७). निपुत्रिक असलेला हा दौलतराव ( ? ) मेल्याबरोबर ह्या इतर मोरे मंडळींत अर्थात् जावलीच्या गादीविषयीं तंटे सुरू झाले. अशांत दौलतरावाचे बायकोनें शिवतरकर मोऱ्यांपैकीं एकास दत्तक घेऊन शिवाजीच्या साहाय्यानें त्यास गादीवर बसवून कारभार चालविला. इकडे शिवाजीच्या मदतीनें जो चंद्रराव ( यशवंतराव नांव असावें. ) सर्व जहागिरीचा धनी होऊन जावलीमध्यें राहिला होता. त्याची, शिवाजी हा आतां आपल्या उद्योगामुळें विजापूरदरबारच्या रोषास कारण होत चालला आहे असें पाहून, पुढें प्रभानवलीच्या सूर्यराजाची जशी बुद्धि फिरली त्याप्रमाणें, बुद्धि फिरून तो शिवाजीशीं तुटकपणें वागूं लागला. पुढें पुढें तर संबंध विसरून उलट विरुद्धहि वागूं लागला. शेवटीं हा प्रकार बराच विकोपास गेला व दोघेहि एकमेकांचे शत्रू बनले. हा बनाव कसा होत गेला हें पाहण्यासारखें आहे. गुंजण मावळचे देशमूख शिंदे शिलिमकर हे देशमुखीवर आले ते चोरघे व मोहिते ( रजपूत ) यांसह आले. शिलिमकरांना देशमुखी मिळाली तेव्हां शिलिमकरांनीं मोहित्यांना बोराळे गांवची पाटिलकी देऊन त्यांची समजूत काढली. पण तसें चोरघे यांना अन्य कारणामुळें कांहीं दिलें गेलें नाहीं. हे रुसलेले चोरघे पुढें गुंजणमावळचे सरखोत झाले. पण देशमुखांत व त्यांच्यांत सलोखा राहिला नाहीं (खं. १७ ले. २). ह्याचा परिणाम

पुढें असा झाला कीं, ह्या शिलिमकर देशमुखांचा पक्ष माणुसबळानें व आपापसांतल्या भांडणानें दुर्बळ झाला. तेव्हां हे चोरघे म्हणूं लागले कीं देशमुखी आमची. ' छिद्रेष्वनर्था बहुली भवन्ति' ह्या न्यायानें जवळचे खेंडेंबारें येथील कोंडे दशमूख तेहि म्हणूं लागले देशमुखी आमची. आणि ह्यावर ताण करावी म्हणूनच कीं काय, ह्या शिलिमकर देशमुखांचे मामा असलेले हे चंद्रराव मोरेहि म्हणूं लागले घाटावर आमची देशमुखी (रु.३ ले.५.)अशा तिघांचे गुंजणमावळच्या देशमुखीकरतां भांडण सुरू झाल्यावर त्यांतील दुर्बल पक्षाला कोणातरी बलिष्ठाच्या आश्रयाला जाणें भाग पडलें. त्याप्रमाणें शिलिमकर देशमूख हा शिवाजीकडे मदतीकरतां आला व शिवाजीनें त्याला साह्य करण्याचें ठरविलें व कौलनामा-अभयपत्र पाठविलें. "तुमचे बाबे हुजूर खबर मालूम जाली जे, कित्येक वाडिया लोकांनीं तुमचे पाठी शक घातला आहे कीं, तुमची देशमुखी आम्ही घेऊं, तुम्हांस बाईट करूं....कित्येक गोष्टीकरतां तुम्ही शक जादे (भयभीत झाले) आहां. डावाडौल होता, तरी तुम्हांस साहेब घरच्या लेकरांसारिखे जाणिती आणि तुमचे फार हेहि गोष्टीचे बाईट करावे, ऐसे मनावर कधीं धरणार नाहींत. हे तुम्हांस बितिम कळले असावे. कोणेहि गोष्टीचा शक न धरणे, तुमचे हजार गुन्हे माफ आहेती. तुम्हासी आम्ही काहीहि बाईट वर्तणूक करू तरी आम्हास महादेवाची आण असे, कोणीहि गोष्टीची चिंता न करणें. अवांतरहि लोक भेडसविले असेल ते भेटाविणें आमच्या इमानावरी आपली मान ठेउनु आम्हापासी येणे" (ले. ७०८). याप्रमाणें अनाथ व न्याय्य शिलिमकराचा पक्ष शिवाजीराजे यांनीं घेतला. अर्थात् चंद्रराव मोरे व शिवाजी यांच्यांतील आधींच्या शत्रुत्वांत ह्यामुळें भरच पडली. आणखीहि दोन प्रकारामुळें ह्या भरींत भर पडली. मुसेखोऱ्यांतील गांवकुलकर्णी रंगो त्रिमल यानें सिंदलकीचा गुन्हा करून, त्यास शिवाजीचीं माणसें दस्त करण्यास म्हणजे पकडण्यास येतात तों हा रंगोबा, चंद्ररायाकडे जावलीस गेला, तेथें चंद्ररावानें त्याला आश्रय दिला. श. १५७४ (ले. ६२७). त्याच्यापूर्वीं १५७३ मध्यें असें घडलें कीं, बीरवाडीचा पाटील शिवाजीकडे येऊन म्हणतो, ' चंद्ररायामधें आपणामधें बरेपणा नाहीं. म्हणौन चंद्रराव आपले गांवाचे अधिकारपण खाताती. ते सबळ आपण कमजोर. सदरहू गांव चंद्ररराये किले कांगोरी खाले दिधले आहेती. हे खबर आइकोन साहेबाचे सेवेशीं आलो. तरी साहेबी हाती धरून आपणास

मिरासीवरी बैसविले पाहिजे ( ले. ६१५ ). हें त्या पाटलाचें म्हणणें मान्य करून शिवाजीनें त्याचें अधिकारपण त्यास दिलें होतें. म्हणजे वरच्याच्या उलट चंद्रावानें काढून लाविलेल्यास शिवाजीनें आश्रय दिला. अशा प्रकारें चंद्रराव व शिवाजी यांमधील भांडण बरेंच चिघळलें गेलें. एकदां तर कान्होजी जेध्यांच्या रोहिडखोऱ्यापर्यंत चंद्ररावाची स्वारी आली. त्याचें निमित्त असें, चिखलीचा पाटील रामाजी वाडकर हा चंद्ररावाशीं टोंगाईनें वर्तत होता, त्यास चंद्ररायानें जिवें मारिलें. त्याचा मुलगा लुमाजी रोहिडखोऱ्यांतील पलसोसीस पळून येऊन राहिला होता. त्यावरहि चंद्ररायानें स्वारी करून त्यासहि ठार केलें(ले. ७०७). प्रारंभीं म्हटलेंच आहे, कीं, चंद्ररायाचें घराणें मोठें. मावळांतल्या बऱ्याच देशमुखांशीं त्याचा आप्तसंबंध होता. ढमाले देशमूख, पासलकर देशमुख व हे शिलिमकर देशमूख हे सर्व त्याचे नातलग. सारांश, असा हा प्रतिष्ठित, घरंदाज, मानानें, ऐपतीनें, व माणुसबळानें, विशेषत: जावलीप्रांतासारख्या स्वभावत:च स्वतंत्र असल्यामुळें प्रांतदृष्टयाहि चंद्रराव म्हणजे महाबलिष्ठ होऊन विजापूरकरांसहि तो शिरजोर व असह्य होऊन बसला होता. अशा प्रकारच्या त्या चंद्ररावाचें प्रकरण मिटविणें शिवाजीला केवळ प्राप्तच होतें. आणि म्हणून त्याचें पारिपत्य करण्याचें योजून पुढील तजवीज केली. कान्होजीनाईक जेधे यांस, व इतरहि अवघ्या देशमुखांस आपापल्या जमावासह बोलाविलें आणि मोरे मंडळींपैकीं कोणी चतुर्बेटीं, कोणी शिवतर खोऱ्यांत, तर कोणी जोहरखोऱ्यांत जे जेथें बसून बंडावा करीत होते त्यांजवर बांदल, सिलिमकर, जेधे, संभाजी कावजी यांस पाठवून पराभूत केलें. प्रथम कान्होजी जेधे यास हणमंतराव मोरे याचा पराभव करण्याकरतां जोरखोऱ्यांत पाठविलें होतें. पण त्याच्यानें हें काम झालें नाहींसें दिसतें. रघुनाथ बल्लाळ यास पाठवून त्यास पराभूत करावें लागलें. शेवटीं सर्व मोरे मंडळी पराभूत झाली व शिवाजीनें जावली आपल्या ताब्यांत घेतली. पण तशांतूनहि चंद्ररावाची गादी मिळण्याविषयीं इच्छा असलेला प्रतापराव मोरे आदिलशाहींत ह्या गडबडींत पळून गेला.

हें कृत्य श. १५७७ पौष वा। १४ म्हणजे १६५६ जानेवारी २७ रोजीं घडलें. पुढें तेथेंच शिवाजीनें दोन अडीच महिने मुकाम केला व तेथील मावळे लोकांस कौल देऊन प्रांताची व्यवस्था केली आणि आपली सत्ता चालू केली. शिवाजी तेथून शके १५७८च्या चैत्री पौर्णिमेनंतर निघून

घाटेंतील मुलखांत व्यवस्था करीत सात दिवसांनीं रायगडास गेला. कारण, जावली शिवाजीच्यां आधीन होतांच चंद्रराव म्हणजे यशवंतराव मोरे ह्यानें बाजी व कृष्णाजी ह्या आपल्या दोन पुत्रांसह आपल्याच प्रांतांतील रायरी किल्ल्याचा आश्रय केला. रायरीगड निसर्गतःच बळकट व 'दौलताबादेपेक्षां दसपट उंच' असून अजिंक्य असा आहे. हा माऱ्याचा व तळकोंकणचें स्वामित्व देणारा गडहि शिवाजीस घ्यावयाचाच होता. मोरे तेथेंच गेल्यामुळें शिवसैन्यानेंहि ह्या किल्ल्यास वेढा घालून मोर्चे बांधले व हल्ला सुरू केला. जवळ जवळ तीन महिने रायगडावर राहून चंद्ररावानें शिवाजीच्या सैन्याशीं लढाई दिली. पण शेवटीं ह्या माऱ्यानें शत्रू अगदीं जेरीस येऊन वाघ असलेला हा चंद्रराव मेंढरूं बनून गेला. नंतर शिवाजीच्या सैन्यांत असलेला चंद्ररावाचा भाचा व ज्याची बाजू शिवाजीनें स्वीकारिली होती तो, यानंतर आपल्या मामाची भेट घेण्याकरितां गडावर गेला. आणि त्याच्या मध्यस्थीनें यशवंतराव व त्याचे दोघे पुत्र गडाखालीं येऊन तेथें त्यांची व शिवाजीची भेट झाली. वाटतें कीं, येथेंच चंद्ररावास ठार करून शिवाजीनें त्याच्या दोघा पुत्रांस कैद केलें. ( हे मोरे पुढें तीन महिन्यांनीं कैदेंतून पळाले. ) आणि श. १५७८ च्या वैशाखांत ( इ. १६५६ मे-जून ) रायरीगडाचाहि ताबा घेतला. नंतर शिलिमकर देशमूख यास देशमुखीचा शिक्का दिला आणि त्यांच्या भावा-भावांतहि वांटण्या करून दिल्या.

ह्या प्रकारें हें चंद्रराव मोरे प्रकरण संपलें. आणि 'जयवली—जयायेन कर्मणा प्रथितं शिवम्' ह्या जावलीच्या विजयकर्मामुळें शिवराज प्रख्यात झाले. जावली प्रांत जो एकदां आतां शिवाजीच्या हस्तगत झाला तो पुढें केव्हांहि त्याच्या ताब्यांतून गेला नाहीं. शाहिस्तेखानाचे वेळीं अथवा जयसिंगाच्या वेळेला शिवाजीच्या ताब्यांतील पुण्याकडील सर्व मुलूख मोंगलाकडे गेला आहे; पण तसें जावलीचें झालें नाहीं. इतकी जावली स्वभावतः मुख्य सत्ते-पासून दूर व सुरक्षित स्थळीं आहे. ह्या सुरक्षित जावलीच्या ठिकाणामुळेंच बाजी जेधे 'आपलिया माणसास जावळी राहावयासी देणें' असें शिवाजीस परोपरीनें म्हणतो ( ले. ८९५ व ९०४ ). शिवाजीचा खजिना जावलीस असे. समर्थांच्या चाफळमठास प्रतिवर्षी पोंचवावयाचे नख्त होन येथील पोत्यांतून जात ( ले. १९७२–७४ ) व वाईच्या पिसाळ देशमुखास आश्रय दिल्याबद्दल पिसाळानें द्यावयाचे दोन हजार होन जावलीच्याच खजिन्यांत

मिरासीवरी बैसविले पाहिजे ( ले. ६१५ ). हें त्या पाटलाचें म्हणणें मान्य करून शिवाजीनें त्याचें अधिकारपण त्यास दिलें होतें. म्हणजे वरच्याच्या उलट चंद्ररावानें काढून लाविलेल्यास शिवाजीनें आश्रय दिला. अशा प्रकारें चंद्रराव व शिवाजी यांमधील भांडण बरेंच चिघळलें गेलें. एकदां तर कान्होजी जेध्यांच्या रोहिडखोऱ्यापर्यंत चंद्ररावाची स्वारी आली. त्याचें निमित्त असें, चिखलीचा पाटील रामाजी वाडकर हा चंद्ररावाशीं टोंगाईनें वर्तत होता, त्यास चंद्ररायानें जिवें मारिलें. त्याचा मुलगा लुमाजी रोहिडखोऱ्यांतील पलसोसीस पळून येऊन राहिला होता. त्यावरहि चंद्ररायानें स्वारी करून त्यासहि ठार केलें(ले. ७०७). प्रारंभीं म्हटलेंच आहे, कीं, चंद्ररायाचें घराणें मोठें. मावळांतल्या बऱ्याच देशमुखांशीं त्याचा आप्तसंबंध होता. ढमाले देशमूख, पासलकर देशमुख व हे शिलिमकर देशमूख हे सर्व त्याचे नातलग. सारांश, असा हा प्रतिष्ठित, घरंदाज, मानानें, ऐपतीनें, व माणुसबळानें, विशेषत: जावलीप्रांतासारख्या स्वभावत:च स्वतंत्र असल्यामुळें प्रांतदृष्टयाहि चंद्रराव म्हणजे महाबलिष्ठ होऊन विजापूरकरांसहि तो शिरजोर व असह्य होऊन बसला होता. अशा प्रकारच्या त्या चंद्ररावाचें प्रकरण मिटविणें शिवाजीला केवळ प्राप्तच होतें. आणि म्हणून त्याचें पारिपत्य करण्याचें योजून पुढील तजवीज केली. कान्होजीनाईक जेधे यांस, व इतरहि अवघ्या देशमुखांस आपापल्या जमावासह बोलाविलें आणि मोरे मंडळींपैकीं कोणी चतुर्बेटीं, कोणी शिवतर खोऱ्यांत, तर कोणी जोहरखोऱ्यांत जे जेथें बसून बंडावा करीत होते त्यांजवर बांदल, सिलिमकर, जेधे, संभाजी कावजी यांस पाठवून पराभूत केलें. प्रथम कान्होजी जेधे यास हणमंतराव मोरे याचा पराभव करण्याकरतां जोरखोऱ्यांत पाठविलें होतें. पण त्याच्यानें हें काम झालें नाहींसें दिसतें. रघुनाथ बल्लाळ यास पाठवून त्यास पराभूत करावें लागलें. शेवटीं सर्व मोरे मंडळी पराभूत झाली व शिवाजीनें जावली आपल्या ताब्यांत घेतली. पण तशांतूनहि चंद्ररावाची गादी मिळण्याविषयीं इच्छा असलेला प्रतापराव मोरे आदिलशाहींत ह्या गडबडींत पळून गेला.

हें कृत्य श. १५७७ पौष वा। १४ म्हणजे १६५६ जानेवारी २७ रोजीं घडलें. पुढें तेथेंच शिवाजीनें दोन अडीच महिने मुक्काम केला व तेथील मावळे लोकांस कौल देऊन प्रांताची व्यवस्था केली आणि आपली सत्ता चालू केली. शिवाजी तेथून शके १५७८च्या चैत्री पौर्णिमेनंतर निघून

घाटेंतील मुलखांत व्यवस्था करीत सात दिवसांनीं रायगडास गेला. कारण, जावली शिवाजीच्यां आधीन होतांच चंद्रराव म्हणजे यशवंतराव मोरे ह्यानें बाजी व कृष्णाजी ह्या आपल्या दोन पुत्रांसह आपल्याच प्रांतांतील रायरी किल्ल्याचा आश्रय केला. रायरीगड निसर्गतःच बळकट व 'दौलताबादेपेक्षां दसपट उंच' असून अजिंक्य असा आहे. हा माऱ्याचा व तळकोंकणचें स्वामित्व देणारा गडहि शिवाजीस घ्यावयाचाच होता. मोरे तेथेंच गेल्यामुळें शिवसैन्यानेंहि ह्या किल्ल्यास वेढा घालून मोर्चे बांधले व हल्ला सुरू केला. जवळ जवळ तीन महिने रायगडावर राहून चंद्ररावानें शिवाजीच्या सैन्याशीं लढाई दिली. पण शेवटीं ह्या माऱ्यानें शत्रू अगदीं जेरीस येऊन वाघ असलेला हा चंद्रराव मेंढरूं बनून गेला. नंतर शिवाजीच्या सैन्यांत असलेला चंद्ररावाचा भाचा व ज्याची बाजू शिवाजीनें स्वीकारिली होती तो, यानंतर आपल्या मामाची भेट घेण्याकरितां गडावर गेला. आणि त्याच्या मध्यस्थीनें यशवंतराव व त्याचे दोघे पुत्र गडाखालीं येऊन तेथें त्यांची व शिवाजीची भेट झाली. वाटतें कीं, येथेंच चंद्ररावास ठार करून शिवाजीनें त्याच्या दोघा पुत्रांस कैद केलें. ( हे मोरे पुढें तीन महिन्यांनीं कैदेंतून पळाले. ) आणि श. १५७८ च्या वैशाखांत ( इ. १६५६ मे-जून ) रायरीगडाचाहि ताबा घेतला. नंतर शिलिमकर देशमूख यास देशमुखीचा शिक्का दिला आणि त्यांच्या भावा-भावांतहि वांटण्या करून दिल्या.

ह्या प्रकारें हें चंद्रराव मोरे प्रकरण संपलें. आणि 'जयवली—जयाधेन कर्मणा प्रथितं शिवम्' ह्या जावलीच्या विजयकर्मामुळें शिवराज प्रख्यात झाले. जावली प्रांत जो एकदां आतां शिवाजीच्या हस्तगत झाला तो पुढें केव्हांहि त्याच्या ताब्यांतून गेला नाहीं. शाहिस्तेखानाचे वेळीं अथवा जयसिंगाच्या वेळेला शिवाजीच्या ताब्यांतील पुण्याकडील सर्व मुलूख मोंगलाकडे गेला आहे; पण तसें जावलीचें झालें नाहीं. इतकी जावली स्वभावतः मुख्य सत्ते-पासून दूर व सुरक्षित स्थळीं आहे. ह्या सुरक्षित जावलीच्या ठिकाणामुळेंच बाजी जेधे 'आपलिया माणसास जावळी राहावयासी देणें' असें शिवाजीस परोपरीनें म्हणतो ( ले. ८९५ व ९०४ ). शिवाजीचा खजिना जावलीस असे. समर्थांच्या चाफळमठास प्रतिवर्षी पोंचवावयाचे नख्त होन येथील पोत्यांतून जात ( ले. १९७२—७४ ) व वाईच्या पिसाळ देशमुखास आश्रय दिल्याबद्दल पिसाळानें द्यावयाचे दोन हजार होन जावलीच्याच खजिन्यांत

भरावयास शिवाजीनें त्यास सांगितलें आहे (ले. १२६३). अर्थात् अशी ही जावली मिळाल्यामुळें शिवाजीच्या कार्यास एकदम दुप्पट जोर मिळाला.

एवढा हा जावली प्रांत तेथें ३।४ महिने लढाई होऊन शिवाजीच्या हस्तगत होतो आणि हें होत असतांना विजापूरदरबार उदासीन होऊन निमुटपणें पाहात कसें राहिलें? कां हा प्रांत अदिलशाही नव्हता? ह्याचा उलगडा केला पाहिजे. जावली हा प्रदेश अदिलशाहींतला होता हें निर्विवाद आहे आणि म्हणूनच अफजलखानानें श. १५७१ त जावलीवरील मोहिमेची तयारी केली होती. परंतु, विजापूरकरांना दोन कारणांमुळें शिवाजीच्या ह्या आक्रमणाकडे लक्ष देतां आलें नाहीं. मुळांतच, अलीकडे विजापूरदरबारांत मुत्सद्दी व सरदार यांच्यांत आपापसांत यादवी सुरू होती. तशांत जो सत्ताधिष्ठित असे त्यास गोवळकोंडे व पोर्तुगीज ह्यांच्याशीं चाललेल्या युद्धाकडे आपलें सारें बल व लक्ष द्यावें लागलें. ह्या वेळीं वाईपरगण्याचा सुभेदार जो अफजलखान तो श. १५७६ ते ७९ अखेर इकडे नसून तेरदाळ परगण्याकडे होता. तिकडे त्यानें १५७८ मध्यें तेरदाळजवळ 'अफजलनगर' नांव ठेवून एक गांव चालू केला. हें एक कारण, आणि दुसरें कारण असें होतें कीं, हा चंद्रराव मोरे विजापूरकरांना मुळींच जुमानीत नव्हता. त्यानें विजापूरकरांचा असा प्रांत जबरदस्तीनें ताब्यांत घेतला होता असें नाहीं. पण जहागीरदार ह्या नात्यानेंहि तो हल्लीं विजापूरदरबाराशीं वागत नसून फटकून म्हणजे जणूं स्वतंत्रच एका राज्याचा मालक म्हणून राहात असे. तेव्हां अशा चंद्ररावाचें शिवाजीसारख्यानें, म्हणजे शहाजीसारख्या विजापूरदरबारांतील एका वजनदार व मुख्य सरदाराच्या मुलानें परस्पर पारिपत्य केलें तर तें विजापूरदरबारला इष्टच होतें. प्रत्यक्ष विजापूरदरबारची अशी उदासीन दृष्टि होती असें दरबारमंत्री जो दियानतराव त्याच्या पत्रांतील धोरणावरून दिसतें. (ले. ७१९-२०)

शिवाजीच्या जहागिरीस लागून उत्तरेस मोंगलांचा मुलूख आणि पूर्व, दक्षिण व पश्चिम बाजूला आदिलशाही मुलूख होता. आदिलशाही मुलखांपैकीं वर सांगितल्याप्रमाणें जावली प्रांत शिवाजीच्या आधीन झाला. आतां शिवाजीराजे पूर्व आणि उत्तर या दिशाकडील प्रदेश जिंकण्याच्या उद्देशानें तयारीस लागले. प्रथम पूर्वेकडील वडिलार्जित सुपे परगणा, तेथील हवालदार संभाजी मोहिते याजपासून घेतला श. १५७८ आश्विन व. १ (इ.१६५६

सप्टें. ९). ह्यानंतर शिवाजीला विशेष सावधपणें विजापूरकर आणि मोंगल ह्यांच्या हालचालीकडे दृष्टि ठेवून ह्या दोही शाह्यांशीं राजकारण करावें लागलें आणि संधी साधून शिवाजीनें चढाऊ धोरणहि पत्करिलें. म्हणजे येथून शिवाजीराजांच्या चरित्रास वेगळें वळण लागलें.

**३. शिवाजीची कोंकणावर स्वारी**—ह्यानंतर म्हणजे श. १५७८ ह्या वर्षीं सुलतान महमूद आदिलशहाच्या मृत्यूमुळें आदिलशाही मुलखांत व दरबारांत बराच गोंधळ उडाला. महमुदाच्या आजारपणांत कित्येक परगण्याच्या अंमलदारांना विजापुरीं बोलाविल्यामुळें तो तो प्रांत मोकळा राहिला; आणि दरबारांत महमुदाच्या मरणानंतर कोणचा पक्ष अधिकारावर राहावयाचा ह्याविषयीं दरबारांतील मुत्सद्दी व सरदार ह्यांच्यांत आपआपल्या लहानमोठ्या अनुयायांसह केवळ बोलणीं म्हणजे वाटाघाट नव्हे तर, बाचाबाची व लाथाळी माजली होती; आदिलशाही मुलखांतील संस्थानिक आपण स्वतंत्र आहों अशी परिभाषा बोलूं लागले होते; ह्या सरदाराचा प्रांत त्या सरदाराला, अथवा सरंजामीदाखल दिलेलीं गांवेंहि कोणाला मिळूंच नयेत, अशा प्रकारें आदिलशाहींत सर्वत्र अव्यवस्था होऊन गेली होती. वस्तुतः ही अव्यवस्था महमूदशहाच्या मरणावेळच्या आजारीपणामुळें व आजारीपणाच्या काळांतच उद्भवली असें नाहीं; तर पूर्वीपासून सुरू झालेली होती. आणि ह्याला कारण कांहीं घरचें व कांहीं दारचें मिळालें होतें. म्हणजे औरंगजेब अधिकाराची लालूच दाखवून, पैसे पेरून, दरबारांतील एखाद्या पक्षाला चिथावीत असे; गोवळकोंडा व पोर्तुगीज ह्या शेजारच्या राज्यकारभारांतील भानगडीमुळेंहि आदिलशाहींत कांहीं राजकारणें चालत. ह्या बाहेरच्या कारणांखेरीज खुद्द दरबारांतील मुत्सद्यांची वर्चस्वाबद्दल चुरस व मुसलमानी धार्मिक पक्षभेदाचे तंटे या घरच्या कारणांमुळें विजापूरदरबारांत चालू असलेल्या अव्यवस्थेंत महमूदशहाच्या मृत्यूच्या वेळीं अधिक भर पडली इतकेंच. ह्या राजकीय अंदाधुंदीबरोबर लोकांमध्येंहि कोठें म्हणजे अथणी येथें लिंगायत व जैन यांचीं एकमेकांच्या देवास शिव्या देण्याच्या हक्काबद्दल भांडणेंहि विकोपाला गेलीं होतीं (ले.७१४). तात्पर्य, अशा संधीचा फायदा कर्तबगार श्रीशिवराजानें घेतला. ह्या फायदा वर्णन करण्यापूर्वी शिवाजीच्या घरच्या एकदोन गोष्टींचा निर्देश करितों. * माघ

*ह्या (श.१५७८)वर्षींचें एक पत्र 'सनदापत्रें'मध्यें छापलें आहे. तें शिवाजीचें असून पुणें प्रांतींच्या काजीस असलेली देणगी चालविण्याबद्दलचें आहे. हें इनाम हुजूरचे परवानगीनें

महिन्यांत शिवाजीकन्या सकवारबाई ऊर्फ सखुबाई व फलटणकर निंबाळकर (बजाजी नाईक त्यांचे पुत्र) महादाजी नाईक ह्यांचें लग्न झालें. स्वत: शिवाजीनेंहि ' गायकवाडासी सोयरीक केली ' म्हणजे गायकवाडांच्या कन्येशीं लग्न केलें. श. १५७९ च्या जेष्ठांत संभाजीराजे यांचा जन्म पुरंधरीं झाला. तो दिवस व काल शकावलींत असा दिला आहे. शुद्ध १२ गुरुवार घटिका १०. ह्या वेळीं संभाजीची माता सईबाई ईस दूध कमी; म्हणून कापूरवळच्या गाडे पाटलांची धाराई स्त्री ही दाई ठेवली. पुढें ह्या धाराईस प्रतिवर्षी होन १६ ची नेमणूक करून दिली होती. ह्या धाराईचे दोघे मुलगे म्हणजे संभाजीचे दूधभाऊ एक पन्हाळ्यास व दुसरा राजगडच्या सुवेळा ह्या माचीवर कामावर होते ( ऐ. सं. सा. खं. १, ले. ३६ ).

वर वर्णिल्याप्रमाणें आदिलशाहींतील अस्वस्थता लक्षांत घेऊन शिवाजीनें तळकोंकण, कर्नाटक, फिरंगाण ह्या प्रांतांत स्वाऱ्या केल्या. तळकोंकणांतील कल्याणभिवंडी ह्या भागावर स्वारी करण्याची संधी शिवाजीनें अशी कांहीं उत्तम साधिली होती कीं, हा मुलूख कोणाचा म्हणून शिवाजीनें घेतला ह्याचीच पंचाईत पडावी. एक तर हा भाग मूळचा निजामशाहींतील असून तहानें आदिलशाहीकडे आला होता व त्यावर विजापूरदरबारकडून ज्या मुल्ला महमद ह्या अधिकाऱ्याची नेमणूक झाली होती, तो ह्या वेळीं दरबारनिमंत्रणावरून विजापूरराजधानींत जाऊन बसला होता. म्हणजे ज्यांचा हा प्रांत त्यांचा अधिकारी तेथें नाहीं; आणि दुसरें व विशेष हें कीं, हाच मुलूख नुकत्याच ( श. १५७९ श्रावणांत) झालेल्या दिल्लीकर व विजापूरकर ह्यांच्या तहानें पुन: मोंगलांकडे द्यावा असें कागदावर नमूद झालें होतें. म्हणजे ह्या तहाची पूर्ण अंमलबजावणी अद्याप व्हावयाची होती. आणि पुढें हा प्रांत पुन: अदिलशाहाकडे औरंगजेबानें दिल्लीकडे परत जाण्याचे पूर्वीं दिला आहे. अशा स्थितींत आश्विनांत हा प्रांत शिवाजीनें हस्तगत केला. त्यांतील हा भाग हस्तगत करण्यापूर्वीं स्वत: शिवाजी एकदां तिकडे जाऊन आला. व त्यावरून त्यास असें वाटलें कीं, आपण स्वत: हा प्रांत घेण्यास जाण्याचें कारण आहेच असें नाहीं. म्हणून कल्याणकडे लष्कर व पायदळ बरोबर देऊन सामराज

पंताजी गोपिनाथ चिटणीस यांनीं चालू केलें आहे. यावरून चिटणीस व प्रताप बखरींमध्यें बाळाजी आवजीस श. १५७० मध्यें चिटणीसी मिळाल्याचें लिहिलें आहे तें खोटें ठरतें.

नीळकंठ रांजेकर पेशवे यांचे चुलत बंधु दादाजी बापूजी ह्यांस रवाना केले; आणि भिवंडीकडे देशमुख व मावळे लोक यांसह सखो कृष्ण लोहकरे यांस पाठवून भिवंडी घेतली. कल्याणभिवंडी हातीं येतांच तिकडील बंदरांतून शिवाजीचीं लढाऊ गलबतेंहि हिंडूं लागलीं. ह्या वेळचें वर्णन जेधे करीन्यांत असें दिलें आहे ' कल्याणाजवळ बंदरी दुर्गाडीचा कोट बांधला. ते समई राजश्री स्वामीस कल्याणांत हरजिनस मता द्रव्य सांपडलें, फत्ते जाली. ' ह्याच वर्षीच्या पौषांत शिवाजीनें ह्या भागांतील माहुलीचा किल्लाहि घेतला. ह्याप्रमाणें हा भाग काबीज झाल्यानंतर आबाजी महादेव यास कल्याणकडे देखरेखीस ठेविलें. अशा तऱ्हेनें चौल, दाभोळपर्यंतचा मुलूख शिवाजीनें ताब्यांत आणिला. ह्या स्वारीचा उपद्रव पोर्तुगीजांच्या प्रदेशासहि झाला व त्याबद्दल गोव्याच्या गव्हर्नरनें आपल्या पोर्तुगालच्या बादशहास तसें कळविलेंहि आहे (ले. ७४७). शिवाजीचा पोर्तुगीजांशीं संबंध हा प्रथमच आला. शिवाजीच्या कर्नाटकांतील स्वारी-संबंधानें ती श. १५८० तील असल्यानें व त्यापूर्वी शिवाजीच्या धोरणांत आणि ध्येयांत अधिक स्पष्टता करणाऱ्या गोष्टींचा निर्देश करावयाचा असल्यामुळें त्या गोष्टींसह या मोहिमेचा उल्लेख पुढील परिच्छेदांत करितों.

**४. शिवाजीची जुन्नर–नगरवर स्वारी**—वरीलप्रमाणें शिवाजी अदिलशाही मुलूख आपलासा करून तो पौष व. ५ स राजगडास परत आला. पण ह्या आदिलशाहीवरील स्वारीपूर्वी मोंगलाई मुलखांत शिवाजीनें जी स्वारी * केली त्यासंबंधीची हकीकत येथें देतों. आदिलशाहीप्रमाणें शिवाजीच्या प्रांतालगतचा उत्तरेकडील मुलूख मोकळा आहे असें पाहून त्यावर शिवाजीराजानें स्वारी केली. औरंगजेब दक्षिणचा सुभेदार बनून औरंगाबादेस येऊन बसला होता. त्याच्या मनांत कुतुबशाही व आदिलशाही मुलूख मोंगलाईंत समाविष्ट करावा असें सहजच होतें. बापाचें म्हणजे शहाजहानचें तें संकल्पित असून औरंगजेबाचीहि तशी प्रबळ इच्छा होती. म्हणून ती पुरी करण्याकरतां ह्या दोन्ही शाह्यांमध्यें कसा चंचुप्रवेश करावा ह्या योजनेंत तो होता. इतक्यांत गोवळकोंड्याचा सेनापती मीरजुमला हें सावज त्याच्या हातांत सांपडलें. हा मीरजुमला आपल्या बादशहास शिरजोर होऊन स्वतंत्रच संस्थानिक बनण्याच्या तयारींत होता. ह्या मीरजुमल्यानें श. १५७२ च्या सुमारासच गोवळकोंडयाच्या अबदुल

कुतुबशहाचे सारे अधिकार संपुष्टांत आणून आपल्या हातीं घेतले होते. कुतुबशहाला नाहीं इतकें या मीरजुमल्याला लोक भिऊं लागले होते. ( ले. ५९७ ), श. १५७३ त हा कर्नाटकांत उत्तरबाजूकडे आपली सत्ता वाढवीत चालला होता ( ले. ६२० ). व श. १५७६ त तर मीरजुमला म्हणूं लागला कीं, ' आपण जिंकलेला मुलूख आपल्याच ताब्यांत असावा. मद्रासचे कंपनीवाले इंग्रज तर म्हणतात कीं, ' तसें झालें तर हा मीरजुमला आपल्या सुलतानाएवढा राजा होऊन त्याच्या राज्याचा वसूलहि तितकाच होईल ( ले. ६७७ ). सारांश, साहजीकच अशा मीरजुमल्याचा हेवा बादशहा करूं लागला व त्या दोघांत वांकडें पडलें; आणि शेवटीं त्याचा परिणाम मीरजुमला औरंगजेबाचें बाहुलें बनण्यांत झाला. ह्या मीरजुमल्याच्या औरंगजेबाकडील जाण्यानें हा घरभेद्या शत्रूच्या हातीं गेला म्हणून, कुतुबशहाला काळजी उत्पन्न झाली; आणि कर्नाटकांत असतां त्याचे व शहाजीचे खटके उडत असल्यामुळें एका दृष्टीनें शिवाजीनेंहि अधिक खबरदार राहण्याला कारण घडलें. औरंगजेबाकडे हा मीरजुमला येतांच शहाजहान आतां मोठें सैन्य पाठवून गोवळकोंडा व विजापूर या राज्यांवर स्वारी करील अशी वदंताहि उठली ( ले. ७०३ ). म्हणजे गोवळकोंडेंकराप्रमाणें विजापूरकरांनाहि ही वेळ काळजीचीच होती. विशेषत: औरंगजेबानें विजापूरच्या दरबारीं आपला फितुरी डाव चांगला मांडला होता. एके ठिकाणीं औरंगजेबाचाच चिटणीस आपल्या मालकाच्या तोंडचे शब्द देतो कीं, ' मी त्याला वारंवार बजाविलें असून त्या( खानमहमद )नें घ्यावी तितकी काळजी घेतली नाहीं; यामुळें प्रतिपक्षाच्या डावास तो बळी पडला ( ले. ७३६ ). म्हणजे खानमहमदासारखा विजापूरचा मुख्य सेनापतीसुद्धां औरंगजेबाच्या मसलतींत आला होता. तात्पर्य, विजापूरदरबारीं असे हे औरंगजेबाचे खेळ ह्या पल्ल्यापर्यंतचे चालले होते. शिवाय, बेदर व कल्याणी किल्ला घेण्याकरितां औरंगजेबाचे सरदार व सैन्य गुंतलें होतें. त्यामुळें व शिवाजीचीहि श. १५७१पासून जुन्नर व अहमदनगर हातीं येण्याविषयींची इच्छा असल्यामुळें (ले. ५७५) उदयेच्छू व महत्वाकांक्षी शिवाजीनें या मुलखांत श. १५७९ च्या वैशाखांत जुन्नरवर स्वारी केली.

ह्या वेळीं जुन्नरपासून अहमदनगरपर्यंतचा प्रदेश मोकळा होता. त्यांत प्रवेश करून त्या मुलखांत शिवाजीनें लूटमार करून तो देश अगदीं

उध्वस्त करून सोडला. सभासदीबखरींत ह्या लुटीची वार्ता पुढीलप्रमाणें दिली आहे. ' जुन्नर शहर मारिले. घोडे दोनशें पाडाव केले, तीन लक्ष होनांची मत्ता, खेरीज कापडजिन्नस, जडजवाहीर हस्तगत करून पुण्यास आले. ' त्यानंतर पुढल्याच महिन्यांत म्हणजे ज्येष्ठांत अहमदनगर येथें शिवाजीनें स्वारी केली. तेव्हां तेथें मोंगलांकडील नासीरखान होता. त्याचाहि पराभव केला. ' नगर शहर मारले, सातशे घोडे पाडाव केले. हत्तीहि पाडाव केलें द्रव्यहि बहुत सांपडलें ' (स. ब.). जुन्नर व नगर येथील शिवाजीनें केलेल्या दुर्दशेची ही वार्ता औरंगजेबास कळतांच औरंगजेब अगदीं संतप्त होऊन चिडून गेला; आणि मुलतफत्खान, नौसीरखान व मीरजुमला यांना 'दक्षतेनें व्यवस्था ठेवा, सैन्य जय्यत ठेवा, शिवाजी ( the son of a dog ) ह्या संधी साधण्यासाठीं टपून बसलेला आहे. तो लुटण्यास सुरुवात करील. तुम्ही घाईनें पळून जाऊं नका ( ले. ७४३ ) अशीं पत्रें पाठविलीं. त्या पत्रानें मोंगली अधिकाऱ्यांना जागसूद आली व त्यांनीं शिवाजीवर स्वारी करण्याची तयारीहि केली. पण पावसानें घोटाळा केला. म्हणजे नदीनाले तुडुंब भरून वाटाच बंद झाल्या. तेव्हां, पुन्हां पूर्ववत् हे अधिकारी आपल्या तळावरच पाऊस काळ संपतांच स्वारी करण्याचें ठरवून स्तब्ध बसले; तिकडे औरंगजेबासहि आपला सगळा आवेश आवरून स्वस्थानीं वास करण्याचा प्रसंग आला. औरंगजेबानें बेदर घेऊन कल्याणी किल्ल्याला वेढा घालून जेरीस आणलें व पुढें थेट विजापुरावरहि चाल करण्याचा त्याचा इरादा होता. पण इतक्यांत आदिलशाही मुत्सद्यांनीं शहाजहानकडेच वकील पाठवून सलोख्याचें बोलणें सुरू केलें आणि ह्यामुळें शहाजहान यानें औरंगजेबास पत्रेंदेखत युद्ध बंद करून सरदारांनाहि माळव्याकडे पाठवून देण्याविषयीं तांतडीचें पत्र लिहिलें. अर्थात् औरंगजेबाला औरंगाबादेस परत येऊन स्वस्थ बसणें भाग पडलें. दिल्लीस आदिलशाही मुत्सद्यांचा शहाजहानच्या दरबारीं जाण्याचा परिणाम औरंगजेबाचें चढाऊ धोरण थांबलें एवढाच झाला नसून पुढें प्रत्यक्ष त्या दोघांत तहहि झाला. सारांश, औरंगजेबाचें शिवाजीवरील संकट याप्रकारें टळलें. तरी त्यांतून दुसरें एक काळजीचें कारण उत्पन्न झालें. औरंगजेबानें अली आदिलशहाला एक पत्र लिहिलें कीं, ' मीरजुमल्याच्या दुष्ट सल्ल्यावरून मी विजापूर व गोवळकोंडा यांवर हल्ला केला. पण आतां तुम्ही आपल्या प्रजेचें संरक्षण करा. परिंडा किल्ला, कोंकण, वांगीमहाल हे प्रांत ( तहांत )

खालसा केले होते. ते व कर्नाटकांतील मुलूख तुमच्याकडे पूर्वीप्रमाणें रहावे. एक कोटी खंडणींत ३० लाख सूट दिली आहे. तुम्ही मात्र मुलखाचें चांगलें रक्षण करा. या प्रांतांतील कांहीं किल्ले शिवाजीनें बळकाविले आहेत. तेथून त्याला घालवून द्या. त्यास नोकरीस ठेवावयाचा असेल तर त्याला कर्नाटकांत जहागीर द्या. मी हिंदुस्थानाकडे जात आहें........' ( ले. ७४४ ).

ह्या पत्राचा स्पष्ट अर्थ असा कीं, आदिलशाही अथवा मोंगलाई या एकमेकाविरुद्ध असणाऱ्या कोणत्यातरी शाहीच्या अंमलांत मनसबदार म्हणून आपण राहावयाचें कीं काय हा प्रश्न शिवाजीच्या मनांत घोळूं लागला. कारण, आपला प्रांत या दोहींच्या सरहद्दीवर असल्यामुळें आणि त्या परस्परांत भांडण-तह होऊन त्यांनींच आपल्या ठिकाणीं माझ्या देशाविषयीं व मजविषयीं मनास येईल तें ठरवावें व तें मला बंधनकारक व्हावें—आणि असें प्रसंगहि नेहमीं यावयाचें—यामुळें वरील प्रश्न शिवाजीला सोडवावा लागला व त्याचें उत्तर देतांना, वडील शहाजींचे अनुभव लक्षांत घेऊन, शिवाजीनें स्वातंत्र्यप्रस्थापनेचाच विचार आपल्या मनाशीं दृढ केला असल्यास नवल नाहीं. या ध्येयाची पूर्व तयारी म्हणजे या दोन्ही तिन्ही दरबारांना त्यांचे प्रांत घेऊन शिवाय, हा शिवाजीराजा पदरचा म्हणून नव्हे तर बरोबरीचा म्हणून मानण्याइतपत आहे, याकरितां आपलें कार्य व आपली योग्यता त्यांना चांगली पटविली पाहिजे; हें शिवाजीराजांनीं ध्यानीं आणून तशी योजना केली. प्रथम त्यांनीं नरमाईचें—कारण जुन्नर-नगर हा मुलूख लुटला होता—परंतु आपला मूळचा व आतां घेतला जाईल तो 'आदिलखानां-कडी'ल प्रांत आपल्याकडे राहण्याच्या दृष्टीनें सावधगिरीचें, असें एक पत्र औरंगजेबाकडे पाठविलें ( यांतील आदिलखान हा शब्द लक्ष्य आहे ). त्यांत म्हटलें आहे कीं, 'आपले वतनी महाल, किल्ले व कोंकणदेशसुद्धां नगरवाले खेरीज, विजापूरकर आदिलखानाचे इलाख्यांत जे आहेत ते त्यांजकडून मुलूख हस्तगत जाहल्यानंतर बंदोबस्त होण्याविषयीं वचन असावें. म्हणजे सोनोपंत यास हुजूर पाठवितों आणि इकडील लक्षांत वागून सरकारी मुलखाची सरहद्द रक्षण करून कामदाराशी षरीक (वाटेदार, सहाय्यक) होतो. कीं, ज्यायोगें बंड वगैरे बखेडे न होवोत' ( ले. ७३९ ). हें पत्र शिवाजीनें अशी संधी साधून पाठविलें कीं, पत्राचें उत्तर सहानुभूतीचेंच यावें. औरंग-

जेब या वेळीं इकडील मुलूख सोडून दिल्लीची गादी मिळविण्याकरतां चालला होता. अर्थात्, आपल्यामागें आपल्या या मुलखावर स्वाऱ्या यावयाच्या म्हणजे शिवाजीच्याच. तेव्हां त्या न येतील असें केलें म्हणजेच इकडील प्रांतांच्या सुरक्षिततेची व्यवस्था केल्यासारखें झालें. कारण, याच वर्षीं औरंगजेबानें मुलतफतखान, नौसिरीखान व मीरजुमला या तिघांनाहि 'सावधगिरीनें रहाणें' इ. अशीं केवळ शिवाजीविषयींच पत्रें लिहिलीं आहेत. पण औरंगजेबास हें माहीत होतें कीं, आपले अंमलदार ठाण्यावर असले तरी, शिवाजीच्याच न येण्याची तजवीज व तीहि त्याच्याशींच संगनमत करून केली तर, तोच सुरक्षिततेच्या व्यवस्थेचा मुख्य भाग आहे. कारण, वैशाखज्येष्ठांत शिवाजीनें जुन्नर लुटलें अथवा नौसिरीखानाशीं युद्ध केलें त्या वेळीं हे ठाणेदार आपआपल्या जागीं होतेच. तेव्हां हे ठाणेदार व शिवाजी या दोघांसहि इशारा देऊन आणि सहानुभूतींत घेऊन इकडील बंदोबस्ताचा मार्ग पत्करणें औरंगजेबास सोयीचें वाटलें व तसें करून तो दिल्लीकडे गमन करतां झाला. शिवाजीनेंहि वरील पत्रानें आपण मागें केलेली आगळीक पचविली व पुढें करावयाच्या कार्याचा निर्देश करून औरंगजेबास खूषहि केलें. आणि आपल्या वर निर्दिष्ट केलेल्या उच्च ध्येयास अनुसरून सोनाजीपंत या वकिलास बादशहा औरंगजेब यास देण्याकरितां बरोबर नजराणा देऊन दिल्लीकडे रवाना केलें.

अशा तऱ्हेनें मोंगलांकडील व्यवस्था करून शिवाजीनें आदिलशाहीवर स्वारी केली. ही स्वारी कर्नाटकच्या बाजूला केली. 'साहेब कर्नाटक प्रांतीं मसलतीस गेले' (ले. ७५३). तेरदाळकडील देशमुखांच्या कागदांतहि असें आलें आहे कीं, "मा। अनाम दलपतराव सर हवलदार व मुगीगौडा याणी तुमचे मुदेबरहुकूम सवाद पाठविला कीं, सालगुदस्त शिवाजीची फितरत होउनु घोडाराऊत तहत रायेबाग व अडगलपावेतों काबीज करून मौजे हारोगेरापावेतों घोडाराऊत जाधवराऊ आले...." हें पत्र श. १५८२ माघ व. ७ चें आहे. ह्याप्रमाणें श. १५८० तील शिवाजीच्या कर्नाटकांतील स्वारीचे कांहीं उल्लेख उपलब्ध व प्रसिद्ध आहेत (ले. ७८०). या वेळीं रणदुल्लाचा मुलगा रुस्तुमजमा हा लखमसावंताला जिंकण्याकरतां निघाला होता (ले. ७४८). लखमसावंतासहि या प्रसंगीं कोणाचें तरी साहाय्य पाहिजे होतें. विजापुरकराविरुद्ध पोर्तुगीजांची मदत आपणांस मिळेल असें सावंतास वाटलें नाहीं. कारण, पोर्तुगीज व विजापूरकर यांच्यांत

नुकताच झालेला सलोखा विरघळून विजापूरकरांचीच पोर्तुगीजावर स्वारी होण्याचा रंग दिसत होता ( ले. ६९९ ). शिवाय शिवाजीनेंहि चौलकडे पोर्तुगीजास उपद्रव देण्यास प्रारंभ केला होता (ले. ७४७); अशा फिकिरींत पोर्तुगीज सांपडल्यामुळें आपल्यांपैकीं, वाढत्या सामर्थ्यानें अदिलशाहीला 'खाल्लें तर बाधेल व टाकलें तर श्रापेल' असा होऊन बसलेला शहाजीपुत्र शिवाजी याचीच मदत घेणें लखमसांवंतास श्रेयस्कर वाटलें व तसा त्या उभयतांत तहहि झाला ( ले. ७६५ ). या तहाचीं पांचच कलमें आहेत. पण तीं अतिशय महत्त्वाचीं व शिवाजीचें उद्दिष्ट व धोरण स्पष्ट करणारीं आहेत. " (१) प्रांताचा निमा आकार हुजूर देऊन राहील निमा त्यांत ३ ह. लोक ठेवावे व बोलावूं तेव्हां या लोकांसह सेवा करावी, ( २ ) किले फोंडा प्रांत तालुका घेऊन हुजूर ठेविला त्यास हरएक प्रसंगीं कुमक राखीत जावी. बिदनूर वगैरे संस्थानच्या खंडण्या घेण्यास स्वारी होईल त्याच्या कुमकेस जात असावे, ( ३ ) स्वराज्यसाधनाच्या ठायीं वकिलापाशीं मर्धे राहून तुरुक लोकांचें साधान करावें ( मारावे ), ( ४ ) प्रांतांतील जमाबंदीच्या चौकशीस हुजूरहून लोक राहातील ते ठेऊन त्यांच्या नेमणुकीबद्दल हुजूर अंमलप्रमाणें पावते करावें, ( ५ ) प्रांतमजकूरची देसकत वतनें व कितावत अजरामरामत चालेल. त्यांतील किल्लेकोट व ठाणीं तुमच्या स्वाधीन केलीं आहेत. तेथें दास्तान करून जतन करावीं. तेथें हुजूरचे कारकून व लोक येतील ते ठेवावे." या तहांत शिवाजी खजिना व लोक कसे मिळवी, जो प्रांत आपलासा झाला त्यावरील जमाबंदीचे अधिकारी ठेवण्यांत व तेथल्या मूळच्या अधिकारात ढवळाढवळ होऊं न देतां त्यावरहि आपलें वर्चस्व राखण्यांत शिवाजी आपलें धोरण कसें आखी हें स्पष्ट समजून येत आहे. विशेषतः बिदनूर वगैरे संस्थानच्या खंडण्या घेणें व स्वराज्यसाधनांत तुर्कांचें साधान करणें यांत तर शिवाजीराजांच्या उद्दिष्टाची पूर्ण कल्पना येते. ज्याप्रमाणें शिवाजीनें यापूर्वी कल्याणभिवंडी घेतली व लगेंच तेथें आपले अधिकारी नेमिले किंवा कोंढाणा किल्ला घेऊन बाराहि मावळांवर आपला कृष्णाजी भास्कर हा स्वतंत्र अधिकारी नेमिला त्याप्रमाणेंच, या कुडाळच्या तहांत तेथील जमाबंदीच्या चौकशीस हुजूरचे लोक ठेवण्याचें जें ४ थें कलम आहे, तें लक्षांत घेतां शिवाजीची दृष्टि किती खबरदार किंवा साक्षेपी होती हें दिसून येतें. या तहानंतर शिवाजी शिवापट्टण येथें आला.

ह्याच वर्षीची शिवाजीच्या बाबतींतलि आणखी एक नमूद करण्या-जोगी गोष्ट म्हणजे समर्थ रामदासस्वामी यांच्या चाफळ येथील श्रीरामाचे उत्साहास प्रतिवर्षी होन दोनशें देत जाण्याबद्दल दत्ताजीपंत वाकेनवीस यांस शिवाजीराजे यांनीं आज्ञा केली, ही होय (ले.१०४०). शके १५८० च्या अखेरीस शिवाजी कर्नाटकांतून परत येऊन शिवापट्टणास राहिला. श. १५८१ च्या ज्येष्ठांत शिवाजीनें बाजीप्रभू यांस पत्र लिहून हिरडसमावळांमधील ओस पडलेला गड दुरुस्त करून त्यावर इमारती, अलंगा, वगैरे बांधून तो वसती-योग्य केला. नांव मोहनगड ठेविलें (ले.७७३).

एकंदरींत श. १५७१ मध्यें अफजलखानाची नेमणूक वाई परगण्यावर झाल्यापासून शिवाजी व अफजलखान यांमधील वितुष्ट वाढत्या प्रमाणावर राहून त्याचेंच पर्यवसान अफजलानें शिवाजीस नेस्तनाबूद करण्याची प्रतिज्ञा करण्यांत झाला. शहाजीला कैदी ह्या नात्यानें जिंजीहून आणतांना अफजलानें त्याचें मन दुखविलेंच होतें. आणि त्यानंतर खानानें जावलीवर स्वारी काढली तेव्हां ती यशस्वी न होण्यास कारण काय झालें तें पाहूं गेलें असतां शहाजी व शिवाजी यांचेविषयीं स्नेहबुद्धि मनांत वसत असल्यामुळें कान्होजीनें अफ-जलखानाच्या इच्छेप्रमाणें हालचाल केली नाहीं व खानाच्या मोहिमेस यश येऊं दिलें नाहीं असें दिसतें. त्यानंतर श. १५७६ मध्यें कनकगीरची स्वारी झाली त्या वेळीं संभाजी मरण पावला; त्याचें कारण अफजल व शहाजी यांच्यामधील तेढ असेल असें बखरकार सांगतात. आणि ( ले. ६८८ ) मधील बादशाही फर्मानावरून खान कनकगिरीच्या नायकाचा पक्षपाती, तर शहाजी हा त्याच्या विरुद्ध पक्षाचा असून बादशहा अफजलाची तरफदारी करतो, असा स्पष्ट देखावा दिसतो. ह्या वेळीं कर्नाटक जिंकण्याची अनावर प्रवृत्ति आदिलशाही दरबारांत वाढली होती. यामुळें खानास कर्नाटकांत राह-ण्याचा हुकूम होऊन शहाजी श. १५७६ अखेर देशीं आला तो वर्षभर म्ह. १५७७ मार्ग० ( ले. ७०१ ) पर्यंत इकडेच होता. तो जातांच शिवा-जीनें जावळी सर केली. तेव्हां अर्थात्च अफजलखानाचा त्याला अडथळा होऊं शकला नाहीं. याचें कारण, खान व इतर अदिलशाही सरदार ह्यांचें लक्ष मीरजुमला प्रकरणामुळें उपस्थित झालेल्या मोठमोठया व महत्त्वाच्या भानगडींत गुंतलें होतें. त्यानंतर महंमद आदिलशहा मरण पावून औरंगजेबानें विजापूर सर करण्यासाठीं स्वारी केली. तेव्हां तर, अफजलखान दरबारांतील

मुख्य वजीर जो खान महमद त्याला चीत करून स्वतः सर्वाधिकारी बनण्याच्या खटाटोपांत होता. तेवढ्यांत शिवाजीनें जुन्नरास लूट मिळवून कल्याण-भिवंडी सर करून व त्याच प्रांतांतील लोकांची आपल्या सैन्यांत भरती करून शिवाजी मोठा फौजबंद बनला आणि कर्नाटकांत शहाजीहि ' आपण रजपूत लोक, पेस्तर हजरतसाहेबास आपला दरकार असेल तरी हिसाबी आपला सरंजाम सदरहू केला पाहिजे' असें बेधडकपणें बजावून सांगूं लागला. अर्थात् ह्या पितापुत्रांचें महत्त्व खानाला अगदीं असह्य झालें. त्यांतच शिवाजीनें खानाच्या ताब्यांतील कृष्णाकांठचा मुलूख दौड करून लुटल्यामुळें आगींत तेल ओतल्यासारखें होऊन खान 'प्रतिपच्चंद्ररेखेव' वर्धमान होणाऱ्या शिवाजीस ग्रासण्याकरतां धावून जाण्यास उत्सुक होणें स्वाभाविक होय. तात्पर्य, शिवाजीराजांनीं श. १५७१-१५८१ ज्येष्ठापर्यंत हालचाल केली तींत त्यांनीं बराच प्रांत हस्तगत केला. पण तो घेतांना शिवाजीराजांना आदिलशाही वजिरास म्हणजे सरदारास ठार करण्याचा प्रसंग आला नाहीं. तो प्रसंग अफजलखानानें ओढून घेतला. ती हकीकत पुढील प्रकरणीं आली आहे.

# प्रकरण सातवें

# अफजलखानाची स्वारी

अफझलखानाची स्वारी हा शिवाजीमहाराजांच्या आयुष्यांतील व स्वराज्यस्थापनेच्या उद्योगांतील पहिला आणीबाणीचा प्रसंग होय. यानंतरच्या त्यांच्या आयुष्यांत अफझलप्रसंगाशीं तुलना करतां येण्यासारखे आणखी दोन प्रसंग सांगतां येतील. ते जयसिंगाची स्वारी व त्यानंतर लवकरच आग्रा येथील अटक हे होत. ह्या सर्व प्रसंगांत अतुल साहस पण त्याबरोबरच सूक्ष्म सावधपणा, वेळीं वेतसवृत्तीचें अवलंबन करण्याची तयारी, संकटांत धीर न सोडतां विविध उपाययोजना करण्याचें कौशल्य, आपले अनुयायी आपल्याकरितां प्राणाचीहि आहुति देण्यास तयार व्हावेत अशा प्रकारची त्यांच्यावर छाप—इत्यादि लोकनायकाच्या आंगीं अवश्य असलेले अनेक गुण महाराजांच्या ठिकाणीं दिसून आले. या गुणांमुळें त्यांना जें यश मिळालें त्यामुळें महाराज हे दैवी अवतार आहेत अशी कल्पना त्यांच्या हयातींतच रूढ होऊं लागली. व या कल्पनेमुळें पुन्हां महाराजांच्या यशांत भर पडण्याला मदतच झाली असली पाहिजे. असो वर उल्लेखिलेल्या तीन प्रसंगांपैकीं अफझलप्रसंगाचें, पहिला म्हणून विशेष महत्त्व आहे. या प्रसंगाची हकीकत प्रस्तुत निबंधांत देण्याचें योजिलें आहे.

क्रमानें हकीकत देण्यापूर्वीं ज्या आधारांवर या निबंधाची रचना केली आहे त्यासंबंधानें व अफझलप्रसंगांतील कांहीं वादग्रस्त मुद्दयांसंबंधानें चार शब्द सांगणें युक्त होईल. अफझलप्रसंगाची माहिती ज्या कागदांवरून व ग्रंथांवरून मिळते, त्यांचे दोन मुख्य विभाग व प्रत्येक विभागाचे दोन पोटविभाग करितां येतील. दोन मुख्य विभाग म्हणजे (१) मराठ्यांकडील मराठी व संस्कृतमध्यें असणारे कागद व ग्रंथ व (२) परकीय, म्हणजे मुसलमानी इंग्रजी किंवा डच. यांपैकीं प्रत्येकाचे तत्कालीन व नंतरचे असे दोन पोटविभाग करतां येतील. यांपैकीं पहिल्या भागांतील पहिल्या पोटविभागांत शिवभारत, जेधे शकावली व अज्ञानदासाचा पोवाडा हे तीन येतील. तत्कालीन पत्रांचा याच ठिकाणीं समावेश व्हावयाचा. परंतु, अफझलप्रसंगावर विशेष प्रकाश पाडणारीं तत्कालीन पत्रें उपलब्ध नाहींत.

नाहीं म्हणावयास त्रैमासिक वर्ष ७ यांतील अफझलखानाचें शिवाजी जेध्याला पत्र ( शिवकालीन पत्रसारसंग्रह—ले. ७८२ ) व राजवाडे खंड १७ मधील अफझलखानाचें विठोजी हैबतरावाला पत्र (ले. ७९८ ) हीं दोन पत्रें उपलब्ध आहेत. खंड १५ लेखांक ३३६ (ले. ५६१) व ३३८ (ले. ५५८) हीं दोन पत्रें १५८१ मधील आहेत, असें रा. भावे यांनीं आपल्या निबंधांत गृहीत धरलें होतें. पण तीं १५८१ चीं नसून १५७१ चीं आहेत असें मानण्यास बराच पुरावा आहे. पहिल्या भागांतील दुसरा पोटविभाग म्हणजे सभासद बखर, ९१ कलमी बखर, व जेधे करीणा ह्यांचा. चिटणीशी बखरींतील अफझलप्रसंगाचें वर्णन सभासदी व ९१ कलमी बखरींवरूनच केलेलें दिसतें. जेधे करीण्याचाहि आपणाला तितकासा उपयोग नाहीं. हा करीणा शके १६११ नंतर केव्हां तरी जेधे यांच्या संग्रहीं असलेली शकावली व पत्रें यांच्या आधारांवर लिहिलेला आहे. खंड १५ ले.३३६व ३३८ यासंबंधानें रा. भाव्यांची जी चुकीची समजूत झाली म्हणून वर लिहिलें आहे तीच जेधे करीणा लिहिणाराचीहि झाली आहे. एकंदरींत शिवभारत, जेधे शकावली, पोवाडा, सभासदी बखर व ९१ कलमी बखर हींच आपलीं अफझलप्रसंगावरील मुख्य साधनें होत. त्यांतहि शिवभारत विशेष महत्त्वाचें आहे. शिवभारत हें काव्य असलें तरी त्यांतील इतिहास कसोशीनें व काळजीपूर्वक माहिती मिळवून लिहिलेला आहे, हें अजून सर्वसंमत झालेलें नाहीं, पण कालांतरानें होईल. यासंबंधानें अफझलप्रसंगवर्णनांतील एक दोन गोष्टी लक्षांत घेण्यासारख्या आहेत. २१ व्या अध्यायांत शिवाजीमहाराज व खान यांच्यामध्यें भेटीचा करार झाला, त्याचें वर्णन देतांना प्रत्येकाच्या पाठीमागें बाणाच्या टप्प्यावर दहा दहा सैनिकांनीं रहावें असें सांगितलें आहे. पुढें भेटीनंतर खानाची व महाराजांची झटापट झाली. तेव्हां दोन्हींकडून हे दहा सैनिक धांवून आले, त्यांचीं नांवें देतांना महाराजांकडील संभाजी कावजी, जिवा महाला वगैरे दहाहि जणांचीं नांवें दिलीं आहेत, पण खाना-कडील लोकांचीं नांवें देतांना सय्यद अबदुला, बडा सय्यद, रहीमखान, पहिलवानखान, पिलाजी व शंकराजी मोहिते अशीं सहा नांवें देऊन बाकींच्या चारांचीं नांवें माहीत नसल्यामुळें 'चत्वारोऽन्येऽपि यवनाः' एवढेंच म्हटलें आहे. कविकल्पनेनेंच नांवें द्यावयाचीं असतीं तर आणखी चार नांवांची भरती करणें कठीण नव्हतें. शिवभारतांत या प्रसंगासंबंधानें

ज्या नांवांचा उल्लेख केला आहे त्यांपैकीं बडा सय्यद, कृष्णाजी भास्कर, संभाजी कावजी, जिवा महाला, येसाजी कंक यांचीं नांवें इतरत्र आढळतात. उलट शिवभारतांत ज्यांचीं नांवें आलीं आहेत त्यांपैकीं अमुक एक या प्रसंगीं हजर नव्हता, किंवा तो हजर असणें अशक्य आहे, असें सिद्ध झालेलें नाहीं. हें जें अफझलप्रसंगासंबंधानें म्हटलें तें इतर प्रसंगांनाहि लागू आहे. या अन्वयव्यतिरेकावरून या काव्याच्या पाठीमागें परिश्रमपूर्वक मिळविलेली विश्वसनीय माहिती आहे, असा मनाचा ग्रह होतो. अर्थात्, शिवभारत हें महाराजांच्या गौरवार्थ लिहिलेलें काव्य असल्यामुळें त्यांत अतिशयोक्तीचा भाग असणार व त्यांतील प्रत्येक वाक्य प्रमाणभूत मानावयाचें नाहीं, हें उघडच आहे. जेधे शकावली व पोवाडा यांसंबंधानेंहि थोडाबहुत हाच प्रकार आहे. जेधेशकावली बहुतांशीं विश्वसनीय असली तरी तिच्यांतील जेध्यांसंबंधांचे उल्लेख तसेच घेऊन चालणार नाहीं. जो सर्जाराव जेधे शकावलींत एकसारखा ' तरवारीची शर्त ' करतो, त्याचें नांवहि आपणांला इतर साधनांवरून कळत नाहीं. तेव्हां शकावलींतील जेध्यांच्या मर्दुमकीचें वर्णन हें जरा सावधगिरीनेंच घेतलें पाहिजे. पोवाडा हा तर शाहिरी कवन, तेव्हां त्यांत कवनाला रंग येण्याकरितां कांहीं कमी अधिक केलें असण्याचा संभव असावयाचाच.

असो, एकंदरींत मराठ्यांकडील आधारग्रंथांचें स्वरूप अशा प्रकारचें आहे. शिवभारत, शकावली, पोवाडा हे समकालीन व म्हणूनच विशेष आदरणीय व त्यांना पूरक म्हणून सभासदी व ९१ कलमी बखरी, हे सर्व ग्रंथ बहुतांशीं परस्परांना पोषक असेच आहेत. एकदोन स्थळीं मात्र त्यांचा एकमेकांत विरोध येतो व अशा वेळीं निर्णय करणें कठीण जातें. त्यांचा प्रथम विचार करून मग आधारग्रंथांच्या दुसऱ्या भागाकडे म्हणजे परकीय साधनांकडे वळूं.

पहिलें वादस्थळ म्हणजे भेटीच्या वेळीं जिजाबाईसाहेब प्रतापगडावर होत्या किंवा नाहीं. ९१ कलमी बखरींत व पोवाड्यांत महाराज जिजाबाई-साहेबांचा निरोप घेतात, त्या वेळचें हृदयंगम वर्णन दिलें आहे व भावे यांनींहि आपल्या निबंधांत तें तसेंच घेतलें आहे. उलट सभासदी बखरींत महाराज राजगडाहून मातोश्रींचा निरोप घेऊन प्रतापगडास आले असें म्हटलें आहे. म्हणजे सभासदी बखरीप्रमाणें जिजाबाईसाहेब भेटीच्या वेळीं प्रतापगडीं नव्हत्या.

शिवभारतांत २१ व्या अध्यायाच्या प्रारंभीं भेटीच्या तयारीचें वर्णन आहे. त्यांत जिजाबाईंचा उल्लेख नाहीं. यावरून त्या प्रतापगडीं नव्हत्या हेंच अनुमान निघतें. अनुल्लेख हें अनस्तित्वाचें गमक नव्हे हें सामान्यतः खरें असलें तरी जेथें उल्लेख जवळजवळ अपरिहार्य आहे तेथें तो नसेल तर तें अनस्तित्वाचें गमक समजणें योग्य होईल. असो. याप्रमाणें शिवभारत व सभासद एका बाजूला, व पोवाडा व ९१ कलमी बखर दुसऱ्या बाजूला, अशी स्थिती आहे.या ठिकाणीं शिवभारत व सभासद यांना प्रमाण मानावें असें मला वाटतें; ऐकणारांची मनोवृत्ति उचंबळविणें हा पोवाडा म्हणणाराचा जर मुख्य हेतु तर जिजाबाईंचा महाराजांना निरोप यासारखा भावनोद्दीपक प्रसंग खरोखर घडला नसला तरी कल्पनेनें निर्माण करण्याचा मोह कोणत्या शाहिराला आवरेल ?

दुसरा प्रश्न वाघनखांसंबंधींचा. महाराजांनीं वाघनखांनीं खानाचीं आंतडीं बाहेर काढलीं असा उल्लेख पोवाडा सभासदी व इतर बखरी व जेधे करीणा यांमध्यें आढळतो. परकीय ग्रंथांतून महाराजांनीं हातांत किंवा आंगरख्याखालीं लपविलेल्या हत्यारानें खानाला मारलें असें वर्णन आढळतें. शिवभारत, जेधे शकावली व ९१ कलमी बखर यांमध्यें वाघनखांचा उल्लेख नाहीं. शिवभारतांत 'कृपाणिका' असें म्हटलें आहे, ९१ कलमी बखरींत बिचव्याचा व पट्टयाचा उल्लेख आहे, शकावलींत कोणत्याहि हत्याराचा निर्देश नाहीं. रा. भावे यांनींहि वाघनखांची कल्पना ही पोवाडेकारानें कवनाला रंग येण्यासाठीं काढली, व वाघनख हातांत घातलें असतां सहज दिसूं शकतें, त्या अर्थी महाराजांसारख्या धूर्त माणसानें तें घातलें नसावें, असें म्हणून वाघनखांची गोष्ट अनैतिहासिक ठरविली आहे. एकंदरींत शिवभारत, जेधे शकावली व पोवाडा ह्या तत्कालीन तीन साधनांपैकीं फक्त पोवाडयांतच वाघनखांचा उल्लेख असल्यामुळें, त्याचप्रमाणें रा. भावे यांनीं दिलेल्या कारणामुळें, वाघनखांचा उपयोग महराजांनीं केलेला नसावा असें वाटतें. तथापि या बाबतींत निश्चित मत देतां येत नाहीं.

आतां परकीय साधनांकडे वळूं. यांमध्यें १ ल्या पोटविभागांत म्हणजे तत्कालीन साधनांत आदिलशहाचें कान्होजी जेध्याला फर्मान, राजापूरच्या इंग्रजी व्यापाऱ्यांनीं १० डिसेंबर १६५९ रोजीं लिहिलेलें पत्र (ले.७९१) व वेंगुर्ल्याच्या डच व्यापाऱ्यांचें १६६० एप्रिलमधील पत्र (ले. ८१२) हीं मुख्यत्वेंकरून येतात. हिंदुस्थानांत आलेल्या परकीय प्रवाशांपैकीं मनुची व

डॉ. फ्रायर यांनींहि आपल्या अनुक्रमें Storia do Mogor व Travels या पुस्तकांतून अफझलप्रसंगाचा थोडा उल्लेख केलेला आहे, पण त्यांना कर्णोपकर्णीं ऐकून माहिती मिळाली ती त्यांनीं दिली. शिवाय डॉ. फ्रायर हा तर शिवाजी महाराजांच्या कारकीर्दीच्या अखेरीच्या सुमारास आलेला.

परकीय साधनांच्या दुसऱ्या विभागांत खाफीखानाचा इतिहास, बुसातिने सलातीन, महमदनामा हे ग्रंथ येतात. या सर्व साधनांबद्दल असें म्हणतां येईल कीं, त्यांच्यावरून अफझलप्रसंगाच्या वेळची सर्वसाधारण राजकीय परिस्थिति काय होती हें समजण्यास मदत होते. पण प्रत्यक्ष अफझलप्रसंगा-संबंधानें फारशी विश्वसनीय हकीकत मिळत नाहीं. अफझलखानाचें मुख्य उद्दिष्ट काय होतें, खानाची व महाराजांची भेट होण्याचें कसें ठरलें व भेटीचा करार काय झाला, व प्रत्यक्ष भेटीच्या वेळीं काय झालें हे या प्रसंगासंबंधीं मुख्य मुद्दे होत. यांपैकीं पहिल्या संबंधानें अफझलखान कोणत्याहि उपायानें महाराजांचा निःपात करण्यासाठीं आलेला होता ( ले. ७७४ ) हें आपल्याला तत्कालीन पत्रांवरून व फर्मानांवरून कळतें. तिसऱ्या मुद्द्यासंबंधानें म्हणजे प्रत्यक्ष भेटीच्या वेळीं काय घडलें, खानानें महाराजांची मान दाबून त्यांना मारण्याचा प्रयत्न केला किंवा नाहीं या संबंधानें मुसलमानी पक्षांतील लोकांना खरी हकीकत कळणें अशक्यच होतें. कारण प्रत्यक्ष भेटीच्या प्रसंगीं हजर असणाऱ्या मुसलमानांपैकीं कोणीहि जिवंत राहिला नाहीं. शरण येणाऱ्या शिवाजीची भेट घेण्याकरितां आपला सेनापति जातो, तों इतक्यांत त्याचा खून होतो व आपल्या सैन्यावर चोहों बाजूंनीं हल्ला होतो, यावरून महाराजांनीं विश्वासघातानें खानाचा खून केला असा समज सर्व मुसलमान लोकांत पसरावा, यांत नवल नाहीं. हीच हकीकत फैलावून, कर्णोपकर्णीं होऊन कमीअधिक विकृत स्वरूपांत युरोपियन व्यापाऱ्यांच्या व प्रवाश्यांच्या कर्णीं गेली असली पाहिजे. उदाहरणार्थ, वर ज्या दोन (डच व इंग्रजी) समकालीन पत्रांचा उल्लेख आला आहे त्यांपैकीं एकांत महाराजांनीं जिजाबाईंना अफझलखानाकडे ओलीस ठेविलें, व दुसऱ्यांत महाराजांनीं जिजाबाईंना खानाकडे रदबदली करण्याकरतां पाठविलें असें सांगितलें आहे. मुसलमानी इतिहासकारांच्या ग्रंथांतूनहि महाराजांच्या विश्वासघाताचीच हकीकत दिलेली असावी, हेंहि स्वाभाविकच आहे. वरील पत्रांतील जिजाबाईसंबंधीं हकीकत म्हणजे कर्णोपकर्णीं ऐकलेली हकीकत

किती विकृत होऊं शकते, याचें उत्तम उदाहरणच आहे. बुसातिने सलातीन या Late but reliable इतिहासांत अफझलप्रसंगासंबंधानें असें सांगितलें आहे कीं, महाराजांनीं खानाला गडावर मेजवानीला बोलाविलें व तेथें त्याचा खून केला. ह्या हकीकतीचें मूळ असें दिसतें कीं, महाराजांनीं खानाची मंडळी भेटीला आली तेव्हां त्यांना मेजवानी दिली असावी. डच व्यापाऱ्यांच्या पत्रांतहि खानाबरोबरचे लोक शिवाजीनें पाठविलेले खाण्याचे पदार्थ खात होते तों इतक्यांत खानाचा खून झाला असें वर्णन आहे. खाफीखानहि भेटीनंतर शिवाजीनें खानाला मेजवानी द्यावयाचें ठरलें होतें असें म्हणतो. चिटणीशी वगैरे बखरींतून खान वाईहून जावळीला आला तेव्हां महाराजांनीं 'मुक्कामाची जागा नेमली होती तेथें मंडप व सामानसाहित्य सर्व फौजेचें बेजमीचें असें करून ठेविलें होतें,' असें वर्णन आढळतें. शिवभारतांतहि महाराजांनीं 'आलेल्या पाहुण्यांचा अतिथिप्रमाणें यथाविधी सत्कार करावा' असें ठरलें असल्याचें सांगितलें आहे. घरीं आलेल्या अतिथींचा भोजनानें सत्कार करण्याचा शिष्टसंमत मार्ग आहेच, त्याला अनुसरून गडावर आलेल्या पाहुण्यांकरितां मेजवानीची व्यवस्था महाराजांनीं केली असावी. असो, एकंदरींत अफझलप्रसंगाच्या वर्णनाची इमारत बहुतांशीं मराठ्यांकडील साधनांवरच रचली पाहिजे, व प्रो. सरकार यांनींहि आपल्या शिवचरित्रांत तसेंच केलें आहे.

शके १५८१च्या वैशाखांत विजापूरदरबारकडून शिवाजीमहाराजां-विरुद्ध अफझलखानाची नेमणूक करण्यांत आली. शके १५७७ त महा-राजांनीं जावळी घेतली तेव्हांपासून त्यांचें आक्रमण सुरू होतें, व त्यांना पायबंद घालणें हें विजापूरदरबारला अवश्यक झालें होतें. पण १५८१पर्यंत हें विजापूरला शक्य नव्हतें. प्रथम महमद आदिलशहाचें आजारपण, त्यानंतर त्याचा मृत्यु, मोंगलांची विजापूरवर स्वारी व नंतर मुत्सद्यांतील अंत:कलह इत्यादि भानगडींमुळें विजापूरदरबारला शिवाजीमहाराजांकडे लक्ष देण्यास सवड झाली नाहीं. १५७९ व १५८० त खानमहमद, फत्तेखान, व बहलोलखान हे कांटे दूर केल्यावर शिवाजीमहाराजांच्या बंदोबस्ताचा प्रश्न हातांत घेण्यांत आला. या वेळीं विजापूरदरबारचीं सूत्रें बादशहा अल्पवयी असल्यामुळें त्याची आई बडी साहेबीण हिच्या हातांत होतीं. वजीरपद खवासखानाकडे होतें. अफझलखान हाहि दरबारच्या प्रमुख मुत्सद्यांपैकीं

एक होता. त्यानें केलेल्या तक्रारीमुळेंच खानमहमद प्राणास मुकला होता. शिवाजीमहाराजांच्या बंदोबस्ताकरितां दरबारनें प्रथम शहाजीमहाराजांना लिहून पाहिलें. पण 'शिवाजी आपला पुत्र असला तरी तो आपल्या हुकुमांत नाहीं, दरबारनें त्याचा बंदोबस्त वाटेल तसा करावा, आपलें त्याबद्दल कांहीं म्हणणें नाहीं.' अशा अर्थाचें उत्तर शहाजीमहाराजांकडून आल्यावर शिवाजीवर स्वारी करणें प्राप्त झालें. या मोहिमेचें आधिपत्य कोणाकडे द्यावें याचा विचार दरबारांत चालू असतांना 'शिवाजी म्हणजे काय ? चढे घोडियानिशीं जिवंत कैद करून घेऊन येतों.' अशी अफझलखानानें प्रतिज्ञा केल्यावरून त्याला तें देण्यांत आलें व मोठया सन्मानानें त्याची रवानगी करण्यांत आली.

अफझलखान हा विजापूरदरबारांतील प्रमुख मुत्सद्यांपैकीं एक होता हें वर सांगितलेंच आहे. दरबारांतील हें प्रमुख स्थान त्यानें आपल्या शिपाइगिरीच्या गुणावर मिळविलेलें होतें. प्रथम तो रणदुल्लाखानाचा खिदमदगार होता. शके १५५८ पासून विजापूरनें कर्नाटकांत ज्या स्वाऱ्या केल्या त्यांत रणदुल्लाच्या हाताखालीं त्यानें मर्दुमकी करून नांव मिळविलें. 'समुद्रापर्यंत माझ्या राज्याचा विस्तार झाला व समुद्रापलीकडे सिंहलद्वीपांतहि माझ्या नांवाची जी भीति वाटत आहे ती तुझ्या पराक्रमामुळेंच;' असे शब्द शिवभारतांत आदिलशहाच्या तोंडीं अफझलखानाला उद्देशून घातले आहेत. पण अफझलखानानें कर्नाटकांत मिळविलेला विजय केवळ बाहुबलारच मिळवला नव्हता असें दिसतें. रणदुल्लाखानानें शिऱ्याचा किल्ला घेण्याकरितां अफझलखानाला पाठवलें असतां अफझलखानानें तेथील राजाला भेटीला बोलावून त्याचा खून केला, अशी माहिती मिळते ( Mod. Review, July 1929, p. 9. ). रणदुल्लाखान १५६३ त मरण पावला. त्यानंतर ५।६ वर्षांनीं त्याच्याकडे असलेली वाई प्रांताची सुभेदारी अफझलखानाला देण्यांत आली व ती तेव्हांपासून त्याच्याकडेच होती. तेव्हां शिवाजीमहाराजांवर अफझलखानाला पाठवितांना दरबारनें आपल्या जवळच्या अत्यंत लायक माणसाची निवड केली, यांत शंका नाहीं. पण अफझलखानाची निवड करण्यांत आणखी एक प्रकारचें औचित्य होतें. त्याचें व शिवाजीमहाराजांचें जुनें—शहाजीच्याहि वेळेपासून चालत आलेलें—वैर होतें. १५७० त मुस्तफाखानानें शहाजीला कैद केलें, तेव्हां अफझलखानच त्याला विजापूरला घेऊन आला. पुढें १५७७ त कनकगिरीच्या युद्धांत

संभाजी मृत्यु पावला तोहि अफझलखानामुळेंच, असें बखरींतून आढळतें. तेव्हां शिवाजीवर पाठविलेला हा सरदार आपल्याकडून प्रयत्नांत कांहीं कसूर करणार नाहीं, याबद्दल दरबारला खात्री वाटण्यासारखी होती. दरबारचा अफझलखानाला हुकूम शिवाजीला ठार करावें किंवा जिवंत धरून आणावें असा होता.'

परंतु शिवाजीमहाराजांना सहज वठणीला आणण्याजोगें सैन्य खाना-बरोबर देण्याचें सामर्थ्य दरबारांत नव्हतें. मोंगलांबरोबरचें युद्ध, त्यानंतरची आपसांतील लाथाळी, बाळनायकी व स्त्रीनायकी यांमुळें विजापूरच्या राज्याची घडी विस्कळित झाली होती. त्यांतच सध्यां गोव्याच्या पोर्तुगीजांशीं युद्ध (ले. ७७१) सुरू होतें. त्यामुळें अफझलखानाचा सरंजाम पाहिजे तसा होणें शक्य नव्हतें. अफझलखानाबरोबर १२,००० स्वार दिले होते असें वर्णन बहुतेक सर्व ठिकाणीं आढळतें. याशिवाय १०,००० पायदळ व तोफा होत्या. तोफा किती होत्या तें नक्की सांगतां येत नाहीं; परंतु युद्धाच्या शेवटीं महाराजांना जो माल सांपडला, त्यांतील हत्ती, उंट, घोडे यांच्या संख्येवरून खानाबरोबर कमींत कमीं ७०।७५ मोठ्या तोफा, व ३००।४०० लहान पहाडी तोफा असाव्यात असा कॅ. मोडक यांनीं तर्क केला आहे. महाराजांजवळ सैन्य किती होतें याचा खात्रीलायक उल्लेख नाहीं. सभासदी बखरींत या सुमाराला महाराजांच्या पदरीं १०,००० घोडदळ व १०,००० मावळे होते असा उल्लेख आहे. ७०० पठाणांची एक तुकडी विजापूरच्या पातशाहींतून महाराजांकडे आली (चिटणीस ६८) तीहि याच सुमाराला असें ग्रँट डफ व जदुनाथ सरकार यांनीं गृहीत धरिलें आहे व तें संभवनीय दिसतें. ९१ कलमी बखरींत महाराजांच्या जवळ 'साठी हजार मावळे होते,' असें म्हटलें आहे. महाराजांची सैन्यसंख्या कांहींहि असली तरी एवढें खरें कीं, अफझलखानाजवळच्या सैन्यानें महाराजांशीं उघड मैदानांत लढाई करून यश येईल असा विजापूरदरबाराला भरंवसा वाटेना. म्हणून महाराजांशीं उघड लढाई न करतां सामोपचारानें बोलणें लावून त्यांचा नाश करावा. वीस वर्षांपूर्वींच्या शिऱ्याच्या इतिहासाची पुनरावृत्ति प्रतापगडीं करावी अशी सूचना अफझलखानाला देण्यांत आली होती (ले. ७९१).

विजापुराहून निघतांना सैन्य दिलें त्याशिवाय स्थानिक सैन्याची भरती करण्याकरितां 'आपल्या जमावानिशीं अफझलखानाला सामील व्हावें'

अशीं पातशाही फर्मानें मावळच्या देशमुखांना निघालीं होतीं ( ले. ७७४). शिवाय स्वतः अफझलखानहि ठिकठिकाणच्या देशमुखांना पत्रें लिहून ( ले. ७८२ ) मानमरातबाची लालूच दाखवून, आपल्या बाजूला ओढण्याचा प्रयत्न करीत होता. ह्या प्रयत्नांना यश येऊन बरेच देशमूख त्याला सामील झाले. अफझलखानाबरोबर असलेल्या मराठे सरदारांत घोरपडे, पांढरे, खराडे जाधव, मंबाजी भोसले, घाटगे, काटे, प्रतापराव मोरे, पिलाजी व शंकराजी मोहिते, इतकीं नांवें शिवभारतांत दिलीं आहेत. उत्रोलीचा देशमूख खंडोजी खोपडे हा फर्मान आल्यानंतर खानाला जाऊन मिळाला असें जेधे-शकावली व करीणा यांवरून कळतें. या देशमुखांवरचा हा प्रसंग खरोखरच फार कठीण होता. फर्मानाप्रमाणें खानाला जाऊन न मिळणें, किंवा उलट महाराजांना सामील होणें, हें धोक्याचें होतें. कारण अशा उघड बंडखोरीनें सर्वस्व-नाशच होण्याचा संभव अधिक. विजापूरच्या दृढमूल सत्तेशीं महाराज तोंड देऊं शकतील, अशी खात्री त्या वेळीं फारच थोड्यांची असेल. या आणीबाणीच्या वेळीं कारीचा देशमूख कान्होजी जेधे यानें महाराजांची बाजू धरली एवढेंच नव्हे तर आपलें वजन खर्च करून इतर कांहीं देशमुखांनाहि महाराजांच्या बाजूला वळवून आणलें असें जेधे शकावली व करीणा हीं सांगतात. मावळच्या इतर देशमुखांबरोबर कान्होजी जेधे यासहि फर्मान आलें. तें फर्मान घेऊन कान्होजी आपल्या पांच पुत्रांसह महाराजांच्या भेटीस गेला. महाराज म्हणाले ' तुमचे शेजारी केदारजी व खंडोजी खोपडे हे अफझल-खानाकडे गेले. तुम्ही पातशाही हुकूम मोडून राहिलांत तर वतनास अपाय होईल, कदाचित् प्राणावरहि बेतेल. तेव्हां तुम्हीहि जाणें. ' कान्होजी म्हणाला 'शहाजीमहाराजांनीं तुमचें सहाय्य करण्याविषयीं आमच्याकडून शपथ घेतली आहे. त्या शपथेला आपण जागणार. मग वतनाचें कांहींहि होवो. ' महाराजांनीं त्याला वतनावर पाणी सोडण्यास सांगितलें. त्याप्रमाणें त्यानें हातावर पाणी घेऊन सोडलें. मग महाराजांनीं त्याला आपलीं मुलेंमाणसें कारीहून तळेगांवाला नेऊन ठेवण्यास सांगितलें. त्यांत महाराजांनीं दोन गोष्टी साधल्या. एक कान्होजीचीं मुलेंमाणसें सुरक्षित राहिलीं, व त्यांच्या सुरक्षिततेची आपण काळजी वाहतों हें कान्होजीला दिसलें; दुसरी, कान्होजीचीं मुलेंमाणसें आपल्याकडे ओलीस राहल्यासारखीं झालीं व कान्होजीच्या एकनिष्ठतेसंबंधानें काळजी राहिली नाहीं. याप्रमाणें व्यवस्था झाल्यावर कान्होजीची व महाराजांची

परस्पर आणभाक झाली. नंतर महाराजांच्या सांगण्यावरून कान्होजी व इतर देशमुख यांची बैठक झाली. कान्होजी म्हणाला, 'आपण तर महाराजां-करतां वतनावर सुद्धां पाणी सोडलें आहे व आपण व आपले लेकसुद्धां महाराजांकरितां प्राणहि वेंचण्यास तयार आहों. मुसलमान बेइमान आहेत. आपलें काम झाल्यावर नसतें निमित्त ठेवून नाश करतील. महाराजांचें हें मऱ्हाष्ट्र राज्य आहे. सर्वांनीं हिंमत धरून एकनिष्ठेनें सेवा करावी.' कान्होजीचे हे हिंमतीचे शब्द ऐकून इतरांनाहि स्फूर्ति झाली व बांदल, हैबतराव सिलिमकर, पासलकर, मारणे, ढमाले, मरळ, डोहार हे सर्व महाराजांना मिळाले.

१५८१ च्या वैशाखांत पातशाही फर्मानें मावळच्या देशमुखांना आलीं, असें जेधे शकावली म्हणते. कान्होजी जेध्याला आलेलें फर्मान उपलब्ध आहे. त्याची तारीख आषाढ शु. ६ आहे. याच सुमाराला म्हणजे पावसा-ळ्याच्या आरंभीं—खान विजापुराहून निघाला असावा. प्रथम तो पुण्याच्या रोखानें निघून तुळजापुरावरून माणकेश्वरापर्यंत आला. दोन्ही ठिकाणीं त्यानें हिंदूंच्या देवळांना त्रास दिला. माणकेश्वराहून त्यानें आपली दिशा बदलली. व सरळ पुण्याच्या रस्त्यानें जाण्याऐवजीं करकंब, भोसें, पंढरपूर, शंभुमहादेव, रहिमतपूर या मार्गानें तो वाईस येऊन पोंचला. पंढरपूर व शंभुमहादेव या क्षेत्रांतहि त्याच्याकडून त्रास पोंचला. खानानें याप्रमाणें आपला मार्ग बदल-ण्याचें कारण काय, असा प्रश्न येथें उपस्थित होतो. या प्रश्नाचीं दोन उत्तरें संभवतात. (१) पहिलें उत्तर असें कीं, ' खानाचें उद्दिष्ट शिवाजीमहाराजांना पकडून नेणें किंवा मारणें हें होतें. शिवाजीमहाराजांनाहि हें माहीत होतें व आपण जाऊं तिकडे आपल्या पाठीमागें खानाला यावें लागेल ही खात्री असल्या-मुळें त्यांनीं आपल्याला सोईस्कर असा प्रतापगडचा टापू युद्धाकरतां पसंत केला. हा टापू पसंत करण्याचें कारण, एक तर तो त्यांच्या राजधानीपासून दूर होता व राजधानीपासून होतां होईल तों लांब शत्रूला तोंड देणें हें युद्ध-कौशल्याचें एक प्रमुख अंग आहे. दुसरें, प्रतापगडचा टापू डोंगराळ व दऱ्या-खोऱ्यांनीं भरलेला असल्यामुळें गनिमी काव्याच्या युद्धपद्धतीला सहाय्यक असा होता. असल्या प्रदेशांत अल्पसंख्याक पण भौगोलिक परिस्थिती पूर्णपणें माहीत असणाऱ्या सैन्याला आपल्याहून कित्येक पटींनीं प्रबल अशा शत्रूचाहि धुव्वा उडविणें शक्य होतें. तेव्हां या कारणांमुळें महाराज आपण होऊन पुण्याहून प्रतापगडला आले व त्यामुळें खानानेंहि पुण्याचा रोंख सोडून वाईचा मार्ग धरला.'

( २ ) याप्रमाणें विवेचन कॅ. मोडक यांनीं केलें आहे तें बरेंच आकर्षक आहे यांत शंका नाहीं. पण त्याला आधार बहुतेक तर्काचाच आहे. शिवाजीमहाराज पुण्याच्या टापूंत असूनहि कांहीं कारणामुळें खानानें वाईचा मार्ग धरला व त्यामुळें महाराजहि पुण्याहून जावळीला आले असें शिवभारतांत स्पष्ट म्हटलें आहे ( अ. १८ श्लो. १-११, ४१-४३ ). खानानें वाईला येण्याचीं कारणें शिवभारतांत सांगितलीं आहेत तीं अशीं:— ( १ ) महाराजांनीं जावळीचें राज्य घेतलें तेव्हां मोऱ्यांच्या वंशांतील प्रतापराव या नांवाचा पुरुष विजापूरला पळून गेला. विजापूर दरबारच्या मदतीनें जावळीचें राज्य परत जिंकण्याची त्याची महत्त्वाकांक्षा होती. अफझलखानाची स्वारी महाराजांविरुद्ध निघाली तेव्हां तो खानाबरोबर आला व जावळी हस्तगत करण्याविषयीं त्यानें खानाचें मन वळविलें. ( २ ) खानालाहि जावळीसारखा नाक्याचा टापू हस्तगत करण्याची कल्पना पटली. जावळी प्रांत आपल्या हातांत आला म्हणजे आपल्या सुभेदारीचा वाईप्रांत व कोंकण यांच्यामधील दरवाजाच आपल्या ताब्यांत आला असें त्याला वाटलें असावें. शिवभारतांतील या स्पष्ट उल्लेखामुळें वर दिलेलें कॅ. मोडक यांचें विवेचन मान्य करतां येत नाहीं. महाराजांच्या मागें खान आला असें नसून खान वाईकडे येतो असें दिसल्यावरून महाराज जावळीला आले, असें म्हणावें लागतें. पण अशा रीतीनें महाराजांच्या प्रतापगडाला येण्याची संगति लावल्यावर, प्रतापगडचा टापू बचावाच्या दृष्टीनें त्यांना फार सोईस्कर होता, हेंहि कबूल केलेंच पाहिजे. सरतेशेवटीं प्रतापगडाजवळच लढाईचा प्रसंग आला, तेव्हां तेथील डोंगराळ जमिनीमुळें खानाच्या घोडदळाची दुर्दशा झाली, हें शिवभारतकारानें मार्मिकपणानें सांगितलें आहे ( अध्याय २३ श्लो. २९ ). पण हा शेवटचा प्रसंग आला तो खानाच्या उतावीळपणामुळें व फाजील आत्मविश्वासामुळें. थोड्याशा धिमेपणानें तो वागला असता तर बहुतेक त्याचा हेतु सिद्धीस गेला असता. कारण खानाच्या स्वारीच्या बातमीनें महाराजांच्या बाजूच्या बहुतेकांच्या तोंडचें पाणी पळालें होतें. सर्वांनीं सांगितलें कीं ' झुंज देऊं नये, सल्ला करावा. ' पण महाराज खानाला ओळखीत होते. अफझलखानाशीं सल्ला म्हणजे मृत्यु हें त्यांना माहीत होतें. कांहीं प्रसंगीं साहस हाच शहाणपणा असतो. म्हणून महाराजांनीं मनाचा धडा करून युद्ध करावयाचें, शरण जावयाचें नाहीं असें ठरविलें. सुदैवानें रात्रीं देवीचा दृष्टांतहि महाराजांच्या बेताला अनुकूल असाच झाला. ही दृष्टांताची

गोष्ट खरी असो वा खोटी असो, शरण जावें म्हणणाऱ्या लोकांना तात्पुरतें निरुत्तर करण्याला तरी तिचा उपयोग झाला असला पाहिजे. याप्रमाणें विचार करून, सर्व निरवानिरव करून जिजाबाईसाहेबांचा निरोप घेऊन, महाराज राजगडाहून प्रतापगडास गेले. प्रतापगडाच्या आजूबाजूला आपल्या सर्व सैन्याचें एकीकरण करावयाचें, मग बाकीचा मुलूख—कदाचित् किल्ले खेरीजकरून—शत्रूच्या हातीं पडला तरी फिकीर नाहीं, असें धोरण महाराजांनीं ठरविलें असावें. कारण खान वाईला आल्यानंतर त्याच्या सैन्यानें महाराजांचा प्रदेश आक्रमण करण्यास सुरुवात केली व जाधवानें सुपेंप्रांत, पांढऱ्यानें शिरवळ, खराड्यानें सासवड, सिद्दी हिलालानें पुण्याच्या आसपासचा प्रदेश व हबशी सैफखानानें तळकोंकण, फारशा प्रयासाशिवाय घेतलें असें दिसतें. *( शि. भा. अ. २३ श्लो० ११-१२ ).

पण याप्रमाणें लढाई चालविल्यास दिवसगत लागणार व इतकें करूनहि जावळी–प्रतापगडासारख्या डोंगराळ देशांत लढाई करणें व तो काबीज करणें फार मुष्किलीचें, असें समजून आपला हेतु 'हुन्नरेंकरून' साध्य करावा असें खानानें योजिलें असावें. महाराजांना भेटीला आणून जिवंत हातीं धरावें व ' पादशाही चाकरी करून दाखवावी ' असा त्यानें विचार केला. त्यानें आपला विश्वासू वकील कृष्णाजी भास्कर याला महाराजांकडे पाठविलें व सांगितलें कीं 'तुमचे वडील शहाजीमहाराज यांचा व आमचा फार दिवसांचा स्नेह. यामुळें तुम्हीं कांहीं आम्हांस परके नाहीं. आमचा हेतु एवढाच कीं, तुम्हीं पुंडपणा करतां तसा न करतां पादशाहाच्या आज्ञेंत चालावें. याला तुम्हीं कबूल झालां म्हणजे तुमचा सध्यांचा मुलूख याहूनहि जास्त सरंजाम व मानमरातब बादशाहाकडून तुम्हांस मिळवून देण्याचा जिम्मा मी घेतों. तेव्हां कांहींहि अंदेशा न धरतां आम्हांला येऊन भेटावें."

महाराज आपल्या गोड शब्दांनीं फसून सहज आपल्या भेटीला वाईला येतील असा खानाचा समज असल्यास तो साफ चुकीचा ठरला. महाराजांनीं खानाच्या वकिलास म्हटलें, 'ठीक आहे. खानांचें म्हणणें आम्हांला कबूल आहे.

---

* खं. २० ले. ४७. यांतहि अफझलखानाच्या या आक्रमणाचा उल्लेख आहे. " मावरी अबजलखान यानें सिवाजी राजियावरी मोहीम केली त्याची ठाणी उठवून आपले ठाणेदार पाठवले सिदी बी[ हि ] लाल व पांढरे सन १०६८ ता. सन १०७०.

त्यांच्यासारख्या पराक्रमी सरदारापुढें आमचा काय पाड आहे ? त्यांनीं आम्हांला एवढी दया दाखविली हेंच विशेष ! त्यांची भेट आम्हीं अवश्य घेऊं. खान आपल्याला शहाजीमहाराजांच्या प्रमाणेंच वडिलांच्या ठिकाणीं आहेत. त्यांचा आणि शहाजीमहाराजांचा स्नेह काय आम्हांला माहीत नाहीं ? तुम्हीं त्यांना जावळीला घेऊन या, आम्हीं त्यांच्या भेटीला अवश्य येऊं. त्यांचा बोलभाक पाहिजे. त्याकरितां आमचे वकील पंताजी गोपीनाथ यांना तुमचे बरोबर पाठवितों. त्यांना नेऊन खानांची भेट करवावी.' पंताजीला पाठविण्यांत महाराजांचा हेतु असा होता कीं, त्यानें खानाच्या सैन्यासंबंधानें कच्ची बातमी आणावी; त्याचप्रमाणें लांच वगैरे देऊन खानाच्या सैन्यांत बारीक रीतीनें शोध करून खानाचा खरा बेत काय आहे यासंबंधानें माहिती मिळाल्यास पहावी. त्याप्रमाणें पंताजीपंतानें शोध करतां त्याला आढळून आलें कीं, खानाचा खरा हेतु महाराजांना भेटीच्या वेळीं धरावें असा आहे. कृष्णाजी भास्कराकडून खानाला सर्व हकीकत कळली, तेव्हां महाराजांनीं भेटीला येण्याचें कबूल केलेलें ऐकून त्याला फार आनंद झाला. शिवाजी आपल्याला भ्याला असें त्याला वाटलें. पंताजीपंतांशीं जावळीला येण्यासंबंधानें त्यानें जराशी तक्रार केली व त्याच्यापासून त्यानें आपल्याला कांहीं इजा होणार नाहीं अशी शपथ घेवविली. पण एकंदरींत जावळीला येण्यासंबंधानें त्यानें निखालस नाखुषी दाखविली नाहीं. पंताजीनें प्रतापगडास जाऊन आपल्याला मिळालेली माहिती महाराजांस सांगितली. महाराजांनीं त्याला परत खानाकडे पाठविलें. व 'शिवाजी फार भितो. आपणच मेहेरबानी करून जावळीला यावें; तेथें तो आपल्याला भेटेल' असें सांगण्यास सांगितलें. त्यावरून खानानें जावळीला येण्याचें नक्की केलें. खानाचा हेतु महाराजांनीं शक्य तर वाईला येऊन भेटावें असा होता. पुढें रडतोंडीचा घाट उतरून खानानें लष्करासह कोयना-तीरीं तळ दिला, तेव्हां 'आतां तरी महाराजांनीं आपल्या गोटांत येऊन आपल्याला भेटावें' असें त्याचें बोलणें चालूच होतें. याकरितां दोन चार वेळ दोघांचे वकील (९१ कलमी बखर, कलम ३२) परस्परांकडे गेले आले. पण महाराजांच्या निग्रहामुळें प्रतापगडच्या माचीवर भेट होण्याचें निश्चित करावें लागलें. दोघेजण सौदा ठरवावयास लागले म्हणजे ज्याला सौदा पटण्याची उत्सुकता कमी त्याच्या बाजूनें सौद्याच्या अटीचा कांटा झुकतो, हा नेहमींचा अनुभव आहे. त्याप्रमाणें खान भेटीला उत्सुक असल्यामुळें, जावळीला

आल्याशिवाय महाराज भेटीस येण्याला तयार नसतील तर जावळीला येण्याचें त्यानें कबूल केलें. कदाचित् आपण ससैन्य जावळीला गेल्यानें ती नाक्याची जागाहि आयतीच आपल्या हातांत येणार व मग शिवाजीचें आपल्यापुढें कांहींहि चालणार नाहीं; आपल्याला जावळीला बोलावण्यांत शिवाजी कसा नामी फसत आहे, असाहि विचार त्याच्या मनांत आला असावा. अफझलखानाची चूक झाली ती ही कीं, आपल्या प्रतिस्पर्ध्याच्या हालचालींची बातमी त्यानें ठेवावी तशी ठेवली नाहीं व त्यामुळें त्याच्या जागरूकतेविषयीं व स्वभावाविषयीं त्याला यथार्थ कल्पना आली नाहीं. जावळीला बोलावण्यांत शिवाजीचा कांहींतरी डाव असला पाहिजे, तेव्हां आपण जावळीला जाऊं नये, असें त्याच्या हाताखालील अधिकारी त्याला जीव तोडून सांगत होते, पण त्यांच्या सल्ल्याचा त्यानें धिक्कार केला. त्याची खात्री कीं, शिवाजी आपल्याला भ्याला आणि खरोखरीच अजूनपर्यंतचा सर्व देखावा या समजुतीला पोषक असाच होता. खानाचें आयुष्य लढाया मारण्यांत गेलेलें, कर्नाटकाच्या राजांना धुळीला मिळविल्याबद्दल सर्वांच्या तोंडीं त्याचें नांव झालेलें, तर महाराज तिशीच्या आंतबाहेर असलेले अननुभवी तरुण; खान आल्याबरोबर महाराजांनीं आपण होऊन बहुतेक मुलूख सोडून दिलेला व आपण स्वत: डोंगरांत लपून बसलेले, व खानाचा निरोप आल्याबरोबर त्याच्या सर्व अटी कबूल असल्याबद्दल त्यांनीं उत्तर पाठवलेलें; या सर्व बनावामुळें शिवाजी खरोखरच घाबरला आहे, निदान जावळीला जाण्यांत धोका तरी नाहीं, असें अनुमान खानानें काढलें. त्याप्रमाणें तो वाईहून निघून रडतोंडीच्या घाटानें उतरून प्रताप-गडच्या पायथ्याशीं पारगांवानजीक कोयनेच्या कांठीं आला व तेथें त्याच्या सैन्याचा तळ पडला. थोरला तोफखाना व बुणगे त्यानें वाईजवळच ठेविले. पण 'बारा हजार लष्कर व बंदुकी' लहान तोफा, हत्ती वगैरे बरोबर आणले. महाराजांनीं झाडी तोडून वाट व फौज राहण्याला मैदान करविलें होतें. वाई हें आपलें मजबुतीचें स्थान सोडून खान पारगांवला आला ही त्याची भयंकर चूक झाली. त्याबरोबरच त्याच्या स्वारीची अखेर कशी होणार हें ठरलें. शिवभारतकारानें हा मुद्दा मोठ्या मार्मिकपणानें मांडला आहे. " तो बलाढ्य अफझलखान जावळीजवळ आला तेव्हांच 'ही आतां माझ्या हातांत आलीच' असा विचार त्याच्या मनांत आला. इकडे शिवाजीमहाराजांना खान

जावळीला आल्याचें कळलें तेव्हां 'हा बरा माझ्या तावडींत आला' असें वाटलें" (अ. २० श्लो. ४८–४९).

पाराला आल्यानंतर पूर्वी सांगितल्याप्रमाणें महाराजांनीं आपल्या गोटांत येऊन भेटावें असा खानानें प्रयत्न करून पाहिला, पण तो फुकट गेला. सरतेशेवटीं किल्ल्याच्या खालीं थोडे अंतरावर महाराजांनीं भेटीकरतां जागा तयार करवावी, व तेथें खान पाराला आल्याच्या तिसऱ्या दिवशीं भेट व्हावी असें ठरलें. प्रत्यक्ष भेटीसंबंधानें करार ठरला तो असा:— आपलें सैन्य आहे तसेंच ठेवून एकट्या अफझलखानानें सशस्त्र निघावें व पालखींत बसून पुढें यावें. त्याच्या सेवेकरतां दोन तीनपेक्षां जास्त सेवक बरोबर नसावेत. याप्रमाणें प्रतापगडच्या माचीपर्यंत येऊन त्यानें मंडपांत शिवाजी महाराजांची वाट पहात रहावें आणि शिवाजी महाराजांनीं सशस्त्र येऊन त्या पाहुण्याचा आदरसत्कार गौरवानें यथाविधि करावा. दोघांच्याहि रक्षणाकरितां स्वामिनिष्ठ व शूर अशा दहा दहा सशस्त्र सैनिकांनीं पाठीमागें बाणाच्या टप्प्यावर येऊन उभें राहावें; आणि अशा रीतीनें भेटून दोघांनीं काय गुप्त बोलणें चालणें करावयाचें तें करावें.

भेटीचें बोलणें सुरू झालें तेव्हांपासूनच महाराजांनीं आपली तयारी चालविली होती. नेताजी पालकराला त्यांनीं हुकूम दिला होता कीं, खानाचें सैन्य वाईला आहे तोंपर्यंत व वाईहून जावळीला येत असतांना त्याला बिलकुल उपसर्ग देऊं नये; पण खान वाईहून आल्यानंतर ज्या दिवशीं आमची भेट व्हावयाचें ठरेल त्याच दिवशीं पुढें येऊन घाटमाथा रोखून धरावा. याप्रमाणें भेटीच्या वेळीं दगा होऊन लढाईचा प्रसंग आला तर खानाच्या फौजेला आल्या वाटेनें परत जातां येऊं नये, याची तजवीज झाली. दुसऱ्या बाजूच्या म्हणजे पारघाट व कोंकण या बाजूच्या बंदोबस्ताकरितां मोरोपंत कोंकणांत होते त्यांनीं वर येऊन ती बाजू धरावी अशी व्यवस्था केली. एकंदरींत पाराला आलेलें खानाचें सैन्य आतां कैचींत धरल्यासारखें झालें. याशिवाय भेटीच्या जागेच्या जास्त जवळ जावळीच्या व पाराच्या रानांत बांदल व त्याचे लोक ठेविले. त्यांचें काम भेटीचा बेत फिसकटला तर एकदम खानाच्या लष्करावर चालून जाऊन त्याचा धुव्वा उडवणें हें होतें. त्याचप्रमाणें सिलिमकराचा जमाव बोचेघोळीच्या घाटांत लपवून ठेवला. खानाच्या लोकांना गडावर येऊं न देण्याचें त्यांचें काम होतें. प्रतापगडच्या आसपासच्या प्रदेशाची

खडानूखडा माहिती असल्यामुळें महाराजांना ही व्यवस्था करतां आली. सर्वांना ताकीद होती कीं, इशारतीचे आवाज गडावर होतील, त्यावरून सूचना घेऊन प्रत्येकानें आपापली कामगिरी करावी.

भेटीचा दिवस मार्गशीर्ष शु. ७ गुरुवार ( १० नोव्हेंबर १६५९ ) हा ठरला होता. महाराजांनीं खानाला भेटीची सूचना करावी म्हणून वकिलास चिठी लिहिली. त्यावरून खानानें भेटीची जागा कशी आहे वगैरे चौकशीकरितां आपले लोक पाठविले. त्यांनीं ती पाहून पसंत केली. तेव्हां खान भेटीकरतां निघाला. बरोबर बरेच सैनिकहि घेतले. हें पाहून पंताजी-पंतांनीं पुढें होऊन सांगितलें कीं, इतके लोक बरोबर घेतल्यानें राजाला भीति वाटेल व भेटीचा योगहि फुकट जाईल. याकरितां हे लोक बरोबर घेऊं नयेत. असें सांगितल्यावर खानानें सर्व लोक दूर बाणाचे टप्प्यावर ठेवले व स्वतः आपण, पालखी, दोघे सशस्त्र नोकर, कृष्णाजीपंत, व पंताजीपंत असे पुढें चालले. बरोबर घेतलेल्या दोन नोकरांपैकीं एक बडा सय्यद नांवाचा प्रख्यात शिपाई होता. सर्व मंडळी भेटीच्या जागेजवळ आली तेव्हां ती उत्तम रीतीनें शृंगारलेली सदर पाहून खानाला फार वैषम्य वाटलें. 'शिवाजी म्हणजे काय ? शहाजीचा लेक आणि पातशहाकडेहि नाहीं असें त्याच्याकडे सामान ?' असे उद्गार त्याच्या तोंडून निघाले. पंताजीपंत जवळच होते, त्यांनीं त्याचें समाधान केलें. ते म्हणाले 'हा सर्व पादशाही माल. लवकरच पादशहाचे घरींच जाणार आहे. त्याची एवढी तजवीज कशाला ? '

इकडे महाराजांनींहि आपली तयारी केली. त्यांनीं नेहमींप्रमाणें स्नान व देवपूजा करून भोजन केलें. नंतर अंगांत चिलखत घालून वर झगा घातला. डोक्यालाहि चिलखताचा टोप घालून वर तुऱ्याचा पांढरा मंदील घातला. पायांत चोळणा घालून कास कसली. उजवे हातांत भवानी तरवार व डावे हातांत बिचवा घेतला. पाठीला ढाल बांधली. पोषाख केल्यानंतर महाराजांनीं सरतेशेवटची निरवानिरव केली. 'आम्हीं ही होड आरंभली. श्री सिद्धीस नेईलच. कदाचित् भेटींत विपरीत घडलें तरी तुम्हीं सर्वांनीं धीर न सोडतां ठरल्याप्रमाणें खान व फौज बुडवावे व संभाजीला राजा करून राज्याचें रक्षण करावें.' याप्रमाणें निरवानिरव करून किल्ल्यावरील लोकांना, 'तुम्हीं सर्व शूर पराक्रमीच आहां. आमची मदार तुम्हांवरच आहे. या प्रसंगीं सर्वांनीं आपली शर्थ व सावधता सांगितली तशी करावी. राज्य वृद्धीला पावेल,

तसतसें आहे तें सर्व तुमचेंच आहे' अशा प्रकारच्या शब्दांनीं उत्तेजन देऊन, व सर्वांचा निरोप घेऊन महाराज, जिऊ महाला व संभाजी कावजी यांसह दरवाजाबाहेर पडले. थोडे पुढें आल्यावर खानाबरोबर बडा सय्यद आहे हें ऐकून उभे राहिले, आणि पंताजीपंतांस बोलावूं पाठविलें. त्यांच्याबरोबर निरोप केला कीं 'जसे शहाजी महाराज तसे खान. बडा सय्यद खानाजवळ आहे. त्यामुळें भीति वाटते. त्याला दूर पाठविणें'. त्यावरून पंताजीपंतांनीं कृष्णाजीपंतास सांगून बडा सय्यद यालाहि दूर पाठविलें. महाराजांच्या मनांत किंतु न रहावा म्हणून खानानें हातांतली तरवारहि कृष्णाजी भास्कराच्या हातांत दिली. याप्रमाणें आपल्या मनासारखें सर्व झाल्यावर महाराज जिऊ महाला व संभाजी कावजी यांसह भेटीच्या जागेपर्यंत गेले. ते येतांच खानहि भेटीसाठीं उठून उभा राहिला. पंताजीपंतांनीं पुढें होऊन 'खानांना जाऊन भेटावें' म्हणून महाराजांना विनंती केली. महाराजांनीं पंतांना 'खान हेच काय' म्हणून विचारून घेतलें. त्याचप्रमाणें खानानेंहि 'महाराज हेच काय' असें विचारून खात्री करून घेतली. लगेच दोघांनीं एकमेकांना कवटाळून भेट दिली. खान उंच व धिप्पाड होता, शिवाजीमहाराज ठेंगणे व बारीक होते. भेट देतांना महाराजांची मान सरासरी खानाच्या खाकेशीं आली. निमिषार्धांत खानानें महाराजांची मान डाव्या हातानें खाकेंत दाबून धरली, व दुसऱ्या हातानें कमरेची कट्यार काढून त्यानें महाराजांच्या डाव्या कुशीला वार केला. सुदैवानें महाराजांच्या अंगांत चिलखत असल्यामुळें कट्यार नुसती खरखरली, अंगांत शिरली नाहीं. खानानें दगा केला हें पाहून महाराजांनींहि डाव्या हातांत बिचवा होता त्यानें खानाच्या उजव्या बाजूला पोटावर वार केला. खानाच्या अंगांत फक्त झगाच होता. त्यामुळें एकाच घावांत खानाचीं आंतडीं बाहेर आलीं. महाराज खानाच्या बगलेंतून मान सोडवून दूर झाले. "मारलें! मारलें! दगा! धावा!!" असें खान ओरडतो तों कृष्णाजी भास्कर खानाची तरवार घेऊन जवळच उभा होता, तो महाराजांवर चालून आला. महाराजांनीं त्याचा वार आपल्या तरवारीनें अडवला, व लगेच दुसऱ्या एका घावानें खानाचें मुंडकें धडापासून वेगळें केलें. इतकें होतें तों दोन्ही बाजूंचे लोक धांवत आले व त्यांची झटापट सुरू झाली. बडा सय्यद महाराजांच्या अंगावर चालून आला, पण जिवा महाला यानें त्याला ठार केलें. ही झटापट चालू आहे तों अफझलखानाच्या पालखीचे भोये होते ते

खानाचा मुर्दा पालखींत घालून चालले. तें पाहून संभाजी कावजी वगैरेंनीं भोयांचे पाय मारले. आणि महाराज व इतर मंडळी खानाचें शीर घेऊन गडाच्या दरवाज्याजवळ आले.

लगेच इशारतीचे आवाज करविले. त्याबरोबर चोहोंकडून महाराजांचे लोक उठून खानाच्या गोटावर एकदम चालून गेले. थोडे वेळापूर्वीं जें रान अचेतन झाडांपाडांनीं हिरवें गार दिसत होतें 'तेंच रान एका क्षणांत शिपायांच्या धिंगाण्यानें गजबजून गेलें.' या आकस्मिक हल्ल्यानें खानाचें सैन्य गोंधळून गेलें, व खानाची हकीकत कळल्यावर तर धीर सुटून पळत सुटलें. त्या अपरिचित व डोंगराळ प्रदेशांत त्यांचा टिकाव लागणें शक्य नव्हतें. यामुळें ज्याला जिकडे वाट फुटली तिकडे तो पळत सुटला. कांहीं थोड्या लोकांना मात्र प्रतापराव मोरे यानें वाईपर्यंत पोंचविलें. बरेच सरदार पाडाव झाले. धाकटा रणदुल्ला, अंबरखान, राजाजी घाटगे, अफझलखानाचे दोन धाकटे मुलगे हे पाडाव झाले व मंबाजी भोसले ठार झाला, असें शिवभारतांत सांगितलें आहे. खानाच्या पार येथील गोटांत व नंतर वाई येथें द्रव्य व मालमत्ताहि अतोनात मिळाली. महाराजांनीं खानाकडील पाडाव झालेल्या लोकांना आदरानें वागवून सोडून दिलें. "भांडते लोक जे पडले होते त्यांच्या लेकांस चालवले, पुत्र नाहीं त्यांच्या बायकांस निम्मे वेतन चालवलें. जखमी झाले त्यांस जखम पाहून बक्षिसें दिलीं. सैन्यांतील अधिकाऱ्यांना कडीं, कंठमाळा तुरे, पदकें वगैरे मोठमोठीं बक्षिसें दिलीं. पंताजीला लक्ष होन इनाम दिले, याप्रमाणें खुशाली केली."

अफझलखानाच्या वधाला प्रथम मुसलमान इतिहासकार व नंतर त्यांच्यावर हवाला ठेवणारे इंग्रज इतिहासकार यांनीं 'खून' ही संज्ञा दिली. याप्रमाणें मराठी राज्याचे संस्थापक 'खुनी,' मराठ्यांच्या साम्राज्याचा आरंभ खून व लुटालूट यांमध्यें व अफझलखान 'हुतात्मा,' असें ठरलें. मुसलमानी इतिहासकारांना महाराजांनीं विश्वासघातानें खानाचा खून केला असें वाटणें कसें सहाजिक होतें तें वर सांगितलेंच आहे. वास्तविक महाराज खुनी नव्हते व खान हुतात्मा नव्हता. खान महाराजांना फसवावयास गेला पण आपणच फसला. लबाडी करावयाची तर ती यशस्वी होईल अशी तरी करावी, नाहीं तर फजीतीला पारावार नाहीं. याप्रमाणेंच खानाचें झालें. महाराज मात्र सर्व बाबतींत सावध राहिले. शिऱ्याच्या राजाचा ज्यानें भेटींत खून केला, आपल्या घराण्याला जो सदा पाण्यांत पाहतो, आपल्याला

धरण्याकरतां किंवा ठार करण्याकरितां जो आलेला व पंताजीपंतांनीं वाईहून आणलेल्या बातमीवरूनहि ज्याचा हेतू भेटींत आपल्याला दगा करण्याचा, त्या खानाशीं आपण जितक्या सावधपणानें वागूं तितकें कमीच, असें महाराजांनीं ठरविलें असल्यास नवल नाहीं. नवल हें कीं, खान बेसावधपणें गडावर आला असतांहि त्यांनीं त्याच्यावर हल्ला केला नाहीं व आपला जीव धोक्यांत घालून त्याची भेट घेतली. महाराजांचा हेतु खानाला मारण्याचाच असता तर, त्यांना त्याची भेट घेण्याचें कांहींच कारण नव्हतें. इशारतीच्या आवाजांच्या व्यवस्थेवरूनहि महाराजांचा हेतु सलोख्याचा होता असेंच स्पष्ट होतें. भेटींतून कांहीं निष्पन्न झालें व आपल्या मनाप्रमाणें तह घडून आला तर पहावें असें महाराजांच्या मनांत होतें. पण खानानेंच भेटींत त्यांना मारण्याचा प्रयत्न केला तेव्हां, त्यांना स्वसंरक्षणार्थ त्याला ठार करणें भाग पडलें.

---

**अफजलखानाच्या वधाची नक्की वेळ**—'मार्गशीर्ष शु. ७ गुरुवारीं आठवे तासी प्रतापगडानजीक....अफजलखान जीवें मारिला' असें 'राज्याभिषेक शकावली म्हणते (प्रदीप पृ. ५७). म्हणजे दोन प्रहरीं २ वाजण्याचा सुमार येतो. 'मध्यान्हीं' असें शिवभारतांत सांगितलें (अ. २१ श्लो. ८४) असून महाराज सदरेवर जाण्यापूर्वी नित्याप्रमाणें पूजा-अर्चा, दानविधि, जेवण इत्यादि यथासांग उरकून गेले इत्यादि तपशील दिला आहे (अ. २१ श्लो. ११–१८); यावरून तोच सुमार येतो. अफजलखानाच्या लोकांकरितां महाराजांनीं शिजविलेल्या अन्नाचा भरपूर पुरवठा केल्यामुळें ते सर्व क्षुधाक्रांत लोक अन्नावर ताव मारूं लागल्यावेळींच शिवाजीनें वधाचें काम उरकून घेतलें असें डच पत्रांत लिहिलें आहे (शि. नि. पृ. ७७–७८). पूर्वीचा दैनिक कार्यक्रम लक्षांत घेतां ही वेळ एकदोन वाजण्याच्या बेतानेंच यावी यांत शंका नाहीं. तेव्हां या सर्व प्रमाणांवरून वधाची नक्की वेळ सुमारें २ वाजण्याची येते. लगेच युद्धाला सुरुवात होऊन शत्रूचें चकित झालेलें सैन्य उधळून लावण्यास अर्थातूच राहिलेला वेळ पुरा होता हें उघड आहे.

—संपादक

## प्रकरण ८ वें

# विजापूरकरांशीं सामना

**१. अफजलखानाच्या वधानंतरची चढाई** —अफजलखानाच्या वधाच्या प्रकरणीं विचार करणारे कित्येक लोक आज मान्य झालेल्या उच्च नीतितत्त्वांची कसोटी लावून शिवाजीमहाराजांना दोष लावितात. परंतु ही दृष्टि त्या वेळच्या लोकांमध्यें नव्हती. त्या वेळचें शिक्षण, परिस्थिति व विचारांची प्रगल्भता यांचा अंदाज पाहिला म्हणजे सर्वांनाच महाराजांचें हें कृत्य अभिनंदनीय वाटलें असल्यास कांहीं नवल नाहीं. सभासद व शिवभारतकार ह्या उभयतांनींहि अफजलखानाच्या तुळजापूरच्या व पंढरपूरच्या मूर्तींवरील अत्याचारांचा उल्लेख करून, त्याच्या वधाबद्दल धर्मदृष्टया समाधान प्रदर्शित केलें आहे. शिवभारतकारानें त्याला 'देवद्वेष्टा' हें विशेषण लावून, आणि सभासदानें झालेल्या रणसंग्रामाला कौरवपांडवांच्या युद्धाची आणि शिवाजी व अफजल ह्यांना भीम-दुर्योधनांची उपमा देऊन तत्कालीन समजुतीचें स्वरूप स्पष्ट केलें आहे. तात्पर्य 'प्रतापगडच्या भेटींत खान ठार झाला हें ऐकतांच हिंदू लोकांना धर्मावरचें मोठें संकट नाहींसें झालें व त्याचें श्रेय शिवाजीमहाराजांना आहे हा विचार प्रामुख्यानें मनापुढें आला' असल्यास नवल नाहीं ( ले. ७९९ ). अर्थात् महाराजांचें हें कृत्य साहजिकच पराक्रम या वर्गांत समाविष्ट झालें. यापूर्वी आतांच्याप्रमाणें शिवाजीला कोणत्याहि प्रबळ सत्तेशीं तोंड द्यावें लागलें नव्हतें. फत्तेखान किंवा चंद्रराव मोरे यांच्याशीं कराव्या लागलेल्या लढाया या प्रसंगाच्या मानानें कांहींच नव्हत्या. या वेळची विजापूरदरबारची तयारी आणि विशेषतः अपेक्षा फारच मोठी असल्यामुळें त्यांना आलेल्या अपयशाचा गवगवा तितक्याच मोठ्या प्रमाणांत होऊन स्वकीयांचा, परकीयांचा आणि एकंदरींत सर्वांचाच शिवाजीबद्दलचा आदर वाढला. कित्येकांना त्याच्यावरील देवीची कृपादृष्टि, कित्येकांना ग्रहबलाची चढती कमान, बहुतेकांना नशिबाचें शिकंदरत्व, तर फारच थोडया जाणत्या लोकांना शिवाजीच्या अंगचें प्रभावशाली कर्तृत्व ह्या घडलेल्या गोष्टींत दिसून आलें असलें पाहिजे.

सर्व स्वजनांना अर्थातच अभिमान वाटूं लागला. विजापूरकरांना दहशत बसली ( मो. २०१ ). इतरांनाहि धाक वाटूं लागला. मोंगलांना त्याच्या यशस्वी चरित्राबद्दल काळजी करणें भाग पडलें. आणि परदेशस्थ इंग्रज, डच आदिकरून व्यापारी चकित होऊन त्यांच्या स्वदेशीं कळविल्या जाणाऱ्या अहवालांत शिवाजीचें नांव चमकूं लागलें. तात्पर्य, शिवाजीमहाराजांच्या अफजलखानावरील अनपेक्षित आणि अद्भुत विजयामुळें महाराज सर्व दक्षिणेंत प्रसिद्ध झाले.

अफजलखानाच्या सैन्याचा पुरा मोड झाला व तें वाट सांपडेल तिकडे पळून गेल्यामुळें या प्रसंगीं लढाईंतील लूटहि महाराजांना मिळाली. मुख्य केंद्रापासून दूर, खुद्द शत्रूचे मुलखांत फसवणूक झाल्यामुळें विजापुरी सैन्याला आपल्या सरंजामापैकीं कांहींहि वाचवितां आलें नाहीं. सभासदानें दिलेला तपशील थोडा अतिशयोक्तीचा मानिला, तरी ‘अनेक घोडे, कित्येक हत्ती, पुष्कळ उंट, बराचसा खजीना आणि शत्रुपक्षानें सिद्ध केलेला सर्व लवाजमा महाराजांचे हातांत पडला’ यांत शंका नाहीं. याचें महत्त्व विशेष होतें. ऐन वेळीं आपलें लष्करी सामर्थ्य वाढविण्यास जरूर असणारी संपत्ति व लष्करी साधनें अशा रीतीनें अचानक त्यांना मिळालीं व त्यांचा त्यांनीं त्वरेनें फायदा घेतला. शत्रूचें मनःस्वास्थ्य ढळविणारा एवढा मोठा पराक्रम केल्यानें आसपासचीं शत्रूसंघाचीं मोहळें त्यांच्यावर तुटून पडणार हें स्पष्टच होतें. आणि तसें झालेंहि. यापुढील निदान पांचसहा वर्षांचा काळ म्हणजे महाराजांची एकसारखी झालेली तारांबळ व एक प्रकारची कुतरओढ यांनीं भरलेला आहे. भावी आपत्तींचा बाऊ करून केवळ विवंचनेंत वेळ न घालवितां त्यांनीं या वेळीं जें अप्रतिम प्रसंगावधान दाखविलें तें लोकविलक्षण होय. मिळालेल्या यशाचा फायदा त्यांनीं मोठया शिताफीनें व अत्यंत त्वरित घेऊन आपला मुलूख व महत्त्व यांची उभयविध वाढ करण्यासाठीं कमर बांधली. किंबहुना विजापूरकरांनीं आपल्या एका बड्या सरदाराला पाठवून केलेल्या प्रयत्नांत त्यांना मोठें अपयश आल्यामुळें महाराजांना विजापूरकरांच्या मुलुखावर चढाई करण्याचें आमंत्रणच मिळाल्यासारखें झालें. अफजलखानाशीं तोंड देण्याकरितां महाराजांनीं केलेली तयारी व आंखलेलें धोरण इतकें अचुक होतें कीं, अफजलखानाचा मोड झाला त्याच्या दुसऱ्याच दिवशीं महाराजांच्या सैन्यानें चढाईचें युद्ध सरू करून त्यांत यश मिळविलें. अफजलखानाचा

वध १५८१ मार्गशीर्ष शुद्ध सप्तमी रोजीं झाला. व विजापूरकरांच्या मुलखांत घुसून चढाईच्या धोरणाला आरंभ शुद्ध अष्टमीला झाला! सरनोबत नेताजी पालकर खानाच्या वाईच्या सैन्यावर तुटून पडण्याकरितां म्हणून दुसऱ्या दिवशीं वाईला गेला. परंतु अफजलखानाचें सैन्य आधींच पळून गेलें होतें, त्यामुळें पराक्रम करण्याला वाईला जागा नव्हती. पळालेल्या लोकांचा पाठलाग करूनहि कोणींच त्याच्या हातीं लागलें नाहीं (भा. २३-४७). लवकरच शिवाजीमहाराजहि त्वरा करून आपल्या सर्व सैन्याचा जमाव घेऊन वाईस आपल्या सेनापतीला येऊन मिळाले. युद्धांत मिळालेल्या सामानाची व्यवस्था, पडलेल्या व जखमी झालेल्यांची निरवानिरव (सभा. २१) इत्यादि गोष्टी करण्यास त्यांना फार तर एक दोन दिवस लागले असतील. वाईच्या ब्रम्हवृंदांना छातीवर येऊन बसलेलें मुसलमानांचें संकट निवारण झाल्यानें आनंद होऊन त्यांनीं मनापासून शिवाजीचें यशचिंतन केलें. वाई येथें सर्व सैन्य एकत्र झाल्यानंतर शिवाजीनें सेनापती नेताजी पालकर याच्याशीं विचार करून युद्धाचा पुढील कार्यक्रम ठरविला व लगेच पन्हाळ्याच्या एकाच रोखानें कामाला सुरुवातच झाली.

शिवाजीचें या वेळचें सैन्य किती असावें याचा अंदाज मागील प्रकरणीं केला आहे. दहा हजार घोडदळ व दहा हजार पायदळ आणि सातशें पठाण हें सैन्य एका लढाईला पुरेसें असलें तरी त्याचे विभाग पाडून अनेक ठिकाणीं चुरशीचे सामने द्यावयाला ही संख्या पुरी होती असें वाटत नाहीं. या वेळचीं वर्णनें पाहिलीं असतां प्रतापगडाजवळ सर्व सैन्य एकत्र आणल्यानंतर त्याच्या पुनः भिन्न दिशांना पाठविण्याकरितां तुकड्या पाडल्याचा उल्लेख आढळत नाहीं. आणि एकसारखी मेहनत करून पन्हाळा आदिकरून मुलूख काबीज करण्याची व दक्षिणेकडे गदग, लक्ष्मीश्वरपर्यंत लुटीची जी हुल्लड उठविली गेली ती यथार्थ ठरण्याकरितां शिवाजीचें सर्वच सैन्य एका रोखानें गुंतविणें अवश्य वाटतें. यामुळें सुपें, शिरवळ, सासवड, पुणें या उत्तरेच्या बाजूला स्वारी करणारे जाधव, पांढरे* खराटे, हिलाल ह्या विजापुरी सेनानायकांनीं आपल्यापैकींच सिद्दी हिलाल याच्या मध्यस्थीनें शिवाजीला शरण येऊन त्याचा

---

* शि. भा. अ. २३, श्लो. ५५ मध्यें 'उभौ नायकनामानौ' असा निर्देश आहे. तो सदर पांढरे व खराटे, यांचाच आहे. (ले. ७९६ व ८८५).

आश्रय केला; तो शिवभारतांत म्हटल्याप्रमाणें युद्धांत पराजय झाल्यामुळें केला, असें मानतां येत नाहीं. अफजलखानाच्या नाशामुळें धैर्य गळून निराधार झाल्यानें (भा. २३, ५४-५६) म्हणजे दहशतीनेंच (चिट. १३७) त्यांनीं वरीलप्रमाणें धनी बदलला असावा.

**२. पन्हाळगडाचा बंदोबस्त**—यापुढें अगदीं अल्पावधींतच शिवाजीनें फार मोठा प्रांत आक्रमिला. कारण किल्ल्यांनीं रक्षण केलेला नाहीं असा उघडा प्रांत कोणाहि फौजबंद सरदाराच्या तावडींत तेव्हांच सांपडूं शके. हे लक्षांत घेतलें म्हणजे कोयना व पार येथील लढाईंत विजापुरी सैन्याची दाणादाण झाल्यानंतर मधील मुलखाचें रक्षण करण्यास, अर्थातच दमदार असें सैन्य कोठेंच राहिलें नसलें पाहिजे हें उघड आहे. वाईला पुढील स्वारीचा कार्यक्रम निश्चित होतांच एकदम जवळच्या चंदन-वंदन किल्ल्यांना वेढा देऊन त्याची नाकेबंदी करण्यांत आली. याचें कारण उघड आहे. किल्ले चंदन-वंदन हें विजापुरी ठाण्याचें ठिकाण असल्यामुळें त्याखालील मुलुख बिनहरकत मिळण्यासाठीं तो ताब्यांत घेणें जरूर होतें. आणि तो लवकरच ताब्यांत आलहि असेल. याच वेळीं शिराळें आदिकरून व खटाव, मायणी, कलढोण, वडगांव, कऱ्हाड, कुंडल, अष्टें, इत्यादि अनेक स्थळें (भा. २३, ५८–६१) म्हणजे सर्व वाईप्रांत—आजच्या सातारा जिल्ह्याचा बहुतेक सर्व भाग—फारच थोड्या अवधींत व्यापण्यांत* आला. व दक्षिणेकडे कोल्हापूरपर्यंत खंडणी वसूल करण्यांत आली. परंतु मध्यंतरीं विजापूरकरांचा नाक्याचा किल्ला पन्हाळगड हा होता, तो उघड्या मुलखाप्रमाणें तितक्या अनायासानें ताब्यांत आला असेल हें शक्य वाटत नाहीं. शिवभारतकारानें (२३, ६३-७२) या प्रसंगीं प्रत्यक्ष युद्ध झाल्याचें वर्णन केलें आहे. सभासदानें या वेळीं पन्हाळा घेतल्याचें न लिहितां शिवाजी आग्र्यावरून परत आल्यावर तो घेतला असें लिहिलें आहे. तथापि तो नेहमीं कालविपर्यास करितो. त्याची सवलत देऊन पाहिलें तर, सिदी जौहराचे, म्हणजे प्रस्तुत प्रसंगीं, 'पन्हाळा किल्ला अदलशाहीचा, तेथें भेद करून गड घेतला.' (पृ.५७) असें त्याचें मत दिसतें. मागें वर्णन केलेल्या परिस्थितींत हीं दोन्ही विधानें खरीं असण्याचा संभव आहे.

---

* धावणी करून केवळ खंडणी वसूल करणें एवढीच गोष्ट या वेळीं शक्य होती. यानंतर बरींच वर्षेंपर्यंत वाई प्रांतावर आदिलशाही अंमल चालू होता असें दर्शविणारे कागदपत्र आहेत. पुढें शके १५९२ चे सुमारास हा प्रांत शिवाजीच्या ताब्यांत आला.

परंतु ह्या भेदाचें निश्चित स्वरूप सांगतां येण्यासारखें नाहीं. ग्रँट् डफ्नें या वेळची मांडणी कोणत्या आधारावर केली आहे हें बरोबर समजत नाहीं. 'अफजलखानाला मदत करण्याकरितां म्हणून जंजिऱ्याच्या सिद्दीनें तळा व घोसाळा ह्या किल्ल्यांस वेढा दिला होता. पण अफजलाचा नाश झालेला कळून त्यानें माघार घेतली. त्याचें परिपत्य करण्याचा बहाणा करून शिवाजी इकडे पन्हाळ्याकडे राजकारण लावीत होता. अण्णाजी दत्तो व मावळ्यांचें प्रबळ सैन्य ह्यांनीं ह्या कामीं उपक्रम करून यश मिळविलें.' ह्या हकीकतींतील महत्त्वाचा तपशील शिवाजीनें शके १५९४ फाल्गुन वा १३ रोजीं दुसऱ्या वेळीं पन्हाळा घेतला, त्या प्रसंगाशीं जमता आहे (सभा. पृ. ७६ व पर्णाल.). यावरून ग्रँट् डफ्चा घोटाळा झाला आहे असें स्पष्ट दिसतें. असो.

मार्गशीर्ष वद्य नवमी सोमवारीं रात्रीं (इ. १६५९ नोवें. २८) पन्हाळा शिवाजीनें घेतला. त्या वेळीं सहा घटका रात्र झाली होती. ही बारकाई फक्त शिवापूरकर देशपांडे वहींतील, किंवा राज्याभिषेक-शकावली हीच देते. शिवाजी पन्हाळगडावर रात्रींच प्रथम आला आणि 'ती सबंध रात्र दिवसाप्रमाणें घालवून त्यानें सर्व किल्ल्याची शोभा पाहिली' असा शिवभारताकडूनहि त्या विधानाला दुजोरा मिळतो. अफजलाचा वध आणि पन्हाळ्याला वेढा घालून युद्ध करून किंवा भेदानें तो किल्ला हस्तगत करणें, ह्यांमध्यें फक्त अठरा दिवसांचा काल गेला; यावरून ही भरारी बहुत त्वरेची झाली असें म्हणण्यास हरकत नाहीं. विजापुरावर किंवा विजापूरकरांच्या मुलखांत, कोंकणांत किंवा देशावर, कोठेंहि स्वारी करण्यास मध्यवर्ति आणि बळकट केंद्रस्थान ( Strong base ) ह्या दृष्टीनें पन्हाळगडाचें महत्त्व विशेष होतें. तेव्हां तो हस्तगत करण्याची घाई शिवाजीनें करावी हें योग्यच होतें. * ही वस्तुस्थिती तत्कालीन इंग्रज व डच व्यापाऱ्यांच्याहि लक्षांत आलेली दिसते. 'शत्रूंचा पाठलाग करीत असतांनाच शिवाजीनें पन्हाळा हस्तगत केला' (ले. ७९१) किंवा 'शिवाजीनें विसांवा न घेतां' पन्हाळा घेतला (ले. ८१२) यांचा अर्थ एकच असून ह्यांवरून वर वर्णन केलेली त्वराच प्रतीत होते.

---

* प्रथम किल्ला ताब्यांत आल्यापासून चार दिवसांनीं शिवाजी 'पन्हाळ्यावर गेले' असा शिवापूर दप्तरांतील यादींत उल्लेख येतो तो अमान्य करावा किंवा कसें ह्या प्रश्नाला आज तितकें महत्त्व प्राप्त झालेलें नसल्यामुळें त्याचा केवळ निर्देश करून पुढें जाण्यास हरकत नाहीं.

पन्हाळा ही नाक्याची जागा असून आदिलशाही राजाचें तें निर्वाणीचें आश्रयस्थान असल्यामुळें अर्थात् विजापूरदरबारांत तो घेतल्यानें सर्वांनाच धडकी भरली. शिवाजी आपल्याला आटोपत नाहीं अशी अल्लीशहाची खात्री होऊन त्याच्या मनांत शिवाजीविरुद्ध मोंगलांकडे मदत मागण्याची कल्पना येऊन गेली नसेल असें म्हणवत नाहीं (भा. २४-२४). परंतु स्वतः कांहींतरी हातपाय हालविणें जरूर होतें. यापूर्वींच फाजल, याकूत, अंकुशखान, हसन, मुसेखान प्रभृति प्रतापगडाखालून पळून गेलेले योद्धे विजापुरीं दाखल झाले होते व झालेल्या अपमानाचें उट्टें काढण्याची त्यांची भाषा चालू होती. इतक्यांत पन्हाळा घेतल्याची बातमी पोंचल्यामुळें यापुढें थेट स्वतःच्या मुलखांत घुसलेल्या शत्रूची उपेक्षा करण्याची सोयच राहिली नाहीं. आणि पन्हाळ्यासारख्या सुरक्षित ठिकाणाहून शिवाजीनें आपल्या मुलखाचें आक्रमण करूं नये म्हणून त्याला तेथेंच पायबंद घालण्याची शक्य ती योजना त्वरेनें करणें इष्ट होतें. ही योजना गर्दीची म्हणून अगदींच जुजबी स्वरूपाची होती असें उघड दिसतें. वर सांगितलेले हे सर्व अपयशी योद्धे, अन्य कोणी मिळण्यासारखे नव्हते म्हणून पुनः शिवाजीवर पाठविण्यांत आले. मात्र या वेळीं त्यांनीं रुस्तुमजमा ह्या सरदाराच्या हाताखालीं लढावें असें ठरविण्यांत आलें.

शके १५५८ च्या तहामुळें उत्तरेकडील सरहद्द निर्वेध झाल्यानंतर दक्षिणेकडे कर्नाटकामध्यें आधाशासारखा मुलूख जिंकण्याचा हव्यास जो आदिलशाहीला लागला तो या काळपर्यंत इंधनानें आधिकाधिक प्रदीप्त होणाऱ्या अग्नीप्रमाणेंच वाढत राहिला. शके १५७८ पर्यंत म्हणजे सुमारें वीस वर्षेंपर्यंत उत्तरेकडे शांतता अनुभविण्यास मिळाल्यामुळें वायव्य व उत्तर ह्या बाजूंला दुर्लक्ष होऊन अनास्थेमुळें किल्ले, ठाणीं इत्यादींचा बंदोबस्त फारच लेचापेचा होऊन राहिला होता. त्याचा फायदा घेऊन शिवाजीनें एक एक पाऊल पुढें टाकिलें. १५७८ मध्यें औरंगजेबानें विजापुरावर स्वारी केली त्या वेळीं ह्याच कारणामुळें विजापूरकर लवकरच वठणीस येणार होते. परंतु औरंगजेबाच्याच अडचणीमुळें ते बचावले. या वेळीं पुनः १५७९ च्या श्रावणांत तह होऊन उत्तरेकडे निरवानिरव झाल्यामुळें आदिलशाहीचा दक्षिणदिग्विजय जोरानें चालविण्यांत आला. यामुळें अफजलाची स्वारी निघाली तेव्हांच विजापूरकरांजवळ पुरेसें सैन्य नव्हतें. त्यांतच अफजलाचा समूळ नाश झाल्यानंतर हा पराजय परतविण्याचें साधन अल्लीं

आदिलशहाच्या हातीं राहिलें नाहीं. आणि म्हणूनच पराजय पावलेलें बेहिम्मत सैन्य किंवा रुस्तुमजमासारखा निष्ठाहीन सेनापती ह्यांच्यावर विजापूरदरबारची इज्जत अवलंबून ठेवावी लागली. अशा आणीबाणीच्या प्रसंगीं, ह्यानंतरहि सिद्दी जौहरासारख्या बंडखोराबर विसंबून रहावें लागलें व ह्याचेंहि कारण, ही अलीची अविचाराची कर्नाटकांतील स्वारी होय असें नुस्रतीनें आपल्या अलीनाम्यांत स्पष्टपणें मांडलें आहे तें खरें दिसतें. नाहीं तर शहाजीसारख्या अनेक प्रबळ सरदारांच्या पोशिंद्याला सैन्याची इतकी टंचाई पडावी हें अत्यंत विचित्र वाटतें. असो.

रुस्तुमजमा हा रायबाग, कोल्हापूर (ले.७८५), राजापूर व कारवार (ले.७८९) इतक्या विस्तृत मुलखाचा आदिलशाही सरसुभेदार होता. हुकेरी हा त्याचा जहागिरीचा गांव असल्यामुळें त्याचें सैन्य याच मुलखांत होतें.त्यांत प्रताप-गडावरून परत आलेलें सैन्य मिळवून शिवाजीला तात्पुरता विरोध करण्याच्या कामगिरीवर त्याची रवानगी झाली. पाठविलेलें सैन्य अपुरें आहे ही जाणीव अर्थातच अली आदिलशहाला होती (भा. २४-२४ ). त्यांतून रुस्तुमजमाची आदिलशाहीवरील निष्ठा तितकी विश्वसनीय नव्हती ही गोष्ट अलीच्या लक्षांत असलीच पाहिजे.बडेसाहेबीण व अली आदिलशहा यांचें व रुस्तुमजमाचें बरें नाहीं व रुस्तुमजमा शिवाजीशीं स्नेहानें वागतो ह्याचा बोभाटा थेट परकी व्यापाऱ्यांच्या पर्यंत जाऊन पोंचला होता ( ले. ७९०,७९१,८००,८१२); त्या अर्थी या स्वारीचें स्वरूप आम्हीं वर दर्शविलें आहे, त्याच प्रकारचें असलें पाहिजे, ह्यांत शंका नाहीं. विजापुरी सैन्य आपल्यावर चाल करून येत आहे असें पाहून महाराजांनीं पन्हाळ्याचा बंदोबस्त पक्का करून ठेविला. रायबाग आदि-करून पेठा काबीज करण्यांत गुंतलेल्या आपल्या सैन्याला रुस्तुमजमाच्या बरोबर चालून येणाऱ्या सैन्यास वाटेंत सतावून सोडण्याची कामगिरी सांगितली, व आपण शत्रुसैन्याला तोंड देण्याकरितां ससैन्य कूच केलें. या वेळीं शिवाजी-महाराजांच्या सैन्यांत नेताजी पालकर, हिराजी इंगळे, भिमाजी वाघ, सिधोजी पवार, गोदाजी जगताप व महाडिक इत्यादि शिवाजीचे जुने सेनापति असून त्यांशिवाय नुकतेच सामील झालेले जाधव, पांढरे, खराटे पितापुत्र व सिद्दी हिलाल हेहि होते. रुस्तुमजमाच्या बरोबर आलेल्या सरदारांत फाजल प्रमुख असून मलिक इतबार, सादात, फत्तेखान, मुल्ला हय, संताजी घोरपडे व सर्जेराव घाटगे हीं इतर नांवें आढळतात. शिवाजी व रुस्तुमजमा ह्यांनीं

आपआपल्या सैन्याची केलेली व्यूहरचना सविस्तर येथें देण्याचें कारण नाहीं (भा.२४श्लो.३०-५२). महाराज स्वत: रुस्तुमजमावर व नेताजी पालकर फाजल-खानावर असे चालून गेले. उभय सैन्याची गांठ वाटेंतच पडून ही लढाई कोल्हापुरानजीक झाली. मराठे विजयश्रीच्या विश्वासानें जोरानें लढल्यामुळें रुस्तुमजमाचा धरसोडीचा आणि फाजलखानाचा कचदिल प्रतिकार टिकाव धरूं शकला नाहीं. आणि थोड्याच वेळांत मुसलमानी फौज उधळून गेली व रुस्तुमजमा व फाजलखान या दोघांहि सेनापतींनीं पळ काढला. पन्हाळा किल्ला घेऊन शिवाजीनें आपला त्या प्रांतीं अंमल बसविण्याचा उपक्रम केला तो ह्या लढाईनें पूर्णतेस जाऊन पन्हाळा व त्याच्या आसपासचा सर्व प्रांत शिवाजीच्या ताब्यांत आला ( भा. अ. २४ ). ही लढाई पौष वद्य दशमी ( डिसें. २८ ) रोजीं झाली. ही मिती राज्याभिषेक शकावलींतच सांपडते. ‘ बारा हत्ती व दोन हजार घोडीं राजे यांनीं पाडाव केलीं. रुस्तुमजमा पळोन गेला ’ हें शकावल्यांतील त्रोटक वर्णन अर्थातच वस्तुस्थितीला धरून आहे ( ले. ८१२ ).

३. **एका महिन्यांतील हालचाली**—पन्हाळा घेतल्यापासून बरोबर एका महिन्यानें कोल्हापूरची लढाई झाली. ह्या एका महिन्यांतील शिवाजीच्या हालचाली काय झाल्या हें समजण्यास परदेशस्थ व्यापाऱ्यांच्या पत्रांशिवाय अन्य साधन नाहीं. १५८१ च्या पौष शु. ७ (१६५९ डिसें. १०) च्या राजापूर–कंपनी पत्रांत ‘पन्हाळा घेतल्यानंतर शिवाजीनें बंदरी व आंतील शहरें काबीज केलीं. यामुळें कांहीं बंदरांचे सुभेदार राजापूरला पळून येत आहेत. ’ असा मजकूर आहे. आणि त्याच्या आधारावर प्रो. सरकारांनीं पन्हाळा घेतल्यानंतर आणि कोल्हापूरच्या लढाईच्या पूर्वी शिवाजीच्या सैन्याचा रत्नागिरी जिल्ह्यांतील संचार गृहीत धरिला आहे ( पृ. २२८ ).जवळ जवळ दोन महिन्यांनंतरच्या फाल्गुन शुद्ध चतुर्थीच्या ( १६६० फेब्रु. ४ ) पत्रांतील ‘त्याला सारखेंच यश येत असून किनाऱ्या-वरील अनेक बंदरें त्याच्या ताब्यांत गेलीं आहेत. त्यांपैकींच दाभोळ हें एक असून तेथील सुभेदार तेथें असलेलीं अफजलखानाचीं तीन गलबतें घेऊन राजापुरास आला. ’ हा मजकूर वरील विधानाला पुष्टी देतो, अशी त्यांची स्पष्ट समजूत दिसते. पण ती चिंत्य आहे. किनाऱ्यावरील अनेक बंदरें यांची व्याप्ति दाभोळच्या उत्तरेकडील किनाऱ्यापुरतीच धरणें इष्ट आहे. आणि हें

विधान पुनरुक्तीपैकीं समजल्याशिवाय गत्यंतर नाहीं. 'कांहीं बंदरांचे सुभेदार' ह्या विधानाची व्याप्तीहि बरीच संकुचित म्हणजे पुष्कळशी अतिशयोक्ती धरून समजली पाहिजे. कारण, ज्या इंग्रजांच्या पत्राच्या आधारावर हें विधान करावयाचें त्या इंग्राजांचाच पुरावा ह्या बाबतींत पूर्णपणें निर्णायक आहे असें दिसत नाहीं. १० डिसेंबरच्या पत्रांत ' शिवाजी उत्तरेचे बाजूला ससैन्य वावरत असून चौलापासून दाभोळपर्यंत सर्व किनाऱ्याचा स्वामी झाला आहे. ' हें वाक्य त्या पत्रांतील अफजलप्रसंगाच्या वर्णनाच्या आधीं आलें असल्यामुळें दाभोळ बंदर जिकण्याचें काम हें पत्र लिहिणारांच्या मतें बरेंच आधीं झालें असावें हें उघड आहे. वाक्यांच्या पौर्वापर्यानुसारें प्रसंगांचा कालानुक्रम ठरविण्याचें हें गमक समाधानकारक आहे हें स्पष्ट होण्याकरितां इंग्रजी पत्रांची लेखनाची पद्धति थोडी उलगडून सांगितली पाहिजे. हिंदुस्थानांतील परदेशीय व्यापाऱ्यांना आपल्या वरिष्ठांकडे पत्रें पाठविण्याची संधी फारच दीर्घकालानंतर म्हणजे वर्षांतून फार तर दोनदां येत असे. तीहि मालाचीं गलबतें भरून पाठवितांना यावयाची. गलबतें बंदरांत आल्यानंतर माल भरण्याची, त्याचे कागदपत्र, हिशेब वगैरे तयार करण्याची गडबड असल्यामुळें त्या वेळीं सविस्तर पत्रें लिहिण्याइतकें मनःस्वास्थ त्यांना मिळत नसे. वरिष्ठांकडे पाठवावयाचीं पत्रें सविस्तर असावींत अशी वरिष्ठांची अपेक्षा अर्थातच असे. तेव्हां पांच सहा महिन्यांत झालेल्या सर्व घडामोडी होतांच किंवा झाल्यानंतर कळतील तशा टिपून ठेवावयाच्या व तींच टिपणें किंवा त्यांचे उतारे वेळ आली कीं करून पाठवायाचे, ह्याच मार्गाचें त्यांना अवलंबन करावें लागे. अर्थात् पत्रांतील मजकुरांत वाक्यांच्या अनुक्रमानें बहुधा पौर्वापर्य साधलें जाई. आतां प्रस्तुत मुद्याबद्दल ह्या अनुक्रमावरच भिस्त ठेवावी अशी परस्वाधीन परिस्थिती सुदैवानें नाहीं. वरील वाक्यांत दाभोळबरोबरच उल्लेखिलेलें चौल शिवाजीचे ताब्यांत १५८१ च्या आषाढ-श्रावणाच्या आधींच म्हणजे १५८० कार्तिकापासून तरी असावें असें दिसतें ( ले. ७७४ व ७७७ ). खुद्द दाभोळ १५७९ च्या वैशाखांत शिवाजीला औरंगजेबानें दिलें होतें, यांत शंका नाहीं ( ले. ७२४ ). ' शिवाजीनें निजामशाही कोंकणांतील मुसलमानांना त्रास देऊन, पातशाही मुलखांतील कित्येक किल्ले हस्तगत केले आहेत' या अल्लीच्या तक्रारींत वरील दाभोळपर्यंतच्या मुलखाचाच समावेश होत असला पाहिजे असें वाटतें.

मग वरील दाभोळ व इतरत्रच्या सुभेदारांबद्दलच्या विधानाची कांहीं संगती लावितां आल्यास पाहिली पाहिजे. आमच्या मतें बंदरांचे सुभेदार राजापुरास पळून येत आहेत हें म्हणणें खरें मानून त्यांना पळून येण्याचें कारण शिवाजीची प्रत्यक्ष स्वारी असें न समजतां स्वारीची अपेक्षा असें समजावें. आणि दाभोळहून आलेला सुभेदार हा अफजलखानाच्या तीन गलबतांचा अधिकारी व दाभोळचा तात्पुरता नवा सुभेदार असें गृहीत धरल्यास कोणतीच अडचण रहाणार नाहीं. मात्र अली आदिलशहाच्या १५८१ कार्तिक व. १२ च्या फर्मानांत मामले मुजफराबाद (प्रभानवल्ली) व बंदर मुस्तफाबाद (दाभोळ) या प्रांतांचा सरहवालदार म्हणून अफजलखानाला हुकूम दिला आहे. यावरून त्या वेळीं तरी दाभोळ आदिलशाही मुलखांत धरलें पाहिजे असें दिसतें. म्हणजे अफजलखानानें शिवाजीवर स्वारी काढिली तिच्या कार्यक्रमांत पश्चिम किनाऱ्याच्या बाजूनेंहि चढाई झाली असें होतें. याच कारणाकरितां इंग्रजी पत्रांतील तीन किंवा अधिकहि गलबतें त्या प्रांताकडे गेलीं असावीं. मात्र त्यांच्याकडून अपेक्षित कामगिरी अफजलाचा नाश झाल्यामुळें न होतां त्यांना नामोहरम होऊन परत यावें लागलें हेंहि उघड आहे. तेव्हां दाभोळ अगदीं अल्प काळ विजापूरकरांच्या पुनः ताब्यांत जाऊन नंतर शिवाजीच्या ताब्यांत पूर्ववत् आलें असें दिसतें. परंतु त्याकरितां प्रो. सरकार यांच्याप्रमाणें शिवाजीनें रत्नागिरी जिल्ह्यांत स्वारी काढिली होती असें म्हणण्याचें कांहींच कारण नाहीं.

सैन्याचे तुकडे पाडून दोनतीन ठिकाणीं विभागण्याची अशक्यता अगोदरच दाखविली आहे. त्यांतून पन्हाळ्यासारखें महत्त्वाचें ठाणें हातीं घेऊन तेथें जम बसल्यावर आदिलशाहीचें सामर्थ्य कोठपर्यंत पुरें पडूं शकतें तें पाहीपर्यंत कोंकणांतील स्वारीची अशी घिसाडघाई करण्याचें महाराजांना कांहींच कारण नव्हतें. दक्षिणेकडे रुस्तुमजमा त्यांचा स्नेही होता. दाभोळच्या वरील कोंकण त्यांच्या हातीं होतेंच. पन्हाळा पक्का काबीज झाल्यानंतर वरघांटाची सर्व पट्टी ताब्यांत आल्यावर राहिलेली छोटी कोंकणपट्टी घेणें अगदीं सोपें काम होतें. परंतु पन्हाळ्याचा बंदोबस्त पक्का करणें हें मात्र अत्यंत जरुरीचें होतें. त्यामुळें १५८१च्या मार्ग. वद्य९पासून पौष वद्य१० पर्यंतचा एक महिना शिवाजीनें पन्हाळ्यावरच सैन्याची व्यवस्था वगैरे करण्यांत व विजापूरकरांच्या हालचालींची बातमी ठेवण्यांत घालविला असला पाहिजे, असा जो

शिवभारतावरून ध्वनी निघतो तोच वस्तुस्थितीला धरून आहे. मात्र मध्यंतरीं पन्हाळ्याचा पक्का बंदोबस्त होण्याकरितां पन्हाळ्याचे पोटकिल्ले म्हणजे दुय्यम किल्ले घेणें आणि त्याला सामग्री पुरविणाऱ्या पेठा व रस्ते ताब्यांत घेणें हीं कामें अर्थातच त्यानें केली असलीं पाहिजेत. डच पत्रांवरून असें म्हणतां येतें कीं, असे पोटकिल्ले शिवाजीनें घेतले व रायबागसारख्या मोठ्या पेठा तेथील रहिवाशांशीं अनुसंधान लावून ताब्यांत आणिल्या. या उद्योगामध्यें शिवाजीचें सैन्य विजापूरच्या बरेंच जवळ गेलें असेहि प्रसंग आले. रायबाग विजापुरापासून दोन अडीच दिवसांच्या मकाणावर आहे. परंतु कोल्हापूर-पन्हाळ्यापासून फार तर तें एक दीड दिवसांच्या अंतरावर असेल.

**४. तत्कालीन राजकारणाचें स्वरूप**—वर सांगितल्याप्रमाणें पन्हाळा हस्तगत होत असतांना महाराजांनीं राजकारणाच्या बनावाकडे लक्ष देत बसावें, विनाकारण स्वाऱ्यांचा पसारा करून स्वसामर्थ्याचा व्यय करूं नये अशीहि परिस्थिति कांहीं अंशीं आलेली दिसते. रुस्तुमजमा हा महाराजांचा स्नेही असला तथापि त्याला कितपत स्वातंत्र्य मिळूं शकतें हा प्रश्न होता. कोल्हापूरच्या लढाईच्या पूर्वी " रुस्तुमजमा शिवाजीकडे येत असून थोड्याच दिवसांत दोघे एकत्र होतील आणि उभयतांच्या विचारानें आपला दारूगोळा वगैरे खपेल " असा विचार करण्यास किंवा "शिवाजीचा बाप दक्षिणेकडून १७,००० सैन्य घेऊन आठ दिवसांत येईल व विजापुरावर चालून जाईल" अशी आशा प्रदर्शित करण्यास इंग्रजांना कांहीं सबळ कारण असलेंच तर त्यामुळें शिवाजीलाहि आपली तयारी करीत रहावयास पाहिजे होतें. त्याच पत्रांत (ले. ७९१) म्हटल्याप्रमाणें रुस्तुमजमा, बहलोलखान, शहाजी व शिवाजी हे एका पक्षाचे असल्यास आणि त्यांत ध्वनित केल्याप्रमाणें एक मोठा कट अल्ली आदिलशहाविरुद्ध उभारावयाचा असल्यास इतकी तयारी झाल्यानंतर त्यांच्या आड काय आलें असावें याबद्दल विचार केला पाहिजे हें उघड आहे. परंतु कांहीं होणार असला तर हा बनाव मुळींच घडून आला नाहीं. रुस्तुमजमा शिवाजीला मिळण्याऐवजीं त्याच्याशीं वरकरणीं कां होईना परंतु समोरासमोर लढला आणि शहाजी मोठें सैन्य घेऊन आपल्या मुलाच्या बरोबरच उठावणी करून विजापूरचें राज्य बुडविण्याकरितां म्हणून येणार होता तो आला नाहीं. अफजलखानाची स्वारी निघालेली ऐकून कदाचित् मुलाच्या कैवारानें

शहाजीची ही हालचाल झाली असेंहि समजण्यास हरकत दिसत नाहीं. म्हणजे अफजलाचा नाश झालेला ऐकल्यानंतर त्यानें आपला बेत फिरविला असण्याचा बराच संभव आहे. शहाजीची ही हालचाल खरी असल्यास बऱ्याच दृष्टींनीं अत्यंत महत्त्वाची ठरेल. ह्या हालचालीमुळें, शिवाजीच्या उपक्रमां-बद्दल पूर्वीपासून शहाजीचा विरोध होता म्हणून समजणाऱ्या पक्षास, ह्या वेळीं तरी आणि पर्यायानें पूर्वीं देखील, त्या विरोधाचें स्वरूप समजलें जातें तितकें कट्टर स्वरूपाचें नसावें असें मान्य करावें लागलें. विशेषतः शहाजीचें ' आम्ही रजपूत ' म्हणून गाजलेलें पत्र महमद आदिलशाहाच्या मृत्यूनंतरचें ( १५७९ श्रावण) म्हणजे ह्याच अडीचतीन वर्षांतलें आहे, हें लक्षांत घतलें असतां शहाजीच्या वृत्तीबद्दल गैरसमज राहण्याचें कारण नाहीं. ह्या विषय मागें एके ठिकाणीं सविस्तर येऊन गेला असल्यामुळें येथें त्याची विशेष परिस्फुटता करीत नाहीं. परंतु शिवाजीमहराजांच्या बद्दल आजहि सर्वांच्या कल्पना तितक्या स्पष्ट नसल्यामुळें या ठिकाणीं शिवाजी व विजापूरकर ह्यांच्या संबंधांबद्दल थोडा उहापोह केला पाहिजे. समकालीनांच्या मध्यस्थीनें ह्या संबंधांचा निकाल करून घ्यावयाचा म्हटलें तर उघडपणें दोन पंथ आपल्या नजरेस पडतात. एक पंथ बखरकार व महाराजांच्या प्रजाजनांचा; दुसरा, मुसलमान व तत्सम म्हणजे त्यांच्या कल्पनांवर चालणाऱ्या पाश्चात्य व्यापाऱ्यांचा. यांपैकीं दुसऱ्यांनीं शिवाजीविषयीं काढलेले उद्गार आपल्याला आक्षेपार्ह वाटतात, एवढ्यावर ते तसे ठरवितां येणार नाहींत. ह्या उद्गारांच्या पाठीमागें कोणती सकारण मनोभूमिका आहे याचें शक्य तर पृथःकरण करून पाहिलें पाहिजे. याकरितां महाराजांची परिस्थिति थोडी लक्षांत आणणें जरूर आहे. विजापूरदरबारच्या एका जहागिरदाराचा मुलगा ही सुरवातीची स्थिति इतक्या कालावधीनंतर आणि असें उज्ज्वल चरित्र स्पष्ट दिसत असल्यामुळें आज आपल्या नजरेसमोर आली नाहीं, तर आश्चर्य नाहीं. परंतु समकालीनांच्या नजरेसमोरून ती ढळणें अशक्य होतें. इंग्रज त्याला शहाजी व रुस्तुमजमा यांचे प्रमाणेंच विजापुरी उमराव समजतात. गोव्याचा गव्हर्नर त्याला आदिलशाही सरदार असेंच म्हणतो (ले. ७९२). डचांच्या हकीकतींत तर महमद आदिलशहानें त्याला आपल्या नोकरींत घेतलें होतें, असें लिहिलें आहे. असा सेव्यसेवक भाव परंपरेनें गृहीत धरणाऱ्या लोकांनीं शिवाजीनें चालविलेल्या उपक्रमाला बंडाळी व त्याला स्वतःला

बंडखोर म्हणावें आणि पुढें त्याच्या लुटीमुळें त्रस्त होऊन गेल्यानंतर 'दरोडेखोर' म्हणूनहि त्याची संभावना करावी व नंतरच्या इतिहासकारांनींहि त्याचेंच अनुकरण करावें ही वस्तुस्थिति विचारांत घेण्यासारखी आहे. मात्र हीं विशेषणें देतांना शिवाजीच्या सामर्थ्याबद्दल कोणींहि स्वत:चा गैरसमज करून घेतलेला नाहीं हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. वजनदार बापाच्या पोटीं जन्म घेतल्यानें प्राप्त होणाऱ्या महत्त्वामध्यें, स्वपराक्रमानेंहि मिळविलेल्या मान्यतेची भर पडल्यामुळें, अल्पावधींतच शिवाजीला अनन्यसाधारण असें स्थान मिळालें होतें. बापाप्रमाणेंच महत्त्व पावलेला शिवाजी 'विजापूरच्या तक्तावर दुसरा एक राजपुत्र बसविणार आहे' अशाबद्दलची अफवा उठण्याइतकें शिवाजीचें नांव त्या वेळीं सर्वतोमुखीं झालें होतें ( ले. ८१० ). आणि त्यामुळेंच शिवाजीचा नि:पात करण्याची घोर प्रतिज्ञा करणाऱ्या अफजलखानाला शिवाजीवर अली आदिलशाहानें पाठविलें होतें.

शिवाजी व अफजलखान हे तत्कालीन परिस्थितीवरून आणि घडलेल्या इतिहासावरूनहि पहातां परस्पर-विरोधी अशा दोन पक्षांचे प्रतिनिधि होते. त्यांमध्यें पूर्वींपासूनच चुरस होती. प्रतापगडावरील प्रकारामुळें तिचा एका अर्थानें शिवाजीच्या बाजूनें कायमचा निकाल लागला असें दिसतें. परंतु अफजल-प्रसंगामुळें निकरावर आलेला हा सामना बराच आधींपासून सूचित होता यांत शंका नाहीं.

शके १५७८ कार्तिक वद्य १३ रोजीं महमद आदिलशाहा मृत्यु पावला. त्यानंतर अली गादीवर आल्या वेळीं दरबारांतील महत्त्वाचे सरदार म्हणून ज्यांचीं नांवें हाफ्त कुरसीमध्यें दिलीं आहेत त्यांत रुस्तुमजमा, बहलोलखान, महाराज शहाजी अशीं नांवें आहेत. हे व शिवाजी यांचा एकच पक्ष असल्याबद्दलची माहिती किंवा कल्पना इंग्रजांच्या पत्रांत (ले. ७९१ ) आली आहे. शके १५७६ च्या पोर्तुगीजांनीं विजापुरास पाठविलेल्या प्रतिनिधीकरितां लिहून दिलेल्या कलमबंदींत फत्तेखान, शहाजी व मलिक याकूत, हे तिघे वजनदार सरदार म्हणून उल्लेखिले आहेत. हे सर्वहि एकमतानें व राजनिष्ठेनें त्या वेळीं वागत होते. तेव्हां आवांतर परिस्थिति लक्षांत घेतां महमद आदिलशाहाच्या कारकीर्दींत हा पक्ष वरचढ होता, आणि त्यांत कर्तृत्ववान् माणसांचा समावेश होत होता, अशी वस्तुस्थिति दिसते. परंतु महमदाच्या मरणानंतर अलीच्या कुलाबद्दल किंवा त्याच्या सल्लागारांवर नाखूष

होऊन हा पक्ष तुटकपणानें वागूं लागला. ही गोष्ट त्या वेळीं मुखत्यार म्हणून कारभार पाहाणाऱ्या बडे साहेबिणीला न आवडून(ले. ८३६)तिनें आपल्या सत्तेचा कित्येक वेळां दुरुपयोग करून दूरदर्शी मुत्सद्यांपैकीं एकामागून एकाला यमसदनाला पाठविण्याचा धडाका लाविला. अफजलखानाच्या औरंगजेबाविरुद्ध करोलपणाचे धोरणाला विरोध करणारा दूरदर्शी वजीर खानमहमद हा तिचा पहिला बळी मारेकऱ्यांनीं घेतला ( १५७९ कार्तिक, मो. १९९ ). १५८० च्या श्रावणांत बहलोलखान मारिला गेला आणि लगेंच पौषांत फत्तेखानाला विजापुरांत विष देण्यांत आलें. राहतां राहिले रुस्तुमजमा व शहाजी. हे विरुद्ध पक्षांत असल्याबद्दलचे पुरावे मागें दिलेच आहेत. तेव्हां ह्या प्रबळ पक्षाची अशा रीतीनें वाताहात होऊन तद्विरोधी पक्ष अधिकारारूढ झाल्यामुळें ह्यापुढील विजापुरी धोरणामध्यें शिवाजीला कसून विरोध करण्याचा कार्यक्रम समाविष्ट केला जाणें क्रमप्राप्त होतें. ह्या कट्टर धोरणाचा पुरस्कर्ता अर्थातच अफजलखान हा होता. त्याच्या मरणानंतर केवळ विकारवशतेवर उभारलेलें हें धोरण थोडें मजिद झाल्याचें व त्यांत राजकीय परिस्थित्यनुरूप बदल केल्याचें दिसून येतें, त्याबद्दल पुढें सांगण्यांत येईल.

**५. शिवसैन्याचा विजापुरी मुलखांत घुसलेला त्रिशूळ**—कोल्हापूरच्या लढाईच्या वेळीं वर वर्णन केलेल्या रुस्तुमजमा व शिवाजी यांच्या संबंधामुळें रुस्तुमजमा मागें राहिला होता. फाजलखान त्वेषाच्या भरांत अघाडी संभाळण्यास पुढें झाला. परंतु नेताजीच्या निकराच्या चढाईपुढें त्याच्यानें टिकाव धरवला नाहीं. रुस्तुमजमा सावधगिरीनें पिछाडीसच राहिल्यामुळें आणि त्याच्यावरील हल्ल्याचा जोर तितका नसल्यामुळें थोडक्यांत निभावून हुकेरीला आपल्या जहागिरीच्या ठिकाणीं परत निघून गेला. रुस्तुमजमासारखा खासा केवळ पांच सहा घोडेस्वार घेऊन समोरून पळून गेला तरी, शिवाजीनें त्याला पकडलें नाहीं ही वस्तुस्थिती वर्णन करून शिवभारतकारानें त्याचें कारण दिलें आहे तें मोठें मनोरंजक आहे. भित्र्यावर हात टाकीत नाहींत, अशी मखलाशी करून भारतकारानें शिवाजी सूर्यवंशी राजे व रुस्तुमजमा यांचा आंतून स्नेह होता हें स्पष्ट सांगण्याचें टाळलें आहे. या काळच्या इंग्रजी व डच पत्रव्यवहारावरून पहातां रुस्तुमजमाचा हा नाजूक संबंध लक्षांत घेऊनच शिवाजीनें त्याच्यावर आपण स्वतः हल्ला करण्याचें काम पत्करलें आणि त्याचें विशेष नुकसान न होऊं देतां त्याला निसटून जाण्याची संधी दिली असें म्हणावें लागतें ( भा. २४-७४ ). रुस्तुमजमा-

नेंहि शिवाजीचें सैन्य विजापुरावर व मिरजेवर हल्ले करीत असतां त्याला अडविलें नाहीं असें इंग्रजांनीं लिहिलें आहे.

कोल्हापूरच्या स्वारीचा असा मनाजोगता निकाल लागल्यावर महाराज पन्हाळ्यावर परत गेले आणि तेथें बसून, पन्हाळ्याखालील प्रांत निर्वेध ताब्यांत आला. ह्या गोष्टीचा फायदा कसा घ्यावयाचा या दृष्टीनें त्यांनीं विचार करून आपला किल्ला आणि सैन्य यांचा चांगला बंदोबस्त केला. कान्होजी जेधे यांजकडून कावजी कोंढाळकर व वाघोजी तुपे यांस मागोन घेऊन त्यांना हशमाच्या हजारिया सांगितल्या म्हणजे हजार पायदळाचे सेनापती बनविले; ही गोष्ट याच व्यवस्थेची द्योतक आहे. परंतु पूर्वींच एक महिना या विवंचनेंत घालविला असल्यामुळें यावेळीं फक्त पंधरा दिवसांतच सैन्याची सिद्धता करून कोंकणांत एक व देशावर एक अशा दोन स्वाऱ्या शिवाजीनें काढल्याचें दिसतें. यांपैकीं विजापूरकडील म्हणजे देशाकडील स्वारी माघ शु. १४( १६६० जाने. १६ ) ला निघाली हें आपल्याला माहीत आहे (जे. श. ). शकावली व डच पत्रव्यवहारांतील मोघम उल्लेखांवरून ह्या स्वारीबरोबर शिवाजी गेला असा बोध होत असला तरी तो पन्हाळ्यावरच राहिला आणि त्यानें सेनापती ( नेताजी )ला अली आदिलशहाचा मुलुख जिंकण्याकरितां पाठविलें हें अधिक सयुक्तिक दिसतें. पूर्वींच्या विजयानें धीर आल्यामुळें आतांची ही दौड नेताजीच्या स्वभावाप्रमाणें त्यानें फारच दूरवरची मारिली. दोन अडीच महिने तो याप्रमाणें बाहेर राहिला. नेताजीनें जिंकलेल्या किंवा व्यापलेल्या मुलखामध्यें पूर्वेकडील विजापूरनजीक असलेलें तिकोटें आणि दक्षिणेकडील हुकेरी, गोकाक येथवर घटप्रभेपर्यंतचीं ( भा. २४-४ ) ठाणीं, आणि गदग, लक्ष्मीश्वर या धारवाड जिल्ह्यांतील ठिकाणांवरून सूचित होणारा त्या पलीकडील मुलूखहि खंडण्या वसूल करण्याकरितां आक्रमिला. मध्यंतरीं महाराजांच्या सैन्यानें मिरजेचा, विजापूर-पन्हाळा मार्गावरील, किल्ला हाताखालीं घालण्याचा प्रयत्न केला. किल्ला सहजासहजीं ताब्यांत येत नाहीं असें पाहून तेथें वेढा घालण्यांत आला. त्या वेढ्याच्या ठिकाणीं बहुधा महाराज जातीनें हजर राहिले असण्याचा संभव आहे. नेताजीची भयंकर दौड आणि शिवाजीची चिकाटी

१ या वेळच्या मराठ्यांच्या पराक्रमाचा अस्सल पुरावा ( के. ८४० ) उपलब्ध आहे. परगणे तेरदलमध्यें ' सिवाजीची फितरत होउनु घोडाराऊत तहद रायबाग अडगलपावेतों कावीज केलें...विलायत खराब आली. '

यांमुळें 'देश तर उध्वस्त झाला, * सैन्य गळालें, पन्हाळा वगैरे गड गेले आणि मोंगली किंवा अन्य सैन्याकडून मदत होण्याचीं चिन्हें दिसतना' अशी अडचणीची वेळ प्राप्त होऊन अल्लीला काय करावें तें सुचेनासें झालें. कदाचित् आपण स्वतः जावें किंवा कसें याबद्दल तो फिकिरींत पडला असतां, कर्नूलचा सिद्दी जौहर ह्या बंडखोर सरदाराला गौरवून तो जाण्यास सिद्ध झाल्यामुळें बुडत्याला काडीचा आधार मिळाला आणि त्याला उंची पोषाख व सलाबतखान हा किताब देऊन त्याची शिवाजीवर रवानगी करण्यांत आली. ही एवढ्या थोड्या मुदतींत शिवाजीवर निघालेली तिसरी स्वारी होय. सलाबतखानाबरोबर सुमारें १६ ते २० हजार घोडदळ आणि ३५ ते ४० हजार§ पायदळ सज्ज होतें. त्यामध्यें कर्नूलकडील कर्नाटकी पायदळ आणि शिवाय दुसऱ्या स्वारींत मोड झाल्यामुळें बेहिंमत झालेले रुस्तुमजमा व फाजलखान इत्यादि सरदारहि होते. एवढें मोठें सैन्य आपल्यावर चालून येत आहे हें समजतांच मिरजेचा वेढा उठवून शिवाजी परत फिरून सावकाश सावकाश आसमंताद्भागाचा बंदोबस्त करीत करीत पन्हाळ्याकडे वळला, आणि चैत्र शु. १ (२ मार्च १६६०) स गडावर जाऊन पोंचला. पुढें येणाऱ्या वेढ्याला तोंड देतां यावें म्हणून गडावर धान्यसामग्री भरून ठेवणें आणि इतस्ततः संचार करीत असलेलें सैन्य एकत्र करणें ह्या गोष्टी मध्यंतरीं चालूच होत्या. त्या करण्यास पुरेसा वेळ बहुधा सांपडला नसावा. कारण, सलाबतखान पन्हाळ्याला लगेच येऊन वेढा देऊन बसला. शिवाजीचें सैन्य या वेळीं विजापूरकरांच्या रणक्षेत्रांत उतरलेल्या सैन्याशीं तुल्यबळ होतें, असें वेंगुर्ल्याच्या डच लोकांनीं त्या वेळीं लिहिलेल्या पत्रांत म्हटलें आहे. तें शिवाजीच्या स्वाऱ्यांचा एकंदर पसारा लक्षांत घेऊन लिहिलें असावें. परंतु वस्तुस्थिति काय होती तिचा अंदाज पूर्वी आलाच आहे.

शिवाजीच्या इतस्ततः पसरलेल्या सैन्यांपैकीं दोन तुकड्यांची हकीकत येथपर्यंत दिली आहे. तीवरून नेताजीची तुकडी विजापूरच्या रोखें गेली,

---

* शिवाजीनें या वेळीं नवे किल्ले बांधले व विजापूरकरांचा प्रदेश लुटला, व व्यापाऱ्यांचे तांडे लुटले. पण मशीदी, बायका आणि कुराण यांचा मान तो राखीत असे असें खाफीखान यानें लिहून ठेविलें आहे (इ. ७-३०५).

§ इंग्रजांनीं हें सैन्य फक्त १५००० होतें असें कळविलें आहे (ले. ८१५). परंतु आपल्या तोफांचा परिणाम उठून दिसण्याची आशा बाळगून त्यांनीं सैन्य कमी दर्शविलेलें दिसतें.

ती गडावर शिवाजीबरोबर वेढ्यांत सांपडली नाहीं हें स्पष्ट झालेंच आहे. ती गदगलक्ष्मीश्वरच्या पराक्रमानंतर तशीच विजापुराकडे चाल करून गेली असेल हें असंभवनीय नाहीं, किंवा कदाचित् डच पत्रांत सुचविल्याप्रमाणें शिवाजीबरोबर पन्हाळ्यापर्यंत येऊन तेथून शिवाजीनें विजापुरावर पाठविल्या-मुळें जोहरचा वेढा ढिला करण्याकरितां राजधानीवर हल्ला करण्यास गेली असेल. शिवाजीच्या सैन्याचा तिसरा एक भाग, नेताजीची स्वारी निघाली त्याच वेळेला, कोंकणामध्यें गेला होता असें इंग्रज व डच साधनांवरून निश्चित विधान करितां येतें. ह्या तुकडीपैकीं सात आठशें लोक घेऊन दोरोजी * नांवाचा हवालदार राजापुरास नांगरलेलीं अफजलखानाचीं तीन गलबतें ताब्यांत घेण्यासाठीं तेथें आला. परंतु तेथील विजापुरी सुभेदार अबदुल करीम ह्याचा कांहीं देण्याघेण्याचा व्यवहार भागवितांना तीं इंग्रजांनीं आपल्या ताब्यांत घेण्याचा प्रयत्न चालविला होता. अर्थात् या बाबतींत इंग्रजांशीं बाचाबाची होऊन दोरोजीनें राजापूरचा गिफर्ड नांवाचा एक इंग्रज व एक दलाल आपल्याबरोबर पकडून नेला. ही गोष्ट शके १५८१ माघ वद्य ३ (इ. १६६० जाने. २०) रोजीं झाली. शिवाजीच्या सैन्याचा व इंग्रज लोकांचा प्रत्यक्ष असा प्रथम संबंध या वेळीं आला.

या वेळीं दोरोजीच्या तुकडीनें राजापूर बंदरांतील अफजलखानाचीं गलबतें ताब्यांत घेण्याशिवाय इतर भानगडींत पडण्याची उत्सुकता दर्शविली नाहीं ही गोष्ट रुस्तुमजमा व शिवाजी यांच्या पूर्वीं उल्लेखिलेल्या स्नेहाला धरूनच आहे. पुढें जेव्हां इंग्रजांनीं रुस्तुमजमाकडे दोरोजीच्या आगळिकीबद्दल तक्रार केली, आणि रुस्तुमजमाचें व इंग्रजांचें सूत आहे असें शिवाजीच्या लक्षांत आलें, तेव्हां शिवाजीनें झाल्या चुकीचें परिमार्जन करून इंग्रज कैदी व घेतलेलें सामानसुमान परत देण्याचा हुकूम दिला (ले. ८०४, १५८१ फाल्गुन शु. १४). श. १५८१च्या फाल्गुन वर्षांत राजापूरच्या जकात नाक्या-वर रुस्तुमजमाचा ताबा अव्याहत चालू होता (ले.८०५) हें आपल्याला पक्कें माहीत आहे. तात्पर्य, रुस्तुमजमाच्या मुलखांत शिवाजीची वागणूक अत्यंत सावधगिरीची म्हणजे स्नेहाची दिसून येते." याबद्दलची स्पष्ट माहिती

* सदर दोरोजीचें नांव इंग्रजी साधनावरूनच प्रथम कळतें. मराठी पत्रव्यवहारांत हें नांव कोठेंच आढळत नाहीं. परंतु इंग्रजी साधनांमध्यें तें ज्या परिस्थितींत आढळतें तीवरून त्याबद्दल संशय घेण्यास जागाच नाहीं.

ले. ८११ मध्यें असून शिवाजी वेढ्यांत सांपडल्यानंतरहि 'रुस्तुमजमाचें मूळचें राजापूर शहर त्याचेकडेच आहे. शिवाय शिवाजीनें त्याला आणखीं दोन तीन शहरें दिलीं आहेत' असें म्हटलें आहे. या विधानाला अगदीं स्वतंत्रपणें डच पत्रांत ( शि. नि. इं. पृ. ८० ) प्रत्यंतर मिळतें व हीं शहरें देणें याचा अर्थ काय याचाहि खुलासा मिळतो. सलाबतखानाकडून वेढला गेल्यावेळीं किल्याच्या संरक्षणाकरितां म्हणून शिवाजीनें आपलें विखुरलेलें सैन्य जमा केलें तेव्हां त्याला जीं ठाणीं सोडावीं लागलीं तीं मुकाट्यानें रुस्तुमजमा आपण स्वतः घेऊन बसे, सलाबतखान किंवा इतर विजापुरी सरदारांना घेऊं देत नसे, किंवा स्वतः स्वारी करूनहि घेत नसे, असें त्यांत लिहिलें आहे. जणूं काय शिवाजी व तो यांच्यामध्यें परस्परांना अडचण उत्पन्न करावयाची नाहीं असा करारच झाला होता. हें धोरण सहज लक्षांत भरण्यासारखेंच असल्यामुळें डच पत्रलेखकानें, गुप्तपणें ४० हजार होनांचा त्यानें शिवाजीकडून लांच घेतल्याविषयीं जनप्रवाद लिहून ठेविला आहे. रुस्तुमजमाचें कांहीं सैन्य सलाबतखानाबरोबर पन्हाळ्याच्या वेढ्यांत हजर होतेंच. परंतु वारा वाहील तशी पाठ फिरवितां यावी म्हणून या वेळीं तो आपलें मुख्य सैन्य घेऊन हुकेरीलाच तळ देऊन बसला होता, ही गोष्ट समकालीनांच्या लक्षांत आल्याशिवाय राहिली नाहीं.

रुस्तुमजमाच्या मुलखाचा विस्तार * मागें दिलाच आहे. तेव्हां आतां उघड करून सांगितलेली परिस्थिति लक्षांत घेतां कोंकणांत गेलेल्या शिवाजीच्या सैन्याचा मुख्य भाग रुस्तुमजमाच्या मुलखाला त्रास देण्याचा उद्योग करीत नव्हता हें सांगण्याची जरुरी राहिली नाहीं. रुस्तुमजमाच्या राजापूरच्या मुलखाच्या दक्षिणेस बांदा, कुडाळ, वाडी व देवगड, आचरें इत्यादि भाग त्याच्या हद्दींत नव्हता. आचरें एका स्वतंत्र राजाच्या ताब्यांत होतें; कुडाळ, वाडी हा भाग वाडकर देसाई लखम सावंत ह्याच्या हद्दींतील होता; आणि वेंगुर्लें बंदर खवासखान ह्या विजापुरी सुभेदाराच्या अमलाखालीं होतें. आचऱ्याचा राजा व वाडकर सावंत हे आदिलशाहीचे मांडलिक होते. अर्थात् शिवाजीला त्यांच्यावर स्वारी करण्यास मुळींच हरकत

---

* मोरगांवच्या कागदांपैकीं कागद शि. च. सा. खंड तीन मध्यें छापले आहेत त्यांवरून या मुद्यावर अधिक प्रकाश पडतो.

नव्हती. आणि म्हणूनच शिवाजीची कोंकणांत आलेली ही तुकडी कुडाळ-कडील मुलूख घेण्यांत गुंतली होती.

देसाई किंवा मांडलिक राजे यांचे व केंद्रस्थ सत्तेचे परस्पर संबंध त्या काळीं कोणत्याहि प्रकारें निश्चित नसत. आणि परस्परांच्या मनगटांतील जोराप्रमाणें प्रत्येकाचें पारडें जड किंवा हलकें होई. डच्च पत्रांतील कांहीं भाग स्पष्टपणें लागला नाहीं. तथापि, लागला त्यावरून प्रथम कांहीं जोराची तक्रार या वाडीच्या सावंतानें खुद्द विजापुरास जाऊन मांडिली; पण तेथील दरबारनें त्याची कांहीं समजूत काढून त्याला राजनिष्ठ बनविलें. तेव्हां कांहीं सेवा करण्याची उमेद धरून तो परत आला;असा आशय दिसतो. इतक्यांत दाभोळपासून कुडाळ-पर्यंत सर्वत्र दरारा बसल्यावर किंवा स्नेहाखातर रुस्तुमजमा आपल्यावर हात टाकणार नाहीं अशी खात्री झाल्यावर शिवाजीचें सैन्य कुडाळवर आलें. तेव्हां बांदा, वेंगुर्ला इत्यादि बादशाही मुलूख वांचविण्याच्या उद्योगास लखम सावंत ईर्षेनें लागला. त्याच्या विनंतीवरून शेजारच्या अनेक देसायांनीं मिळून सुमारें चार हजार सैन्य उभें केलें; आणि लखम सावंताच्या सैनापत्याखालीं कुडाळवर चाल केली. ही त्यांची स्वारी श. १५८१ च्या फाल्गुनांत झाली. या वेळीं महाराज वेढ्यांत सांपडले नव्हते. आणि सैन्याची योग्य तऱ्हेनें कुमक करून किंवा सावंताची समजूत घालून त्यांनीं त्याचा हल्ला परत लाविला असें दिसतें. सावंतानें त्यामुळें आपल्या सहकाऱ्यांच्या मनाविरुद्ध शिवाजीच्या सेनापतीशीं तह केला आणि तो वाडीला परत गेला. शिवाजीच्या लोकांनीं कोणत्याहि प्रकारचा बखेडा न करितां सावंताचा मुलूख सावंताच्या ताब्यांत राहूं द्यावा, पण त्यांतून वाटेल तिकडे निघून जाण्याची फक्त त्यांना परवानगी असावी, असा करार झाल्यामुळें युद्धाची दगदग न करितां तो परत गेला खरा, परंतु शिवाजीचे लोक एवढ्या साध्या कामगिरीकरितां अर्थातच आले नव्हते. सावंतांनीं आपला मुलूख मोकळा सोडितांच शिवाजीच्या लोकांनीं लगेच कुडाळचा किल्ला स्वाधीन करून घेतला. शिवाजीकडे किल्ल्याच्या संरक्षणाकरितां म्हणून जादा सैन्याची मागणी यांच्याकडून होतांच त्यानेंहि सुमारें ४००० पायदळ व ७०० घोडदळाची एकदम योजना केली. आणि लखम सावंताला त्यांचें खरें स्वरूप कळून आलें. तेव्हां त्यांना खोटीच भीति दाखविण्याकरितां लखम सावंतानें आपलें छोटें सैन्य पाठविलें. पण त्याचा कांहींच उपयोग न होतां उलट

मराठ्यांनीं त्याचें अवसान जोखून यथास्थित संचार सुरू केला आणि मराठ्यांच्या भीतीमुळें त्याचा मुलूख उध्वस्त होऊं लागला. शेवटीं नाक मुठींत घेऊन या वेळीं लखम सावंतानें पुनः आपल्या शेजाऱ्यांकडे मदतीची याचना केली. पुनः ४००० सैन्य जमा होऊन तें कुडाळवर रात्रींच्या वेळीं चाल करून गेलें (शके १५८२, चैत्र शुद्ध ६ ). या हल्लयालाहि मराठ्यांनीं दाद दिली नाहीं. परंतु बहुधा पन्हाळ्याच्या बंदोबस्ताकरितां इकडून सैन्य व दारूगोळा नेण्यांत आला असल्यामुळें किल्लयांतील दारूगोळा खपून जाऊन फार वेळ किल्ला लढविणें त्यांना शक्य झालें नाहीं. व रात्रभर शत्रूला थोपवून धरून सकाळच्या प्रहरीं त्यांनीं पळ काढिला. या वेळीं शिवाजी पन्हाळ्यांत अडकला असल्यामुळें त्यांचा पाठपुरावा व्हावा तसा अर्थातच झाला नाहीं. लखम सावंत व आचरें येथील राजा कौरेंना ही संधी चांगली मिळून त्यांनीं शिवाजीचें सैन्य आपण काढून लाविलें अशी फुशारकी मारण्यास कमी केलें नाहीं. परंतु सर्वांत आश्चर्याची गोष्ट ही कीं, दंगल संपते न संपते तोंच रुस्तुमजमानें कुडाळ आदिकरून प्रांतांत प्रवेश करून तो प्रांत आपल्या हुकुमानें शिवाजीवर स्वारी करून ताब्यांत आला असें विजापुरास कळविलें. कुडाळ व फोंडा एकदम आपल्या ताब्यांत घेऊन तेथें शहामीर नांवाच्या सुभेदाराची त्यानें नेमणूक केली व लखम सावंताचें पारिपत्य करण्याची कामगिरी त्याच्यावर सोंपविली.

शिवाजीचे हे लोक मुख्यत्वेंकरून मुलूख घेण्याची कामगिरी करीत होते असें म्हणतां येत नाहीं. शिवाजीच्या नेहमींच्या धोरणाप्रमाणें देशाप्रमाणेंच त्यानें कोंकणांतहि खंडण्या वसूल केल्या ( ले. ८११ व शि. नि. इं. पृ.८४ ). पन्हाळ्याकडील मुख्य उपक्रमाला कोंकणांतून व देशांतून द्रव्याची मदत व्हावी असाच या बारीकसारीक उपयुद्धांचा उपयोग शिवाजीनें करून घेतला असावा.

कुडाळकडील शिवाजीच्या सैन्याच्या हालचालींचें हें वर्णन मुख्यत्वें करून वेंगुर्ल्याहून पाठविलेल्या डच पत्राच्या आधारें केलें आहे. बखरींवरून किंवा खुद्द शिवभारतावरूनहि या स्वारीची कल्पना येत नाहीं. शिवभारतांत या उपयुद्धाचें नांव देखील आलें नाहीं. याचें एक कारण असें आहे कीं, शिवभारत हा सांगोपांग कालानुक्रमदर्शक इतिहास नसून शिवाजीमहाराजांचें संगतवार मुख्य सूत्र धरून चरित्र सांगणें एवढाच त्याचा उद्देश आहे. अफजलवधाचें सूत्र घेऊन पन्हाळाप्रकरणीं शिद्दी जौहराच्या वेढ्यावर

त्याला मुख्यत्वेंकरून यावयाचें असल्यामुळें हें कुडाळकडील उपाख्यान त्याला तितकें महत्त्वाचें वाटलें नाहीं, यांत नवल नाहीं. शिवाय या स्वारीचा, खुद्द महाराजांशीं, म्हणजे ते प्रत्यक्ष त्यांत हजर असल्यानें येणारा संबंध जुळण्यासारखा नसल्यामुळें प्रसंगाच्या दृष्टीनें त्याचें महत्त्व भारतकारांना राहिलें नाहीं. शिवभारतांतील बहुतेक अनुल्लेखांची संगती परमानन्दाच्या प्रत्यक्षाप्रत्यक्ष विवेकाच्या ह्या कसोटीवर लावितां येण्यासारखी आहे असें वाटतें. खुद्द महाराजांची आणि कोंकणांत पाठविलेल्या तुकड्यांची हालहवाल पाहिल्यावर आतां नेताजीबरोबर गेलेल्या घोडदळाच्या पराक्रमाची हकीकत या ठिकाणीं सांगणें जरूर आहे. महाराज मिरजेला वेढा देत असतांना नेताजी गदगलक्ष्मीश्वरच्या बाजूला खंडण्या वसूल करीत होता. कारण ह्या मुलूख सधन असल्यामुळें खंडणी अधिक मिळण्याचा संभव त्याच बाजूला विशेष होता. परंतु श. १५८२ च्या चैत्र शुद्ध प्रतीपदेला पन्हाळ्यावर महाराज जाऊन पोंचले आणि सलाबतखानासारख्या जबरदस्त आणि करोल सरदाराचा वेढा पडला. असा वेढा उठविण्याकरितां किंवा ढिला करण्याकरितां शत्रूच्या राजधानीला शह देण्याची युक्ति पुरातन आणि अनुभवसिद्ध असून ती या वेळीं नेताजीनें आपल्या स्वतःच्या हिंमतीवर किंवा महाराजांच्या सूचनेनें अमलांत आणिली. कमींतकमी ४।५ हजार घोडदळ घेऊन नेताजीनें आपला रोख बदलून विलक्षण त्वरेनें विजापूरचें सधन आणि शोभिवंत उपनगर शहापूर गांठलें. अचानकपणें रात्रींच त्याच्यावर हल्ला करून त्यानें तें घेतलें ( चैत्र शु. १५ सुमारें ). या वेळीं विजापुरामध्यें सैन्य अगदीं कमी राहिलें होतें, ही गोष्ट नेताजीच्या पक्की ध्यानांत आली होती तिचा त्यानें फायदा घेतला. तेथें सैन्य अगदींच थोडें असल्यामुळें शहापूर अल्पावकाशांत ताब्यांत आलें व नेताजीनें मनसोक्त लूट केली. नेताजीनें या वेळीं विजापूरकरांचे सेनापती मुल्ला महमद व दोन सरदार बाबूलखान ( ! ) व आजापा नायक यांचा पराजय करून निदान २००० घोडेस्वार कैद केले अशी माहिती मिळते. ( ले. ८३९ ). नेताजीनें मारिलेल्या ह्या धडकीमुळें विजापूरच्या दरबारांतील लोक व खुद्द अल्ली आदिलशहा पार भेदरून गेले. कदाचित् नेताजीच्या अपेक्षेप्रमाणें सलाबतखानाला परत बोलावण्याचेंहि त्यांच्या मनांत आलें असतें. परंतु थोड्याच वेळांत नेताजीचें सैन्य फार मोठें नाहीं हें त्यांच्या लक्षांत आलें

आणि शहाच्या संरक्षणाकरितां म्हणून राखलेलें खवासखानाचें ५००० सैन्य त्याच्यावर तुटून पडलें. घनघोर युद्ध होऊन उभयपक्षाचें बरेंच नुकसान झालें; व यशाबद्दल कांहींच निर्णय लागला नाहीं. तथापि मराठ्यांना पांच सहा मैल मागें हटावें लागलें आणि इच्छिताप्रमाणें कांहींच न होतां पन्हाळ्याच्या वेढ्यांत ढिलाई येण्याचा संभव नाहींसा झाला; याचा विचार केला असतां मराठ्यांच्या दृष्टीनें हा नेताजीचा पराजयच होय असें म्हटलें पाहिजे. विजापूरचें सैन्यबळ इतकें ओहोटीला लागलें असतांहि नेताजीला अपयश आलें याचें खापर अर्थात् त्याच्या योजनेच्या वैगुण्यावर फोडतां येण्यासारखें नसून सैन्याच्या कमीपणाचा तसा अनपेक्षित परिणाम झाला हें सहज लक्षांत येण्यासारखें आहे. गोंवळकोंडेकरांनीं या वेळीं विजापुरी सैन्यांत सामील होऊन त्यांना मदत केली असें दिसतें व त्यामुळें असा परिणाम झाला असण्याचा संभव आहे (ले.८२३). मराठ्यांना या आणीबाणीच्या वेळीं अधिक सैन्य जमा करणें शक्यच नव्हतें. तेव्हां हा डाव पुन: खेळण्याची सोय आणि उपयुक्ततांहि कायमची नष्ट झाली, असें पाहून नेताजी विजापुराकडून परतून कोल्हापूर प्रांतीं येऊन दाखल झाला आणि वेढा देऊन बसलेल्या सैन्यालाच त्रास देण्याचा दुसरा एक प्रकार अमलांत आणून कांहीं काम साधतें किंवा कसें हें पहाण्यास त्यानें सुरुवात केली (ले. ८२६). नेताजीच्या या शहापूरकडील* पराजयाची बातमी इंग्रजांच्या वैशाख शु. ६ च्या पत्रांत आली आहे (ले.८१३). ह्या बातमीबद्दल त्यांनीं आनंद व्यक्त करावा, इतकी शिवाजीबद्दल अप्रीती उत्पन्न होण्याचें मुख्य कारण असें होतें कीं, या वेळीं ते पन्हाळ्याचा वेढा अधिक परिणामकारक करण्याच्या कामीं सलाबतखानाला मदत करीत होते. आपल्या कांहीं तोफा व दारूगोळा खपण्याची सोन्यासारखी संधी येतांच हे इंग्रज बनिये रुस्तुमजमाचा व पर्यायानें शिवाजीचा स्नेह विसरून शत्रूच्या गोटांत सामील झाले. परंतु ह्या त्यांच्या बेमानीबद्दलची, व त्यांना शिवाजीनें त्याचें प्रायश्चित दिलें ती हकीकत सांगण्यापूर्वीं, पन्हाळ्याच्या वेढ्याची हालहवाल पाहिली पाहिजे.

६. **पन्हाळ्याचा वेढा**—श. १५८२ चैत्र शुद्ध प्रतीपदा (इ. १६६० मार्च २) रोजीं शिवाजी राजे फिरोन पनाळ्यास आले. मग सिदी जौहर येऊन पनाळ्यास वेढा घातला (शकावली). याचा अर्थ दूरान्वयन्यायानें न

* शिवभारतांतील शहापूरच्या कामगिरीबद्दलच्या उल्लेखाचा विचार पुढें केला आहे.

करितां दिलेली तिथी शिवाजीच्या आगमनाची असून राजे फिरोन पनाळ्यास आले हें मुख्य विधान होय असें समजून मागें वर्णन केलें आहे. मग सिद्दी जौहर आला यांतील 'मग' सार्थ धरिल्यामुळें जरी वेढयाच्या सुरुवातीची मिति तितकी निश्चितपणें सांगतां येत नसली तथापि चैत्रांतच वेढा केव्हां तरी सुरू झाला ह्या म्हणण्याला विरोध येण्याचें कारण नाहीं. आषाढ वद्य १ (जुलै १३) रोजीं पनाळ्यावरून राजे उतरून खेलणियास गेले. ह्या आद्यंताच्या दोनहि मित्या फक्त शकावल्यांवरूनच कळतात. इतरत्र त्यांचा निर्देश कोठेंच आला नसल्यामुळें त्यांच्याशीं तुलना करून त्यांच्या विश्वसनीयतेबद्दल संशय प्रकट करण्याचा प्रसंग अर्थातच येऊं शकत नाहीं. तथापि शकावल्याशिवाय दुसरीं एक दोन साधनें आहेत तीं ह्या बाबतींत कोठपर्यंत निश्चित विधानें करितात तें अभ्यासकांनीं लक्षांत घेण्यासारिखें आहे. शिवभारतांतील ह्या वेढयाच्या कालनिर्णयास मदत करणारे ( अ. २६ श्लो. ५६- ५७ ) हे दोन श्लोक आहेत.

मासाश्चैत्रादयोऽस्माभिरिह नीताः.... ॥ (२६)
पंचमोयं तु संप्राप्तो नभाः श्यामनभः शुभः । (५७)

चैत्रांत वेढ्याला आरंभ झाला असें म्हणण्यास यांत अर्थातच संवड आहे. पण आरंभींची तिथी यावरून निश्चित कळण्यास मार्गच नाहीं. परंतु अंताबद्दल श्रावण महिन्याच्या नांवानें, अनुक्रमानें आणि वर्णनाच्या योगानें स्पष्ट उल्लेख केला असल्यामुळें शिवभारत व शकावल्या यांचा येथें मतभेद होतो असें दिसतें. परंतु अनुक्रमावरच भर देणें योग्य आहे; पांचवा महिना ही कालाच्य दृष्टीनें बरोबर असलेली गोष्ट अधिक स्पष्ट करीत असतांना गणितदृष्ट्या चूक होऊन या वेळच्या अधिक ज्येष्ठ महिन्याचें विस्मरण झालें आणि आषाढाच्या ऐवजीं श्रावणच महिना लिहिण्याच्या भरांत हातून पडला; अशी समर्थनाची दृष्टी ठेविल्यास ती केवळ चूकच ठरेल असें वाटत नाहीं. शिवभारत व शकावल्या यांचा समन्वय साधारणपणें करितां आला, तसा या उभय साधनांचा डच पत्रांशींहि मेळ घालतां आल्यास पाहिलें पाहिजे. डच पत्रांतील विधानें देखील बरींच असंदिग्ध अशींच आहेत. हीं पत्रें वेंगुर्ल्याहून लिहिलेलीं आहेत. आणि त्यांतील बहुतेक सर्व विधानें प्रत्यंतरानें व शक्यतेनें खरीं वाटल्यामुळें ह्या प्रकरणांतील हकीकत लिहितांना त्यांचाच उपयोग केला आहे. शिवाय तीं

स्वतःशींहि सुसंगत अशींच आहेत. श.१५८२ वैशाख वद्य ११ च्या पत्रांत सलाबतखान व शिवाजी यांचीं सैन्यें अद्याप एकमेकांशीं भिडलीं नाहींत असें वेंगुर्लेकर डच लिहितात. 'हातघाईवर न येण्याची खबरदारी शिवाजी खास घेईल, व सिद्दी जौहरला कांहीं तरी युक्ती योजून तो वश करून घेईल. कारण, कोणत्याहि युक्तीनें हीं तिसरी स्वारी निष्फळ होऊन परतली तर मग सैन्यबलाचा आधार तुटल्यामुळें गांगरलेल्या विजापूरदरबाराकडून यापुढें तीव्र विरोधाची उठावणी होणार नाहीं हें शिवाजी जाणतो. आतां सिद्दी जौहर पन्हाळ्याच्या अगदीं पायथ्याशीं येऊन भिडला आहे. परंतु शिवाजीनें त्याला चुकवून ४।५ हजार घोडदळ थेट विजापुरावर दवडलें आहे' इत्यादि सांगून पुढें नेताजीचा विजापुराकडे ( शहापूर) झालेला पराजय वर्णन केला आहे. या वर्णनाचा एकंदर थाट वेढयाला अजून सुरुवात झाली नाहीं अशा घाटाचा आहे. त्याच्या पुढच्याच 'पत्रांत मागील पत्र गेल्यानंतर शिवाजी आतां पन्हाळ्याच्या मजबूत किल्ल्यावर सैन्यासह येऊन बसला आहे. विजापुरी सैन्यानें त्याला कोंडीत आणिल्यामुळें जिंकलेल्या मुलखाच्या संरक्षणार्थ कांहीं सैन्य विखरून ठेऊन तो पन्हाळ्यांत शिरला. पावसाळा जवळ आला होता त्यामुळें सिद्दी जोहरला स्वारीचें काम तहकूब केल्याशिवाय गत्यंतर नाहीं असें मनांत ठरवून शिवाजी विश्वासानें राहिला होता. पण त्याची ती कल्पना चूक ठरली आणि सिद्दी जौहरनें पावसाळी तात्पुरतीं छपरें बांधून पावसांतहि वेढा चालवण्याची हिंमत धरिली', अशी हकीकत देऊन वेढ्यापर्यंत ती आणून भिडविली आहे. याचा वाच्यार्थ लक्षांत घ्यावयाचा म्हटलें तर वैशाख वद्य ११ नंतर केव्हां तरी लगेच वेढा पक्का झाला असावा, असा लिहिणाऱ्याचा रोंख दिसतो. शिवाजीच्या वेढयांतून सुटकेच्या बद्दल निश्चित मिती डच किंवा इतर साधनांत नाहीं. इंग्रज लोक ( हेन्री, रेव्हिंगटन् इ.) प्रत्यक्ष वेढयांत राहून सलाबतखानाला मदत करीत होते तरी देखील त्यांनीं शिवाजी पन्हाळा सोडून गेल्याचा उल्लेख आपल्या पत्रांत केलेला नाहीं.*

तिथिनिश्चयाकरितां उपलब्ध साधनांची साक्ष घेत असतांनाच आपण वेढयाच्या पूर्वीची थोडीशी हकीकत त्या अनुषंगानें ध्यानांत घेतली. त्यांतील तपशील डच साधनांइतका मराठींत किंवा शिवभारतांतहि नाहीं. विजा-

---

* मराठी पत्रांत 'गनिमांनीं कोट बळकाविला होता. त्यावर सिद्दी जौहर काबिजाती

पूरच्या इतिहासांतील या प्रसंगाची आरंभींची हकीकत बरीचशी विकृत अशी आहे; तिचा येथें थोडक्यांत परामर्ष घेण्यासारखा आहे. अफझलखानाच्या वधानंतरच्या कोल्हापूरच्या लढाईची वार्ता त्या लेखकाला नाहीं. जौहरनें स्वतः शिवाजीवरील कामगिरी पत्करिल्यामुळें आदिलशाहानें त्याला सैन्यासह पाठविल्यावर सिद्दी जौहरची व शिवाजीची गांठ पडून युद्ध झालें व त्यांत शिवाजीचा पराजय झाला अशी माहिती त्यानें दिली आहे. 'पराजयामुळें शिवाजी विवश होऊन पळाला आणि आश्रयाकरितां म्हणून पन्हाळ्याकडे गेला. तेथील नाईकवाडींना वश करून व लालूच दाखवून तो किल्ल्यावर जाऊन राहिला. शिवाजीच्या गनीमी काव्याला कंटाळून सिद्दी जौहर शिवाजीला कोठें तरी एके ठिकाणीं डांबण्याचा विचार करीतच होता. इतक्यांत शिवाजीनें पन्हाळ्याचा आपणहून आश्रय केला हें समजतांच आपलें आयतेंच काम झालें असें पाहून जौहरला आनंद झाला आणि त्यानें पन्हाळ्याला वेढा घातला.' अशी मीमांसा त्यांत आहे.

मागच्या कांहीं लेखकांचीं विधानें प्रसंगनिर्देशापुरतीं बरोबर असतात. पण त्या प्रसंगाचे परिणाम किंवा कारणमीमांसा तितकी शुद्ध नसते, असा नेहमीं अनुभव येतो. वरील हकीकतींत शिवाजीला पन्हाळ्यांत शिद्दी जौहरनें वेढा दिला हें ऐतिहासिक सत्य समजलें पाहिजे. परंतु त्याची पूर्व हकीकत सांगतांना शिवाजीचा पराजय झाला होता वगैरे शिवाजीला कमीपणा आणणारे व विजापूरकरांना श्रेष्ठत्व देणारे सर्व ध्वनि सहजच टाकावे लागतील. नायकवाडींना वश करून शिवाजी शत्रूंच्या किल्ल्यावर आश्रयार्थ अशा आणीबाणीच्या वेळीं गेला या भोळ्या विधानाला इतिहासांत कोठेंच तोड सांपडावयाची नाहीं. परंतु सिद्दी जौहरशीं युद्ध होतांच पराजय होऊन पन्हाळ्याच्या आश्रयास शिवाजीनें यावयाचें तर अघाडीचें हें युद्धाचें ठिकाण कोणतें ? बरें, त्या पुढच्या ठिकाणापर्यंत शिवाजी जाऊन पोंचला असेल तर वाटेंतील ठिकाणें शत्रूच्या हातीं ठेवून तो पुढें गेला तरी कसा ? इंग्रजी वगैरे पत्रांतून पन्हाळा शिवाजीच्या हातीं आल्याचा स्पष्टच उल्लेख असल्यानें विजापुरी इतिहासाचें हें विवरण असत्यच समजलें पाहिजे.

**७. शिद्दी जौहरचा प्रामाणिकपणा**—एकाद्या घराण्याच्या गौरवार्थ लिहिलेल्या हकीकतींत अशा चुका वारंवार घडून येतात. त्या जाणूनबुजून केल्या जात नसल्या तर बहुधा चुकीच्या म्हणजे पूर्वग्रहदूषित किंवा

पक्षाभिनिवेशाच्या आवेशांत सहजासहजींहि होत असतील. आपल्याला प्रिय असलेल्या पक्षाचा पराजय झाला किंवा आपल्याला आवडेल इतकें भव्य यश न मिळालें तर शत्रूच्या दुष्टपणाबद्दल किंवा स्वकीय सरदारांच्या फितुरीबद्दल तक्रार करावी असा मोह उत्पन्न होत असतो. कित्येक वेळां शत्रूच्या पदरांत पडलेलें यश तितकें भरींव नव्हतें असेंहि सांगण्याचा अट्टाहास असे विकृत इतिहासकार करीत असतात. तशाच तऱ्हेचा एक प्रयत्न सलाबतखान व शिवाजी यांच्या या वेळच्या संबंधाबद्दल केलेला दिसतो. वेढयांत सांपडल्यानंतर किंवा वेढा पडण्याच्या सुमारास शिवाजीनें रुस्तुम-जमाप्रमाणेंच सलाबतखानाला आपल्याला अनुकूल करून घेण्याचे प्रयत्न केले नसतील असें म्हणवत नाहीं. परंतु सलाबतखानहि मनापासून जातीचाच फितुरी असल्यामुळें शिवाजीला सहज वश झाला आणि त्यानें शिवाजीला बेइमानानें सोडून दिलें, इत्यादि गोष्टी खऱ्या मानण्याकडे मनाचा कल होत नाहीं. सलाबत आला तोच कर्नाटकी सैन्य वगैरे घेऊन जबरदस्त होऊन आला. आणि येतांच पाश्चात्य तोफखान्याचीहि जोड मिळविण्याचा त्यानें प्रयत्न केला. '४०० पायदळ व लहानशी एक घोडदळाची तुकडी बरोबर देऊन राजापूरच्या इंग्रजांकडे त्यानें पांच पालख्या पाठविल्या. विजापूरच्या राजाच्या वतीनें त्यांच्याकडे त्यानें मनुष्यांची आणि २ तोफांची मागणी केली. जमल्यास सामोपचारानें आणि नच जमल्यास जबरदस्तीनें सदर कुमक मिळविण्याचा सलाबतखानाचा बेतच झाला होता आणि पालख्यांच्या सादर आमंत्रणाच्या मानाबरोबरच सैन्याची तुकडीहि जय्यत तयार होऊन आली असल्यामुळें इंग्रजांना नाखुषीनें कां होईना दोन तोफा व दोन तीन वाकबगार माणसें पाठवून द्यावीं लागलीं." अशी जौहरच्या पहिल्या उपक्रमाची माहिती डच पत्रांत आली आहे. यांतील पालख्या व स्वार यांचा तपशील बरोबर असला तरी इंग्रजांनीं ही मदत नाखुषीनें दिल्याचें दिसत नाहीं. त्या वेळीं राजापूरच्या इंग्रजांच्या वखारीचा मुख्य हेन्री रेव्हिंगटन या नांवाचा चळवळ्या आणि मोठी महत्त्वाकांक्षा बाळगणारा असा होता. कंपनीच्या मालाशिवाय स्वतःचा म्हणून दारूगोळा आदिकरून माल हा स्वतःच्या जबाबदारीवर आणखीहि बाळगीत असे. अर्थात् तो विकला जावा अशी याची नेहमींच इच्छा असल्यामुळें आसपासच्या मुलखांत उत्पात व्हावेत अशी हा नेहमींच इच्छा बाळगी

( ले. ७९१ ). सलाबतखान शिवाजीवर चालून येत आहे असें कळतांच त्यानें त्याच्याकडे दारूगोळा आणि तोफा पुरविण्याबद्दल बोलणें लाविलें असें खुद्द इंग्रजांच्याच लिहिण्यावरून दिसतें. ‘ सिद्दी जोहरकडून त्याबद्दल अनुकूल उत्तर आल्यावर रेव्हिंगटन् रायपाटण-अणस्कुरा ह्या मार्गानें १ तोफ व ५० दारुगोळे घेऊन पन्हाळ्याकडे रवाना झाला (श. १५८२ वैशाख शु. ३ इ.१६६० एप्रील २; ले.८१३ व ८१५). रुस्तुमजमा हा इंग्रजांचा दोस्त असून प्रथम शिवाजी व रुस्तुमजमा ह्या दोघांशींहि युद्धसामग्रीविषयीं त्यांचा व्यापार चालत असे. परंतु आतां सिदी जौहरची जबरदस्ती पाहून इंग्रजांनीं नवीन गिऱ्हाईक खटपटीनें मिळवून तें हाताशीं धरिलें हें उघड आहे ( ले.८१६). सिद्दी जौहरनें डच म्हणतात त्याप्रमाणें आपणहून तोफा नेल्या असल्या किंवा इंग्रजांनीं खटपट केल्यामुळें घेण्याचें कबूल केलें असलें तरी ह्या वेढ्याचें काम कसून चालविण्याचाच जौहरचा इरादा वरील गोष्टीवरून दिसून येतो.

सिद्दी जौहर शिवाजीविरुद्ध कसून मेहनत करीत होता असें म्हणण्यास दुसरेंहि एक कारण आहे. तिकडून पन्हाळ्याला वेढा दिल्यावर वैशाखाच्या महिन्यांत खारेपाटण, सांदळ इत्यादि शिवाजीचा कोंकणांतील मुलूख घेण्याकरितां आणि अशा तऱ्हेनें पश्चिमेकडूनहि त्याला शह देण्याकरितां त्यानें सैन्य पाठविलें होतें ( ले. ८१८ ). शिवभारतानें तर पन्हाळ्याचा वेढा घालतेवेळची सलाबतखानाच्या सैन्याची संपूर्ण व्यूहरचना दिली आहे. त्यावरून पन्हाळ्याला सर्व बाजूंनीं वेढण्याची त्यानें खबरदारी घेतल्याचें दिसतें. ‘ जौहराबरोबर रुस्तुम, फाजल व सादातखान हे या मोहिमेंत पुन: सामील झाले होते आणि बाजराज घोरपडेहि आला होता. पैकीं जौहार, फाजल आणि रुस्तुम ह्यांनीं पन्हाळ्याची पूर्व बाजू वेढली आणि सादात, मसूद, घोरपडे, भाईखान वगैरेंनीं पश्चिम बाजूचा बंदोबस्त केला. दक्षिण व उत्तर बाजूंच्या सरदारांचीं नांवें भारतकारानें दिलीं नाहींत. ’

रुस्तुमजमा व फाजलखान ह्यांच्याशीं कोल्हापूरनजीक युद्ध देऊन त्यांचा पराजय करितां आला, तशी गोष्ट या वेळीं शक्य असती तर शिवाजी सलाबतखानापुढें हटत हटत पन्हाळ्यांत स्वत:ला कोंडून घेण्याची आपत्ति पत्करता ना, हें उघड आहे. सलाबतखानाची बाजू जबरदस्त होती यांत शंकाच नाहीं. तेव्हां जबरदस्त शत्रूच्या समोर अंमलांत आणावयाचे सर्व प्रकार शिवाजीनें करून पाहिले असल्यास नवल नाहीं.

८. सुटकेविषयीं प्रयत्न—त्यानें प्रथम सलाबतखानाला त्याच्या बंडखोरीच्या भूमिकेचें स्मरण करून दिलें असेल. पण तो तसा वळला नाहीं ही गोष्ट खरी दिसते; कारण शिवाजीनें लगेच अली आदिलशहाची क्षमा मागून मोठी खंडणीहि भरण्याचें कबूल केलें असें डच्च पत्रांवरून कळतें. शिवाजीला या वेळीं इतक्या लवकर क्षमा व्हावी अशी अली आदिलशहाची मनस्थिति अर्थातच नव्हती. आणि वेढयाचें काम पक्कें आंवळून सलाबतखानानें कोठेंहि बोट शिरकण्यास जागा ठेविली नव्हती. या कामीं इंग्रजांचा दारूगोळा व तोफा इत्यादि तत्कालीं उत्तम ठरलेल्या पाश्चात्य युद्ध-सामग्रीचा त्यांना पुरवठा होत होता. विजापुरी सैन्य स्वतःच्याच मुलखांत काम करीत होतें आणि आसपासच्या मुलखावर त्यांच्या सुलतानाची साम्राज्यसत्ता चालू असल्यामुळें त्या दृष्टीनेंहि त्यांची चढती कमान आणि अत्यंत स्वाधीन म्हणून कर्तृत्वक्षम अशी परिस्थिती होती. उलट शिवाजी परमुलखांत, स्वतःच्या राजधानीपासून दूर आणि वेढयांत म्हणजे पिंजऱ्यांत सांपडल्यासारखा होता. त्याला सहानुभूती काय ती रुस्तुमजमाची होती. परंतु तो उघडपणें शिवाजीच्या साहाय्याला येऊं शकत नव्हता. शिवाजीविरुद्ध म्हणून आपल्याकडे येईल ती कामगिरी मनापासून करूं नये आणि शिवाजीच्या शत्रूला शक्य तितकें फसवावें यापलीकडे त्याला कांहीं करितां येण्यासारखें नव्हतें. त्यानें आपल्या महालदारांकडून ' सिद्दी जौहरसाठीं म्हणून दारूगोळा ' ताब्यांत घेण्याचा एकदां दोनदां प्रयत्न केला असें दिसतें. हेतू हा कीं, तो आपण दाबून ठेवून त्याच्या हातीं लागूं देऊं नये. परंतु कावेबाज इंग्रज व्यापाऱ्यांपुढें त्याचा हा लपंडाव चालला नाहीं ( ले. ८२१ ). तेव्हां इतर म्हणजे सामदामाचे व भेदाचे मार्ग निरुपयोगी झाले आणि दण्डाचा अवलंब करणें सामर्थ्याच्या बाहेरचें वाटूं लागलें. तेव्हां वेढयांतून निसटून जाण्याच्या युक्तीचा अवलंब करण्याशिवाय शिवाजीला गत्यंतर राहिलें नाहीं. वास्तविक पाहिलें तर पावसाळ्यामध्यें वेढिलेल्या लोकांपेक्षां वेढा घालणाऱ्या लोकांचेंच काम अधिक बिकट होत असतें; तेव्हां पावसाळाभर वेढा लांबत ठेविण्यानें शिवाजीच्या वेढयांतल्या म्हणून भासणाऱ्या अडचणी अधिक वाढणार होत्या असें म्हणतां येत नाहीं. आणि शिवाजीनें आपण किल्ला सोडून गेल्यानंतर दोन अडीच महिने तरी शत्रूविरुद्ध किल्ला लढविण्याचें काम आपल्या हस्तकांकडून करूनहि

घेतलें. ही वस्तुस्थितीच त्याबद्दल साक्ष देत आहे. यामुळें जरी तमाखू, खिचडी, मीठ इत्यादि अन्नसामग्रीचा पन्हाळ्यांत तोटा पडला अशी त्या वेळीं वेंगुर्ल्याला बातमी आली होती, तरी शिवाजीनें घाईनें पन्हाळा सोडून जाण्याचें तें मुख्य कारण होतें असें कोणालाहि वाटणार नाहीं.

**९. शाइस्तेखानाची पुणें प्रांत वर स्वारी**—सलाबतखानाला जशी इंग्रजांच्या दारूगोळ्याची मध्येंच मदत मिळाली ( तिचा परिणाम कितपत झाला याबद्दल निश्चित माहिती मिळत नाहींच. ) त्याप्रमाणेंच मोंगलांचा सुभेदार शाइस्तेखान याची शिवाजीच्या पुणें, सुपें, इंदापूर, चाकण इत्यादि मुलखाकडील स्वारी ही त्याच्या पथ्यावर पडली. शाइस्तेखानाचें सैन्य फार मोठें होतें ( सभा. ३१ ). सुमारें ६० सरदारांच्या हाताखालीं, ७७ हजार घोडेस्वार, अनेक हत्ती व बक्सर जातीचें मोठें पायदळ इत्यादि घेऊन ( मा. ३५, ३६–५९ ) तो भीमानदीच्या दक्षिणेकडे आला. ' नवाब शास्ताखान म्हणजे पादशहाची प्रतिमाच दुसरी '. त्याच्या सैन्यानें देवळें भ्रष्ट केलीं, मठमठ्या मोडिल्या, अधिकाऱ्यांचीं घरें जमीनदोस्त केलीं, आणि सर्व मुलख उजाड करून टाकिला. शिवाजी पन्हाळ्यांत अडकून पडला आहे असें पाहून शाइस्तेखानानें चाकणच्या संग्रामदुर्गाला वेढा दिला आणि शिवाजीचा दोन्ही बाजूंनीं विलक्षण कोंडमारा होऊं लागला.

श. १५८१च्या फाल्गुन व. १० स (इ. १६६० फेब्रु. २५) शाइस्तेखान अहमदनगराहून निघाला आणि पांच दिवसांत संवत्सर प्रतिपदेस भिवरा उतरोन पुणें प्रांतीं आला. त्याच दिवशीं तिकडे महाराज पन्हाळ्यास आले. थोडक्याच दिवसांत शिद्दी जौहरनें येऊन पन्हाळ्याला वेढा घातला आणि इकडे शाइस्तेखानाचें आक्रमण चालू झालें. शाइस्तेखान येऊन पुण्याकडे त्यानें गलबला केला इत्यादि उल्लेख मराठी पत्रांत येतात (ले. ८७९, ८८०). परंतु त्याच्या स्वारीचें तपशीलवार वर्णन मुसलमानी तवारिखांतूनच प्यावयास पाहिजे. अलमगीरनामा या फारशी ग्रंथान्वयें सर जदुनाथ सरकार यांनीं शाइस्तेखानाच्या हालचाली दिल्या आहेत त्यांवरून, तो सोनवडी, सुपें, बारामती व होळ या मार्गानें वाटेंतील कोट काबीज करीत श. १५८२ वैशाख व. ३ (एप्रिल १८)ला शिरवळास येऊन पोंचला. तेथून राजगडपर्यंतचा मुलूख लुटण्याकरितां त्यानें सैन्याच्या तुकड्या पाठविल्या. शिरवळहून कूच करून मोंगली सैन्य कांहीं काळ नीरेच्या कांठानें चालून एकदम शिवाजीच्या बाळपणच्या गांवीं म्हणजे

खेडेबाऱ्यांतील खेडशिवापुरास गेलें. शिवापूर सिंहगडच्या अगदीं जवळ आहे. तेथें जाण्यांत सिंहगडाकडे प्रयत्न करून पहाणें हाच त्याचा उद्देश असला पाहिजे. तेथें कांहीं लाग न साधल्यामुळें तेथून तें (अत्र्यांच्या) गराड्यावरून सासवडला अधिक ज्येष्ठ शु. २ ला (१ मे) गेलें. शिवाजी या वेळीं पन्हाळ्याकडे वेढ्यांत अडकून पडल्यामुळें शाहिस्ते-खानाला हा मुलूख अगदीं मोकळा सांपडला. आणि पहिल्या दोन महिन्यांत उघड्या मुलखांत त्याचा संचार चालू असे तोंपर्यंत त्याच्यासमोर मराठ्यांनीं उभें राहण्याचा प्रयत्नच केला नाहीं. शिवापूर-गराडा मार्गांतील वारोडीच्या (गाडे–) खिंडींत त्यांनीं पहिल्यानें मोंगलांच्या पिछाडीकडून हल्ला चढविला, पण त्यांत त्यांना यश आलें नाहीं. आणि शाहिस्तेखान सासवडचें ठाणें काबीज करूं शकला. सासवडपासून पुरंदर अगदींच जवळ असल्यामुळें त्याच्या पायथ्याच्या गांवांमध्यें त्याच्या सैन्यानें कांहीं जाळपोळ केली. या ठिकाणीं शिवाजीच्या लोकांनीं फिरून शाहिस्तेखानाचा प्रतिकार केला. परंतु ह्याहि खेपेस त्यांना परत जावें लागलें. मात्र शाहिस्तेखानाच्या मनांतून सिंहगड किंवा पुरंधर यांच्यावर हल्ला करून पहाण्याची इच्छा उत्पन्न झाली असल्यास ती त्याला मराठ्यांच्या ह्या विरोधामुळें जागच्या जागीं दाबून टाकावी लागली; आणि तो तसाच पुण्याकडे निघून गेला (अधिक ज्ये. शु. १०, मे ९). मराठ्यांनीं त्याला तेथेंहि शांती मिळूं दिली नाहीं. तो येण्याच्या पूर्वींच त्यांनीं पुण्यापासून चाकणपर्यंतचा मुलूख उध्वस्त करून ठेविला होता. हेतू हा कीं, त्याच्या अवाढव्य सैन्याला अन्नसामग्री मिळूं नये आणि त्याला आपला मुक्काम तेथून हालवावयास लागावा. शाहिस्तेखानाला अर्थात् अन्य मार्ग राहिला नाहीं. आणि तो मोंगली सरहद्दीच्या जवळ सरकत जाऊन चाकणलाच तळ देऊन राहिला (ज्येष्ठ व. ९, जून २१). चाकणला आल्यामुळें त्याची सर्व प्रकारची सोय झाली. एक तर पुणें, सिंहगड व पुरंधर ह्या अडचणीच्या टापूंतून निसटल्यामुळें मराठ्यांच्या हल्ल्यां-पासून त्याची मुक्तता झाली. दुसरें, तो आपल्या सरहद्दीच्याजवळ आल्यामुळें त्याचें दळणवळण अप्रतिहत चालू होऊन त्याला रसद मिळूं लागली. आणि तिसरें असें कीं, अहमदनगराहून कोंकणांत जाण्याचा भोरघाटाचा मार्ग त्याच्या आटोक्यांत आला. चाकणपासून होणारे हे फायदे ध्यानांत येऊन त्यानें एकदम तेथील संग्रामदुर्ग नांवाच्या भुईकोट किल्ल्यास वेढा

देऊन तो घेण्याची तयारी चालविली. किल्ला साधा भुईकोट असूनहि किल्लेदार ( फिरंगोजी नरसाळा ? ) यानें शिकस्त करून तो जवळजवळ दोन महिने लढविला. वेढा चालू असतांना पावसाळ्याचा त्रास वेढा घालणाऱ्यांना थोडासा झाला असेल असें मानिलें तरी किल्लेदाराची ही कामगिरी वाखाणण्यासारखी झाली यांत शंका नाहीं. सभासदानें चाकणच्या वेढयाचें नांवच काढिलें नाहीं. फिरंगोजी नरसाळा याचेंहि नांव अन्यत्र कोठें त्याला देण्यासारखें वाटलें नाहीं. चिटणिसानें चाकणच्या त्याच्या पराक्रमाबद्दल भूपाळगडची हवालदारी दिल्याचें नमूद केलें आहे ( पृ. २११ ). फिरंगोजी * नरसाळा हें नांव शिवकालीन अस्सल कागदपत्रांत आढळत नाहीं, यामुळें शाहिस्तेखानानें त्याच्या मर्दपणावर खूष होऊन त्याला मन्सब देण्याचें आमिष दाखविलें. परंतु त्या स्वामिभक्त शिपायानें त्यावर लाथ मारिली, ही दंतकथा काल्पनिक असावी असें वाटतें. अलमगीरनाम्यावरून चाकणचा किल्ला १५८२ श्रावण व. ४ ( १६६० ऑगस्ट १४ ) रोजीं मोंगलांच्या स्वाधीन झाला असें दिसतें. चाकण हातांत येतांच शहाजहानानें त्याचें नांव बदलून इस्लामाबाद असें ठेविलें ( इ. ७-२६३ ); हा तपशील खाफीखान देतो. परंतु ह्या स्वारीची हकीकत देतांना त्यानें ' शिवाजी त्या वेळीं सुप्याला होता ' अशासारख्या घोडचुका केल्या असल्यामुळें इतर बाबतींतहि तो विश्वसनीय धरवत नाहीं.

शाइस्तेखानाच्या उत्तरेकडील हालचाली बहुतांशीं पन्हाळ्याकडील हालचालींशीं समकालीन आहेत. शाइस्तेखानानें पुणें बाजूचा उघडा मुलूख चार एक महिन्यांच्या अल्पकाळांत व्यापून प्रथम चाकणच्या भुईकोट किल्ल्यावर येलगार केला. चाकणच्या वेढ्याला सुरुवात ज्येष्ठ वद्य पक्षांत झाली. उघडा मुलूख व्यापून जेव्हां किल्ल्यांवर पाळी आली तेव्हां ह्यानंतर राजगड आदिकरून स्वतःच्या खास किल्ल्यांवर ही संक्रांत केव्हां फिरेल याचा नियम नसल्यामुळें शिवाजी आणि राजमाता जिजाबाई ( राजगडावर ) उभयतां

---

* पुढें सवाई माधवरावांच्या कारकीर्दीत पुरंधरचा किल्लेदार एक फिरंगोजी नरसाळा या नांवाचा येतो. त्याचा शिक्का ' शिवचरणीं तत्पर ' असाच असल्याचें एका लेखांकडून कळतें. तें खरें असल्यास हा शिक्का सचीव, फत्तेसिंग भोसले यांचेप्रमाणेंच परंपरित आहे असें सिद्ध झालें तर या मुद्याचा फेर विचार करावा लागेल हें उघड आहे.

आपापल्या ठिकाणीं काळजींत पडलीं. तेव्हां आतां महाराजांच्या दक्षिणेकडील हालचालींकडे थोडें लक्ष दिलें पाहिजे.

शिवाजी पन्हाळ्यावर असतांनाच शाइस्तेखानानें पुणें प्रांतांत स्वारी करून मुलूख उध्वस्त करण्याचा सपाटा चालविला. त्या वेळींच मागें सांगितल्याप्रमाणें नेताजी पालकर विजापूरनजीक शहापुरावर हल्ला करण्यांत गुंतला होता. शाइस्तेखानाच्या आगमनाची बातमी कळतांच त्याच्या बंदोबस्तासाठीं नेताजीनें परत यावें असा शिवाजीनें त्याला निरोप पाठविला ( भा. अ. २६–७ व २२ ). त्याच सुमारास नेताजीचा शहापुरावरील हल्ला यशस्वी झाला होता. तथापि त्याला मागें हटावें लागल्याचें पूर्वीं सांगितलेंच आहे. तेव्हां त्याच बाजूला पुढें रहाण्यांत कांहीं अर्थ नाहीं असें पाहून व पुणें प्रांतांतील अडचण जाणून नेताजी दौड करून राजगडाच्या पायथ्याशीं शिवापट्टणास येऊन दाखल झाला ( सुमारें वैशाख मध्य, एप्रील १५ ). त्या वेळीं शाइस्तेखानाच्या हल्ल्यामुळें पुण्याकडील मराठे तितके नामोहरम झालेच नव्हते. त्यांनीं नुकताच कोठें शाइस्तेखानाला विरोध करण्याचा डाव मांडिला होता. तेव्हां तिकडची बाजू आपण संभाळूं, परंतु शिवाजीला पन्हाळ्याच्या वेढ्यांतून सोडविणें भाग आहे, असा राजगडाकडील सरदार व माता जिजाबाई यांचा सल्ला पडल्यामुळें नेताजी व हिलाल, आपल्या सैन्याला आवश्यक होती तेवढी विश्रांति मिळाल्यावर, जरूर ती सामग्री घेऊन, तडक पन्हाळ्याकडे निघाले. यापुढील अधिक ज्येष्ठ महिना, पुणें प्रांतांत व पन्हाळ्याकडे दोन्ही ठिकाणीं मराठ्यांनीं आपली शिकस्त करून पाहिली. परंतु दोहींकडे त्यांना म्हणण्यासारखें यश आलें नाहीं. शाइस्तेखान पुणें सोडून चाकणला जाऊन बसला. आणि दक्षिणेकडे आसपासच्या मुलखांत आवढाव करून नेताजी काय तो वासोटा किल्ला घेऊं शकला ( शका. ज्येष्ठ शु. ८, जून ६ ). पण जौहरच्या एका तुकडीशीं त्याची गांठ पडली असतां हिलालाचा पुत्र वाहवाह युद्धांत मूर्च्छित होऊन पडला. शत्रूच्या लोकांनीं त्याला आपल्या गोटांत नेलें आणि* हिलालाचा पार मोड केला. नेताजीनें कित्येक

---

*सिद्दी हिलाल हा मूळचा विजापुरी सेनापती अफजलखानाबरोबर येऊन त्याच्या आज्ञेनें पुणें प्रांतावर चालून गेला होता. परंतु त्यानंतर लगेच तो शिवाजीला शरण जाऊन त्याच्या सैन्यांत सामिल झाला व पन्हाळ्याच्या वेढ्यांत शिवाजीच्या बाजूनें लढला. त्यांत त्याचा मुलगा कामास आला इत्यादि शिवभारतांतील हकीकत वर दिलीच

[ पुढें चालू ]

देऊन तो घेण्याची तयारी चालविली. किल्ला साधा भुईकोट असूनहि किल्लेदार ( फिरंगोजी नरसाळा ? ) यानें शिकस्त करून तो जवळजवळ दोन महिने लढविला. वेढा चालू असतांना पावसाळ्याचा त्रास वेढा घालणाऱ्यांना थोडासा झाला असेल असें मानिलें तरी किल्लेदाराची ही कामगिरी वाखाणण्यासारखी झाली यांत शंका नाहीं. सभासदानें चाकणच्या वेढ्याचें नांवच काढिलें नाहीं. फिरंगोजी नरसाळा याचेंहि नांव अन्यत्र कोठें त्याला देण्यासारखें वाटलें नाहीं. चिटणिसानें चाकणच्या त्याच्या पराक्रमाबद्दल भूपाळगडची हवालदारी दिल्याचें नमूद केलें आहे ( पृ. २११ ). फिरंगोजी *नरसाळा हें नांव शिवकालीन अस्सल कागदपत्रांत आढळत नाहीं, यामुळें शाहिस्तेखानानें त्याच्या मर्दपणावर खूष होऊन त्याला मन्सब देण्याचें आमिष दाखविलें. परंतु त्या स्वामिभक्त शिपायानें त्यावर लाथ मारिली, ही दंतकथा काल्पनिक असावी असें वाटतें. अलमगीरनाम्यावरून चाकणचा किल्ला १५८२ श्रावण व. ४ ( १६६० ऑगस्ट १४ ) रोजीं मोंगलांच्या स्वाधीन झाला असें दिसतें. चाकण हातांत येतांच शहाजहानानें त्याचें नांव बदलून इस्लामाबाद असें ठेविलें ( इ. ७-२६३ ); हा तपशील खाफीखान देतो. परंतु ह्या स्वारीची हकीकत देतांना त्यानें ' शिवाजी त्या वेळीं सुप्याला होता ' अशासारख्या घोडचुका केल्या असल्यामुळें इतर बाबतींतहि तो विश्वसनीय धरवत नाहीं.

शाइस्तेखानाच्या उत्तरेकडील हालचाली बहुतांशीं पन्हाळ्याकडील हालचालींशीं समकालीन आहेत. शाइस्तेखानानें पुणें बाजूचा उघडा मुलूख चार एक महिन्यांच्या अल्पकाळांत व्यापून प्रथम चाकणच्या भुईकोट किल्ल्यावर येलगार केला. चाकणच्या वेढ्याला सुरुवात ज्येष्ठ वद्य पक्षांत झाली. उघडा मुलूख व्यापून जेव्हां किल्ल्यांवर पाळी आली तेव्हां ह्यानंतर राजगड आदिकरून स्वतःच्या खास किल्ल्यांवर ही संक्रांत केव्हां फिरेल याचा नियम नसल्यामुळें शिवाजी आणि राजमाता जिजाबाई ( राजगडावर ) उभयतां

---

* पुढें सवाई माधवरावांच्या कारकीर्दीत पुरंधरचा किल्लेदार एक फिरंगोजी नरसाळा या नांवाचा येतो. त्याचा शिक्का ' शिवचरणीं तत्पर ' असाच असल्याचें एका लेखांकडून कळतें. तें खरें असल्यास हा शिक्का सचीव, फत्तेसिंग भोसले यांचेप्रमाणेंच परंपरित आहे असें सिद्ध झालें तर ह्या मुद्याचा फेर विचार करावा लागेल हें उघड आहे.

आपापल्या ठिकाणीं काळजींत पडलीं. तेव्हां आतां महाराजांच्या दक्षिणेकडील हालचालींकडे थोडें लक्ष दिलें पाहिजे.

शिवाजी पन्हाळ्यावर असतांनाच शाइस्तेखानानें पुणें प्रांतांत स्वारी करून मुलूख उध्वस्त करण्याचा सपाटा चालविला. त्या वेळींच मागें सांगितल्याप्रमाणें नेताजी पालकर विजापूरनजीक शहापुरावर हल्ला करण्यांत गुंतला होता. शाइस्तेखानाच्या आगमनाची बातमी कळतांच त्याच्या बंदोबस्तासाठीं नेताजीनें परत यावें असा शिवाजीनें त्याला निरोप पाठविला ( भा. अ. २६–७ व २२ ). त्याच सुमारास नेताजीचा शहापुरावरील हल्ला यशस्वी झाला होता. तथापि त्याला मागें हटावें लागल्याचें पूर्वी सांगितलेंच आहे. तेव्हां त्याच बाजूला पुढें रहाण्यांत कांहीं अर्थ नाहीं असें पाहून व पुणें प्रांतांतील अडचण जाणून नेताजी दौड करून राजगडाच्या पायथ्याशीं शिवापट्टणास येऊन दाखल झाला ( सुमारें वैशाख मध्य, एप्रील १५ ). त्या वेळीं शाइस्तेखानाच्या हल्ल्यामुळें पुण्याकडील मराठे तितके नामोहरम झालेच नव्हते. त्यांनीं नुकताच कोठें शाइस्तेखानाला विरोध करण्याचा डाव मांडिला होता. तेव्हां तिकडची बाजू आपण संभाळूं, परंतु शिवाजीला पन्हाळ्याच्या वेढ्यांतून सोडविणें भाग आहे, असा राजगडाकडील सरदार व माता जिजाबाई यांचा सल्ला पडल्यामुळें नेताजी व हिलाल, आपल्या सैन्याला आवश्यक होती तेवढी विश्रांति मिळाल्यावर, जरूर ती सामग्री घेऊन, तडक पन्हाळ्याकडे निघाले. यापुढील अधिक ज्येष्ठ महिना, पुणें प्रांतांत व पन्हाळ्याकडे दोन्ही ठिकाणीं मराठ्यांनीं आपली शिकस्त करून पाहिली. परंतु दोहींकडे त्यांना म्हणण्यासारखें यश आलें नाहीं. शाइस्तेखान पुणें सोडून चाकणला जाऊन बसला. आणि दक्षिणेकडे आसपासच्या मुलखांत आवढाव करून नेताजी काय तो वासोटा किल्ला घेऊं शकला ( शका. ज्येष्ठ शु. ८, जून ६ ). पण जौहरच्या एका तुकडीशीं त्याची गांठ पडली असतां हिलालाचा पुत्र वाहवाह युद्धांत मूर्च्छित होऊन पडला. शत्रूच्या लोकांनीं त्याला आपल्या गोटांत नेलें आणि* हिलालाचा पार मोड केला. नेताजीनें कित्येक

*सिद्दी हिलाल हा मूळचा विजापुरी सेनापती अफजलखानाबरोबर येऊन त्याच्या आज्ञेनें पुणें प्रांतावर चालून गेला होता. परंतु त्यानंतर लगेच तो शिवाजीला शरण जाऊन त्याच्या सैन्यांत सामिल झाला व पन्हाळ्याच्या वेढ्यांत शिवाजीच्या बाजूनें लढला. त्यांत त्याचा मुलगा कामास आला इत्यादि शिवभारतांतील हकीकत वर दिलीच

[ पुढें चालू ]

दिवस खटपट करूनहि जेव्हां त्याला पन्हाळ्याचा वेढा फोडतां आला नाहीं आणि चाकणकडेहि शाइस्तेखानाची पक्कड बसूं लागल्याचें शिवाजीला कळलें, तेव्हां राजरोस जय मिळत नाहीं तर थोडे लोक घेऊन आपण पलायन करावें असें त्यानें ठरविलें, आणि तो त्या मार्गाला लागला.

**१०. पन्हाळ्यांतून सुटका**—आदिलशाहाशीं तहाचें किंवा सलोख्याचें अगर शरणचिठीचें लावलेलें बोलणें यशस्वी होत आहे असें दिसेना. तेव्हां पळूनच जावयाचें म्हटलें तर पावसाळी हवेचा फायदा घेऊनच पळून जाणें अधिक सुलभ होतें. एकदां पावसाळा संपून उघडीप पडल्यावर मागाहून तें साधलें नसतें. शिवाय शाइस्तेखानाला चाकण घेऊं न देण्याची शिकस्त करून पहाण्याकरितां महाराजांनीं त्वरेनें बाहेर पडणें इष्ट होतें. म्हणून वेढा थोडा शिथिल होण्याच्या आशेनें त्यांनीं सिद्दी जौहरशीं आषाढाच्या आरंभापासून सलोख्याचें बोलणें करण्यास सुरुवात केली. 'सलाबतखानानें मध्यस्थी करून अलीशाहाकडे स्वत:बद्दल वडीलपणानें रदबदली करावी म्हणजे आपण आपलें सर्वस्व त्याच्या चरणीं अर्पण करूं' असें बोलणें शिवाजीनें गंगाधर नांवाच्या आपल्या वकिलामार्फत लाविलें ( ले. ८३१ ). यामध्यें कांहींच गैर नसल्यामुळें सलाबतानें त्याला होकार दिला आणि उभयतांची

---

आहे. सर जदुनाथ सरकारांच्या लिहिण्यांत तो याच वेळ्यांत फाजलाचा मुख्य साहाय्यक होता ( पृ. ७५ ) असें आलें आहे तें खरें नाहीं. एकाच धन्याची एकनिष्ठेनें सेवा करीत रहाणें ही गोष्ट हिलालाच्या बाबतींत खरी दिसत नाहीं. सिद्दी हिलाल हा पुढें लगेच शाहिस्तेखानाच्या वतीनें सुपें परगण्याचा अमल चालवितांना दिसतो (ले. ८४७). कारण श. १५८२ ज्येष्ठ व. १ ला सुपें शाहिस्तेखानाच्याच ताब्यांत होतें, हें आपल्याला माहित आहे. पन्हाळ्याचा वेढा होऊन गेल्यानंतर शिवाजीची हलाखीची स्थिति पाहून तो त्या वेळीं मोंगलांकडे गेला. पुनः एकदां तो शिवाजीकडे आल्याचें दिसतें ( पर्णा. अ. ५ श्लो.७७). पण त्यानंतर मोंगलांशीं राजकारण जमविण्याकरितां महाराजांनीं त्याचा अव्हेर केल्याचेंहि आढळून येतें. हे सर्व संदर्भ एकाच व्यक्तीबद्दल असले, आणि आहेत असेंहि वाटतें, तर त्या वेळच्या एका सेनापतीच्या निष्ठेच्या अदलाबदलीचा इतिहास आणि तत्कालीन परिस्थिती नजरेसमोर यावी म्हणूनच ही टीप दिली आहे. विजापूरकरांचा जौहराबरोबरच शरण आलेला दुसरा सेनापती जाधवराव याचाहि वृत्तांत असाच दिसतो ( ले. ८८६ ). नाईकजी राजे खराडे यांनींहि फिरून मसूरचा मोकासा विजापूरकरांकडील मिळविल्याचें स्पष्ट आहे (ले. ८८५). तात्पर्य, वारा वाहील त्या मानानें पाठ फिरविणें हें त्या वेळच्या सेवाधर्माचें एक प्रमुख अंग दिसतें.

भेट होण्याचें ठरलें. शिवाजीच्या मनांत अशी भेट घेण्याचें होतें किंवा कसें हें समजण्यास मार्ग नाहीं. परंतु या बोलण्यामुळें सिद्दी जौहरचा जागरूकपणा विशेष कमी झाला नसला तथापि त्याच्या सैन्यांत थोडा बेसावधपणा आला असेल असें वाटतें. त्याचा फायदा घेऊन म्हणा किंवा अकस्मात् दुसऱ्या दिवशींच वादळ, पाऊस, पूर येणें इत्यादि अनुकूल वातावरण दिसल्यामुळें म्हणा शिवाजी जौहरची भेट घेण्यास न थांबतांच आषाढ व. १ ( जुलै १३ ) रोजीं पन्हाळ्यावरून १००० शिपाई, १५ उमदे घोडे, २ पालख्या व कांहीं खजीना घेऊन पन्हाळ्यावरून खालीं उतरला. शिवाजी रात्रीच्या पहिल्या प्रहरीं निघाला व हेरांनीं पूर्वी पाहून ठेविलेल्या रस्त्यांनीं विशाळगडास जाऊन विश्रांतीकरितां थोडा वेळ थांबला.

ह्या प्रसंगासभोंवतीं इतक्या नाना कल्पना रचिल्या गेल्या आहेत कीं, त्या सर्वांचें निराकरण करण्याकरितां पुष्कळ पृष्ठें अडवावीं लगतील; म्हणून त्याबद्दल थोडक्यांत तपशील सांगून महत्त्वाच्या गोष्टींचीच येथें चर्चा करितों. शिवाजी पन्हाळ्यावरून निघून गेला तेव्हां त्याच्याबरोबर ६०० पायदळ होतें असें शिवभारतांत आहे. डचांनीं १००० चा आंकडा लिहिला आहे, तो तसा फारसा भिन्न नाहीं. शिवाजी गेल्याची बातमी कळतांच खिन्न होऊन सिद्दी जौहरनें आपला जांवई (मो. २०६ ), सिद्दी मसूद यास पाठलागाकरितां पाठविलें. विशाळगड हें शिवाजीचें कायमचें उद्दिष्ट नसून तेथून तो लवकरच राजगडाकडे जाईल हें ध्यानांत घेऊन मसूदला त्वरा करण्याचा हुकूम होता. तेव्हां मसूद येत असल्याचें पाहून शिवाजीनेंहि गड लढविण्याची तयारी चालविली. गड शिवाजीच्याच ताब्यांतला होता आणि रस्त्यांची त्याला चांगली माहिती असल्यामुळें शिवाजी सहजगत्या शत्रूला चुकवून गडावर गेला असला तरी पाठलाग करणाऱ्यांना व वेढा घालणाऱ्यांना मुसळधार पावसांत किती अडचणी सहन कराव्या लागल्या असतील त्याची कल्पना सहजच येईल. यापूर्वीच विशाळगडाला पालीचा राजा जसवंतराव व शृंगारपूरकर राजे सूर्याजीराव हे विजापूरकरांच्या वतीनें वेढा घालून बसले होते. अर्थात् तेहि शिवाजीच्या या हालचालीबद्दल अज्ञानांतच असल्यामुळें शिवाजी त्यांना झुकांडी देऊं शकला. तेव्हां आतां सिद्दी मसूद आल्यावर सर्वांनीं मिळून पुन: वेढयाचा प्रयत्न केला. या ठिकाणीं मराठे थोडे जबरदस्त होते. त्यांनीं वेढा घालणाऱ्यांना नामोहरम केल्यामुळें सिद्दी

गसूद आल्या वाटेनें परत गेला. आणि इकडे शिवाजीचा मार्ग मोकळा होऊन विशाळगडाहून कूच करून तो राजगडाकडे आपल्या मुलखांत गेला. या सर्व भानगडी फार तर आठ पंधरा दिवसांत संपून राजगडाला श्रावणाच्या आरंभीं बहुधा शिवाजी गेला असेल; शिद्याच्या हातावर स्वपराक्रमानें तुरी देऊन शिवाजी जों राजगडावर येतो तोंच मोंगलांनीं संग्रामदुर्ग काबीज केल्याची बातमी त्यानें ऐकिली ( भा. अ. २८ श्लो. २८). शिवभारतांत दिलेली हकीकत सरळपणें येथें दिली आहे. त्यामध्यें महाराज विशालगडावर पोंचल्यानंतरचें युद्ध वर्णन केलें आहे. आजपर्यंत मराठयांच्या आंगावर रोमांच थरारवणारा घोडखिंडींतील बाजी प्रभूचा प्रसंग महाराज गडावर पोंचण्यापूर्वींच म्हणून वर्णन करण्यांत येतो. तो प्रसंग शिवभारतांत दिलेला नाहीं. शिवाय प्रसिद्ध आहे तितका तपशील जेधे शकावलींत देखील नाहीं; " सिदी-जोहार यांची फौज पाठीवरी अली, युद्धाची दाटी बहुत जाली, तेव्हां बादलाच्या लोकांनीं युद्धाची शर्त केली, लोक खस्त जाले बाजी प्रभु देशकुळकर्णी ठार जाला " अशी हकीकत देऊन ' तेव्हां तरवारेचें पान आधीं बांदलास द्यावेंसें केलें त्यावरी जेधियास द्यावें ' असा मानपानाचा प्रश्न निकालांत निघाल्याचें सांगितलें आहे. या वर्णनावरून जेध्यांच्या शका-वलींत बांदलांच्या नांवाला व पराक्रमाला अधिक महत्त्व दिलेलें आढळतें. परंतु तें कितपत यथार्थ आहे हें सांगतां येण्यासारखें नाहीं. बाजी प्रभू ही व्यक्ती ऐतिहासिक असून त्याचें नांव अस्सल पत्रांत येतें ( ले. ७७३ ). परंतु शिवाजीचा अंमलदार किंवा सैन्यांतील अधिकारी म्हणून त्याचा उल्लेख आढळत नाहीं. वरील लेखांकांत त्याला मशारूल अनाम म्हणजे लोकमान्य संबोधिलें आहे. पंधराव्या खंडांतील पत्रांवरून प्रभू हे देशपांडे किंवा देश-कुलकर्णी होते हें सिध्द होतें. तेव्हां हल्लीं ज्याला स्वयंसेवक असें म्हणतां येईल असा हा कोणीं वीर पुरूष असावा असें कित्येकांनीं सुचविलें आहे. परंतु अधिक कागदपत्र या विषयावर प्रकाश पाडणारे सांपडतील तर ह्या बहारीच्या प्रसंगाची उत्तम सजावट करितां येईल. बाजी प्रभूसारख्या शूर मर्दाच्या पराक्रमाला अवसर या प्रसंगीं अर्थात् होता हें सहज पटण्यासारखें आहे. तशा प्रकाराची चकमक गडावर जातांनाच होणें शिवभारत-काराला अमान्य असण्याचें कारण नाहीं. कारण, महाराज गडावर गेले तेव्हां गडाला विजापूरकरांचा वेढा पडलेलाच होता; आणि तशी चकमक

झाल्याचें डच पत्रांत स्पष्ट म्हटलें आहे ( ले. ८३१ ). मात्र शत्रूचे लोक दुसऱ्या मार्गानें अगदीं नजीक येऊन भिडले असें पाहून त्यांना फसविण्या-करितां शिवाजीनें केलेल्या युक्तीचें त्यांतील वर्णन बरेंच भिन्न पण अत्यंत मनोरंजक आहे. शिवाजीनें या वेळीं आपल्या सैन्याचे दोन भाग करून पालखी वगैरे सरंजाम देऊन ' शिवाजी ' नांवाच्या आपल्या न्हाव्याला राज-रस्त्यानें पाठविलें. तो हाताला लागतांच पाठलाग करणारें सैन्य खूष होऊन परत गेलें ! तों इकडे खरा शिवाजी अडचणीच्या वाटेनें सुरक्षितपणें गडावर जाऊन पोंचला ! !

महाराज पन्हाळ्याच्या वेढ्यांतून सुटून गेले ह्या त्यांच्या अकल्पित धाड-साच्या कृत्यामुळें शिवराज्यावर कोसळूं पाहणारें कृष्णमेघाचें काहूर, एकदम वाताहत होऊन कोठच्या कोठें वितळून गेलें. तत्कालीन कल्पनानुसारें शिवाजी या व्यक्तीच्या सुरक्षिततेवर अवलंबून असणाऱ्या अनुयायांचीं मुखें टवटवीत झालीं. राजगड केंद्रावर पसरलेली काळजीची छाया पार ओसरली. पन्हाळगडावर अडकून पडलेल्या मराठ्यांची स्वप्रभूकरितां चिंता हरपली. आणि पुणें प्रांतांत केवळ आपल्याच जोरावर शाहिस्तेखानाला विरोध उभा करणाऱ्यांना महाराज आपल्या पाठीशीं आले यामुळें उत्साह आला. उलटपक्षीं शिवाजी निघून गेल्यामुळें विजापूरकरांना या पुढें पन्हाळ्याचा वेढा चालू ठेवण्यांत विशेष जीव राहिला नाहीं; आणि पुणें प्रांत अजून-पर्यंत असहाय स्थितींत असल्यामुळें शाहिस्तेखानाला हात मारितां आला तसा यापुढें मारतां येणें अशक्य झालें. महाराज पन्हाळ्याच्या वेढ्यांत अडकून पडल्यामुळें, एका अर्थानें मराठ्यांचा मुख्य गडी कोंडींत अडकल्यासारखा होऊन मराठ्यांवर डाव उलटूं लागला होता. परंतु कोंडी फोडून महाराज पुढें सरकल्यामुळें तुंबून राहिलेलें लोण पुढें झटकलें. एवढेंच नव्हे तर, एकंदर डावाचें स्वरूपच पालटलें; आणि झालेल्या झटापटीचा मराठ्यांना शक्य तितका अधिक फायदा मिळावा अशी परिस्थिति उत्पन्न झाली.

महाराजांच्या सर्व चरित्रांत प्रत्यहीं प्रतीतीला येणारा विशेष म्हटला म्हणजे त्यांच्या कर्तबगारींतील अद्भुतत्त्व होय. त्यांचें शौर्य, त्यांची मुत्सद्दे-गिरी, त्यांचें धोरण, त्यांचा सावधपणा या सर्वांपेक्षांहि त्यांची तडफ आणि अगदीं अडचणीच्या प्रसंगीं इतरांना कांहीं चमत्कार वाटेल अशी अजब करामत यांमुळें त्यांच्या शत्रूंना जशी त्यांच्याबद्दल विलक्षण दहशत बसत

असे, तितकाच किंवा त्याहून कांकणभर जास्तच त्यांच्या अनुयायांच्या मनांत त्यांच्याबद्दल सप्रेम आदर वसत असे. आतांच्या त्यांच्या निसटून जाण्याचा त्यांच्या शत्रूंची हिंमत खचण्याला उपयोग झाला एवढेंच नव्हे तर त्यांना आपल्या स्वातंत्र्याचा फायदा घेऊन राजकारणाचे डाव मोकळेपणानें खेळतां आले.

**११. विशाळगड का रांगणा !**—पन्हाळ्याचा प्रसंग वर्णन करणाऱ्याला शिवाजी पन्हाळ्यावरून निघाला तो विशाळगडला गेला का रांगण्याला गेला ह्या प्रश्नाचें उत्तर देणें भाग आहे. सभासदी बखरींत ' गड शिद्दी जोरास दिला आपण उतरोन आले. ' एवढाच उल्लेख आहे; उतरोन कोठें गेले याचा खुलासा नाहीं ( सभा ५७ ). चिटणीस रांगणा बोलतात ( पृ. १३८ ). त्यावरून गँड डफ् रांगण्यालाच पाठबळ देतो. आणि रांगण्याचेंच नांव इतकीं वर्षें सर्वांच्याच तोंडीं होतें. वास्तविक एक्याण्णव कलमी बखरीच्या एकूणचाळीसाव्या कलमांत विशाळगडावर गेल्याचीच नोंद होती. ती बखर गेल्या ३०।४० वर्षें लोकांना उपलब्ध असूनहि तिकडे कोणींच लक्ष दिलें नाहीं. परंतु शकावली प्रसिद्ध झाल्यापासून ज्या एकदोन महत्त्वाच्या तपशिलांत तिनें क्रांती घडवून आणली त्यांतच शिवाजी पन्हाळ्यावरून रांगण्याला न जातां विशाळगडला गेला ह्या गोष्टीचा समावेश होतो. शकावल्यांतून विशाळगडाच्या ऐवजीं खेळणा असें नांव आलें आहे. शिवभारतांतहि ' विशाल शैल ' असा उल्लेख आला आहे. आणि जरी पन्हाळ्याच्या वेढ्यांत खुद्द हजर असलेल्या इंग्रजांच्या पत्रांत ह्या बाबतींत कांहींच खुलासा नाहीं, तरी डचांच्या पत्रांत ' खेळणा ' या नांवाचा डच अपभ्रंश किंवा चुकीचा उच्चार ' हेळणा ' असा लिहिला आहे. केवळ कागदी पुरावा पाहिला तर विशाळगडाच्याच बाजूला कांटा झुकतो हें उघड आहे. कारण शकावल्या व शिवभारत हे आधार समकालीन म्हणून महत्त्वाचे, आणि डचांचीं पत्रेंहि त्याच वर्गांत मोडणारीं आहेत. अलीकडे सुप्रसिद्ध, कॅप्टन मोडक ( ग्वालेर आर्मी ) यांनीं लष्करी दृष्टया केलेल्या संशोधनाचा निष्कर्ष म्हणून व प्रत्यक्ष त्या त्या प्रांताची रचना पाहून आपलें मत रांगण्याच्या बाजूला दिलें आहे, आणि त्यांचीं कारणेंहि बरींच सयुक्तिक वाटतात. विशेषतः बखरींतून येणारीं घोडखिंड, गजापूर, बादशहाचा माळ, पांढरें पाणी वगैरे ठिकाणें विशाळगडाच्याच मार्गावर लागतात, ह्या विधानाला त्यांनीं आक्षेप घेतला असून पन्हाळ्यापासून विशाळगडाचें अंतर थोडें असल्यामुळें तिकडेच शिवाजी

जाणें शक्य होतें ह्याहि आक्षेपाचें समर्पक उत्तर देण्याचा त्यांनीं प्रयत्न केला आहे. उपर्युक्त ठिकाणें रांगण्याच्याहि मार्गावर आहेत आणि रांगण्यापर्यंतचें अंतर शिवाजीसारख्याला फार नव्हतें असें त्यांचें म्हणणें आहे. त्यांतून शिवाजी-सारखा कसलेला सेनापती शत्रूला आपण होऊन आपल्या स्वतःच्या कोठीच्या किल्ल्याकडे ओढून आपल्या आंगावर घेईल हें त्यांना अशक्य वाटतें. भौगोलिक संशोधन आणि अप्रतिम लष्करी ज्ञान ह्या दोन्ही गोष्टींमुळें समर्थित होणारे हे सिद्धांत अस्सल कागदांच्या पुराव्यानें दृढ झाले तर कॅ. मोडकांप्रमाणेंच आम्हांलाहि समाधान होईल. असो.

**१२. मोंगलांचें धोरण**—शिवाजी पन्हाळगडाहून आपल्या राजधानीस आला. तेव्हां दिल्लीपतीच्या मामास ( शाहिस्तेखानास ) 'आपला इष्ट हेतू सिद्धीस जातो किंवा नाहीं याविषयीं संशय उत्पन्न झाला' असें शिवभारतांत म्हटलें आहे ( अ. २७ श्लोक ५२ ). सर जदुनाथ सरकारहि चाकण घेतल्यानंतर शाहिस्तेखानानें पुढील कित्येक महिने निष्क्रियपणें घालविले असें म्हणतात आणि तें उघडच दिसत आहे. ग्रँट डफनें ह्या बाबतींत असें नक्की विधान केलें आहे कीं, "शाहिस्तेखानाला चाकणच्या भुईकोट किल्ल्या-संबंधीं आलेल्या अनुभवावरून राहिलेले डोंगरी किल्ले घेणें अत्यंत बिकट वाटलें." या सर्वांचा विचार करून पहातां आधींच थोडा कंटाळलेला शाहिस्तेखान शिवाजी सुटून आल्याचें कळतांच दबकून वागूं लागला असावा असें म्हणण्यास हरकत नाहीं. शिवाय शिवाजीनें शाहिस्तेखानाशीं सामोपचाराचें बोलणें लावल्याचेंहि दिसतें. श. १५८२ च्या कार्तिकांत (इ.१६६० ऑक्टो-नोव्हें.) 'राजश्री सोनाजी पंडित शास्ताखानाचा निरोप घेऊन राजगडास राजियापासीं आले' असें शकावल्या म्हणतात. मागें औरंगजेब भावांशीं भांडण्याकरितां उत्तरेकडे जाण्यास निघाला तेव्हां त्यानें शिवाजीच्या मागण्यांना अनुकूल उत्तर देऊन बरेंच उत्तेजन दिलें होतें ( ले. ७३९ ). त्याचें स्मरण देण्याकरितां व अन्य तऱ्हेनें पुणें प्रांतावरील स्वारी-बद्दल कांहीं सवलती मिळविण्याकरितां, सोनाजीपंडीत या मोंगली राजकारणांत कसलेल्या वकिलाला शिवाजीनें त्याच्याकडे पाठविलें असें दिसतें. परंतु पुढील बनावावरून पहातां या वेळीं शाहिस्तेखानाला हातांत आलेला प्रांत सोडून देऊन शिवाजीसारख्याशीं कांहीं सलोख्याचें बोलणें करण्याची आवश्यकता वाटली नसावी. स्वतः अत्यंत अडचणींत असतांना खुद्द

बादशाहानें वाटेल तीं अभिवचनें द्यावीं. पण तेवढा प्रसंग बचावल्यावर तीं बेलाशक मोडावींत; ही मोंगली साम्राज्यवाद्यांची जगजाहीर राजनीति औरंगजेबाच्या बादशाहींत जारी होती. तिचेंच अवलंबन शाहिस्तेखान करीत होता. शिवाजीचा पुणें प्रांत ( सिंहगड, पुरंदर वगैरे किल्ले सोडून ) आपण एकदां व्यापून बसलों आहों, आपलें सैन्य जबरदस्त असल्यामुळें आपल्याला पुणें प्रांतांतून हुसकून लावणें शिवाजीला कठीण जाईल हें शाहिस्तेखान जाणून होता. फार तर यानंतर नवे डोंगरी किल्ले घेणें किंवा आणखी मुलूख जिंकणें ही गोष्ट इतक्यांत सिद्ध होणार नाहीं. तर त्याला त्याची फिकीर नव्हती. देशावरील पुणें प्रांतांत ठाणें बसविल्यावर कोंकणांतील शिवाजीचा मुलूख घेण्याचा उद्योग त्यानें चालविलाच होता. अलमगीरनामा या फारशी ग्रंथाच्या आधारें सर जदुनाथ सरकार यांनीं, गेल्या वैशाखापासूनच (एप्रिल १६६०) इस्माएल नांवाचा एक सेनापती ३००० सैन्यानिशीं उत्तर कोंकणांत शिवाजीच्या मुलखावर स्वाऱ्या करीत असल्याचें लिहिलें आहे. पुणें प्रांताप्रमाणेंच ( कल्याण वगैरे किल्ले वगळून ) कोंकणांतीलहि उघडा प्रांत त्यानें जिंकून घेतल्यावर सलाबतखान दख्खनी या नांवाचा एक फौजदार त्या प्रांतावर नेमण्यांत आला; आणि त्याच्या मदतीकरितां म्हणून कित्येक मराठे सरदार ठेवण्यांत आले. शाहिस्तेखानाच्या ह्या हालचाली पहातां विशेष माघार घेण्याचा त्याचा विचार नसून फार परिश्रम केल्याशिवाय हळूहळू आक्रमण करून काय साधेल तेवढें हाताखालीं घालीत रहावें असें त्याचें धोरण दिसतें. आणि शिवाजीच्या सामर्थ्याबद्दल त्याची कल्पना अगदीं क्षुद्रत्वाची असल्यामुळें बरींच वर्षेंपर्यंत अधिकार उपभोगण्यासाठीं नेमला गेलेला सुभेदार या नात्यानें त्याच्या दृष्टीनें त्याचा हा कार्यक्रम बरोबर होता असेंच म्हटलें पाहिजे. शिवाजीच्या सुटकेमुळें यांत कांहीं फरक झाला असेल तर त्यानें पुणें प्रांतावर आणखी लगट करण्याचें सोडून देऊन आपला हात थोडासा आंवरला असावा इतकेंच म्हणतां येतें.

**१३. पन्हाळा देऊन सल्ला केला**—विजापूरी राजकारणाच्या ओघावर शिवाजीच्या ह्या धाडसाचा फार जबर परिणाम झाला. शिवाजीनें पन्हाळ्यावरून निघून जाण्यापूर्वीं अल्लीशाहाला शरण जाण्याचें बोलणें लाविलें होतें. त्यानंतर अल्लीशाहा खुद्द जातीनें मिरजेकडे येण्यास निघाला. त्याची मिती जदुनाथ सरकार श्रावण शु. ९ ( ऑगस्ट ५ ) अशी देतात. त्यानंतर सुमारें दीड महिन्यांनीं

भाद्रपद वद्य १३ ( सप्टेंबर २२ शनिवार ) रोजीं 'पनाळा सलाबतखानास दिल्हा सला केला ' असें विश्वसनीय ठरलेल्या शकावल्या म्हणतात. या दोन मित्या अशा तपशीलहीन येथें देण्याचें कारण असें कीं, त्या आज सर जदुनाथ सरकारांना मान्य असून त्यांच्या विषयींच्या तपशिलांत भयंकर तफावत आहे. यांपैकीं शेवटची मिती ही त्यांनीं आतां तिसऱ्या आवृत्तीमध्यें जेधे शकावलीवरून गृहीत धरली असून यापूर्वी ते केवळ बुसातीने सलातीन वर मिती व तपशील, यांकरितां अवलंबून रहात होते. त्यांच्या, म्हणजे केवळ मुसलमानी साधनांवर अवलंबून रहाणाऱ्यांच्या कशा ढोबळ चुका होतात आणि त्या कशा परत घ्याव्या लागतात हें दर्शविण्याकरितां प्रस्तुत विषयासंबंधींचीं त्यांचीं विधानें कालानुक्रमानें तपासून पाहूं. आणि शेवटीं नवीन उपलब्ध साधनांवरून हा प्रसंग कसा लिहिला पाहिजे हें पाहूं.

सरकार शिवाजी ( द्वितीय आवृत्ति पृ. ८३—८४ ):—' शिवाजीनें अडचणींत सांपडल्यामुळें सिदी जौहरशीं कपटानें सलोख्याचें बोलणें लाविलें. जौहर मूर्ख आणि राजद्रोही असल्यामुळें आपल्या वळणावर जाऊन, आपल्याशीं शिवाजीनें सल्ला केला तर आपणहि अल्लीपासून स्वतंत्र होऊन निराळें राज्य स्थापूं अशा विचारानें, त्यानें दुसऱ्या दिवशीं शिवाजीची भेट घेतली. उभयपक्षीं सहकार्य करण्याच्या आणाशपथा झाल्यावर शिवाजी किल्ल्यांत परत आला आणि वेढयाचा देखावा पुढें चालू राहिला ! ही जौहरच्या बेइमानीपणाची गोष्ट अल्ली आदिलशाहाच्या कानावर जातांच अल्ली संतप्त होऊन ( वर सांगितलेल्या तारखेस ) विजापुराहून उभय बंडखोरांची खोड मोडण्याकरितां निघाला. जौहरची समजूत घालण्याकरितां अल्लीनें एक वकील पाठविला, परंतु त्याचा उपयोग झाला नाहीं ! पण अल्ली मिरजेला पोंचून त्याच्या सैन्याची अघाडी पन्हाळ्याला येऊन भिडूं लागली तेव्हां शिवाजी आपलें कुटुंब (!) व ५।६ घोडेस्वार घेऊन एका रात्रीं निसटून गेला आणि पन्हाळा एकहि हात केल्याशिवाय सुमारें २५ ऑगस्ट १६६० रोजीं आदिलशाहाच्या हातीं लागला. तारीख-इ-अल्लींत म्हटल्याप्रमाणें ' अल्लीनें सलाबतपासून पन्हाळा एका क्षणांत घेतला ! " ही हकीकत सर जदुनाथांनीं तारीख-इ-अल्ली व बुसातीने सलातीनवरून दिली आहे. त्यापुढें सुप्रसिद्ध बाजी प्रभूचा प्रसंग बखरीवरून दिला आहे. मूळ बुसातीनमध्यें तो नसून त्या ऐवजीं " तो किल्ला बिनहरकत आदिलशाहाच्या ताब्यांत

आला. मग शिवाजीला शोधण्याकरितां रानें, दरीं, डोंगर धुंडण्यानें लष्कराची खराबी होऊन 'डोंगर पोखरून उंदीर काढिल्यासारखें होणार' असें जाणून अली पुढें 'पाहून घेतां येईल' अशा दमावर मिरजेहून आनंदानें विजापुरास गेला." यांत शिवाजी पळून गेल्यावर पूर्वसंकल्पाप्रमाणें त्याचें पारिपत्य करण्याचा किंवा जौहरलाहि शिक्षा देण्याबद्दल पुढें एक शब्दहि नाहीं हें लक्षांत घेण्यासारिखें आहे ( मो. २०२ ).

आतां तिसऱ्या आवृत्तींत सरकार काय म्हणतात तें पाहूं. ( पृ. ७५-७६ ):—"वेढ्याचा देखावा बेइमानीनें पुढें चालविल्यावर शिवाजी पूर्ववत् पन्हाळ्यांतच राहिला. मध्यंतरीं पावनगडावर फाजलखान व सिद्दी हिलाल यांनीं प्रयत्न सुरू केले. पावनगडाची परिस्थिति बिकट होऊं लागली. तेव्हां पावनगड शत्रूच्या हातीं लागला तर आपली धडगत नाहीं हें जाणून शिवाजी आषाढ वद्य १( जुलै १३ )स पावनगडावर हल्ला करणाऱ्या सैन्यावर तुटून पडला. आणि युद्धाच्या गोंधळांत पळून विशाळगडाकडे गेला.' पुढें बाजी प्रभूप्रसंग देऊन अलीला मिरजेला आणून "आतां यापुढें अलीला फसविणें शक्य नाहीं असें पाहून मराठ्यांकडून त्यानें २२ सेप्टेंबरला किल्ला ताब्यांत घेतला व अलीच्या मुखत्याराच्या हातांत दिला."

शिवाजीचें पलायन आणि किल्ला सलाबतखानाच्या हातांत देणें यांमध्यें अंतर दोन महिन्यांच्या वर होतें, हें जेधे शकावली व शिवभारत यांवरूनच उघड होतें. तो तपशील पूर्वीच्याच वृत्तांतांत घुसडून देण्याचा प्रयत्न वरील हकीकतींत केलेला स्पष्ट दिसतो. पण त्यानें इतिहासाची हानी कशी झाली आहे हें पहाण्यासारिखें आहे.

आमच्या मतें निरनिराळ्या ग्रंथांतून एकाच प्रसंगाबद्दलच्या तपशिलाची सांगड घालण्याचा प्रयत्न करीत असतांना त्या सर्वांची संगति व्यवस्थित लावून दाखविली पाहिजे. म्हणजे प्रत्येक तपशील मान्य केलाच पाहिजे असें नाहीं. परंतु कांहीं तपशील मान्य व इतर अमान्य ठरवितांना त्यांचीं सयुक्तिक कारणें दाखविलीं पाहिजेत. उदाहरणार्थ, शिवभारतकारानें शिवाजीनें निघून जात असतांना जौहरला द्वंद्वयुद्धाला आव्हान केलें ( अ. २७ श्लोक ५-९ ) अशासारखी केवळ गौरवार्थ वर्णिलेली गोष्ट इतिहासाच्या ओघांत कांहींच फरक करूं शकत नाहीं ती सोडून दिल्यास चालेल. परंतु शिवाजीचा पाठलाग करण्यांत कांहीं अर्थ नाहीं, असें पाहून आदिलशाहा

मिरजेकडून विजापुरास परत गेला ही गोष्ट मुद्दाम लक्षांत घेण्यासारिखी आहे. उभय बंडखोरांचें पारिपत्य करण्याकरितां म्हणून निघालेला संतप्त अली शिलकी ' जय्यत ' फौज घेऊन आला; तो तसाच परत गेला ! शिवाजीच्या लोकांकडून सलाबतखानानें किल्ला घेतला आणि तो अलीला दिला आणि शिवाजीचें सैन्य मधच्यामध्यें सुरक्षित सुटलें ! हा बनावहि पूर्वी वर्णन केलेल्या प्रवाहांत बरोबर बसत नाहीं. या वेळीं विजापूरकर शिवाजीला तसाच सोडून परत गेले एवढेंच नव्हे तर पुढें श. १५८६ च्या कार्तिक मासीं इदलशाहाचा व राज्याचा बिघाड होईपर्यंत-म्हणजे सुमारें ४ वर्षेपर्यंत-ते त्याच्या वाटेस गेले नाहींत. ही गोष्ट अली ज्या मनस्थितींत मिरजेला आला म्हणून सांगितलें आहे तिच्याशीं पूर्ण विसंगत आहे. म्हणून या वेळची वस्तुस्थिति वर्णन केली जाते त्याहून भिन्न असली पाहिजे.

जेधे शकावलींतील नोंदीप्रमाणें या वेळीं सल्ला झाला आणि तो १५८६ पर्यंत चालला. त्या अर्थी या वेळीं उभयपक्षीं युद्धतहकुबी झाली असली पाहिजे. येथेंहि पुनः हेगमधून आणविलेल्या विशेष महत्त्वाच्या डच पत्राचा आपल्याला फारच उपयोग होतो. श १५८२ भाद्रपद शु. ११ ( ले. ८३१, १६६० सेप्टें. ५ )च्या पत्रांत पन्हाळाप्रकरणाचा समारोप खालील शब्दांत केलेला आहे. " मध्यंतरीं बंडखोर शिवाजी पुरंदर (?) नांवाच्या आपल्या बळकट किल्ल्याच्या आश्रयास गेला व तेथून त्यानें निरनिराळ्या किल्ल्यांवर व विशेषतः पन्हाळ्यास शिपाई व सामग्री पाठविली. प्रत्येक गोष्ट त्याच्या मनाप्रमाणें होत आहे. थोड्याच दिवसांपूर्वी अशी बातमी आली कीं, रुस्तुमजमा हा शिवाजी व विजापूरदरबार यांमध्यें सल्ला घडवून आणण्याची खटपट करीत असून त्यास इतकें यश आलें कीं, सुलतान अलीशाहा वृद्ध राणीला बरोबर घेऊन, इतर गोष्टींचा निकाल करण्याच्या वेळींच, शिवाजीशीं असलेला मतभेद निकालांत काढण्यासाठीं विजापुराहून मिरजेच्या मजबूत किल्ल्यापर्यंत आला आहे. लोकवार्ता अशी आहे कीं, रुस्तुमजमा यास सेनापतीची पदवी देण्यांत आली. आणि बादशहाचा वकील शहासाहेब यासह तो हुकेरीहून सैन्याचा अधिकार घेण्याकरितां निघाला असून, लवकर बादशहाला भेटण्याकरितां मिरजेला जाईल.' शिवाजी पन्हाळ्याहून सुटून गेल्यानंतर चाकणच्या वेढ्यांत सांपडलेल्या लोकांना जरी त्याला कुमक पोंचवितां आली नाहीं आणि तो किल्ला शाहि-

स्तेखानाच्या हातीं गेला तथापि सुटकेनंतर त्यानें कोणत्या दिशेनें प्रयत्न करून उभय दिशांनीं चालू असलेल्या चढाईच्या प्रयत्नांना थोपविलें हें या अवतरणाच्या आरंभींच आलें आहे; आणि त्यामुळें शिवाजी किल्ल्यांत अडकून पडला असतांना त्याची जशी बिकट परिस्थिति होती तशी ती पुढें न राहतां प्रत्येक दिवशीं सुधारत गेली, क्रमशः तो अधिक बलवान् होत गेला. त्यामुळें त्याला पेंचांत आणण्याची शक्यता कमी होत जाऊन विजापूरकरांना पन्हाळ्याचा वेढा ही बाब किफायतशीर राहिली नाहीं. शिवाजीचा नित्याचा कार्यक्रम पाहिला असतां यापुढील दसरा आपल्या राज्याला सुखाचा जाणार नाहीं अशी सहजच अलीशाहाला भीति वाटूं लागली. आणि तो युद्ध थांबविण्यास तयार झाला. इकडे शाहिस्तेखानाचा मुलूख जिंकण्याचा क्रम लवकर थांबण्याचें चिन्ह दिसेना. कोंकण व देश उभय ठिकाणींहि सावकाशीनें मुलूख पादाक्रांत करण्याचें त्याचें धोरण सोनाजीपंडिताच्या मध्यस्थीनेंहि तो सोडण्यास तयार नाहीं असें दिसून आल्यामुळें विजापूरकरांशीं गोडी करून एकाच शत्रूवर आपलें सामर्थ्य एकवटून मारा करावा या विचारास शिवाजीला लागण्याशिवाय गत्यंतर नव्हतें. विजापूरकरांनीं पन्हाळा घेतला तर नवीन मुलूख जिंकण्याच्या प्रयत्नांत शिवाजीला अपयश आलें, एवढेंच काय तें नुकसान होणार होतें. शाहिस्तेखानाकडे दुर्लक्ष करण्यानें खुद्द ताब्यांतील मुलूख जाऊन लगेच कफल्लक बनण्याची पाळी येणार होती. तेव्हां शाहिस्तेखानाला चांगल्या तऱ्हेनें तोंड देतां येण्याकरितां विजापूरकरांशीं सलोखा करणें शिवाजीला आवश्यक वाटलें. दोन्ही बाजूंना आपल्याला लढणें कठीण जाईल असें पाहून शिवाजीनें पन्हाळगड आदिलशहाच्या स्वाधीन करण्याबद्दल आपल्यामागें पन्हाळ्यावर ठेविलेल्या त्र्यंबक भास्कर ह्या अधिकाऱ्यास कळविलें आणि त्या आज्ञेनुसार त्यानें तो किल्ला श. १५८२ भाद्रपद वद्य १३ रोजीं सलाबतखानास देऊन तह केला (इ. १६६० सप्टें. २२ ).

या प्रकरणांतील शिवाजीची मनःस्थिति वर्णन करण्याचा शिवभारतकारानें प्रयत्न केला आहे. त्याचा अर्थात् विचार केला पाहिजे ( अ. २८ श्लो. ३०-४१ ). आपण दुसरीकडे गुंतल्यामुळेंच चाकण व संग्रामदुर्ग हातचे गेले ही वस्तुस्थिती परमानन्दानें शिवाजीच्या तोंडून वदविली आहे ती बरोबर आहे. या वेळच्या स्वतःच्या सामर्थ्याबद्दल बोलतांना शिवाजी

विशेष निराशेनें न बोलतां ‘ जरी ते घेण्यास कठीण आहेत तरी त्यांच्यावर मीं स्वतः चालून जाऊन ते घेण्याची मला उमेद आहे ’ असेंच तो म्हणतो. परंतु दुसरीकडे निकडीनें आपल्याला लक्ष दिलें पाहिजे. आणि त्यासाठीं तो नाद तूर्त तरी सोडून दिला पाहिजे असे विचार शिवाजीचे आहेत. अदूरदृष्टीनें लहानसान गोष्टींच्या नादीं लागून महत्त्वाच्या गोष्टींकडे दुर्लक्ष करण्याचा अधीर स्वभाव शिवाजीचा नव्हता असा परमानन्दाचा अभिप्राय दिसतो. म्हणून ‘ शत्रुसेनेचा पराभव करण्याची इच्छा धरणाऱ्या शहाण्या राजानें मोठ्या यत्नानें सतत सैन्य बाळगिलें पाहिजे आणि त्याकरितां पुष्कळ द्रव्याची जरुरी आहे. कारण,

अर्थाद्धर्मो भवत्युच्चैरर्थाद्धर्मोऽपि वर्धते ।
अर्थादेव तृतीयोऽर्थस्तस्मादर्थः प्रशस्यते ॥ ३६ ॥

एवढेंच नव्हे, तर कुलशील, वय, विद्या, पराक्रम, सत्यवादित्व, गुणज्ञता, गांभीर्य व असेच अनेक गुण पैशाच्या अंगभूत असतात. तेव्हां प्रथम पैसा मिळवून मग दिल्ली पतीच्या मामाचा चांगला सूड घेईन ’ असे शब्द त्यानें शिवाजीच्या तोंडीं घातले आहेत. शाहिस्तेखानाचा सूड उगविण्याकरितां लागणारें सामर्थ्य या वेळीं आपल्याजवळ नाहीं याची जाणीव शिवाजीला होती असें या भाषणावरून दिसून येतें.

अशा प्रकारें शिवाजीनें पन्हाळा किल्ला ताब्यांत देण्याचें कबूल केलें, तथापि ‘ अल्लीपासून त्या गडाचा मोबदला आपण एका क्षणांत घेऊं ’ अशी खूणगांठ त्यानें मनांत बांधून ठेविली होती ( भा. अ. २८ श्लो. ४ ). त्र्यंबक भास्कर आज्ञेप्रमाणें गडावरून निघतांना सिद्दी जौहरला स्वतः भेटून व स्नेहाच्या दोन गोष्टी बोलून राजगडावर महाराजांपाशीं येऊन दाखल झाला. महाराज गडावरून सुटून गेले, या गोष्टीबद्दल सिद्दी जौहरवर ठपका येऊन अल्लीची त्याच्यावर गैरमर्जी झाली असेंच सर्व इतिहासकार लिहितात. शिवभारतकारानेंहि हा प्रश्न मुद्दाम उपस्थित करून त्यानें लांच घेऊन शिवाजीला जाऊं दिलें हा आक्षेप अनाठायीं आहे असें दर्शवून त्याला निरपराधी ठरविलें आहे ( अ. २८, २२–२४ ). आरंभच त्यानें बेइमानींत केला या आक्षेपाला जागा नाहीं ही गोष्ट यापूर्वींच सिद्ध केली

आहे. पुढें शिवाजीच्या पाठलागांत त्याच्या हाताखालील सरदार व त्याचा जांवई सिद्दी मसूद यानें पराक्रम केल्याबद्दल त्याला 'खान' हें पद मिळालें होतें ( मो. २०७ ). यावरून त्या वेळची कामगिरीहि अलीशहाला मान्य होण्यासारखीच झाली यांत शंकेला जागा राहात नाहीं. शिद्दी जौहर-वर यानंतर लगेच दरबारची इतराजी होऊन उत्पन्न झालेल्या यादवींत त्रस्त होऊन शेवटीं त्याचा विषप्रयोगानें वध ( शि. भा. अ. २८, श्लो. २१ ) किंवा आजारानें मृत्यु ( मो. २०७ व जे. श. ) झाला. ही गोष्ट खरी असल्यामुळें त्या वेळीं कित्येकांनीं तिचा संबंध शिवाजीशीं लाविलेला दिसतो. आणि मागें सूचित केल्याप्रमाणें त्याला बेइमान म्हणणें हें कित्येकांना सोईचें वाटलें असलें तरी त्याच्या पुढील वर्तनक्रमाचा संबंध निराळ्याच कारणांशीं म्हणजे विजापूरदरबारांतील पक्षोपपक्षांशीं असावा असें वाटतें.

या वेळीं म्हणजे अली आदिलशाहाच्या कारकीर्दींत सामान्यतः दोन पक्ष दिसतात; ते 'राजनिष्ठ पक्ष' आणि 'आत्मनिष्ठ पक्ष' हे होत. पहिला पक्ष बरेच अंशीं बादशहा आणि त्याची मर्जी यांना संभाळून त्या मार्गानें आपली बढती करूं इच्छिणारा होता. तर दुसरा पक्ष स्वतःच्या मनगटाच्या जोरावर प्रसंगीं प्रमुख सत्ताधीशांशीं विरोध करूनहि आपलें महत्त्व राखूं पहाणारा असा होता. केंद्रस्थ सत्ता असमर्थ होऊं लागली म्हणजे कर्तबगार लोकांमध्यें साहजिकच दुसऱ्या प्रकाराची वृत्ती उत्पन्न होत असते. त्यांतहि जहाल वृत्तीचे सरदार प्रत्यक्ष बंडखोरांमध्यें़हि सामील होतात. ह्या तीनहि वृत्तीचे लोक अलीच्या कारकीर्दींत दिसून येतात. कर्नूलचा नबाब सिद्दी जौहर व तोरगलचा किल्लेदार सिद्दी याकूत ( मो. २०४ ) हे तर उघड उघड बंडखोरच होते. रुस्तुमजमा व शहाजी हे स्वत्व राखून स्वपराक्रमाच्या जोरावर आपली मान्यता संभाळणारे कर्तबगार सरदार होते. सिद्दी मसूद हा जौहरचाच जांवई होता. परंतु तोहि कांहींसा दरबारांत मान्य असावा. सरजाखानासरिखे सरदार सिद्दी जौहरबद्दल रदबदली करण्यास अनुकूल अशा वृत्तीचे होते ( मो. २०३ ). तर बहलूलखान, इब्राहीमखान, मौलवी अहंमद, शहासाहेब ( ले. ६६८ ) हे अलीच्या विश्वासांतले असून राजनिष्ठ-पक्षांतील अध्वर्यू होते. अबदुल महमद हा अलीच्या १५।१६ वर्षांच्या कारकीर्दींपैकीं शेवटच्या बारा वर्षेपर्यंत एकसारखा मुख्य प्रधान होता. त्या पक्षाचें धोरण सामान्यतः ठरलेलें असल्यामुळें ते एकाच मार्गानें जात; परंतु इतरांचे

मध्यवर्ति सत्तेशीं संबंध थोडे विस्कळित व आपसांत कचित् वैराचेहि असत, यामुळें त्यांत नानाविध बनाव होत. सरजाखानासारखे मर्यादेवर वागणारे सरदार केव्हां केव्हां खुद्द मुख्य सरदार बहलूलखान याचीहि कळ काढण्यास सोडीत नसत ( ले. ८३५ ). या निरनिराळ्या धोरणांनीं प्रेरित होणाऱ्या माणसांबद्दल दरबारांतूनहि भिन्न भिन्न प्रकारची आस्था दर्शविण्यांत येई.

शिद्दी जौहर हा मूळचा बंडखोर होता. अल्लीशहा असहाय स्थितींत सांपडला असतां जरी त्यानें त्याच्या सेवेचा स्वीकार केला, कांहीं वेळपर्यंत रुस्तुमजमाकडे थोडी प्रतिकूल नजर वळविली आणि त्याला मागें टाकून सिद्दी जौहरला सेनापती करून पाठविलें; तथापि उभयतांकडे पहाण्याची अल्लीच्या दरबारची दृष्टी प्रथमपासूनच भिन्न असल्यामुळें शिवाजीबद्दल त्याची दृष्टी प्रसंगानें बदलतांच रुस्तुमजमा फिरून विश्वासांत आला असला पाहिजे हें उघड दिसतें. शिवाजीच्या युद्ध-तहकुबीच्या बाबतींत रुस्तुमजमानें अर्थात् पुष्कळच कामगिरी केली असली पाहिजे. पण यामुळें सिद्दी जौहरचें धोरण सौम्यपणाचें सुटून एकदम बंडखोरीचें कां व्हावें हें समजत नाहीं. लेखांक ८४५ मधील त्याच्याबद्दलच्या मजकुरावरून कांहीं तर्क करावयाचा म्हटला तर, प्रथम जौहरला पन्हाळ्यावर पाठवितांना रुस्तुमजमावर इतराजी झाल्यामुळें त्याची त्या प्रांताची जहागीर जौहरला दिली असावी, व पुढें रुस्तुमजमावर फिरून मर्जी आली तेव्हां ती त्याला परत देऊन सिद्दी जौहरला वेंगुर्ल्याकडील जहागीर दिली व त्याला कानड्यावर स्वारी करण्याकरितां पाठविलें असें दिसतें. या बाबतींत कांहीं असमाधानाला जागा होऊन सिद्दी जौहरनें "वाटेंत आपला विचार बदलून बंड उभारलें." आणि या वेळीं त्यानें आपण विजापूरचे हस्तक नसून मोंगलांचे सरदार आहों असें जाहीर केलें ही गोष्ट लक्षांत घेण्यासारखी आहे. अल्लीशहानें शिवाजीशीं संगनमत केल्याबद्दल सिद्दी जौहरचें पारिपत्य केल्याचें दिसून येण्याऐवजीं उलट त्याला जहागीर वगैरे देऊन त्याला कानड्यावर वेंकटापा नायकाकडून खंडणी वसूल करण्याकरितां पाठविलें. आणि तिकडे जातांना कांहीं बिनसल्यामुळें किंवा मोंगलांकडून कांहीं अनुसंधान आल्यामुळें जौहरनें स्वतः बंड उभारलें आणि विजापूरकरांची सत्ता अमान्य करून विजापूरचे झेंडे व निशाणें नष्ट करून त्यांचे बदली मोंगली तऱ्हेचीं तयार केलीं. कदाचित् बुसातीने सलातीनच्या म्हणण्याप्रमाणें त्यानें विजापुरी सरदारांवर दौडहि केली असेल (मो.२०३).

नंतर युद्ध चालून त्यांत त्याचा पराजय वगैरे गोष्टी क्रमानें होत गेल्या हें ठीकच आहे. परंतु ही गोष्ट नंतरची म्हणजे शके १५८३ तील आहे. सिद्दी जौहरचें पुढें काय झालें हा प्रश्न शिवाजीच्या चरित्राच्या दृष्टीनें महत्त्वाचा नाहीं. त्याचे व शिवाजीचे परस्पर संबंध काय होते हाच काय तो महत्त्वाचा प्रश्न आहे. उपलब्ध साधनांच्या आधारें त्याचा येथपर्यंत विचार केला. परंतु अल्लीनामा इत्यादि महत्त्वाचे ग्रंथ नुकतेच हाताशीं आले आहेत. त्यांचा बारकाईचा अभ्यास अद्याप व्हावयाचा आहे. त्यानंतर ह्या मुद्यावर अधिक प्रकाश पडेल अशी आशा आहे.

**१४. कित्येक महत्त्वाचे प्रश्न**—शिवचरित्रांतील महत्त्वाच्या प्रसंगांची संख्या सामान्यपणें ठरून गेल्यासारखीच असल्यामुळें तीमध्यें विशेष भर पडण्याचा यापुढें संभव दिसत नाहीं. त्यांपैकीं बऱ्याच प्रसंगांचे तपशीलाच्या बाबतींत मात्र तसें म्हणतां येणार नाहीं. तेव्हां तपशील अधिक मिळावा याकडे अभ्यासकांचें लक्ष अर्थातच यापुढें बरेच दिवस लागून रहाणार असें वाटतें. परंतु तपशीलहि पाहिजे तितका उपलब्ध झाल्यानंतर त्याहून देखील महत्त्वाचा असा एक संस्कार रहातो आणि तो म्हटला म्हणजे संगती लावण्याचा ( Interpretation ) म्हणजे प्रसंगाचें मर्म किंवा हृदय समजून घेण्याचा होय.

महाराजांच्या चरित्रांतील या पन्हाळा प्रकरणाच्या बाबतींत असे एक दोन मार्मिक प्रसंग आले आहेत. शिद्दी जौहर आदिलशाहीशीं बेइमानानें वागला आणि शिवाजीला पळून जाण्यास त्यानें मदत केली अशी त्या वेळच्या आदिलशाही पक्षपात्यांची समजूत होण्यासारखी परिस्थिति वरवर दिसत असली तरी वस्तुतः तसा प्रकार नव्हता, हें सप्रमाण पूर्वीं दाखविलेंच आहे. तशा सारखाच दुसरा एक प्रश्न शिवभारतकारानें उपस्थित केला आहे. अफजलखानाच्या वधानंतर अगदीं अल्पावधींतच शिवाजीनें पन्हाळा घेतल्यामुळें भयचकित झालेल्या अल्लीशाहानें 'त्याचा निग्रह करण्यास आपण असमर्थ आहों असें समजून दिल्लीच्या बादशहाची सेना मदतीकरितां मागविली' ( अ. २४-२४ ); असें म्हणून पुढें एकदां त्वरित बोलाविलें असतांहि 'चिरयत्सुच ताम्रेषु' ( ताम्रांनीं दीर्घसूत्रीपणा चालविल्यामुळें ) खिन्न होऊन त्यानें कर्नूलच्या जौहराला बोलाविलें ( अ. २५, ११-१२ ) असें म्हटलें आहे. आणि अखेरीला मोंगली सैन्य

संग्रामदुर्गावर हल्ला करण्याकरितां आलेलें पाहून अलीशहाच्या चित्तास धीर आला व मोंगलांपासून स्वप्रांतांचें रक्षण करण्यासाठीं शिवाजी सुटूं नये म्हणून त्यानें जौहरला ताकीद दिली ( अ. २५–६७ ); असा अनुक्रम भारतकारांचा आहे. सर जदुनाथ सरकारांच्या लिखाणावरून तसा कांहीं संबंध त्यांना मान्य नसून ' शिवाजीचें बंड मोडण्याकरितां म्हणून शाहिस्तेखानाची नेमणूक जुलै १६५९ मध्येंच झाली होती व त्यानें विजापूरकरांचें सहकार्य मिळविलें ही त्याच्या यशाच्या दृष्टीनें अनुकूल गोष्ट घडली ( पृ. ७४ ) म्हणून त्याचें अभिनंदन करणें योग्य आहे. या सहकार्यामुळें शिवाजीचें सैन्य दोन्ही युद्धक्षेत्रांत पांगून गेलें आणि दोन्ही ठिकाणीं त्यामुळें त्याचा पराजय झाला. ' असें त्यांचें म्हणणें आहे.

यांत मुख्य प्रश्न असा आहे कीं, शिवाजीचा पराभव करण्याची विशेष आस्था कोणाला होती? विजापूरकरांना कीं दिल्लीकरांना ? सरकारच्या मतें ती दिल्लीकरांना होती. पण शिवभारतकाराच्या मतें ही आस्था विजापूरकरांना विशेष होती. अफजलाच्या मृत्यूनंतर विजापूरकरांना शिवाजी आपणास आवरत नाहीं हें समजून आलें व त्यांनीं दिल्लीकरांकडे मदतीची मागणी केली; यामुळें शाहिस्तेखानानें शिवाजीच्या मुलखावर स्वारी केली, हें म्हणणें अधिक सयुक्तिक दिसतें. १५८१ आषाढ-श्रावणांत ( जुलै १६५९ ) मध्यें अफजल प्रसंग अजून दूर असतांनाच शिवाजीवर स्वारी करण्याचें काम औरंगजेबानें शाहिस्तेखानाकडे सोंपविलें या म्हणण्यांत स्वारस्य दिसत नाहीं. औरंगजेबाच्या राज्याभिषेकाच्या वेळीं शिवाजीचा वकील हजर होता व त्याच्या मार्फत औरंगजेबानें शिवाजीकडे जें पत्र पाठविलें (ले. ७७५) तें दोघांतील गोडीचें निदर्शक आहे. तात्पर्य, शाहिस्तेखानानें इकडे येऊन प्रथम शिवाजीवर मोहीम काढली व विजापूरकरांचें सहकार्य संपादन केलें असा प्रकार बिलकूल नसून विजापूरकर व शिवाजी यांचा तंटा आधींच श. १५८१ च्या कार्तिकापासून सुरू होऊन तो ऐन रंगांत आला असतां विजापूरकरांनीं दिल्लीकरांची मदत मागितली. ही सबब पुढें करून शिवाजीकडील मुलूख विनाविरोध म्हणजे सुलभपणें घेण्याची ही उत्तम संधी आली तिचा फायदा शाहिस्तेखानानें घेतला इतकेंच. त्याच्या मनांत दोघांनाहि बुडवावयाचें होतें. तो औरंगजेबाचें धोरण अमलांत आणण्यासाठीं आला होता. औरंगजेबाच्या मनांतून विजापूरची बादशाही बुडविण्याची हौस फार होती. आदिलशाही

व कुतुबशाही बुडविण्याची प्रतिज्ञा त्यानें लहानपणींच केली होती. ती भावाच्या व बापाच्या आग्रहानें पुरी होऊं शकली नाहीं. ती पुरी करण्यासाठीं साधन म्हणून शिवाजीला हाताशीं धरण्याला तो केव्हांहि तयार असे ( ले. ७३९ ). आणि हें ओळखून शिवाजीनें विजापूर बुडविण्याच्या कामीं मी साह्य करतों, असें सांगून किंवा त्याच्या आड मी येत नाहीं हें तरी निदान सांगून आपल्या हयातींत औरंगजेबाची शक्ती विजापूरकरांच्या अंगावर ढकलून दिली.

या दोन शाह्या बुडविण्याचा औरंगजेबाचा नाद इतका जबर होता कीं, त्यांच्या मानानें मराठे हे चिवट शत्रू आहेत हें, त्याच्या लक्षांत आलें नाहीं. या दोन शाह्या बुडविल्या म्हणजे मराठ्यांचें राज्य सहज बुडवितां येईल अशा समजुतीवर तो गेला. पण त्याप्रमाणें केल्यावर नंतर त्याला अनुभव आला कीं, या शाह्या बुडवितां येतील पण मराठयांना बुडविणें तितकें सोपें नाहीं. ह्या शाह्यांचीं पाळेंमुळें खोल नव्हतीं. लोकांच्या अंतःकरणांत त्यांच्याविषयीं आपलेपणा नव्हता; पण मराठयांच्या राज्याविषयीं लोकांच्या मनांत आपलेपणाची भावना होती व ती कालगतीनें स्वाभाविकपणेंच वाढणें अपरिहार्य होतें. हिंदूंचें स्वतंत्र राज्य असूं शकतें हें दाखविणें व तें कांहीं दिवस टिकवून दाखविणें हें काम शिवाजीमहाराजांनीं केलें, यांत लोकांना मोठा धडा मिळाला. आदिलशाहा व कुतुबशाहा हे मोंगलांच्या भक्ष्यस्थानीं पडणार ही गोष्ट लोकांना दिसूं लागली होती. म्हणजे या शाह्यांची परंपरित भीति घालविण्याचें काम औरंगजेबानें केलें. आणि औरंगजेबाशीं खेळखंडोबा करून स्वतंत्रपणें डोकें वर काढतां येतें हें जयसिंगप्रसंगापर्यंत महाराजांनीं दाखविलें; आणि नंतर कडव्या धर्माच्या पुकाऱ्यामुळें औरंगजेबानें, स्वतंत्र हिंदु राज्य उभें केलें पाहिजे असें म्हणण्याची आवश्यकता दक्षिणेंतील हिंदूंना पटण्यास अनुकूल असें वातावरण निर्माण केलें. तो इतिहास पुढें सांगावयाचाच आहे. सारांश, अव्यवस्थितपणा व दुर्लक्ष म्हणून प्रथम शिवाजीला वाढूं द्यावयाचा आणि नंतर धर्माचें नांव घेऊन त्याच्या पक्षाला आणखी एवढें तेज चढवावयाचें हें काम विजापूरकर व औरंगजेब या दोघांनींहि क्रमानें केलें; आणि दोघांच्याहि या स्वभावाचा फायदा शिवाजीमहाराजांनीं घेऊन पुढें दोघांनाहि पण विशेषतः औरंगजेबाला पश्चात्ताप करावयास लाविलें.

पुढें पेशवाईंत शिंद्यांनीं दिल्ली काबीज करण्याचा नाद धरून जसें पेशवाईला निराळें वळण लाविलें तसें दक्षिण जिंकण्याची व धर्मप्रसार करण्याची दुहेरी इच्छा धरून औरंगजेबानें दिल्लीच्या बादशाही राजकारणास जें वळण लावलें त्यांत बादशाही रसातळास गेली. दोघांचेहि इच्छेनें मुख्य 'सत्तेची ओढाताण झाली; व या ओढाताणींत सर्व सत्ता खर्ची पडली. औरंगजेबाच्या दक्षिणी बादशाह्या जिंकण्याच्या वेडानें मराठ्यांची सत्ता जशी सावकाशीनें प्रस्थापित होऊन दिल्लीकरांच्या उरावर बसूं शकली, त्याप्रमाणें शिंद्यांच्या दिल्ली सर करण्याच्या उद्योगांत इंग्रजांना वेळींच खची करण्याचें काम दृष्टीआड झालें; आणि नंतर ते इतके डोईजड झाले कीं तेच मराठ्यांना जिंकूं शकले. सारांश, प्रथम किरकोळ म्हणून भलत्यांची उपेक्षा करणें व सहायार्थ हाताशीं घेणें व आपण नंतर आपल्या आटोक्याबाहेरचें काम अंगावर घेणें यांत लहान सत्तेला डोकें वर काढण्याला उत्तम संधि सांपडते.

हा खुलासा केल्यानंतर विजापूरकर व शाहिस्तेखान या उभयतांपैकीं कोणीं कोणास मदत केली हा मुद्दा तितका महत्त्वाचा रहात नसून उभयतांहि पूर्वींच निश्चित झालेल्या धोरणाचें अवलंबन करून युद्धाला प्रवृत्त झाले होते असें म्हणतां येतें. शाहिस्तेखान आपल्या बादशहाचें धोरण यथाशक्य अंमलांत आणीत होता. आणि विजापूरकरांच्या बाबतींत तर, अफजलवधापासून शिवाजीच्या जोरकस हल्ल्यांचा प्रतिकार करतां करतां, त्यांना स्वारीवर स्वारी काढावी लागली होती. त्यांच्या नांवाचें व राज्याचें रक्षण करण्याची तीव्र आवश्यकता यापलीकडे बाह्य कारण, कोणाला साहाय्य करण्याची इच्छा इत्यादि त्यांच्या या स्वाऱ्यांचें असेल हें शक्यच वाटत नाहीं. पण यदाकदाचित् कोणी कोणाला मदतीला बोलावणें आवश्यकच असलें तर तें विजापूरकरांनीं मोंगलांना बोलावणें आवश्यक होतें व त्या वेळचा इतिहास पाहिला तर तेंच शक्य आहे. मोंगलांशीं विजापूरकरांनीं सहकार्य केलें ही गोष्ट तत्कालीन परिस्थितीशीं विसंगत अतएव अनैतिहासिक आहे.

कारणमीमांसेमधील दृष्टिकोण कसा अयोग्य असूं शकतो हें येथपर्यंत दाखविलें. या दृष्टिकोण-भेदामुळें म्हणजेच पूर्वग्रहांवर अवलंबून राहिल्यामुळें वस्तुस्थितीचा उलगडा बरोबर न होऊन एकादे वेळीं केवळ अनुमान धक्क्यावर केलेलें मतप्रदर्शन कसें चुकतें हेंहि याच प्रसंगांत पहावयास मिळतें.

या वेळीं उभय शत्रूंशीं लढावें लागल्यामुळें शिवाजीमहाराजांच्या सैन्याची पांगापांग होऊन उभय युद्धक्षेत्रांत शिवाजीचा पराजय झाला असेंच बहुतेक लोक समजतात. त्याच्या योग्य मर्यादा कोणत्या हें थोडेंसें स्पष्ट करून सांगितलें पाहिजे. शिवाजीमहाराज कितीही मुत्सद्दी असले आणि त्यांनीं कांहीं काळपर्यंत प्रबळ शत्रूंशीं धिटाईनें तोंड दिलें असलें तथापि वास्तविक सामर्थ्य पाहिलें तर मुलूख, सैन्य व संपत्ति या सर्वांहि बाबतींत ते मोंगल व विजापूरकर या दोघांपैकीं कोणाच्याहि पासंगास देखील पुरण्याइतके नव्हते. या प्रकरणांतील हकीकत जेथपासून सुरू झाली त्या वेळचा शिवाजीमहाराजांचा राज्यविस्तार म्हणजे पुणें व जावली हें प्रांत व कोंकणांतील कांहीं मुलूख एवढाच होता. मुलखाचे मानानेंच सैन्य व संपत्ति असणार. संधी साधून उभयतांच्याहि मुलखांत आवाढाव करण्यास त्यांनीं केव्हांहि कमी केलें नाहीं असा जो पूर्वींपासून देखावा दिसतो तो त्या वेळच्या राज्यसत्तांच्या विशेष प्रकारच्या परस्पर संबंधामुळेंच होय. शिवाजीमहाराज हे एक हिंदू संस्थानिक असतां आणि मोंगल व विजापूरकर ह्या उभय राज्यसत्ता धर्माकरितां, स्वार्थाकरितां आणि स्वतःच्या मानाच्या दृष्टीनेंहि स्वाभाविकपणेंच त्यांच्या विरुद्ध असतां त्यांना डोकें वर काढतां कसें आलें याचा खुलासा वर केलाच आहे. तो लक्षांत घेतला म्हणजे मोंगल व आदिलशाही यांच्यामध्यें आपसांत भांडण राहिलें तरच महाराजांचा तरणोपाय होता हें उघड होईल. अर्थात् उभय सत्ता एकरूप होऊं नयेत ह्याचीच काळजी मुख्यतः महाराजांना वहावी लागे. शके १५७९ तील जुन्नर व अहमदनगर ह्या मोंगली मुलखावर स्वारी करीत असतांना ह्या उभय सत्तांचें वैर चालू होतें त्याची हकीकत मागें आलीच आहे. त्यापुढें १५७९ च्या पौषांत औरंगजेब दिल्लीला जाण्यास निघाला तेथपासून १५८१ च्या ज्येष्ठांत तो तख्तनशीन होईपर्यंत म्हणजे शाहिस्तेखानाची दक्षिणच्या सुभ्यावर नेमणूक होईपर्यंत सुमारें दीड वर्ष औरंगजेबाला शिवाजीकडे लक्ष देण्यास फावलें नाहीं. त्याचा फायदा घेऊन, मध्यंतरींच्या तहाच्या भानगडीमुळें धड मोंगलांचाहि नव्हे आणि विजापूरकरांचाहि नव्हे असा कोंकणांतील कल्याण भिवंडीकडील मुलूख शिवाजीनें घेतला. अल्ली आदिलशहानें अफजलखानाला स्वारीवर पाठविलें त्या वेळचें त्याचें भाषण म्हणून शिवभारतानें जे कांहीं विचार प्रकट केले आहेत ते यथार्थ वाटतात. " ह्या

हळू हळू स्वतंत्र होऊन माझा अंमल मुळींच मानीत नाहीं ( अ.१७—श्लो. १३ ); सह्याद्रीच्या आश्रयानें तो दुर्जय झाला आहे; सख्य करण्याच्या इच्छेनें मीं औरंगजेबास जो प्रदेश दिला तो आम्हां दोघांनाहि न जुमानतां त्यानें बलात्कारानें काबीज केला;....तेव्हां हा बलवान् शिवाजी हळू हळू पाऊल पुढें टाकीत आमचें राज्य हिसकावून घेऊन गिळंकृत करणार असें दिसतें " ( श्लो. १३—२९ ).

या कारणांनीं विजापूरकरांनीं त्याचें पारिपत्य करण्याचा केलेला प्रयत्न फसला तोहि अचानक फसला. उभय सत्तांकडून दोन्ही बाजूंनीं वेढलेली आपली जिंदगी वेतसवृत्ति स्वीकारूनच वाढविली पाहिजे हें शिवाजी पूर्णपणें जाणीत होता. आणि शाब्दिक मानापमानाच्या विवंचनेंत न पडतां प्रसंगीं ताबेदारीचीहि भाषा बोलण्यास तो कमी करीत नसे हें वेळोवेळीं घडलेल्या प्रसंगांतून दिसून येतेंच. अशी वस्तुस्थिति असल्यामुळें आपली पुरेशी वाढ होईपर्यंत चढाईचें धोरण न पत्करितां बहुधा संरक्षक धोरणानेंच तो चालत असे. अफजलखानप्रसंगींहि त्यानें केलेली तयारी स्वसंरक्षणार्थ होती याबद्दल मतभेद होईल असें वाटत नाहीं. अफजलावर डाव उलटल्यानंतरची शिवाजीची हालचाल चढाईची अशी वरवर वाटते. परंतु त्या धावणीचे कांहीं फांटे थेट विजापूरपर्यंत भडकले असले तरी तिचा मुख्य मार्ग सह्याद्रीच्या लगत्याला धरून आणि पन्हाळ्यापर्यंतच वाढला होता हें उघड आहे. प्रथम नियुक्त defensive मध्यें अभूतपूर्व यश आल्यामुळें त्याच बेताचें त्यानें offensive defensive मध्यें रूपांतर केलें एवढेंच त्या बाबतींत म्हणतां येण्यासारखें आहे. शिवाजीचें धोरण नीट लक्षांत घेतलें म्हणजे झालेल्या युद्धांतील त्याच्या यशापयशाचें माप घेतां येईल. यापूर्वीं शिवाजीनें दक्षिणेंतील पन्हाळ्याच्या आसपासचे विशाळगड रांगणा वगैरे किल्ले घेण्याचा प्रयत्न केल्याचें कोठें नमूद केलेलें नाहीं. आणि शिवाजी पन्हाळ्यावरून पळून विशाळगडाकडे गेला व तेथें विश्रांतीस्तव राहिला हें सर्वांनाच मान्य आहे. रांगण्याकडे शिवाजी पळून गेला असें मानणाऱ्यांना तोहि किल्ला शिवाजीच्या ताब्यांत आहे असेंच मानावें लागतें. आणि पन्हाळा घेतल्याबरोबर आसपासचे किल्ले घेऊन त्यांचा बंदोबस्त केला असें ग्रॅन्ट डफ बखरींच्या आधारावर मांडतो व डच पत्रांचाही त्याला दुजोरा मिळतो; त्या अर्थीं पन्हाळ्याच्या आसपासचे किल्ले या वेळीं शिवाजीच्या ताब्यांत आले होते असेंच

म्हणणें रास्त आहे. पन्हाळा मात्र विजापूरकरांना घात्रा लागला असें सांगितलें जातें. म्हणजे इतर जिंकलेले सर्व किल्ले शिवाजीच्या हातीं राहिले असाच अर्थ होतो. आणि महाराजांचें अल्प सामर्थ्य पाहिलें म्हणजे कोल्हापूर प्रांतांतील इतर सर्व किल्ले विजापूरकरांना त्यांच्यापासून परत घेतां आलें नाहींत व केवळ पन्हाळ्यावर तृप्त रहावें लागलें ह्या कोणाचा विजय झाला असा प्रश्नच विचारण्याचें कारण रहात नाहीं. पन्हाळ्याच्या युद्धांत शिवाजीचा विजय झाला एवढेंच नव्हे तर चाकणच्या बाजूलाहि त्याचें म्हणण्यासारखें नुकसान झालें नाहीं. शाहिस्तेखानासारखा ‘ प्रति रावण ’ युद्ध करण्यासाठीं आला असून त्याला पुणें प्रांतांतील उघडया मुलखाशिवाय कांहींच हातास लागलें नाहीं; व सिंहगड व पुरंदर हे किल्ले तर त्याच्या सर्व कारकीर्दींत त्याला घेतां आले नाहींत ह्या विषयींचा वृत्तांत पुढें यावयाचा आहे. ताब्यांत असलेला मुलूख हातांतून सोडावा लागणें हेंच कांहीं सर्वत्र यशापयशाचें गमक समजतां यावयाचें नाहीं. शिवाजीसारख्या नवांकुरित संस्थानिकाला सर्व हिंदुस्तानच्या सम्राटाशीं व दक्षिणाधिपती आदिलशाहीशीं लढतांना इच्छित असलेलें सर्वच कांहीं न साधलें तथापि स्वतःच्या सामर्थ्याच्या दृष्टीनें झालेली वाढ हीहि गोष्ट अत्यंत महत्त्वाची असते. सर जदुनाथ सरकार यांच्या म्हणण्याप्रमाणें शिवाजीवर दोन्हीकडूनहि या वेळीं प्रबळ सत्ताधीशांकडून संकटांचा लोट आला असतांनाहि त्याला आपलें डोकें पाण्यावर राखतां आलें आणि थोडयाच वेळांत दोघांनाहि पराजित करतां आलें ही कामगिरी असामान्य असून कोणत्याहि अर्थानें ह्या वेळीं पराजय झाल्याची द्योतक नाहीं असें वाटतें. ही स्फूर्तिदायक हकीकत यापुढें सांगावयाची आहे.

**१५. शाहिस्तेखानाच्या हालचालीः**—मागें सांगितल्याप्रमाणें शाहिस्तेखानाच्या हालचाली सर्वस्वीं मोंगलांच्या राज्यविस्ताराच्या तत्त्वानुसार विजापूरकरांशीं किंवा शिवाजीशींहि जुळतें धोरण न ठेवितां चालू होत्या याचें प्रत्यंतर विजापूरकरांना आतां लवकरच आलें. पुणें प्रांत काबीज करण्यानें थोडा वेळ विजापूरकरांचा अमित्र शिवाजी याला दहशत बसल्यामुळें विजापूरकरांकडील त्याचा दाब थोडासा कमी झाला असला तरी तिकडील मुलूख कायमचा मोंगलांकडे जाण्यांत विजापूरकरांचें कांहींच हित नव्हतें. अद्यापपर्यंत शिवाजीचें स्थान बंडखोराचें असलें तथापि तो विजापूरकरांच्याच राज्यांतील होता हा देखावा

तसाच होता. शाहिस्तेखानानें घेतलेला मुलूख मात्र सध्यां तरी शिवाजी व विजापूरकर या उभयतांना कायमचाच अंतरला.

शाहिस्तेखानानें यापुढें खुद्द विजापुरी मुलखावरच घाला घालण्यास सुरवात केली. 'ईदिलशाही परडें कोट मोंगलांस शास्ताखानाचे मारफतीनें दिल्हे.' असा त्रोटक उल्लेख शकावल्यांत येतो. शिवभारतांत, कहारतलबखानानें, परेंडा ( प्रचंडपूर ) शाहिस्तेखानाला मिळवून दिला अशी माहिती सांगून तो त्यानें 'बलाढ्य गालीबास जिंकल्यामुळें मोंगलांना मिळाला' असा तपशील दिला आहे. हा गालीब पुढें मोगलांकडे नौकरीस असल्याचा प्रत्यक्ष उल्लेख असल्यामुळें या वेळींच तोहि विजापूरकरांची नोकरी सोडून आपण व किल्ला असे दोन्हीहि मोंगलांच्या स्वाधीन झाले असतील. शिवभारतावरून हा किल्ला मोंगल जबरदस्त होते म्हणून त्यांच्या स्वाधीन झाला असें दिसतें. मुसलमानी इतिहासांत ( मासीर–इ–अलमगिरी हिंदी आवृत्ति*) २६ रबिलावल हि. १०७१ (१५८२ कार्तिक व. १३, नोवें. २०, १६६० ) रोजीं सदर किल्ला घेतल्याची नोंद आहे. तीवरून सर जदुनाथ सरकार यांनीं गालीब या विजापुरी सेनापतीला मोठा लांच देऊन तो किल्ला घेतला, परंतु ऐन वेळीं गालीबानें बेइमानी करूं नये म्हणून मोठें सैन्य पुण्याहून रवाना केलें होतें असें म्हटलें आहे, हें खरें असल्यास भारतकाराचें म्हणणें यथायोग्य दिसतें. परंतु अस्सल साधनांतून अधिक माहिती मिळेपर्यंत या त्रोटक उल्लेखांवरून कांहींच कयास बांधतां येण्यासारखा नाहीं.

थोडा अधिक तपशील मिळाला असता तर या गोष्टीचा तत्कालीन राजकारणावर काय परिणाम झाला असावा याचा कांहीं अंदाज करतां आला असता. शके १५७९ मधील औरंगजेबाच्या तहामध्यें परिंडा व त्याखालील मुलूख मोंगलांकडे द्यावे असा ठराव झाला असतां (ले. ७२८) औरंगजेबाला उत्तरेकडे जाणें भाग पडल्यामुळें मीर जुमल्यावर पूर्वींच्या बेबनावाचें खापर फोडून औरंगजेबानें परिंड्याचा किल्ला वगैरे फिरून विजापूरकरांकडेच ठेवण्याचा उदारपणा दर्शविला होता ( ले. ७४४ ). तेव्हां त्यानंतर दुसरी कांहीं घडामोड झाली नसली आणि हाच करार पूर्ववत् कायम असला तर शाहिस्तेखानानें पूर्वींचा सलोखा मोडला असेंच गृहीत धरलें पाहिजे.

* हा संदर्भ बरोबर सांपडला नाहीं. स्मरणानें लिहिला आहे.

शकावलींतील भाषा थोडी संदिग्ध आहे. तथापि भारत व मुसलमानी नोंद या उभयतां संवादी दिसतात त्या खऱ्या समजण्याकडे सहजच मनाचा कल होतो. याच वेळीं विजापूरकर कानडाकडील बंड मोडण्यांत गुंतले होते व अल्ली स्वतःच तिकडे गेला होता ( मो. २०३ ). ही पार्श्वभूमि लक्षांत घेतली म्हणजे शाहिस्तेखानाच्या या उपक्रमाचें खरें रहस्य ध्यानांत येतें.

इकडे विजापूरकरांच्या मुलखावर हें अतिक्रमण चालू असतां शिवाजीच्या मुलखावरहि शाहिस्तेखानाचें अतिक्रमणाचे प्रयत्न चालू होते त्याची बातमी शिवाजीच्या सल्लागारांना होतीच. आणि म्हणूनच मागें सांगितल्याप्रमाणें शिवाजी द्रव्यहरणाची गोष्ट बोलला तेव्हां त्याच्या सल्लागारांनीं शाहिस्तेखानाचा मोर्चा कोंकणाकडे वळण्याचा संभव असल्याबद्दल इशारा दिला. आणि मोंगलांची स्वारी मध्यंतरी न होईल असा बंदोबस्त केल्याशिवाय अन्य बेत व्यर्थ होत असें सुचविलें.

शाहिस्तेखानाचे प्रयत्न फार दूरवर पोंचणारे असे होते. तो फार कसलेला योद्धा आणि प्रवीण मुत्सद्दी असल्यामुळें पुणें प्रांतांत आलेल्या अनुभवाचे बळावर त्यानें ताबडतोब आपलें नक्की धोरण ठरविलें. मराठे डोंगरांच्या आणि किल्ल्यांच्या आश्रयानें आपल्याला दुर्जय होतात हें त्यानें नुकतेंच अनुभविलें होतें. शिवाजीचें पुण्याशिवाय दुसरें आश्रयस्थान कोंकणांत आहे हे त्याला माहीत होतें. तेव्हां कोंकणांत त्याला निराधार करून मग देशावर साफ मारावें असें दूरदर्शी धोरण आंखून त्याप्रमाणें तो हालचाली करूं लागला.

सह्याद्रीच्या आश्रयानें शिवाजीच्या हालचाली होतात याबद्दल त्याला मोठा पेंच पडला. तेव्हां सह्याद्री उतरून कोंकणांतच शिवाजीला अडचणींत आणला पाहिजे अशी शाहिस्तेखानाची कल्पना होती. शिवाजीचें आणि शाहिस्तेखानाचें हे वैर इंग्रजांना देखील चांगलें माहीत असल्यामुळें ते यानंतर त्याचा फायदा घेण्याचा विचार करीत होते. शाहिस्तेखानाला पर्वताखालीं कसें यावें याचीच मुख्य अडचण पडली आहे असेंहि त्यांनीं लिहिलें आहे ( ले. ८४८ पृ. २०० ). शाहिस्तेखान येईपर्यंत इतक्या दूरचा विचार करून कोंकणची काळजी कोणीं केलीच नव्हती असेंच म्हणावें लागतें. देशावरील मुलूख बराचसा सपाट आणि सधन असल्यामुळें मुसलमानी अमदानींत त्याच्याकडेच विशेष लक्ष देण्याचा प्रघात पडला. अल्प

साधनांच्या जोरावर प्रबल सत्तेशीं झगडा करण्याची हिंमत धरणारे पाळेगार लोक आणि शहाजीसारखे उभय शाह्यांना त्रासदायक झालेले पराक्रमी व कर्तबगार सरदार यांनीं मात्र कोंकणांतील दुर्गम स्थळांच्या आश्रयानें आपले डाव चालविले होते. आणि त्याचमुळें त्या प्रांताबद्दल मोंगल आदिकरून सत्तांना अप्रीति किंवा एक प्रकारची भीति वाटत असे. शके १५५८ त शहाजहानानें महमद आदिलशहाशीं तह केला, त्या वेळीं निजामशाहींतील देशावरील कांहीं मुलूख आपल्याकडे ठेवून निजामशाही कोंकण वगैरे आदिलशाहाकडे दिले ! पण फिरून शके १५७९ त तह झाला त्या वेळीं औरंगजेबानें कोंकणसुद्धां सर्व मुलूख घेण्याची तयारी दर्शविली होती. परंतु तो बेत त्यानें शेवटीं अडचणीच्या वेळीं सोडून दिला. तें आतां शाहिस्ते-खान पद्धतशीर रीतीनें घेण्याचा प्रयत्न करीत होता. आजपर्यंत विशेष लक्ष न दिल्यामुळें प्रचलित सत्तेविरुध्द उभारणी करण्यास त्याचा उपयोग चांगला होतो हें आतां त्याच्या लक्षांत आल्यामुळें शिवाजीचीं पाळेंमुळें खणण्याचा जणूं त्यानें उद्योग चालविला होता असें दिसतें.

**१६. उंबरखिंडीचें युद्ध**—शिवाजीच्या कोंकणांतील मुलखांत या वेळीं चौल, कल्याण, भिवंडी, पनवेल आणि नागोठणें इत्यादींचा समावेश होत असे. त्यांवर कारतलबखान नांवाच्या उजबेग सरदाराची शाहिस्तेखानानें योजना केली. यानेंच त्याच्याकरितां परिंडा किल्ला मिळवून दिला होता. त्याचेबरोबर चव्हाण, गाढे, कोकाटे, जाधव इत्यादि मराठे सरदार असून सुप्रसिद्ध स्त्री सेनापती रायबागीण, माहूरच्या उदाजी रामाची विधवा, हीही गेली होती. हें सैन्य पुण्याहून निघून लोहगडच्या दक्षिणोत्तर मार्गानें कोंकणांत येत असतां घांटां-तून एकदम कड्यावरून उतरावें लागतें, त्या अडचणीच्या जागीं अडखळत अडखळत तेथील निबिड अरण्यांत शिरलें.

इकडे शिवाजीनेंहि या सैन्याच्या आगमनाची खबर ठेवून प्रतिकार करण्याची जय्यत तयारी ठेविली होती. सकाळीं तें घाटावरून उतरत असतांना त्याला कोणत्याहि तऱ्हेचा सुगावा लागूं न देतां तें घोर अरण्यांत शिरेपर्यंत त्यानें अडथळा केला नाहीं. "आरंभींच जर आपण ह्या शत्रूस अडविलें तर सैन्यासह तो ह्या अरण्यसागरांत येऊन पडणार नाहीं; असा विचार करून स्वतः समर्थ असतांहि शिवाजीनें कारतलबास तेथें अडविलें नाहीं ( भारत अ. २९, ७४-७५ ). पण एकदां तें सर्व सैन्य उंबर-

खिंडीच्या * निबिड अरण्यांत अडकल्यावर सर्व बाजूंनीं त्याच्यावर शिवाजीनें नेटानें हल्ला चढविला व तोफांचे गोळे व बाण यांचा एकसारखा वर्षाव करून त्याला जेरीस आणिलें. अडचणींत सांपडल्यामुळें मागें किंवा पुढें कोणत्याहि दिशेनें पाय काढून बचाव करणें अशक्य होऊन जागच्या-जागीं सर्व सैन्य गारद होण्याचा दुर्धर प्रसंग ओढवला असें पाहून मध्या-न्हाच्या सुमारास रायबागिणीच्या सांगण्यावरून व स्वतः अनन्यगतिक होऊन सेनापती कारतलबखान यानें शरण येण्याचें बोलणें लाविलें. त्या वेळीं शहाजीचा आपल्यावर लोभ होता इत्यादि वशील्याच्या गोष्टी करून त्यानें आपलें सर्वस्व शिवाजीच्या हवालीं केलें व स्वतःकरितां व सर्व सैन्याकरितां जीवदान मागितलें. शिवाजीनें तें उदारपणानें दिलें आणि मोठी खंडणी देऊन सर्वांनीं आपली सुटका करून घेतली. हें युद्ध माघ शुद्ध १४ शके १५८२ रोजीं झाल्याचें शकावल्यांत लिहिलें आहे. या मितीला लिहिलेला मंगळवार अर्थात् चुकला आहे. पण चतुर्दशी शनिवार व रविवार या दोनहि दिवशीं असल्यामुळें नक्की दिवस या दोहोंपैकीं कोणता तरी एक असला पाहिजे हें उघड आहे (इ. १६६१ फेब्रु. २ अगर ३).

या युद्धाचें वर्णन शिवभारतांत अर्थात् बहारीचें दिलें आहे. तें मुळांतून वाचणें बरें ( अ. २९ ). कारतलबखानाला अभयदान दिल्यानंतर युध्द-तहकुबीची सूचना देण्याकरितां हात वर करून उंच स्वरानें ओरडणाऱ्या भालदारांची केलेली योजना लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

---

* उंबरखिंडीचें हें युद्ध बरोबर कोठें झालें याचा तपास करणें आवश्यक आहे. आम्हीं त्या भागांत जाऊन थोडीशी माहिती मिळविली, तीवरून उंबरखिंड ( उदुंबर खंड ) या नांवाचें गहन अरण्य सदर खिंडीच्या सभोंवार, हल्लीं खोपोली-निफाण-जांबुळ-पाडा अशी सडक जाते तिच्या ( पेण तालुक्यांतून जाणाऱ्या भागाचे ) पूर्वेस अर्ध्या मैलावर उंबरें नांवाचा गांव आहे, त्याच्या जवळ होतें असा सुमार दिसतो. कारतलब-खानाचा कोंकणांत उतरण्याचा रस्ता बरोबर ध्यानांत येत नाहीं. लोहगडच्या दक्षिणोत्तर मार्गानें किंवा देशावरून कसेंहि निघून कोंकणांत यावयाचें तर सामान्य दिशा पूर्वप-श्चिमच असावी लागते. स्थानिक माहिती लक्षांत घेतां वरील उंबरें गांवाच्या आसपास, खंडाळा-लोणावळा इकडे जाणारे, खिंडींतून अडचणीचे असे निदान पांच मार्ग आहेत. मोठें सैन्य उतरावयाचें म्हणजे त्यांतल्यात्यांत उंबरें-चावणी-कुरंडे-लोणावळा हाच मार्ग कारतलबखानानें पत्करला व कोंकणांत पाताळांत म्हणजे अगदीं तळास उतरल्यावर शिवाजीनें त्याच्यावर हल्ला करून त्याला कोंडलें असें म्हणतां येतें.

काहार तलबखानासारख्या प्रबळ सरदाराची आणि त्याबरोबरच 'महाराजांचा कोंकणांतील मुलूख सहज घेऊं' ह्या शाहिस्तेखानाच्या व्यर्थ आशेची वासलात लागली. सह्याद्री हस्तगत करण्याची अडचण अनुभवास येऊन 'हा आपल्या संरक्षणाखालीं असलेला देश दुसऱ्याच्या ताब्यांत जाणार नाहीं.' (भा. २९ श्लो. ३१ ) अशीच जवळ जवळ कबुली शाहिस्तेखानाला द्यावी लागली. आणि तात्पुरता तरी त्याचा विरोध थोडा दबून राहिला. इतकें झाल्यावर महाराजांचा द्रव्यसंपादनाचा पूर्वींचा विचार बळावला आणि पावसाळा येण्यापूर्वीं राहिलेल्या चार महिन्यांचा भरपूर उपयोग करून घेण्याचें त्यांनीं ठरविलें.

पन्हाळगडचा मोबदला विजापूरकरांकडून घ्यावा हाहि त्यांत अंतस्थ हेतु होताच. परंतु राजापूरच्या इंग्रजांनीं पन्हाळ्याच्या वेढ्यामध्यें सिद्दी जौहरला दारूगोळा पुरवून शिवाजीला अडचणींत आणण्याचा प्रयत्न केला त्याचाहि सूड उगविणें अवश्य होतें. या वेळचा लढाईचा बेत व त्याची अमलबजावणी फार त्वरेची, सुटसुटीत आणि स्पष्ट अशी होती. उंबरखिंडीच्या युद्धानंतर महाराजांनीं आपल्या सैन्याचे दोन भाग करून एक नेताजीच्या हाताखालीं मोंगलांच्या बंदोबस्ताकरितां भोरघांटाच्या आसपासच ठेविला आणि त्याला नेहमीं जागरूक राहाण्यास बजाविलें. मोंगलांचा या वेळीं पराजय झाला परंतु ते आपला उद्योग सोडणार नाहींत अशी शिवाजीची कल्पना होती. सैन्याचा दुसरा विभाग आपल्याबरोबर घेऊन मोठ्या पहांटेस उठून त्यानें दक्षिणेकडे कोंकणांत जाण्यासाठीं कुचाचा नगारा वाजविला. नागोठण्यापर्यंतचा मुलूख आधींच ताब्यांत आलेला होता; त्याच्या दक्षिणेकडे ही स्वारी आतां निघाली. या वेळीं आणि पूर्वींहि या मुलखांत विजापूरकरांचा बंदोबस्त सरकारी असा अगदीं अल्प असून इकडील मुलूख बहुतेक स्वतंत्र राजे म्हणवून मुसलमानी-सत्तेशीं मांडलीकत्वानें रहाणाऱ्या संस्थानिकांच्याच ताब्यांत होता. यामुळें आणि प्रस्तुत विजापूरकरांचें सर्व सैन्य पूर्वींच सांगितल्याप्रमाणें कानड्यांतील बंडें मोडण्यांत गुंतलें असल्यामुळें कोंकणपट्टी मोकळी सांपडली आणि अल्पावधींत शिवाजी दाभोळपर्यंत येऊं शकला. वाटेंतील नगरें, गांवें, गड व अरण्यें शत्रूंनीं विरोध न करितांच सोडून दिलीं. उंबरखिंडीमध्यें मोंगलांची नुकतीच झालेली अवस्था त्यांच्या नजरेसमोर ताजीच होती ! या वेळीं केवळ दहशतीनेंच कांहीं कार्य झालें असेल तेवढेंच. आणि

तेंहि थोडें झालें नसावें. परंतु मुलूख जिंकीत बसण्यांत शिवाजीनें वेळ घाल-विला नसावा असें वाटतें. कारण त्वरा करून त्याला एकदांचें राजापूर गांठावयाचें होतें.

वाटेंत दाभोळ येथील श्रीदाल्भ्येश्वर या क्षेत्राचें त्यानें दर्शन घेतलें. शिवाजीचें सैन्य त्याच्या मुलखांतून जात असतां पल्लीवनाचा राजा जसवंत ह्या आपण पूर्वी जौहरास मदत करून ( भारत अ. २७ श्लो. २७ ) शिवाजीला विरोध केला हें आठवून घाबरून गेला आणि शृंगारपूरच्या सूर्यरावाच्या आश्रयाला गेला. त्या दोघांकडेहि या वेळीं दुर्लक्ष करून मात्र प्रसंग पडल्यास उपयोगी पडावें म्हणून दाभोळास त्यानें २००० सैन्य ठेवून दिलें. वाटेंत चिपळूणच्या श्रीपरशुरामाचें दर्शन घेऊन पुढें जाणार तों संगमेश्वराचें ठाणें मुसलमान अधिकाऱ्यांनीं आपोआप सोडून दिल्याचें कळल्यामुळें तेथें जाण्यांत वेळ न मोडतां शिवाजीनें एकदम देवरूख गांठलें. आणि तेथून पिलाजी नीळकंठराव नांवाचा ब्राम्हण अधिकारी व इतिहासांत पुढें कोंडाण्याच्या वेढ्यांत प्रसिद्धीस आलेला नरवीर तानाजी मालुसरे असा दोघांची संगमेश्वरच्या ठाण्यावर योजना केली. ह्या सैन्याशीं स्नेहानें वागण्याबद्दल श्रृंगारपूरच्या राजास कळवून शिवाजी तसाच पुढील मुलूख व्यापीत राजापुरास येऊन दाखल झाला.

डंबरखिंडींतून माघ वद्यांत निघून शिवाजी फाल्गुन वद्य पक्षांत राजापुरास येऊन पोंचला असावा. एकदोन क्षेत्रांचें दर्शन, ठाणीं वसविणें वगैरे बंदोबस्ताचीं कामें करणें इत्यादि गोष्टींमुळें सुमारें महिन्याचा काळ मध्यंतरीं जाणें अशक्य नाहीं. राजापूरच्या लुटीचा काळ डच पत्रांत मार्च मध्य असाच दिला आहे ( ले. ८५२ ) तो बरोबर आहे. राजापुरावर या वेळीं शिवाजी १००० घोडदळ व ३००० पायदळ घेऊन आला होता. मित्रत्वानें नगरांत प्रवेश करण्याचा आविर्भाव आणून शिवाजीनें विश्वासघात करून गांवच्या संपत्तीची लूट केली असें डच लेखकांनीं लिहिलें आहे. इंग्रजांचें खुद्द या प्रसंगाची माहिती देणारें पत्र नाहीं ही फार मोठी उणीव* आहे. यामुळें डाग-

* नाहीं म्हणावयाला इस्कालियटनें सुरतेहून ३ वर्षांनंतर लिहिलेल्या पत्रांत अगदीं त्रोटक वृत्तांत दिला आहे. त्यानें इंग्रजांच्या माहितीवरून दिलेलीं १।२ वाक्यें डाग रजिस्टरशीं जमतीं अशींच आहेत ( पहा ले. ८७५ ), १५८४ फाल्गुन वा ६ (१८।२।६३) रोजीं राजापूरच्या कैद्यांचे सुटकेनंतरचें राजापुराहून पत्र लिहिलें आहे, त्यांत झालेल्या

रजिस्टरवरच या प्रसंगापुरतें तरी अवलंबून रहावें लागतें. परंतु तत्कालीन परिस्थिती किंवा पद्धती माहीत नसणारांना म्हणजे डचांसारख्या परस्थांना ज्यांचें नुकसान झालेलें दिसतें त्यांच्याबद्दल सहानुभूती वाटणें साहजिक असल्यामुळें त्यांच्या लिखाणाचा रोख शिवाजीविरुद्ध असणें अपरिहार्य आहे. तेथील रिवाजाप्रमाणें शहरांतील प्रमुख मंडळींना बोलावून आणून शिवाजीनें शहरांत प्रवेश केला व तेथील नागरिकांना तोशीस न देण्याचें वचन दिलें. ते भोळे लोक मनांत संशय न आणितां भेटीस गेले. त्यांतच रेसिडेंट रेव्हिंगटन व दोन तीन इंग्रज गेले होते. लगेच त्या सर्वांना पकडून त्यांचा छळ करून जिंदगी जप्त करण्यांत आली. हें विधान शब्दशः खरें आहे, परंतु त्यांत थोडी भर घातली पाहिजे. खंडणी वसूल करण्याकरितां म्हणून एकादें सैन्य येतें तेव्हां पुढाऱ्यांना बोलावून खंडणीचा करार करून घेण्याची त्या वेळीं पद्धतीच होती. तो करार पुरा झाल्यास अर्थातच छळ करण्याचें कारण नाहींसें होई. व्यापारी वर्गावर कांहीं खंडणी आली असेल ती देण्याची लोभी व्यापाऱ्यांनीं व विशेषतः इंग्रजांनीं टाळाटाळी करून शिवाजीच्या क्रोधाला आपला बळी दिला असेल. समोरासमोर गांठ पडल्यावर पन्हाळाप्रकरणीं बोलाचाली होऊनहि इंग्रजांवर कैदेची व लुटीची आपत्ती ओढवली असेल. वर उल्लेखिलेल्या डचांच्या हकीकतींत तो संबंध सुचविलाच आहे. खुद्द सुरतेचा प्रेसिडेंट अँड्रूज ह्यानेंच रेव्हिंगटनप्रभृतींना त्याबद्दल उघड ठपका देऊन तुम्हीं त्याबद्दलच कैद भोगीत आहां असें बजाविलें ( ले. ८७४ )आहे. या वेळीं महाराजांचा क्रोध अनावर झाला होता. त्यानीं द्रव्य शोधण्याकरितां इंग्रजांची वखार समूळ खणून काढिली असें डचांप्रमाणेंच शिवभारताचेंहि म्हणणें आहे ( भा. अ. ३० श्लो. ६ ). यावरून अगदीं बारीक सारीक तपशीलांतहि शिवभारत कसें अचूक आहे हें समजून येईल.

केवळ इंग्रजांचेंच द्रव्य या वेळीं लुटलें गेलें असें नाहीं. मुख्य डोळा अर्थात् त्यांच्यावरच होता. तथापि फिरंगी म्हणजे पोर्तुगीज वगैरे इतर पाश्चात्य

---

नुकसानीचा इंग्रजांच्या मतें अंदाज दिला आहे. " राजापुरांत २३।२४ हजार होनांची लूट झाली व २ माणसें दगावलीं " ( ले. ९१८ ). इंग्रजांच्या ह्या आंकड्याला धरबंधच नाहीं. सोनमडच्या पत्रांत तेच १२००० होन असा अंदाज देतात ( पृ. २०१ ). पुढें वाघ तह होण्याच्या वेळीं झालेली भानगड यानंतरच्या सविस्तर अस्सल पत्रांतच आली आहे. पत्रसारसंग्रहांतील तीं पत्रें वाचनीय आहेत.

लोक व त्यांच्या बरोबरच मलबारी व अरबी इत्यादि व्यापाऱ्यांनाहि शिवाजीला खंडणी द्यावी लागली असें शि. भा. म्हणतें. कोणी मांडलीकहि त्या वेळींच सांपडले असें त्यांत लिहिलें आहे. डच पत्रांत जणूं त्या श्लोकांचें भाषांतरच दिलें आहे ! " इराण व मस्कतचे व्यापारी आपला माल घेऊन दरसाल राजापूरला विक्री करण्याकरितां येतात व काम होतांच परत जातात त्यांचीहि लूट झाली. कोणा एका राजानें व कांहीं लोकांनीं विरोध करण्याची तयारी केली होती. परंतु शिवाजीचे लोक आधींच निघून गेले. " ( भा. ३० श्लोक १-४ ची ले. ८५२ शीं तुलना करून पहाण्यासारखी आहे. ). या प्रसंगीं इंग्रजांबरोबर इतर व्यापारीहि शिवाजीनें कैद केले होते ( ले. ८४८ पृ. १९९ ).*

राजापूरपर्यंतचा मुलुख महाराजांनीं व्यापला तो कायदेशीर रीतीनें बोलावयाचें म्हणजे विजापूरकरांच्या राज्यापैकीं होता. अर्थात् विजापूरकरांना या अत्याचाराबद्दल प्रतिकार करणें भाग होतें. या वेळीं अली आदिलशहा मागें सांगितल्याप्रमाणें दुसरीकडे गुंतला होता. त्याला स्वतः किंवा त्याच्या बरोबरच्या सरदारांना कोंकणांत येणें शक्य नव्हतें. तेव्हां त्यांनीं शृंगारपूरचा राजा सूर्यराव याची शिवाजीविरुद्ध उठावणी केली. इतर सरदारांना सोडून सूर्याजीरावावरच ह्या स्वारीचा भार पडण्याचें कारण वर दिलें आहे तेंच वास्तविक खरें आहे. शिवभारतांत 'रुस्तुमादि पराभूत झालेले सरदार त्याच्याशीं लढूं शकणार नाहींत असा मनांत विचार करून अरण्याचा माहितगार आणि शिवाजीच्या डोंगरी लढाईचा ज्ञाता म्हणून त्याची योजना केली' असें लिहिलें आहे, तेंहि विचारांत घेण्यासारखें आहे. विजापूरकरांच्या इशारतीप्रमाणें गनीमी पद्धतीला अनुसरून सूर्याजीरावानें भर मध्यरात्रीं शिवाजीच्या संगमेश्वरीं ठेविलेल्या सैन्याला वेढा घातला आणि तें बेसावध सांपडेल अशा विश्वासानें कत्तलीला सुरवात केली. सामान्य

---

* या वेळच्या इंग्रजांचे व शिवाजीचे संबंध अस्सल इंग्रजी पत्रांच्या आधारावरून डॉ. बाळकृष्ण यांच्या 'Shivaji the great' ह्या पुस्तकांत सविस्तर यावयाचे असल्यामुळें येथें त्यांचा उल्लेख विशेष केला जाणार नाहीं. परंतु इंग्रजांशीं मधून-मधून बोलणें चालू होतें, तेव्हां दंडाराजपूर घेण्याबद्दल शिवाजीनें इंग्रजांकडे मदत मागितल्याचें त्यांनीं लिहिलें आहे. यावरून देशावर तूर्त कांहीं कारवाई न करितां कोंकणपट्टी संपूर्ण हातीं घेण्याचा शिवाजीचा विचार झाला असावा असें वाटतें.

सेनापतीची या वेळीं गाळणच उडावयाची. त्याप्रमाणें पिलाजी नीळकंठराव गर्भगळित होऊन पळ काढण्याच्या विचारास लागला. परंतु त्याचा जोडीदार तानाजी मालुसरे हा निधडया छातीचा वीर असून प्रसंगावधानी होता. त्यानें एका बाजूनें आयत्या वेळीं हातपाय गाळणाऱ्या सहकाऱ्याला धीर देण्याचें व दुसऱ्या बाजूनें सैन्य आवरून शत्रूचा हल्ला परतविण्याचें काम अलौकिक धिटाईनें पार पाडलें. पिलाजी नीलकंठाचें गलित झालेलें धैर्य हितोपदेशानें ताळ्यावर येत नाहीं असें पाहून त्यानें पळून जाऊं नये म्हणून त्याला दोरखंडांनीं एका दगडास पक्कें बांधून ठेवून, आपलें असामान्य सामर्थ्य प्रकट केलें. सर्व सैन्यामध्यें वीरश्री संचारली आणि थोडया वेळापूर्वी मराठयांचें नशीब फिरलें असें वाटत होतें त्या ठिकाणीं मराठयांना विजयश्रीनें माळ घातली. चार पांच तास घन-घोर युद्ध होऊन सूर्याजीरावाचें सैन्य उजाडण्याच्या सुमारास नामोहरम होऊन परत फिरलें. आणि पुन: शिवाजीच्या वाटेस गेलें नाहीं. हें युद्ध झाल्याची मिती उपलब्ध नाहीं. तथापि शके १५८३ च्या चैत्र शुद्धामध्यें बहुधा केव्हां तरी तें झालें असावें. हें युद्ध झाल्याची बातमी शिवाजीला राजापुरासच कळली असावी. तेथें थोडा बहुत बंदोबस्त करून तो त्वरितच संगमेश्वराकडे आला. व तेथील हकीकत समजून घेऊन तानाजीचें त्यानें यथोचित अभिनंदन केलें. परंतु सूर्याजीरावाच्या ह्या बेमानीबद्दल अत्यंत संतप्त होऊन त्याला शेवटची संधी देण्याकरितां म्हणून तावडतोब दूताकरवीं असें कळविलें कीं ‘ जरी तुझ्या अपराधामुळें मला राग आला आहे तरी तुला एक वार माफी केली आहे; मात्र यापुढें असा विरोध करूं नको. लवकरच मी पल्लीवनाचें राज्य घेणार आहें, तेथील राजा तुझ्या आश्रयाला आला आहे, त्याची फिकीर न करितां तें राज्य घेण्यास मला मदत करण्यासाठीं एकदम मजकडे निघून ये, मीं आतां तिकडेच जात आहें.” शृंगारपूरच्या राजाला या निरोपामुळें ‘ इकडे आड, तिकडे विहीर ’ असें होऊन गेलें. शिवाजीच्या निरोपाचा सरळ अर्थच असा होता कीं, सूर्याजीरावानें विजापूरकरांचा ताबा आणि जसवंतराव आदिकरून शिवाजी–विरोधकांचा स्नेह सोडून शिवाजीचें मांडलिकत्व पत्करावें. परंतु ही गोष्ट त्या मानी राजाला विशेषत: या प्रसंगीं मान्य होण्यासारखी नव्हती. आपण केलेला विश्वासघात स्मरून त्यापेक्षां त्यानें राज्यत्यागच पत्करला.

शृंगारपूरकर मदतीला आले नाहींत म्हणून शिवाजी अडून न बसतां थेट पल्लीवनावर चालून गेला आणि त्यानें तो प्रांत लगोलग आपल्या अमलाखालीं आणिला. आणि त्याच्या बंदोबस्ताकरितां म्हणून 'चिरदुर्ग' नांवाच्या प्रख्यात किल्ल्याची थोडी दुरुस्ती करून त्याला 'मंडनगड' * हें नांव दिलें व तेथें गडकरी वगैरे नेमून लगेच तो शृंगारपूरच्या राजाचें पारिपत्य करण्याच्या उद्योगास लागला. पंधरा हजार पायदळ घेऊन शिवाजी गुप्तपणें शृंगारपुरावर चालून आल्याची बातमी कळतांच इष्टमित्रांनीं त्याचा त्याग केल्यामुळें नाइलाजानें आपलें राज्य सोडून शृंगारपूरचा राजा पळाला. आणि अनायासानें प्रभावलीचें राज्य शिवाजीच्या हातीं येऊन कोंकणांतील स्वारीचा असा यशस्वी शेवट झाला.

शृंगारपूरच्या राजाच्या बाबतींत वागतांना शिवाजीनें दाखविलेलें धोरण विशेष सामोपचाराचें व फार दूरदर्शीपणाचें दिसून येतें. अगदीं आरंभापासूनच संगमेश्वरास सैन्याचें ठाणें ठेवून तें त्याच्या सपूर्द करणें, नंतर त्यानें विश्वासघात करून शिवाजीच्या सैन्यावर मध्यरात्रीं छापा घातला असतांनाहि एकदम पारिपत्य करण्याची घाई न करितां फिरून एकवार त्याला संधी देणें, ह्या गोष्टी पाहिल्या म्हणजे शिवाजी फार सावधगिरीनें वागत होता असें दिसतें. ह्याचें राजकारणी तत्त्व असें होतें कीं, 'समर्थ अशा स्वजातियांना शक्य तोंपर्यंत न दुखवितां आपल्याकडे वळवून घ्यावयाचें आणि कामाला लावावयाचें. शक्य तोंपर्यंत कोणाशींहि तोडावयाचें नाहीं. फारच नाइलाज झाला तर मात्र दंडाचा अवलंब करावयाचा. निष्कारण रक्तपात अगर वैर होऊं द्यावयाचें नाहीं.' शिवभारतकारालाहि या सहज लक्षांत येणाऱ्या तडजोडीच्या धोरणाची मीमांसा करावीशी वाटली. त्यानें वर दर्शविलेल्या राजधोरणाची दृष्टी न धरितां शिवाजीचें हें वर्तन केवळ पूर्ववचनावर अवलंबून असल्याचें सांगितलें आहे. सूर्याजीराव हा पुरातन

---

* पल्लीवन याचा अर्थ शिवभारता ( श्री. दिवेकर )मध्यें पाली असा केलेला आहे. पाली हें नागोठण्याजवळ असून तें आधींच शिवाजीच्या ताब्यांत होतें असें दिसतें. मंडनगड किल्ला ज्या प्रांतांत असूं शकेल तो प्रांत वरील पालीपासून दक्षिणेकडे बराच दूर असला पाहिजे हें उघड आहे. तो नव्यानें जिंकावयाचा होता व शृंगारपूरनजीक असला पाहिजे, इत्यादि गोष्टी लक्षांत घेतल्या म्हणजे सर जदुनाथ सरकार म्हणतात त्याप्रमाणें पल्लीवन म्हणजे हल्लींचें 'पालवण' असावें असेंच वाटतें ( सर. शिवाजी पृ. ८४ टीप ).

आणि सामर्थ्यवान् राजा असून ( भा. ३१, ४६-५१ ) शिवाजीनें चंद्रराव मोऱ्याचें राज्य घेतलें तेव्हां त्यानें आपल्यावर चालून येऊं नये म्हणून सूर्याजीरावानें शिवाजीचे आपण ' क्रीतपुत्र ' आहों असें शरणागतीचें बोलणें लाविलें होतें. व त्याप्रमाणें शिवाजीला अनेक युद्धांत साहाय्यहि केलें होतें. पण पुढें शिवाजी अडचणींत सांपडला असतां विशाळगडच्या वेढयांत पल्लीवनाच्या जसवंताप्रमाणें यानेंहि विजापूरकरांना उघडपणें आणि गुप्त रीतीनें शिवाजीविरुद्ध मदत केली. यावेळीं तर शिवाजीच्या बेसावध सैन्यावर शत्रुबुद्धीनें छापा घातल्यामुळें त्याच्या अपराधांचे घडे भरले आणि शिवाजीनें त्याचें राज्य जिंकून घेतलें. सूर्यराव एवढा प्रबळ असतांना शिवाजीसमोरून त्याला पळून जावें लागलें ही परिस्थिती आणण्यांत शिवाजीचे धोरणाचाच विजय दिसून येतो. प्रथम मूळ गड्ड्याला हात न घालतां सभोंवारचीं लहानसान राज्यें जिंकून घेऊन, सर्व प्रांतावर आपला दरारा बसवून, त्यानें शृंगारपूरकरांना कोणीं मदत करणार नाहीं अशी परिस्थिति हळूहळू निर्माण करून मग शृंगारपुरावर स्वारी चढविली. आणि त्या वेळीं कोणींच मदतीला येण्यास न राहिल्यामुळें सूर्याजीरावाला पळून जावें लागलें ( अ. ३१ श्लो. ५४-५५ ). राजानें शृंगारपूर घेतल्याची मिती शके १५८३ वैशाख शुद्ध ११ सोमवार ( ता. २९ एप्रिल १६६१ ) अशी शकावल्यांनीं दिली आहे. यानंतर महाराजांनीं सर्व प्रभावली प्रांत जिंकून आपल्या राज्यास जोडिला. यावेळीं ग्रीष्म ऋतु होता असें शिवभारतानें म्हटलें आहे तें वरील मितीशीं जुळतें असेंच आहे.

तळकोंकणच्या स्वारीचा इतका तपशील शिवभारताशिवाय अन्यत्र सांपडत नाहीं. मितीचा निश्चय फक्त शकावल्यांवरूनच बरोबर होतो. सभासदानें ' शृंगारपूरला सुर्वे राज्य करीत होते, ते पळोन देशांतरास गेले. त्यांचे कारभारी शिर्के होते त्यांशीं भेद करून राज्य हस्तगत केलें ( सभा. ७ )' असा तपशील दिला आहे. परंतु जावली-प्रसंगानंतर व अफजल-प्रसंगाचे आधीं हें युद्ध घातल्यामुळें सर जदुनाथ सरकार यांनींहि त्याचें म्हणणें गृहीत धरून तसेंच लिहिलें होतें (दुसरी आवृत्ती पृ. ५०). इंग्रजी पत्रांवरून या स्वारीबद्दल थोडा खुलासा मिळतो. सोनगडावर राजापूरच्या वखारींतील कैदी ठेविले होते. त्यांनीं १५८३ ज्येष्ठांत लिहिलेल्या पत्रांत (ले. ८४८) 'नुकतेंच दळवी राजा आणि शृंगारपूरचा राजा अशा दोघांचा मोड करून

शिवाजीनें आपल्या ताब्यांतील मुलूख वाढवून चांगला बंदोबस्त केला आहे' असें लिहिलें आहे. शिवापूर दप्तरांतील यादींत 'दळवी होते' असें आहे. या पत्रांतहि ' दळवी राजा ' असा स्वतंत्र उल्लेख येतो. तरी 'दळवी' हे कोण होते याचा तपास करण्यासारखा आहे. कदाचित् पल्लीवनाहून पळून गेलेला जसवंतराव हा दळवी असून तोहि सूर्याजीरावाबरोबर होता असें वरील संदर्भावरून म्हणतां येण्यासारखें आहे. परंतु त्याला प्रत्यंतर पुरावा पाहिजे. 'सिवाजीनें प्रभावलीकर हरजी राजे व सूर्याजी यासी मारून चालविले. श्रीगारपुराहून ते लखम सावंता....सी आले सन इहिदेमधें' (ले. ८४३) या टिपणांतील सुहूरसन बरोबर असल्यामुळें शृंगारपुराहून पळालेले सुर्वे खालीं सावंतांकडे गेले असा ध्वनि यांत दिसतो, त्याचा विचार करणें भाग पडतें. परंतु, एवढयाच आधारावरून तसें नक्की विधान करतां येत नाहीं. तळकोंकणच्या स्वारीबद्दल मराठी अस्सल पत्रांतूनहि अर्थात् दुजोरा मिळतो. ले. ८५७, ८७१ व ले. ८८७ हे अनुक्रमें श. १५८३ श्रावण व. ३ (३।८।६१), माघ व. १२ ( २१-१-६२) व १५८४ वैशाख शु. १३ (२१-४-६२ ) या तारखांचे असून त्यांमध्यें ' हाली तलकोकण साहेबास अर्जान झाले ', ' हाली महाराजास तलकोकण अर्जानी जाहाले' व 'सालगुदस्त तलकोंकण व मुलकाची कबजादत बदल खासा स्वारी तल कोकणात होउनु मुल्क कबज जाहाला ते वक्ती शृंगारपूरकर सुर्वे व कोंकणांतील पातशाई अमलदार याणी बेमानी केली ते नतीजा पोहचोन उधलेन गेले ' अशी वस्तुस्थिति वर्णन केली आहे. तीवरून शिवभारतांतील प्रत्येक विधानाला साधार दृढीकरण मिळतें. शिवाजीनें त्र्यंबक भास्करास प्रभावली प्रांताचा अधिकारी नेमिलें असें शि. भा. त (अ. ३२-२) सांगितलें असतां वरील तिन्ही लेखांकांत पिलाजी नीलकंठराव सुभेदार नामजाद मामले प्रभावली असा उल्लेख आहे, हें थोडेंसें विसंगत दिसतें. तरी राजव्यवहारकोशामध्यें लष्करी व मुलकी अशा दोन अधिकाऱ्यांचे वर्ग सुचविले आहेत (प्रदीप पृ. १७०व १५९*) त्याप्रमाणें पहातां पिलाजी नीळकंठराव व

* सुभेदारस्तु देशाधिकारीति परिभाषितः । जनपदवर्ग, श्लो. ३२९ हा मुल्की अधिकारी असुन तत्रत्यस्तु सुभेदारः पदात्यध्यक्ष ईरितः । सामन्तवर्ग, श्लो. १८३ हा उघड लष्करी सुभेदार आहे.

त्र्यंबक भास्कर ह्या उभयतांनाहि अधिकार मिळणें शक्य वाटतें. त्र्यंबक भास्कर हा उघडपणें सैन्याधिकारी होताच. पिलाजी नीलकंठराव लष्करी-दृष्ट्या निकामी असल्याचें प्रत्यंतर संगमेश्वरच्या छाप्यांत आलेंच होतें. तेव्हां वरील दोन प्रकाराचे अधिकार गृहीत धरल्यानंतर अधिकारविभागणी कशी झाली असेल हें सहज लक्षांत येईल.

ताब्यांत आलेल्या प्रांतामध्यें सुव्यवस्था नांदण्याच्या दृष्टीनें अधिकाऱ्यांची नेमणूक करूनच शिवाजी थांबला असें नाहीं. जो मुलूख हातीं येत होता त्यांतील प्रजा इतर सर्व मुलखाप्रमाणें हिंदु धर्माची होती. स्वधर्मी राजा असण्यांत जो आनंद असतो तो आजपर्यंत त्यांच्या नशिबीं आलेला नव्हता. आणि शिवाजी येऊन दाल्भ्येश्वराचे दर्शनाला भक्तिभावानें जातो, परशुरामाचें दर्शन घेऊन ब्रह्मवृंदाला दक्षिणा देतो, देवता व इतर नागरिक ह्यांची आस्थेनें व्यवस्था करितो, आपल्यामध्यें मिसळूं शकतो, हें पाहून सर्वांना आपलेपणा उत्पन्न होऊन यवनसंपर्कानें त्रस्त झालेला हा देश आतां पुनः मुक्त झाला अशी सर्वांची कल्पना झाली व शिवाजीबद्दल सर्व प्रजाजन प्रेमयुक्त झाले ( भा. अ.२९, श्लो. ६८, अ. ३० श्लो. १०). नंवीन जिंकलेल्या मुलखांत अशा तऱ्हेची प्रथमच अनुकूलता उत्पन्न करणें अत्यंत जरूर असतें. नानातऱ्हेचे शिल्पकार हे तर प्रांतांतील संपत्तीचे उत्पादक. त्यांची मनधरणी होऊन ते सुवर्त्तेत नांदले तरच प्रांताची खरी नांदणूक झाली असें समजावयाचें. तिकडेहि शिवाजीनें लक्ष देऊन जो आपला झाला त्या प्रांताची भरपूर भरभराट व्हावी असा उपक्रम सर्वांना आश्वासन देऊन केला ( अ. ३१ श्लो. १७–२३ ). शिवाजी उत्तम प्रजापालक राजा होता.

**१७. शिवाजीमहाराज आणि वतनदार**—शिवाजीमहाराजांनीं पूर्वापार चालत असलेलीं वतनें अनामत करून त्यांचे हक्कांबद्दल नगदी रकमा देण्याचा प्रघात पाडला ही गोष्ट इतिहासप्रसिद्ध आहे. याचें प्रत्यंतर प्रमाण म्हणून खुद्द शिवाजीची कारकीर्द चालू झाल्यानंतर पाहिलें तर शिवाजीनें दिलेलीं नवीन वतनाबद्दलचीं पत्रें मुळींच सांपडत नाहींत हें होय. त्यांच्या राज्याचा मामला थाटत चालल्यानंतर त्यांनीं हिशेब व राज्यव्यवस्था सर्वत्र ठेविण्याचा उपक्रम केला एवढेंच नव्हे तर त्यांच्या मतानें वतनदारांचा ऐदी व बखेडेखोर वर्गच आपल्या राज्यांत नामशेष

कसा होईल याची विवंचना बाळगून पद्धतशीरपणें त्यांचें उच्चाटन चालविलें. शृंगारपूरचें राज्य हातीं आल्यानंतर त्यांनीं प्रभावळी मामल्याची व्यवस्था केली. त्यांतील जीं पत्रें उपलब्ध आहेत त्यांवरून शिवाजीचें हें धोरण जितकें सर्वग्राही तितकेंच निरपवाद होतें असें म्हणावें लागतें. ले. ८५७ मध्यें यासंबंधींचा तपशील आलेला आहे. 'साहेबास तळकोकण अर्जान झाले....दिवाणांतून सारी वतनें अमानत जाहाली' आणि त्यांपैकीं माझ्या वतनाबद्दल 'साहेबी मामले मज. २००० लाहारी देण्याची सनद दिली' असें वतनदार सांगतो. याचा अर्थ उघड आहे. फिरून ले. ८८७ मध्यें 'सरदेशमुखीचें वतन पिढी दरपिढी सालगुदस्तपावेतों चालत आलें.' असें आहे. शिवाजीमहाराजांच्या ताब्यांत तलकोकण आल्यापासून महाराजांनीं सर्व वतनदारांना कौल सादर केले, म्हणजे वतनें चालविण्या-बद्दलचीं आश्वासनेंहि दिलीं. म्हणजे हक्क मान्य केले. परंतु त्या हक्कांबद्दल प्रजेशीं कांहीं संबंध न ठेवितां थेट सरकारांतून नगद देण्याचा प्रघात पाडला. 'दिवाणांतून सारीं वतनें अमानत जालीं' त्यानंतर फेर विचार करून हे हक्क मामल्यांच्या जमाबंदीवर वसूल करण्याची परवानगी मिळाली. सरकार तिजोरींतून वतन बाबे रकम देण्याचा प्रघात महाराजांनीं फार पूर्वींपासून अमलांत आणिला असावा. शके १५७५ तील जिजाबाईसाहेबांच्या लेखांतील वतन अमानत करण्याचा उल्लेख कांहीं स्पष्ट तपशीलाच्या अभावीं मामुली तऱ्हेचा मानण्याचें कोणीं ठरविल्यास आक्षेप घेतां येणार नाहीं. परंतु त्या सुमारास किंवा थोडें आधींहि महाराजांचें त्या बाबतींतील धोरण ठरून गेलें असल्यास नवल नाहीं.

१५८२ मार्गशीर्ष व. ११ चा सरंजामी वटहुकूम (खंड ८ ले. ११), हा या प्रश्नावर प्रकाश पाडणारा आहे. त्यांतील मजकूर असा आहे:— 'पुणें, व इंदापूर व चाकण, सुपें, बारामती ऐसे इनाम हिंदु व मुसलमान यांसीं इनाम आहेत. त्यास पेसजी आपणास मुकासा असतां, अफजलखान आधीं जेणेंप्रमाणें तसलमती ज्यास जें पावत असेल त्यास तेणेंप्रमाणें देणें. ऐसा तह केला असे' (ले. ८३७). अफजलखानाच्या आधीं महाराजांना वरील परगण्यांचे मोकासे किंवा मोकासेवजा अधिकार शके १५६७-६८ पासूनच होते याबद्दल विवेचन मागें आलेंच आहे. (शिवाय ले.५१०,५१८, ५२०,५२९-३४-३५, ५४२, ५४५, ५५१ हे सर्व त्याबद्दल आधार

आहेत ). तेव्हां तेथपासूनच हें धोरण महाराजांनीं स्वीकारिलें होतें असें दिसतें. या वेळीं पुणें, इंदापूर वगैरे परगणे मोंगलांच्या ताब्यांत गेले असतां शिवाजी मागच्याप्रमाणेंच वतनें व इनामें चालवूं असें म्हणतो त्याअर्थी त्यासंबंधीं प्रजेकडून वसूल करण्याच्या हक्काबद्दल तो बोलत नसून नगदी रकमा पोंचविण्याबद्दल बोलत असावा हें उघड आहे. प्रांत दुसऱ्याकडे गेला तरी नगदी रकमा खजिन्यांतून देण्याचा हा प्रकार शिवाजीला करण्याचें कारणहि सहज लक्षांत येईल. प्रांत ताब्यांतून गेला म्हणजे वतनाची आवड असणारे भाबडे लोक वतनाच्या आशेनें शत्रूकडे मिळून तितका स्वराज्याचा आब कमी होईल हें लक्षांत घेऊनच ती आपत्ती टाळण्याकरितां महाराजांनीं ह्या लोकांचीं वतनें व इनामें राखण्याचें म्हणजे खजिन्यांतून देण्याचें कबूल केलें. ही जबाबदारी फार मोठी होती. स्वार्थी लोकांची निष्ठा कायम राखण्यासाठीं इतर प्रांतांच्या वसुलांतून ही रकम भरण्याचें कबूल केल्यानें द्रव्याचा अभाव महाराजांना जाणवला व त्याबद्दल अन्यत्र वर्णन केल्याप्रमाणें त्यांना द्रव्यार्जनाकरितां स्वारी काढावी लागली.

ही पद्धति मराठ्यांचें राज्य प्रबळ आणि त्या मानानें पुरेसें सधन असेतोंपर्यंत चालली हेंहि आपल्याला माहीत आहे. राजारामाच्या वेळीं मराठी खजिन्यांत पराकाष्ठेचा खडखडाट झाल्यानंतर केंद्रसत्तेनें घेतलेली ही जबाबदारी सामर्थ्याच्या बाहेरची म्हणून सोडावी लागली आणि आपोआप पूर्वपदावर यावें लागलें. घालमेलीच्या काळांतील नगदी रकमा प्रांत हातचा गेल्यावर देण्याचें साधन राहिलें नाहीं. एवढेंच नव्हे तर चालू खर्च भागण्याची भ्रांत पडूं लागली. आणि ओरडणाऱ्या मागणीदारांच्या विनंत्यांना कंटाळून पूर्वींची सुलभ पद्धति राजारामाला स्वीकारावी लागली. असो.

**१८. विजापूर दरबारांतील चलबिचल**—अली अदिलशाहाशीं मागें सांगितलेलें सामोपचाराचें धोरण पत्करून शिवाजीनें पन्हाळा स्वाधीन केला, त्या वेळीं अली अदिलशाहाबरोबर त्याची आई बडीसाहेबीण आली होती. महमद आदिलशाहाची पत्नी म्हणून तिचा मान सर्व विजापुरी सरदार व शिवाजीदेखील ठेवीत होता असा त्या वेळच्या इंग्रजी व डच पत्रांतून ध्वनी निघतो. 'आतां राणी परदेशीं गेल्यामुळें (घालवून दिल्यामुळें) पुष्कळ उमराव या प्रांतांत लुटालूट करितात (ले.८४८,श. १५८३ ज्येष्ठ व. ८=१६६१ जून १०). राणी मक्केच्या यात्रेला निघून जातांच शिवाजीनें पुनः डोकें वर

काढलें आणि इंग्रजांनीं केलेल्या नुकसानीचें उट्टें काढण्याकरितां मार्च मध्यांत इंग्रजांच्या राजापुरी वखारीवर हल्ला केला " ( ले. ८५२ ). यावरून राणी केव्हां मक्केकडे गेली याचा अंदाज कळतो. जानेवारी १६६१ ( पौष-माघ ) मध्यें तिच्याकरितां डचांकडे इराणांत जावयाच्या गलबताची मागणी आली होती. त्याप्रमाणें त्यांचें बँटम नांवाचें गलबत घेऊन ती निघून गेल्याचें दिसतें ( ले. ९४० ). कोंकणांतील एका टिपणांत १५८२ माघमध्यें बडेसाहेबीण वेंगुर्ल्याहून मक्केस गेली असें आहे तें अर्थात् खरें दिसतें. बडेसाहेबिणीचा हा मान केवळ शाब्दिक परंपरेनें चालत आलेला होता. निदान इंग्रजांची तशी समजूत आहे ( ले. ८९० ). कारण तसें नसतें तर रेव्हिंगटन्च्या पत्रांत तिला घालवून लाविल्याचें लिहिलें आहे तसें घडलें नसतें. परंतु इंग्रजहि त्या परंपरित दाबाच्या नांवानें आपला सहनशीलपणा प्रस्थापित करूं पहातात याचें कौतुक वाटतें. " राणीच्या स्नेहाखातर आम्हीं अजून पर्यंत औरंगजेबाचें सैन्य सुरतेहून दख्खनकडे आणिलें नाहीं. परंतु आतां राणी पदच्युत झाल्यामुळें आम्हांला तसें करण्यास हरकत नाहीं;" अशी ते शिवाजीला धमकी देतांना दिसतात. यावरून राणी या वेळीं कांहीं राजकीय त्रासामुळें यात्रेला निघाली असावी असें वाटतें. तें कसेंहि असलें तरी आजपर्यंतच्या विजापूरच्या राज्याचा आब तिच्या जाण्यानें कांहींसा कमी झाला असावा ही या चर्चेची सामान्य निष्पत्ति म्हणून समजण्यास हरकत नाहीं. आणि या विजापूरच्या राज्यांतील चल-बिचलीचा परिणाम शिवाजीवर होऊन त्यानें मागें वर्णन केलेली तळ-कोंकणची स्वारी काढून यशस्वी केली हें उघड दिसतें. असो. खुद्द विजापूर दरबारांत या यात्रेचा परिणाम काय झाला याचा अंदाज करणें कठीण आहे. अलीबद्दल लेकवळा सुलतान असें तुच्छतेनें बोलण्याचा प्रयत्न निदान इंग्रज तरी करितात. राजापुरांत म्हणजे रुस्तुमजमाच्या पक्षांत वागण्याचा हा परिणाम असावा. परंतु शाहिस्तेखानानें शिवाजीच्या किल्ल्यांतून दरवेश नांवाचा राज्याचा वारस आपल्या ताब्यांत घेतल्याचें इंग्रज लिहितात तेव्हां राज्याच्या वारसाचा प्रश्न या वेळीं फिरून उपस्थित झाला होता किंवा कसें हें शोधून पाहणें जरूर आहे. अलीच्या कारकीर्दीच्या अखेरी-पर्यंत विजापूरकरांनीं निदान दोन मोठीं युद्धें केल्याचें आपल्याला माहीत आहे. कर्नाटकाकडे एकसारखा त्यांचा प्रयत्न चालूच होता असें म्हटलें

पाहिजे. परंतु कै. राजवाडे यांच्या म्हणण्याप्रमाणें अलीच्या राज्याचा हा तेगार सर्व त्याच्या पदरच्या सरदारांनीं आपल्या इच्छेप्रमाणें चालविला होता. त्यांत त्याला कांहींच महत्त्व नव्हतें. अलीनामा, तारीख-इ-अली इत्यादि काव्यांच्या कर्त्यांना अलीच्या राज्याचे गोडवे गाणें हेंच कार्य महत्त्वाचें वाटलें. तथापि त्या राज्याची ओहटीच अलीनें पाहिली हेंच खरें दिसतें ( रा. मा. वि. चं. प्रस्तावना रकाना ४६ ). वर दिलेल्या वारसाच्या प्रकरणाचा उल्लेख पाहून शाहिस्तेखानहि आपल्या परीनें विजापूरच्या कारभारांत हात शिरकविण्यास पहात असावा असा संशय उपस्थित होतो. आणि ह्या प्रश्नांचा निकाल पक्षपाती अशा मुसलमानी तवारिखांवरून कितपत लावितां येईल याचा अंदाजहि करितां येत नाहीं.

इंग्रजांच्या पत्रांतून व डाग रजिस्टरमधून विजापूरच्या हीन स्थितीबद्दल फार करुणास्पद उल्लेख आलेले आहेत. ‘ उमरावांच्या मध्येंच दुही आहे.... विजापूर लुटलें जाईल असें वाटतें ’ ( ले. ८४८ ). ‘ विजापुरांत यादवी वाढत असून परिस्थिति अशीच राहिली तर विजापूरचा नाश जवळ आला आहे असेंच म्हटलें पाहिजे. ( ले. ८५४ ). त्यांचा पद्धतशीर तपशील मिळाला पाहिजे. त्याशिवाय ले. ८६५, ८६७ यांतून तोच ध्वनी निघतो. शेवटच्या लेखांत तर ‘ सर्व देश रणक्षेत्र बनला आहे. दख्खनचा सुलतान औरंगजेबाशीं, आणि दख्खनी उमराव बंडें करून स्वतःच्या सुलतानाशीं, एकमेकांशीं आणि औरंगजेबाशीं लढत असल्यामुळें त्याची झळ येथेंहि लवकर लागेल ’ असें लिहिलें आहे. आदिलशाहीलाहि हें वर्णन लागू असावें असेंच वाटतें. या वेळीं कांहीं खंडणीची भानगड उपस्थित करून औरंगजेबानें गोवळकोंडेकरांची कुरापत काढल्याचे उल्लेख आहेत ( ले. ८६० व ८६३ ). यांवरून शिवाजीवर हल्ले चालू असतांनाच तिकडे आदिलशाही व कुतुबशाही यांचेहि बळी घेण्याचे उद्योग शाहिस्तेखान करीत होता असें म्हणावें लागतें. याबद्दल मोघम उल्लेख वर आलेच आहेत. परंतु बराच प्रत्यक्ष उल्लेख लेखांक ९२३ मध्यें आहे. नेताजीचा मार्गे वर्णन केलेला पाठलाग करीत ‘ मोंगलांचे घोडेस्वार विजापुराजवळ गेले. तेव्हां राजा व राणी यांना भय वाटून तीं सुरक्षिततेकरितां बंकापूराला गेलीं. मोंगल विजापूरकरांचा सर्व मुलूख घेतील असें वाटतें ’ असें त्यांत आहे. यावरून उभयतांतील बखेड्याचा तर्क होतो. परचक्राची

निकराचा हल्ला आला म्हणजे सरदारांच्या निष्ठेला ओहोटी लागते त्याचेंहि प्रत्यंतर त्याच पत्रांत आहे. रुस्तुमजमा या पूर्वपरिचित सरदारानें मोंगलांना भेटून आपल्या स्वतःपुरता सलोखा केला असें त्यांत लिहिलें आहे. ले. ९२७ हें पत्र त्यानंतर १० दिवसांनींच लिहिलें असून त्यांत रुस्तुमजमाच्या भेटीची बातमी पक्की आहे असें लिहिलें आहे; त्यावरून रुस्तुमजमाचा शिवाजीशीं स्नेह पूर्ववत् कायम होता असें दिसतें. कारण मोंगलांपासून नेताजीचा त्यानें या वेळीं बचाव केला.

अशा संदर्भांत १५८४ भाद्रपद वद्य १२ (३०।८।६२) बडी साहेबीण मक्केहून परत आली व दोन दिवसांनीं दरबाराकडे निघून गेली. वेंगुर्ल्याला तिला मानपत्र, नजराणा वगैरे देण्यांत आले. बंदराची वाढ करण्याबद्दल ती बोलली व वेंगुर्ल्याचें नांव बदलून तिनें शहाबंदर म्हणून ठेविलें. ती विजापूरला पोंचल्याचें वेंगुर्ल्याच्या डचांना पत्रहि आलें. पुढें विजापूरचा राजा आपल्या आईला घेऊन मोठ्या सैन्यासह कानड्याकडे स्वारी करण्याच्या तयारींत आहे, वगैरे हकीकत डचांच्या पत्रांत आहे (ले. ९४०). ही अर्थात् विश्वसनीय समजली पाहिजे. इंग्रजांचीं याच बाबतींतील पत्रें पाहिलीं म्हणजे अगदीं निराळी कल्पना होते. त्यांच्या मतें विजापुरांत सर्वत्र बेबंदशाही होती, त्याबद्दल वर उल्लेख आलाच आहे.

विजापुराकडील या अंदाधुंदीवर उत्तम प्रकाश पाडणारी त्यांच्या मताप्रमाणें गोष्ट म्हटली म्हणजे त्यांनीं दिलेली उपरिनिर्दिष्ट बडी साहिबा हिची अखेरीअखेरीची हकीकत होय. १५८२ च्या माघांत ती वेंगुलें मुक्कामाहून मक्केकडे निघून गेली. ती १५८४ च्या ज्येष्ठांत 'इतक्यांतच परत येणार' होती (ले. ८८८); त्यामुळें तिच्या येण्यावर इंग्रज लोक शिवाजीच्या ताब्यांतील आपले कैदी सोडविण्याचे बेत रचूं लागले. तिला आधीं पकडून ठेवावी आणि मग तिला सोडण्याच्या मोबदल्यांत विजापूरच्या आदिलशहाकडून आपले कैदी सोडविण्याचा हुकूम घ्यावा असा थोडक्यांत तो बेत होता (ले. ८९४). बडी साहेबीण पुढें वेंगुर्ल्यास आली (ले. ८९०); पण अपेक्षेप्रमाणें तिचा मान ठेवण्यास कोणींच तयार नसल्यामुळें तिला चौलांत गुप्तपणें राहाणें भाग पडलें (ले. ९०३). तरी देखील ती ताब्यांत घेऊन कैदी सोडविण्याचा हुकूम मिळविण्याचा इंग्रजांचा बेत होता. परंतु त्याचें पुढें काय झालें हें इंग्रज लिहीत नाहींत ! इंग्रजांचे कैदी पुढें शिवाजीच्याच अधिकाऱ्यांकडून सुटले.

दोन्ही वृत्तांत एकत्र देण्याचा उद्देश एवढाच आहे कीं, उभयतांमधील अधिक विश्वसनीय कोणता हें ठरवितां यावें. डचांची वेंगुर्ल्याला वखार असल्यामुळें त्यांच्या हकीकतीवर या बाबतींत तरी वास्तविकपणाचा ठसा स्पष्ट उमटलेला दिसतो. इंग्रजांच्या बातम्यांचा उगम काय असेल तो असो; परंतु अशाच तऱ्हेच्या हकीकती इतरत्र असण्याचा संभव व त्यामुळें त्यांच्या किंवा त्यांच्या सारख्या पाश्चात्यांच्या अस्सल पत्रांतील हकीकतींचीहि छाननी केल्याशिवाय स्वीकारण्यांत असलेला धोका यांवरून दिसेल. व केवळ पत्रांतील मजकुरावरून लिहिलेल्या हकीकतीलाहि अन्य विचारांची कसोटी लावणें कशी जरूर आहे हें ध्यानांत येईल.

**१९. आदिलशाहाचें सलोख्याचें फर्मान**—बडी साहेबिणीचा हात ती यात्रेला गेल्यामुळें विजापूरच्या राजकारणांतून निघाल्यावर किंवा त्या सुमारास झालेली तिकडील हलाखीची स्थिति पाहिली म्हणजे त्या वेळीं विजापूरकरांना कसेंहि करून शिवाजीच्या उपक्रमाला थोपविण्याशिवाय गत्यंतर नव्हतें, असें उघड दिसतें. शृंगारपूरच्या स्वारीनंतर अलीच्या दरबारचे व शिवाजीचे संबंध कोणत्या प्रकारचे राहिले याविषयीं प्रत्यक्ष पुरावा कोणत्याहि प्रकारचा उपलब्ध नाहीं. परंतु त्यानंतर उघडपणें शिवाजीकडून त्यांची आगळीक झाली नाहीं असें वाटतें. पन्हाळ्यापर्यंतच विजापूरकरांनीं चळवळ केली. त्यापुढें विजापूरकरांनीं आपण होऊन शिवाजीच्या वाटेला जाण्याचा प्रयत्न निदान ३-४ वर्षें केला नाहीं. शिवाजीनें पन्हाळ्याचा सूड उगविण्याकरितां म्हणून राजापूरपर्यंत दौड करून शृंगारपूर आदिकरून कोंकणपट्टी काबीज केली. पण त्यानंतर मग कांहींच चढाई केली नाहीं. या उभयपक्षीं शांततेच्या धोरणाचा कांहीं समर्पक खुलासा मिळाला तर पाहिला पाहिजे. प्रत्यक्ष पुराव्याचे अभावीं तर्कच करावयाचा तर आदिलशाही सत्ता निर्जीव झाली म्हणून तिनें व शिवाजी मोंगलांच्या युद्धांत गुंतला म्हणून त्यानें, असा दोघांनींहि हात आटोपून आत्मसंयमन केलें असें म्हणतां येण्यासारखें आहे. परंतु शिवाजी मोंगलांशीं तितका गुंतून गेला नव्हता याचें विवेचन पुढें करण्यांत येईल. तेव्हां मोकळा सांपडलेला आदिलशाही मुलूख त्यानें न घेण्याला यापेक्षां कांहीं निराळें कारण असलें पाहिजे असें मानावें लागतें. आणि तें म्हणजे उभय युद्ध्यमान सत्तांच्या इच्छेनें परस्परांत ठरलेला सलोख्याचा तह हें होय.

या बाबतींत उपयोगी पडतील असे एक दोन उल्लेख बरेच उशिरां म्हणजे १५८४ फाल्गुन( १६६३ फेब्रु. )मधील आहेत. राजापुरांत कैद केलेल्या इंग्रजांना १५८४ माघ व. ४ ( १६६३ जाने १७ ) रोजीं सोडण्यांत आले. अमावास्येला ते राजापुरास आले आणि चार दिवसांनीं त्यांच्या बेड्या काढण्यांत येऊन रावजी पंडित नांवाच्या प्रांताधिकाऱ्याशीं त्यांचें बोलणें झालें. त्यांत इंग्रजांशीं सलोखा व्हावा अशा तऱ्हेची इच्छा रावजीनें प्रदर्शित केली. इंग्रजांनीं त्यामुळें राजापूरच्या लुटीबद्दल वगैरे तक्रार केली. तिचें उत्तर देण्याकरितां रावजी जें बोलला त्याचा सारांश टेलरनें सुरतेस लिहून कळविला. त्यांत पुढचीं वाक्यें आहेत:—' झाल्या गोष्टी विसराव्या. यापुढें एका काडीचीहि तोशीस आम्ही लागूं देणार नाहीं. मागें शिवाजीचें व विजापूरकरांचें युद्ध चालू होतें. तेव्हां राजापूर विजापूरच्या राज्यांत मोडत होतें. म्हणून तेथें उपद्रव झाला. शिवाय त्या प्रसंगीं शिवाजीला दोन प्रबळ सत्तांशीं झगडा करावयाचा होता आणि औरंगशहानें शिवाजीचा बराच मुलूख उध्वस्त केला होता या कारणांनीं शिवाजीला द्रव्याची फार गरज होती. * आतां शिवाजीला तशी तीव्र गरज नाहीं ' हा मजकूर शिवाजीनें आपला पंजा करून सहीशिक्क्यानिशीं पाठविलेल्या पत्रांतील म्हणून रावजी पंडितानें सांगितला असें टेलर लिहितो. यापूर्वीं युद्ध चालू होतें, म्हणजे या वेळीं नव्हतें ( ले. ९१७ ). टेलरच्या याच पत्रांत आणखी असा मजकूर आहे:— ' राजापूर आदिकरून जो मुलूख शिवाजीनें युद्धांत घेतला आहे त्याचा उपभोग शिवाजीनें घ्यावा असा आदिलशाहानें शिवाजीला फर्मान दिला आहे', यदाकदाचित् ही गोष्ट शब्दशः खरी नसली तथापि त्यांतील भावार्थ खरा धरण्यास हरकत दिसत नाहीं. आणि त्यावरून तळकोंकणच्या स्वारीनंतर लवकरच विजापूरकरांनीं शिवाजीच्या या काबिजातीला मान्यता देऊन तें प्रकरण सलोख्यानें निकालांत काढलें असावें असें वाटतें. आतां हा सलोखा नक्की केव्हां झाला याबद्दल तर्क करण्यास साधारणपणें १५८३ च्या वैशाखापासून ( शृंगारपूरची स्वारी ) १५८४ च्या फाल्गुनापर्यंत म्हणजे सुमारें वीस बावीस महिन्यांचा अवसर आहे. ह्या सलोख्याचा उल्लेख

* ह्यासंबंधीं शिवभारतानें मांडलेले विचार मागें सांगितलेच आहेत ( अ. २८ श्लोक ३५–४० ). येथें दिलेला मजकूर शिवाजीच्या अस्सल पत्रांतील म्हणून इंग्रजांनीं लिहिला आहे. यांतील विलक्षण सारखेपणा वाचकांच्या लक्षांत येईल.

१५८४ च्या फाल्गुनांतच आला म्हणून तहहि त्याच सुमारास झाला असला पाहिजे असें मानण्याचें विशेष कारण कांहींच नाहीं. तशासारखा उल्लेख करण्याचा प्रसंगच त्या पूर्वी आला होता असें वाटत नाहीं. कैदी सोडून त्यांच्याशीं तडजोडीचें बोलणें करण्याची परिस्थिति आली त्या वेळींच ह्या सलोख्याबद्दल व पूर्वीच्या बिघाडाबद्दल प्रश्न निघणें साहजिक आहे. युद्धाची सर्व गडबड १५८३ च्या वैशाखांत सर्वच ठिकाणीं शांत झाली ही ऐतिहासिक गोष्ट आपल्या नजरेसमोर असल्यामुळें त्यानंतर लगेच केव्हां तरी ह्या सलोख्याची मांडणी केली पाहिजे हें उघड आहे.

शिवाजीनेंहि या वेळीं निष्कारण फायदा घेऊन फाजील स्वातंत्र्य मिळविण्याचा उद्योग केल्याचें दिसत नाहीं. त्याच्या सामोपचाराच्या धोरणाला धरूनच या वेळीं तो वागला. आणि आपण विजापूरचे ताबेदार आहोंत हा देखावा त्यानें कायम ठेविला. एरवीं टेलरच्या पत्रांतील पुढील उतारा किंवा पुढें वर्णन करावयाचा कॅरे या फ्रेंच गृहस्थाचा खुलासा योग्य होता असें म्हणतां येणार नाहीं. टेलर म्हणतो 'फार तर अधिक बंदोबस्ताकरितां खुद्द आदिलशहाचें दुसरें फर्मान आणावें म्हणजे झालें.....हा सर्व मुलूख अजूनहि विजापूरच्या राज्यांत असून शिवाजी त्याच्या प्रजाजनांत मोडतो.' शब्दांबद्दल भांडत बसावें हें महाराजांच्या दृष्टीनें इष्ट वाटत नसल्यामुळें विजापूरकरांना एवढें समाधान देण्यास त्यांची कांहींच हरकत नव्हती. आणि यामुळेंच जरी त्यांनीं कोंकणपट्टी स्वतःकरितां म्हणून जिंकून घेतली होती, तथापि संजान ते गोव्यापर्यंत सर्वच बंदरें दख्खनच्या राजाचीं म्हणजे विजापूरकरांचींच आहेत अशीच सर्वांची समजूत होती (ले. ८७७). शिवाजी विजापूरचा सेनापती होता असेंच इंग्रज लिहितात ( ले. ८६१ ). शिवाजीनें कैद केलेल्या इंग्रजांची सुटका शिवाजीला पत्र लिहून होत नाहीं तर त्याच्यावर तक्रार आदिलशाही सुलतानाकडे करावयाची हाच मार्ग शिष्टसंमत समजला जाई (ले. ८८६, श.१५८४ वै. शु. २, १६६२ एप्रील १० ). आणि या सर्वांविरुद्ध मोठें विश्वासाचें स्थान म्हटलें म्हणजे बडी साहेबीण होती ( ले. ८८८, श. १५८४ ज्येष्ठ, १६६२ मे ).

मराठी पत्रांतून ह्या बनावाचें प्रत्यंतर मिळण्यासारखें नाहीं. बखरींचा निष्कर्ष कांहीं अंशीं या वेळीं असा सलोखा होण्याला अनुकूल असा दिसतो. त्यांनीं आपल्या पद्धतीनें याबद्दल मांडणी केली आहे ती अशी आहे. शिवाजी-

राजांचा प्रभाव वाढत चालला त्यामुळें समाधान पावून पुत्रदर्शनाची अनिवार इच्छा होऊन शहाजीनें तुळजापूरच्या कुलस्वामीनीचें दर्शन घेण्यासाठीं आदिलशाहाची परवानगी मिळविली. ती देतांना आदिलशहाकडून ' शिवाजीनें आपल्या लक्षांत वागावें अशी खटपट करावी ' म्हणून त्याला सूचना करण्यांत आली ( चिट. १९३-१९७ ). शिवाजीची भेट* झाल्यानंतर उभयतांचीं प्रेमानें संभाषणें होऊन त्यामध्यें शहाजीनें पूर्ववत् आपल्या जहागिरीकडे जावें इत्यादि ठरलें व शहाजी निघून गेला. बखरींचा उत्तम अभ्यास करून लिहिलेल्या छत्रपती शिवाजीमहाराजांच्या चरित्रांत श्री. केळूसकर लिहितातः—' असें सांगतात कीं महाराजांनीं या वेळीं आपल्या तीर्थरूपांपाशीं असें कबूल केलें कीं, आपण हयात आहां तोंपर्यंत विजापूर-सरकारच्या उरलेल्या मुलखास मी उपद्रव करणार नाहीं. शहाजीराजांनीं विजापुरास जाऊन बादशहाची मुलाखत घेतली व शिवाजीमहाराजांकडून स्वतःस मिळालेले हत्ती घोडे व जवाहीर हीं, त्यांनीं पाठविलेला नजराणा म्हणून, बादशहास अर्पण केलीं व हजरतीनें फर्माविलेलें काम फत्ते करून आलों ' असें सांगितलें. ( पृ. २०६ ). शहाजीच्या मध्यस्थीनें विजापुरी प्रधान अबदुल महमद यानें शिवाजीशीं कांहीं गुप्त करार केला असें ग्रँट डफ्हि म्हणतो. ( नवी गुप्ते. आ. पृ. १५१ ). अशा रीतीनें, बऱ्याच प्रमाणांवरून, वरील प्रकारचा कांहीं कारारमदार शिवाजी व विजापूरकर यांमध्यें झाला असावा असें वाटतें. अबदुल महमद हा मुख्य प्रधान असतांना त्याचें धोरण शिवाजी, शहाजी ह्या पक्षाला सामोपचाराचें असे. तो निदान खवासखानपक्षाइतका कट्टर नव्हता असा एक स्वतंत्र पुरावाहि उपलब्ध आहे. सिद्दी जौहर या बंडखोराच्या मृत्यूनंतर त्यानें स्वतः जौहरचा मुलगा व जांवई यांच्याकरितां रदबदली करून त्यांना मूळची जहागीर मिळवून दिली ( मो. २०७ ). असो.

---

* एक्याण्णव कलमी बखर ( कलम ७० ) याच विषयासंबंधीं त्रोटक वृत्त देते, परंतु कालदृष्ट्या तें विपर्यस्त असून त्यांत महाराजांची पितृभक्ति उठून दिसण्यापेक्षां अधिक ऐतिहासिक भर पडत नाहीं.

## प्रकरण १० वें

# मोंगलांशीं सामना

**१. मोंगली शत्रुत्वाचें विशेष स्वरूप**—आठव्या व नवव्या अशा दोन्ही प्रकरणांत मिळून शिवाजीचा विजापूरकरांशीं झालेला सामना वर्णन करण्यांत आला. १५८१ मार्गशीर्ष शु. ७ पासून १५८३ च्या वैशाखापर्यंत सुमारें दीड वर्षांच्या अवधींत शिवाजी विजापूरकरांशींच युद्ध करण्यांत गुंतला होता. या युद्धाच्या आरंभीं औरंगजेबाचे व शिवाजीचे संबंध कोणत्या प्रकारचे होते यांचें वर्णन मागें ( पृ. १४७ ) केलेंच आहे. औरंगजेब व शिवाजी उभयतांहि परस्परांचा अविरोध संपादन करून त्यायोगें होईल तितका फायदा करून घेण्याच्या विचारांत होते. आणि ह्या तडजोडीची इतरांनाहि कल्पना आली होती असें दिसतें. १५८१ च्या पौष शु. १५ (११-१२-५९) स गोवें येथील गव्हर्नरानें आपल्या बादशहाकडे पत्र लिहिलें त्यांत शिवाजीचें वाढतें सामर्थ्य व विजापूरचें राज्य त्याच्या हातून बुडण्याची शक्यता वर्णन करून ' या शिवाजीला औरंगजेबाचा पाठिंबा आहे ' असा लोकप्रवाद तेथेंच नमूद केला आहे ( ले. ७९२ ). यापुढें लवकरच ही परिस्थिति बदलली आणि नवीन वर्षाच्या प्रतीपदेच्या मुहूर्तावर म्हणजे थोडा आधींपासूनच मोंगलांशीं होणाऱ्या झगड्याचा वेध लागला. १५८२ चैत्रापासूनच त्याची मोंगलशाहीशींहि सलामी झडण्यास सुरुवात झाली. ही हकीकत मागें आलीच आहे. आखाड्यांत उतरणाऱ्या दोन पहिलवानांनीं परस्परांचा हात सलामीखातर धरून थोडी ओढाओढी करून परस्परांची ताकद अजमावण्याचा प्रयत्न करावा, सक्त कुस्ती सुरू करण्यापूर्वी थोडे पाचपेंच टाकून प्रतिस्पर्ध्याला गोंधळविण्याचा प्रयत्न करावा तसा कांहींसा प्रकार चालू होता हें पूर्वीच्या विवेचनावरून लक्षांत आलेंच असेल. होतां होतां परस्परांचें कट्टर शत्रुत्व परस्परांना प्रतीत होऊन चांगलें युद्ध जुंपण्याची पाळी पुढें लवकरच आली. आणि शिवाजीच्या मुख्य शत्रूची भूमिका विजापूरकरांनीं कांहीं वेळपर्यंत सोडून मोंगलांच्या वतीनें शाहिस्तेखानानें ती उचलली आणि त्याच्यामागून आलेल्या अधिकाऱ्यांनीं

ती एकसारखी पुढें चालविली. एका अर्थानें विजापूरकरांच्या सामन्यांतून मोंगलांचा सामना उभा राहिला. परंतु या दोघांशीं घाव्या लागलेल्या सामन्यांचें स्वरूप थोडें थोडें भिन्न होतें. विजापूरकर हे दक्षिणेंत स्थायिक झालेले सत्ताधीश होते. आणि शिवाजीच्या स्वतंत्र सत्तेचा उदय हा त्यांच्या अंमलांतूनच झाला असल्यामुळें विजापूर दरबारांत शिवाजीबद्दल स्नेह बाळगणारे कांहीं सरदार होते. विजापूर दरबारांतील अगदीं कट्टरांचीहि शिवाजीकडे पहाण्याची दृष्टि साधारण आपलेपणाचीच असून त्यानें केवळ आपली सत्ता मान्य करावी एवढ्यांतच त्यांना समाधान होतें. परंतु मोंगलांची स्थिति तशी नव्हती. ते उत्तरेंतून दक्षिणेकडे आले ते मुलूख जिंकण्याच्या आकांक्षेनें आले. त्यांतून त्यांचा त्या वेळचा सिंहासनाधीश औरंगजेब कोणत्याहि तडजोडीच्या धोरणाला अनुकूल नसून कांहींहि झालें तरी आक्रमण करण्यांचा अट्टाहास धरणारा होता. मोंगलांचें सामर्थ्य अचाट आणि शिवाजी म्हणजे त्यांच्यापुढें केवळ कःपदार्थ होता. अलीशाहाची आदिलशाही मागें वर्णन केल्याप्रमाणें भावी मृत्युकालाची पूर्व सूचना घेऊन मोठ्या कष्टानें आपल्या निष्ठाहीन सरदारांच्या जिवावर कसातरी काल कंठीत होती. यामुळें तिच्या जिव्हारीं एकादी गोष्ट लागल्यास तत्काल ती आपला हात स्नेहासाठीं पुढें करी. तर आलेल्या अपयशाबद्दल मनांत द्वेष बाळगून, खुनशीपणानें सूड घेण्यासाठीं आपलें सामर्थ्य वाढवून, नतीजा पोंचविण्याचा मोंगलशाही प्रयत्न करी. विजापूरकरांशीं झालेलें युद्ध खेळीमेळीनें चालून त्यामुळें शिवाजीवर समूळ नाश होण्याची पाळी कधींच आली नाहीं. औरंगजेबाशीं करावे लागलेले दोन हात त्याला 'शेंडी तुटो कीं पारंबी तुटो'. अशा निकरानें करावे लागून प्रसंगीं मानहानीहि पत्करावी लागली. औरंगजेबानें त्याचें समूळ उच्चाटन करण्यासाठींच कमर बांधली. परंतु ही पाळी अद्यापि आली नसून ती हकीकतच आतां क्रमानें सांगावयाची आहे.

दक्षिणेकडील राजकारणांत मोंगलांचा शिरकाव प्रथम अकबराच्या कारकीर्दींत झाला. पुढें शहाजहानानें निजामशाही बुडवून आपली सरहद्द विजापुरी राज्याशीं आणून भिडविली. परंतु त्याच्या ऐदी स्वभावामुळें त्याच्या शेजारचा अनिष्ट परिणाम आदिलशाहीला जाणवला नव्हता; तो औरंगजेबाच्या दुसऱ्या सुभेदारींत फार जाणवला. आणि आतां तो सिंहासनावर बसल्या दिवसापासून दक्षिणेची फार विवंचना करूं लागला. राज्याभिषेकाच्या वेळींच

दक्षिणच्या सुभ्यावर शाहिस्तेखानाची नेमणूक करून त्यानें आपलें धोरण जाहीरच केलें असें म्हणावयास हरकत नाहीं. यापुढें दक्षिणेच्या राजकारणांत मोंगल हे एक भागीदार होऊन बसले. राजापूरची वखार खणून काढल्यावर तेथील इंग्रज कैद करून सोनगडावर नेवून ठेविले, ते आपल्या सुटकेनिमित्त नानातऱ्हेचे उपाय सुचवितात. त्यांतच 'औरंगजेबाचें सैन्य आपण सुरतेहून दख्खनमध्यें आणण्याला मदत करूं' अशी शिवाजीला धमकी देण्याबद्दल बोलतात! शाहिस्तेखानाकडूनहि इंग्रजांकडे प्रत्यक्ष अनुसंधान आल्याचें दिसतें. कोंकणांतील फार महत्त्वाचा जंजिरेकर शिद्दीचा दंडाराजपूर हा किल्ला ताब्यांत घेऊन शिवाजीवर तेथून हल्ले चढवावे यासाठीं शाहिस्ते-खानाचा त्याच्यावर डोळा होता. आणि शिवाजीहि त्याच कारणाकरितां इंग्रजांच्या मदतीनें तो घेऊं इच्छित होता व व्यापारी इंग्रजहि त्याच ठिकाणाची आशा धरून राहिले होते (ले. ८६२-८८३). अशा रीतीनें त्या वेळच्या राजकारणाचें केंद्र कोंकण बनत चाललें होतें (ले. ८४८). मोंगलांचे प्रयत्न कल्याणभिवंडीच्या आसपास शके १५८२ पासून चालू होते. त्यांना यश येऊन श. १५८३ च्या वैशाख-ज्येष्ठांत (सुमार मे १६६१) त्यांना तीं ठाणीं मिळाल्याचें दिसतें. शिवाजीहि पावसांत मोंगलांचें सैन्य छावणीस गेल्यावर तीं परत घेण्याची तयारी करीत असल्याची बातमी त्याच वेळेस आली होती.

**२. कोंकणांतील युद्ध**—वर दर्शविलेल्या धोरणाप्रमाणें कोंकणांतील हें युद्ध बरेंच चुरशीचें झालें असावें यांत शंका नाहीं. परंतु याबद्दल मिळावा तितका समाधानकारक तपशील मिळत नाहीं. सोनगडच्या पत्रावरून पावसाच्या आरंभीं शिवाजी महाडला गेला होता. तेथून कल्याणभिवंडीकडे कांहीं कारवाई केली असल्यास ती सफल झाल्याचें दिसत नाहीं. उलट बुलाखी या नांवाच्या मुसलमान सरदारानें देइरीगडा (पेण तालुका) स वेढा दिला. म्हणजे मोंगलांनीं थेट शिवाजीच्या मुलखांत प्रवेश केल्याचें दिसतें. परंतु हा वेढा फार वेळ न टिकतां कावजी कोंढाळकरानें हल्ला करून तो मोडला. त्यांत मुसलमानांचे चारशें लोक कामास आले व त्यांना वेढा उठवून जाणें भाग पडलें.

मोंगलांशीं चाललेलें युद्ध हें तडकाफडकीं निकालांत लागणारें प्रकरण नसून चिघळणारी जखम ज्याप्रमाणें प्राण घेतल्याशिवाय सोडीत नाहीं त्या

धर्तीचें आहे हें महाराजांच्या केव्हांच लक्षांत आलें होतें. तेव्हां त्याला चांगला सामना देतां येण्यासाठीं अवश्य ती सर्व प्रकारची सुव्यवस्था करण्याकडेहि वेळोवेळीं त्यांनीं लक्ष दिलें. भावी युद्धांत चांगलीं माणसें हाताशीं धरण्याच्या दृष्टीनें भाद्रपद शु. ६ ( ऑगस्ट २१ ) रोजीं सुमुहूर्तावर त्यांनीं कित्येकांस अधिकार दिले. यांच्यावर राज्याचा भार टाकून महाराज, कार्तीक महिन्यांतील उष्णता ( October heat ) अतिशय भासल्यामुळें, वर देशावर कोरेगांव( सातारा )जवळील वर्धनगडावर जाऊन राहिले. महाराजांची प्रकृति या वेळीं नादुरुस्त होती असें समजावें का तिकडील कांहीं राजकारणाची व्यवस्था करण्यासाठीं गेले म्हणावें हें अस्सल कागदपत्रांच्या अभावीं सांगतां येत नाहीं. शकावलींतील त्रोटक नोंदीपलीकडे या उल्लेखाला अन्य आधार नाहीं.

श. १५८४ मधील हालचाली समजण्याच्या बाबतींत कागदपत्रांची तशाच प्रकारची वाण आढळते. परंतु ज्येष्ठाच्या सुमारास, ' शिवाजीचा मुक्काम कोठें आहे याची बातमी नाहीं ' असें इंग्रज लिहितात. त्या अर्थी तो युद्धांत गुंतला होता असा तर्क करितां येतो ( ले. ८८८ ). या वेळीं शकावली च्या म्हणण्याप्रमाणें ' नामदार खानावरी खासा राजियांनीं मिरे डोंगरास जाऊन पेणेस छापा घातला ' व पेण ताब्यांत राखिली.

मोंगलांशीं चालू असलेलें युद्ध हें एक प्रकारें माणसांची पारख करण्याची कसोटीच होती. या वर्षी चैत्र वद्य १० ला पुनः कांहीं अधिकाराच्या जागा बदलण्यांत आल्या व कित्येक नव्यानें देण्यांत आल्या. मोरोपंत या वेळीं पेशवे झाले. पारखून माणसें निवडून काढावीं व स्वतःच्या राज्याची बळकटी करावी हा हव्यास अलीकडे महाराजांना लागला हें उघड आहे. मोरोपंत पेशवे झाल्याचा हा काळ बरोबर लक्षांत न घेतां बखरकारांनीं त्यांना अफझलप्रसंगाच्या वेळींच पेशवे बनविलें आहे. सभासद( पृ. ७ )वरून जावळी व शृंगारपूर येथील कामगिरीबद्दल त्याला पेशवेपद मिळाल्याचें समजतात. परंतु कालदृष्ट्या नव्या कोंकणच्या युद्धाचाहि त्यांत समावेश केला पाहिजे असें वाटतें. शामराजपंत नीळकंठ यांची पेशवाई काढून ती मोरोपंतांस दिल्याचें सभासद सांगतो. परंतु एक वर्ष आधीं नरहरी आनंदरावास पेशवाई दिल्याचें शकावली म्हणते. पण शामराजपंताचा शिक्का सांपडतो तसा नरहरी आनंदरावाचा * मिळत

* तथापि नरहरी आनंदराव हा कुडाळचा सरसुभेदार श. १५९२ त आहे ( खंड ८ ले. २७ ).

नाहीं. यावरून शामराजपंताची पेशवाई पक्की दिसते. शामराजपंताचें पेशवेपद काढण्याचें कारण म्हणून सिद्दीवरील स्वारींत त्याला अपयश आलें असें सांगितलें जातें त्याबद्दल विश्वसनीय माहिती कांहींच मिळत नाहीं.

पेणेवरील छाप्यापूर्वी पेण मुसलमानांनीं घेतली होती हें उघडच आहे. त्या अर्थी देइरी व पेण मोंगलांनीं घेणें याचा अर्थ कल्याणभिवंडीचा मुलूख त्यांच्या हातीं पक्का आल्यानंतर त्याच्या आश्रयानें मोंगल शिवाजीच्या दक्षिणेकडील मुलखांत स्वारी करूं लागले होते असा केला पाहिजे. शकावलींतील भाषेवरून देइरी व पेण या दोन्ही ठिकाणीं मराठ्यांना यश आलें असावें असें वाटतें. तथापि नामदारखान पक्का मोडला नव्हता. याकरितां श. १५८५ चैत्र शु. ६ च्या सुमारास ( ३-४-६३ ) मोरोपंत पेशवे व निळो सोनदेव मुजुमदार यांनीं साहेबांच्या हुकमानें ‘ कोंकणांत नामदार खानावरी जाण्याचा तह ( ठराव ) केला होता. ’ त्याप्रमाणें ते जाणार होते. परंतु ‘ किल्ले सिंहगडाहून समाचार आला कीं, गडावरी कांहीं फितवा झाला आहे याबद्दल तूर्त कोंकणांत जाण्याचा तह राहिला ’ आणि पेशवे व मुजुमदार ह्यांस सिंहगडाकडे जाण्याचा हुकूम झाला. त्यानंतर दोनच दिवसांनीं महाराजांनीं स्वतः पुण्यास जाऊन शाहिस्तेखानाचीं बोटें छाटिलीं.

**३. देशावरील युद्ध**—शाहिस्तेखानानें मराठ्यांवर चढाई करण्यास प्रथम देशावर सुरुवात करून पुणें प्रांत व्यापिला, आणि तेथून कोंकणांत प्रवेश केला अशी वस्तुस्थिती असल्यामुळें त्याचें मुख्य ठाणें अर्थात्च देशावर व वसतिस्थान पुणेंच राहिलें. त्यानें अगदीं प्रथम पुणें प्रांत व्यापून चाकण घेतल्यावर पुण्यास परत येऊन खुद्द शिवाजीच्या महालांत वस्ती केली. येथपर्यंतची हकीकत मागें सांगितलीच आहे. लेखांक ८७९ व ८८० हे मितिहीन असल्यामुळें त्यांमध्यें शाहिस्तेखानाच्या आगमनाबद्दलचे व मुलूख उध्वस्त झाल्याचे उल्लेख येतात ते बरोबर कोणत्या वेळचे (मिति-मास) आहेत हें नक्की समजत नाहीं. याच प्रसंगांतील म्हणून ते अर्थात् समजले पाहिजेत. श. १५८४ च्या आषाढश्रावणांत पुण्यापलीकडे मावळांत हा गलबला वाढल्यासारखा दिसतो. सर्जाराऊ जेधे हे महाराजांच्या अंमलाखालील रोहिडखोरें व भोर या तप्यांचे देशमूख होते. त्यांच्यावर आपल्या तप्यांत बंदोबस्त राखण्याची जबाबदारी होती. ती पार पाडतांना

मोंगलांचा अतोनात त्रास होऊन त्यांचे नोकर लोक फुटून खुद्द शिवाजी-महाराजांकडे नोकरीसाठीं जावयास निघाले. त्यांना आपल्याकडे ठेवून न घेतां फिरून पाठवून देऊं म्हणून महाराजांनीं जेधे यांस आश्वासन-पत्र लिहिलें आहे ( ले. ८९१ ). श्रावणांत हा त्रास फारच वाढला आणि माणसें भोरमध्यें सुरक्षित रहाण्याची अडचण भासूं लागली. जावली जागा कुबल असल्यामुळें जेध्यांनीं माणसें तिकडे पाठविण्याची परवानगी मागितली; परंतु महाराजांनीं ती दिली नाहीं ( ले. ८९५ ). आश्विनांतील तसल्याच विनंतीला फिरून नकार मिळाला ( ले. ९०४ ). पावसाळा कसाबसा सुरक्षितपणें गेला; पण कार्तिकामध्यें ही स्थिति पालटली; मोंगलांचा स्वैर संचार चालू झाला, आणि महाराजांना स्वत:लाच लोकरक्षणाची काळजी वाटून कार्तीक व. ७ ( २३-१०-६२ )ला त्यांनीं मोठ्या कळकळीनें पत्र लिहिलें:—" मोंगल तपियांत धावणीस येतात ' म्हणून जासुदांनीं समाचार आणिला, तरी हें पत्र पोंचतांच माणसें, लेंकरें सर्व गोळा करून घाटाखालीं बांका जागा असेल तेथें पाठविणें. " ( ले. ९०५ ). या पत्रावरील मिती व आंतील मजकूर यांबद्दल तिळमात्र संशय नाहीं. यावरून त्या वेळची परिस्थिती, देशमुखांची जबाब-दारी, महाराजांची प्रजारक्षणाबद्दल कळकळ आणि तत्कालीन युद्धक्षेत्रांत वागणाऱ्या शेतकऱ्यांची दुर्दशा ह्या गोष्टी अगदीं ठळकपणें वाचकांच्या नजरेसमोर रहातील.

भोरतप्यांतील लोकांच्या रक्षणाबद्दल महाराजांच्या मनांतील विचारांची उत्क्रांति वर महिनावार दर्शविली आहे. तीवरून संकटाचा हळुहळु वाढणारा भार क्रमश: नजरेस येतो. मोंगलांनीं दीड दोन वर्षें चिकाटीनें युद्ध चालवून आपल्या साम्राज्याचें सर्व सामर्थ्य शिवाजीवर खर्च करण्याचें ठरविल्यामुळें दक्षिणच्या मोठ्या प्रांताचा सुभेदार एकट्या शिवाजीवर लक्ष देऊन बसला होता. त्याच्या सैन्याचा तापदायक शिलशिला एकसारखा वाढत होता. श. १५८४ मार्ग. शु. १५ (१४-११-६२) च्या पत्रांत इंग्रजांनीं ' शिवाजीचें पारिपत्य करावयास गेलेल्या शाहिस्तेखानाचा दाब शिवाजीवर फारच पडत आहे ' ही सुरतेहून लिहिलेली बातमी तिचें उगमस्थान लक्षांत घेतलें म्हणजे बरीच खरी असावी असें वाटतें. दीड दोन वर्षांच्या अनुभवानें शहाणा होऊन शाहिस्तेखानानें १५८५ त

लवकर सोक्षमोक्ष करून घेण्याची तयारी चालविली. त्याच्या दोन वर्षांच्या खटपटीला या वेळीं यश येऊं लागल्याचीं चिन्हें स्पष्ट दिसतात. कोंकण आणि देश अशा दोन्ही ठिकाणीं एकदम त्यानें उठावणी केली. या पावसांत शिवाजीला कांहीं गडबड करितां येऊं नये म्हणून १२००० घोडेस्वारांचें मोंगली सैन्य वरच्या चौलला पावसाळ्यांत घरें बांधून छावणी करून रहावें असें त्यानें ठरविलें. आणखी ७००० घोडदळ रहमतपुराला ठेविलें ( ले. ९२३ ). ही चकडबंदी करण्याचें कारण असें होतें कीं, शिवाजी हा सामान्य शत्रू नव्हे असें शाहिस्तेखानाच्या निदर्शनास येऊं लागलें होतें. वेळ येईल त्याप्रमाणें तोंड द्यावें, स्वतःच्या मुलखाचें रक्षण करावें आणि संधी येतांच अचानकपणें छापे घालून व लूट करून सतावावें, हें नेहमींचेंच शिवाजीचें धोरण होतें आणि तें चालविणारा त्याचा उजवा हात म्हणजे नेताजी पालकर हाच होता. श. १५८४ कार्तिकानंतर ही स्वारी मोंगलांच्या पुणें प्रांतांत वऱ्हाड इत्यादि मुलखांत लुटालूट करण्यास शिवाजीनें सोडून दिली होती. तेथें त्यानें खूप धुमाकूळ घालून मोंगली मुलखाचें अतोनात नुकसान केल्यामुळें त्याच्यावर बरेंच मोठें सैन्य रवाना झालें होतें. यामुळें फार लूट न मिळतां उलटा त्याला शत्रूकडून बराच त्रास झाला. पाठलाग करणाऱ्या सैन्यानें त्याचा इतक्या नेटानें पाठलाग केला कीं, नेताजीला रोजीं ४५ ते ५० मैलांची दौड करावी लागली आणि शेवटीं रुस्तुमजमाचा आधार न मिळता तर त्याच्यावर साफ नाश होण्याची पाळी आली होती. झालेल्या चकमकींत नेताजीचे तीनशें घोडे पडले आणि त्याला स्वतःलाहि जखमा झाल्या. ही बातमी इंग्रजांच्या राजापुराहून पाठविलेल्या श. १५८५ चैत्र शु. १ व ११ अशा मितींच्या दोन पत्रांत मिळून आलेली आहे ( ले. ९२३ व ९२७ ). यावरून सदर चकमक श. १५८४च्या फाल्गुनांत झालेली असावी. ह्या पराजयाची बातमी इंग्रजांना मिळाली त्याबरोबरच शिवाजीला मिळाली असें मानण्यास हरकत नाहीं. तेव्हां श. १५८५ च्या चैत्रांत आरंभीं शिवाजीचे दिवस फार काळजीचे गेले असेंच म्हटलें पाहिजे. शाहिस्तेखानानें याच सुमारास सिंहगडावर भेद करून तो किल्ला घेण्याची खटपट चालविली. सिंहगड हें पुणें प्रांताचें नाक आणि खुद्द पुण्याची किल्ली असल्यामुळें शिवाजीला यापुढें धीर न निघून त्यानें वर सांगितल्याप्रमाणें

कोंकणांतील ठरविलेला नामदार खानावरील हल्ला तहकूब करून एकदम सिंहगडाकडे मोर्चा वळविला. सर्जेराव जेध्याकडील लोकांनीं फुटून जाण्यास सुरुवात करणें, जेध्याला आपल्या लोकांच्या रक्षणाची फिकीर वाटूं लागणें आणि प्रत्यक्ष मोंगलांनीं धावणीस येणें किंवा मोठ्या सैन्यानिशीं कोंकणांत तळ देऊन रहाणें या गोष्टींचा लोकांवर विपरीत परिणाम होऊन त्यांच्या मनांत दहशत बसली तर आपल्या राज्याचा जम बसत चाललेला तेव्हांच नाहींसा होईल हें महाराजांच्या लक्षांत येऊन त्यांनीं जिवावर उदार होऊन एक धाडसाचा डाव टाकण्याचें ठरविलें.

४. **' शास्ताखानाचा हात तुटला'**—महाराजांवर गेल्या चार एक वर्षांत आलेले प्रसंग आणि त्यांतून तितक्याहि वेळीं अचानकपणें झालेली सुटका अशा तऱ्हेच्या गोष्टी इतर कोणाच्याहि चरित्रांत पहावयास मिळणें कठीण. अफजलप्रसंगीं त्यांना आगामी संकटाची थोडीबहुत सूचना मिळून पूर्व-तयारी व योजना सावकाशीनें व सावधपणें करितां आली. पन्हाळ्याच्या तेथें संकटांत पडले असतांना तेथून सुटकेचा उपाय त्यांनीं केला; तो एका जबरदस्त संकटांतून बाहेर पडण्याकरितां म्हणून केला. पण पुढें वर्णन करावयाच्या शाहिस्तेखानावरील छाप्याच्या बाबतींत त्यांनीं ठरविलेली योजना म्हणजे प्रत्यक्ष काळाच्या जबड्यांत उडी घेण्यासारखें होतें. नेहमींप्रमाणेंच याहि वेळीं ते संकटास तोंड देण्यासाठीं स्वतः खुद्द जातीनें तयार झाले. पूर्वींच्या दोनहि प्रसंगींचें धाडस कांहीं सामान्य नव्हतें, पण या वेळचें साहस अपूर्व होतें.

शिवाजीनें रात्रीं शाहिस्तेखानाच्या राहत्या घरावर छापा घालून त्याचीं बोटें कापलीं, ही गोष्ट माहीत नाहीं असा मनुष्य महाराष्ट्रांत मिळणें विरळा. ले. ९३० हें गिफर्ड नांवाच्या इंग्रजानें राजापुराहून सुरतेस पाठविलेलें पत्र आहे. त्यांत शाहिस्तेखानावरील छाप्याची हकीकत रावजी पंडित नांवाच्या राजापूरच्या अधिकाऱ्याला, शिवाजीनें स्वतः लिहून कळविली; तिचा सारांश दिला आहे. रावजीला तें पत्र श. १५८५ चैत्र शु. १४ ला म्हणजे छाप्यापासून सातव्या दिवशीं पोंचलें. त्यांत शाहिस्तेखानावरील छाप्यांत झालेल्या खाशांच्या कत्तलीची हकीकत देऊन या सगळ्या भानगडींत शिवाजीचे फक्त सहा सैनिक मेले व चाळीस जखमी झाले असें लिहिलें आहे. दहा हजार घोडेस्वारांचा सेनापती जसवंतसिंग जवळच होता, परंतु शिवाजीला विरोध करण्यास तो धजला नाहीं. ' शाहिस्तेखान त्या रात्रीं

आपल्या हातून मेला असें मला वाटलें होतें. परंतु त्याला केवळ जखम झाली असें मी मागाहून ऐकिलें.' असें शिवाजीच्या ह्या पत्रांत लिहिलें आहे. 'परमेश्वरी संदेशानुसार मीं हें कृत्य केलें व म्हणून मला यश आलें.' असा शिवाजीनें समारोप केला; यावरून या प्रसंगाबद्दल जरूर ती सर्व माहिती खुद्द शिवाजीमहाराजांच्या शब्दांत नसली तरी त्यांच्या शब्दांच्या भावार्थाच्या रूपानें कळते. यानंतर उपर्युक्त गिफर्डनें राजापुराहून कोल्हापुरास गेल्यावर महिन्या दीडमहिन्यानें लिहिलेलें पत्र उपलब्ध आहे. त्यांत अर्थात् लोकप्रवाद येण्यास सुरुवात झाली आहे. सुरतेहून मद्रासकडे श. १५८५ वैशाख व. १४ ( २५ मे १६६३ ) रोजीं लिहिलेल्या पत्रांत वरीलच हकीकतीचा गोषवारा देऊन जिवावरचें हें संकट आलें असतां गर्भगळित झालेल्या व बावरलेल्या शाहिस्ते-खानाला, त्याच्या मुलानें प्रसंगावधान राखून व आपला जीव धोक्यांत घालूनहि योग्य वेळीं इशारत दिल्यामुळें, त्याचा जीव कसा वांचला याबद्दल सुरतेकडे प्रचलित झालेली बाजारगप्प सांगितली आहे. ती खरी असो किंवा खोटी असो. तीमुळें इतिहासाच्या ओघावर कांहींच परिणाम होण्यासारखा नाहीं. दहा हजार सैन्य घेऊन जसवंतसिंग ठिकाणीं हजर असूनहि शिवाजीला त्यानें विरोध केला नाहीं या गोष्टीचेंच त्या पत्रांत विशेष वर्णन केलें आहे. वरील पत्रलेखक गिफर्ड यानें तरी 'यावरून शिवाजीच्या ह्या छाप्यांत त्याचें आंग होतें असें सगळ्यांना वाटतें' असें लिहिलें आहे (ले. ९३०). कोल्हापुरास गेल्यावर, 'जसवंतसिंगाच्या सांगण्यावरूनच त्यानें हें कृत्य केलें असें लोक बोलतात' अशी त्यानें सुधारून आवृत्ती वाढविली आहे. येथपर्यंत जसवंतसिंगाचे उद्देश स्पष्ट झाले नव्हते; ते सुरतकरांनीं करून, वरील कोल्हापूरचें पत्र पोंचण्यापूर्वींच स्वतःचाच तर्क लढवून किंवा सुरतेंतील मुसलमानांच्या निंदेवर विसंबून 'शाहिस्तेखानाचा कांटा आपल्या मार्गांतून काढला जावा असें जसवंतसिंगाच्या मनांत होतें' असें लिहिलें आहे. ह्या विधानांतील खोडसाळपणा सहज लक्षांत येण्यासारखा आहे. आमच्या मतें हिंदु सरदाराबद्दल सामान्य विधान करावयाचें म्हटलें तर, तो बहुधा स्वामिनिष्ठ नसणें शक्य वाटत नाहीं. जसवंतसिंग कासमखानाबरोबर औरंगजेबावर चालून आल्याचें स्वतः औरंगजेबानें लिहिलें आहे ( ले. ७३९ ). परंतु त्या वेळीं औरंगजेब एका अर्थानें बंडखोरच होता. तेव्हां प्रस्थापित सत्तेशीं राजनिष्ठा हें तत्कालीन रजपुतांचें व्रत त्यानें चालविलें; याबद्दल त्याला बेइमान

म्हणतां यावयाचें नाहीं. यापुढेंहि औरंगजेब त्याच्याबद्दल साशंक असे असें सांगतात. परंतु औरंगजेबानें शंका कोणाबद्दल घेतली नाहीं बरें? शिवाजीच्या स्वतःच्या पत्रांतून जसवंतसिंगाच्या संगनमताचा ध्वनि निघतो. परंतु जयसिंगाला लिहिलेलीं वगैरे जीं पत्रें प्रसिद्ध झालीं आहेत, त्यांची विश्वसनीयता अद्यापि सिद्ध व्हावयाची आहे. शाहिस्तेखान दुसऱ्या दिवशीं जसवंतसिंगाला टोंचून बोलल्याबद्दलची हकीकत शाहिस्तेखानाच्या मनःस्थितीची द्योतक असली तरी त्यावरून वस्तुस्थितीचें अनुमान काढितां येणें कठीण आहे. शिवाजीचें तत्कालीन राजकारण भेदनीतीवर उभें केल्यामुळें सभासदालाहि प्रत्येक गोष्टींत भेदाची संपादणी करावी असें वाटणें साहजिकच आहे. परंतु कित्येक प्रसंगांना त्या पार्श्वभूमीचा उपयोग होत असला म्हणून प्रत्येक प्रसंगाचे आद्यंत भेदांतच असले पाहिजेत असें म्हणणें योग्य नाहीं.

राज्याभिषेक शकावलींत ' चैत्र शु. ८ रविवारीं शास्ताखानावरी पुणियांत शिवाजीराजे खासा जाऊन छापा घातला. शास्ताखानाचा हात तुटला, मग पळाला, त्याचा लेक अबदुल फते ठार झाला ' असें कलम आहे. जेधेशकावलींत ' लालमहालांत शिरले. तेव्हां कान्होजी नाईकाचे पुत्र चांदनाईक होते. सर्जाराऊ नदीपलीकडे स्वारांच्या जमावांत ठेविले होते. राजश्री स्वामी लालमहालाच्या दिंडींतून बाहेर पडतांच घोड्यावर बसून निघाले. बरोबर स्वार होते ते घेऊन कर्यात मावळांत गेले. वरकड जागा लस्कराच्या टोल्या ठेविल्या होत्या त्याहि निघाल्या ' इतका अधिक तपशील दिला आहे. यांत महाराज लालमहालांत शिरले इत्यादि सांगून जेधे घराण्यांतील दोन चिरंजीव छाप्यांत होते असें स्पष्ट विधान आहे. हें राज्याभिषेक शकावलींतहि असल्यामुळें जेधेदप्तरांतील माहितीला अधिक विश्वसनीयता येते. तेव्हां शिवाजीच्या छाप्याच्या वेळीं शाहिस्तेखान तंबूंत होता किंवा महालांत होता हा प्रश्न निकालांत काढतांना जेधेशकावलीचा पुरावा ग्राह्य धरिला पाहिजे. जेधेशकावलींतील महालाच्या विधानाला खाफीखान व नुष्क-इ-दिलकाश या पारशी ग्रंथांचा व ग्रँट डफ्, सरकार या, पारशी साधनांचा बारकाईनें अभ्यास करणाऱ्या, लेखकांचा पाठिंबा आहे. ह्या प्रश्नाशिवाय ह्या छाप्याचा आरंभ, पूर्वतयारी, शेवट वगैरे तपशिलाचे प्रश्न अद्यापि तसेच अनिश्चित आहेत. किंबहुना त्यांची छाननी करण्याचा प्रयत्नच अद्यापि कोणीं केलेला नाहीं.

शाहिस्तेखान ह्या फजितीमुळें हतदैवी ठरला. त्याच्या बादशहाचा त्याच्यावर राग झाला. जसवंतसिंगाला त्यानें दक्षिणेंत कायमच ठेवून शाहिस्तेखान नालायक म्हणून त्याची काळ्या पाण्यावर-बंगालच्या सुभ्यावर नेमणूक केली. शहाजादा मुअज्झम हा स्वतःचा मुलगा औरंगजेबानें दख्खनच्या अधिकारावर पाठवून दिला आणि मोंगलाचें युद्ध पूर्ववत् चालू राहिलें. श. १५८५ मार्गशीर्ष शु. १२ (१-१२-६३, सरकार) स शाहिस्तेखानाला बदलीचा हुकूम मिळाला आणि मुअज्झमच्या हातीं कारभार देऊन दहा पंधरा दिवसांनीं औरंगाबादेहून स्वारी निघाली. अशी बदली होतांना बादशहाचें दर्शन घेण्याची परवानगीहि बादशहाच्या मामाला मिळाली नाहीं. ॲबे कॅरे नांवाच्या फ्रेंच प्रवाशाला सुरतेच्या दुसऱ्या लुटीच्या अनुषंगानें शिवाजीच्या चरित्राची माहिती मिळाली. मूळ फ्रेंचमधून ॲबेनें संकलित केलेल्या शिवाजीचरित्राचें सुबोध इंग्रजी भाषांतर सर जदुनाथ सरकार यांनीं, केलेलें छापलें आहे तें वाचण्यासारखें आहे (Historical Miscellany, pp. 36-63).

**५. शिवाजीचे पोर्तुगीज साहाय्यक**—त्या वेळच्या राजकारणाचें स्वरूप अत्यंत संकुचित असल्यामुळें उदार तत्त्वांनुसार दोन राष्ट्रांत किंवा राज्यांत एकी होण्याला अनुकूल असें वातावरण नव्हतें. शिवाजीशिवाय इतर राज्यें बहुतांशीं मृत्युपंथाला लागलीं असल्यामुळें त्यांमध्यें जिवंत व दूरदर्शी राजकारणाची जाणीव दिसून येत नाहीं. परंतु त्यांतल्यात्यांत जवळ जवळ दीड शतकपर्यंत पूर्वेकडील देशांत व्यापार करून प्राप्त झालेल्या व्यापक दृष्टीमुळें पोर्तुगीज ह्या सर्वांत अघाडीला होते. दख्खनमधील राजकारणाचा रंग मोंगलांच्या आगमनामुळें अनिष्ट तऱ्हेनें पालटणार हें त्यांच्या लक्षांत आलें होतें (ले. ३४३ व ३४५).

हल्लींच्या शिवाजीवर आलेल्या संकटांत त्यांनीं शिवाजीलाहि शाहिस्तेखानाविरुद्ध साहाय्य करण्याची तयारी किंवा निदान सहानुभूति दर्शविल्याचें दिसतें. अँतोनियो डी मेलो कॅस्ट्रो या नांवाचा नवा व्हाइसरॉय गोव्याला श. १५८४ पौष शु. ६ (६-१२-६२)स आला. त्या वेळीं शिवाजी व शाहिस्तेखान यांचें युद्ध चालू होतें. हिंदी राजकारणाची परिस्थिति कांहींशी लक्षांत येतांच आल्यापासून थोड्याच दिवसांनीं अँतोनियोनें शिवाजीकडे सलोख्याचें बोलणें लावून तह करण्याकरितां 'विश्वासू मनुष्य' मागविला (ले. ९१०). शिवाजीकडून ह्या मागणीचा स्वीकार झाला असेल हें सांगा-

वयासच नको. श. १५८५ चैत्र व. ४ ( १६-४-६३ ) स अँतोनियोकडून शिवाजीला त्याचें उत्तर गेलें आहे ( ले. ९३२ ). त्यावरून मोंगलांना शिवाजीविरुद्ध कोणत्याहि प्रकारची मदत पोर्तुगीजांनीं देऊं नये असें धोरण ठरलेलें दिसतें. वसईच्या अधिकारावर आटायडे नांवाचा राजघराण्यांतील सरदार नेमण्यांत आला. तो उत्तर प्रांतीं शिवाजीशीं शक्य तितके सलोख्याचे संबंध ठेवण्याकरितां हुकूम घेऊन गेला. परंतु ह्या बाबतींत योग्य तो गुप्तपणा राखण्यांत आला होता. ह्या अधिकाऱ्याला ह्याबद्दल श. १५८५ चैत्र व. १३ ( २५-४-६३ )स दिलेल्या सूचनांत शिवाजीच्या आलेल्या पत्राचा उल्लेख आहे:—' मजकडे थोड्या दिवसांपूर्वीं राजा शिवाजीचें पत्र आलें होतें. त्यांत " तुम्ही मोंगलांकडे अन्नसामग्री जाऊं देऊं नये आणि जोंपर्यंत तुम्हीं तशी त्यांना मदत करणार नाहीं तोंपर्यंत मीहि पोर्तुगीज मुलखास व उत्तरेकडील किल्ल्यांस तोशीस पोंचविणार नाहीं ! ' असें लिहिलें आहे. ' तरी तुम्ही त्याच्याशीं सलोख्याचे संबंध ठेवावे. आणि नाना तऱ्हेच्या सबबी दाखवून मोंगलांच्या सैन्याकडे रसद पाठवूं नये. म्हणजे अन्नाचा तुटवडा पडून मोंगल तो प्रांत सोडून जातील आणि तसें झालें म्हणजे शत्रूचें नुकसान करण्याची शिवाजीची इच्छा पूर्ण होऊन, आपल्यालाहि अनिष्ट वाटणाऱ्या मोंगलांच्या शेजारापासून आपण दोघेहि मुक्त होऊं ' ( हि. रे. क. ९ पृ. १११ ).

या पत्रव्यवहारावरून, कोंकणांत बसलेलें मोंगलांचें ठाणें पोर्तुगीजांनाहि आवडत नव्हतें. आणि तें उठविण्यासाठीं शक्य ती मदत करण्यास पोर्तुगीज लोक तयार होते असें म्हणावें लागतें. ह्या मदतीचा शिवाजीला कितपत फायदा झाला याची कांहीं कल्पना करितां येत नाहीं. परंतु पुढें जयसिंगप्रसंगाच्या वेळीं देखील पोर्तुगीजांचें शिवाजीशीं सख्य होतें आणि त्याकरितां मोंगलांची त्यांच्यावर गैरमर्जी झाली होती असें तत्कालीन पत्रव्यवहारावरून दिसून येतें.

**६. कुडाळवरील स्वारी**—शिवापूरदप्तरांतील यादींत १५८५ शकाखालीं, चैत्र वद्य १ ( १६६३ एप्रिल १३ ) स ' कोंकणांत गेले ' असा मितभाषी उल्लेख आहे. चैत्र वद्य १ म्हणजे शाइस्तेखानाचीं बोटें तोडलीं त्या रविवारच्या पुढें एक रविवार जाऊन त्याच्या पुढचाच सोमवार होय. या सात आठ दिवसांत इतकी त्वरा करून महाराज कोंकणांत गेले, ते गोव्याकडे जाण्याकरितां राजापूर मार्गानें जाणार आहेत अशी गिफर्डला

राजापुरास बातमी कळली (वैशाख शु. ९, मे ५) त्याची भवती न भवती त्याच्या मनांत चालू होती. आतां पावसाळा जवळ आला तेव्हां ते इतक्यांत येणारच नाहींत इत्यादि त्याचे तर्क चालू आहेत (ले. ९३५), तोंच वैशाख वद्य ११ (२३-५-६३) स गोव्याच्या पोर्तुगीजांना शिवाजी वेंगुर्ल्यास येऊन पोंचल्याची बातमी मिळाली. शिवाजी राजापूरावरून, रावजी पंडित वगैरेंना घेऊन, वैशाख व. ४ ला, गिफर्ड तेथून निघण्यापूर्वीच, गेला होता. कुडाळ, वेंगुर्लें या बाजूला ते गेले होते असें या वेळीं सर्वांना माहीत झालें होतें. गिफर्ड हा राजापुराहून कोल्हापूरला जातांना वाटेंत त्याला असें आढळून आलें कीं, शिवाजी जातांना लोकांना सुरक्षितपणाचे कौल म्हणजे आश्वासनें देत गेला होता. सदर वचनें पक्केपणानें पाळून प्रजेची सहानुभूति त्यानें आपल्याकडे राखून घेतली होती (ले. ९३७). असें असतांना त्याच्या आगमनामुळें भेदरून जाऊन सांगेंडिचोलीपर्यंतचे (गोवा प्रांतांतीलहि) सुभेदार पळून गेले होते, आणि सर्वत्र अंदाधुंदी माजली होती. शिवाजी या वेळीं वेंगुर्ल्याच्या पुढें दक्षिणेस आंतरप्रदेशांत बांद्यापर्यंत चालून गेला होता, आणि कदाचित् पुढें मिर्जान, कारवार इकडेहि गेला असता; परंतु मोंगलांकडून जोराचा शह बसल्यामुळें या बाजूचें सैन्य त्यानें काढून नेलें असें कारवारचे इंग्रज ज्येष्ठ व. ५ (१५-६-६३) स लिहितात. चैत्र व. १ ला प्रस्थान ठेविलेली ही मोहीम सुमारें ज्येष्ठी पौर्णिमेला परत फिरली; असा वरील उल्लेखांचा निष्कर्ष आहे.

या मुदतींत मोंगलाचा ससेमिरा काडीभरहि कमी झाला नव्हता. 'शास्ताखान व जसवंतसिंग शिवाजीशीं युद्ध करण्याच्या तयारीनें राहिले होते' असें डाग रजिस्टर म्हणतें (ले. ९३९, ज्येष्ठ व. १, ११-६-६३). मोंगलांच्या शहामुळेंच शिवाजीला दक्षिणेकडील मोहीम सोडावी लागली. आणि आषाढ वद्य ११ (२०।७)च्या पत्रांत मोंगल महाडाला येऊन भिडल्याचें लिहिलें आहे (ले. ९४६). मोंगलांनीं नेताजीचा वध केल्याची बातमी याच पत्रांत आहे. ती अर्थात् खोटी होती. परंतु जो पेंच पडल्यामुळें शिवाजी दक्षिणेकडील बेत सोडून परत फिरला तो पेंच हाच असावा (ले. ९५८). सर यदुनाथ म्हणतात त्याप्रमाणें मार्चांत (१६६३) सेनापतीचा पाठलाग झाला त्या पेंचामुळें जूनांतील कुडाळ व कारवारकडील स्वारी सोडावी लागली हा तर्क अर्थात् खोटा आहे (पहा ३ री आवृत्ति पृ. २३०).

परंतु अशी परिस्थिति असतां, मोंगलांच्या बाजूनें युद्धाची तहकुबी झाली नसतां आणि होण्याची फारशी आशा नसतांना शिवाजीनें ही दोन महिन्यांची छोटी स्वारी कशाकरितां काढिली असावी याचा बरोबर खुलासा होत नाहीं.

इंग्रजी पत्रांतील माहिती ही एवढीच आहे. उलट पक्षीं शिवाजीनें ज्या प्रांतांत स्वारी केली ; तो वेंगुर्ला, कुडाळ, बांदा हा प्रांत डचांच्या वेंगुर्ल्याच्या वखारीच्या कक्षेंत असून तेथील वस्तुस्थिति त्यांच्या लेखांत बरोबर प्रतिबिंबित झाली आहे ( ले. ९४०, ९५९, ९६३ इत्यादि ). तिचा आराखडा येणेंप्रमाणें :—

वैशाख व. १( २३ मे न्यूस्टाईल )स शिवाजी चार हजार घोडदळ व दहा हजार पायदळ घेऊन कुडाळ प्रांतीं आला. यामुळें वेंगुर्ल्याचे लोक भिऊन पळाले. वेंगुर्ल्याची जहागीर किंवा रक्षणाची जबाबदारी वाडकर लखम सावंत आपल्यावर आहे असें समजून शिवाजीला विरोध करण्याची खटपट पूर्वीपासूनच करूं लागला होता. त्यानें त्या कामासाठीं २००० होन खजिना व २४०० पौंड दारूगोळा डचांकडे मागितला; परंतु इंग्रजांचा धडा लक्षांत ठेवून नाइलाज म्हणून डचांनीं त्याला फक्त ६०० पौंड दारू पुरविली. शिवाय लखम सावंताबद्दलहि डच वखारवाल्यांच्या मनांत सहानुभूती नसल्यामुळें शिवाजीला प्रतिकार करण्याच्या बाबतींत उभयतांचें सहकार्य झालें नाहीं. आणि उलट सावंताचा हल्ला आल्यास परतविण्याची त्यांनीं तयारी केली. शिवाजीशीं युद्ध देण्याची आपली ताकद नाहीं असें पाहून आपला माल सुरक्षितपणाकरितां गलबतांवर भरून समुद्रांत तरंगत ठेवणें व सामोपचाराचें बोलणें लावणें व नजराण्यानें त्याला खूष करणें अशाच मार्गांचें त्यांनीं अवलंबन केलें. शिवाजीच्या लोकांनीं वेंगुर्ल्याच्या व्यापाऱ्यांकडून खंडण्या वसूल करण्याचा प्रयत्न करून पाहिला; परंतु व्यापाऱ्यांनीं त्यांचें कांहीं चालूं दिलें नाहीं. मोंगलांकडील नेटाचा शह न लागता तर कदाचित् शिवाजीनें कांहीं वसूल केला असता, अशीच सर्वांची समजूत होती. वेंगुर्ल्याला डचांच्या रक्षणाकरितां व्हर्सप्रीट नांवाच्या सेनापतीचें सैन्य हजर असल्यामुळें शिवाजीनें वेंगुर्ल्याची लूट केली नाहीं; तरी देखिल गोडीचें बोलणें लावून त्यांना बेसावध करण्याचा प्रयत्न केलाच असेंहि त्यांनीं लिहून ठेविलें आहे. शिवाजीच्या त्या वेळच्या उद्देशाची डच पत्रांवरून दिसणारी संपादणी अशी आहे. शिवाजी वेंगुर्लें लुटणार ही गोष्ट त्याच्या

परंतु अशी परिस्थिति असतां, मोंगलांच्या बाजूनें युद्धाची तहकुबी झाली नसतां आणि होण्याची फारशी आशा नसतांना शिवाजीनें ही दोन महिन्यांची छोटी स्वारी कशाकरितां काढिली असावी याचा बरोबर खुलासा होत नाहीं.

इंग्रजी पत्रांतील माहिती ही एवढीच आहे. उलट पक्षीं शिवाजीनें ज्या प्रांतांत स्वारी केली ; तो वेंगुर्ले, कुडाळ, बांदा हा प्रांत डचांच्या वेंगुर्ल्याच्या वखारीच्या कक्षेंत असून तेथील वस्तुस्थिति त्यांच्या लेखांत बरोबर प्रतिबिंबित झाली आहे ( ले. ९४०, ९५९, ९६३ इत्यादि ). तिचा आराखडा येणेंप्रमाणें :—

वैशाख व. १( २३ मे न्यूस्टाईल )स शिवाजी चार हजार घोडदळ व दहा हजार पायदळ घेऊन कुडाळ प्रांतीं आला. यामुळें वेंगुर्ल्याचे लोक भिऊन पळाले. वेंगुर्ल्याची जहागीर किंवा रक्षणाची जबाबदारी वाडकर लखम सावंत आपल्यावर आहे असें समजून शिवाजीला विरोध करण्याची खटपट पूर्वीपासूनच करूं लागला होता. त्यानें त्या कामासाठीं २००० होन खजिना व २४०० पौंड दारूगोळा डचांकडे मागितला; परंतु इंग्रजांचा धडा लक्षांत ठेवून नाइलाज म्हणून डचांनीं त्याला फक्त ६०० पौंड दारू पुरविली. शिवाय लखम सावंताबद्दलहि डच वखारवाल्यांच्या मनांत सहानुभूती नसल्यामुळें शिवाजीला प्रतिकार करण्याच्या बाबतींत उभयतांचें सहकार्य झालें नाहीं. आणि उलट सावंताचा हल्ला आल्यास परतविण्याची त्यांनीं तयारी केली. शिवाजीशीं युद्ध देण्याची आपली ताकद नाहीं असें पाहून आपला माल सुरक्षितपणाकरितां गलबतांवर भरून समुद्रांत तरंगत ठेवणें व सामोपचाराचें बोलणें लावणें व नजराण्यानें त्याला खूष करणें अशाच मार्गाचें त्यांनीं अवलंबन केलें. शिवाजीच्या लोकांनीं वेंगुर्ल्याच्या व्यापाऱ्यांकडून खंडण्या वसूल करण्याचा प्रयत्न करून पाहिला; परंतु व्यापाऱ्यांनीं त्यांचें कांहीं चालूं दिलें नाहीं. मोंगलांकडील नेटाचा शह न लागता तर कदाचित् शिवाजीनें कांहीं वसूल केला असता, अशीच सर्वांची समजूत होती. वेंगुर्ल्याला डचांच्या रक्षणाकरितां व्हर्सप्रीट नांवाच्या सेनापतीचें सैन्य हजर असल्यामुळें शिवाजीनें वेंगुर्ल्याची लूट केली नाहीं; तरी देखील गोडीचें बोलणें लावून त्यांना बेसावध करण्याचा प्रयत्न केलाच असेंहि त्यांनीं लिहून ठेविलें आहे. शिवाजीच्या त्या वेळच्या उद्देशाची डच पत्रांवरून दिसणारी संपादणी अशी आहे. शिवाजी वेंगुर्लें लुटणार ही गोष्ट त्याच्या

दक्षिणेकडील आगमनानंतर लोकांना इतकी अपरिहार्य वाटली कीं, सुरत व मच्छलीपट्टणाकडे तर त्याबद्दल शंकाच राहिली नव्हती. शिवाजी वेंगुर्ल्याला आल्यापासून महिन्याच्या आंत सुरतकर डचांनीं मच्छलीपट्टण, बटेव्हिया इत्यादि ठिकाणीं 'आमची वेंगुर्ल्याची रहाती इमारत बंडखोर शिवाजीनें लुटली आणि लोक पळून गेले' असें लिहिलें आहे. डचांच्या शत्रूंना हा बनाव घडल्यास अर्थातच पाहिजे होता. डचांनीं कोचीन इत्यादि जिंकून घेतल्यामुळें पोर्तुगीज हे डचांचे हाडवैरी बनले होते. त्यांनीं शिवाजीच्या ह्या प्रांताकडील आगमनाचा फायदा घेऊन डचांना हांकलून लावण्या-करितां त्याला १५०००० होनांचा नजराणा देण्याचें आमिष दाखविलें. परंतु शिवाजीला त्यांचें समाधान करितां आलें नाहीं. तेव्हां शिवाजीच्या मनांत काय आहे याचा बरोबर अंदाज न लागून गोवेकरांनींहि सरहद्दीवर सैन्याची तयारी केली. परंतु शिवाजीनें त्यांनाहि सामोपचाराचें पत्र लिहून प्रकरण मिटतें घेतलें.

या वेळीं शिवाजीनें पत्करलेली भूमिकाहि लक्षांत घेण्यासारिखी आहे. 'विजापूरच्या सुलतानानें आपल्यावर मेहेरबान होऊन आपल्याला कुडाळ प्रांत बहाल केला आहे आणि आपण त्या प्रांताचा ताबा घेण्याकरितां आलों आहों' अशीं पत्रें त्यानें रेसिडेंट आदिकरून मंडळीकडे पाठविलीं. अधिकारी या दृष्टीनें आपलें स्वागत करण्याकरितां डचांनीं प्रतिनिधि पाठवावा असेंहि त्यानें सुचविलें होतें. त्याप्रमाणें डचांनीं दोन्ही पाठविले. पुढें कुडाळ प्रांतांत सुव्यवस्था करून शिवाजी आपल्या मुलखांत परत गेला (पृ. २३८). ले. ९४८ हें गोव्याच्या व्हाइसरॉयाकडून रावजी सोमनाथ पंडित यास श. १५८५ आषाढ व. १४ (२३-७-६३) स लिहिलेलें पत्र आहे. या पत्रावरून रावजी सोमनाथ यास अंदाजें आषाढ शुद्ध पक्षांत कुडाळ प्रांतावर सुभेदार नेमून शिवाजी उत्तरेकडे गेला असें समजतें.

शिवाजीनें ही स्वतंत्र व्यवस्था केली, तथापि ती ज्या विजापूरच्या सत्तेला मान्य होती असें जाहीर केलें ती सत्ता त्या वेळीं ह्या जाहीरनाम्याचा प्रतिकार करण्याला मोकळी नव्हती. विजापूरचा अली आदिलशाहा या वेळीं कान-ड्याच्या राजाचें पारिपत्य करण्यांत गुंतला होता (ले.९६१). लखम सावंत शिवाजीला प्रतिकार करण्याची खटपट करीत होता परंतु त्याला यश आलेलें दिसत नाहीं. आणि या वेळीं शिवाजीचा सुभेदार निर्धास्तपणें प्रस्थापित झाला.

पण विजापूरकरांचे हात मोकळे होतांच त्यांनीं शिवाजीच्या ह्या कृत्या-बद्दल मोबदला घेण्याचा उद्योग आरंभिला. फोंड्याचा सुभेदार 'तुणबेग काळो' यानें लखम सावंत, केशव नाईक, राम सेणवी आणि चंदाराणा अशा चार देसायांच्या साहाय्यानें शिवाजीला कुडाळांतून घालवून लावावें असा विजापूरच्या राजाचा हुकूम आला. अशा रीतीनें सरसुभेदार आणि वरील देसाई यांच्यांत एकमत होणें ही गोष्ट अशक्य समजली जात होती. परंतु आत्मसंरक्षणाच्या दृष्टीनें, ह्या प्रांतांतील शिवाजीची जबरदस्ती पाहून पोर्तुगीजांनींच त्याला आळा घालण्याकरितां अशी एकी घडवून आणिली, असें त्या वेळच्या पत्रांत लिहिलें आहे. या सैन्याचा पराजय झाल्यास दुसरें सैन्यहि पाठविण्याची तयारी याच वेळीं चालू असल्याचीहि बातमी त्याच पत्रांत दिली आहे.

परंतु शिवाजीनें कुडाळ प्रांत पद्धतशीर रीतीनें व्यापिला होता. डचांशीं आपण स्नेहानें वागतों त्यामुळें किंवा लखम सावंताचा त्यांच्यावर आधीं-पासूनच डोळा होता यामुळें लखम सावंतापासून वेंगुर्ल्याला उपसर्ग पोंचूं नये म्हणून शिवाजीनें कांहीं शिपाई वेंगुर्ल्याकडे पाठविले आहेत असें वेंगुर्ल्याच्या एका व्यापाऱ्यानें श्रावण व. ११ ( ४-८-६३ ) च्या पत्रांत लिहिलें होतें. अशा प्रकारें स्थायिक होऊं पाहणाऱ्या शिवाजीचें उच्चाटण करण्यासाठीं विजापूरकरांकडून बराच पद्धतशीर प्रयत्न होणार होता. त्याची योजना गिफर्डनें गोव्याहून दिलेली ( ले. ९४६ ) बरीच विस्तृत आहे:— वर सांगितल्याप्रमाणें सर्वांनीं एकी करून शिवाजीला केवळ कुडाळांतूनच नव्हे तर राजापूर व खारेपाटण यांतूनहि काढून लावावें, असें अलीनें फर्माविल्याचें गिफर्ड सांगतो. तीं शहरें ताब्यांत येण्यापूर्वींच रुस्तुमजमाकडून काढून आदिलशाहानें तीं महमदखानाला देऊन टाकिलीं. तेव्हां महमद-खानानेंहि आपलें सैन्य सज्ज करून तीं घेण्याकरितां कमर बांधिली. तेवढयावरच न थांबतां अलीनें दाभोळ, चिपळूण इत्यादि मामल्यांचीहि स्वेच्छेनें खैरात करून ते अफजलखानाचा पुत्र फाजलखान याच्या हवालीं केले व शिवाजीला ते सोडून देण्याबद्दल ताकीदच केली. हा कार्यक्रम अलीच्या नेहमींच्या ताकदीच्या किंवा तडफेच्यापेक्षां बराच मोठा वाटतो. या कार्यक्रमाच्या पूर्ततेकरितांहि नेहमींच्या सरदारांपेक्षां अधिक सेनापती आलेले दिसत नाहींत. तेव्हां हा जोर त्यांना कोठून मिळाला हा प्रश्नच

आहे. शाहिस्तेखानाला एकदां दुखविल्यामुळें तो खवळून प्रतिकाराची जबर तयारी करण्यासाठीं विजापूरकरांनाहि त्यानें हिंमत भरली नसेल असें कोणीं म्हणावें ?

श. १५८५ च्या आरंभीं विजापूरच्या राज्यांत असा नवीन बनाव बनत असल्याचें दिसून येतें. बडीसाहेबीण ही स्वतः शहाजी इत्यादींच्या पक्षाची द्वेष्टी होती हें मागें सांगितलेंच आहे. तिच्या गैरहजेरींत झालेल्या घडामोडींतून तिचा हात काढून घेतल्यामुळें थोडी अव्यवस्था झाली आणि पक्षापक्षांचा करोलपणाहि कमी झाला. परंतु ती परत येतांच फिरून पक्षोपपक्षांना ऊत येऊन दक्षिणी पक्षाला वाईट दिवस आले; आणि दक्षिणी पक्षानें आपल्या बाजूनेंहि विरोध करण्यास सुरुवात केली. श. १५८५ च्या चैत्रांत मोंगल नेताजीचा पाठलाग करीत विजापुरापर्यंत आल्यावेळीं अल्लीशहा, बडीसाहेबीण व सर्व सरदार भेदरून जाऊन रक्षणाकरितां बंकापुरांत पळून गेले. परंतु बहलोलखानाच्या आईनें आपल्या मुलाचें व दरबारी पक्षाचें वांकडें आहे हें लक्षांत ठेवून त्यांना शहरांत घेण्याचें नाकारिलें. इकडे रुस्तुमजमानेंहि मोंगलांना भेटून स्वतंत्रपणें कांहीं अटी ठरविल्या ( ले. ९२७ ). मोंगलांच्या आश्रयानें रुस्तुम-जमासारख्यांच्या उलट हालचाली होणार असल्या तर आपणहि मोंगलांना मिळून वागावें अशासारखी प्रतिकारबुद्धि अल्लीच्या पक्षांत संचारून त्या-प्रमाणें त्यांच्याहि हालचाली सुरू झालेल्या दिसतात. कोंकणांतील प्रांतांत शिवाजीच्या विरुद्ध हुकूम फिरले, रुस्तुमजमाला खुद्द त्याच्या जहागिरींत व शहरांतहि अल्लीशाहाच्या हुकुमामुळें प्रवेश मिळाला नाहीं, आणि बंका-पुरांत प्रवेश नाकारणाऱ्या बहलोलखानालाहि प्रायश्चित्त मिळालें. या सुमारास बहलोलखान व शहाजी यांना बेड्या घालण्यांत आल्या आणि सिद्दी जौहरचा जांवई मसूद व मुलगा अजीजखान यांनाहि अडकविण्याचे प्रयत्न झाले ( ले. ९४६, आषाढ व. ११, २०-७-६३ ). ह्या सर्व हालचाली एका सूत्रानें चालल्यासारख्या दिसतात. आणि राजकारणांत याचें प्रत्यंतर, शिवाजीच्या विरुद्ध व मोंगलांच्या बाजूचें म्हणतां येईल, असें आल्यामुळें ही उठावणी मोंगलांना अनुकूल होती असें म्हणावें लागेल. श. १५८६ वैशाख व. ५ ( ५-५-६४ ) च्या डाग रजिस्टरमधील उल्लेख बराच स्पष्ट आहे. ' आदिलशाहा मोंगलांचा मांडलिक झाला आहे' ( ले. ९९१ ). आदिलशाहानें शिवाजीवर पाठविलेलें सैन्य गोव्याजवळ कडोलीपर्यंत येऊन ' चौलपर्यंत

शिवाजीचा सर्व मुलुख घेण्याकरितां ' प्रवृत्त झालें होतें (ले. ९९२). हा पुढील वर्षाचा बनाव आधींपासूनच होत असला पाहिजे. यांतील मुख्य सूत्रचालक कोण होते याबद्दलचें दिग्दर्शन वर केलेंच आहे. खवासखान इत्यादि कर्तबगारांबद्दल पुढें बोलण्याची पाळी येणारच आहे.

शहाजीच्या कैदेचा हा प्रकार सुमारें आषाढ शुद्धांतला असावा. ह्याच्या मार्गे तो फ़ारसा नेतां येणार नाहीं. बहलोलखानाच्या आईनें सुलतानाला बंकापुरांत येऊं दिलें नाहीं, त्याबद्दल बहलोलखानानें माफी मागावी म्हणून आदिलशाहानें शहाजीला त्याच्याकडे पाठविलें होतें. बहलोलखानहि यापुढें टंगाळमंगळ करूं शकला नाहीं. कारण अली आतां सर्व स्वाऱ्यांत व विशेषत: कर्नाटकांत यशस्वी झाल्यामुळें त्याच्या राज्यांतील धामधुमी बंद होऊन सर्वत्र शांतता नांदत होती. शेवटीं शहाजीच्या सांगण्यावरून बहलोलखान सुलतानाकडे येण्यास निघाला. शहाजीनें आपल्याबरोबरच आलें पाहिजे अशी त्यानें ( बहुधा दग्याच्या संशयानें ) अट घातली. ती मान्य करून शहाजी त्याच्याबरोबर गेला. त्याप्रमाणें ते दोघेजण बरोबर गेले असतां सुलतानानें दोघांनाहि पकडिलें. पण शहाजीच्या बेडया लगेच दोन दिवसांनीं काढण्यांत आल्या व त्याला सुलतानाजवळ ठेविण्यांत आलें. वरील सर्व गोष्टींचें धोरण अर्थात् मोंगलांना अनुकूल असें उघडच दिसतें. परंतु अडचणींत सांपडलेला शिवाजी विजापूरदरबारांतील पक्षोपपक्षांत आपल्याला अनुकूल असा बदल घडवून आणण्याकरितां मुद्दाम अशी दूरची कामगिरी अंगावर ओढून घेईल हें संभवत नाहीं. त्यानें स्वत:च्या किफायतीचें एकादें धोरण ठरवून ही स्वारी काढिली असली पाहिजे. दरबारांतील पक्षांवर कांहीं आपल्या वतीचा दाब पाडण्याची शिवाजीची इच्छा होती असें गृहीत धरणारांना त्या दृष्टीनें त्याला अपयशच पदरांत घ्यावें लागलें असें मान्य करावें लागेल. कारण, तो ती स्वारी आटपून परत जातो न जातो तोंच त्याच्यावर विजापूरदरबारनें शस्त्र उचलल्याचें दिसतें. म्हणजे शिवाजीच्या बाजूचा पक्ष त्याच्या स्वारीनें प्रबळ होण्याऐवजीं त्याच्या विरुद्ध पक्षाचाच त्यापुढें जोर झाल्याचा देखावा दिसतो.

राजकारणामध्यें संमिश्र उद्देश ( mixed motives ) गृहीत धरणें भाग पडतें. तेव्हां शिवाजीच्या या हालचालींच्या मुळाशीं फार दूरदर्शीपणाचा एकादा विचार असण्याचा संभव दिसतो. सह्याद्रीच्या आसऱ्यामुळें कुडाळ,

फोंडा हा भाग रायगड टापूसारखाच दुर्गम होता. तेव्हां आणीबाणीच्या प्रसंगीं उपयोगी पडावें असें दुसरें आश्रयस्थान निर्माण करण्याचा तर शिवाजीचा उद्देश नसेलना ? अशी राहून राहून शंका येते. तशा अन्य आश्रयस्थानाची जरुरी भासविणारा खडतर प्रसंग म्हटला म्हणजे तूर्त अनुभवास येत असलेला मोंगलांचा ससेमिरा. शाहिस्तेखानानें कोणत्या प्रकारें शिकस्त चालविली होती त्याचें वर्णन वर केलेंच आहे. शाहिस्ते-खानावर रात्रीं छापा घालण्याचा व शक्य तर त्याचा प्राण घेण्याचा प्रयत्न करून पाहिला तोहि फसला. शेपटीवर पाय दिल्याप्रमाणें डिवचलेला खान व मोंगल सत्ता हीं स्वत:वर जोरानें उलटून पडणार याबद्दल शंकाच राहिली नव्हती. स्वत:च्या सुरक्षिततेकरितां आणि आणीबाणीचा प्रसंग आला तर राज्याचा आश्रय म्हणून कुडाळकडे धूम ठोकतां यावी यासाठीं कुडाळकडे व्यवस्था करणें आवश्यक होतें. कुडाळच्या आसपास परदेशस्थ व्यापाऱ्यांचीं भरभराटींत असलेलीं ठाणीं होतीं. गोवेकर, डच व इंग्रज इत्यादिकांशीं स्नेह ठेवून भरपूर युद्धसामग्री, दारूगोळा वगैरे सामोपचारानें मिळाला असता. इंग्रजांचा हात सुरतेंत अडकला असल्यामुळें दंडाराजपुरी घेण्यांत त्यांची मदत आपल्याला होऊं शकत नाहीं हें चाणाक्ष शिवाजीच्या तेव्हांच लक्षांत येऊन त्यानें डचांच्या मदतीवर लक्ष ठेवण्यास सुरवात केली होती. डचांना अनुकूल करून घेण्याच्या दृष्टीनें त्यांच्या व्यापारांतहि तो सहकारी होणार होता ( पत्रसार पृ. २३८ ). आणि सर्वांत अत्यंत महात्त्वाची बाब म्हटली म्हणजे कुडाळांतील वास्तव्य धोक्याचें नव्हतें ही होय.

७. **' कोंढाणियाचे खालीं वेढ्यास आला '**—महाराज कुडाळ-कडून परत आले, तेव्हां पावसाळ्यास सुरुवात असल्यानें तात्पुरती स्थिर-स्थावरता होऊन त्यानंतर युद्धाला तोंड लागलें नाहीं. मोंगली सैन्य एक इंचहि मागें न हटतां आपल्या ठिकाणीं पाय रोवून बसलें होतें. पण शाहिस्ते-खान बादशहाची इतराजी झाल्यामुळें रंजीस झाला आणि सुभा तगीर होणार असल्यानें युद्धाचे नवे बेत करण्याचें त्यानें सोडून दिलें. आणि कार्तिक-मार्गशीर्षापर्यंत सर्वत्र वरवर तरी स्तब्धता पसरली. शिवाजीमहाराजहि या वेळीं स्वस्थ राहिलेले दिसतात. शाहिस्तेखानावर अचानक छापा घालण्यानें मोंगली छावणींत गोंधळ उडवून देण्यांत त्यांना यश आलें होतें. मोंगलांची हिंमत खचून औरंगजेबानें शाहिस्तेखानाची बदली केल्यामुळें

सर्वत्र विस्कळीतपणा आला होता. महाराजांच्या पराक्रमामुळें मराठ्यांची हिंमत वाढली आणि कुडाळकडे तितक्यांतच यशस्वी स्वारी काढण्याची योजना करून सैन्याकडून थोडें उत्तेजक काम करून घेऊन महाराजांनीं उत्तम सेनापतित्व दाखविलें. त्याचाहि इष्ट परिणाम झाला. चैत्राच्या पहिल्या पंधरवड्यात जो सर्व बाजूंनीं कोंडमारा झाल्याचें दिसून आलें होतें ती स्थिति आतां पालटली आणि मराठे पावसाळ्यानंतरच्या मोहिमेकरितां थोडे ताजेतवाने होऊन राहिले.

मराठ्यांच्या या वेळच्या वाढत्या हिंमतीचें प्रत्यंतर ले. ९८२ ह्या शिवाजीमहाराजांनीं मोंगल अधिकाऱ्यांना लिहिलेल्या पत्रांत मिळतें. ह्या पत्राचें मूळ पहावयास मिळेल तर त्याबद्दल अधिक निश्चयानें विधान करितां येईल. तथापि त्यांतील विचार शिवाजीच्या मन:स्थितीचें उत्तम दिग्दर्शन करितात. मोंगलांशीं चाललेल्या झगड्यांत आलेल्या अनुभवाला धरून महाराजांनीं त्यांत दमदार आत्मविश्वास प्रगट केला आहे. विशेषत: ‘ आपल्या भूमीचें रक्षण करणें माझें कर्तव्य आहे आणि तें बजावण्यास मीं चुकणार नाहीं ’ हें वाक्य पूर्वींचीं निराशेचीं चिन्हें नाहींशीं झाल्याची ग्वाही देतात.

पावसाळा ओसरतांच मोंगलांचा सेनापती जसवंतसिंग हा बहुधा आगाऊ ठरलेल्या बेताप्रमाणें सिंहगडास वेढा घालण्याकरितां आला. शाहिस्तेखानानें उघडा प्रांत केवढाहि जिंकला तथापि जोंपर्यंत किल्ले त्याच्या हवालीं झाले नव्हते तोंपर्यंत तेथील ताबा डळमळीत होता हें मोंगल जाणून होते. इतक्या दिवसांत शाहिस्तेखानाला पुणें प्रांतांत राहतां आलें असलें तर तें केवळ त्यानें चारी बाजूंला सैन्य पेरून शिवाजीला सर्व ठिकाणीं गुंतवून ठेविलें यामुळेंच होतें. परंतु असें फार वेळ चालणें शक्य नाहीं हें तो जाणून होता. गेल्या एक दोन वर्षांत आणि नुकत्याच काढलेल्या स्वारीनें शिवाजीनें आपल्या पाठीमागें थोडासा आधार संपादून ठेविला होता. तेव्हां तो आतां त्रास देण्यास सोडणार नाहीं, अशा विचारानें सिंहगडाला वेढा देण्याचा विचार होऊन जसवंतसिंग कार्तिकांत तयारीला लागला व मार्गशीर्षांत गडाखालीं येऊन बसला. रजपूत लोक वेढा फोडण्यांत जितके धाडसी म्हणून गणले जातात तितके वेढा घालण्यांत नसून त्यांची तरवार मैदानावर चांगली चालते. कोंडाण्यासारख्या किल्ल्याला वेढा घालण्याचें त्याला अर्थात् जमलें नाहीं. चार पांच महिने अशा रीतीनें गेल्यावर मुअज्जमकडून त्याला बहुधा

सूचना आल्यामुळें श. १५८६ चैत्र वद्य १३ (१४।४।६४) रोजीं त्यानें गडावर चढून जाण्याचा प्रयत्न केला, परंतु गडकऱ्यांनीं तो मोठ्या शौर्यानें परतविला आणि सर्व माच्या आपल्या ताब्यांत घेतल्या. ह्या वेळीं दारूगोळ्याच्या स्फोटामुळें जसवंतसिंगाचें फार नुकसान झालें. आणि आलेल्या पराजयाबद्दल आपला मेहुणा भावसिंग हाडा याच्याशीं त्याचें भांडण होऊन व पावसाळा जवळ आल्यामुळें जसवंतसिंग कोंडाण्याचा वेढा उठवून गेला (ज्येष्ठ शु. १४, २८।५।६४) आणि सिंहगड शिवाजीच्या ताब्यांत राहिला. महाराज गडावर यानंतर ज्येष्ठ वद्य १ (३०।५।६४) ला गड पाहाण्यास गेले.

सिंहगडास जसवंतसिंग वेढा घालण्यास आला, त्याच्या सैन्याची फिकीर केलेली दिसत नाहीं. जसवंतसिंग सिंहगडास वेढा घालीत आहे, म्हणजे शिवाजी तिकडे गुंतून राहिला असला पाहिजे, ह्या लोकांच्या कल्पनेचा फायदा घेऊन मार्गशीर्ष वद्य २ (६।१२।६३)सच महाराजांनीं सुरतेकडे कूच केलें.

**८. युद्धखर्चाची वसुली किंवा सुरतेची लूट**—१५८५ पौष वद्य ३ (५।१।६४)स शिवाजीच्या आगमनाची सुरतेस प्रथम बातमी लागल्यापासून तों पौष व. ८ ला तितक्याच त्वरेनें आणि कोणाला न समजूं देतां शिवाजी सुरतेहून परत स्वदेशीं निघाला. येथपर्यंतच्या चारपांच दिवसांची सविस्तर हकीकत पत्रसारसंग्रहांत अस्सल डच व इंग्रजांच्या पत्रांवरून दिली आहे. प्रो. पिसुर्लेकरांच्या वर उल्लेखिलेल्या लेखांत सुचविल्याप्रमाणें वसईकर पोर्तुगीजांनीं शिवाजीला सुरतेस जाण्यास मदत केली असण्याचा संभव आहे (ले. १०३८). परंतु त्याबद्दल निश्चित विधान आपल्याला करितां येण्यासारखें नाहीं. संग्रहांत दिलेल्या लेखांवरून साधारणपणें सुरतेच्या लुटीबद्दल खालील कल्पना होतात. (१) सुरतेवर चालून येतांना शिवाजीनें 'आपण बादशाही सरदार असून बादशाही कामाकरितां अमदाबादला जात आहों' असें वाटेंत सांगून लोकांचा संशय जागृत होऊं दिला नाहीं. (२) सुरतेचा सुभेदार व किल्लेदार या उभयतांनींहि आपलें प्रजारक्षणाचें कर्तव्य बजावलें नाहीं. आणि त्यामुळें कित्येक सधन व्यापारी व नागरिक ह्यांचें फार नुकसान झालें. (३) डच व इंग्रज ह्यांनीं आपल्या ठिकाणीं बंदोबस्त करून ठेविला होता, त्यामुळें त्यांना शिवाजीच्या लोकां-

कडून फार त्रास झाला नाहीं. ( ४ ) स्वतःच्या अंमलदारांच्या भ्याडपणाशीं तुलना करितां हें कृत्य मोठ्या शौर्याचें असें समजलें जाऊन उभयतांचा, परंतु विशेषतः इंग्रजांचा मोठा गौरव करून औरंगजेबानें एक वर्षाची जकात सर्वांना माफ केली व पुढें शेंकडा अर्धा टक्याची सूट दिली. ( ५ ) शिवाजीच्या उद्देशांबद्दलहि त्यांत कांहीं विधानें केलेलीं आहेत. खुद्द शिवाजीनें अँटनी स्मिथ नांवाच्या इंग्रजाजवळ काढलेले उद्गार ले. ९७७ मध्यें दिले आहेत; ते असेः—कोणा व्यापाऱ्यांचें नुकसान करण्याचा आपला इरादा नसून औरंगजेबानें माझ्या मुलखावर स्वाऱ्या करून प्राणहानी केली त्याचा सूड उगविण्याची माझी इच्छा आहे. इंग्रज व डच व्यापाऱ्यांनीं मला कांहीं द्रव्य द्यावें म्हणजे झालें. (६) शिवाजीच्या सैन्याची संख्या, त्याची सुरतेबाहेरील प्रवासी छावणी, त्यानें एकंदर मिळविलेली लूट व पैसा उकळण्याकरितां घरें जाळण्यापासून लोकांचे हात व डोकीं कापण्यापर्यंत केलेले नानाविध अत्याचार यांची किळसवाणी कहाणी अतिशयोक्तीनें वर्णन करून, शिवाजीच्या या विलक्षण भरारीबद्दल कांहींच कौतुक वाटूं नये अशी साधारणपणें ह्या वृत्तांताची रचना आहे. इंग्रज लोक स्वतःच्या पराक्रमाबद्दल फुशारकीनें बोलतात परंतु वर प्रदर्शित केलेले शिवाजीचे विचार लक्षांत घेतले म्हणजे इंग्रज व डच व्यापाऱ्यांची सुरक्षिततेकरितां माल गलबतांत भरून स्वाली मरीनकडे पळवून नेण्याची खोड पाहिली, म्हणजे हत्यारबंद व तटबंदी गढीवजा वखारींच्या वाटेस जाण्यापेक्षां अरक्षित अशीं धनवानांचीं घरेंच रिकामीं करणें त्याला अधिक किफायतशीर वाटलें असलें पाहिजे यांत शंका नाहीं. शिवाजी जवळ आल्याची बातमी आल्यावर इंग्रजांनीं प्रेसिडेंटला पुढें घालून मोठी मिरवणूक काढल्याचें लिहिलें आहे. सदर मिरवणूक, शिवाजी शहराच्या वेशीजवळ येण्याच्या आंतच वखारींत जाऊन पोंचल्याचें तत्कालीन पत्रांतच लिहिलें आहे ! उत्तम तोफा व दारूगोळा बाळगणाऱ्या लोकांच्या हातून लुटींत गुंतलेले बेसावध किंवा प्रत्यक्ष चाल करून येऊं पहाणारे दोन चार लोक मेले याची प्रौढी गाण्यासारखें काय आहे हें समजत नाहीं. पूर्वीचे इंग्रज वगैरे व्यापारी आजकालच्या प्रमाणें असहाय व बिनहत्यारी नसून ते चांगल्या मजबूत घरांत रहात असत. एवढेंच नव्हे तर गरजूंना युद्धसामग्री पुरविणें हा त्यांच्या व्यापाराचा एक भाग होता एवढें सांगितलें म्हणजे पुरें होईल. विलायतेंतील आपल्या धन्यांना स्वतःची कामगिरी फुगवून सांगण्याकरितां

लिहिलेल्या पत्रांचें ( ले. ९७४ ) वास्तविक स्वरूप लक्षांत घेऊनच आधुनिक इतिहासकारांनीं विधानें करावीं. तेच लोक आपसांतील बिंगें काढूं लागले म्हणजे खरें बाहेर येतें. शिवाजीच्या पाषाणहृदयाचें वर्णन करणाऱ्या अँटनी स्मिथबद्दल पुढें त्यांनींच खरी स्थिति लिहिली आहे ( ले. १०५०). जकातीची सूट मिळाल्याबद्दलचीं त्यांचीं विधानें किती वारेमाप होतीं आणि अखेरीला तीं कशीं खोटीं ठरलीं ( ले. ९९४ ) हें अस्सल साधनांवरूनच समजतें. तात्पर्य, आज आपल्यापुढें एकतर्फी पुरावा आहे. शिवाजीमहाराजांच्या बाजूचा पुरावा आपल्याला उपलब्ध नाहीं. शिवभारत, पर्णालपर्वतग्रहणाख्यानासारखे ग्रंथ जितकी हकीकत देतात तेवढ्यापुरता त्यांचा फार चांगला उपयोग होतो. यामुळें तसे इतर ग्रंथ मिळण्याबद्दल चुटपुट लागून राहते. पर्णालाचा कर्ता जयराम महाराजांच्या सुरतेच्या दुसऱ्या लुटीबद्दल ' हिंदींत व मराठींत मी वर्णन केलें आहे ' असें म्हणतो ( पर्णाल, अ. १ श्लो. २९ ). तसेंच त्यानें किंवा दुसऱ्या कोणीं आपल्या दृष्टीनें केलेलीं वर्णनें मिळतीं तर सत्यशोधनाला कांहीं अंशीं मदत झाली असती. बखरी कांहीं अंशीं उपयोगी पडण्यासारख्या आहेत, परंतु त्यांवर पुराणग्रंथांची पडलेली छाप, अपुरी माहिती, अज्ञानानें झालेला कालविपर्यास ह्यांबद्दल दुरुस्त्या करून मगच त्यांचा उपयोग करणें इष्ट होईल.

महाराजांनीं 'सुरतेची आपण सुरत घेतली' अशी प्रौढी मिरविण्यासारखा हा प्रसंग होता. सुरतेसारखें सधन शहर, ठाण्याची राजधानी, व्यापार व नौकानयनाचें केंद्र, खुद्द औरंगजेबाच्या डोळ्यांदेखत, त्याचें सैन्य मराठ्यांच्या छातीवर बसलें होतें अशा वेळीं तें घेणें हा पराक्रम केवळ असामान्य होता. शिवाजीची त्या वेळची ख्याति अशी झाली होती कीं, ' त्याचें शरीर हवामय असून त्याला पंखहि आहेत; एरव्हीं तो एकाच वेळीं अनेक ठिकाणीं प्रकट होतो; ह्या बातम्या शक्य तरी कशा होतात ? ' सुरतकर इंग्रजांनीं कारवारला सुरतेच्या लुटीनंतर चार पांच महिन्यांनीं लिहिलेलें श. १५८६ आषाढ शु. १३ ( २६-६-६४ )चें पत्र ( ले. ९९६ ) हें सर्वच अत्यंत वाचनीय असें आहे.

**९. शहाजीचा मृत्यु**—राजगडावर येण्याकरितां सुरतेहून निघाल्यानंतर महाराज कोठें तरी वाटेंतच असतांना तिकडे कर्नाटकांत (सभा. ६५ ) शहाजीमहाराज माघ शु. ६ ( २३-१-६४ )स मरण पावले. त्यानंतर

बातमी कळण्यास आठ-पंधरा दिवस सहज लागले असतील. म्हणजे महाराज गडावर येऊन पोंचले असतील नसतील तों त्यांस पितृनिधनाची दुःखकारक बातमी समजली! त्या वेळचा शिवाजीचा व जिजाबाईचा शोक व अग्निप्रवेश करण्याचा तिचा निश्चय वगैरेबद्दल थोडक्यांत परंतु हृदयस्पर्शी भाषेंत सभासदानें वर्णन केलें आहे (पृ. ६५–६६). परंतु त्यामध्यें शिवाजीचें शोकाचें भाषण बनवून घातलें आहे. त्यांत 'मिरजा राजाची भेट घेऊन दिल्लीला गेलों, पातशाहाची भेट घेऊन मागती आपल्या राज्यास आलों, नंतर गडकोट घेतले त्याबद्दल समाधानपत्रें वारंवार आपणास येत होतीं' वगैरे उल्लेख घातले आहेत. त्यावरून सुरतेच्या दुसऱ्या लुटीनंतर शहाजी मेला अशी सभासदाची समजूत दिसते. ती अर्थात् चुकीची आहे.

शहाजीच्या मृत्यूचा राजकारणाच्या ओघावर काय परिणाम होण्यासारखा होता याची कल्पना करतां येत नाहीं. शहाजीच्या मध्यस्थीनें म्हणून झालेला तह अस्तित्वांत असेल तर तो त्याच्याच हयातींत मोडल्याचें मागें लिहिलेंच आहे. शिवाजीच्या चळवळीचा परिणाम शहाजीच्या बढतीवर होणें ही गोष्ट अलीकडे बरींच वर्षें थांबली असली पाहिजे यांत शंका नाहीं. तथापि कौटुंबिक संबंधांवरच पुष्कळ गोष्टी अवलंबून असलेल्या त्या युगांत, शहाजी-महाराजांची विजापूरच्या अमलाखालील सरदारी म्हणजे एक प्रकारचा शिवाजीचा जिव्हाळ्याचा मनुष्य ओलीस ठेवल्यासारखा होता. तो संबंध आतां कायमचा तुटला. शिवाजीच्या व जिजाबाईच्या राजकारणी मनांवरील कौटुंबिक प्रेमानें जड भासणारें भिडेचें बंधन तुटलें आणि विजापूरकरांशीं वागतांना यापुढें संकोच बाळगण्याचें कारण राहिलें नाहीं.

**१०. शिवाजीची चढती कमान**—महाराजांच्या नशिबाची चढती कमान लागल्याचें या वेळीं स्पष्ट दिसतें. ज्येष्ठ व. १ (मे ३०)स महाराज सिंहगडास आले त्या वेळीं पावसाळा सुरू झाला नव्हता. तेव्हां औरंगजेबाचें (जसवंताचें) सैन्य परत गेलें असें पाहून तितक्यांतच महाराजांनीं मोंगलांच्या ताब्यांतील अहमदनगरापर्यंत मुलूख लुटला आणि कदाचित् औरंगाबादेपर्यंत दौड मारण्याचा त्यांचा विचार होता (ले. १००३).

मागें वर्णन केल्याप्रमाणें शिवाजीविरुद्ध विजापूरकरांनीं पत्करलेल्या चढाईच्या धोरणानुसार बहुधा १५८५च्या आश्विनकार्तिकापासून बाहेर

निघालेलीं सैन्यें १५८६ च्या वैशाखामध्यें गोव्यापासून दोन दिवसांच्या अंतरावर असलेल्या कोडोली गांवापर्यंत आलीं होतीं. आणि चौलपर्यंत शिवाजीचा सर्व मुलुख जिंकण्याची उमेद धरून त्यांचा कार्यक्रम आंखलेला होता ( ले. ९९२ ). त्या सैन्याचा सेनापति सिद्दी जौहरचा मुलगा अजीजखान हा होता. व त्याला ' शिवाजीच्या फौजेबरोबर लढाई करून कुडाळ परगण्यामध्यें बादशाही दौलत रुजू ' करण्याच्या कामीं लखम सावंत वगैरे सरदेसाई मदत करीत ( ले. ९९८ व १००१ ). वैशाख व. ८ ( ८।५।६४ ) स अजीजखानाचें सैन्य बालाघाटांतून उतरून कुडाळचा शिवाजीचा सुभेदार रावजी पंडीत याच्यावर चालून आलें. रावजी पंडीत राजापुराकडे माघारा हटून तेथें स्वसंरक्षण करीत राहिला; अजीजखानानें लखम सावंताची गांठ घेऊन लबाडीनें तें काम त्याच्या एकट्यावरच सोंपवून दिलें. परंतु लखम सावंत झटून लढल्यामुळें त्याला यश येऊन कुडाळ प्रांतांतील मराठयांना अजीजखानाच्या मदतीनें कुडाळ सोडून जावें लागलें. या युद्धामध्यें व्यक्तिशः अजीजखानाच्या नरमपणामुळें मराठ्यांचें फार नुकसान झालें नाहीं. मध्यंतरीं ज्येष्ठ व. ११ ( १०।६।६४ )स अजीजखान मृत्यु पावला आणि त्याचे जागीं शिवाजीचा दोस्त रुस्तुमजमा याचीच नेमणूक झाली ( ले. ९९९ व १०११ ). परंतु इतक्यांत पावसाळा चालू झाल्यामुळें युद्ध सहजच तहकूब राहिलें. विजापूरदरबारांत शिवाजीवर हल्ला करण्याचें मनापासून ठरलें असलें तरी त्या हल्ल्याचें नेतृत्व ज्यांच्या हातीं आलें ते अजीजखान व रुस्तुमजमा दोघेहि शिवाजीचे दोस्तच असल्यामुळें शिवाजीला ही चढाई तितकी त्रासदायक झाली नाहीं; आणि डच रेसिडेंटचेंहि ' विजापूरकर हें युद्ध केवळ मोंगलांच्या समाधानाकरितां करीत असून त्यांचें खरें मन त्यांत नाहीं ' असें मत झालें ( पृ. ४६८ ). परंतु रुस्तुमाच्या सैन्यांत फाजलखान व सादातखान हे दोघे शिवाजीचे कट्टे शत्रू होते हें पाहिलें म्हणजे या स्वारीचें स्वरूप पोकळ असावें असें वाटत नाहीं ( ले. १००३ ).

त्याच वेळीं बेदनूरच्या वारशाबद्दल वाद उपस्थित होऊन बहलोलखान व सर्जाखान हे आदिलशाही सरदार बेदनूरवर स्वारी करण्यांत गुंतले होते ( १५८६ वैशाख शु. ३, १८-४-६४, ले. ९८८ ). श्रावण-भाद्रपदामध्यें हें युद्ध चालूच होतें ( ले. ९९९ व १००५ ).

याच सुमारास गोवेकर पोर्तुगीज आणि उपरिनिर्दिष्ट कानडयाचा राजा यांच्यांत किनाऱ्यावरील बंदरांसंबंधीं कांहीं वाद चालू होता. परंतु आदिलशहाच्या स्वारीमुळें बहुतेक पुरें होत आलेलें बोलणें विसकटण्याची पाळी आली ( ले. ९९९ ). आणि ठाणीं हातीं येण्यासाठीं पोर्तुगीजांना हत्यार हातीं घ्यावें लागलें ( ले. १०१३, कार्तिक शु. ७, १६।१०।६४ ).

कुडाळ प्रांत व त्याच्या आसपास कानडा व गोवेप्रांत यांचे परस्पर संबंध ह्या स्वरूपाचे होते. शिवाजीच्या बद्दल या वेळीं तिकडे विशेष विचार १५८६ च्या पावसाळ्यांत कोणींच करीत नव्हते. खुद्द वेंगुर्लें बंदरावर बंडे साहेबिणीची चांगली मर्जी असल्यामुळें शिवाजी आपल्याशीं चांगला वागतो व त्याचा सरसुभेदार रावजी पंडीतहि सलोख्यानें रहातो असा तेथील डचांचा अभिप्राय झालेला होता. एका काळीं शिवाजीबद्दल इंग्रजांचें मत चांगलें होतें. त्याप्रमाणेंच या वेळीं डचांचेंहि असून 'या प्रांतांत शिवाजीला मोठा मान असून लोक त्याच्यावर प्रेम करितात' असें त्यांनीं श्रावणांत लिहून ठेविलें आहे ( ले. १००२ ). तात्पर्य, विजापूरच्या चालू झालेल्या शिवाजीला विरोध करणाऱ्या धोरणांत सामान्य लोक किंवा डच वगैरे व्यापारी यांची सहानुभूति होती असें वाटत नाहीं. गोंवेकरांची पूर्वीपासूनच असलेली सहानुभूति आजही कायम होती ( ले. १००९ ).

पावसाळ्यामध्यें शिवाजी स्वतंत्र मोहीम कोणतीच काढूं शकत नव्हता. परंतु राजकीय परिस्थितींतील बारीकसारीक फरक शिवाजीच्या लक्षांत असल्यामुळें तो आश्विन-कार्तिकानंतर आरमारी स्वारी करण्याच्या विचारास लागलेला दिसतो. नारळी पौर्णिमा उलटून गेल्यावर त्याच्या हालचालींची चाहूल मोंगलांना लागून आपल्यावर त्याचा रोंख असल्याचें जाणून, 'सुरतेकडे मक्केहून येणाऱ्या गलबतांचें रक्षण करावें' अशी त्यांनीं डच व इंग्रजांकडे मागणी केली ( ले. १०१०, १५८६ आश्विन व. १, ५।१०।६४ ). शिवाजीचा हा पहिलाच आरमारी प्रयत्न कितपत यशस्वी होतो याबद्दल त्या वेळच्या तज्ज्ञांत बराच मतभेद होता. आणि कित्येकांना शिवाजीची ही केवळ हूल असावी असें वाटलें. शिवाजी उत्तरेकडे जाणार कीं दक्षिणेकडे जाणार हें नक्की नसलें तथापि तो मनापासून आरमार उभें करण्याच्या मार्गाला लागला होता यांत शंका नाहीं. सुरतेची लूट, कुडाळची स्वारी यांतील अनुभव व दहाबारा चांगलीं गलबतें बाळगणाऱ्या पाश्चात्य व्यापा-

त्याची पाण्यावरील जबरदस्ती लक्षांत घेऊन शिवाजीनें आरमार बांधण्याकडे लक्ष पुरविण्याचें आतां ठरविलें. सुरतेसारख्या कोठीवर लूट करून समाधान मानण्यापेक्षां संपत्तीचा ओघच स्वतःकडे वळवून घेण्याचें साधन म्हणजे गलबतें स्वतःच्या मालकीचीं करण्याचा त्यानें आतां नाद धरिला. त्याचा सुभेदार रावजी पंडीतहि व्यापाराचा फायदा अनुभवूं लागला होता ( ले. १००२ ). आणि शिवाजीहि इतरांचा पास घेण्यास कंटाळून स्वतः प्रबळ होण्याचा विचार करूं लागल्यास नवल नाहीं. तें कसेंहि असलें तरी शिवाजी परिश्रमपूर्वक ४०।५० गलबतांचें आरमार सजवीत होता. भाद्रपदांत त्या आरमाराचा मुहूर्ताचा प्रवास व्हावयाचा होता, आणि आपआपल्या जागीं सर्व लोक तें आरमार कोणीकडे जाणार याबद्दल तर्क करीत बसले होते ( ले. १०११ ).

**११. येदिलशहाशीं बिघाड**—कार्तिक वद्य ५ (२९।१०।६४) रोजीं कारवारहून सुरतेस लिहिलेल्या पत्रांत शिवाजीनें नुकतेंच वेंगुलें जाळून जमीनदोस्त केल्याची बातमी आली. कार्तिक वद्यांतील ही बातमी असल्यामुळें कार्तिक शुद्ध पक्षांत वेंगुर्ल्यावर शिवाजी आला असावा. त्यानंतर कुडाळ प्रांतांत शिरून पावसाळ्याच्या आरंभीं आलेली विजापूरकरांची स्वारी परतविण्याचा उद्योग त्यानें केला असावा. या बाबतींत उपलब्ध असलेले त्रोटक उल्लेख एकदोनच आहेत. एक पोर्तुगीज कागदांत गोव्याचे व्हाइसरॉयचें पेडणेकर देसायांना पत्र व दुसरें, आदिलशहाच्या वकिलाचें व्हाइसरॉयला पत्र अशीं दोन पत्रें आहेत ( ले. १०१६ व १०२० ). यांपैकीं पहिलें मार्ग. शु. ४ ( ११।११।६४ ) चें आहे. ' शिवाजी व खवासखान यांचें युद्ध झालें ' असें पहिल्या पत्रांत असून, ' त्यांत खवासखान विजयी झाला ' ही बातमी विजापूरच्या वकिलानें दुसऱ्या पत्रांत दिली आहे. हें युद्ध अंदाजानें कार्तीक वद्य पक्षांत आरंभीं आरंभीं झालें असावें. इंग्रजांच्याहि पत्रांत ( सुरतकंपनी, मार्ग. व. ३, २६।११।६४ ) ' आदिलशाही सैन्यानें त्याला गांठून त्याचा पराजय केला ' व त्याला एका किल्ल्यांत कोंडून टाकिलें अशी बातमी दिली आहे. ही सुरतेहून आलेली बातमी प्रथम त्यांना कारवारकडून कळली असें मानिलें तरी हें युद्ध कार्तीक १५च्या आसपास झालें असलें पाहिजे.

एकंदर परिस्थिति पहातां वर उल्लेखिलेली विजापूरकरांची तयारी पुरी होऊन पावसाळ्यानंतरच्या त्यांच्या युद्धाचा बेत ( plan ) पक्का होण्या-

पूर्वीच शिवाजीनें त्यांना त्यांच्याच मुलखांत गांठून युद्ध दिल्याचें दिसतें. मोंगलांस एकादा दुसरा दिवस घालवून तिकडून बंदोबस्त करून शिवाजी घाटांतून चढून गेला. मागचा बंदोबस्त खरेंनें करून टाकल्यामुळें " राजापूर अद्यापि शिवाजीचेच ताब्यांत आहे. कांहीं महिन्यांपूर्वी शिवाजी-कडून शहरें घेण्याकरितां सैन्य येणार होतें; तें आलें नाहीं. आणि शिवाजी लवकरच सर्व कोंकणपट्टी ताब्यांत घेणार " असें मार्गशीर्षांत इंग्रजांनीं लिहिलें ( ले. १०१९ ).

या युद्धाबद्दल तपशील इंग्रजी, पोर्तुगीज व डच पत्रांतून इतकाच मिळतो. शकावलींत ' कार्तिकमासीं ईदलशहाचा व राज्याचा बिघाड झाला; खवास-खान कुडालास आले; राजे तेथें जाऊन घोरपडे मारिले; खवासखानासि झगडा केला; तो पळोन घाटावर गेला ' असा क्रम आहे. हा क्रम शब्दशः शिवाजीच्या एका पत्राशीं तंतोतंत जमतो (ले.१०४१).'वडिलांचे सेवसीं' म्हणून शिवाजीनें लिहिलेलें हें पत्र होय. 'खवासखान तुमच्यावर चालून येत आहे, त्यांच्या समवेत बाजी घोरपडे व खेम सावंत अघाडीला आहेत. घोरपड्यांनीं शहाजीशीं केलेलें वर्तन स्मरून ये समयीं त्यांचे येढे घ्यावे ' असा सूचक इशारा मिळून त्याची सांगता करण्याकरितां शिवाजी निघाला आणि घोरपडे अघाडीस होता त्याला खुद्द मुधोळास गाठून त्याचा वध केला व त्याचा सर्व मुलूख काबीज केला. इतकें होतें तों खवासखान मागून आला. त्यालाहि शिवाजीनें पळवून लाविलें. सावंत मधून मधून लुडबुड करीत असे. तेव्हां त्याचा ' निशाच करावा म्हणून ' त्याच्या मुलखांत शिरून महाराज ' तळपट करीत चालले, ' फोंड्याचा किल्ला घेतला ( ले. १०२१ पहा), सावंत गोवेकरांच्या अश्रयास गेला म्हणून त्यांचाहि फडशा उडविला . ' त्याणीं तह करून तोफा नजराणा पाठविला. ' तेव्हां निरा-श्रित होऊन सावंतानें खूप आपलेपणाचीं बोलणीं लावून ' आपण सावंत भोसले कुळीचे आपले पुत्र आहों, सर्फराज करून देसगतीच्या वतनाची सेवा घेऊन प्रांताचा ठराव निमे ऐवज फौजेनिशीं चाकरी करितों,' असें कबूल केलें. तें मान्य करून तसा ठराव केला, हा त्या पत्राचा मोघवारा आहे. त्यापैकीं शेवटचा सावंताचा करार बहुतांशीं १५८० तील करारशीं जमता असल्यामुळें तो तह हा होय असें म्हणणारा एक पक्ष श्री. कृ. वि. आठल्ये, बी. ए. ( शिपोशी ), यांचा आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणें अर्थातच

खवासखानाची स्वारी, कुडाळकडील सावंतांचें पारिपत्य व बाजी घोरपड्याचा वध या सर्व गोष्टी १५८० त घेतल्या पाहिजेत. तसें केल्यानें 'वडिलांचे सेवेशीं' यापैकीं वडील कोण हा प्रश्न न राहून वडील म्हणजे शहाजी असा सरळ अर्थ लागतो. परंतु शकावली हे सर्व प्रसंग तपशीलवार त्याच क्रमानें देते. खवासखान व लखम सावंतांचें युद्ध यांना इंग्रजी पत्रांत आधार मिळतो, व शिवाजीची ही या वेळची स्वारी योग्य वेळीं उचित धोरणानें झाली असें दाखवितां येतें. परंतु मग शहाजी पूर्वींच वारला असल्यामुळें वडील म्हणजे जिजाबाईला हें पत्र लिहिलें असा अर्थ करावा लागतो. या बाबतींत उभय बाजूंनीं पुष्कळ बोलण्यासारखें आहे यांत शंका नाहीं. बाजी घोरपडयाच्या वधाची नक्की तारीख मिळेल असें एकादें साधन मुधोळकडील कागदांत सांपडेल तरच अर्थात् ह्या प्रश्नाचा पक्का निर्णय लागेल.

प्रस्तुत प्रसंगांत आणखी तपशिलाची भर घालणारें एक विश्वसनीय साधन आहे. मालवणच्या सिंधुदुर्गाच्या उपाध्येपणाच्या बाबतींत पूर्वाधार इतिहास देत असतांना ह्या वेळची हकीकत तेथील धर्माधिकाऱ्यानें दिली आहे (काव्येतिहाससंग्रह, पत्रें यादी वगैरे, ले.४२१, पृ.३७६–७७):—'महाराज राजश्री थोरले कैलासवासी स्वामी यांनीं राज्य आक्रमण करीत असतां कुडाळप्रान्ती जमाव पाठवून कांहीं मुलखाची [त्यांची काबिजात] होती. ते समयीं महाराज राजश्री बसनूर प्रांत मोहीम करावया निमित्य आरमाराच्या जमावानिसीं एथें आले. आणि कुरटें बेटांवर जागा चांगली आहे असें पाहून तेथें एक मजबूत किल्ला बांधण्याचा हुकूम देऊन मग आरमारानिशीं बसनूरवर स्वारी केली.' ही बार्सिलोर किंवा बसनूरची स्वारी माघ वद्य पक्षांत निघाली हें आपल्याला माहीत आहे. त्यापूर्वी महाराजांनीं खुद्द आपल्या हस्तें, १५८६ मार्गशीर्ष वद्य २ ( २५।११।६५ ) रोजीं किल्ला बांधण्यास मुहूर्त करून चिरा भूमीमध्यें बसविला. या वेळीं महाराजांच्या व त्या उपाध्याच्या तोंडीं जे विचार घातले आहेत ते लक्षांत घेण्यासारखे आहेत. महाराज म्हणतात, 'प्रस्तुत संपूर्ण प्रांत हस्तगत करणें आहे हें कृत्य होतच आहे.' म्हणून गांवचाच उपाध्या असला म्हणजे स्थायिकपणा येईल. पुढें त्या उभय उपाध्यांना आश्वासन देतांना महाराज म्हणाले 'तुम्हीं येथें निःशंक रहा. प्रांत मजकूर हस्तगत झालाच आहे. कांहीं किंचित् अदलशाई कुडाळापासून मामले फोंड्या-

पर्यंत ठाणीं आहेत तीं दशहत खाऊन जातील '. महाराज स्वामीचें राज्य प्रबळ होत आहे, चिंता करण्याचें कारण नाहीं, असेंच त्यांच्या मनाला पटलें. यावरून प्रांत जिंकणें याचा अर्थ साफ एकादा मुलूख जिंकणें असा नसून मधून मधून शिरकाव करीत, पाचर मारीत, लहान मोठीं ठाणीं काबीज करीत अशी प्रगति होत असे असें दिसतें. ह्या हकीकतीवरून मार्गशीर्ष वद्यांतील एक मुक्कामहि कायम झाला. कुडाळांतील प्रांत बराच ताब्यांत आला आहे, ही वस्तुस्थिती धरली पाहिजे. अर्थात् खवासखानावरील स्वारी आटोपून परत आल्यावर मालवणास त्यांचा मुक्काम महिना दोन महिने पडल्याचें दिसतें.

मार्गशीर्ष मासीं खुदावदपूर लुटलें असें शकावली म्हणते. हें खुदावदपूर कुडाळच्या आसपास असावें. याच महिन्यांत बहुधा शुद्ध पक्षांत भटकलकडे चार गलबतें पाठवून शिवाजी जमिनीवरून त्या सैन्याला जाऊन मिळणार होता ( ले. १०१९ ). शिवाजी विजापूरकरांच्या मुलखांत जाळपोळ करतो म्हणून त्याच्याबद्दल वद्य १४ च्या पत्रांत हाकाटी केली आहे ( ले. १०२२ ). तसेंच त्यानें हुबळी वगैरे बरींच सधन शहरें लुटल्याबद्दल वारंवार तक्रार केली आहे ( पौष शु. ७, ले. १०२४ व पौष वद्य ३०, ले. १०२९ ). खवासखानावरील ही स्वारी वेंगुर्ल्याला कार्तीक शुद्धांत सुरू होऊन मार्गशीर्ष शुद्धांत संपली.

शिवाजीला या वेळीं दांडगी उमेद होती, ह्याच्या द्योतक अनेक गोष्टी आहेत. शिवाजी सुरतवाल्यांकडे ' मुलुखाची चौयाई द्या नाहीं तर मी पुनः येऊन लूट करितों ' अशी वारंवार धमकी देई ( ले. १०१९ ). शिवाजीनें खवासखानाला जबर शिक्षा दिल्यामुळें तो पन्हाळ्याच्या वेळेप्रमाणें पुनः विजापूर, हुबळी इकडे स्वारी करून आला. त्याला विजापूरकर कांहीं उपाय करूं शकत नव्हते, ही त्यांची खरीखरी नामुष्की होती. परंतु ते शिवाजीला आंतून मिळून आहेत असा औरंगजेबाला निष्कारण संशय येई. वस्तुस्थिति अशी होती कीं, दरबारांत मोंगलप्रवण पक्ष वरचढ असला तरी राज्यांत सर्वत्र उदासीन किंवा शिवाजीशीं स्नेहानें वागणाऱ्या पक्षाचें प्राबल्य होतें. मोंगल व विजापूरकर ह्यांच्यामध्यें वाटेल तें करून भांडण लावून देण्याचा शिवाजीचा नेहमींचाच उद्योग असल्यामुळें एक वेळ विजापूरकरांशीं ( पृ. २६८ ) तर दुसऱ्या वेळीं मोंगलांशींहि ( ले. १०२३ पृ. २७३ )

तह केल्याचें तो बेलाशक जाहीर करी. आणि तितक्या सगळ्या बातम्या लोभी इंग्रज व डच व्यापाऱ्यांनीं प्रसिद्ध केल्या आहेत. वास्तविक शिवाजीनें मोंगलांशीं किंवा विजापूरकरांशीं कोणाशींच तह केला नव्हता. तह केला होता तो खरोखर मोंगल व विजापूरकर यांनीं. हा तह म्हणजे देखील बरोबरीचा तह नसून विजापूर मांडलीक असल्यामुळें मोंगलांची भाषा जबरदस्तीचीच असे. परंतु प्रथम विजापूरला असमर्थ बनविल्यानंतर मग 'चला आम्हांला मदत करा' असें म्हणावयाचें आणि दामटी वळलेलें घोडें दौडत नाहीं म्हणून त्याला चाबकांनीं मारावयाचें असा प्रकार सुरू झाला. विजापूरकरांनीं नेटानें प्रयत्न करूनहि त्यांना मिळावें तसें यश मिळालें नाहीं. तेव्हां ते मनापासून मदतच करीत नाहींत अशी हाकाटी करण्याची नेहमींची अपशयामुळें कातावलेल्या पक्षाची युक्ती मोंगलांनीं अंगिकारली इतकेंच.

ह्या खवासखानाच्या स्वारीबद्दल विजापुरी लेखक व कवींचीं वर्णनें विजापूरकरांच्या बेइमानीबद्दल कांहींच न म्हणतां, उलट 'शिवाजीच्या दंग्यामुळें मोंगल जेरीस येऊन औरंगजेबाकडून विजापूरकरांकडे सलुखाची गोष्ट काढण्याकरितां एक वकील आला. त्याप्रमाणें विजापूरकरांनीं दोस्तीचा तह करून शिवाजीवर स्वारी काढण्याचें ठरविलें. सर्वांत शूर अशा राजा जयसिंगाची औरंगजेबानें नेमणूक केल्यावर त्याच्या तोलाचा सरदार कोण काढावा असा विजापूरदरबारांत विचार सुरू असतां खवासखानानें (इखलासखां नुस्रती) ती कामगिरी पत्करिली. पुढें युद्धांत शिवाजीनें त्याला अडचणींत गांठलें त्यामुळें त्याच्या सैन्याची हिंमत खचली. परंतु योग्य शब्दांत उत्तेजन देऊन त्यानें निकरानें युद्ध करून शिवाजीला दमविलें व पळ काढावयास लाविलें. अशा रीतीनें दमलेला शिवाजी पुढें जयसिंगाच्या तावडींत सांपडला आणि म्हणून इतक्या त्वरेनें जयसिंगाला यश आलें. तेव्हां ह्या स्वारीमध्यें जयसिंगाला एवढें भव्य यश आलें त्याचें सर्व श्रेय खवासखानालाच दिलें पाहिजे.' अशी बुसातीने सलातीन (मो. २११-२१४) (व नुस्रतीचा अलीनामा शि. नि. म. २ पृ. ५) हे मांडणी करतात. मिति, शक, सन देऊन जोंपर्यंत हे उभय ग्रंथहि बोलत नाहींत तोंपर्यंत ही त्यांची मीमांसा ग्राह्य करण्यास थोडी अडचण आहे. परंतु विजापूरचें बेइमानीचें वागणें ह्यांना मान्य नसून मोंगलांचा वकील विजापूरकरांनीं हाकवून लाविला हें तर सुतराम् मान्य नाहीं (ले. १०११ पृ. २६९).

खवासखानाच्या लढाईंत शिवाजीचा पराजय होऊन दमून गेल्यावर लगेच जयसिंगाच्या तावडींत तो सांपडला, हें अशक्य वाटण्याचें कारण असें आहे कीं, मागें वर्णन केल्याप्रमाणें शिवाजी दमलेला न दिसतां मार्गशीर्ष वद्यांत नवा किल्ला उभारण्याच्या उद्योगांत असून मुलूख तर पुढें काबीज होतच आहे अशा उमेदींत आहे. एवढेंच नव्हे तर पूर्वी ठरलेल्या कार्यक्रमांत काडीचाहि फरक न करितां त्यानें बसनूरवर स्वारी काढली. माघी शिवरात्रीला गोकर्णाच्या यात्रेकरितां म्हणून तो निघाला होता ( ले. १०३२, माघ वद्य ८, २८।१।६५ ). माघ वद्यांत १२ ( फेब्रुवारी १६६५ आरंभ ) चे सुमारास ८५ लहान व ३ मोठीं गलबतें घेऊन शिवाजी मालवणांतून बाहेर पडला व गोव्यावरून कांहीं विरोध न होतां बार्सिलोरपर्यंत जाऊन तें बंदर लुटून गोकर्णास परत आला. तेथें तीर्थयात्रा संपादून अंकोल्यास गेला आणि तेथून त्यानें सर्व आरमार जलमार्गानें पाठवून दिलें. वाटेंतील मोठ्या नद्या उतरण्याकरितां फक्त १२ तरांडीं ठेवून तो निर्धास्तपणें संचार करूं लागला. फाल्गुन वद्य ३ ( २२।२।६५ )स म्हणजे आपल्या पस्तिसाव्या वाढदिवशीं शिवाजी कारवारला आला. तेथें त्याच्या मनांत चांगली मनसोक्त लूट करून ' होळीची शिकार ' मिळवावयाची होती. परंतु शेरखानाचा थोडा दाब पडून आणि सुभेदारानें तत्काळ खंडणी जमा करून दिल्यामुळें थोडा असमाधानानेंच तो दोन दिवसांनीं निघून गेला. तो भीमगडाकडे असून मोंगलांवर चालून जाण्याचा त्याचा रोख दिसत होता ( ले १०४४ ). लगेच एक महिन्याच्या आंत जयसिंगाची स्वारी आली आणि महाराजांच्या चढतीला उलटी मिळाली. मागें दिलेली खवासखानाच्या स्वारीची हकीकत नुस्रतीकृत अलीनाम्यांत बहुतेक तशीच सांगितली आहे. मात्र त्यांत खवासखानाचें नांव नसून त्याच्या ऐवजीं इखलासखांचें नांव आहे. अलीनाम्यामध्यें सहायक सरदारांचीं नांवें सय्यद शाहहजरत, सय्यदी सुरूर व शेखमिरां अशीं दिलीं आहेत (शि. नि.२ पृ.५). बुसातिनेमध्यें तींच सिद्दी सरवर, शहा हजरत, शेख मिरां अशीं दिलीं आहेत. थोडया फार फरकानें उभय यादा एकच आहेत असेंहि असून अलीनामा व बुसातिने सलातीन यांनीं विजापूरकरांना दिलेलें श्रेय खरें ठरण्याकरितां बसनूरकडून परत जातांना म्हणजे फाल्गुन वद्य ५ व चैत्र वा १० यांचे मध्यंतरीं गांठून शिवाजीचा पराजय झाला असें मानावें लागेल. परंतु तशी शक्यता दर्शविणारा प्रत्यक्ष उल्लेख अद्याप पहाण्यांत नाहीं.

१२. **जयसिंगाची स्वारी**—सुरतेच्या लुटीनंतर अत्यंत त्रस्त होऊन औरंगजेबानें निर्वाणीचा बाण म्हणून मिर्झा राजा जयसिंगाला पाठविलें. त्याची नेमणूक १५८६ आश्विन शु. ५ (३०-९-६४) रोजीं झाली. आणि फाल्गुन वद्य १२ (३-३-६५) तो पुण्यांत आला. ७।८ दिवसांत तेथील व्यवस्था आटोपून सासवडकडे त्यानें मोर्चा फिरविला व दिलेरखानासमवेत श. १५८७ चैत्र वद्य १० (३१-३-६५) रोजीं पुरंधरला वेढा घातला. आषाढ शु. १० (१२-६-६५) स शिवाजी अगदीं टेकीस येऊन जयसिंगाला भेटून तहाविषयीं ठरविण्याकरितां गेला आणि बरोबर अडीच महिन्यांत, गेल्या पांच सहा वर्षें सर्वांना भारी होऊन बसलेला शिवाजी जयसिंगानें नमविला. ह्या वेळची सुंदर व सुसंगत हकीकत सर जदुनाथ सरकार यांच्या शिवाजीच्या चरित्रांत दिलेली आहे. इंग्रजी व फारसी साधनें काळजीपूर्वक अभ्यासिलीं पाहिजेत असें सोदाहरण पुढें मांडणारे पहिले इतिहासकार जदुनाथ सरकार हेच होत. यामुळें जेथें अस्सल फारशी पत्रांचा त्यांनीं उपयोग केला आहे तेथें त्यांचें लिहिणें बहुधा आक्षेप घेण्यासारखें झालेलें नाहीं. सदर परिच्छेदांतील जयसिंग-प्रकरण हें खुद्द जयसिंगाच्या पत्रसंग्रहाच्या (हाफ्त अंजुमान) आधारानें लिहिलें असल्यामुळें तो सर्वच भाग वाचनीय झाला आहे. मात्र प्रो. सरकार हे अस्सल उतारे स्वतंत्र न देतां मध्येंच लेखांत गोवून, गोळाबेरीज भाषांतररूपानें किंवा कदाचित् अगदींच त्रोटक स्वरूपांत देत असल्यामुळें अभ्यासकांची थोडी गैरसोय होते. ती दूर करण्यासाठीं भा. इ. सं. मंडळाच्या व कोणत्याहि विद्वत्सभेच्या उघड पद्धतीनें त्यांचा अमूल्य संग्रह लोकांना छापून मिळेल तर त्याचा फार उपयोग होणार आहे.

जयसिंग-प्रसंगावरून प्रामुख्यानें एक दोन गोष्टी दिसून येतात. (१) जयसिंगानें आल्यापासून आपला एक दिवसहि फुकट न घालवितां तडकाफडकीं युद्धाचा शेवट लावून घेतला, यामुळेंच तो यशस्वी झाला. मोंगलांचें सैन्य सामान्यतः कितीहि प्रबळ व तयार असलें तरी दख्खनमधील संपर्कानें, वातावरणानें व कामगिरीनें जसजसा काळ जातो तसतसें मव्यास येऊन कमी कार्यक्षम होत जातें, हें ओळखून त्यानें त्वरेनें युद्धाचा निकाल लावून घेतला. (२) औरंगजेबाच्या गैरविश्वासामुळें जोडसेनापती पाठविण्याच्या पद्धतीनें नेहमीं उभयतांत मतभेद होऊन ते दोघे जसे कधींहि औरंगजेबा-

विरुद्ध बंड करूं शकत नसत, तसें दुसरें कोणतेंहि काम किंवा युद्धाचा बेत ते उत्तमपणें पार पाडण्यास नालायक ठरत. यामुळें नेहमीं गोंधळ माजून कर्तबगार सेनापतीहि निकामी ठरे. हेंहि लक्षांत ठेवून जयसिंगानें प्रथम येतांनाच सर्व अधिकार आपल्या हातीं देण्याचा लकडा लावून त्याप्रमाणे व्यवस्था करून घेतली होती. ज्याच्याशीं त्याला तोंड द्यावयाचें होतें तो शिवाजी सर्वस्वीं वाटेल तें करण्यास मुखत्यार असल्यामुळें सेनापतित्व आणि एकसूत्रीपणा यांमध्यें तो इतरांपेक्षां वरचढ ठरे. तेथेंहि जयसिंगानें त्याच्याशी सामना देण्याची योग्य तयारी केली. त्याच्या हुकमांची अवज्ञा झाली नाहीं तोंपर्यंत जयसिंग प्रत्येक ठिकाणीं यशच मिळवीत गेला. पुढें त्यानेंच दिलेरखान व खुद्द शिवाजीच्या मदतीनें विजापुरावर स्वारी काढिली त्या वेळी वैयक्तिक चुरस, शिवाजी व नेताजी यांना संभाळून घेण्याची जरुरी, वगैरे विलक्षण पेंच पडून हुकमतींतील एकसूत्रता केवळ नांवाचीच राहिली. त्यामुळें एवढा मोठा सेनापती विजापुराहून पराजय पत्करून माघारा आला. ( ३ ) औरंगजेबासारख्या परधर्मी व सहानुभूतिशून्य अधिपतीची इमानानें सेवा करून शेवटीं भोगाव्या लागणाऱ्या जयसिंगाच्या यातना लक्षांत घेण्यासारख्या आहेत. अपयश येणें हें प्रसंगावर अवलंबून असतें हें लक्षांत न घेतां शाहिस्तेखानाप्रमाणेंच जयसिंगाचीहि औरंगजेबानें मानखंडना केली. ह्या किंवा अशा प्रश्नांची चर्चा जयसिंगप्रकरणीं, जयसिंग व शिवाजी मिळून विजापूरकरांवरच्या स्वारीस गेले त्याविषयीं व त्यानंतर महाराजांना आग्र्यास जावें लागलें त्या संबंधांत सविस्तरपणें करणें अर्थात् जरूर आहे. परंतु तूर्त स्थलाभावामुळें येथेंच थांबणें भाग आहे.

# प्रकरण ११ वें

## आग्र्‍याहून सुटका

Shivaji was almost worshipped as God, and the renown of his deeds, his eagle glances and long arms, his rapid marches and secret forays, are to this day the most popular themes of the wandering minstrels of the Deccan.
Sir, E. Sullivan. P. 385.

भवतामग्रतोत्युग्रैः सभायां तैर्महत्तरैः । दशद्वादश साहस्रैरश्ववाराधिपैः स्थितम् । तत्राप्यशस्त्रककरः क्रूरत्वं न विमुक्तवान् ॥ ३७ ॥ द्रष्टव्यं स्वामिभिस्तत्र कियद्यत्नेन रक्षितः । तथापि पक्षिवत्तूर्णं पुत्रेण सह निर्गतः ॥ ३८ ॥
—पर्णालपर्वतग्रहणाख्यान.

उपकारबद्ध महाराष्ट्रानें ज्या महापुरुषास शिव अथवा विष्णूअंश म्हणून संबोधिलें, नव्हे दुष्टांचा संहार करण्याकरतां पुनश्च परमात्म्यानें अवतार घेऊन भूमिभार कमी केला असेंहि म्हटलें, ज्याच्या पराक्रमाचे पोवाडे आजहि सर्वत्र गातांना दृष्टीस पडतात व जे भविष्यकाळांतहि तितक्याच आदरानें आणि प्रेमानें गाईले जातील—त्या शिवरायाच्या अद्भुत चरित्रांतील जे अत्यंत हृदयस्पर्शी व थरारून सोडणारे प्रसंग आहेत त्यांपैकीं महाराजांची अग्र्‍याहून सुटका हा प्रसंग अत्यंत चित्ताकर्षक व उत्साहजनक आणि उद्बोधक आहे. जयराम कवीनेंहि त्यासंबंधीं आपल्या पर्णालपर्वतग्रहणाख्यानांत फार मार्मीक उल्लेख केला आहे. हा कवी श्रीशिवकालीन असून त्यानें शिव-चरित्र उत्तम अवलोकन केलें होतें असें दिसतें. वरील उताऱ्यावरून भर दरबारांत परम पराक्रमी औरंगजेब बादशहाशीं त्याचे मोठमोठे नामांकित सरदार उपस्थित असतां व आपण निशस्त्र असतां शिवाजीमहाराजांनीं कसें वर्तन केलें हें चांगलें दिसून येतें. त्याचप्रमाणें औरंगजेबानें अत्यंत बंदोबस्तानें त्यास अटकावून ठेविलें असतां पक्ष्याप्रमाणें पुत्रासह हातावर तुरी देऊन ते कसे निसटले हेंहि उध्दृत केलें आहे. हीच गोष्ट मला विशद करून सांगावयाची आहे.

राज्याचा योग्य बंदोबस्त करून शिवाजीमहाराज फाल्गुन शु. ९ श. १५८८ (ता. ५ मार्च १६६६) रोजीं राजगडाहून संभाजीमहाराजास बरोबर घेऊन निघाले. सोबत ५०० घोडेस्वार व १५०० पायदळ घेतलें. तानाजी माल्लुसरा, येसाजी कंक, सर्जेराव जेधे, हिरोजी फर्जंद, राघो मित्र, बाळाजी आवजी, निराजी रावजी, राघोबल्लाळ कोरडे, त्रिंबकपंत डबीर, प्रतापराव गुजर वगैरे एकजात निवडलेली जिवास जीव देणारी मंडळी बरोबर घेतली.

**प्रवासाचा मार्गः**—राजगडाहून पुण्यास येऊन, तेथून कोरेगांव, भीमा, राजंणगांव गणपति, घोडनदी, जातेगांवहून अहमदनगरास येऊन तेथून कायगांव टोकें, साताऱ्याहून औरंगाबादेस आले. औरंगाबादचा सुभेदार शफी शिकनखान ह्यानें आपण स्वतः सामोरे जाऊन महाराजांचें स्वागत न करितां आपले पुतण्यास सामोरे पाठवून आपण दरबार भरून शिवाजीमहाराजांची वाट पाहात बसला. त्याचे मतें शिवाजी एक जहागीरदार, त्यास आपण मान देणेचें कारण नाहीं. शिवाजीमहाराजांनीं त्याचे पुतण्यास खूप झाडल्यावर शफी शिकनखान आपले सरदारांसह महाराजांस जाऊन भेटला. महाराजांस औरंगाबाद येथें बऱ्याच मेजवान्या झाल्या. औरंगजेब बादशहानें शिवाजीमहाराज दिल्लीस आपणास भेटण्यास येत आहेत त्यांचा मान शहाजाद्याप्रमाणें ठेवावा; वाटेंत त्यांची सरबराई उत्तम ठेवावी म्हणून सर्व फौजदार व सुभेदार यांस फर्मान सोडलें. वाटखर्चाकरितां औरंगाबाद खजिन्यांतून महाराजास १ लाख रुपये मिळाले. महाराजा जयसिंग यांनीं शिवाजीमहाराजाबरोबर आपला अत्यंत विश्वासू सरदार रामसिंग हारा यांस बरोबर देऊन आपला मुलगा रामसिंग यास शिवाजीमहाराजांस अत्यंत जपावें, आपण त्यांस जिवास धक्का पोंचणार नाहीं असें वचन दिलें आहे, तें पाळण्याकरितां सर्वस्वाचा नाश झाल्यास हरकत नाहीं पण दगा होऊं देऊं नये, म्हणून पत्र लिहिलें व मोठ्या प्रेमानें निरोप दिला. औरंगाबादेहून, फर्दापूर, सराई हातमबेग, एदलाबाद बहादरपूरहून बऱ्हाणपुरास आले. तेथून अशीरगड, दाऊदनगर खर्वाहून हंडियाजवळ नर्मदापार झाले. तेथून सिहोर, भोपाल, शिरौज, काळाबाग, सराई सिंधवरून सिप्रीस येऊस नरवरास आले. तेथून ग्वाल्हेर, धवलपूराहून झाझर व तेथून आग्र्यास ता. ९ माहे मे १६६५ रोजीं दाखल झाले. राम-

सिंग व दुसरा एक मुसलमान सरदार मुखलीसखान यांस औरंगजेब बादशहानें शिवाजीराजांस सामोरे जाऊन भेटण्यास सांगितलें.

सन १६५८ मध्यें शहाजहान बादशहास आग्र्याचे किल्ल्यांत अटकेंत ठेवून राजमुकूट आपण धारण केल्यापासून औरंगजेब, आग्र्यास बाप जिवंत असे तोंपर्यंत कधीं गेला नव्हता. ता. २२ जानेवारी १६६६ रोजीं शहाजहान बादशहा कालवश झाला. तो मेला अशी पक्की खात्री करून घेतल्यावर औरंगजेब आग्र्यास आला. मयुरासन व इतर राजचिन्हें त्यानें दिल्लीहून आग्र्यास आणवून घेतलीं. बाप मेल्यामुळें तो आतां निर्भय झाला. तो जिवंत असे तोंपर्यंत त्यास पुन: एखादा कट होऊन बापास गादीवर बसविलें जाईल असें वाटत होतें. त्यानें विष घालून बापास मारण्याचा बरेच वेळां प्रयत्न केला होता. ही गोष्ट सर्वांस माहीत झाली होती. बापास पदच्युत करून व बंदोबस्तानें अटकेंत ठवून देखील त्याचें समाधान न होतां तो कसा मरेल व किती लौकर मरेल अगर मरावा याजबद्दल त्याची सारखी खटपट सुरू होती. लोक उघड उघड या त्याचे कृत्याचा निषेध करूं लागले होते. व पितृघातक्यास चांगली शिक्षा व्हावी म्हणूनच परमेश्वरानें दक्षिणेंत शिवाजी राजास निर्माण करून त्यास घोर चिंतेंत पाडलें होतें अशी बाजारांत नेहमीं चर्चा होत असे; असें मनूची म्हणतो. कसेंहि असो, औरंगजेबास आतां कोणी अंत:शत्रू राहिला नव्हता म्हणून त्यानें आपला ५० वा वाढदिवस फार मोठया प्रमाणानें अग्र्यांत करण्याचें ठरवून त्यासाठीं सर्व तयारी करविली. आग्र्याच्या दिवाणी आम मध्यें दरबार भरून तेथें शिवाजीस भेटीस आणण्यास कुमार रामसिंग यांस हुकूम झाला. येथें एक गोष्ट सांगणें इष्ट आहे. मराठी बखरकार व ग्रांट डफसारखा इतिहासकार शिवाजीमहाराज दिल्लीस भेटीकरितां गेले म्हणून लिहितात; त्याचें कारण बादशहा अग्र्यास येईतोंपर्यंत ८ वर्षें दिल्लीसच असे व शहाजहान मेला म्हणूनच तो आग्र्यास आला व तोहि महाराज अग्र्यास पोंहोचण्याचे अगोदर थोडेच दिवस तेथें आला होता म्हणून दिल्लीस ते रवाना झाले असें समजून सार्वत्रिक तसें लिहिलें गेलें असावें. असो; औरंगजेब बादशहाचे वेळीं सार्वभौम राज्याच्या सत्तेचा जवळ जवळ कळस झाला होता. आपलें वैभव पूर्णपणें शिवाजीस दाखविलें असतां शिवाजी दिपून जाईल असें औरंगजेबास वाटलें होतें. भरजरीचे पडदे

त्यास सोनेरी काढण्या व गोंडे लागलेले, तंबूच्या कनाती भरजरीच्या, खालीं पर्शियन गालिचे अंथरलेले व जिकडे तिकडे उत्तमोत्तम पोशाख केलेले सशस्त्र शिपाई उभे केलेले दिसत होते, दिवाणी-आममधील दरबारांत एक हजारीपासून १२ हजारीपर्यंत निरनिराळे दर्जाचे सरदार, नाना तऱ्हेचे रत्नालंकार घालून आपआपले जागीं सोन्याचे अगर रुप्याचे कठड्यांनीं मर्यादित केलेल्या जागेवर हात बांधून उभे होते. समोर सर्व जगांत ज्यास जोड नाहीं अशा देदिप्यमान मयुरसिंहासनावर बादशहा औरंगजेब अंगांत चिलखत घालून व वर पांढरा स्वच्छ अंगरखा घालून बसला होता. त्याचे मस्तकावरील पगडीवर दिव्य हिरे झळकत होते. बादशहानें आपले जवळ निरनिराळीं शस्त्रें रक्षणाकरितां ठेविलीं होतीं. जवळच मागील बाजूस नख-शिखांत चिलखतें घातलेले सशस्त्र दोन हजार लोक न दिसतील असे उभे करून ठेवले होते.

अशा या दिवाणी–आमच्या दरबारांत ता. १२ माहे मे सन १६६६ या दिवशीं हिंदुस्थानांतील अत्यंत दोन महत्त्वाचे पुरुष एकमेकांसमोर येण्याचा योग विधिघटनेनें आला. नेमलेल्या वेळीं कुमार रामसिंग शिवाजी-महाराजांस दरबारांत घेऊन आला. भालदारांच्या ललकाऱ्यांत शिवाजीमहा-राजांची स्वारी दरबारांत येतांच विजापूरच्या प्रबल सरदारास-अफझलखानास-एकाकी मारणाऱ्या, षाहिस्तेखानास, बादशहाचे खास मामास, नामोहरम करून पुण्याहून पळविण्यास लावणाऱ्या व कित्येक खानांची खां खां जिर-विणाऱ्या व बादशहाच्या त्या मोगल सम्राटाच्या सत्तेशीं टक्कर देणाऱ्या वीर पुरुषाच्या मूर्तीकडे स्वाभाविकच सर्वांचें लक्ष वेधलें. बादशहापासून तों शेवटच्या दर्जाच्या मनसबदारांपर्यंत एकसमयावच्छेदें जर कोणाचें लक्ष एका विभूतीकडे लागलें असेल तर ते शिवाजीराजांकडे ! ! असा तो नर-वीर शिवाजी दरबारांत प्रविष्ट झाला. त्यानें निमिषमात्रांत सर्व दरबारची स्थिति अवलोकन केली. सर्व हिंदु राजे व सरदार अत्यंत नम्रतेनें खालीं माना घालून उभे राहिलेले त्यानें अवलोकन केले. अगोदरच आग्र्यास येतांच, ज्या तऱ्हेचा मान ठेवावयास पाहिजे होता, व तो ठेवला जाईल असें मिरझा राजा जयसिंग यानें कळविलें होतें, तसा ठेवला न गेल्यामुळें शिवाजीमहाराजांचे मनाची चलबिचल झाली होतीच. त्यांतून हिंदू राजांची पराधीनतेची स्थिति पाहून तो पुरुषव्याघ्र कावराबावरा झाला. जन्मादारभ्य

एक परमात्मा किंवा महान् सत्पुरुष अथवा ईश्वररूप मातापितरें यांशिवाय इतर ज्यानें आपलें कोणापुढें डोकें कधींहि वांकविलें नव्हतें, तो या यवन बादशहापुढें डोकें वांकविण्यास तयार झाला नाहीं. कुमार रामसिंगानें लगभग आपण होऊनच बादशहापुढें करभार सादर केला. बादशहा या पुरुषांचे भर दरबारांतील वर्तन पाहून थक्क झाला. त्यानें शिवाजीच्या अनेक गोष्टी आजपर्यंत ऐकल्या होत्या; पण तो इतका धाडशी, भर दरबारांत देखील बादशहास मोंगल सम्राटास न नमतां उभा राहिलेला पाहून बादशहा विषण्णचित्त झाला. त्यानें त्यास तिसऱ्या दर्जाचे सरदारांत उभे राहण्यास कळविलें (ले. ११२८). ज्यांच्या पाठी आपल्या फौजेनें पाहिल्या. आपल्या फौजेपुढें पाठ दाखवून ज्यांस पळतां भुई थोडी झाली, आपला लहान ७ वर्षांचा मुलगा बादशाही पंचहजारी—त्या मुलाच्या त्या पळपुट्या सरदारांच्या मागें उभे राहण्यास सांगून बादशहानें जाणूनबुजून आपला अपमान केला तो सहन करणें त्यास शक्य नव्हतें. कुमार रामसिंगास त्यानें त्याचे कंबरेचा खंजीर मागितला. यावरून दरबारांत त्यांस निःशस्त्रच नेण्यांत आलें होतें, हें स्पष्ट दिसतें. पर्णाल—पर्वतग्रहणाख्यानातहि तसेंच लिहिलें आहे. शिवाजीमहाराजांनीं जयसिंगानें आपणांस दरबारांत पाठवून फसविलें व आपला अपमान केला असा रामसिंगास ठपका दिला. बोलाचाली झाली. बादशहानें काय आहे म्हणून तपास करतां 'दख्खनच्या जंगलांतील वाघ दरबारांत गरम झाला' म्हणून कळविलें. शिवाजीमहाराज क्रोधानें संतप्त होऊन बेशुद्ध झाले. त्यांस गुलाबपाणी शिंपून सावध झाल्यावर शिबिरास घेऊन जाण्याचा हुकूम होऊन दरबार खलास झाला. न जाणो, काय प्रसंग गुजरला असतां शाहिस्तेखानानें कळविल्याप्रमाणें १२ हात उडी मारून सिंहासनावर चाल करून दगा केला असता तर काय प्रसंग येता—खुदाने खैर केली, शिरसलामत सुटलों असें औरंगझेबास वाटून थोडा धीर आला व त्यानें दुसरा हुकूम होईतोंपर्यंत शिवाजीमहाराजांस पुनः दरबारांत आणूं नये म्हणून हुकूम दिला.

मिरझा राजा जयसिंगानें कळविल्याप्रमाणें गोष्टी घडून आल्या नाहींत. बादशहानें आपणांस वागवावें तसें वागविलें नाहीं; सुरत आणि शाहिस्तेखान या दोन गोष्टी लक्षांत आणून आपण कोण, आपला प्रभाव काय, आपणासारखा पुरुष सहकारी मिळाल्यास साम्राज्याची इभ्रत वाढेल या

गोष्टीकडे औरंगजेबानें दुर्लक्ष करून जाणूनबुजून आपला अपमान केला या भावनेनें शिवाजीमहाराजांचे मनाची अत्यंत चलबिचल झाली. आपणास देशी परत जाण्यास हुकूम व्हावा म्हणून अर्ज करण्यास आपला वकील राघो वल्लाळ कोरडे यास बादशहाकडे पाठविलें असतां; सबूर करावी, मागाहून हुकूम होईल म्हणून कळविलें. कुमार रामसिंगानें बादशहास अर्ज करितां त्यांस कळविलें कीं, शिवाजी महाराजांनीं आपला मुलगा ओलीस ठेवून वाटल्यास देशीं जावें. ही गोष्ट महाराजांस बिलकुल पटली नाहीं. आतां काय करावें असा विचार येऊन पडला. इतक्यांत ता. २५ माहे मे रोजीं अग्र्याचा कोतवाल फूलादखान यांस शिवाजीमहाराजांच्या शिबिरावर पहारा बसविणेचा हुकूम झाला व त्याप्रमाणें पांच हजार फौजेचा महाराजांचे शिबिराभोंवतीं गराडा पडला. महाराजांचे फौजेंतील सर्व शिपाई एक जात लढाऊ, ज्यांनीं कैक वेळा मोंगलाचे व विजापूरचे फोजेचा मोड केला होता; एक एक इसम दहास भारी असा निवडून आणलेला होता; ज्यांस आपले जिवाची यत्किंचित पर्वा नव्हती; ज्यांनीं आपल्या धन्याकरितां वाटेल तें केलें असतें; असे होते. आतां मोठा पेंच पडला. औरंगजेबाचे ताब्यांत आपण सांपडलों. न जाणो पुढें काय होणार. ज्यानें प्रत्यक्ष आपले बापास बंदिवासांत ठेवलें. ज्यानें आपले बंधु जगांतून नाहींसे करून जो तख्तावर बसला. पुतणे बंदींत टाकून गुप्तरूपें त्यांचा वध केला. तो काय आपणांस–त्याचे कट्टे शत्रूस–सोडतो हा विचार मनांत आला. तथापि तो महापुरुष बिलकूल डगमगला नाहीं. त्यानें जेवढी शिकस्त तेवढी करून पाहिली. पण देशी परत जाणेस आज्ञा मिळणें कठीण झालें. आतां त्यानें काय करावें हें मनाशीं ठरविलें. तुम्हीं शिवाजीस आग्र्यास पाठवितांना त्यास काय सांगून पाठविलें, काय वचनें दिलीं याजबद्दल जरूर खुलासा करावा असा औरंगजेबानें जयसिंगास हुकूम पाठविला. शाहिस्तेखानाची बायको आग्र्यास होती तिनें आपला मुलगा ज्यानें मारला, आपल्या खाविंदाचीं बोटें ज्यानें कापलीं त्याजवर आपली फिर्याद आहे, दाद मिळावी, म्हणून बादशहाकडे अर्ज केला. जनानखान्यांतील बायकानीं तिची बाजू उचलून या "सैतानास" या खुनी माणसास इनसाफ करून शिक्षा द्या म्हणून सारखी ओरड सुरू केली. अशा स्थितींत फिदा-इ-हुसेन नांवाचे सरदारास नवा वाडा बांधून त्यांत शिवाजीस ठेवणेचा आहे करितां तावडतोब इमारत तयार

करावी म्हणून हुकूम झाला. शिवाजीमहाराजांनीं निराजी रावजी (प्रल्हाद निराजीचे वडील) व बाळाजी आवजी चिटणीस यांजकडून हिरेबी फडणीस रहुल्लाखान यांजकडे संधान बांधून, शिवाजीमहाराजांस गुरुवारचा उपास असतो; देशीं असतांना ते त्या दिवशीं मोठा दानधर्म हिंदू-मुसलमान इत्यादि सर्वांस करतात; त्यांजला परवानगी असावी म्हणून कळविल्यावरून बादशहाची परवानगी रहुल्लाखानानें मिळविली. गुरुवारचा उपास व दानधर्म सुरू झाला. रामसिंगामार्फत बादशहास अर्ज केला कीं, आम्ही बादशहांचे हुकुमाप्रमाणें अग्र्यास दरबारीं राहिलों. बादशहास आपलेकरतां व आपले फौजेकरतां विनाकारण कर्च करावा लागतो. करितां तो विनाकारण खर्च न व्हावा म्हणून आपली आलेली फौज देशीं परत जाण्यास हुकूम दिला जावा. ही विनंति ऐकतांच बादशहास फार आनंद झाला. त्यास वाटलें, फौज राहूं दिली असती तर एखादे वेळीं गोंधळ होणेचा संभव होता, पण अनायासें फौज देशीं गेल्यावर शिवाजी आपले हातांत पक्का सांपडणार. मग आपणास कांहीं करणें झाल्यास भीती राहिली नाहीं. त्यानें फौज देशीं पाठविण्याचा रुकार दिला. फौजेस देशी घेऊन जा म्हणून प्रतापराव गुजर यास सांगताच तो इमानी योद्धा कबूल होईना. तो म्हणाला "महाराज आपण लाखांचे पालन करणार—आपणांस शत्रूचे गोटांत असहाय सोडून आम्ही आपला जीव बचावण्याकरतां देशीं कधींही जाणार नाहीं." महाराजांनीं त्यांची समजूत घातली. महाराजांनीं सांगितलेली गोष्ट त्यांस पटली व सर्व फौजेसह प्रतापराव गुजर अग्र्याहून देशीं जाण्याकरतां म्हणून निघाला व त्यांतील प्रत्येक मनुष्य निरनिराळ्या वेषानें अग्र्याचे आसपास भागीं फिरत राहिला.

प्रत्येक गुरुवारीं शिवाजीमहाराजांनीं फार दानधर्म सुरू केला. हिंदू—मुसलमान हा भेद ठेवला नाहीं. गरीबास याप्रमाणें दानधर्म सुरू करून बादशहाचेच परवानगीनें सर्वांस मेवामिठाई पाठविणेस सुरवात केली. मुख्य प्रधानापासून तों लहान सरदारापर्यंत रोज मिठाईचे मोठे पेटारे भरून मिठाई जाऊ लागली. अशा रीतीनें थोड्याच अवधींत सर्व शहरांत शिवाजी महाराजांचे औदार्याबद्दल फार ख्याति होऊन प्रत्येक इसम, अशा थोर पुरुषास औरंगजेबानें विनाकारण प्रतिबंध केला, विश्वासानें बोलावून आणून विश्वासघात केला, असें म्हणूं लागला. रजपूत राजेरजवाड्यांत

व सरदारांत तर फार असंतोष उत्पन्न झाला. महाराजा जयसिंगा सारख्या पुरुषानें ज्यास वचन देऊन पाठविलें त्यास अशा तऱ्हेनें वागविल्यामुळें आपला सुरक्षितपणा राहिला नाहीं व याचा परिणाम चांगला होणार नाहीं असें ते उघड बोलूं लागले. ही गोष्ट बादशहाचे कानावर जाऊन रजपूत लोकांचें असें मत होणें बरोबर नाहीं असें त्यास वाटूं लागलें. शिवाजीस नाहींसा केल्यास काय परिणाम होईल व त्यास राहूं दिल्यास काय परिणाम होईल याचा तो विचार करूं लागला. एके वेळीं त्यास अफगाणीस्थानांत शहाअब्बास बादशहाशीं लढण्या करतां पाठवावा असें वाटून त्यानें शिवाजीस तसें विचारलेंहि. शिवाजीनें आपली फौज आपणांस मिळाल्यास आपण अफगाणिस्थानांत जाण्यास तयार आहोंत; पण दुसऱ्याचे फौजेचें आधिपत्य घेऊन जाणेस तयार नाहीं असें कळविलें. देशी कासीद (पत्र घेऊन जाणारे जासूद) कागदपत्र घेऊन जाणाऱ्या लोकांबरोबर पत्रें पाठविलीं जात त्याहून तोंडी निरोप निराळा दिला जात असे. एका ग्रंथकाराचे म्हणण्याप्रमाणें महाराजांनीं आपली कांहीं फौज गुजराथचे सरहद्दीवर आपणावर कांहीं प्रसंग आला असतां उपयोगी पडावी म्हणून आणून ठेविली होती असें दिसतें.

शिवाजीचें काय करावें याबद्दल औरंगजेबाचा पक्का निश्चय झाला नव्हता. कुमार रामसिंगास राजा जयसिंगानें कळविलेप्रमाणें महाराजाचे जिवास कोणचेहि प्रकारें अपाय न व्हावा म्हणून तो अहर्निश जपत होता. अशा स्थितींत मनूची या ग्रंथकारानें लिहिल्याप्रमाणें फिदाई हुसेन याचा वाडा तयार झालेमुळें श्रावण वद्य १३ ता. १८ आगष्ट १६६६ रोजीं त्यांत शिवाजीमहाराजास नेण्याचा हुकूम झाला होता, ही खबर रामसिंगानें महत्प्रयासानें मिळवून शिवाजीमहाराजास ता. १७ आगष्ट श्रावण वद्य १२ रोजीं कळविली.

याचे अगोदर महाराज वारंवार बरेच वेळां अजारीं पडूं लागले होते. त्यांस औषध वगैरे देण्यास वैद्य व हकीम येत जात असत. त्यासहि मेवा-मिठाई भरपूर जात असे. मेवामिठाईचे पेटारे जात असतां फुलादखानचे शिपाई अति तत्परतेनें त्यांची तपासणी करीत असत, त्यामुळें पेटारे जिकडे तिकडे जाण्यास फार वेळ लागे. याबद्दल शिवाजीमहाराजांनीं जाफरखान प्रधान, रहुल्लाखान जमाखर्च फडणीस व इतर सरदार यांजकडे फार वेळां

तक्रारी केल्यामुळें पूर्वीच्याइतकी तपासणीची सक्ती राहिली नव्हती. शिवाय शिवाजीमहाराजांचे सर्वांवर सारखेंच लक्ष असल्यामुळें पहाऱ्यावर असलेल्या लोकांस ते विसरले नव्हते. त्यांसहि प्रत्यहीं ते मिठाई, फळफळावळ देऊं लागल्यामुळें कृतज्ञता बुद्धीनें तेहि प्रेमानें वागू लागलें. तपासणी नांवाची राहिली. असल्या पुण्य पुरुषाचा संशय घेणें त्यांस पाप वाटू लागलें. याप्रमाणें स्थिती असतां रामसिंगानें सांगितल्याप्रमाणें श्रावण वद्य १२ (ता. १७ आगष्ट) रोजीं सायंकाळीं उदईक फिदाईहुसेनचे वाड्यांत जावें लागणार व तेथें गेल्यावर जिवावर बेतणार. आतां वेळ नाहीं. गेलेंच पाहिजे म्हणून दोन मोठमोठे पेटारे आणवून त्यांपैकी एकांत महाराज व दुसऱ्यांत संभाजी यास बसवून राजरोस हे पेटारे शिपाई लोकांच्या जय्यत पहाऱ्यामधून बाहेर नेण्यांत आले. शिवाजीमहाराजांची प्रकृति फार बिघडली. तरी वारंवार पुसतपास केल्यामुळें व आलेगेलेमुळें त्रास होतो करितां कृपा करून कोणी त्यास त्रास न होईल असे वागा; म्हणून सांगितलें गेल्यामुळें पुढील गोष्टी करण्यास सवड मिळाली. पेटाऱ्यांत बसण्याचे अगोदर बहुतेक सर्व मंडळी कांहीं ना कांहीं सबबीवर बाहेर निघून गेली होती. हिरोजी फर्जंद हा शिवाजीमहाराजांचा सावत्र लेकवळा भाऊ असल्यामुळें हुबेहुब त्यांजसारखा होता. त्यास महाराजांनी आपगावर संकट आलें आपण गेले पाहिजे; न गेल्यास प्राणावर बेतणार हें कळवितांच हात जोडून तो म्हणाला. "महाराज आम्ही आपले देह महाराजावरून ओवाळून टाकण्यास तयार आहोंत. आपण जगल्यास आमचेसारखे लाखों लोक सेवेस हजर होतील व त्यांचे चीज होईल. पण आपणांस कांहीं बरेवाईट झाल्यास आम्हास कोण त्राता होईल. आपण जावें. आमची काळजी करूं नये." मदारी मेहतर मुसलमान मुलगा महाराजांचा सेवक तोहि तसेच म्हणाला. महाराज गहिंवरले. त्यांनीं हिरोजीस आपली आंगठी दिली व त्यांचा निरोप घेऊन ते रवाना झाले. श्रावण वद्य १२ चे सायंकाळी ७चे सुमारास ही गोष्ट झाली. हिरोजी, महाराजांचे पलंगावर दुलई पांघरून निजला व मदारी मेहतर फरास त्याचे पाय दाबीत बसला. मधून मधून शिपाई पाऊल न वाजवितां महाराजांची प्रकृति कशी आहे हें पाहणेस येऊन जात. मदारी त्यास खूण करून झोंप लागली असे सांगून जाण्यास सुचवी. याप्रमाणें रात्र गेली. दुसरे दिवशीं दुपारीं तीन वाजेतोंपर्यंत कांही गडबड झाली नाहीं. पण गुप्त हेरानें औरंगजेबास खबर दिली कीं, शिवाजी महाराज

पसार झाले. कोतवालास आणून विचारतां त्यानें आपला पहारा जय्यत असून शिवाजी आजारी असून निजला आहे म्हणून कळविलें. बातमीदारानें पुन: खबर दिली. शिवाजी पसार झाला. ५-२५ मैल निघून गेला असला पाहिजे. तपास व्हावा. पुनश्च कोतवालानें तेंच सांगितलें. तिसरे खेपेस हेरानें आपण खोटें ठरलों तर डोकें मारा; पण शिवाजी गेला खास असें कळविलें. बादशहानें फुलादखानास स्वत: जावून पाहून मग येवून कळवावें म्हणोन सांगितलें. कोतवाल जाऊन पाहूं लागला. तों शिवाजी निजला असून मदारी मेहतर पाय दाबीत आहे. संशयनिवृत्ती व्हावी म्हणून पाहतां शिवाजी नसून हिरोजी असल्याचें दिसलें. फुलादखान घाबरला. हिरोजीस त्यानें पलंगावरून खालीं ओढले. दरडावून विचारूं लागला. शिवाजी कोठें आहे? 'काल संध्याकाळीं आपणास पलंगावर निजणेस सांगितलें. त्याप्रमाणें आपण निजलों पुढें काय झालें माहीत नाहीं. आपले जय्यत पहाऱ्यांतून ते कसे निसटून जातील याचा विचार आपण करावा' म्हणून म्हणूं लागला. मदारी मेहतर यानें तसेंच सांगितलें. आतां प्रसंग कठीण आला. आपलें डोकें उडणार म्हणून फुलादखान घाबरला. पण बादशहास ही हकीकत सांगितल्याशिवाय सोय नाहीं. म्हणून तो मोठ्या कष्टानें त्यांजकडे गेला. आपला बंदोबस्त फार कडक होता. पण 'हजरत सलामत' तो सैतान जमिनींत गुप्त झाला. या कोठीच्या भोंकांतून सूक्ष्म रूप घेऊन तो बाहेर पडला अगर कांहीं जादू करून जनावराचें रूप घेऊन निसटला हें कळण्यास मार्ग नाहीं, असें बोलू लागला. शाहिस्तेखानाचे शिबिरावर छापा घातला त्यावेळीं बादशहाकडे त्यानें जी हकिकत कळविली त्यांत शिवाजी मोठा जादूगार, १२ हात उडी मारतो, निरनिराळीं रूपें घेतों. भोंकांतून बाहेर पडतो, त्याचा भरवसा नाहीं व त्यामुळेंच इतका बंदोबस्त केला असतां तो शिबिरांत आला वगैरे लिहून कशीतरी त्यानें बादशहाची समजूत घालण्याचा प्रयत्न केला होता. बादशहानें त्याजवर काडीइतका विश्वास ठेवला नाहीं. पण न जाणो असें कांहीं झाल्यास आपली फजीती होईल म्हणून दरबारांत शिवाजीस त्यानें लांबच उभे करण्यास सांगितलें होतें. पण आतां जेव्हां फुलादखान तसेंच बोलूं लागला व तो कसा निसटला याचा उलगडा होईना, तेव्हां त्यास वाटले तो कोठेंतरी अग्र्यांतच लपून राहून आपला घात खात्रीनें करणार म्हणून त्यानें आपले शरीर रक्षकांची संख्या वाढ-

विली. शस्त्रास्त्रें जवळ ठेवलीं व फार काळजीनें वागू लागला. आपले कपाळीं हात मारून घेऊन आपण इतकी सावधगिरी ठेवली असता आपले हातांवर तुरी देऊन तो पळाला. आपली बदनामी झाली म्हणून खेद करू लागला. त्यानें दशदिशांस अनेक स्वार पाठलागास पाठविले व शिवाजीस पकडून हजर करावा म्हणून सर्वत्र फर्मानें पाठविलीं.

शिवाजीमहाराजांस पेटाऱ्यांतून गांवाबाहेर बाळाजी आवजी, निराजी रावजी यांनीं नेले. तानाजी मालुसरे वगैरे मंडळी घोडीं घेऊन बाहेर ३ मैलांवर तयार होतीच. पेटारे नेणारे दक्षिणीच लोक होते. त्यास परत पुष्कळ पैसा देऊन रवाना केलें. महाराज व संभाजी घोड्यावर बसून यमुना पार झाले व पुनरपि दुसरे ठिकाणीं नावेंत बसून अलीकडील थडीस येऊन रातोरात ४२ मैलांचा प्रवास करून पहाटचे सुमारास मथुरेस आले. मथुरा आग्र्याचे उत्तरेस असलेमुळें व तिकडे शिवाजीमहाराज जाण्याचा बिलकूल संभव नसलेमुळें पाठलाग होणेची भीति नव्हती. बखरकारांनीं दिल्लीहून मथुरेस गेले म्हणून म्हटलें आहे तें चूक आहे. कारण दिल्लीहून मथुरा दक्षिणेस असल्यानें तावडतोब ते त्या बाजूस जाते तर पकडले गेले असते. उत्तरेस आग्र्याहून गेलेमुळें ती भीति तात्पुरती तरी नव्हती. मथुरा-वृंदावनास गोकुळ अष्टमी ( श्रावण वद्य ८ ) चा फार मोठा उत्सव फार प्राचीन काळापासून असतो व त्या उत्सवास लाखों यात्रा जमते. त्यांत गोसावी, बैरागी, संन्यासी, उदासी वगैरे अनेक लोक जमत असत व अद्या-पिहि जमतात. त्याप्रमाणें गोकुळअष्टमीनंतर चवथ्याच दिवशीं म्हणजे द्वाद-शीचे रात्रीं शिवाजीमहाराज तेथें जाऊन पोहोंचले. सकाळींच त्यांनीं यमुने-वर जाऊन क्षौरविधी उरकला. सर्व केस काढून टाकले. अंगास राख फासली व गोसाव्याची भगवी वस्त्रें परिधान करून महाराज व त्यांचे अनु-यायी गोसावी बनले. बाळाजी आवजी व निराजी रावजी यांनीं प्रधान मोरोपंत पिंगळे यांचे मेहुणे कृष्णाजी त्रिमल, काशी व विश्वनाथ यांचा पत्ता काढला. महाराजांची भेट करविली व त्याजपाशीं संभाजी महाराजांस ठेवलें. त्यास मुबलक पैसा दिला व आपले खास स्वदस्तूरचें पत्र येतांच मुलास संभाळून दक्षिणेंत आणावे म्हणून सांगितलें. आतां प्रश्न असा उद्भवतो कीं हे तीन बंधू याच वेळीं मथुरेस असणेचें कारण काय ? ते शिवाजीमहाराज मथुरेस पळून येतांच बाळाजी आवजी यास कसे भेटतात ? त्यांजपाशीं

संभाजी महाराजास ठेवण्याइतकी त्यांची खात्री कशी पटते ? लाखों रुपयाचें बक्षीस लागलें असतां व संभाजीसारखा राजपुत्र जवळ असल्यावर त्यास मोगलाचे स्वाधीन करून तें बक्षीस मिळविण्याचें अनायासें साधन असतां ते त्या मोहास बळी पडणार नाहींत याची खात्री या मंडळीस या संकटप्रसंगीं कोणीं पटवून दिली ? या लोकांची यांस ओळखच होण्याची अगर पटण्याचीं काय कारणें झालीं असावीं ? आम्हास वाटतें, ही मंडळी कांही तरी निमित्तानें या प्रसंगाचीच वाट पाहात तेथें राहिली असावी. त्रिस्थळी यात्रेपैकीं मथुरा हे क्षेत्र नसल्यामुळें तेथें यात्रेकरूनीं गेले पाहिजे असें नाहीं. शिवाय औरंगझेबाच्या कारकीर्दीत व अशा दंगलीचे वेळीं यात्रेकरतांच ही मंडळी तेथें आली असतील हे संभवत नाहीं. आगगाडी होणेचेपूर्वी महायात्रा करणें फार धोक्याचें होतें. यात्रेस जावयाचें म्हणजे आतां आपण सर्व संकटांतून वांचून परत येणें शक्य नाहीं. म्हणून सर्वांचा अखेरचा निरोप घेऊन लोक यात्रेस जात असत. मग हिंदुधर्मद्वेष्टया औरंगजेबाचे वेळीं महायात्रेस किती अडचणी असतील याचा विचार करतां हे लोक तेथें यात्रेनिमित्य आले असल्याचे संभवत नाहीं.

मोरोपंत पिंगळे मुख्य प्रधान हे श्रीसमर्थ रामदासस्वामी यांचे शिष्य होते. मोरोपंत, महाराजांचा उजवा हात. त्या वेळच्या अत्यंत महत्त्वाच्या पुरुषांचा तो अग्रणी. आग्र्यास जातांना सर्व राज्याचा कारभार त्यांजवर सोपविलेला; अशा पुरुषाचे हे मेहुणे हे याच वेळीं मथुरेस राहतात व महाराजहि अग्र्याहून तेथेंच येतात व अनायासें त्याजपाशीं संभाजीमहाराजास विश्वासानें ठेवतात. ही गोष्ट पूर्वनियोजीतच असली पाहिजे. मथुरेस समर्थांचा मठ होता. त्यांत समर्थांचे कांही तरी अंग असावें असें दिसतें.

एकदां यमुना नदीवर महाराज स्नानास गेले. त्यांजबरोबर असलेली सर्व मंडळी गोसावी वेषांत स्नानास गेली. तेथें त्यांजबरोबर कृष्णाजी त्रिमलहि होता. महाराजांनीं तेथील घाटांची अनास्था पाहून दुःख प्रदर्शित केलें, व हे घाट दुरुस्त केले असतां काय खर्च पडेल अशी चौकशी केली. भणंग गोसावी यांस घाटास काय पैसा लागेल याजबद्दल चौकशी करणेचें कांहीं कारण नसता तो चौकशी करतो याजबद्दल तेथील एका चोबे ब्राह्मणास आश्चर्य वाटून तो म्हणाला, हे महाराज खरे गोसावी दिसत नाहींत. कृष्णाजी

त्रिमल यानें त्यास बाजूस घेऊन त्याचे कानांत कांहीं सांगताच तो गप्प झाला. त्यास मथुरेचा क्षेत्रोपाध्याय करून त्यासहि आपले बरोबर घेतला.

मथुरेस जमलेल्या सहस्रावधि गोसावीबैराग्यांत हे नवे गोसावी मिळून गेले. आतां बहुजन समाजांतून आपणास कोणी ओळखतील याची तूर्त त्यांस भीति राहिली नाहीं. तथापि मथुरेस राहणें इष्ट नसल्यानें महाराजांनीं मथुरा सोडली व पूर्वेस प्रयागचा रस्ता धरला. बरोबर शेपन्नास गोसावी; त्यांत निराजी रावजी यांस फार भाषा येत असल्यामुळें त्यांसच महंत करून त्यांचे आगेमागे सर्व चालू लागले. पायांतील चढाऊ जोड्यांत हातांतील पोकळ काठ्यांत, एकतारीच्या पोकळ दांड्यांत, अंगांतील रूच्या बंड्यांत अगणित उत्तमोत्तम रत्नें, हिरे, पांच वगैरे लपवून वरोबर घेतले. द्रव्याचा पुरवठा मजबूद केला. कांहींनीं गंगेच्या कावडी खांद्यावर घेऊन काशी कापडी झाले. अतएव कोणास शंका न यावी इतका वेषपालट केला गेला. प्रयागाहून काशीस आले. खाफीखान इतिहासकार म्हणतो, आपण सुरत येथें असतां नाभाजी नांवाचा एक ब्राह्मण वैद्य आपणास भेटला. त्यानें आपणास हकीकत सांगितली ती अशी:—"एके दिवशीं पहाटे आपण गंगेवर स्नानास गेलों असतां एक गोसावी आपलेजवळ आला व त्यानें आपणास कांहीं दिलें व स्नानाचा मंत्र सांग म्हणून गंगेंत उभा राहिला. त्यांस आपण मंत्र सांगणार इतक्यांत घाटावर कांहीं गडबड झाली. त्यांत शिवाजी नांवाचा राजा अग्र्याहून फरारी झाला असून त्यास जो कोणी पकडून देईल त्यास फार मोठे बक्षीस मिळेल, असें कोणीं म्हणाल्याचें ऐकिलें. मंत्र सांगावा म्हणून पाहातो तों गंगेत तो इसम नाहीं. आपणहि भिऊन काशी सोडून सुरतेस आलों. आपणास दक्षिणा मिळाली. त्यांत ९ हिरे, ९ रत्नें, ९ मोहरा, ९ होन या प्राप्तीवर आपण घर बांधून सुखी झालों." यावरून शिवाजीमहाराज काशीकडे असतां जवळ जवळ पकडलें जाण्याचा संभव आला होता असें दिसतें. काशीहून पाटण्याहून गयेस गेले. तेथें दानधर्म केला. वाटेंत एका मुसलमान सुभेदारानें शिवाजीच्या बरोबरीच्या लोकांस संशयानें पकडलें. मनांत कशाची शंका न धरतां शिवाजी गोसाव्याच्या वेषांतच सुभेदारास रात्रीं भेटले. गोसाव्यास कां धरलें ? म्हणून विचारतां शिवाजीबद्दल हुकूम आला असून नाना तऱ्हेच्या वेषांत तो सांपडण्याचा संभव आहे. सबब गोसाव्यास अटकावलें म्हणून त्यानें सांगतां; त्यास धरल्या-

पासून काय फायदा होणार ! जहागीर मिळेल, अब्रू वाढेल, म्हणून म्हणतांच 'मी शिवाजी आहें. २ हिरे तुम्हांस देतों, जन्म जन्म दुसऱ्याकडे पहावयास नको व इतकेहि करून मलाच धरून माझें डोकें उडविलेलें पाहून डोळे निववावयाचे असल्यास अवश्य तसें करावें' म्हणून हिरे पुढें ठेविले. सुभेदारांस मोह आवरेना व विनाकारण अशा मोठ्या पुरुषास मारून आपणांस काय फायदा होणार. मोठें बक्षीस मिळून शिवाय एक मोठा प्रबळ आपणास मित्र मिळाला म्हणून पोक्त विचार करून त्यानें धरलेल्या लोकांस सोडून दिलें व शिवाजी महाराजांसहि जाऊं दिलें. नंतर गयेहून महाराज कटकास आले. तेथें कोणी थकलाभागला तर त्याजकरितां एक घोडें बरोबर असावें म्हणून एक लहानसें घोडें घेण्याचें ठरविलें. त्यास चांदीचें नाणें न देतां चुकून सोन्याचें नाणें दिलें.तें पाहून घोड्याचा मालक म्हणाला, महाराज, आपण खरें गोसावी नसून कोणी तरी वेषधारी गोसावी आहां. न जाणो, आग्र्याहून पळालेले शिवाजीमहाराजहि असूं शकाल. त्यांस सोन्याच्या नाण्याची थेली देऊन तेथून जगन्नाथास येऊन दर्शन घेऊन. गोंडवनांत चांद्यास आले. देवगडाहून पाइनगंगा वगैरे नद्या उतरून गोदातटाकी आले. श्रावण-भाद्रपद महिना,-नदीनाले भरपूर चाललेले. मोठमोठ्या गांवांतून न जातां आडमार्गानें अरण्यांतून जावें लागल्यामुळें किती त्रास झाला याची कल्पनाहि होणें शक्य नाहीं. महाराजांबरोबरचे कोणासहि मार्ग ठाऊक नव्हता. कृष्णाजी त्रिमल यास वाट माहीत म्हणून त्याचे विनंतीवरून त्यांस बरोबर घेतला होता. मथुरा सोडल्यानंतर प्रयाग, काशी, गया, गंगासागर येथें समर्थांचे मठ होते, त्यांतील महंतांचा अथवा समर्थ भक्तांचा खात्रीनें या कामीं उपयोग झाला असला पाहिजे, नाहींतर ज्या गांवीं समर्थांचे मठ त्याच गांवांवरून प्रवास करण्याचें कारण नव्हतें. असो. गोदातटाकी आल्यावर इंदूर येथें समर्थांचा मठ होता तेथें येऊन कडेवळीत प्रांतांत कोडोली गांवीं एके रात्रीं ही मंडळी मुक्कामास आली. तेथील पाटलाचे घरीं जातां त्यानें फार आदरातिथ्यपूर्वक सत्कार केला. सर्व गोसाव्यांस गोठ्यांत जागा दिली. स्वयंपाकपाण्याची सोय केली. पाटलाची वृद्ध मातोश्री दुःखानें सांगूं लागली कीं, २।४ दिवसामागेंच आनंदराव तेलंगराव नांवाचे दोन मराठे सरदारांनीं येऊन गांव लुटलें. गुरेंढोरें नेली. त्यामुळें असल्या पुण्य पुरुषांस देण्यास त्याजपाशीं कांहीं राहिलें नाहीं शिवाजी नांवाच्या कोणा

राजाचे ते सरदार होते असें समजलें. बाई म्हणाली, ज्या राजाचे सरदार गोरगरिबास लुटतात व अनर्थ करतात त्या शिवाजीस आग्र्यांत अडकावले असे लोक म्हणतात,. तेथेंच त्यास देवानें ठेवावें. महाराजांनीं त्या बाईचें नांव टिपून घेतलें. पुढें भागानगर विजापूर मार्गानें गोकर्णमहाबळेश्वरास जाऊन सह्याद्रीमार्गानें मार्गशीर्ष शु॥ ५ ता. २० नोव्हेंबर १६६६ रोजीं ही गोसावी मंडळी राजगडीं आली. अद्याप राजगडावरील हवालदार वगैरे मंडळी त्या वेळची गोष्ट म्हणून सांगतात कीं, गोसावी राजगडास आले. मातोश्री जिजाबाईच्या आज्ञेवरून त्यांस आंत घेतलें. तेथें त्यांची सर्व व्यवस्था नीट ठेवली. भजन वगैरे सुरू झालें. अप्रतिम भजन ऐकून लोक संतोषी झाले. शिबंदी बेसावध नव्हती. गोसावी यांजवर त्यांची पूर्ण नजर होती. तथापि त्यांचे भजनाबद्दल मातोश्रीकडे खबर गेली. कसें भजन करतात म्हणून त्यांस भजन करणेस बोलाविलें. भजन सुरू झालें. निराजी रावजी महंत बसले भोंवतीं गोसावी भजन करूं लागले. महाराज शिवाजी भजन म्हणताना व आपलें भजन स्वत: मातोश्री ऐकतात पाहून केव्हां भेटून पायावर मस्तक ठेवीन असें त्यांला झालें होतें. ते उठले व मातोश्रीसमोर जाऊन त्यांचे पायावर त्यांनीं मस्तक ठेविलें. मातोश्री जिजाबाईंनीं साधूपुरुषानें हें काय केलें. म्हणून म्हणता निराजी म्हणाले, 'माईजी, ए महाराज शिवाजी आपके लडके, आप पछानते नही हो ' असें म्हणतांच महाराजांनीं आपल्या डोक्यावरील वस्त्र काढून तेथील खूण दाखवून मातोश्रीस घट्ट मिठी मारली. मातापुत्र भेटले. सर्वत्र आनंद झाला. तोफा सुटल्या सर्व महाराष्ट्रभर जनतां धन्यवाद गाऊं लागली. मृत्यूचे जबड्यांतून महाराज सुटून देशीं आले म्हणून परमेश्वराचे सर्वांनीं अनन्यभावें आभार मानले. फाल्गुन शु॥ ९ ता. ५ मार्च १६६६ रोजीं महाराज राजगडाहून हत्तीवर बसून पूर्ण ऐश्वर्यानें फौजफाटा लवाजमा घेऊन निघाले ते मार्गशीर्ष शुद्ध ५ ता. २० नोव्हेंबर १६६६ रोजीं म्हणजे सुमारें ९ महिन्यांनीं अजमासे २ हजार मैलांचा अत्यंत बिकट प्रवास शत्रूचे मुलखांतून करून परत गोसाव्याचे रूपानें आलेले पाहून लोकांस काय वाटलें असेल; त्यांचे मनाची स्थिति काय झाली असेल याची कल्पना होणें शक्य नाहीं. बुद्धीबळाचे भाषेंत बोलावयाचें म्हणजे औरंगजेबावर महाराजांनीं मात केली. प्रश्न असा उतद्भवतो कीं, महाराज अगोदर आग्र्यास गेलेच का ? त्याचें उत्तर हें कीं—

१ स्वतः जाऊन एकंदर स्थिती काय आहे ती पहावी.

२ सर्व रजपूत राजांशीं स्नेह संपादून त्यांस आपणास अनुकूल करून घ्यावे.

३ बादशहावर आपली छाप बसवून त्यांजकडून साधल्यास दक्षिणची सुभेदारी मिळवावी.

४ बादशहाचे इच्छेप्रमाणें व हिंदूचे कल्याणार्थ विजापूर व गोवळकोंड्याचीं राज्यें खालसा करावीं.

५ हीं राज्यें जिंकल्यावर स्वाभाविकच त्यांचे चाकरीस असलेले सैनिक आपलेकडे नौकरीस ठेवावे.

६ प्रबळ सेना झाली, सत्ता उत्तम प्रस्थापित झाली म्हणजे, रजपूत लोकांस पूर्वीच अनुकूल करून घेतले असल्यामुळें त्यांचे सहाय्यानें धर्मयुद्ध पुकारावें.

७ दिल्ली-साम्राज्यास अखेरचा शह देऊन दिल्लीवर हल्ला चढवावा.

अशा हेतूनें दिल्लीस जाणेकरितां तयारी करून निघाल्यावर आग्र्यास पोहोंचल्यावर औरंगजेबानें जणूं काय त्यांचे मनोगत जाणून त्यांस नजर कैद केल्यावर सर्वरंग अनपेक्षित रीतीनें बदलल्यामुळें त्या परिस्थितीस तोंड देऊन आपले हालचालीस निराळें रूप देणें शिवाजीस प्राप्त झालें. १ बिलकूल शंका अगर संशय उत्पन्न न होईल अशा रीतीनें प्रथम आपण आग्र्यास राहणेस कबूल आहोत. २ आपली फौज देशी जाऊं द्यावी. व त्यामुळें बादशहास खर्च कमी पडेल असे भासवून फौजेतील सर्व लोक आपले मदतीकरितां नाना वेषानें जवळचे मुलखांत पसरविले. ३ मिठाईचे करंडे पाठविणेची पद्धत पाडून जनतेत आपले संबंधीं प्रेम उत्पन्न केलें. ४ व पुढील सुटकेच्या उपायाची पूर्व तयारी केली; व ५ अशा उपायानें बेमालूम आपली सुटका करून घेऊन औरंगजेबास आपली पुरी ओळख करून दिली.

*हा प्रसंग अत्यंत उद्बोधक असून तो सर्वांनीं कौतुकानें वाचावा, अशा योग्यतेचा आहे.

---

*महाराजांनीं आपल्याकरितां ज्यांनीं ज्यांनीं अनंत कष्ट केलें, प्रसंगीं देह देण्यास सुद्धां मागें पाहिलें नाहीं. त्या सर्वांस पारितोषिकें दिली. हिरोजी फर्जंदास रायगडची हवालदारी दिली. मदारी मेहतरास सिंहासनाची पूजा झाल्यावर पूजेचे सर्व द्रव्य त्यास दिलें जावें म्हणून आज्ञा झाली, या स्वामीभक्त पुरुषाचें घराण्यांतील लोक अद्याप सातान्यास रहातात.

# प्रकरण १२ वें

## सुटकेनंतरचीं तीन वर्षें.

१ **शिवाजीच्या गैरहजेरींतील मराठ्यांच्या हालचाली**---ह्या साडेदहा महिन्यांच्या काळांत दक्षिणेंत मराठ्यांच्या हालचाली काय होत होत्या ह्यासंबंधीचे फारसे कागदपत्र उपलब्ध नाहींत. फॅक्टरी रेकॉर्डस् मधून या कालांतील मराठ्यांच्या हालचालींवर फारच थोडा प्रकाश पडतो. परंतु जो कांहीं पुरावा उपलब्ध आहे त्यावरून शिवाजीचे सरदार, विशेषतः मोरोपंत, हे स्वस्थ बसले नव्हते हें उघड दिसतें. फॅक्टरी रेकॉर्डस्मध्यें पुष्कळ वेळां पुढील तारखेच्या एकाद्या लांबलचक पत्रांत मागील आठदहा महिन्यांची हकीकत सारांशरूपानें ग्रथित केलेली असते. यामुळें अमुक हकीकत एका कालावधींत झाली हें सांगतां आलें तरी त्या गोष्टीचा नक्की काल अन्य पुराव्याच्या अभावीं ठरवितां येत नाहीं. त्याचप्रमाणें या रेकॉर्डस्मध्यें विश्वसनीय हकीकतीबरोबरच दंतकथेप्रमाणें परंपरेनें कळलेल्या गोष्टीहि ग्रथित केलेल्या असतात व अशा वेळीं पत्राची पैवस्ती, लेखकाचा दर्जा, ज्यास लिहिलें त्याचा दर्जा, लिहिण्याचा उद्देश व इतर पत्रांतून आलेल्या हकीकतींचा परस्पर मेळ या गोष्टी ध्यानांत घेऊन पत्रांतील हकीकतीची विश्वसनीयता ठरवावी लागते. उदाहरणार्थ, एका पत्रांत नेताजीचा शिरच्छेद झाला ( ले० ११२६ ) असें लिहून नंतर पुढें त्याची दुरुस्ती झाली आहे. ह्यावरून हातांत असलेल्या कागदाच्या तत्कालीनतेप्रमाणेंच त्याचें स्थानमाहात्म्य लक्षांत घेऊनच त्या कागदाचा अव्वलपणा ठरविला पाहिजे हें उघड आहे. असो. वर सांगितलेल्या साडेदहा महिन्यांपैकीं शिवाजी देशांतून निघून आग्र्यास जाऊन पोहोंचला त्या काळांत म्हणजे मार्च ५ पासून मे १२ पर्यंत मराठ्यांनीं मोंगलांविरुद्ध कांहीं धुमाकूळ माजविलेला नसावा; कारण शिवाजीचा आग्र्यास जाण्याचा गुप्त उद्देश कोणाच्या कल्पनेप्रमाणें कदाचित् दुसरा कोणताहि असला तरी, जाहीर उद्देश अर्थातच झालेला पुरंदरचा तह पुरता पदरांत पाडून घ्यावा व शक्य तर मोगलांच्या नामधारी ताबेदारीखालीं विजापूरकरावर विनहरकत हल्ले चढविण्यास फर्मानी परवानगी मिळवावी हाच होता. अशा वेळीं मोंगलाविरुद्ध आगळीक करण्याजोगें कृत्य मराठ्यांकडून

होईल हें संभवत नाहीं. त्याचप्रमाणें मे १२पासून ऑगस्ट १७ तारखेपर्यंत शिवाजी आग्र्यास कैदेंत होता त्या काळांतहि मोगलांची खोडी काढणें म्हणजे शिवाजीच्या जिवावर आपत्ती ओढवून घेणें होय ही गोष्ट तत्कालीन मराठ्यांनीं विसरणें शक्य नसल्यामुळें याहि कालांत मराठ्यांच्या हालचाली मर्यादित असणार हें उघड आहे. किंबहुना शिवाजी श्रावण व० १२स(ऑगस्ट १७) सुटला ही बातमी दक्षिणेस पोहोंचून ती नक्की होईपर्यंत सुमारें १५ दिवसांचा काळ लोटला असेल, तोंपावेतों मराठे मोगलांविरुद्ध लढले नसतील. तेव्हां शिवाजीच्या गैरहजेरींतील मोगलांविरुद्ध झालेल्या मराठ्यांच्या हालचालींचा काळ सप्टेंबर ते डिसेंबर १६६६ या चार महिन्यांचा असला पाहिजे असें तर्कशुद्ध अनुमान करणें वावगें होणार नाहीं.

विजापूरकरांचे हल्ले परतवीत परतवीत जयसिंग एक एक पाऊल मागें घेत होता; अशा स्थितींत त्यास शिवाजीकडून घेतलेल्या किल्ल्याचें रक्षण करण्याचें सामर्थ्य राहिलें नाहीं. म्हणून त्यानें देशावरील पुरंदर, सिंहगड, लोहगड व कोंकणांतील माहुली व कर्नाळा ह्या किल्ल्यांचा बंदोबस्त राखून बाकीच्यांची पाडापाड करविली. ही संधि साधून मोरोपंतांनीं आपले गेलेले किल्ले फिरून परत घेण्याची खटपट चालविली. शिवाजी परत येईपर्यंत कोंकणांतील बहुतेक किल्ल्यावर मराठ्यांचें निशाण पूर्ववत् लागलें. तो येण्याच्या सुमारासच कल्याण प्रांताचा बहुतेक भाग फिरुन मराठ्यांच्या हस्तगत झाला. ह्या सर्व गोष्टी ग्रँट डफ 'मराठी कागदपत्रांच्या आधारें लिहितों' असें उल्लेखितो व ते कागदपत्र मिळावेत म्हणून चुटपूट लागून राहते. सरकार या मोरोपंताच्या हालचालींचा उल्लेख करीत नाहींत, परंतु रोहिडा किल्ल्याच्या आसपास मराठे एकत्र जमाव करूं लागल्यानें जयसिंगाची कशी तारांबळ उडाली व त्यानें घाईनें ५०० स्वारांचें पथक त्याच्या रक्षणार्थ कसें पाठविलें; तसेंच अण्णा ( दत्ताजी देशमूख ) यांनीं पंढरपुराकडे कसा धुमाकूळ माजविला यामुळें जयसिंगास तिकडेहि कसें लक्ष पुरवावें लागलें ह्याचें हप्तअंजुमानच्या आधारें वर्णन केलें आहे. त्याचपैकीं ( ले० ११४५ ) हें जयसिंगाच्या गुमास्त्याचें पत्र पुणें प्रांतांतील घडामोडीचा उल्लेख करीत आहे. शिवाजीचा जावई, फलटणकर बजाजीचा मुलगा, महादजी निंबाळकर हा पुण्याच्या असपास धुमाकूळ घालीत असतो. माझा धनी ( जयसिंग ) यानेंहि त्या बाजूला बंदोबस्ताकरितां त्या प्रांताचे जहागीरदार नेमले आहेत; ते असे. बाबाजी भोसले

वगैरे लोक सुपें येथें; हलालखान इंदापूरच्या बाजूला; वलीबखान चांभारगोंदाच्या बाजूला; हसनखान, अबदुल रसूल व आणखी कांहीं दक्षिणी इतरत्र ठेविले आहेत. त्रिंबकजी भोसले वगैरे लोक रासीनकडे पाठविले आहेत. सर्वांच्या आधीं बाबाजी भोसले आपल्या जहागिरींत पोहोंचून त्यानें महादजीवर हल्ला करून त्याचे पुष्कळ लोक मारले.......पुढें चार दिवसांनीं महादजीला विजापूरकरांची मदत मिळून त्यानें बाबाजीवर अचानक छापा घातला. बाबाजी या हल्लयांत पडला........जयसिंग त्याच बाजूला ह्या अप्रयशाचें परिमार्जन करण्याकरितां जाणार होता. परंतु ‘ आपण तिकडे गुंतलों तर विजापूरकर उचल खातील ’ या भीतीनें तो बेत रद्द केला व तिकडच्या बाजूला ५००० लोकांनिशीं अबदुल हमीदला रवाना केलें.” ह्या पत्रांतील ‘ त्या प्रांताचे जहागीरदार नेमले आहेत ’ या वाक्यावरून जयसिंगानें नवीन प्रांतावर अमल बसविण्यासाठीं त्या प्रांतांतील स्थायिक वजनदार माणसांचा कसा उपयोग करण्याचें मनांत आणिलें तें दिसून येतें. हें पत्र डिसेंबरांतील म्हणजे शिवाजी आल्यानंतरचें आहे; पण त्यांतील हकीकत शिवाजीच्या गैरहजेरींत घडलेली आहे.

याखेरीज फॅक्टरी रेकॉर्ड्समधील ता० ५ सप्टेंबर १६६६ चें पत्र (ले० ११३५) कुडाळच्या बाजूला शिवाजीच्या गैरहजेरींत झालेल्या हालचालीवर प्रकाश पाडतें. “रुस्तुमजमाला शिवाजीविरुद्ध सेनापत्य मिळाल्यानंतर त्याच्या नेहमींच्या वहीवाटीप्रमाणेंच शिवाजीशीं संधान ठेवून आणि आपण शत्रूविरुद्ध शक्य ती खटपट करीत आहोंत असें आदिलशहास भासवून कुडाळच्या हद्दीवरील रांगणा या नांवाचा मजबूत किल्ला अंतस्थपणें त्यानें रावजी पंडिताचे हवालीं केला. ह्यामुळें आदिलशहानें चिडून जाऊन सर्व हस्तकासह त्याची कत्तल करण्याचा हुकूम दिला. परंतु मित्राच्या मध्यस्थीमुळें विजापुरास जातीनें जाऊन खुलासा करण्याची संधि त्याला देण्यांत आली आहे. आतां विलक्षण दैवानें हात न दिला तर तो यांतून सुटणें कठीण आहे.” या पत्राची तारीख ५ सप्टेंबर आहे खरी; पण रुस्तुमनें रांगणा मराठ्यास नक्की केव्हां दिला तें कळत नाहीं. परंतु २४ एप्रिल १६६६ च्या कारवारहून आलेल्या पत्रांत (ले. ११२६) ही बातमी नाहीं. कारवारास विजापूरची बातमी लवकर कळणें शक्य आहे, हें लक्षांत घेतां व त्या पत्रांत केवळ दख्खनचीच नव्हे तर इतर ठिकाण-

चीहि सविस्तर बातमी लिहिली आहे, हें पाहतां रांगण्याबद्दलची महत्त्वाची गोष्ट अगोदर घडली असतां त्याची बातमी कारवारपर्यंत पोहोंचत नाहीं व पोहोंचल्यावर लेखक ती अशा पत्रांत सविस्तर लिहिणार नाहीं हें असंभवनीय दिसतें. म्हणून हा रांगण्याचा प्रकार एप्रिल ते सप्टेंबर मधील अर्थात् शिवाजीच्या गैरहजेरींतील असला पाहिजे. रांगण्याची मोहीम म्हणजे मोगलांशीं युद्ध नव्हे, हें लक्षांत वागविलें असतां पूर्वीच्या छेदकांत लिहिलेल्या अनुमानास कांहींच बाध येत नाहीं. ह्या पत्रांतील बाबाजी भोसले यास प्रो० सरकार ठिकठिकाणीं तानाजी असें संबोधीत आहेत. वर वर्णिलेली हकीकत खरी असेल तर रुस्तुमजमाचे मराठ्यांशीं फिरून सख्य जुळलें असें म्हटलें पाहिजे. शिवाजीच्या गैरहजेरींत मराठे मुत्सद्यांनीं हरप्रयत्न करून त्याची मैत्री संपादन केली असावी. हीं सर्वच वर्णनें जमेस धरून पाहातां तत्कालीन मराठ्यांत शिवशाहीच्या स्थापनेबद्दल तीव्र आकांक्षा होती. संभाजीच्या मृत्यूनंतरच्या संकटपरंपरेंत महाराष्ट्रानें जें अनुपम चैतन्य जगाच्या निदर्शनास आणिलें, त्या तेजाची किंचित् चमक या वेळीं दिसून आल्याशिवाय राहिली नाहीं व या साडेदहा महिन्यांत सर्वांची खात्री पटली कीं, शिवाजीच्या नेतृत्वाखालीं जे मराठे आपला पराक्रम दर्शवितात ते शिवाजीच्या गैरहजेरींतहि अशा तशा तऱ्हेनें चिरडले जाणारे नाहींत.

हें शिवाजीच्या गैरहजेरींत झालेल्या युद्धविषयक हालचालींचें वर्णन झालें. या काळांतील अंतर्गत राज्यव्यवस्थेवर प्रकाश पाडणारे कागदपत्र फारसे उपलब्ध नाहींत. आहेत त्यावरून मातुश्री जिजाबाईच्या कर्तृत्वाची साक्ष पटते. बाबाजीराय प्रभु देश कुळकर्णी पुणें यास माघ शु. ६ शके १५८७ रोजीं लिहिलेलें पत्र शिवाजी आग्रयास निघण्याच्या किंचित् अगोदरचें आहे. त्यांत जिजाबाई कुळकर्ण्यास लिहिते 'नशते कथले केलियास चिरंजीव मुलहाजा करणार नाहींत' (खं. १८, पान ३०); दुसरें पत्र शिवाजी आल्यानंतरचे म्हणजे माघ शु.१०।१५८८ चें आहे (ले.११४९, खं. १६, पा. ३७.) त्यांत कानदखोरे येथील बाबाजी झुंझारराव व कानोजी पतंगराव यांचा भाऊबंदीचा तंटा मातुश्री आऊसाहेब (जिजाबाई) यांनीं गोत बैसोन मिटविला. त्याचा महजर वरील लेखांकांत दिला आहे. हीं दोन्ही पत्रें शिवाजी दक्षिणेंत असतांचीं असलीं तरी पहिलें शिवाजीस उत्तरेस जाण्याचा वेध लागला तेव्हांचें व दुसरें शिवाजी दक्षिणेंत आल्यावर पूर्णपणें

स्वकार्यक्षम होण्यापूर्वीचें आहे. त्यावरून जिजाबाई त्याच्या गैरहजेरींत किती कर्तबगारीनें काम करीत असेल याचा सहज उलगडा होतो.

**२ सुटकेच्या बातम्यांमुळें उडालेली गडबड**— शिवाजी सुटल्याबरोबर त्यासंबंधींची बातमी मात्र वाऱ्याच्या वेगानें चहूं-कडे पसरली. तत्कालीन फॅक्टरी रेकॉर्डसवरून, जो तो दुसऱ्यास 'शिवाजी सुटला, शिवाजी सुटला' असें सांगत सुटल्याचें दिसून येतें (ले. ११३७, ११४१–४२–४३ पहा). २९ सप्टेंबर १६६६ च्या पत्रांत कारवारचे व्यापारी लिहितात कीं, शिवाजी सुटला हें खरें असलें तर औरंगजेबावर आतां चांगलाच पश्चात्ताप करण्याची पाळी येईल. पुढें ही संशयित बातमी पक्की झाल्यावर शिवाजी येतो तो एकदम सुरतेवरच येतो कीं काय अशी सुरतवाल्यास भीति पडली; (पा. १७१ पहा) व ते विलायतच्या डायरे-क्टरास तावातावानें लिहितात कीं, 'आपण आम्हांस त्याजबरोबर पत्रव्यव-हार ठेवा असें लिहितां; परंतु असल्या दगलबाज चोराबरोबर आम्ही कांहीं-एक संबंध ठेवूं इच्छित नाहीं.' ह्याच सुरतेच्या हवालदील स्थितीचें वर्णन, (पान २०७ वर) सुरतेहून कारवारला ता. १७ आक्टोबर १६६६रोजीं गेलेल्या पत्रांत आहे. फॅक्टरी रेकॉर्डसमधून शिवाजीस चोर, दगल-बाज वगैरे विशेषणांचा आहेर अव्याहत झालेला आहे. परंतु असल्या निंद-कांच्या तोंडूनहि एखादा निर्वाळा चुकून बाहेर पडतो. (पान ५२ वर) कारवारचे व्यापारी लिहितात कीं, 'शिवाजी मोठा दरोडेखोर असल्यानें व्यापारी लोक त्याच्या टापूंतून मालाची नेआण करण्यास सहसा धजावणार नाहींत. परंतु कांहींचें मात्र त्याच्याविषयीं असें मत आहे कीं, त्यानें एकदां वचन दिल्यावर तो तें विश्वासानें पाळणें हा आपला धर्म समजतो व म्हणून तो वचनभंग करीत नाहीं'! एकूण प्रतिपक्षाच्या गोटांत स्वतःविषयीं असें मत उत्पन्न करण्याइतका मोठेपणा शिवाजीच्या अंगीं होता हें वाचून अभि-मान वाटतो. प्रो. सरकार आपल्या चरित्रांत याबद्दलचा उल्लेख करीत नाहींत! दुसराहि प्रासंगिक मुद्दा उल्लेखितों. तो असा कीं, शिवाजीचे प्रति-पक्षी व परकीय त्रयस्थ इ. स. १६६६–६७ सालीं देखील शिवाजीस बंड-खोर म्हणतात; यावरून शिवाजीची या काळापर्यंतहि इतरांकडून गणना 'यशस्वी बंडखोर' येवढ्यापर्यंतच होत होती. तेव्हां 'यशस्वी बंडखोरास'

' राजा ' म्हणवून घेण्याकरितां राज्याभिषेकाची किती आवश्यकता होती हें यावरून सहज दिसून येतें.

**३ जेधे शकावलींतील त्रुटित उल्लेख व प्रो. सरकार—** या ठिकाणीं सन १६६६ तील घडामोडींची बहुतेक हकीकत पूर्ण होते. पण जेधे शकावलींत ' मार्गशीर्ष मासीं ( श. १८५८ ) पीरमिया व ताजखान देवरुखी होते. तो झगडा होऊन मारिला. हातीं पाडाव केला. ' असें कलम आहे त्याची संगति कोठेंच लागत नाहीं. कारण हे पीरमिया कोण व कोठले याचा संदर्भ कळत नाहीं. प्रो. सरकार यांनीं आपल्या शिवचरित्राच्या तिसऱ्या आवृत्तीला जो कालादर्शाचा तक्ता जोडला आहे त्यांतहि हेंच कलम भाषांतर करून मार्गशीर्षाचे जागीं डिसेंबर व शकाचे जागीं सन घालून दिलें आहे. परंतु मूळ ग्रंथांत त्याचा कोठेंहि पत्ता नाहीं व कालादर्शांतहि हें कलम जेधे शकावलीवरून घेतलें असा उल्लेख नाहीं. जेधे शकावलीच्या विश्वसनीयतेबद्दल मनांतून शंका नसल्यामुळें स्वतः तिचें अंध अनुकरण करून पुन्हां तिच्या विश्वसनीयतेबद्दल एकही अक्षर लिहून गुंतावयाचें नाहीं असें प्रो० सरकार यांचें धोरण आहे! कारण तसे विश्वसनीयतेचे शिफारसपत्र जेधे शकावलीस दिल्यास जेधे शकावलीचें शिवजन्माचें कलम विश्वसनीयतेच्या सदरांत येतें! तेव्हां ही आपत्ति टाळण्यासाठीं सामान्य वाचकांच्या सहज लक्षांत येणार नाहीं असा मार्ग प्रो० सरकार यांनीं स्वीकारावा यांत आश्चर्य नाहीं.

**४ गुणीजनांचा गौरव—** शिवाजीच्या सुटकेमुळें सुरतेच्या व्यापाऱ्यांस भय पडलें; तसेंच इतरत्र सर्वांना पुन्हां काळजी उद्भवली; हें खरें असलें तरी शिवाजीनें राजगडास परत आल्यावर घाईघाईनें असें कोणतेंच कृत्य केलें नाहीं. राजगडास येऊन पोहोंचतांना बरोबर निराजीपंत, दत्ताजीपंत व राघोजी मराठा असे तिघे त्याजबरोबर आले असें सभासद लिहितो. ' राजगडास आलियावर थोर धर्म मोठा महोत्सव केला. साखरा वाटल्या, तोफांचे आवाज केले, शिवाजीच्या गैरहजेरींत मातुश्रीनें व कारकुनांनीं व लष्कर गड कोट हशाम सर्वांनीं संतोष करून खुशाली केली. ' यानंतर ' राजगडास वाराणशीहून सुखरूप पावलियावरी मथुरेस माणसें व पत्रें पाठविलीं. त्याजवरून कृष्णाजीपंत व काशीराऊ व विसाजीपंत या त्रिवर्गांनीं आपले कुटुंबासहीत संभाजी राजे यास

जानवें धोत्रें नेसवून आपला भाचा म्हणवून राजगडास आणिले; आणि राजियास भेटले. मग राजे पुत्रास भेटले. आनंद थोर झाला. मोठा दानधर्म केला आणि कृष्णाजीपंत त्रिवर्ग बंधूंस 'विश्वासराव' म्हणवून किताब दिला. लक्ष होन बक्षीस दिले. तिघां बंधूस दहा हजार होन तैनात केली. निराजीपंतास न्यायाधीशी सांगितली. दत्ताजीस वाकेनिसी दिली व राघो मित्रा यास हुजूर लोकांचा हवाला सांगितला.समागमें जे जे लोकीं श्रम साहस केला त्यास नांवाजले.' ह्या(सभासद पृ.५६) सभासदाच्या बिनहिशेबी लिहिण्यास खं. ८ ले. २३ या पत्रानें कांहींसा निश्चितपणा येतो. राजश्री कृष्णाजी 'विश्वास राऊ' यांस ५०००० रुपये, त्यांच्या मातुश्रीस रु. २५००० व बंधू काशी (राऊ) त्रिमळ यास २५००० 'येणेंप्रमाणें पाववीत; पाववावें' असें त्यांत लिहिलें आहे. पत्र शहुरसन इसन्ने सबैन व अलफचे म्हणजे सन १६७१।७२ चें आहे. यावरून 'संभाजी मागाहून पांच वर्षांनीं दक्षिणेंत आला असावा असें यावरून दिसतें' असें श्री. सरदेसाई लिहितात (म० रि० पृ० ३२८ पहा.) परंतु इ० स० १६६८ त संभाजी शहाजाद्याच्या भेटीस गेला वगैरे गोष्टींस अस्सल साधनाचा आधार असल्यानें वरील तर्क लटका पडतो. वास्तविक या तर्कास जागा आहे असें नाहीं. कारण पत्रांत कृष्णाजीपंतास 'कृष्णाजी विश्वासराऊ' असें म्हटलें आहे. अर्थात् कृष्णाजीपंतास आल्याबरोबर विश्वासराव हा किताब दिला. कदाचित् दरबारांत बक्षीसहि द्यावयाचें त्याच वेळीं जाहीर झालें असेल व नंतर ही 'वर्कसनद'—हा शब्द त्याच पत्रांत आहे—म्हणजे धातूच्या पातळ पत्र्यावर कोरलेली सनद सावकाश तयार झाली असेल.

**५ पुढील धोरणाची मीमांसा**—गुणी व कर्तृत्ववान् मनुष्यांचा याप्रमाणें सन्मान केल्यावर शिवाजी पुढील उद्योगास लागला. शिवाजी सुटला खरा. परंतु त्याच्यामागें त्रिंबकपंत व रघुनाथपंत कोरडे यास श्रा० व० अमावास्येस (श. १५८८) आग्र्यास धरलें होतें. त्यांना सोडविणें अगत्याचें होतें. तसेंच येथपर्यंतच्या धामधुमीच्या काळांत राज्यव्यवस्था करण्यास कांहीं वेळ मिळाला नव्हता तो मिळणें जरूर होतें. पुढील हल्ल्याच्या पूर्व तयारीसाठीं कांहीं अवसराची आवश्यकता होती. विजापूरकरांशीं चाललेलें युद्धहि अद्याप थांबलें नव्हतें. साडेदहा महिन्यांच्या काळांत काय काय फेरबदल झाले व परस्पर शत्रुमित्रांचें बलाबल काय आहे

तें अजमावणें अगत्याचें होतें. "आपलें राज्य नवें, त्याहिमध्यें दोनतीन चपेटे होऊन हलाखी झाली आहे. त्यास एक शत्रु तरी मित्र करावा. आणि दोन वर्षें बळ धरून सावरावें मग पुढें जें कर्तव्य तें करावें (पा. ५९) हे सभासदानें शिवाजीच्या तोंडीं घातलेले उद्गार शिवाजीच्या हेतूंवर प्रकाश पाडतात. या सर्व गोष्टी लक्षांत घेऊन शिवाजीनें औरंगजेबाशीं तहाचें बोलणें लावलें. श. १५८९वै. शु. ९च्या पत्रांत (ले० ११५८) तो औरंगजेबास लिहितो "हा बंदा गुलाम आपली नोकरी करून हुकूम पाळण्यांत मोठें भूषण मानीत आहे. हिंदुस्तानच्या बादशहाची मोठी फौज मजवर चालून येत आहे. या फौजेशीं टक्कर देण्याचें सामर्थ्य पृथ्वीमध्यें कोणास तरी आहे काय? म्हणून माझी अशी नम्र विनंति आहे कीं माझा मुलगा संभाजी यास चार हजारांची मनसब बादशाही फौजेंत मिळावी. मनसब न मिळाली तरी ही फौज घेऊन तो बादशहाची नौकरी करीत राहणार. माझ्या ताब्यांत जे किल्ले होते ते सर्व मीं बादशहाकडे सोंपवून दिले आहेतच. आणि अद्यापि जे कांहीं किल्ले माझ्याकडे आहेत ते व माझी सर्व जिंदगी आपल्या सेवेस अर्पण आहे."

**६ मोगलाईवरील संकटें**—अशा प्रकारच्या नरमाईच्या पत्रास सहज भुरळण्याइतका औरंगजेब अर्थातच भोळा नव्हता. परंतु त्याच्या अडचणीहि अनेक होत्या. शहाजहान मृत्यु पावल्यानंतर (जानेवारी १६६६) त्याच्या पहिल्याच वाढदिवशीं (चांद्रमानाप्रमाणें) शिवाजी दरबारांत येण्याचा वगैरे प्रकार झाला. तेव्हांपासून त्यास इतर गोष्टींकडे पहाण्यास स्वस्थता मिळाली नव्हती. आपल्या बापाशीं केलेल्या गर्ह्य वर्तनामुळें तो दरबारांत अप्रिय होता. शिवाजीसारख्या क्षुद्र शत्रूंचा बंदोबस्त त्याच्या हातून न झाल्यामुळें परराष्ट्रांत त्याची पत राहिली नव्हती. इराणचा शहा शहाअब्बास यानें तर त्यास टोंचून पत्र लिहिलें कीं 'तूं आपणास अलम दुनियेचा जेता म्हणवितोस आणि तुला शिवाजीसारख्याचा बंदोबस्त कसा होत नाहीं!' शिवाजी सुटल्यानंतर अवघ्या एक महिन्यांत असलें पत्र वाचून अलमगीरची मनःस्थिति काय झाली असेल याची वाचकांनींच कल्पना करावी. बिचाऱ्या औरंगजेबानें हें पत्र त्याच्या दरबारीं घेऊन येणाऱ्या आपल्या मनुष्यावरच सगळा राग काढला. (सप्टेंबर १६६६ सरकार औरंगजेब व्हॉ. ३ पा. ११० पहा). पण येवढ्यानें संपलें नाहीं. इराणचा शहा हिंदु-

स्थानावर स्वारी करण्याची जय्यत तयारी करीत होता. त्यास तोंड देण्या-साठीं सज्ज राहाणें बादशहास अगत्याचें होतें. याखेरीज इ. स. १६६७त वायव्य सरहद्दीवर भागू नांवाच्या पुढाऱ्याच्या नेतृत्वाखालीं युसुफशाही लोकांचें बंड उद्भवलें होतें. या सरहद्दीवरील लोकांचा स्वभाव पूर्वींपासून आहे तोच आहे. 'प्राणापेक्षां स्वातंत्र्यप्रिय व शांततेपेक्षां लुटालूट प्रिय' हें त्यांचें मुख्य लक्षण असल्यानें ते मूठभर लोक आज विसाव्या शतकांतहि पूर्णपणें कोणाच्याच ताब्यांत नाहींत. हें बंड पुढें इ. स. १६७२मध्यें उत्पन्न झालेल्या अकमलखानाच्या बंडाएवढें मोठें नसलें तरी एकंदरीनें बादशाहीचें चित्त चिंताग्रस्त करण्याजोगें होतें. भागूच्या युसुफशाही लोकांनीं अटकेच्या उत्तरेस सिंधू नद ओलांडून हजारा जिल्ह्यांत धुमाकूळ घालण्याला सुरवात केली. त्यांच्यावर हल्ला करण्यासाठीं तीन तुकड्यांनीं फौज पाठविण्याचें ठरलें. अटकचा फौजदार कामीलखान, काबूलचा सुभेदार व राजधानीहून महमद अमीनखान यांना त्यांच्यावर एकदम हल्ला करण्याचा औरंगजेबानें हुकूम केला. पेशावरच्या अधिकाऱ्यानेंहि आपलें पथक पाठविलें. या सर्वांचा चांगला उपयोग झाला व इ. स. १६६७ च्या जून महिन्यांत भागूच्या बंडाचा मोड झाला. तेवढ्यानें त्या प्रांतांत पूर्ण शांतता नांदली असें नाहीं. किरकोळ दंगेधोपे सदैव चालू असत व इ. स. १६७२त तर त्याचा एवढा परिणाम झाला कीं पुढें खुद्द औरंगजेबासच आपली छावणी त्या बाजूस हलवावी लागली.

**७ जयसिंगाची दुर्दशा व मृत्यु**—उत्तरेस हा प्रकार चालू असतां दक्षिणच्या बातम्या किती आशाजनक होत्या हें आपण पाहिलेंच आहे. विजापूर गोवळकोंड्याच्या सैन्यापुढें हार खात जयसिंग १६६६ च्या नोव्हेंबरांत औरंगाबादेस येऊन पोहोंचला. किंबहुना जानेवारी ते नोव्हेंबर हें जवळ जवळ १६६६चें वर्ष तो विजापुरापासून औरंगाबादेपर्यंत मागें सरकत होता हें मागें सांगितलेंच आहे. त्याची ही पिछेहाट पाहून औरंगजेबानेंच त्याची निर्भर्त्सना केली. पुढें ऑगस्टांत शिवाजी सुटल्याचें वर्तमान ऐकल्यावर तर जयसिंगाची संकटपरंपरा वाढत गेली. कारण औरंगजेबास जयसिंगाचा संशय आला. तेव्हां तो मनांतून अतिदुःखित झाला. औरंगजेब हें युद्ध अंगावर घेण्यास तयार नव्हता. दूरदूरच्या मुलखांत स्वाऱ्या करीत बसून

पाण्यासारखा पैसा ओतीत बसण्याच्या निष्फळ धोरणाचा त्याला आपल्या बापाच्या कारकीर्दींत पुरा अनुभव आलेला होता. परंतु जयसिंगानें त्यास भर दिली. एकादा विजय मिळाल्यावर विजापूर प्रांतांतील सुपीक प्रदेशाच्या उत्पन्नानें लढाईंत झालेला सर्व खर्च भागून निघेल असें त्यास वाटत होतें. यासाठीं त्यानें बादशहानें दिलेलें ३० लाख रुपये तर या स्वारींत खर्च केलेच. परंतु पदरचे एक कोट रुपये इरेस पडून गमावले. इतकेंच नव्हे तर त्यानें दक्षिणच्या सरदारांपैकीं जो जो कोणी सरदार मोगलास येऊन मिळेल त्या त्या प्रत्येकास मनसबदाऱ्या देऊं केल्या. बादशहानें प्रथम प्रथम ह्या मनसबदाऱ्यास भीडमुर्वतीस्तव मान्यता दिली. परंतु पुढें त्यानें जयसिंगानें शिफारस केलेल्या अनेक मनसबदारीच्या जागा नामंजूर केल्या व तो जयसिंगास त्याच्या अपयशाबद्दल दोष देऊं लागला. त्याच्या भरीला जयसिंग शिवाजीस फितूर आहे कीं काय असा संशय बादशहानें प्रकट केला; यामुळें जयसिंगास अपरंपार दुःख झालें. बादशाहीशीं आपलें असलेलें इमान पटवून देण्यासाठीं तो वाटेल तें करण्यास सिद्ध झाला. शिवाजीची मुलगी स्वतःच्या मुलास करून घेण्याचें क़बूल करून शिवाजीस बाह्यात्कारी स्नेह दाखवावा व त्याची मुलगी ताब्यांत घेऊन त्याला मऊ आणावा ह्या आसुरी उपायासुध्दां ( ले० ११५२ पहा ) त्यानें बादशहाची संमति मागितली. परंतु असल्या उपायांनीं देखील तो बादशहाची गेलेली मर्जी पुनः संपादन करूं शकलों नाहीं. बादशहानें त्यास राजधानीस परत येण्याचा हुकूम केला व दिल्लीच्या सुभेदारीवर शहाजादा मुअज्जम व जसवंतसिंग यांची जोडी पाठवून दिलेरखानास त्यांच्या मदतीस, अथवा खरें म्हटलें तर त्यांच्यावर दाब ठेविण्याकरितां, ठेविलें. एक राजपुत्र व एक सरदार स्वारी-वर पाठविण्याची चाल मोगलाईंत पूर्वापारची होती. त्यानें दोघांचाहि एक-मेकांवर दाब रहात असे. संशयी औरंगजेबाच्या कारकीर्दींत एक रजपूत सरदार व राजपुत्र यांच्याबरोबर आणखी एका मुसलमान सरदाराची नेमणूक

---

१ शिवाजीच्या प्रत्येक कृत्याकडे सामान्य मनुष्याच्या नीतिमत्तेच्या नियमांनीं काटेकोरपणानें पाहणारास जयसिंगाच्या वरील विचारावरून शिवाजी-विषयीं आपलें मत बदलावें लागेल. शिवाजी ज्या काळांत वागत होता त्या काळांत त्याचे शत्रू प्रसंगीं पडेल त्या काळ्याबेऱ्या साधनाचा उपयोग करण्यास मागे पाहा-णारे नव्हते.

होऊं लागली. असो. जड अंतःकरणानें जयसिंगानें दक्षिणच्या सुभ्याचा अधिकार मे १६६७ मध्यें मुअज्जमच्या हवालीं केला व आपण उत्तरेस निघाला. पण बिचारा फार दिवस वांचला नाहीं. उत्तरेच्या वाटेवर ता० २ जुलै १६६७ रोजीं बऱ्हाणपूर येथें तो मृत्यु पावला. साऱ्या मोगलाईंत जयसिंगाइतका इमानी सरदार क्वचितच असेल. जयसिंगाचें धोरण चुकलें होतें असें म्हणतां येणार नाहीं, कारण बादशहानें त्याला दक्षिणेंत पाठविल्यावर त्याला पुरतें साहाय्यच केलें नाहीं. दक्षिणेस अशा रीतीनें पाठविलेला सरदारच प्रबळ होऊन बसेल याची औरंगजेबास नित्य भीति असे. त्याच्या हाताखालच्या मुसलमान व रजपूत सरदारांतहि दिलजमाई नसे. बाबरच्या काळांतील मोगलांचा मैदानी मर्दानीपणा वैभवाच्या राहणीमुळें कमी पडला होता. हालचाली झपाट्यानें होत नसत. ह्या सर्व कारणांमुळें जयसिंगाचा पराभव झाला. औरंगजेबानें त्याच्या पराभवामुळें त्यास मरतेसमयीं नीट वागविलें नाहीं, ही त्याची मोठी चूक होय. कोणी म्हणतात औरंगजेबानें त्यास विषप्रयोग करविला. ह्याला बळकट पुरावा नाहीं. परंतु औरंगजेब कांहीं असें न करणाऱ्यांपैकीं नव्हता. वुल्झीनें मृत्युसमयीं म्हटलें कीं ' मी जितक्या इमानानें राजाची चाकरी केली तितक्याच इमानीपणें परमेश्वराचें भजन केलें असतें तर त्यानें मला असा दगा दिला नसता. जयसिंगाच्या तोंडून मृत्युसमयीं असेच उद्गार निघण्यासारखा तो प्रसंग होता.

८ **औरंगजेबाशीं तहः**—एकीकडून शिवाजी निसटला व दुसरीकडून विजापूरकरांच्या हातून पराभव झाला; अशा स्थितींत औरंगजेबास शिवाजीनें केलेल्या तहाच्या मागणीस मान्यता द्यावीसें वाटल्यास नवल कसलें? इकडे दक्षिणेंत नवीन आलेल्या तीन अधिकाऱ्यांत तीन नसले तरी दोन पंथ होते. दिलेरखानाचें व जसवंतसिंगाचें वाकडें होतें. शहाजादा जसवंतसिंगाचा पाठपुरावा करी. शहाजादा व जसवंतसिंग यांना मनापासून युद्धाची दगदग नको होती; बरें, जमल्यास मनांतून शिवाजीशीं सख्य हवें होतें. कारण पुढें मागें याच पूर्वपरंपरागत मार्गानें प्रबळ होण्याची त्यास इच्छा होती. औरंगजेबास ह्या गोष्टीची कल्पना नव्हती असें नाहीं. परंतु वर सांगितलेल्या अनेकविध अडचणी लक्षांत घेऊन औरंगजेबानें शहाजादियास सांगितलें कीं "जोरावारीनें शिवाजीस हातास लागत नाहीं. तुम्ही जाऊन औरंगाबादेस रहाणें आणि सलामामला राजियासी करून त्याचें सख्य करणें

आणि भेटी न ये तरी मुलाज माफ करणें....इ." (सभासद पृ.५८) हा निरोप सभासदाच्या म्हणण्याप्रमाणें औरंगजेबानें शहाजाद्यास पाठविला असल्यास तो शहाजादा येतांनाच, त्याजबरोबर पाठविलेला दिसत नाहीं. भागूचें बंड व इराणच्या शहाच्या स्वारीचें भय यांनीं चिंतातुर झाल्यावर जुलै १६६७ त पाठविला असावा. कारण फिरून शिवाजीनें जसवंतसिंगास लिहिलेलें पत्र उपलब्ध आहे. त्यांतील मजकूर असा कीं, "बादशहा माझें म्हणणें मनावर घेत नाहीं. काय करावें ? नाहींतर माझ्या मनांत बादशाही फौज घेऊन कंदाहारवर जावें असें होतें. माझ्या जीवाच्या धास्तीनें मी राजधानींतून पळालों. माझी ज्याच्यावर भिस्त तो जयसिंग तर मरण पावला. खरोखर अशी माझी इच्छा आहे कीं, संभाजीनें औरंगाबादेस मनसबदारी पतकरून शहाजाद्याजवळ राहावें आणि माझ्या फौजेनें माझ्या सरदाराच्या हाताखालीं बादशहाची कामगिरी करून दाखवावी. ( सरकार पान १६४ ) लवकरच शिवाजीनें रघुनाथपंत कोरडे[२] यांस औरंगाबादेस पाठविलें. त्यांच्याबरोबर "कित्येक जडजवाहीर व वस्त्रेंहि शहास पाठविलीं. रघुनाथपंतीं जाऊन भेट घेतली. शहानें बहुत सन्मान केला. एकांतीं कित्येक गोष्टी बोलिला कीं, 'राजे व आपण भाऊ, तुम्ही व आम्ही एक विचारें राहूं ( न ) तुम्ही भेटीस येणें. तुमचे पुत्राचे नांवें दौलत देतो. एक सरदार फौज चाकरीस देणें व एक ब्राह्मण मातबर देणें....संभाजी राजाच्या नांवें सप्तहजारी दौलत द्यावी. पंधरा लक्ष होनांचा मुलूख वऱ्हाड व खानदेश द्यावा असें केले. उत्तम भूषणें वस्त्रें देऊन रवाना केलें" ( सभासद पान ५८–५९ ). या सभासदाच्या म्हणण्यावरून असें दिसतें कीं, शहाजाद्यानें वरील प्रकाराच्या तहाच्या अटी बादशहाच्या मंजुरीकरितां पाठविल्या. हा तह बहुधा मंजूर

---

१ हें पत्र नष्क-इ–दिल्काश या ग्रंथाच्या आधारें दिलेलें आहे. नष्क–इ–दिल्काश हा ग्रंथ भीमसेन बऱ्हाणपुरी नांवाच्या बुंदेल्यानें लिहिलेला आहे. परंतु अनेक मराठी बखरीप्रमाणेंच व त्याहूनहि कदाचित् अधिक कल्पनाप्रचुर, अनैतिहासिक व अविश्वसनीय आहे. तेव्हां या पत्रावर अव्वल पुरावा म्हणून भिस्त टाकतां कामा नये.

२ चै. व. ५ शके १५८९ = एप्रिल ३ इ. १६६७ रोजीं त्र्यंबकपंत डबीर व रघुनाथपंत कोरडे दिल्लीहून [ आग्र्याहून ] सुटले असे जे० श० त विधान आहे. त्यानंतर ते लवकर दक्षिणेंत आले असावेत.

होईल असें समजून ( In anticipation ) व्यवहार सुरू झाले. शिवाजी औरंगाबादेस गेला नाहीं; परंतु त्यानें संभाजीस तिकडे पाठविलें. "कार्तिक वद्य ५ मीस संभाजी राजे शहाजादा[1] व शहाअलम यांस भेटण्यास औरंगाबादेस गेले; मोगलांशीं सल्ला झाला. जसवंतसिंगाची भेट कार्तिक व. ६ स झाली, राजपुत्राचें दर्शन कार्तिक व १३ स होऊन दुसरे दिवशीं (५नोव्हेंबर १६६७) औरंगाबादेहून स्वार होऊन रायगडास आले" असें जेधे शकावलींत एका मागून एक उल्लेख आहेत. त्यावरून संभाजीस औरंगाबादेस धाडलें, परंतु तो प्रत्यक्ष काम करण्याच्या दृष्टीनें लहान असल्यामुळें तो औपचारिक रीतीनें औरंगाबादेस जाऊन शहाजाद्यास भेटून मनसबदार होऊन परत आला. पुढील वर्षी म्हणजे ९ मार्च १६६८ रोजीं मुअज्जमनें औरंगजेबाकडून तहाच्या पसंतीबद्दलचें आलेलें पत्र शिवाजीस दिलें तें असें "आमचा लोभ तुम्हांवर आहे याकरितां तुम्हांस राजेपणाचा किताब दिला आहे. पेशजीपेक्षां अधिक कार्य करून दाखवावें म्हणजे मनोरथ पूर्ण होतील....इ." ( लें० १२०० पाहा. ) हें पत्र आल्यावर 'श्रावण शु. ८ मीस बुधवारीं प्रतापराऊ व श्रावण शु. ५ मीस रविवारीं निराजी राहुजी स्वार होऊन फौजेनिशीं औरंगाबादेस गेले. त्यावेळीं प्रतापरावाबरोबर[2]५००० फौज होती.

एकंदरींत या तहानें पुढील गोष्टी ठरल्याः—( १.) शिवाजीस 'राजा' असा किताब मिळाला. संभाजी पंचहजारी ( कीं हप्त हजारी ? ) मनसबदार बनला. शिवाजीस वऱ्हाड खानदेशांत जहागीर मिळाली. प्रतापराव गुजर आपलें ५००० सैन्य घेऊन औरंगाबादेस गेला व त्याचें कांहीं सैन्य वऱ्हाड खानदेशांत जहागिरीच्या रक्षणासाठीं राहिलें. त्या जहागिरीच्या अंतर्व्यवस्थेसाठीं रावजी सोमनाथ यास मोकासदार म्हणून पाठविण्यांत आलें. डफ

---

१ "व" हा हस्तदोष आहे. मुअज्जम हाच शहाअलम होय. हें नांव त्यास १५ आक्टोबर १६७५ त मिळालें.

२ हा प्रतापरावाचें मूळ नांव कडतोजी गुजर हा राजगडचा सरनोबती होता. नेताजी पालकार हा पूर्वी सेनापति होता. परंतु पुढें पूर्वी वर्णिल्याप्रमाणें त्याचीं अनेक स्थित्यंतरें झालीं. पुढें तो शिवाजीकडे परत आला. परंतु त्याजवरील विश्वास उडाला असल्यामुळें शिवाजीनें कडतोजीस प्रतापराव हा किताब देऊन त्यास सेनापतीचें काम सांगितलें.

म्हणतो कीं, शिवाजीचा पुणें, चाकण, सुपे परगण्यावरील हक्कहि मान्य केला; फक्त सिंहगड, पुरंदरासारखे महत्त्वाचे किल्ले मात्र त्यास दिले नाहींत.

ह्या तहानें विलासी अशा शहाजाद्याची सोय झाली असली तरी औरंगजेब व शिवाजी या उभयपक्षीं हा केवळ फसवाफसवीचा प्रकार होता. दोघांसहि एकमेकांशीं लढण्यापूर्वी थोडी फुरसत पाहिजे होती; ती मिळाली इतकेंच. असो.

**९ आदिलशहाशीं तह**—मोगलांशीं सख्य झालें तेच वर्षी राजश्रींनीं मुलुखाची बढाई केली असे जेधे शकावलीकार सांगतो. त्यास ले. ११९७ 'कारकीर्द राजश्री शिवाजी राजेसाहेब राजश्री मोरो त्रिमल प्रधान यांनीं परगणें शिरवळची वसाहती करून कीर्दी जमीनीस धारा बांधोन दिला.' या विधानानें पुष्टि मिळते. तसेंच ले. ११६४–६७–६८ इत्यादि लेखांकांत इनामाबाबतचीं जीं सनदापत्रें आहेत त्यावरून ह्या वर्षांत जमिनीची पहाणी, धाऱ्याची आकारणी व इनामांची रुजवात वगैरे कामें झालीं. इ. स. १६६७–६९ हा उणापुरा तीन वर्षांचा काळ शिवाजीच्या आयुष्यांत तारतम्यानें शांततेचा होता हें खरें आहे. मोगलांशीं तहाची वाटाघाट चालू असतां शिवाजीनें आदिलशाहीशींही तह घडवून आणण्याचा यत्न केला. मात्र मोगलाशीं नमून तह केला त्याऐवजीं आदिलशहास नमवून त्यांच्याशीं तह केला; एवढाच फरक. ले. ११५६ मध्यें त्याच्या चढाईच्या हालचालींचा ओझरता उल्लेख आहे. शिवाजी आग्र्यास कैदेंत पडल्यापासून आदिलशाही सरदारांनीं शिवाजीच्या मुलुखावर केलेल्या हल्ल्याची व रुस्तुमजम्याच्या फितुरीची हकीकत मागें दिली आहे. त्याचा तो उद्योग शिवाजी आल्यानंतरहि जोरानें चालू होता. शके १५८९ 'वैशाख मासीं बहलोलखान व राजश्री येकोजी राजे रांगणियास वेढा घातला. राजश्रींनीं वेढा मारून काढला. मग भाद्रपदमासीं येदिलशहाचा व राजश्री शिवाजी यांचा सला झाला.' (जे. श. शि. च. प्र. पा. २४) यावरून शिवाजीनें रांगण्यास पडलेला वेढा उठविल्यावर इ. स. १६६७ च्या ऑगष्टांत आदिलशाहीशीं तह केला असला पाहिजे हें उघड दिसतें. ह्या विधानास सभासद पृष्ठ ६१ वरील सविस्तर हकीगतीनें दुजोरा येतो. 'रांगणा किल्ला राजियाचा होता त्यास विजापुराहून रुस्तुमजमा वजीर सात आठ हजार लष्कर घेऊन गडास वेढा घातला. ते वक्ती गडकरी यांनीं थोर भांडण केलें व

राजियांनीं लष्कर पाठवून उपराळा करून रुस्तुमजमा मारून चालविला आणि गड रक्षिला. रुस्तुमजमा नामोहरम जाहल्यावर अबदुल करीम व बलोलखान वजीर विजापुराहून बारा हजार जमाव स्वार घेऊन रांगणियास वेढा घातला.' ह्या विधानास ले. ११५० मधील ते शिवाजीशीं गुप्तपणें विरोध करीत असावे व सावंतास शिवाजीवर हल्ले करण्यास चिथवीत असावेत. कारण रायगडच्या सुभेदारानें या प्रकाराविरुद्ध पोर्तुगीज व्हाइसरॉयकडे तक्रार केल्यावरून त्यानें लिहिलें कीं, 'आम्ही देसाई लखम सावंत व केशव नाईक ह्यांना माझ्या राज्यांतून निघून जाण्यास आज्ञा केली आहे. यामुळें तरी सदर देसायास इकडून मदत मिळते अशी आपली समजूत झाली आहे ती खोटी असल्याचें आपणास कळेल.' (ले. १२९४ ता. १६ फेब्रुवारी १६६८ ) परंतु आपल्या इमानीपणाचा निर्वाळा देणाऱ्या याच व्हाइसरॉयानें औरंगजेबाला कळविलें कीं, तुम्ही शिवाजीबरोबर जमिनीवरून लढत असल्यास आम्ही समुद्राच्या मार्गानें मदत देण्यास तयार आहोंत. (पत्र ता. १८ मे १६६८ प्रो. सेन शि. च. प्र इं. पृ. १० पहा). औरंगजेबास या वेळीं शिवाजीशीं लढण्यास सवड नसल्यामुळें ह्या पत्राचा कांहीं उपयोग झाला नाहीं. शेवटीं शिवाजीनें पोर्तुगीज भांडणाचें मूळ जो लखम सावंत त्याला पोर्तुगीजांनीं ता.८जून१६६८आषाढ शु.९श.१५९० रोजीं आपल्या प्रांताच्या हद्दीबाहेर घालविलें. तेव्हां तो शिवाजीस शरण आला. (शि. च. प्र. पृ. १८० पहा) सावंताला पोर्तुगीजांनीं आश्रय देण्यांत दाखविलेली चिकाटी एका शतकानंतर इंग्रजांनीं राघोबास आश्रय देण्यांत दाखविलेल्या चिकाटीसारखीच अन्यायाची होती व ती तशीच निष्फळ झाली. ले० १२०२ नें ह्या सावंताच्या हकालपट्टीच्या बातमीस पुष्टि मिळते.

**१० शिवाजीचा प्रतिशह**—पोर्तुगीजांकडून तह इमानानें पाळला जात नाहीं व त्यांचे गुप्त बेत चालू आहेत हें पाहून शिवाजीनेंहि पोर्तुगीजांवर तसल्याच गुप्त हत्याराचा उपयोग केला. त्याची माहिती आपणांस ले. १२२९ तारीख १२ नोव्हेंबर १६६८ च्या पत्रावरून कळते. गोव्याचा व्हाईसरॉय मेला असून आतां त्याच्या जागीं तीन अधिकारी काम करतात. व्हाईसरॉय मरण्यापूर्वी त्यानें बारकाईनें तपास केला असतां सर्व शहरांत मिळून शिवाजीचे चारपांचशें लोक छपून राहिलेले आढळले. तेव्हां स्व-

हस्तानें शिवाजीच्या वकिलाच्या (पीतांबर शेणवीच्या !) दोन तीन थोबाडींत देऊन त्याला आणि ह्या सर्व कैद्याला गोव्यांतून हद्दपार केलें. हें ऐकून शिवाजीनें आठदहा हजार पायदळ आणि एक हजार घोडेस्वारांनिशीं गोव्यावर स्वारी करण्याचें जाहीर केल्यामुळें पोर्तुगीजांनींहि आपल्याकडून कडेकोट तयारी केली. शिवाजी या वेळीं राजापूरचे उत्तरेस होता व त्याचा या अपमानाचा सूड घेण्याचा बेतहि होता; परंतु गोव्यावर स्वारी करण्यास आदिलशहाच्या मुलखांतून जावें लागत असल्यामुळें या स्वारीनें आदिलशहाशीं व परंपरेनें मोगलांशींही युद्ध उपस्थित होईल हें पाहून शिवाजीनें जमिनीवरून जाऊन स्वारी करण्याचा बेत रद्द केला व तो 'नवा सेनापति आतां शिवाजीवर पाठविला आहे....इ०' या वाक्यांनीं पुष्टि मिळते. 'गडकरी याणीं बहुत मारामारी केली व राजियांनींहि लष्कर पाठवून बाहेरून उपराळा करून मारामारी केली. बहिलोलखानाचा थोर वाखा केला आणि पाऊस पडला. झड लागली. पावसाळियांत कित्येक मेले. हत्ती घोडें, उंटें मेलीं. लष्कर सडलें. अशी अवस्था जाहाली. बहिलोलखान जीव वांचवून पळोन गेला. "गड सुखरूप राहिला." याखेरीज ले० ११७० मध्यें वेंगुर्लें देशांत यादवीचा धुमाकूळ चालूं आहे. सुलतानाचे सेनापति मनापासून काम न करितां गुप्तरीतीनें शिवाजीलाच मदत देतात. अशी लोकांची समजूत असून मधल्यामध्यें गरीब प्रजा मात्र उभयपक्षांकडून लुटून नागविली जात असते' असें लिहिलें आहे. यावरून तिकडेहि शिवाजीची स्वारी झाली असें सिद्ध होतें. इ. स. १६६७ च्या ऑगष्टांत झालेला तह हा तात्पुरता तह (Truce च्या स्वरूपाचा) असावा. कारण ले० १२१९ मध्यें खालीं उल्लेखिलेल्या औरंग.-आदिलशहाच्या तहाचा उल्लेख करून लेखक लिहितो कीं "यद्यपि शिवाजी व आदिलशहा यांचा तह झालेला नाहीं. तथापि परस्पराविरुद्ध शत्रुत्वाचें वर्तन त्यानें थांबविलें आहे." (१६ सप्टेंबर १६६८)

पुढील वर्षीं (१६६८त) औरंगजेब व आदिलशहा यांच्यामध्यें आग्रा येथें तह झाला. त्यांत असें ठरलें कीं, विजापूरकरांनीं मोगलास सोलापूरचा किल्ला द्यावा व दरसाल एक लक्ष ऐशीं हजार होन वसूलाचा मुलूख तोडून द्यावा. हा तह कायम झाल्याबरोबर शिवाजी जसवंतसिंगास जाऊन भेटला व त्या भेटींत त्यानें त्याच्यापासून असें आश्वासन घेऊन ठेविलें कीं, आपण विजापूरकरांपासून खंडणी वसूल करण्यासाठीं स्वारी केल्यास मोगलांनीं

मध्यें पडूं नये. जसवंतसिंगानें हें आश्वासन दिलें असावें; कारण ले. ११९ (ता. २२ जानेवारी १६६८), चें पत्र ह्या गोष्टीवर कांहीं प्रकाश पाडणारें आहे. "शिवाजी आपला उद्योग इतक्या चतुराईनें चालवितो कीं, बादशहाच्या संतापाची त्याच्या पुढें कांहीं मात्रा न चालतां शेवटीं अपमानानें शिवाजीशीं त्याला नमतें घ्यावें लागलें. आतां शिवाजीच्या सहाय्यानें विजापूरचा मुलूख पादाक्रांत करण्याच्या आशेनें बादशहा त्या राज्यावर त्वरेनें सैन्य पाठवील असें म्हणतात." शिवाजीच्या ह्या हालचालींचा विजापूरचा प्रधान अबदुल महमद यास दाद लागून त्यानें शिवाजीस दरसाल तीन लक्ष रुपये खंडणी देण्याचें कबूल केलें. ही वाटाघाट करण्यासाठीं शिवाजीनें बाबाजी नाईक पुंडे यास विजापुरीं आपला वकील म्हणून पाठविलें होतें (मे १६६५.) परंतु अशा प्रकारें हिंदु राजास खंडणी दिली हें मुसलमानास कळल्यास त्या प्रधानाविरुध्द असंतोष माजेल म्हणून हा करार विजापूर दरबारांत जाहीर केलेला नव्हता. ही सर्व हकीकत डफनें मराठी कागदपत्रांच्या आधारें तयार केली आहे. तिला ले० १२२१ मधील ता० ८ आक्टोबर १६६८ डच पत्रावरून पुष्टि मिळते. "शिवाजीनें पुन्हां आदिलशाहाशीं तह केला आहे. त्यानें कबूल केलेलीं सहा लाखांची खंडणी अर्थातच तो गरीब बिचारा रयतेकडून उकळील." खंडणीचे रुपये तीन लाखच असावेत. या कामीं परंपरेनें कानांवर आलेल्या डच रेकॉर्डस्‌मधील बातमीपेक्षां कागदपत्रांच्या आधारानें डफनें केलेल्या विधानावर अधिक भरवसा ठेवावा. विजापूरकरांप्रमाणेंच कुतुबशहानेंहि चौथाईचा त्रास टाळण्यासाठीं शिवाजीस दरसाल पांच लक्ष रुपये खंडणी देण्याचें कबूल केलें. अशा रीतीनें इ. स. १६६८ या सालीं शिवाजीचे मोगल, आदिलशाहा व कुतुबशाहा या त्रिवर्गाशीं शांततेचे तह झाले. ह्या शांततेच्या काळांत त्यानें राज्यांत अनेक सुधारणा केल्या व भावी राज्यव्यवस्थेचा पाया घातला. त्याचें वर्णन करणें प्रस्तुत लेखकाच्या कक्षेबाहेरचें आहे.

**११ शिवाजी आणि पोर्तुगीज**—परंतु १६६७ ते ६९ हीं तीन वर्षें अगदींच शांततेचीं गेलीं अशी जी सामान्य समजूत होती ती श्री० पिसुर्लेकर यांच्या संशोधनानें लटकी पडली आहे. श्री० पिसुर्लेकर यांचा या विषयाचा

अभ्यास अत्यंत खोल आहे. याखेरीज डॉ० सेन यांनीं याच विषयावर परिश्रमपूर्वक लिहिलेला निबंध शि० च० प्र० मध्यें प्रसिद्ध झालेला आहे. त्या निबंधांत गोव्यांतील अप्रकाशित दप्तराच्या द्वारें शिवाजी व पोर्तुगीज यांच्या संबंधावर प्रकाश पाडण्याचा यत्न झालेला आहे. परंतु त्याचा संबंध इ. स. १६७६ पासून विशेष येतो. प्रो. सरकार यांचें सर्व लिहिणें श्री० पिसुर्लेकर यांच्या ग्रंथाच्या आधारें आहे. या सर्व हकीकती जमेस धरून शिवाजीचा पोर्तुगीजांशीं काय संबंध आला तें थोडक्यांत देतों.

(अ) **स्वारीचें कारण**––इ.स.१६६६च्या पूर्वींच पोर्तुगीज व शिवाजी यांचे एकमेकांशीं संबंध आलेले होते. कुडाळ प्रांतांत शिवाजीबरोबर लढणाऱ्या व लढून पळून जाणाऱ्या लखम सावंताला पोर्तुगीजांनीं अनेक वेळां आश्रय दिला होता. शिवाजी जयसिंगाबरोबर युद्धांत गुंतल्यावर लखम सावंतानें पुन्हां पोर्तुगीजांच्या मुलखाबाहेर येऊन शिवाजीचा कारभारी कृष्ण सावंत यास दूर करून विजापूरकरांच्या मदतीनें कुडाळांत आपला पूर्वींचा अधिकार प्राप्त करून घेतला. लखम सावंत इतकेंच करून थांबला नाहीं. त्यानें कृष्ण सावंतास धरून कैद केलें व नंतर थोड्या दिवसांनीं ठार मारलें. ह्या सर्व गोष्टीचा सूड घेणें अत्यंत जरूर होतें. इ. स. १६६६च्या जानेवारी फेब्रुवारींत शिवाजीची कुडाळ प्रांतीं स्वारी झाली होती. परंतु त्यावेळीं शिवाजीस फोंड्याच्या वेढ्यांत अपयश आलें व नंतर शिवाजीस उत्तरेस जाण्याचा वेध लागला म्हणून लखम सावंताचा व पोर्तुगीजांचा बंदोबस्त करण्याचें काम तसेंच राहिलें. मध्यंतरींच्या काळांत शिवाजीच्या हस्तकांनीं रुस्तुमजमाशीं संधान बांधून रांगणा परत मिळविला. परंतु लखम सावंताचें उच्चाटन झालें नव्हतें. किंबहुना उलट त्याचेच चोरटे हल्ले शिवाजीच्या मुलखावर चालू असत. तेव्हां शिवाजीनें सुटून आल्यावर दुसऱ्या अनेक उद्योगाबरोबर सावंतावर स्वारी करण्याचें ठरविलें. ले० ११७०मध्यें वेंगुर्लें प्रांतांत धुमाकूळ चालू आहे म्हणून जें वर्णन आहे तें शिवाजीच्या याच वेळच्या हालचालीस उद्देशून असावें. ‘ सावंताचा निशाच करावा ’ म्हणून शिवाजी राजे त्या प्रांतांत शिरले व ‘ त्याचा मुलूख तळपट करीत चालले, ठाणीं व किल्ले तमाम घेतली. त्यामुळें सावंत दमोन गेला व बार-

देशांत गोमांतककरांचे आश्रयास निघाला. ' (शि० च० प्र० पृ.१७९ पहा.) अर्थातच ह्यापुढें पोर्तुगीजांच्याहि मुलुखावर स्वारी करणें शिवाजीस प्राप्त झालें.

(आ) **पोर्तुगीज मुलखावर स्वारी**—शिवाजी आग्र्याहून सुटून आल्यापासून पोर्तुगीजांचें त्याच्याशीं धोरण अत्यंत दुटप्पीपणाचें होतें. ता. २९ एप्रिल १६६७ च्या पत्रांत पोर्तुगीज व्हाईसरॉयनें जयसिंगास लिहिलें कीं, मोगल बादशहा खर्च देण्यास तयार असेल तर मोगलांचा शिवाजीवर जमिनीकडून हल्ला होत असतांना आम्ही त्याच्या मुलखावर समुद्रांतून हल्ला करण्यास तयार आहोंत (ले० ११५७ पहा); ह्या पत्राचा प्रो० सेन म्हणतात त्याप्रमाणें कांहींच उपयोग झालेला नसावा. कारण पुढील महिन्यांत जयसिंग अधिकारच्युत झाला व मोगलांचें शिवाजीशीं एकंदरीनें पूर्वीचें वैराचें धोरण बदललें. ही स्थिति पाहून पोर्तुगीज आतां शिवाजीस खूष ठेवण्याचा यत्न करूं लागले. याला पुरावा (ले० ११६०) ता. ५ जुलैच्या पत्राचा होय. यांत शिवाजी आग्र्याहून सुटून आल्याबद्दल त्यास अभिनंदनपर पत्र पाठविल्याचा उल्लेख आहे. अशा रीतीनें शिवाजीच्या अभिनंदनपर लिहिलेल्या पत्राची शाई वाळते न वाळते तोंच वर सांगितल्याप्रमाणें फिरंग्यानीं लखम सावंतास आश्रय दिला व शिवाजीनें त्याबद्दल अनेक वेळां तक्रार करूनहि तिकडे लक्ष देण्यांत आलें नाहीं; (ले० ११९२). तेव्हां शिवाजीनें सावंताचा पाठलाग करीत बार देशांत प्रवेश केला. त्यांतील बराच भाग जाळला व लूट करून गोव्याच्या व्हाईसरॉयला व त्याच्या आरमाराला न जुमानतां त्यानें तेराशें कैदी आपल्याबरोबर नेलें. फॅ० रे चा लेखक म्हणतो ' ह्याचा निकाल कसा लागेल तें अजून समजलें नाहीं. परंतु हें भांडण लवकर मिटलें नाहीं तर समुद्रावर व जमिनीवर दोन्ही ठिकाणीं शिवाजीपुढें पोर्तुगीजांचा टिकाव लागणार नाहीं. ' शिवाजीची ही बारदेशावरील स्वारी ता. २० नोव्हेंबर १६६७ (१५८९ मार्ग. शु. १५) रोजीं झाली. वर दिलेल्या वर्णनावरून सावंताचा पाठलाग हेंच एक कारण शिवाजीच्या बारदेशावरील स्वारीला आहे असें वाटेल. परंतु आणखी एका कारणाचा उलगडा ले० ११८६च्या ता. ३० नोव्हेंबरच्या पत्रानें होईल. पोर्तुगीज लोक ख्रिस्ती धर्मप्रसाराच्या कामीं अनेक सक्तीच्या साधनांचा उपयोग करीत. पोर्तुगीज व्हाईसरॉयनें रोमन कॅथॉलिक धर्माचा स्वीकार न करणाऱ्या सर्वांना हद्दपार करावें म्हणून हुकूम काढला. इतकेंच नव्हे तर तेथील चार प्रमुख धर्मोपदेशकांनीं आपल्या

मताविरुद्ध असलेल्या सर्वांचा घात करण्याचें ठरविलें. ही बातमी शिवाजीस कळतांच शिवाजीनें अत्यंत क्रुद्ध होऊन गोंव्यापासून ९ मैल अंतरावर असलेल्या बारदेश बेटांत अवघ्या ६००० लोकांनिशीं शिरून तीन दिवसांत सोळांच्या वर खेडीं बेचिराख केलीं. (ले० १२०५ पहा). इतकेंच नव्हे तर ज्या चार पाद्र्यांनीं अन्य धर्मीयांचा छळ मांडला त्यांना त्यानें 'मराठा धर्म' न स्वीकारल्यास शिरच्छेद केला जाईल अशी धमकी दिली व त्यांनीं तसें करण्याचें नाकारल्यावरून त्यांचा शिरच्छेद केला. ह्या प्रकारामुळें घाबरून जाऊन व्हाईसरॉयनें आपला क्रूर व कडक हुकूम परत घेतला. शिवाजीनें या स्वारींत दीड लक्ष होनांची लूट नेली. हा उग्र अवतार पाहिल्यावर अर्थातच शिवाजीशीं तहाचें बोलणें लावण्यासाठीं गोंव्याच्या व्हाईसरॉयची धांवपळ सुरू झाली. ह्या तहासाठीं पोर्तुगीज व्हाईसरॉयनें कळविलें कीं, रामोजी शेणवी यांस आपणांकडे पाठविला आहे. त्याजपाशीं आपलें म्हणणें कळवावें (ले० ११७७). ह्यावर शिवाजीनें उलट कळविलें कीं, 'रामोजी मार्फत पाठविलेलें पत्र पोहोंचलें व त्यावरून आपली सलोख्याची इच्छा असल्याचें समजून आलें. तरी आपला वकील पाठवावा' (ले० ११७८). असें म्हणून शिवाजीनें रामोजीस परत पाठविलें व त्याबरोबर आपला वकील सकोपंत यासहि वाटाघाट करण्यास पाठवून दिलें. त्यावर पोर्तुगीज व्हाईसरॉयनें कळविलें कीं, आपला वकील सकोपंत याजमार्फत तहाचीं कलमें ठरविलीं. त्यावर मीं सही केली आहे. ह्या सकोपंताबरोबर रेव्ह. पाद्री गोसाल्व मार्तिस यास आपणांकडे पाठविला आहे. रा० सकोपंतांनीं आपली कामगिरी मोठ्या शहाणपणानें बजावली. तहावर आपली सही घेऊन येण्यासाठीं आपणाकडे पाद्री गोसाल्व ह्या वकील पाठविला आहे इत्यादि (ले० ११८३). शेवटीं शिवाजीनें तह मान्य केला व त्यावर सही करून गोसाल्वला परत पाठविलें. पोर्तुगीज व्हाईसरॉय शिवाजीस लिहितो 'पाद्री गोसाल्वमार्फत आपण पाठविलेलें पत्र व तहाचीं कलमें मान्य करून पाठविलीं तीं पोहोंचलीं. पाद्री गोसाल्व यास चांगल्या रीतीनें वागविल्याबद्दल व गोंव्यांतून नेलेले कैदी बंधमुक्त केल्याबद्दल मला फार आनंद झाला' (ले० ११७५). ह्या लेखाची तारीख ९ नोव्हेंबर दिली आहे ती कच्च्या मसुद्याची असावी; तह ५ डिसेंबरला पुरा झाला.

**(इ) पोर्तुगीजांशीं तह**—ह्या तहांत पुढील अटी ठरल्याः—

[ १ ] शिवाजीनें ता. २० नोव्हेंबर रोजीं कैद केलेले सर्व बंदिवान कांहीं खंडणी न घेतां बंधमुक्त करावे व पोर्तुगीजांच्या आश्रितांचे पकडलेले बैल इ. जनावरें वगैरे सोडून द्यावे.

[ २ ] लखम सावंत, केशव नायक, नारोबा सावंत व मालू शेणवी यांनीं पोर्तुगीजांच्या राज्यांत आश्रय घेतला आहे त्यांनीं तेथून शिवाजीच्या मुलखावर स्वारी करूं नये म्हणून ताकीद देण्यांत येत आहे. त्यांनीं तसें केल्यास त्यांना बाहेर घालविलें जाईल. बाहेर जाऊन त्यांनीं शिवाजीशीं युद्ध केल्यास त्यांना पोर्तुगीज हद्दींत घेतले जाणार नाहीं. ह्या सर्व गोष्टींचा पक्का बंदोबस्त व्हावा म्हणून वरील सर्व व्यक्तींनीं गोवें शहराची हद्द सोडून बाहेर कोठें जाऊं नये असें आम्ही ठरवितों.

[ ३ ] बालेघाटांतून पोर्तुगीजांच्या मुलुखांत येणारा माल शिवाजीनें पकडूं नये व पोर्तुगीज मुलखांतून बालेघाटीं येणारा माल पोर्तुगीजांनीं रीती-प्रमाणें असलेली जकात घेऊन बिनहरकत जाऊं द्यावा व ही पद्धत शिवा-जीचें व आदिलशहाचें युद्ध चालू असलें तरी बिनहरकत चालू राहावी कारण अशा रीतीनें अडथळे न होतां व्यापार चालू राहाणें हें रयतेच्या फायद्याचें आहे.

या तहावर शिवाजीनें ता. ११ डिसेंबर रोजीं सही केली. मोरोपंत पेशव्यानें ह्या कराराची मोडींत लिहिलेली प्रत गोंवें येथील दप्तरांत व तिचा ठसा पुण्याच्या भा. इ. मं.त आहे. ह्या तह होत असतां संभाजीचा थोडाबहुत उपयोग झाला असावा असें डॉ. सेन यांचा तर्क आहे. कारण २१ नोव्हेंबरच्या पत्रांत पोर्तुगीज व्हॉईसराय संभाजीस एक शिष्टाईचें पत्र लिहितो कीं, ' आम्ही गोंव्यास सुखरूप पोहोंचलों. ह्या वेळीं संभाजी अवघा दहा वर्षांचा होता (संभाजीचा जन्म १६५७ ). परंतु इतक्या लहान वयांत पोर्तुगीज व्हाईसरॉयानें त्याला शिष्टाईचें कां होईना; पण पत्र लिहिण्याइतका समजूतदार होता हें लक्षांत ठेविलें पाहिजे. कांहींहि असो, डॉ. सेन यांचा तर्क त्या वेळचा शिष्टाचार समजण्यास उपयोगी पडेल. याच तारखेचें दुसरें पत्र गोव्याच्या सुभेदारानें गिरमाजी पंडित, डिचोलीचा सुभेदार, यास लिहिलें आहे त्यांत शिवाजीचा वकील पितांबर शेणवी वारंवार गोव्यास येईल त्यास बिनहरकत परवाना द्यावा असें लिहिलें आहे. हा पितांबर शेणवी पूर्वी लखम सावंताकडे वकील होता. याचें आडनांव गुळगुळे चिटणीस असें होतें ( शि. च. प्र. पृ.

१८१ पाहा ). तो बहुभाषाकोविद होता. कुडाळचाच रहिवाशी असल्यानें त्यास गोव्याकडील राजकारण चांगलें कळत असावें. तेव्हां अशा चांगल्या मनुष्याचा शिवाजीनें उपयोग करून घेतला असल्यास नवल नाहीं ह्याचा उल्लेख सभासदहि करतो ( पृ. ६८ पहा ).

**(ई) पोर्तुगीजांचीं दुटप्पी कारस्थानें**-हा तह झाला तरी पोर्तुगीजांचें पूर्वीचें दुटप्पी धोरण बदललें नाहीं. गोव्यांतील देसायांनीं शिवाजीच्या राज्यांत जाऊन दांडगाई करण्याचा ( ले० ११९४ ) क्रम चालूच ठेवला. यामुळें शिवाजीनें इ० स० १६६८ च्या मार्च मध्यें ( ले० १२०५ ) बारदेशावर हल्ला केला. आणि नंतर पावसाळ्याअखेर अचानक छापा घालण्याचा प्रयत्न केला. पण तो फसल्यावर राजगडास निघून गेला. त्याचे येण्याची इतकी दहशत बसली आहे कीं तो परत गेल्याची बातमी खरी मानावयास कोणीच तयार नाहीं ( ले० १२३१ ). इ. स. १६६७ नंतर चालू असलेल्या या शिवाजी व पोर्तुगीज यांच्या भांडणाबाबत डॉ० सेन म्हणतात कीं, आपणांजवळ असलेल्या तुटपुंज्या उपलब्ध साधनांवरून इ. स. १६६७ नंतर प्रथम आगळिक कोणी केली व नंतर त्यास प्रतिशह कोणी दिला हें नीटसें कळत नाहीं. परंतु वर कालानुक्रमानें दिलेल्या उपलब्ध साधनांचे उतारे वाचल्यास ते आपणास आगळिक करणारा कोण व उत्तर देणारा कोण ते सहजच सांगतात. त्यावरून संशयास जागा रहात नाहीं.

आदिलशहा व मोगल यांच्याशीं झालेल्या तहामुळें शिवाजी जमिनीवरून पोर्तुगीजास शह देण्यास नाखूष असला तरी जलमार्गानें शह देण्याची मात्र त्यानें चांगलीच तयारी चालविली. जलमार्गाच्या बाजूनेंहि पोर्तुगीज शिवाजीस अडथळा करीत होते. सर्व समुद्रावर आपला खाजगी हक्क आहे असें पोर्तुगीज मानीत असत व आशियांतील सर्व सत्ताधीशांनीं आपल्या जहाजांची वहातूक पोर्तुगीजांस त्यांच्या समुद्रावरील स्वामित्वाबद्दल कांहीं जकात देऊन करावी असें त्यांचें म्हणणें असे. मोगल प्रबळ असल्यामुळें त्यांच्याकडून ते जकात कमी दरानें वसूल करीत असत. परंतु इतरांशीं त्यांनीं आपला हक्क बजावण्यासाठीं भांडण करण्यास कमी केलें नाहीं. शिवाजीस पोर्तुगीजांचा हा समुद्रावरील स्वामित्वाचा हक्क अर्थातच मान्य नव्हता. त्याचा प्रतिकार करण्यासाठीं त्यानें कारस्थान चालविलें. शिवाजीचें आर-

मार अद्याप बाल्यावस्थेंत होतें. कोणत्याहि सत्तेच्या बाल्यावस्थेंत प्रत्यक्ष धुमरीतुमरीपेक्षां धाकदपटशा व शहप्रतिशहानें होईल तें कार्य करून घेणें अवश्य असतें. म्हणून शिवाजीनें पोर्तुगीजांचा हाडवैरी मस्कतचा इमाम याच्याशीं संधान बांधलें; व पोर्तुगीजांस कळविलें कीं, मस्कतचा इमाम आमच्याशीं पोर्तुगीजांविरुद्ध चढाईचा तह करण्यास तयार आहे. प्रो० सेन यांस हा तह झाला असावा कीं नाहीं याबद्दल शंका आहे, परंतु ले० १२३० ता. २६ नोव्हेंबर १६६८ वरून असा तह झाला असावा असें मानण्यास बराच बळकट आधार सांपडतो 'मस्कतहून ताजी बातमी अशी आली आहे कीं............एक आरबी आरमार हिंदुस्थानाकडे निघून गेलें. कांहींच्या मतें तें मुंबईवर जावयाचें आहे व इतरांच्या मतें तें शिवाजीला मदत करण्यास जात असावें. शिवाजीनें पोर्तुगीजांपासून चौल घेतल्याची परंपरेनें कळलेली खरी खोटी बातमी याच पत्रांत आहे. परंतु शिवाजीचें व आरबांचें आरमार एकत्र होऊन त्यांचें पोर्तुगीज आरमाराशीं युद्ध झाल्याचें कोठेंहि लिहिलेलें नाहीं त्यावरून हें युद्ध अखेर झालें नसावें. पोर्तुगीजांचा नवा व्हाइसराय पोर्तुगालच्या राजास प्रौढीनें लिहितो कीं 'आमच्या कारकीर्दीस प्रारंभ होतांच यंदा बार्देश व साष्टी हे प्रांत घेण्याची शिवाजीची इच्छा होती. पण आमचा बंदोबस्त असल्यामुळें त्याला आपला हेतु तडीस नेतां आला नाहीं ( ले० १२३३,२८ डिसेंबर १६६८ ).

याखेरीज पोर्तुगीजांना आणखी शह देण्याकरितां शिवाजीनें मोंगलांशींहि संधान बांधलें असलें पाहिजे असें ले० १२३७ (ता. २४ जानेवारी १६६८ ) वरून दिसतें. " अरब व शिवाजी यांच्याशीं पोर्तुगीजांचें आधींच वैर चालू असल्यामुळें, त्यांतच मोगलांनींहि विरोध करण्याचें निश्चून मनावर घेतल्यास पोर्तुगीजांची धडगत नाहीं " तसेंच ता. १४ च्या पत्रांत लिहिलें आहे कीं, " बादशहाकडून अहाडी सर्व पोर्तुगीजांना सुरतेहून हाकून लावण्याबद्दल हुकूम घेऊन आला. बादर ( बहादर ) खान दमणला वेढा घालण्याकरितां, दुसरा एक उमराव दीवकडे आणि आणखी २२ सरदार इतर पोर्तुगीजांवर असे पाठविण्यांत आले व औरंगाबादेहून त्यांना सुलतान मुअज्जमनें मदत करावयाची आहे. " हाहि बेत पुढें सिद्धीस गेल्याचें दिसत नाहीं. तरी शिवाजीनें पोर्तुगीजांचा पिच्छा सोडला नाहीं. ले.१२४६ (ता. २० मार्च १६६९ ) वरून शिवाजीच्या या वर्षांतील इकडील

हालचालींचा सुगावा लागतो. " ता. १८ ला नजीकच्या एसाजी राजानें मला खाजगी निरोप पाठविला कीं, ' आपल्या अमलाखालील दर्यांतील पोर्तुगीजांच्या कांहीं गलबतावर शिवाजी हल्ला करून तीं घेऊन नंतर साष्टीवरहि जाणार आहे. ' शिवाजीचें साष्टींतील सान्निध्य आपल्याला इष्ट नसल्यामुळें त्याला शक्य ती मदत देण्याचें मीं कबूल केलें आहे. " असे मुंबईचा गव्हर्नर आपल्या सुरतच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांस लिहितो. पुढें ता. ६ नोव्हेंबर १६६९ च्या पत्रांत ' शिवाजीनें पोर्तुगीजांचीं कांहीं गलबतें धरलीं व त्यांनींहि त्याचें इराणाहून आलेलें एक गलबत पकडलें (ले. १२७१). हा मजकूर शिवाजीच्या व पोर्तुगीजांच्या झटापटीची साक्ष देतो. पुढील ले० १२७२ वरून असें दिसतें कीं, शिवाजीनें पोर्तुगीजांना शह देण्यासाठीं इंग्रजांचीहि मदत मागितली. इ. स. १६०९ सालीं जहांगिरानेंहि याच कारणाकरितां इंग्रजांशीं संधान बांधलें होतें तेव्हां यांत नवीन असें कांहींच नाहीं.

**(उ) पोर्तुगीजांशीं दुसरा तह**—(१६७०) इतकें झालें तरी पोर्तुगीजांचा शिवाजीकडून मोड झाला असें म्हणतां यावयाचें नाहीं. मुख्य कारण म्हणजे अर्थातच शिवाजीचे आरमाराचें दौर्बल्य होय. परंतु या सततोद्योगामुळें पोर्तुगीजांना शिवाजीच्या मागण्या मान्य करून त्याच्याशीं सलोख्याचा तह करावा लागला (ता. १० फेब्रुवारी १६७०). त्यांतील अटी पुढील प्रमाणें—

१ शिवाजीनें पोर्तुगीजांच्या आश्रयाखालील मालोपा चेटी व संतोबा गौंसो या दोघांकडून अनुक्रमें २००० व १००० होनांची नेलेली लूट परत करावी.

२ एकमेकांच्या राज्यांतील बैल व इतर जनावरें यांच्या वहातुकीस इ. स. १६६७ सालीं झालेल्या तहाप्रमाणें एकमेकांनीं बंधनें घालूं नयेत.

३ शिवाजीनें चौल येथें पोर्तुगीजांचीं धरून ठेवलेलीं जहाजें सोडून द्यावींत.

४ शिवाजीनें पोर्तुगीज मुलखाच्या सरहद्दीवर नदीची मर्यादा असल्याखेरीज इतर ठिकाणीं आपल्या मुलखांत किल्ला बांधू नये.

५ पोर्तुगीजांनीं गोवें व दमण येथें धरून ठेवलेलीं शिवाजीचीं जहाजें बिनहरकत सोडून द्यावीं.

६ शिवाजीच्या धान्य, मीठ वगैरे पदार्थ घेऊन जाणाऱ्या लहानसहान होड्यांच्या वहातुकीला पोर्तुगीजांनीं बंधन घालूं नये. परंतु मोठ्या जहाजांची वहातूक मात्र मोगल अधिकारी जशी रीतीप्रमाणें जकात देऊन करीत असतात त्याप्रमाणें शिवाजीच्या अधिकाऱ्यांसहि परवानगी असावी.[१]

७ सिद्दी हा पोर्तुगीजांच्या आश्रयाखालील असल्यामुळें त्यास लढाईच्या वेळीं मदत देणें त्यांना भाग पडतें. परंतु तसें केल्यास शिवाजीशीं झालेल्या तहाविरुद्ध आचरण होईल. म्हणून पोर्तुगीज, शिवाजी व सिद्दी यांच्या भांडणांत योग्य ती मध्यस्थी करण्यास तयार आहेत व त्यासाठीं शिवाजीनें आपला प्रतिनिधि विठ्ठल पंडित यास सर्वाधिकार देऊन पाठविलें आहे.

**(ऊ) पुढील संबंधांचा त्रोटक उल्लेख**—या तहानें शिवाजी व पोर्तुगीज यांच्यामध्यें सलोखा झाला. परंतु शिवाजीच्या मनांतून आपणास पोर्तुगीजांचा मोड करतां आला नाहीं ही गोष्ट डांचत होती. इ० स० १६७२च्या जून महिन्यांत शिवाजीनें रामनगरच्या कोळी राजाचा पराभव केला. याच राजाच्या मुलखांत पोर्तुगीजांची दमण वसईसारखीं पोर्तुगीजांनीं वसाहत केलेलीं बंदरें होतीं व त्याबद्दल पोर्तुगीज त्यास चौथाई देत असत. ही चौथाई म्हणजे शब्दशः वसुलाच्या चौथा हिस्सा नसे. अदमासें शेंकडा १० ते २५ टक्केप्रमाणें कमीजास्त घेण्यांत येई. या चौथाई हक्काच्या उपभोगामुळें रामनगरचा राजा “ चौतियाचा राजा ” या नांवानें प्रसिद्ध होता. व सभासदहि त्यास चौतियाचा राजा असे संबोधितो. या राजास शिवाजीनें जिंकल्यानंतर त्याचे सर्व हक्क शिवाजीकडे आले व त्याप्रमाणें शिवाजी पोर्तुगीजांकडे चौथाई मागूं लागला. व ती त्यांनीं देण्याचें नाकारल्यामुळें त्याच्या शिपायांनीं पोर्तुगीजांच्या साष्टीबेटावर हल्ला केला. परंतु तो यशस्वी झाला नाहीं. ही गोष्ट इ० स० १६७२ च्या पावसाळ्यानंतर घडली असावी (ग्रँट डफ पृ. ११३ पहा). प्रो. सेन डफच्या पृ० ११९ चा आधार घेऊन लिहितात कीं, शिवाजीनें इ० स० १६७४ त प्रथम पोर्तुगीजांकडे खंडणी मागितली ( शि. च. प्र. इं. पृ. १३ पहा ) तें बहुधा नजरचुकीमुळें असावें. यानंतर पुढें इ० स० १६७६ त शिवाजीनें दमणवर

---

१ या बाबतींत मोगलांशीं करार इ. स. १६७० त झालेला होता. [ भा. इ. सं. मं. त्रै. मा. व. ६ पृ. ५६ ].

करून प्रो० ताकखव म्हणतात त्याप्रमाणें पोर्तुगीजांना चौथाई देणें भाग पाडलें असावें परंतु त्याचें वर्णन प्रस्तुत लेखकाच्या नियोजित कक्षेंत येत नसल्यामुळें हें शिवाजीपोर्तुगीज संबंधाचें कलम येथेंच पुरें करतों.

**१२ शिवाजीस कोकणपट्टीचें महत्व**—कोकणपट्टीवर शिवाजीला मुख्य शत्रु जंजिऱ्याचा सिद्दी ह्याच होता. हा नांवाला विजापूरकरांची तावेदारी पत्करून कोकणपट्टीचा किनारा संभाळून असे. शिवाजीला आपली सत्ता वाढवितांना कोकणपट्टीचा विशेष उपयोग होत असे. शिवाजीचे रायगडसारखे किल्ले कोकणपट्टींतच होते. शिवकालीन लेखक सभासद सिद्दयाला 'घरांत जैसा उंदीर तैसा शत्रू' म्हणतो. यावरून कोकणपट्टीचा प्रदेश शिवाजीचें घरच होय अशी तत्कालीन समजूत उघड दिसते. शिवाजीनें कोकणपट्टीला घराप्रमाणें कां मानावें हा एक मराठ्यांच्या इतिहासांतील विचारानें सोडविण्यासारखा मनोरंजक प्रश्न आहे. वास्तविक पाहातां भोसले हे मूळ कोकणपट्टीचे रहिवासी नव्हत. भोसले व त्यांचें संबंधीं हिंगणी, बेरडी, देऊळगांव वगैरे भीमानदीच्या कांठावरील गांवाच्या पाटिलक्या करून असत, असें कै० राजवाडे आपल्या रा. मा. वि. चंपूमध्यें लिहितात. पूर्वपश्चिम घाटाच्या मध्यभागांतून वाहणाऱ्या नद्यांच्या उतरणीवरील सुपीक प्रदेशांत भोसले वाढले व कर्तृत्वास क्षेत्र मिळाल्यामुळें ते पश्चिमेस अहमदनगरच्या निजामशाहीकडे वळले. अशा पुरुषांत मालोजी व शहाजी यांची गणना होते. असें असतां शिवाजीला कोकण घरांप्रमाणें कां वाटावें ? पुण्यास राज्यस्थापनेस प्रारंभ केल्यावर त्यानें आपल्या मूळ गांवाकडे राज्यविस्तार करण्याची हाव धरण्याऐवजीं त्याचें लक्ष कोकणपट्टीचा बंदोबस्त ठेवण्याकडे होतें याचें कारण काय ? हिंदुस्थानांतील आजपर्यंतच्या राज्यसंस्थापकांचा क्रम याच्याविरुद्ध होता. काबूलशीं दळणवळण तुटूं नये म्हणून बाबर दिग्विजयार्थ निघाला असतांना मध्येंच थबकला व दौलतखान लोदीचा कांटा काढून पुढें गेला. बक्सारच्या लढाईंत विजयी झालेले इंग्रज शहाअलम बादशहास दिल्लीस नेण्यास कचरूं लागले. कारण, आपल्या मुक्कामाच्या मुलखांतून लांबवरचा पल्ला मारण्याचें त्यांच्या जीवावर आलें. हा मोगल व इंग्रज ह्यांनीं अनुसरलेला कांहींसा स्वाभाविक क्रम टाकून निराळा क्रम अनुसरण्याचें शिवाजीनें कां ठरवावें ? शिवाजीच्या राज्यस्थापनेस घाटावर बारा मावळांत प्रारंभ झाला हें खरें, परंतु प्रारंभींच त्यानें कोकणपट्टींतील महत्त्वाचीं ठाणीं

घेऊन तेथें इतकी भक्कम वसाहत केली कीं, त्यापुढील काळांतील त्याच्या देशावरील हालचाली म्हणजे निव्वळ लूट करून सधन होण्यापुरत्या त्याच्या होत्या असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. शिवाजी तळकोकणांतून घाटावर वारंवार येई. घाटावरील किल्ल्याच्या भोंवतीं त्याच्या हालचाली भरपूर असत. परंतु घाटावरून देशावर उतरावयाचें तें बहुधा स्वारी करून परत जावयाचें हा शिवाजीचा क्रम राज्याभिषेककालापर्यंत चालू होता. शिवाजीचें राज्य त्याच्या हयातींत उत्तरदक्षिण वाढलें तसें पूर्वपश्चिम वाढलें नाहीं. इ. स. १६६५ तील पुरंदरच्या तहांत शिवाजीनें पुरंदर-सिंहगडसारखे देशावर डोकावणारे मोठमोठे किल्ले बेशक मोगलांच्या हवालीं केले व मोगलांच्या दृष्टीनें क्षुल्लक असे लिंगणगड, घोसाळे, बिरवाडी या किल्ल्यांवरील आपला हात कायम ठेविला व विजापूरकरांच्या बालेघाटीच्या मुलखाची मागणी केली. याच्याहि पूर्वी इ. स. १६५६ मध्यें औरंगजेब घाईघाईनें भावाभावांच्या भांडणांत भाग घेण्यास उत्तरेस जात असतां त्यास थांबवून त्याजकडून तळकोकणांतील कल्याण ते चौलपर्यंतच्या भागाची मांडलिकी मागून घेतली. इतकी कोकणपट्टीवर त्याची आसक्ति कां ? ह्या प्रश्नाचें उत्तर तत्कालीन विशिष्ट राजकीय परिस्थितींत आहे. मोगली फौजा मैदानी लढाया मारण्यांत बहुधा कोणास हार जात नसत. दिल्लीआग्र्यास राहून वायव्येस पंजाबमैदान व पूर्वेस बंगालपर्यंतचे सपाटीवरील प्रांत त्या विस्तीर्ण प्रदेशावर मोगलांनीं लीलेनें अंमल ठेविला; परंतु रजपुताना ताब्यांत आणण्यास त्यांना दंडयोगाइतकीच सामदामभेद या त्रयीवर भिस्त ठेवावी लागली. रतनभोर, अशीरगडसारखे दुर्भेद्य किल्ले अकबरास दगेबाजीच्या जोरा-वर अंमलांत आणावे लागले व लांब पल्ल्याच्या तोफा मिळविण्यासाठीं पोर्तु-गीजांची काकुलती करावी लागली. यावरून मोगलांची किल्ले मारण्यांतील दुर्बलता स्पष्ट व्यक्त होते. जी गोष्ट किल्ल्यांची तीच गोष्ट आरमारा-संबंधीं. मोगलांचें व त्याचप्रमाणें विजापूरकरासारख्या इतर मुसलमानी सत्ता-धीशांचें आरमार अगदीं कुचकामाचें असे, ही गोष्ट जहांगीरनें पोर्तुगीजांवर शह ठेवण्यास इंग्रजांशीं सख्य राखलें यावरून सिद्ध होते. मोगलांच्या ऐन वैभवांत देखील त्यांना व्यापारी दर्जानें राहणाऱ्या नाविक सत्तेच्या साहाय्याचें महत्त्व वाटावें, ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. यावरून मोगल किल्ले लढविण्यांत व किनारा रक्षण करण्यांत दुर्बल होते हें स्पष्ट होतें. नूतन

राज्यस्थापकास शत्रूच्या माऱ्याच्या जागा व मर्मस्थानें बरोबर ओळखून त्या-प्रमाणें भुसभुशीत बाजूनें प्रथम उरकण्यास प्रारंभ करावा लागतो. समुद्र-किनारा व घाटमाथ्यावरील किल्ले यांनीं मर्यादित झालेली कोकणपट्टी ही उभय मुसलमानी सत्तांकडून सारखीच उपेक्षिली गेलेली जागा होय. ही गोष्ट शिवाजीचा बाप शहाजी यानेंहि ओळखलेली होती. कारण इ. स. १६३०–३६ च्या काळांत निजामशाहीस जगविण्यासाठीं शिकस्तीचा यत्न करीत असतां त्यानें मूर्तजास देशावरून उचलून कोकणपट्टीवर ठाणें जिल्ह्यांतील माहुलीच्या किल्ल्यांत नेऊन ठेविलें व आपण जुन्नरच्या आसपास राहिला. शिवाजीसारख्या थोर पुरुषास बापाच्या आयुष्यांतील कर्तबगारीच्या कृत्यांचें मर्म कळत नसेल असें शक्य नाहीं. तेव्हां त्यानेंहि अशाच जागीं राज्यस्थापनेची सुरवात केली कीं, जेथें मोगलांच्या राज्याच्या दूरच्या टोंका-वरील डोंगराळ प्रदेश म्हणून त्यांचें दुर्लक्ष होतें व विजापूरकरहि त्यांना उत्तरेस मावळपर्यंत येऊन मोगलांशीं खटके उडून घेणें नको होतें म्हणून दुर्लक्ष करीत होते. खुद्द आदिलशाही मुलखांतील बालेघाटावरही आदिल-शहाचा अंमल बेताबाताचाच होता. ह्या सर्व कारणांमुळें शिवाजीनें कोकण-पट्टी हें आपलें घर केलें. तेथून देशावर येऊन लूट नेली. विजापूरकर व मोगल यांची झुंज लावून देऊन आपण सुरक्षित राहिला. व संकटप्रसंगीं देशावरील असेल तो मुलूख व घाटावरील देशाच्या बाजूचे किल्ले सोडून देऊन आपण शत्रूस महत्त्वाची वाटत नसलेली कोकणपट्टी ताब्यांत ठेवून स्वस्थ राहिला. आर्थर वेलस्लीनें पेनिन् सुलर वॉरमध्यें नेपोलियनशीं लढतांना विशिष्ट प्रकारचें धोरण ठेविलें होतें. टॉरेस् व्हेड्रासची भिंत उभारून त्याच्या मागें तो सुरक्षित राही व नेपोलियनची पाठ फिरल्याबरोबर स्पेनमधील मुलूख मारून परत येई. शिवाजीच्या संरक्षणास सृष्टिनिर्मित घाटमाथा अस-ल्यानें कृत्रिम भिंतीची जरूर नव्हती इतकेंच.

येथें असा प्रश्न उत्पन्न होतो कीं, शिवाजीनें मोगलांशीं लढतांना केवळ घाटमाथ्यावरील किल्ल्यांचा आश्रय करून स्वस्थ कां राहिला नाहीं. त्याला कोकणपट्टीच्या मुलखाची जरूर काय ! त्यानें मनांत आणिलें असतें तर त्यास किल्ले भांडवून उभय मुसलमानी सत्तांस सतावून सोडतां आलें असतें. व प्रसंगीं अफझलाप्रमाणें मुसलमानी सरदारास दऱ्याखोऱ्यांत गांठून गारद करतां आलें असतें. पण कोकणपट्टीच्या रक्षणाची यातायात काय म्हणून !

या प्रश्नास उत्तर असें कीं, राज्याच्या संरक्षणास मान्याच्या जागाप्रमाणें वसुलाच्या उत्पन्नाची जरूर असते. घाटावरील मुलूख हे डोंगराळ व अल्प उत्पन्नाचे मुलूख होत. निव्वळ घाटमाथ्यावर राज्यस्थापना करून मोठें सैन्य बाळगून बळ वाढविणें हें फारसें शक्य नाहीं. सदा सर्वकाळ परराज्यांत लुटालूट करून जगावयाचें व घाटमाथ्यावर राज्य करावयाचें मनांत आणलें तर मात्र तें कांहीं काळ शक्य आहे. सारांश, निव्वळ घाटमाथ्यावर विसंबून राज्य करणाऱ्या सत्ताधीशास पैशाच्या कमाईसाठीं मैदानी मुलखांतील लुटालुटीवर विसंबून रहावें लागतें, व लुटालूट हा त्या सत्तेचा स्वाभाविक जीवनक्रम बनतो. ही स्थिति टाळण्यासाठीं प्रत्येक डोंगरी सत्तेस भरपूर वसूल देणाऱ्या सुपीक सपाटीच्या प्रदेशावरील मालकीची आवश्यकता असते. शिवाजीस कोकणपट्टीचें जर विशेष महत्त्व असेल तर त्याचें कारण हेंच होय. एकंदरीनें पहातां शिवाजीनें कोकणपट्टीवर अम्मल बसविण्यांत ( १ ) शत्रूंनीं उपेक्षिलेल्या मुलखांत राज्यस्थापनेस सुरुवात केली, ( २ ) शत्रूंचें दौर्बल्य कशांत आहे हें ओळखलें व ( ३ ) राज्याच्या वाढीस आवश्यक अशा वसुली उत्पन्नाची तरतूद करून ठेविली असें साररूपानें सांगण्यास हरकत नाहीं.

---

# प्रकरण १३ वें

## चढाईचें युद्ध.

**१ दिलकाश व बखरी**—आग्र्याहून सुटून शिवाजीमहाराज देशीं आल्यापासून (म्हणजे शके १५८८ च्या मार्गशीर्षापासून) राज्याभिषेकापर्यंत जो साडेसात वर्षांचा काळ लोटला त्याचे ठोकळ मानानें दोन विभाग पडतात. पहिला तीन वर्षांचा, ज्यांत मोगलाशीं युद्ध चालू नव्हतें तो; आणि दुसरा मोगलाशीं युद्ध चालू असल्याचा. पैकीं मागील प्रकरणांत पहिल्या विभागाची माहिती दिली गेली. आतां दुसऱ्या युद्धप्रधान विभागाचें वर्णन द्यावयाचें. तें देण्यापूर्वीं साधनांची तपासणी करणें आवश्यक आहे. या सात आठ वर्षांच्या काळांत विजापूरकर व मोगल यांच्याशीं उघड सामना करण्याचे अनेक प्रसंग आल्यामुळें त्यांची माहिती फारशी तवारिखांतून भरपूर सांपडत असेल असें सहज वाटण्याचा संभव आहे. पण उपलब्ध साधनावरून तरी तसें म्हणतां येत नाहीं. या वेळची मोगलांच्या बाजूची हकीकत देणारा म्हणून जो ग्रंथ प्रो० सरकार यांनीं उपयोगांत आणला आहे त्याचें नांव 'दिलकाश'. या ग्रंथाचें इंग्रजी भाषांतर स्कॉटनें इ. १७९४ मध्यें प्रसिद्ध केलें व कै. पां. न. पटवर्धन यानीं त्यांतील निवडक भाग, मराठींत भाषांतररूपानें 'बुंदेल्यांची बखर' या मथळ्याखालीं ' इंदुप्रकाश ' नांवाच्या दैनिकांत क्रमशः छापला आणि पुस्तकरूपानें १९२० सालीं प्रसिद्ध केला. या 'दिलकाश' ग्रंथाचा अभ्यास बारकाईनें केल्यास महाराष्ट्रांतील कित्येक बखरींची उपपत्ति लागण्यास चांगला उपयोग होणार आहे, पण तो एक स्वतंत्र विषय आहे; व तसें करण्याचें हें स्थळ नव्हे. मात्र शिवाजीचरित्राच्या दृष्टीनें त्याच्यावर विश्वसण्यापूर्वीं कोणती सावधगिरी ठेविली पाहिजे याविषयींचें दिग्दर्शन केलें पाहिजे. प्रो. सरकार यांनीं फारशी साधनांच्या आधारें शिवाजीचरित्र लिहिण्याचें धोरण प्रामुख्यानें पत्करल्यामुळें दिलकाशमधील हकीकतीवर या आठ वर्षांपुरता त्यांनीं भर दिला हें स्वाभाविक आहे. प्रो.नीं टीपेंत दिलेल्या आधारांची तपासणी केली असतां त्यांनीं या काळची हकीकत याच बखरीच्या आधारें लिहिली व ती त्यांना अत्यंत उपयुक्त वाटली ( of invaluable help 3rd edi. Shivaji p. 167 note)

हें स्पष्टच आहे. पण या बखरींत फार मोठा कालविपर्यासाचा दोष भरलेला आहे व 'अखबारांत' व 'जेधे शकावली' यांच्याच आधारामुळें या बखरीतील मजकुरांचें पौर्वापर्य ठरवितां येतें इत्यादि गोष्टींचा स्पष्ट उल्लेख सरकार यांच्या लिहिण्यांत येणें आवश्यक असून तसा तो आलेला नाहीं. फारशी साधनांतील गुण तेवढे ठळकपणें मांडावयाचे व त्यांतल्या दोषांविषयीं अवाक्षर काढावयाचें नाहीं असा प्रकार त्यांच्या हातून घडला आहे. ज्या बुंदेल्यांच्या बखरीवर ते एवढी भिस्त ठेवतात ती मुळांतून फारशी प्रतींवरून वाचणें हा उत्तम पक्ष; पण तें शक्य होईपर्यंत स्कॉटच्या भाषांतरावरून या ग्रंथांतील आशय ठोकळ मानानें समजून घेतां येण्याजोगा आहे. या बखरींत औरंगजेबाच्या मृत्यूपर्यंतची हकीकत दिलेली आहे त्या अर्थी ती पेशवाईंत लिहिलेली हें निर्विवाद आहे. मात्र औरंगजेबाच्या दक्षिणेंकडील मोहिमेंत दलपतराय बुंदेला नांवाचा सरदार हजर असे व त्याच्या तैनातीला असलेल्या एका अधिकाऱ्यानें ठेवलेल्या टिपणावरून ही बखर लिहिली गेली; अर्थात् राजारामकालीन लेखकानें मिळविलेल्या टिपणावरून अव्वल पेशवाईंत एका रजपूत अथवा बुंदेल्या*लेखकानें ही बखर तयार केली.तेव्हां या टिपणांना सभासदापेक्षां अधिक प्रामाण्य येणें शक्य नाहीं. मात्र सभासदापेक्षां मोंगलांच्या सरदारांचीं नांवें व त्यांचे संबंध या बखरकाराला अधिक व्यवस्थित रीतीनें माहीत आहेत. पण शिवाजीचरित्राचे प्रसंग सांगतांना त्यानें फारच मोठ्या चुका केल्या आहेत. उदाहरणार्थ, "शिवाजी आग्र्याहून परत येतांच राजा किताब धारण करून मोगली मुलखावर चालून गेला; त्यानें सुरत लुटून जयसिंगाच्या वेळीं दिलेले सर्व किल्ले परत घेतले. नंतर विजापूरकरांशीं मारामारी करण्याची इच्छा असल्यामुळें शिवाजीनें शहाजाद्यामार्फत मोगलाशीं तह केला. नंतर मुधोळच्या घोरपड्यांना मारून पुढें शहाजीची (बापाची) थाटानें भेट घेऊन

* It is a free translation of a Journal kept by a Bondela officer, who attended Dulput Roy, the chief of his tribe, in all Auraojzeb's campaigns which was presented to me (= Jonathan Scott) by the Raja of Dutteah a great grandson of Dulput Roy, when I acted as Persian interpreter to a detachment under Colonel Popham, in the Ghoed country. Preface to History of Deccan Vol. II. p. 2.

पितृभक्तीचें प्रदर्शन केलें. इकडे शहाजादा व दिलीर यांत वैमनस्य आल्याची संधि साधून शिवाजीनें दुसऱ्यांदा सुरत लुटली. पुढें महाबतखानाची नेमणूक दक्षिणेंत झाली. त्यानें चैनींत दिवस घालविले; नंतर बहादुरखानाची नेमणूक झाली तेव्हां त्यानें हैद्राबादकरावर चाल केली. तेव्हां शिवाजी जिंजीकडे स्वारीवर गेला होता." इत्यादि हकीकत यांत आहे. म्हणजे आग्र्याहून येतांच 'चार महिन्यांत २७ किल्ले घेणें. पुढें सुरतेच्या लुटीनंतर शहाजी मरण पावणें; त्यापुढें मोंगलाशीं तह होणें' हा जो सभासदी बखरींतला सदोष अनुक्रम तो यांत कायम असून त्यांत शहाजी-शिवाजी भेटीचा काल्पनिक प्रसंग घुसडून दिलेला आहे. हा प्रसंग व 'औरंगजेबानें पाठविलेलें फर्मान कुंत्र्याच्या शेपटास बांधून त्याची शोभा केल्याचा' प्रसंग हे या बुंदेल्याच्या बखरींत व आमच्या इकडील छोटी बखर, एक्याणव कलमी बखर वगैरेंतून जशास तसे दिलेले आहेत. त्यावरून ही राजपुतान्यांतील बखर उत्तर पेशवाईंत भाषांतरित होऊन मराठींत आली असें दिसतें. पानिपतच्या सुमारास बखर लिहिणारा चित्रगुप्त या चुकीच्या दंतकथा देत नाहीं व नंतरचे बखरकार त्या देतात; त्यांत मोंगलाकडली माहितीच कांहींशी खुलासेवार आहे व मराठ्यांची माहिती देतांना फार व ढोबळ चुका केल्या आहेत; इत्यादि कारणांवरून 'छोट्या बखरी'च्या जातीची शिवचरित्रविषयक माहिती उत्तर पेशवाईंत रजपुतान्याकडून महाराष्ट्रांत आली असा संभव दिसतो. सारांश बुंदेल्याची बखर, प्रो. सरकार म्हणतात त्या मानानें, विश्वसनीय नाहीं, तिचा परिचय महाराष्ट्रांतील लेखकांना गेल्या सवाशें वर्षांपासून आहे व चिटणिसानीं तिची तपासणी करून ठिकठिकाणीं दुरुस्ती केली हें लक्षांत ठेविलें पाहिजे.

मोगलांसंबंधीच्या हकीकतीच्या आधाराचा विचार केल्यानंतर विजापूरकरांशीं झालेल्या सामन्याची हकीकत देतांना बुसातिने सलातीनबरोबर जयरामाचें 'पर्णालाख्यान' मुख्यतः विचारांत घेतलें पाहिजे. कारण बु. स. मधील हकीकत पडताळून पाहण्यास महमद व अली यांच्या कारकीर्दींतले समकालीन ग्रंथ जसे उपलब्ध होत आहेत तसे शिकंदरच्या कारकीर्दींतले समकालीन ग्रंथ आपल्यापुढें नाहींत; यामुळें या कारकीर्दींतली हकीकत देतांना बु. स. नें ज्या चुका किंवा अनुल्लेख केले आहेत त्यांची दुरुस्ती फारशी साधनाधारें करतां येत नाहीं. सारांश, फारशी साधनांत मोगली व विजापुरी

बाजूची एकतर्फी माहिती असते व त्यांत मराठ्यांचा जय झाला असेल तो भाग गाळलेला अगर विपर्यस्त असतो; या सामान्य नियमाचें स्मरण या कालांतील हकीकतीला विशेष लागू असल्यामुळें, मराठींतल्या शकावल्या, सभासदी बखर, पोवाडा इत्यादि वृत्तांत-साधनांचा सांगाडा आधारास घेऊन या वेळच्या मराठ्यांच्या हालचालीचें वर्णन प्रथम तयार करावें; नंतर फारशी साधनांतील माहितीची भर घालावी; आणि यानंतर अस्सल पत्रावरून मित्या पडताळून पहाव्या; अशा त्रिविध साधनाच्या आधारें या साडे-चार वर्षांतली हकीकत बरीच संगतवार देण्याचें काम आजपर्यंतच्या अनेक लेखकांनीं केलें आहे. काशीचें देवालय औरंगजेबानें भाद्रपदांत पाडल्यानंतर पावसाळा संपतांच मराठ्यांनीं मोगलांचा सल्ला तोडून जी जोराची मोहीम चालू केली तिच्यांत तानाजीनें कोंढाण्यास कसें शौर्य गाजविलें; पुरंदर, जुन्नर वगैरे किल्ले घेतांना मराठ्यांनीं कोणतीं साहसें केलीं, सुरतेची लूट करून परत येतांना दिंडोरीपाशीं केवढी धुमश्चक्री केली; त्याचप्रमाणें सालेरी, रोहिडा, लोहगड, अहिवंत वगैरे किल्ले कसे घेतले आणि मोरोपंत, आनंदराव व प्रतापराव यांनीं सालेरी, जव्हार वगैरे भागांत धुंद उठवून अनेक खानांचा कसा पराभव केला याची जंत्री जेधे शकावलींत आहे व कांहीं वृत्तांत सभासदांत आहे, त्यापैकीं श. १५९१ अखेरीस झालेल्या बिघाडापासून राज्याभिषेकापर्यंतच्या फक्त निवडक प्रसंगांची हकीकत सभासदी बखर, शकावली, बु. सलातिन व पर्णालाख्यान यावरून उदाहरणादाखल उद्धृत करतों.

**२ बिघाडः**—प्रारंभीं श. १५८९मध्यें शहाजाद्याच्या मध्यस्तीनें औरंगजेबाशीं तह ठरला तेव्हां पुणें वगैरे मराठ्यांच्या ताब्यांत आलें किंवा नाहीं याविषयीं शंका आहे ( Shivaji p. 19) note ) व याबद्दल अस्सल पुरावा ( direct evidence ) नाहीं असें कांहीं लेखक म्हणतात. पण मराठींत प्रकाशित झालेल्या पत्रांची माहिती लक्षांत घेतां हा प्रश्न सुटतो. कारण ले. ११६३ हा मोगलांच्या अधिकाऱ्यांनीं लिहिलेलें वसुलाचें सरकारी टिपण असून त्यांत पुणें परगण्यांतील २९० गांवांपैकीं 'तश्रीफ राजश्री शिवाजी राजे' म्हणून पुण्याकडील २० व तर्फ मावळचे ३६ मिळून ५६ गांव वजा दिले आहेत. यामुळें पुण्याकडील कांहीं भाग मराठ्यांच्या ताब्यांत

ठेवण्यांत आला याविषयीं संशय रहात नाहीं. सारांश, ‘ मुसलमानी धर्म रक्षक ’ हें विशेषण औरंगजेब जसा सामोपचारादाखल शिवाजी शब्दाला जोडीत असे आणि त्याबरोबर आतां ‘ राजे ’ हाहि शब्द जोडूं लागला त्याप्रमाणें थोडाबहुत मुलूख सोडणें व पैसा खर्चणें या गोष्टी शिवाजीखातर त्याला कराव्या लागल्या ( ले. ११९२ ). मात्र त्याच वेळीं ‘ देवळें पाडून मशिदी बांधण्याचा सपाटा ’ मोगली राज्यांत सुरु झाल्याचा बोभाटा सर्वत्र ऐकूं येऊं लागल्यामुळें मराठ्यांचा सलोखा किती दिवस टिकेल याविषयीं शंका वाटण्याजोगी होती. तथापि हा बिघाड होण्यापूर्वी शिवाजी महाराजांनीं पुण्याच्या देशपांड्यास ‘ नवे कचाट करून कारबारास खलेल करणें हे गैरमाकुल गोस्टी आहे व नवे कारबार कांहीं चालणार नाहीं’ (ले. ११३२). वगैरे शब्दांत दिलेली धमकी त्यांचा दरारा व्यक्त करण्याजोगी आहे. तथापि ही शाब्दिक धमकी लोकांच्या अंतःकरणांत ठसण्यास मैदानी मुलखाप्रमाणें सिंहगड, पुरंदर वगैरे किल्ले ताब्यांत घेणें मराठ्यांना भाग होतें. व ही संधि औरंगजेबानें लौकरच आणून दिली; आणि मराठे व मोगल यांच्यांत बिघाड आला. त्या बिघाडाची हकीकत सभासद अशी देतो. “शहाजाद्याचा व राजियाचा घरोबा बहूत चालिला. परस्परें वस्ताभावा धाडूं लागले. याकरितां दिल्लीस औरंगजेबास शंका उत्पन्न जाली कीं “ शहाजादे व शिवाजी एक जाहाले. एखादे वक्तीं फितवा होऊन आपणास दगा करतील. ” ( तेव्हां त्यानें ) अशी कल्पना केली कीं, “ आतां या उभयतांत कज्या वाढवावा.” म्हणून शाहाजाद्यास लिहिलें कीं “ शिवाजी हराम आहे. त्याचा सरदार प्रतापराव व नीराजीपंत हे दोघे फौजेनिशीं आहेत. याकरितां त्यास पातेजों ( = विश्वासूं ) नये. एकादे वक्तीं दौलताबादेस भेद करतील. तरि तुम्हीं त्या दोघांस कैद करणें. त्यांचीं अवघीं घोडीं तबेल्यास लावणें. ” हें वर्तमान शाहाजाद्याच्या वकिलानें टाकोटाक इशारतीनें शाहाजाद्यास कळविलें. तेव्हां त्यानें नीराजीपंतास एकांतीं बोलावून सांगितलें कीं “ दो चौ रोजांत पादशहाचे कागद येतील. मग तुम्हांस कैद करावें लागेल. याकरितां अगोदर निघून जाणें. ” त्यावरून नीराजीपंत व प्रतापराव दुसरे दिवशीं रात्रीं फौजेनिशीं निघून गेले. मजल दरमजल राजियाजवळ आले. राजे खुशाल जाहाले आणि बोलिले कीं “ दोन वर्षें लष्करचें पोट भरलें आणि शाहाजादा

मित्र जोडला ही बरी गोष्ट जाहाली. आतां मोगलाई मुलूख मारून खावयास वाव जाहला. " ( सभा. पृ. ६१ )

यानंतर युद्ध सुरू झालें तेव्हां प्रथम सिंहगड सर करण्याचें ठरलें. त्या ठरावाची अंमलबजावणी कशी झाली याची हकीकत सभासद देतो ती अशी.

**३ सिंहगड सर करणें**—सत्तावीस गड मोगलांस दिले होते ते मागती घ्यावे ही तजवीज केली. मोरोपंत पेशवे, निळोपंत मुजुमदार व आणाजीपंत सुरनीस यांस सांगितलें कीं, " तुम्ही राजकारण, यत्न करून किल्ले घ्यावे. " आपण राजियानीं मावळे लोकांस सांगितलें कीं " गड घेणें. " त्याजवरून तानाजी मालुसरा म्हणून मावळियांचा ' हजारी ' होता. त्यानें कबूल केलें कीं, " कोंढाणा गड आपण घेतों. " असें कबूल करून वस्त्रें विडे घेऊन गडाचे यत्नास ५०० माणूस घेऊन गडाखालीं गेला. आणि दोघे मावळे बरे, मर्दाने निवडून, रात्रीं गडाच्या कड्यावरून चढविले. जैसे वानर चालून जातात, त्याचप्रमाणें कड्यावर चालून गेले. आणि कडा चढून, गडावर जाऊन, तेथून माळ लाऊन वरकड लोक, देखील तानाजी मालुसरा, चढून गडावरी तीनशें माणूस गेले. गडावरी उदेभान रजपूत होता. त्यास कळलें कीं, गनिमाचे लोक आले. ही खबर कळून कुल रजपूत कंबरबस्ता होऊन, हातीं तोडा बार घेऊन, हिलाल चंद्रजोती लाऊन बाराशें माणूस, तोफाची व तिरंदाज, बरचीवाले, पटाईत, सुऱ्या आडहत्यारी ढाला चढवून चालोन आले. तेव्हां मावळे लोकांनीं ' श्रीमहादेव ' असें स्मरण करून नीट रजपुतांचे फौजेवर चालून घेतलें. मोठें युद्ध एक प्रहर जालें. पांचशें रजपूत ठार जाले. उदेभान किल्लेदार खासा त्याशीं व तानाजी मालसुरा सुभेदार याशीं गांठ पडली. दोघे मोठे योद्धे, महाशूर. एकएकावर पडले, वार करीत चालले. तानाजीचे डावे हातची ढाल तुटली. दुसरी ढाल समयास आली नाहीं. मग तानाजीनें आपले डावे हातची ढाल करून, त्याजवरी वोढ घेऊन, मोठें युद्ध केलें. दोघे महा रागास पेटले. एकाचे हातें एक फिरंगीच्या वारें तुकडे होऊन पडले. दोघे ठार जाले. मग सूर्याजी मालसुरा, तानाजीचा भाऊ, यानें हिंमत धरून कुल लोक सावरून, उरले रजपूत मारिले. कित्येक रजपूत कडे उडोन पळोन गेले. असे बाराशें माणूस मारिलें. किल्ला काबीज केला. आणि गडावरी पागेचे खण होते त्यास आग लाविली. त्यांचा उजेड राजियानीं राजगडाहून पाहिला; आणि बोलले कीं,

"गड घेतला. फत्ते जाली !" तों जासूद दुसरे दिवशीं वर्तमान घेऊन आला कीं, "तानाजी मालसुरा यानीं मोठें युद्ध केलें. उदेभान किल्लेदार यास मारिलें; आणि तानाजी मालसुराहि पडला. गड फत्ते केला." असें सांगतांच राजे म्हणूं लागले कीं, "एक गड घेतला, परंतु एक गड गेला!" असे तानाजीसाठीं बहुत कष्टी जाहाले. पुढे गडावरी ठाणें घातलें. सूर्याजी मालसुरा, भाऊ, नांवाजून त्याचा सुभा त्यास सांगितला. धारकरी लोकांस बक्षिसें, सोन्याचीं कडीं दिलीं, द्रव्य अपार दिलें. वस्त्रें जरी कुल लोकांस दिलीं. ये जातीनें प्रथम कोंडाणा घेतला. (सभा. पृ. ५५).

**४ दुहेरी कार्यक्रम**—अशा प्रकारें जेव्हां मोगलाशीं बिघाड सुरू झाला तेव्हां शत्रूच्या मुलखांत युद्धाची धुमश्चकी माजविण्यांत व गडामागून गड घेण्यांत मराठ्यांना यश आलें व मोंगली अधिकारी चकित झाले यांत शंका नाहीं. यानंतर प्रत्याघात न्यायानें मोंगल मराठ्यांच्या मुलखावर चालून येऊन धुमाकूळ घालतील हें उघड दिसू लागलें. अशा वेळीं आपला मुल्ख कसा राखावयाचा हा प्रश्न सोडविणें कठिण होतें. दहा वर्षांपूर्वी अफजलप्रसंगानंतर मराठ्यांनीं पुष्कळ मुलूख मिळविला; परंतु एका वर्षांत नव्यानें मिळविलेला पन्हाळ्याकडचा मुलूख विजापूरकरांना द्यावा लागला आणि पुणें चाकण-कडचा शाइस्तेखानानें जबरदस्तीनें घेतला. यामुळें क्षेत्रफळाच्या दृष्टीनें त्या वेळचा व्यवहार आंतबट्ट्याचाच झाला. तसा प्रकार पुनः होण्याचा संभव होता. पण मराठ्यांना यावेळीं आपल्या प्रयत्नाची पराकाष्ठा करून पाहण्याची ईर्षा चढली होती असें दिसतें. डोंगराएवढ्या अडचणी दृष्टीपुढें स्पष्ट दिसत असल्या तरी त्यांनीं दबून न जातां शांत मनानें एकीकडून बचावाची व दुसरीकडून उठावाची अशी दुहेरी योजना बरोबरच पार पाडल्या-वांचून काम निभणार नाहीं हें त्यानीं ओळखलें व या पद्धतीनें सर्व कार्य-क्रम आंखला. याची कल्पना खं. ८ मधील कांहीं पत्रावरून स्पष्टपणें करतां येण्याजोगी आहे. सन इसन्ने (म्हणजे श. १५९३) चा कार्यक्रम आधींच ठरविण्यांत आला तो असा—

'जबिता तह. सन इसन्ने कारणे राजश्री साहेबीं तह केला कीं, जो आपला मुलूक आहे त्यापैकीं माहालेमाहालीहून खजाना करावयास पैके आणावे त्याचा खजानाच करून ठेवावा. जे वक्तीं मोगलांशीं झगडा सुरू होईल आणि मोगल येऊन गडास वेढा घालतील त्याचे मदतीस जरूर.

आणिकी करून ऐवज जुळेना तरीच खजानाचे पैके खर्च करावे. नाहींतरी एरव्हीं राज्यभागास सर्वहि खर्च न करावा, ऐसा साहेबीं तह केला; आणि खजाना करावयाची मोईन केली होन एक लाख पंचवीस हजार होन रास,' ( खं. ८ पृ. १६ ). ( यानंतर कोणत्या ठिकाणीं किती होन खजीन्यांत सांठवावयाचे याचा तपशील दिला आहे ).

वतनी मुलखांत संरक्षणाच्या दृष्टीनें द्रव्यबळ व मनुष्यबळ किती व कोठें पाहिजे याची व्यवस्था करण्यांत आली त्याचप्रमाणें चढाईचा कार्यक्रम कोणी कसा पार पाडावयाचा हेंहि ठरलें. तेव्हां वतनाच्या कारभारापेक्षां चढाईच्या लढ्यांत सामील होण्याची महती स्वराज्यांतील कर्त्या पुरुषांना अधिक वाटत होती व त्याचीच उत्सुकता विशेष दिसू लागली.

अशा वेळीं नवें मिळविणें या गोष्टीस जितकें महत्त्व तितकेंच जुनें राखणें यासहि दिलें पाहिजे हें तत्त्व स्पष्टपणें शिवाजी महाराजांनीं आपल्या मुत्सद्यांच्या दृष्टीपुढें ठेवलें. याची हकीकत खं. ८ ले. १०मध्यें आलेली आहे. तिच्यांत निळोपंत मुजुमदार व शिवाजीराजे यांच्यामधील राजकीय धोरणासंबंधीची चर्चा सारांशरूपानें आढळते. ती संभाषणरूपानें येथें मांडून दाखवितां येण्याजोगी आहे ती अशी:—

**शिवाजी राजे**:—निळोपंत मुजुमदार, तुम्हास वतनीचा कारभार करावयास ठेविलें. माहुलीपासून भीमगडपावेतों व इंदापूर, पुणें, चाकण (येथील) कदीम वतनीचा कारभार ( तुम्ही ) करावा.

**निळोपंत**:—आजी कामाचे ( = युद्धाचे ) दिवस आहेत. वतनीचा कारभार आणिक कोण्हास सांगावा. आपण ( साहेबा ) बराबरी येऊन दाहा लोक कामें करितील तैसी करून देऊं. गड घेणें पडिलें तरी घेऊन देऊं.

**शिवाजी राजे**:—वतनी राहाणें हेंहि काम थोर आहे; त्यासाठीं वतनी राहाणें. येथें तुम्हांस इमारतीस पैके पावतील त्यास दर सदे होन २ प्रमाणें पावतील.

**निळोपंत**:—जरी वतनीचेंहि काम थोर आहे तरी बहुत बरें; **एकानें सिद्ध संरक्षण करावें; एकानें साध्य करावें**;दोन्ही कामें साहेब बराबरीनें मानितातो तरी आपण वतनी राहोन ( = राहूं ). परंतु इमारतीचे पैके पाववून बकरीस घेणार नाहीं. मोरोपंत त्रिंबक व शिवनेर येथें पाठविले आहेत. ते गड घेतील व मुलुख घेतील व कामें करितील. साहेब थोर कामासी

जाताती तें काम श्रीचे कृपेनें होऊन येईल. त्यास मोरोपंतास २५ फुलें दिली तर आम्हांस वीस द्यावी, ऐसा साहेबी निश्चय केला पाहिजे.

**शिवाजी राजेः**—(तुम्ही) वतनी राहोन कारभार करावा. इमारतीचे पैके पाववून (त्यावर) बकशीस न घ्यावें. मोरोपंत कारभार करतील, गड घेतील, पैके मिळवितील, दुरगिरीचा (= देवगिरीचा) प्रयत्न करून घेतील. त्यास वतनीचें काम (व) तें काम बराबरी ऐसें समजोन मोरोपंतास २५ फुलें द्यावीं त्याच वक्ती तुम्हांस २० फुलें द्यावीं. या हिशेबानें तुम्हांस देऊं.

**निळोपंतः**—सदरहूप्रमाणें आपण मान्य केलें असें.

विश्वसनीय व 'मर्यादेयं विराजते' या मुद्रेनें अलंकृत झालेल्या या पत्रांत जें राजनीतीचें तत्त्व ग्रथित केलें आहे तें यापुढील शिवाजीचरित्रांतलें महत्त्वाचें सूत्र आहे. पूर्वार्धांत ' चढाई करण्याची संधि दिसत असली तरी भेदनीतीचा आश्रय करणें हेंच श्रेयस्कर ' असें सोनोपंतानें सांगितलेलें तत्त्व पाळण्यांत आलें होतें; आणि या भेदनीतीच्याच कल्पनेवर(म्हणजे दिल्लीकर व विजापूरकर हे मराठ्यांचें राज्य चिरडण्यासाठीं एकजुटीनें वागणार नाहींत तरच) मराठ्यांचें राज्य टिकेल; व ते एक होतील तर त्यांच्याशीं विरोध करणें आत्मघातकीपणाचें ठरेल या तत्त्वावर जयसिंगाच्या वेळीं शिवाजीनें पड खाऊन मोगलाचें विजापूरकराशीं भांडण लाऊन दिलें असें अल्लीनाम्याचा कर्ता सांगतो. पण सल्ल्याचीं तीन वर्षें संपल्यानंतर मराठ्यांनीं मोगलांशीं जें युद्ध सुरू केलें त्यावेळीं त्यांना केवळ भेदनीतीवर अवलंबून न राहतां उघड सामना देऊन देखील आत्मसंरक्षण करतां येईल असा आत्मविश्वास वाटत होता हें स्पष्ट आहे. या वेळीं मोगलांशीं सुरू झालेलें युद्ध शिवाजीमहाराजांच्या अखेरीपर्यंत चाललें होतें; व त्यांत मोगली सरदारांतील आपसांतल्या बेबनावाचा मराठ्यांना फायदा घेता आला हें खरें. पण एव्हां मोगल व विजापूरकर यांच्या राज्यकारभाराची घडी अनेक कारणामुळें इतकी विस्कळित झाली होती कीं, ती अधिक विस्कळित होण्यासाठीं विशेष खटपट करण्याचें कारण नव्हतें. त्यापेक्षां स्वतःचें बळ वाढविणें व शत्रूवर चढाई करणें हेंच उपकारक होण्याजोगें होतें. आपलें सामर्थ्य बाल्यावस्थेंत असतांना लपून छपून, व पड घेऊन जगणें मराठ्यांना आवश्यक दिसलें व त्यांनीं भेदनीतीवर भर दिला; रुस्तुमजमाशीं अंतस्थ स्नेह राखला व जयसिंगापुढें पड घेतली. पण कोंढाण्याच्या युद्धांत तानाजीनें जी

सिंहगर्जना केली ती स्वराज्याच्या नव्या व निराळ्या उमेदीची निदर्शक होती असें म्हणण्यास हरकत नाहीं. पूर्वार्धांत नेताजीसारखा, शिवाजीच्या अगदी सांनिध्यांत राहणारा, वीर फितूर होऊन मोगलांना मिळाला. पण उत्तरार्धांत हें गाडें उलटून मोगलाकडील असंतुष्ट लोक मराठ्यांच्या आश्रयास येऊं लागले. शिदी हिलाल व जाधवराव हे सरदार मोगलांच्या आश्रयास होते व त्यांची नेमणूक मराठ्यांविरुद्ध युद्ध चालविण्याच्या कामीं झाली होती. पण त्यांच्या हातून तें काम न झाल्यामुळें बादशहाची आपणावर गैरमर्जी होईल अशी त्यांना भीति पडली; तेव्हां ते उलट मराठ्यांकडे आश्रयार्थ आले ( पर्ना. अ. २-४३,४४ ). त्याचप्रमाणें जयसिंगाच्या वेळेपासून जे नवे मनसबदार मोगली सुभेदारांनीं बनविले होते त्यांचीं उत्पन्नें कमी करण्यांत आलीं तेव्हां तेहि मराठ्यांच्या आश्रयास आले. सारांश, मराठ्यांचें राज्य हें शेजारच्या राज्यांतील असंतुष्ट लोकांना आश्रयस्थान आहे असें यावेळीं वाटूं लागलें. नवीन उभारलेल्या स्वराज्यास स्वतंत्र सत्ता म्हणून लोकांकडून मान्यता मिळूं लागल्याबद्दलचें हें एक उत्तम प्रमाणच आहे. औरंगजेब व विजापूरकर यांचीं मात्र या सत्तेस उघडपणें मान्यता मिळणें शक्य नव्हतें. पण त्या वेळच्या लोकांना वस्तुस्थिती आतां स्पष्टपणें दिसूं लागली. मराठ्यांच्या तरवारीचें पाणी झळकूं लागतांच इंग्रजादि युरोपियन व्यापाऱ्यांनीं देखील दबून वागण्यास सुरुवात केली 'शिवाजीशीं वैर करण्याची आपली आज तयारी नाहीं हें समजून त्याला खिजविण्याला कारण होईल असें कांहींच करू नका' या अर्थाचे हुकूम सुरतवाले अधिकारी मुंबई येथील इंग्रजी व्यापाऱ्यांना सोडीत. या सुमाराची हकीकत सभासद अशी देतो.

**५ मोंगलाशीं युद्ध**—मोरोपंत पेशवे यांनीं त्रिंबकगडापासून सालेरी किल्ल्यापावेतों कित्येक किल्ले घेतले. हें वर्तमान दिल्लीस पातशहास कळलें. त्यानें इखलासखान व बहिलोलखान यांस बोलावून आणून वीस हजार स्वारानिशीं सालेरीस रवाना केलें. 'सालेरी घेऊन फस्त करणें' असें सांगितलें. तसें दिलेलखान यास दहा हजार स्वारांनिशीं अहिवंत किल्लयावर रवाना केलें. दिलेलखान येऊन खळाजवळ्यास लागले. मोठें युद्ध जालें. गड हातास आला नाहीं. मोरोपंत पेशवे यांनीं उपराळियास मावळे लोक बारा हजार रवाना केले. त्यांनीं जाऊन छापे घातले. रामाजी पांगेरा, हशमाचा हजारी यानें कणेरगडाखालीं निवडक सातशें लोक घेऊन भांडण दिलें. दिलेल-

खानाच्या फौजेनें पायउतारा होऊन चालून घेतलें. चौफेरा मावळे लोक वेढिले. एक प्रहर टिपरी जैसी शिमग्याची दणाणते तैसे मावळे भांडले. दिलेरखानाचे बाराशे पठाण रणास आणिले. मग सातशे माणूस व रामाजी पांगेरा सर्वहि उघडे बोडके होऊन लढले. एकएकास, तीराच्या व बर्चीच्या, वीस वीस तीस तीस जखमा लागल्या, व लोक मेले. मोठें युद्ध जालें. मग दिलेलखान यानें तोंडांत अंगुली घालून आश्चर्य केलें..

त्याजवर इखलासखान नबाब याणीं येऊन सालेरीस वेढा घातला; आणि गडाखालें उतरला. हें वर्तमान राजियास कळोन राजियानीं प्रतापराव सरनोबत, लष्कर देऊन मोंगलाईंत पाठविले होते, त्यास पत्रें व जासूद पाठविले कीं, "तुम्ही लष्कर घेऊन सिताबीनें वरघाटे सालेरीस जाऊन, बेलोलखानावरी छापा घालून, मारून चालविणें. आणि कोकणांतून मोरोपंत पेशवे यांस हशमानिशीं रवाना केलें आहे ते इकडून येतील आणि तुम्हीं वरघाटीं येणें. असे दुतर्फा चालून घेऊन गनिमास मारून गर्दीस मेळविणें" अशीं पत्रें पाठविलीं. त्यावरून प्रतापराव लष्कर घेऊन वरघाटें आले. आणि मोरोपंत पेशवे कोंकणांतून आले. उभयतां सालेरीस पावले. एकातर्फेनें लष्करांनीं घोडीं घातलीं; एक तर्फेने ( = दुसऱ्या बाजूनें ) मावळे लोक शिरले; आणि मारामारी केली. चार प्रहर मोठें युद्ध जालें. मोगल, पठाण, रजपूत, रोहिले, तोफाची, हत्ती, उंटे आराबा घालून युद्ध जाहालें. दुतर्फा दहा हजार माणूस मुर्दा जहाले. घोडीं, हत्ती, उंट यास गणना नाहीं. रक्ताचे पूर वाहिले. रक्ताचा चिखल जाहाला तो असा कीं त्यांत रुतो लागले, असा कर्दम जाहाला. मारता मारता घोडे जिवंत उरले नाहींत. साहा हजार घोडे जिवंत सापडले ते राजियाकडे गणतीस लागले. सवाशे हत्ती सापडले. साहा हजार उंटें सापडलीं. मालमत्ता, खजीना, जडजवाहीर, कापड, अगणित बिछाई हातास लागली. बेवीस वजीर नामांकित धरले. इखलासखान व बेलोलखान पाडाव झाले. ऐसा कुल सुभा बुडविला. हजार दोन हजार सडेसडे पळाले. या युद्धांत प्रतापराव सरनोबत व आनंदराव व व्यंकाजी दत्तो व रूपाजी भोसले व सूर्यराव काकडे, शिदोजी निंबाळकर, खंडोजी जगताप, गोंदजी जगताप, संताजी जगताप, मानाजी मोरे, विसाजी बल्लाळ, मोरो नागनाथ, मुकुंद बल्लाळ यानीं बाजे वजीर व उमराव असे कस्त केले. मावळे लोकांनीं कस्त केली. मोरोपंत व प्रतापराव या उभयतांनीं

आंगीजणी (= धाडस) केली. युद्ध करीत असतां सूर्यराव काकडे हा पंचहजारी लष्करी धारकरी जंबुरियाचा गोळा लागून पडला. वरकडहि नामांकित शूर पडले. असे युद्ध होऊन फत्ते जाहाली. राजियानीं हें वर्तमान ऐकून बहुत खुशाल जाले. तोफा मारल्या. साखरा वांटल्या. खबर घेऊन जासूद आले त्यांचे हातीं सोन्याचीं कडीं घातलीं. प्रतापराव सरनोबत, मोरोपंत पेशवे, लष्करचे सरदार व मावळे यास बक्षिसें दिधलीं. नांवाजलेले वजीर पाडाव जाले होते त्यास 'वस्त्रें व अश्व देऊन सोडणें' म्हणून हुकूम पाठविला. त्यावरून बेलोलखान व नबाब यास वस्त्रें अश्व देऊन सोडिलें. दिलेलखान सालेरीहून चार मजलीवर होता. त्याणें ही खबर ऐकून माघारा पळोन गेला [ सभा. पृ. ७५ ].

**६ दंगेखोरास आश्रय**—या अनुभवा नंतर मोगली सरदारांनीं आपल्या हातून शिवाजीचा बंदोबस्त होत नाहीं असें पाहून विजापूरकरांना आपले स्नेही बनविण्याचा प्रयत्न केला व तेथें खवासखानाचें महत्त्व वाढल्यामुळें या कामीं त्यांना यश येणार असा रंग दिसूं लागला. पण याच वेळीं विजापूरकरांच्या मुलखांत धुमाकूळ घालणाऱ्यानें शिवाजीमहाराजाकडे आश्रयार्थ पाठविलेलें पत्र उपलब्ध आहे; त्यावरून सत्तेचें केंद्र विजापूरास नसून प्रतागडास गेलें आहे हें खवासाच्या लक्षांत आलें नसलें तरी इतर लोकांनीं ओळखले होतें हें स्पष्ट दिसून येतें. तें असें.

वाईचा देशमुख दत्ताजी पिसाळ याचा गंगाजी पिसाळ वगैरेंशीं भाऊबंदीचा तंटा सुरू होता. त्यांत आदिलशाही सुभेदार व कारकून यानीं या भाऊबंदांची बाजू घेतली; व दत्ताजीच्या मुतालिकाला कैद केलें. तेव्हां दत्ताजीच्या तर्फे केदारजी सुरो हा विनंति करण्यासाठीं शिवाजीमहाराजांकडे गेला. वस्तुतः वाईच्या सुभेदाराविरुद्ध तक्रार करून दाद लावून घ्यावयाची तर केदारजीनें विजापुरास जावयास पाहिजे होतें. पण त्यापेक्षां जवळ प्रतापगडास जाऊन लौकर लाद लागेल असें त्याला वाटलें. तो महाराजांकडे जाऊन म्हणाला, कीं "तुम्ही आपला एक भला ( =वजनदार) माणूस वाईच्या सुभेदाराकडे पाठवून सुभेदाराला गंगाजीची पाठी राखूं नको; दत्ताजीकडे देशमुखी चालवा; असें न कराल तर दत्ताजी तुमच्याशीं दावा करील, विलायतीस तसदी देईल, मुलख ओस पाडील मग आम्हांस बोल नाहीं असें दाटदपटें देऊन सांगा. यावर त्यानें तें न ऐकलें तर साहेबीं (=शिवाजीनें)

दत्ताजीस राहण्यास जागा द्यावी. म्हणजे दहा वीस घोडी करून, शर्तीनसी दावा करून वाई परगण्याच्या विलायतीस आजार देऊन. लुटुन, नागऊन, कळेल तो इलाज करून आपलें पारपत्य (= व्यवस्था) दत्ताजी करून घेईल." आणि असा आश्रय दिल्याबद्दल दरसाल ५०० होनप्रमाणें ४ वर्षांत २ हजार होन घेण्याचा करार मान्य करून शिवाजी महाराजांनीं दत्ताजीला (कौलनामा=) अभयपत्र दिलें (ले. १२६३).

**७ औरंगजेबाचा जळफळाट**:—इकडे सालेरीच्या युद्धांत झालेल्या पराभवाचें वर्तमान ऐकून औरंगजेब दक्षिणेंतील मोगली सुभेदारांवर अतिशय रागावला; आणि "आमचा मुलुख शिवाजीनें लुटला, तुमच्या सारख्या योध्यांना युद्धांत अडविलें; तेव्हां सालेरीच्या युद्धांत तुम्ही लढून कां मेला नाहीं? जगला कसे? आदिल, कुतुब, फिरंगी, हबशी वगैरे सत्ताधारी त्याला भिऊन नजराणा पाठवितात. तेव्हां ते व तुम्ही एक होऊन चोहोंकडून त्याचा मुलुख काबीज करा. म्हणजे तो किल्ल्यावर किती दिवस बसून राहील? आपोआप जेरीस आलाच पाहिजे" अशा अर्थाचें पत्र त्यानें बहादुर व दिलेलखान यांना पाठविलें. पण खानांनीं उलट उत्तर पाठविलें कीं "तुमच्या सांगण्याप्रमाणें आम्हीं खटपट करूं. पण शत्रूच्या मुलुखांत शेकडों खंडी धान्य उत्पन्न होतें; यामुळें आम्हीं गडाखालचा मुलुख हस्तगत केल्यानें गड जेरीस येतील असें वाटत नाहीं. प्रत्येक किल्ल्यावर शिवाजीचे २।३ हजारच सैन्य आहे. पण तें अचानक गडावरून खालच्या मुलखावर झडप घालून उंदराप्रमाणें अशा सफाईनें निघून जातें कीं, त्याला अडविणें शक्य नाहीं. बरें, आमचे घोडेस्वार सज्ज होऊन उभे असले तरी शिवाजी त्यांच्यावर बेधडक दौड करून येतो; व बहिरीससाण्याप्रमाणें झडप घालतो. तेव्हां आम्ही सपाट प्रदेशांत राहून त्याचें कसें निवारण करणार? आमच्याजवळ एक लाख घोडा असला तरी शिवाजीच्या डोंगराळ मुलुखांतून त्याचा पाठलाग करणें शक्य नाहीं. अशा स्थितींत त्याच्याशीं तह करणें हाच मार्ग आम्हांस प्रशस्त वाटून आम्ही एक चांगला भाषाभिज्ञ ब्राह्मण, वकील म्हणून पाठविला. तेव्हां शिवाजीनें, उलट, आमच्याकडे काजी हैदर नांवाचा यवन आमच्याकडे वकीलीस पाठविला आहे." औरंगजेबाकडे हें उत्तर पाठविल्यानंतर काजी हैदर या वकिलाशीं कोणत्या रीतीनें वागवावें याविषयीं त्यांना मोठा विचार

पडला; शेवटीं त्याला सवलतीनें वागविलें तर बादशाहा आपल्यावर रागावल्यावांचून राहणार नाहीं असा अंदाज करून त्यांनीं काजी हैदरास कैद करून परांड्याच्या किल्ल्यावर ठेविलें. ( पर्नाल अ. २ ).

यानंतर मोरोपंतानें श. १५९४ च्या ज्येष्ठ, आषाढांत जव्हार व रामनगरच्या बाजूस स्वारी करून तो मुलूख हस्तगत केला. तेव्हां तेथील राजे पळून मोगलांच्या आश्रयास गेले. या सुमारास शहाअलम दक्षिणेंतून दिल्लीस गेला होता. त्याच्या जागीं बहादुरखान सुभेदारीवर आला. त्याच्याबरोबर औरंगजेबानें सत्तर हजार स्वार दिले होते; व दिलेलखानास त्याच्या हाताखाली वागण्याचा हुकूम सोडला होता. " नाना हुन्नर करून शिवाजीस जेर करतों. पादशहांनीं फिकीर न करावी " असें औरंगजेबास आश्वासन देऊन हा बहादुरखान मराठ्यांच्या स्वारीवर निघाला होता. पण ही बातमी ऐकून " बहादुरखान पेंडीचें गुरूं आहे. त्याचा गुमान काय ? त्यास आपल्या मुलखांत यावयास दोन वर्षें लागतील. " असे उद्गार शिवाजी महाराजांनीं काढल्याचे सभासद सांगतो ( पृ. ७६ ).

बहादुरखानानें दक्षिणेंत आल्यावर शिवाजीचा जांवई महादजी नाईक ( निंबाळकर ) याला मोठी मनसब दिली. नंतर खानानें मराठे पुण्याजवळ जमले आहेत अशी बातमी ऐकली. तेव्हां तो चांभारगोंद्यावरून ( अहमदनगराहून वीस कोसांवर असलेल्या ) वडगांवास आला व त्यानें आपलें स्मारक म्हणून ' बहादुरगड ' स्थापिला. पुढें दलपतराय व इंद्रमन बुंदेला वगैरे रजपूत सरदारांना बढती मिळाली; परंतु चंपतराय बुंदेल्याचा मुलगा छत्रसाल याची बढती झाली नाहीं, व त्याची परिस्थितिहि अडचणीची झाली होती. यामुळें तो *शिवाजीकडे निघून गेला. पण शिवाजीचा उत्तर हिंदुस्थानांतील लोकांवर विश्वास नसल्यामुळें त्यानें छत्रसालास केवळ सामोपचारानें वागवून लौकरच निरोप दिला. यामुळें त्याची त्रिशंकुवत् स्थिति झाली; तेव्हां तो स्वदेशास गेला आणि तेथें त्यानें कांहीं लोक जमवून बंड उभारलें व मुलूखहि काबीज केला इत्यादि हकीकत ' दिलकाश 'मध्यें आहे ( स्कॉ. भा. २ पृ. २५ ).

---

* प्रो. सरकार ही भेट १६७०–७१ मध्यें झाली असें म्हणतात. [ पृ. १८९ ].

**८ विजापूरची हकीगतः**—येथवर सांगितल्याप्रमाणें मराठ्यांनीं मोगलांविरुद्ध चढाईचें धोरण स्वीकारलें असतां विजापूर दरबारांत अली आदिलशाहा मरावयास टेकला. तेव्हां मोठी उलथापालथ होण्याची वेळ आली. त्या वेळचें वर्णन बु. स. मध्यें (हिं. पृ. ६२३ व मो. पृ. २२३) असें आहेः—

अली जिवंत होता तोंपर्यंत आदिलशाही दरबारांतलीं वैमनस्यें विशेष उघडकीस आलीं नाहींत. पण दरबारांत परस्पर विरोधी पक्ष जोरांत होते. दियानतराव व मुख्य कारभारी अबदुल महंमद यांचें मुळापासून उघड उघड सख्य होतें व या कारभाऱ्याच्या हातीं बारा वर्षें एकसारखीं राज्यसूत्रें कायम टिकल्यामुळें दरबारांतील सर्व सरदारांवर त्याचा चांगला वचक होता. इतर मुत्सद्द्यांपैकीं मिर्झा युसफखा हा खवासखाचा द्वेष करी आणि धर्माजी पंडित हा वर सांगितलेल्या (अबदुल महमद व दियानतराव यांच्या) अधिकारारूढ पक्षाच्या विरुद्ध होता; व त्याची खटपट मुजफरखान याच्यातर्फें चाललेली असे. या तिरंगी सामान्यांत खवासखा अगर मुजफरखा यांचा हेतु अधिकारी पक्षास हाणून पाडण्याचा मात्र आहे; पण कारभाराची जबाबदारी अंगावर घेऊन ती पार पाडण्याचा वकूब त्यांच्या ठिकाणीं नाहीं हें अली पूर्णपणें जाणून होता. अबदुल महमद यानें १२ वर्षें धिमेपणानें कारभार करून व मोठमोठ्या अडचणींच्या प्रसंगांना तोंड देऊन आदिलशाही टिकविली असल्यामुळें अबदुल करीम बहलोलखान वगैरे दरबारांतील सरदारांची त्याच्या विरुद्ध वागण्याची छाती नव्हती. हें सर्व लक्षांत घेऊन अलीनें असें ठरविलें होतें कीं, ‘ शहाजादा शिकंदर यास आपल्या डोळ्यादेखत गादीवर बसवून त्याचें कारभारीपण अबदुल महमदानें पत्करलेलें आपण पाहावें. ’ अनेक मुत्सद्द्यांचाहि असाच सल्ला पडला; व बादशहानें कारभाऱ्यास तसें करण्याविषयीं अनेक वेळां आग्रहपूर्वक सांगितलें. पण कारभाऱ्यानें ती गोष्ट मनावरच घेतली नाहीं; तो टाळाटाळी करूं लागला. याचें कारण या कारभाऱ्याला त्याच्या आईनें असें बजावून सांगितलें होतें कीं, “ जो कारभारी नव्या शहाजाद्यास प्रथम गादीवर बसवितो तो शेवटीं लवकर मारला जातो. एवढ्याकरितां तूं या खटपटींत पडूं नको. आणि पडलास तर माझें दूध प्याला आहेस त्याचे उपकार तूं फेडले नाहींस असें मी समजेन !” या भोळ्या समजुतीमुळें हा कारभारी आपल्या अंतकाळीं पुढील

राज्यव्यवस्थेच्या कामीं उपयोगी पडूं शकत नाहीं अशी अल्लीची खात्री झाली. तेव्हां निरनिराळ्या पक्षांनीं एकमेकांशीं भांडून यादवी युद्ध माजवूं नये अशासाठीं कारभाऱ्याच्याच संमतीनें एक तात्पुरती योजना त्यानें मरण्यापूर्वीं करून ठेवली. ती अशी कीं खवासखान हा शहाजाद्याचा पालक व गादीचा कारभारी असावा; व अबदुल महमद यानें शहादुर्ग व गुलबुर्गा येथें राहून मोगलाशीं लढण्याची तयारी ठेवावी; अबदुल करीम बहलोलखान यांच्याकडे पन्हाळा व मिरज हे किल्ले देऊन शिवाजीशीं मुकाबला करण्याचें काम सोंपवावें; मुजफरखान यानें बैदनूरकरावरील मोहीम पार पाडावी आणि स्वतः अबदुल महमदानें खवासखानाच्या हाताखालीं राहून तो सांगेल त्या कारभाराची अंमलबजावणी करावी. याप्रमाणें खवासखान व अबदुल महंमद यांच्यांत करामदार ठरून बादशहाच्या मृत्यूनंतर दुसऱ्याच दिवसापासून ही व्यवस्था अंमलांत आणण्याचें ठरलें. त्याप्रमाणें बादशहा अगदीं मरणोन्मुख झाला तेव्हां खवासखानानें मोठ्या व्यवस्थेनें बादशाही महाल व दरबार यांचा बंदोबस्त केला. शेवटीं हि.१०८३ साबान १२ (श. १५९४ का.१५=२४।११।७२) रोजीं पांचवे तासीं बादशहाचा अंत झाला; व ५ वर्षांचा शिकंदर आदिलशाहा तक्तावर बसला. त्याबरोबर दुसरे दिवशीं अ. महमदानें खवासखानाकडे निरोप पाठविला कीं, "ठरल्याप्रमाणें शहादुर्ग किल्ला माझ्या ताब्यांत द्या." पण खवासानें उत्तर पाठविलें कीं "बादशहा लहान लेकरूं, अज्ञान; अशा स्थितींत राज्यांतले किल्ले कोणाच्याहि स्वाधीन करण्यास मी कोण मालक? वर्ष दोन वर्षे तुम्ही थांबा; तेवढ्यांत कांहीं तोड काढूं." या चालढकलीच्या जबाबाचें रहस्य अ. महंमदानें तेव्हांच ओळखलें व त्याला फार वाईट वाटलें. दुसरें दिवशीं स्वतः खवासानें अ. महंमदाच्या घरीं जाऊन पुष्कळ साळसूदपणाच्या गोष्टी सांगितल्या. पण गोड बोलण्यानें फसण्याइतका अ. महंमद भोळा नव्हता. त्यानें कारभारांतून अंग काढून घेतलें. आणि खवासाच्या नाकर्तेपणामुळें 'आपण जन्मभर कष्ट करून उभ्या केलेल्या राज्याची घडी विघडत चालली' हें दिसूं लागतांच त्याला विजापुरांत राहणेंहि असह्य वाटून तो त्या शहरांतून चालता झाला!

यानंतरची हकीकत जयरामकृत पर्नालाख्यानाच्या तिसऱ्या अध्यायांत दिली आहे ती अशी: अबदुल महंमदासारख्या अनुभवी मुत्सद्द्यास बाजूस सारून खवास विजापुरांत सत्ताधारी होत आहे व या नाकर्त्या शिद्याच्या

आंगांत मोगल व कुतुब यासारख्या जबरदस्त शत्रूशीं झगडण्याचें सामर्थ्य नसल्यामुळें आदिलशाही मोगलांच्या भक्ष्यस्थानीं पडेल हें ओळखून शिवाजी महाराजांनीं आदिलशाहीवर आपणच आधीं चालून जावें असा विचार केला. याचा सरळ अर्थ असा होतो कीं आदिलशाही बादशाहा म्हणजे ५ वर्षांचें पोर व अधिकारारूढ प्रधान नाकर्ता अशा स्थितींत या बादशाहीचे लचके तोडण्याची संधि गमावण्याची सोय नव्हती. शेजाऱ्याची अडचण म्हणजे आपला राज्यविस्तार करण्याची उत्तम संधि हा दंडक त्यावेळीं चालू असल्यामुळें व खवास मोगलांना अनुकूल होण्याचा स्पष्ट रंग दिसूं लागला तेव्हां मराठ्यांनीं त्याच्या राज्यावर अचानक रीतीनें हल्ला केला. 'जें विजापूर माझ्या बापानें ( = शहाजीनें ) राखलें तें हा खवास आतां नाशाप्रत पोंचवीत आहे, यासाठीं आम्हींच विजापूर ताब्यांत घेऊन या बादशाही मुलास द्यावें हा शहाणपणाचा मार्ग' असे उद्गार शिवाजीच्या तोंडीं जयरामानें घातले आहेत. त्यावरून दियानतराव व अबदुल महंमद हे शहाजी व शिवाजी यांचे मनापासून शत्रुत्व करणारे नव्हते; उलट खवास, धर्माजी पंडित वगैरे मंडळी मात्र दिल्लीकराशीं सख्य करावें या मताचीं असून बहलोलखान पठाण हा या दोनहि पक्षांशीं प्रसंग पडेल त्याप्रमाणें वागणारा स्वतंत्र व महत्त्वाकांक्षी सरदार होता असें दिसतें.

९ **पन्हाळ्याचा भेद**—विजापूर येथील घालमेलीची परीस्थिति समजतांच शिवाजी महाराजांनीं सैन्याची जमवाजमव करणें व विजापुरांतून आपला वकील बाबाजी नाईक पुंडे याला परत बोलवून घेणें या दोन गोष्टी प्रथम केल्या. आणि त्याच वेळीं वऱ्हाडच्या बाजूस व तेलंगणच्या बाजूस आनंदराव व प्रतापराव हे स्वारीस गेले होते त्यांना महाराजांनीं हुकूम पाठविला कीं, "तुम्हीं औरंगजेब व कुतुबशाहा यांचा जितका मुलूख लुटतां येईल तितका लुटून पिळलेल्या उसाप्रमाणें नि:सत्व करून टाका. म्हणजे ते तहास कबूल होतील. आणि यानंतर त्यांचा मुलूख सोडून एकदम आदिलशाही मुलुखांत दौड करा व वाईपासून लक्ष्मेश्वरापर्यंतचा मुलूख ताब्यांत घ्या."

इकडे बाबाजी पुंडे विजापुराहून सुखरूप परत आला असें पाहतांच महाराजांनीं अनाजी पंडित, कोंडाजी आणि गणोजी व मोत्याजी रवळेकर यांना बोलावून पन्हाळा किल्ला सर करण्याविषयींची योजना सांगून ती पार पाडण्याचा हुकूम दिला. तेव्हां आनाजी ताबडतोब कोकणांत गेला व नंतर

तीन दिवसांनीं रात्रीं कोंडाजी वगैरे तीघेहि येऊन पोचले. नंतर दोराच्या शिड्या, वाघनखे, घोरपडी, मेखा वगैरे सामुग्री सह पायदळ लोक बरोबर घेऊन ते रात्रीच्या रात्रीं तेथून निघाले. त्यावेळीं चोहीकडे दाट अंधकार असल्यामुळें कोणाच्याहि दृष्टीस न पडतां अनाजी पंडित आपल्या लोकांसह पन्हाळ्याच्या पायथ्याशीं पोचूं शकला. नंतर एकमेकांस हाताचा आधार देऊन ते शत्रूस चाहूल लागू न देतां किल्ल्याच्या पठारापर्यंत चढून गेले; व त्यांनीं रणशिंग फुंकलें. तेव्हां पाहरेकरी जागे होऊन शस्त्रें हातीं घेण्यासाठीं धावपळ करूं लागले; व किल्लेदार तरवार हातीं घेउन धाऊन आला. तेव्हां कोंडाजीनें पुढाकार घेऊन शत्रुपक्षाचे कित्येक शिपाई ठार केले. इतक्यांत पहाट झाली. तेव्हां हा आरडाओरडा कसला चालला आहे याची चौकशी करण्यासाठीं नागोजी पंडित नांवाचा आदिलशाही कारकून आला; तेव्हां त्याला कळलें कीं किल्ल्याच्या दरवाजासमोर आपला किल्लेदार ठार पडला आहे ! इतक्यांत गणोजी रवळेकर जवळ आला असें पाहून नागोजी पळून गेला. किल्ल्यावरील इतर अधिकारी देखील यानंतर कैद झाले व पन्हाळ्याचा किल्ला अनाजी पंडिताच्या ताब्यांत आला. जयरामानें दिलेल्या हा हकीकतीवरून पन्हाळ्यावर दरवाजा आंतून उघडण्याची व्यवस्था कोणातरी फितुरीं आदिलशाही नोकरानें केली होती हें स्पष्ट आहे. जेधे शकावलींत देखील " फाल्गुन वद्य १३ पनाला गड आणाजीपंतीं भेद करून घेतला. साठी लोक रवाना केले त्यांनीं पनाळा घेतला " अशी नोंद आहे. तिचा मेळ जयरामकृत वर्णनाशी चांगला बसतो. सभासदहि या प्रसंगीं ' भेद ' हाच शब्द वापरतो. तात्पर्य, आदिलशाही नोकर मराठयांना भेदता येऊं लागलें. याची नैतिक मीमांसा येथें करण्याचें कारण नाहीं. पण ऐतिहासिक दृष्टया असें म्हणतां येईल कीं, आदिलशाही कमजोर होत चालली, मुत्सद्यांत वैमनस्य वाढलें, एखाद्या भागावर शत्रूचा हल्ला आला असतां त्या भागाचा पाठपुरावा मध्यवर्ती सत्तेकडून होण्याची खात्री राहिली नाहीं आणि मोठ्या इमानानें शेवटपर्यंत किल्ला लढविला तर बक्षीस किंवा याच्या उलट वागल्यास शिक्षा करण्याचें सामर्थ्य विजापूर दरबारांत नाहीं या गोष्टी उघड दिसत असल्यामुळें आदिलशाही नोकर मराठ्यांना भेदता येऊं लागले. किंबहुना निग्रहानुग्रहाचें सामर्थ्य म्हणजे राजेपण हें विजापुरांतील तक्तावर बसलेल्या पोरांत नसून रायगडास विनतक्ताच्या जागीं राहाणाऱ्या शिवाजी नांवाच्या व्यक्तींत आहे व त्याच्याच

आश्रयास जाण्यांत आपलें हित आहे ही गोष्ट त्या वेळीं सर्वांच्या लक्षांत येऊं लागली होती. शिवाजी हें भक्कम आश्रयस्थान आहे हें मोंगलांकडे असलेल्या हिलाल व जाधवराव किंवा छत्रसाल यांना जर पटलें तर पन्हाळ्याच्या किल्ल्यांतील एकाद्यास तसें वाटलें याचें आश्चर्य वाटावयास नको. सारांश 'इमान' ही भावना नोकरांच्या अंतःकरणांत जागृत राहाण्यास बादशाही व्यक्ति व त्याचें राज्ययंत्र जबरदस्त व व्यवस्थित चाललेलें दिसणें आवश्यक असे; तशी परिस्थिति शिवकालीन आदिलशाहींत राहिली नसल्यामुळें त्या राज्याची घडी विस्कळित होत चालली.

याचें प्रत्यंतर मराठ्यांनीं पन्हाळा घेतल्यानंतर लौकरच आलें. अबदुल महंमद वगैरे अनुभवी मुत्सद्द्यांशीं वैमनस्य आल्यामुळें खवासाची विजापुरांत फारशी चहा राहिली नव्हती. अशा वेळीं पन्हाळ्यासारखा महत्त्वाचा किल्ला मराठ्यांनीं घेतला व यापुढें त्यांच्याशीं लढण्याचा प्रसंग आहे ही कल्पना स्पष्ट होऊं लागली तेव्हां जो तो खवासास दोष देऊं लागला. यशाचा वाटेकरी होण्यास जो तो तयार असतो, पण अपयशाचें खापर मात्र एकट्या प्रधानावर लादण्यांत येते या नियमानें मराठ्यांनीं विजापूरकरांशीं बिघाड केला याबद्दल एकट्या खवासाला सर्व जण जबाबदार धरूं लागले. त्यांत बहलोलानें अर्थातच पुढाकार घेतला. * शेवटीं शिवाजीशीं लढण्याचें काम बहलोलाच्या आधिपत्याखालीं चाललें पाहिजे ही गोष्ट खवासानेंहि मान्य केली व बहलोल सैन्यासह निघून तिकोट्यावरून उम्राणीनजीक गेला. तेथें त्याला खवासाचें पत्र आलें कीं, "सर्जाखान व मुजाफर मलीक रांगण्याच्या आसपास आहेत; त्यांना तुमच्या मदतीस येण्याविषयीं कळविलें आहे; त्याचप्रमाणें आदवानीचा सिद्दी मसूद, कर्नूलचा अबदुल अजीज व नळदुर्गाकडचा खिदरखान पन्नी व दिलेलखान यांनाहि मिळवून घेण्याची खटपट करा. आणि अशा रीतीनें तुम्ही सर्व एकत्र मिळून नंतर शिवाजीला युक्तीनें जिंका" विजापुरी सेनापतींनीं योजलेल्या या व्यूहाची बातमी

---

* मोहोकमसिंग व बहलोल या मोगली सरदारांना आनंदरावानें पराभूत करून कैद केल्याचें मागें सांगितलें आहे त्या मोगली बहलोलाचा भाऊ हा आदिलशाही दरबारांतला बहलोल आहे असें जयरामाच्या पर्नालाख्यावरून [अ.५-१४] दिसतें. त्याचप्रमाणें जुन्नरवर मराठ्यांनीं हल्ला केला तेव्हां 'मुल्लाहय' याचा हत्ती त्यांना सांपडला अशीहि माहिती त्याच ठिकाणीं सांपडते.

मराठ्यांना लागली. तेव्हां महाराजांनीं प्रतापराव,आनंदराव वगैरे सेनापतींना बोलावून असा हुकूम दिला कीं " हा बहलोलखान पठाण थोड्या सैन्यानिशीं आपल्याजवळ आलेला आहे, तेवढ्यांत त्याच्यावर जोराचा हल्ला करावा." या आज्ञेप्रमाणें प्रतापराव वगैरे सेनापती विडे घेऊन निघाले ते रातोरात गुप्त रीतीनें चाल करीत दोन दिवसांनीं शत्रूच्या तळानजीक एक जलाशय होता त्या नजीक पावले. तेथें घोडेस्वारांनीं कांहीं वेळ विसावा घेतला; तेवढ्यांत इतर सैन्यहि त्यांना येऊन मिळालें. नंतर मराठ्यांनीं शत्रूच्या तळाभोवतीं चारहि बाजूंनीं वेढा घालून त्याला कोंडण्याचा व्यूह रचला; त्यांत सिद्दी हिलालखान आघाडीस, आणि त्याच्यामागें एका कोसावर विठोजी शिंदे; शत्रूच्या दोनहि बगलांवर कृष्णाजी भास्कर व विठ्ठल पोलदेव आणि सभोंवती घिरट्या घालून टेहळणी करण्यासाठीं विसो बल्लाळ अशी मांडणी करण्यांत आली. इतकें होईतोंवर आदिलशाही सैन्याला मराठ्यांची चाहूल समजली नाहीं. पण नंतर त्यांचे हत्ती पाणी पिण्यासाठीं जलाशयाकडे निघाले तेव्हां त्यांबरोबर आलेल्या लोकांना आपल्यासभोवतीं शत्रूसैन्याचा वेढा पडला आहे असें प्रथम दिसून आलें. इतक्यांत प्रतापराव आपल्या स्वारांसह भरधांव घोडे फेकीत तेथें येऊन पोंचला. त्याबरोबर बहलोलखानाच्या सैन्यांत एकच गोंधळ उडाला; व लौकरच युद्धास तोंड लागलें. चार घटका युद्धाचा मोठा खणखणाट झाला. इतक्यांत आनंदरावानें शत्रूच्या पिछाडीस पोंचून जोराचा हल्ला करून तीन घटका युद्ध केलें; व शत्रूसैन्याची त्रेधा उडविली. या गर्दीत आदिलशाही तळावरचा एक हत्ती साखळी तोडून घेऊन धांवत सुटल्यामुळें त्या सैन्याच्या धांदलींत आणखी एवढी भर पडली. शेवटीं त्या हत्तीला पकडण्यासाठीं आदिलशाही माहूत आले तेव्हां त्यांच्यावर शिद्दी हिलाल व त्याचे मुलगे यांनीं व रूपाजी भोसला, सोमाजी मोहिते व सिदोजी निंबाळकर यांनीं हल्ला चढविला. त्याच वेळीं दोनहि बाजूंनीं विठोजी शिंदे, विठ्ठल पीलदेव व जाधवरावाचा सेनापती महादजी ठाकूर व सोमाजी यानीं, शत्रुपक्षाकडील भाईखान पठाण वगैरेवर, चाल केली व संध्याकाळपर्यंत घनघोर युद्ध झालें. सिदोजी निंबाळकरानें विजापूरकरांचा मोकळा सुटलेला हत्ती वळवून मराठ्यांच्या तळावर आणिला. सिद्दी महमद बर्की या आदिलशाही सरदाराशीं दीपाजी राउतराव

यानें गांठ घातली आणि त्याला ठार करून त्याच्या घोड्यावर बसून विजयी होवून तो परत आला. बकीं मरण पावल्याचें ऐकूनं बहलोलखान घाबरला व प्रतापरावानें दाखवून दिलेल्या मार्गानें पळून गेला. ही हकीकत जयरामानें पर्णालाख्यानाच्या पांचव्या अध्यायांत दिली आहे. आणि जेधे शकावलींतील हकीकतीशीं तिचा उत्तम प्रकारचा मेळ आहे. पण मुसलमानी ग्रंथांत याविषयीं अवाक्षर नाहीं !

वर सांगितलेल्या उम्राणीनजीकच्या युद्धानंतर मराठ्यांनीं परळी व सातारा हस्तगत करून संपगावची पेठ लुटली. मात्र साताऱ्याकडे सर्जाखानाशीं लढतांना विठोजी शिंदे पडला व शिवरात्रीच्या दिवशीं निवत्यानजीक किंवा नेसरीवर बहलोलखानाबरोबर लढत असतां प्रतापराव पडला. पूर्वीं उम्राणी-नजीकच्या युद्धांत बहलोलास सोडलें होतें तो पुनः चालून आला, तेव्हां महाराज प्रतापरावावर रागाऊन म्हणाले कीं, "बहलोलखान घडीघडीं येतो, तुम्हीं त्यांच्याशीं गांठ घालून त्याला बुडवा. नाहींतर मला तोंड दाखवूं नका." त्याप्रमाणें प्रतापरावानें बहलोलाशीं गांठ घातली; पण 'अवकाल होऊन †प्रतापराव तरवारीचे वारानें ठार जाले,' असें सभासद म्हणतो ( पृ० ७९ ).

सारांश श० १५९१ अखेरीपासून चार वर्षें मोगल व विजापूरकर यांच्याशीं ठिकठिकाणीं उघड सामने देऊन मराठ्यांनीं विजय मिळविले. तेव्हां राज्याभिषेकाची कल्पना गागाभट्ट व चिटणीस वगैरेंनीं काढून "मराठा राजा छत्रपती व्हावा" या गोष्टीस मान्यता मिळविली. नंतर महाराजांनीं प्रथम चिपळुणास जाऊन तेथें सैन्याची पाहणी केली व छावणी केली. नंतर तेथील देवळांचा जीर्णोद्धार करून व देवदर्शन घेऊन महाराज रायगडाकडे आले. त्यानंतर राज्याभिषेकाचा समारंभ झाला. त्याचें वर्णन पुढील प्रकरणांत आहे.

---

†अनेक युद्धांत अनुभव घेतलेला प्रतापराव अशा किरकोळ चकमकींत सांपडून ठार झाला. ही गोष्ट त्यावेळीं पुष्कळांना चमत्कारिक वाटली व तिला 'गोष्पदेंबुधिपारगः' अशी उपमा दिली आणि हा योग गागाभट्ट, महाराजांच्या भेटीसाठीं आला त्या सुमारास घडल्यामुळें, त्याच्याच पांढऱ्या पायाचें अशुभसूचन प्रतापरावाच्या मृत्यूनें केलें होतें अशी कोटी राज्याभिषेकानंतर गागाभट्टाचा प्रतिस्पर्धी निश्चल गोसावी यानें केली आहे. प्रो. सरकार यांच्या मतें प्रतापरावानें बहलोलाकडून लांच घेऊन वाट दिली असावी (पृ. २०१) पण त्यास आधार नाहीं.

# प्रकरण १४ वें

## श्रीशिवाजीमहाराज यांचा राज्याभिषेक.

**१ राज्याभिषेकाची आवश्यकता**—राजकीय अधिसत्ता कोणत्या ठिकाणीं वसत आहे व त्या सत्तेचा दृश्य व विद्यमान अधीश कोण हे प्रश्न इतिहासांत प्रामुख्यानें विचार करण्यासारखे असतात. कारण बहुजन समाजाचे पुष्कळसे व्यवहार या अधिसत्तेवर थोडेबहुत तरी अवलंबून असतात. मांडलीक राजांची तशी गोष्ट नाहीं. कारण ते मुख्य सत्तेचे अंकित असतात. व ज्या ठिकाणापासून अधिकार उगम पावतो तें ठिकाण जर आपलेसें करून घेतलें असलें तर अंकित राजाच्या कृपावकृपेचा सामान्य जनांच्या दृष्टीनें प्रश्नच उरत नाहीं. फार तर दहा पांच रुपयांच्या नजराण्याचा तो मालक ! एवढा उपचार संभाळला कीं, मुख्य मुद्दयाला अडयळा आणण्याची त्याला शक्ति नसते;व त्यामुळें हा एक मोठा अम्मलदार आहे; पण अम्मलदारापलिकडे कोणीहि नव्हे अशी सर्वांची समजूत झालेली असते. असलें पोकळ राजेपण शिवाजीमहाराजांना पुरेसें वाटत नव्हतें. त्यांच्या घराण्यांत मांडलिक सत्ता दोन तीन पिढ्या स्थिरावलेली होती. पण खरेंखुरें स्वतंत्रतेचें व स्वाधीनतेचें अधिराज्य मिळविल्याशिवाय आपली व आपल्या स्वकीयांची हीनदीन स्थिति कायमची घालवितां येणार नाहीं अशी त्यांची खात्री झाली होती. सन १६५५ पासून सन १६७४ पर्यंत ज्या ज्या राजकीय उलाढाली त्यांनीं केल्या त्याचा निष्कर्ष हाच निघाला कीं, अधिसत्ता स्थापन केल्या वांचून मांडलिकी दुबळेपणा नष्ट होऊं शकत नाहीं. आपल्याला एखाद्या गांवची पाटीलकी देतां येत नाहीं; व कदाचित् आपण दिली तर ती ज्याला दिली असेल त्याच्या वंशांत ती आपल्या हुकमाप्रमाणें टिकेल कीं नाहीं याची शंका असते. ही स्थिति जाऊन आपला अधिकार सर्वमान्य व्हावा व आपली सत्ता स्वतंत्र गणली जावी म्हणून राज्याभिषेकाची जरूर होती. तो प्रसंग कसा घडून आला याचें थोडक्यांत वर्णन करावयाचें आहे.

विजयानगरचें राज्य कसें होतें ? तसें अधिराज्य आपल्याला पाहिजे;

मोगलांचें उत्तरेंत जसें आहे, तसें दक्षिणेंत आपलें असावें अशी महाराजांची महत्त्वाकांक्षा होती हें वर दर्शविलें आहे. त्याप्रमाणें एकेक सत्तेचें हलकें हलकें आक्रमण करून आपल्या राज्याचा बराच विस्तार केला. आपल्या प्रजेचें संरक्षण करण्याची ताकद आपण चांगली कमावली आहे व परचक्र निवारण्याचें सामर्थ्यहि आपणामध्यें आहे हें अनेक प्रसंगीं दाखविलें.

अशी वस्तुस्थिति होती तरी लोकांच्या मनामध्यें दक्षिणेंतील अधिसत्ता मोगल बादशहा किंवा विजापूरची आदिलशाही या दोहोंच्यामध्यें कमी अधिक विभागून राहिलेली आहे अशी सामान्य समजूत होती. राज्यारोहण-प्रसंगीं ही सत्ता मोगलांकडेहि नाहीं, व विजापुरकरांच्या इकडेहि नाहीं, तर मराठ्यांनीं ती आतां मिळविली आहे, हें स्पष्ट करून दाखवावयाचें होतें. या समारंभाच्या निमित्तानें मराठ्यांच्या नवीन राजकीय सत्तेला कायदे-शीर किंवा सनदशीर मान्यता आहे हें जगाच्या निदर्शनास आणावयाचें होतें. या तत्त्वाला अनुसरून प्रथमत: निरनिराळ्या तत्कालीन राजसत्तांशीं बरोबरीच्या नात्याचे करारमदार करणें व त्याद्वारें नव्या अधिसत्तेची मान्यता मिळविणें ही महत्त्वाची गोष्ट होती. गोवळकोंड्याचा बादशहा तानाशा यानें मराठी राज्याला आपली मान्यता प्रथम दिली; व विजापुरकरांनीं त्याचेंच अनुकरण पुढें केलें. इंग्रज कंपनीनें आपला बरेच दिवस राहि-लेला तहनामा अभिषेक प्रसंगीं उरकून घेतला. पोर्तुगीज सरकारनें मोग-लाशीं वैरभाव उत्पन्न होऊं नये म्हणून आपली मान्यता स्पष्टपणें दर्शविली नाहीं इतकेंच; आंतून शिवाजीच्या सत्तेला त्यांची अनुमती होती हें इति-हासांत स्पष्ट आहे. ज्यानीं अनुमती दिली नाहीं त्यांच्यावर शस्त्र चालविण्याला महाराजांनीं कमी केलें नाहीं. अभिषेक संपल्याबरोबर मोंगलाचें व सिद्दीचें राजकारण महाराजांनीं हातीं घेतलेंच.

तहाच्या वाटाघाटी सुरू नाहींत असे १६७२नंतर कधीं झालेंच नाहीं. प्रत्येकाचे हेतु जरा वेगळे असतील 'पण महाराजांची मैत्री संपादणें जरूर आहे व ही सत्ता आतां बद्धमूल झाली असून तिच्याशीं मिळतें घेण्यावांचून मार्ग नाहीं' या बुद्धीनें तहाचीं बोलणीं सारखीं चालू असत. इंग्रजांचा हेतु काय होता हें पुढील उताऱ्यावरून समजेल. "आम्हाला फार नाजूक डाव खेळावयाचा आहे. कारण जर बादशाहाचा शत्रु शिवाजी याच्याशीं आमचे शांततेचे संबंध आहेत असें बादशाहाला कळलें तर या प्रांतांत आणि

बंगाल्यांतहि आमच्या व्यवहाराला अडथळा येईल. दुसऱ्या बाजूनें विचार केला तर शिवाजीच्या मुलखावर आमचें अन्न व सर्पण अवलंबून असल्या-मुळें उघड तह तहकूब करणें याशिवाय अन्य मार्गच नाहीं. ” (ले. १५११ ). इकडे आड आणि तिकडे विहीर अशी मुंबईकर इंग्रजांची स्थिती झाली होती. पण शेवटीं शिवाजीमहाराजांच्या पराक्रमाची चढती कमान पाहून त्यांनीं तह कायम केलाच. कारण मुंबईकर ता. १५ सप्टेंबर १६७३ रोजीं पुनः लिहितात “ एका बाजूनें बहलोलखान व दुसऱ्या बाजूनें मोगलांचें सैन्य अशा पेचांत शिवाजी असल्यानें तो प्रतिकार कर-ण्यास असमर्थ आहे आणि म्हणून त्याच्याशीं ढपंडाव करून सौजन्यानें वागण्याचें कारण नाहीं असें सुरतवाले म्हणतात. वस्तुस्थिति अशी नसून शिवाजी दोघांनाहि तोंड देण्यास समर्थ आहे....शिवाय शिवाजीचा पुरा नाश व्हावा हा त्यांचा ( मोगल सरदारांचा ) उद्देश नाहीं. कारण, हे उम-राव स्वतःच्या फायद्याकरितां ह्या लढाया धोरणानें, बादशाही खर्चानें चाल-वीत असतात ” ( ले. १५६३ ). याप्रमाणें मोगलाच्या विरोधाला फारशी किंमत नसल्यामुळें महाराजांशींच जरा नमतें घेऊन आपला कार्यभाग उरकून घ्यावा असा स्पष्ट हेतु इंग्रज व्यापाऱ्यांचा होता. विजापूर-कर व गोवळकोंडेकर यांनीं तहाची वाटाघाट करतांना “ मोगलांशीं युद्ध चालू ठेवण्याकरितां शिवाजीला पैशांच्या मोठ्या रकमा दिल्या ” अशी मुंबई-करांस बातमी लागली होती (ले. १५६५ ), व राज्याभिषेकानंतर ती खरी ठरली हें इतिहासांत प्रसिद्ध आहे.

एकंदरींत कांहीं थोडासा विरोध व बरीचशी संमति अशी स्थिती असतांना विरोधकांवर वचक बसविण्याकरितां व मित्रसत्तांचें संबंध दृढ करण्याकरितां राज्याभिषेकप्रसंग मोठ्या थाटानें साजरा करण्यांचें ठरविण्यांत आलें; इतकाच संबंध येथें ध्यानांत घ्यावयाचा आहे.

**२ रायगडचें स्थानमाहात्म्य**—रायगड किल्ल्याचें लष्करीदृष्ट्या महत्त्व किती आहे याचें विस्तरशः वर्णन करणें एथें आवश्यक नाहीं. तथापि कोकणच्या बाजूचीं बंदरें रोखण्याला व देशावरच्या मुलखा-वरहि जरब ठेवण्याला हा राजधानीचा किल्ला महत्त्वाचा होता यांत शंका नाहीं. किल्ल्याचे निसर्गसिद्ध उंच कडे आजहि पाहिले, वाटा अवघड व किती थोड्या आहेत हें लक्षांत घेतलें, म्हणजे हा दुर्गराज राजदुर्ग कसा

झाला याचें आश्चर्य वाटत नाहीं. शिवाय किल्ल्याच्या वरच्या पठारांचा विस्तार व मुबलक पाण्याचा पुरवठा यामुळें किल्ल्याच्या महत्त्वांत भर पडते. शहाजी राजे यांनीं आपलें स्वातंत्र्य शहागड नांवाच्या किल्ल्यावर पुकारलें होतें. पण थोड्या महिन्याच्या अवधींतच आपली नवी राजधानी टाकून कोंकणांतल्या माहुली किल्ल्यास जाणें त्यांना प्राप्त झालें. तेथेंहि मोगलांनीं पाठलाग केल्यामुळें शेवटीं तह करून विजापुरकरांच्या दरबारांत नौकरी पत्करण्याचा प्रसंग त्यांच्यावर आला. परंतु रायगडावर पुकारलेलें स्वातंत्र्य अधिक चिरस्थायी झालें. याचें श्रेय बदललेल्या परिस्थितीला जितकें देतां येईल तितकेंच राजधानीकरितां या किल्ल्याची योजना करण्यांत महाराजांनीं दाखविलेल्या चातुर्यांतहि दिसून येतें.

**३. हकीकत**—राज्याभिषेकासंबंधीं ऐतिहासिक माहिती फार थोडी उपलब्ध आहे. तत्कालीन प्रमुख मुसलमान इतिहासकार शिवाजीच्या राज्याभिषेकाची हकीकत मुळींच देत नाहींत. पण शिवाजी सुटून आला म्हणून त्याच्यावर स्वारी करण्याकरितां औरंगजेबानें कशी तयारी सुरू केली याची सविस्तर हकीगत ते देतात. आणि राज्याभिषेकानें शिवाजीची सत्ता वाढली ही गोष्ट कबूल करणें अडचणीचें असल्यामुळें तद्विषयक माहिती ते अजीबात देत नाहींत. मराठी बखरींमध्यें समारंभाची हकीगत सविस्तर दिली आहे. परंतु प्रत्यक्ष पहाणारानें ती लिहिलेली नसल्यामुळें तिच्या वर्णनांत खरेपणा किती आहे हें समजण्यास जागा नाहीं. नवीन उपलब्ध झालेला शिवभारत नांवाचा ग्रंथ सन १६६२ पर्यंतच हकीगत देतो. इंग्रजाचे वकील मात्र समारंभाचे वेळीं रायगडावर हजर होते, त्यामुळें कांहीं गोष्टी तरी स्पष्ट होतात. ‘फ्रायर’चें प्रवासवृत्त या कामीं थोडेंसें उपयोगी पडतें. या व आणखी कांहीं किरकोळ संदर्भग्रंथांतून जी माहिती मिळते तिचे आधारावर कांहीं महत्त्वाच्या बाबींचे खाली उल्लेख केले आहेत.

**१ धर्मसत्ता दुय्यम**—राजाभिषेक करून घेण्यामध्यें केवळ हिंदुधर्माचें संरक्षण करावें असा मुख्य हेतु होता असा पुष्कळांनीं तर्क केलेला आहे. या उलट राज्याभिषेक करणें ही केवळ उपचाराची बाब होती, व राजकीय सत्ता धर्मवेडाच्या भरांत उभारली गेली नसून, सामाजिक व राष्ट्रीय भावनेच्या पायावर उभारली गेली आहे असा दुसऱ्यांचा तर्क आहे. यांपैकीं दुसरी कल्पना विशेष ग्राह्य दिसते. कारण हिंदू व मुसलमान बराच काळ

दक्षिणेंत एके ठिकाणीं राहिल्यामुळें केवळ धर्मबाबतींत राज्याभिषेकापूर्वी व तदनंतरहि त्यांच्यांत विशेषसा वैरभाव दिसून आला नाहीं. (कै. प्रो. लिमये यांचा निबंध.) शिवाय अष्टप्रधानांपैकीं पंडितराव यांचा धर्माध्यक्षत्वाचा अधिकार राजकीय सत्तेच्या आधीन होता, त्यामुळें धर्मभावनांना वाजवीपेक्षां अधिक महत्त्व मिळण्याचा फारच थोडा संभव होता. तथापि राजाभिषेकाचा धार्मिक विधि पूर्ण हिंदु तऱ्हेचा होता. तो करण्यांत महाराजांचा पुष्कळ वेळ प्रत्यहीं जात असल्यामुळें आपल्या कामाला विलंब लागतो अशी मुंबईकर वकील तक्रार करतात ( ले. १६४३ व १६४५ ). हिंदुधर्माचें संरक्षण करणें व इतर धर्मांशी अविरोध राखणें ही धर्माच्या बाबतींतील वागणूक त्या काळापूर्वीच रूढ झालेली होती. या धोरणाचा उच्छेद होत असल्यास महाराज तो चालू देणार नाहींत अशी ग्वाहीच राज्याभिषेकसमारंभानें दिली असें म्हणण्यास हरकत नाहीं.

**२ राज्याभिषेकास ब्राह्मणांचा विरोध**—महाराजांच्या क्षत्रियत्वाबद्दल एखाद्या पंडितानें वाद उपस्थित केला असल्यास तेवढ्यावरून ब्राह्मणांचा विरोध असल्याचें अनुमान काढणें इतिहासपद्धतीला धरून होणार नाहीं. उलट ब्राह्मणांना किती तरी दानें वगैरे दिलीं म्हणून तक्रार करावयाची असल्यास तसा पुरावा मात्र उपलब्ध आहे. उदाहरणार्थ, ( इति. सं. ले. १६४३ ) "ता. २९ मे रोजीं राजाची तुला केली. वजन १६००० होन झालें. (डच रेकार्डनें वजन १७००० होन झाले व तें १६० पौंडाइतकें झालें असा उल्लेख केला आहे ले. १६८४ ). यांत १ लक्ष होनांची भर घालून राज्याभिषेकानिमित्त गोळा होणाऱ्या ब्राह्मणांना याची खैरात वाटावयाची आहे." सर्व आवश्यक धार्मिक–विधि झाल्यानंतर ५ जून रोजीं मुद्दाम आणविलेल्या गंगाजलानें स्नान करून शिवाजीनें प्रत्येक ब्राह्मणाला १०० होन दक्षिणा दिली. मुख्याला ५०० होन व २०० होनांचें वर्षासन दिलें." ब्राह्मणभोजनें कित्येकांचे मतें दोन महिनेपर्यंत चाललीं होतीं. पण हें खरें दिसत नाहीं. कारण राज्याभिषेकाच्या १२ व्या दिवशीं राजमाता जिजाबाई दिवंगत झाल्या व त्यानंतर जेवणाचे समारंभ चालू असणें शक्य नाहीं. ब्राह्मणांची संख्या १००० पासून ५००० पर्यंत कोणीकोणी आपापल्या अजमासाप्रमाणें वेगळी वेगळी दिली आहे. अतिशयोक्तीनें पछाडल्यामुळें हा आंकडा कदाचित् बेसुमार फुगला असेल. तात्पर्य,

इतकेंच कीं, कांहीं थोड्या ब्राह्मणसमाजाचा विरोध कोठें डोकावला असल्यास गागाभट्टांच्या विद्वत्तेमुळें व वजनामुळें तो केव्हांच नाहींसा झाला असावा हा तर्क बरा दिसतो. देवतादिकांना राज्याभिषेकानिमित्त अनेक देणग्या दिल्या; त्यांत प्रतापगडच्या देवीकरितां केलेलें नवें छत्र सव्वा मण सोन्याचें होतें असें इंग्रजी वकिलानें म्हटलें आहे.

**( ३ ) अष्टप्रधान व राज्याभिषेक**—आठहि प्रधान राज्याभिषेका-नंतर दरबाराचे वेळीं सिंहासनाच्या आठ खांबाशेजारीं उभे होते. त्यांनीं आपले नजराणे प्रथम दिले असे उल्लेख सांपडतात. “ ता. ६ जून रोजीं पहांटेस ५ वाजतां त्यानें मुद्दाम बनविलेल्या सिंहासनावर आरोहण केलें. त्यानंतर मुख्य प्रधान मोरो पंडित यांनीं मुजरा करून ८००० होनांनीं शिवाजीराजांना स्नान घातलें. मुख्य हिशेबनीस निळो पंडित यानें ७००० होन अर्पण केले; दोन सरकारकुनांनीं प्रत्येकीं ५००० होन आणून त्याप्रमाणेंच शिवाजीला स्नान करविलें. राहिलेल्या प्रधानांनींहि मुजरे केले आणि ते सिंहासनाच्या उभय बाजूंना रांगा करून उभे राहिले.” ( ले. १६८४ ) प्रधानांचा क्रम येथें दिसतो तो लक्ष्यांत ठेवण्यासारखा आहे. फायरनें मुख्य पेशवा, संभाजीजवळ सिंहासनाच्या पायरीवर बसला होता, असें वर्णन केलें आहे. राजाभिषेकाच्या समारंभामध्येंहि अष्टप्रधानांची घटना प्रामुख्यानें दिसून येते.

**( ४ ) इंग्रज वकिलांचे नजराणे**—फॅक्टरी रेकार्डमध्यें इंग्रजांच्या वकिलांनीं शिवाजीच्या राज्यारोहणानिमित्त काय देणग्या दिल्या याचा तप-शील सांपडतो. इतर वकिलांनींहि अनेक तऱ्हेचे मानमरातब या वेळीं केले असतील यांत शंका नाहीं. पण त्यांचा इतिहास अद्याप मिळाला नाहीं. महाराजांना काय पाहिजे इकडे इंग्रज वकिलांचे मात्र आरंभापासून लक्ष होतें. ता. ४ एप्रिल १६७४ चे पत्रांत “ यापुढें तुम्ही शिद्दीला कोणत्याहि प्रकारें जवळ केल्यास शिवाजीशीं जमणार नाहीं. आतां ऑक्सिन्डन-बरोबर नजराणा देऊन त्याला लगेच पाठवावें. निराजी पंडिताचे सांगण्या-वरून तुम्ही, शिवाजीच्या नजराण्यांत अरबी घोडा न पाठवितां मूल्यवान् रत्नें राज्यारोहणाच्या वेळीं धारण करण्यासाठीं पाठवावीं; हें बरें दिसतें. नजराणा चांगला १०००।१२०० रुपयांचा पाठवा. ” ( सा. सं. ले. १६२५ ) इत्यादि सूचना रायगडास असलेला वकील मुंबईकरांस करीत

आहे. अद्याप तह कायम व्हावयाचा होता. म्हणून नजराण्याचा खर्च कां करावा अशी शंका प्रदर्शित केल्यामुळें उत्तरादाखल "या वेळीं हा तह झाला नसता तरी राज्याभिषेकाचे वेळीं नजराणा पाठवावा लागलाच असता, आणि तसा पाठविण्यानें कंपनीला पुष्कळ फायदा होणार आहे" इत्यादि उल्लेख सा. सं. ले. १६२६ मध्यें आलेला आहे. असो. नजराणा करावा आणि तो चांगला करावा इतकें ठरल्यानंतर ऑक्झिन्डन, रॉबिन्सन् व टॉमस हे तिघे समारंभाला गेले; व खालील वस्तु नजर केल्या.

| | | |
|---|---|---|
| शिवाजीराजाला—१ | हिरेजडित शिरपेंच, | किंमत रु. ६९० |
| २ | हिरेजडित सलकडीं | किंमत रु. ४५० |
| ३ | मोती | किंमत रु. ५१० |
| | | रु. १६५० |

संभाजीला रु. ३७५ ची, मोरो पंडित यांस रु. ४०० ची, याप्रमाणें आणखी नजर केली व एकंदर नजराण्याच्या वस्तूंचा खर्च रु. २६९० पर्यंत झाला ( ले. १६४० ). शेवटीं "नजर करावयाची खुर्ची आम्ही भेटीला जाण्याच्या वेळेपूर्वी सुमोर अर्धा तास, म्हणजे अगदीं वेळेवर पोचली." असा ले. १६४९ मध्यें उल्लेख आहे. यावरून किरकोळ खर्चासह नजराण्याच्या खर्चाची रक्कम रु. ३००० चे वर गेली असावी असा अजमास करण्यास हरकत नाहीं. साध्या भेटीचा नजराणा रु. ७४० पर्यंतचा असावा ( ले. १७७४ ) असें दिसतें.

( ५ ) **दरबार, शोभा वगैरे**—रायगडला उत्सवाकरितां जाणारांना तेथील दरबार—मंडप, दिल्लीदरवाजा, व सिंहासनाची जागा पाहून २५० वर्षांपूर्वी तेथें भरलेल्या दरबार-समारंभाची कल्पना स्पष्टपणें करतां येईल. येथे जातां जातां इतकेंच सांगतां येईल कीं, इतिहासाच्या शिक्षणाकरितां म्हणून हा किल्ला पाहणें अत्यंत आवश्यक आहे. पूर्वीच्या इमारतींची रचना कशा तऱ्हेची होती हें त्यांचे राहिलेले भाग पाहून समजेल. दिल्लीदरवाजा पुण्यांतील शनिवारवाड्याच्या उत्तरेकडील दरवाजासारखा उभट मुसलमानी कमानीचा आहे. दरबार—मंडपाची मांडणीहि दिवाण-इ-खासच्या मांडणीप्रमाणें असावी असा तर्क आहे. तेथल्याप्रमाणेंच दरवाजाच्या समोर दुसऱ्या बाजूला मधोमध उंच जाग्यावर सिंहासन बांधलेलें आहे. देवीच्या मंडपांत दरबार भरविण्याची पद्धत पुढें पडली असावी. तथापि मंडपाच्या एका

बाजूला ( throne-room) सिंहासनाचें स्थान वेगळें असो, मंडपाच्या भोंवतालच्या ओऱ्या अद्याप दिसतात. तसेच दुसरे वाडे, बाजारपेठ यांचे अवशेष व कांहीं देवळें वगैरे पाहून त्या वेळची शिल्पकला समजण्यासारखी आहे. रायगड निसर्गतःच दुर्भेद्य असून ज्या कित्येक लहान जागी मूळचे कडे नाहींत, तेथें " २४ फूट उंचीचा तट बांधला आहे. ४० फुटांवर लगेच दुसरी भिंत बांधून हा किल्ला इतका दुर्भेद्य बनविला आहे कीं, अन्नाचा भरपूर पुरवठा झाल्यास हा किल्ला अगदीं अल्प शिबंदीच्या साहाय्यानें सर्व जगाविरुद्ध लढूं शकेल. पाण्याकरितां मोठे तलाव असून ते पावसाळ्यांत भरल्यावर पाणी पुरून उरेल इतकें होतें " ( ले. १५३६ ).

किल्यासंबंधीं ही हकीकत दिल्यावर इंग्रजांचे वकील म्हणतात. " शिवाजीचें आमच्याकडे लक्ष जातांच त्यानें अगदीं सिंहासनाच्या पायरीजवळ येण्याचा आम्हांला हुकूम केला व पोशाख देऊन आम्हांला तत्काळ रजा दिली. थोडा वेळ आम्ही सिंहासनासमोर होतों. तेवढ्या वेळांत सिंहासनाच्या दोन्ही बाजूंला सुवर्णांकित भाल्याच्या टोंकावर ( मुसलमानी पद्धतीचीं ) अनेक अधिकारदर्शक व राजसत्तेचीं चिन्हें असल्याचें आम्हीं पाहिलें. उजव्या हाताला २ मोठीं, मोठ्या दांतांच्या मत्स्यांचीं सुवर्णाचीं, शिरें होतीं. डाव्या हाताला अनेक चवऱ्या होत्या व एका मूल्यावान् भाल्याच्या टोंकावर समपातळींत लोंबणारीं सोन्याच्या तराजूचीं पारडीं, न्यायचिन्ह म्हणून, तळपत होतीं. राजवाड्याच्या दाराशीं आम्ही परत आलों तों दोन लहान हत्ती दरवाजाच्या दोन्ही बाजूंला उभे केले असून दोन सुंदर पांढरे घोडे शृंगारून आणलेले दिसले. गडाचा मार्ग इतका बिकट होता हें लक्षांत घेतां हे पशु कोठून वर आले असावे याचा आम्हांला तर्कच करवेना. " ही हकीकत प्रत्यक्ष पाहणारांनीं लिहिलेली आहे.

( ६ ) **दुसरा राज्याभिषेक**—राज्याभिषेक पुन्हां एकदा करावा लागला. त्याची हकीकत भा. इ. सं. मं. त्रैमासिक वर्ष १० अंक १ यांत दिली आहे. हा दुसरा राज्याभिषेक म्हणण्यापेक्षां त्याला एक शांतीचा समारंभ म्हटल्यास बरें दिसेल. कांहीं अशुभ गोष्टी झाल्यामुळें हा नवा समारंभ न करणें लोकविरुद्ध दिसलें असतें म्हणूनच तो उरकून घेतला असावा. महाराजांची एक बायको समारंभापूर्वींच वारली. मातुश्री जिजाबाईसाहेब समारंभानंतर ११ व्या दिवशीं दिवंगत झाल्या. प्रतापरावहि यापूर्वीं वारले.

या गोष्टी होण्याचें कारण कांहीं मंत्रविधि करण्यांत व स्थानदेवतांचे पूजनांत दोष राहिले असे निश्चलपुरी नांवाच्या या गागाभट्टाच्या विरोधी पक्षांतील एका पंडितानें ध्वनित केलें, त्यामुळें पुनः एकदां "तांत्रिक पद्धतीनें" आश्विन शु॥ ५ चे दिवशीं दुसरा राज्याभिषेक केला. या विषयावर जें काव्य उपलब्ध झालें आहे त्यानें एका गोष्टीचा मात्र फार चांगला निकाल लाविला आहे. शिवाजीनें राज्यभिषेकाचे प्रसंगीं दोन नवीन लग्नें केलीं असें विधान कित्येकांनीं केलें आहे. तें चुकीचें आहे. "एवं धृतव्रतो राजा योषिद्भिस्ताभिरेव हि । विवाहितो नराणां तु पश्यतां परमोत्सवः" या श्लोकावरून वेदमन्त्राप्रमाणें पुनः फक्त समारंभ केला असा होतो. त्याचप्रमाणें राज्याभिषेक वेदमन्त्राप्रमाणेंच झाला हेंहि येथें स्पष्टपणें नमूद केलेलें आहे.

**( ७ ) महाराजांचें निशाण व झेंडाः**—इंग्रज वकील शिवाजीमहाराजांचें निशाण पांढरें होतें असें म्हणतात. तथापि हें निशाण एखाद्या सरदाराचें राजचिन्ह असेल व त्याचा रंग जो तो आपल्या आवडीप्रमाणें ठरवीत असेल. झेंडा हा स्वातंत्र्याचा द्योतक असून इतर सत्तांना आव्हान दर्शक जयस्तंभ होय. यावरून भगवा झेंडा हा महाराजांनीं प्रथम सुरू केला असावा. भगवा रंग मालोजीच्या निशाणाला होता असा लेख अलिकडे प्रसिद्ध झाला आहे. तथापि या बाबतींत अधिक शोध होणें जरूर आहे, एवढेंच सांगतां येईल. भगवा झेंडा हा रामदासस्वामींच्या शिष्यत्वाची खूण म्हणून घेतला असावा हा तर्क अवास्तव दिसत नाहीं. महाराज व स्वामीं यांची भेट अगदीं आरंभापासून होत असावी व दोघांनीं एकमेकांना प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष साहाय्य केलें असलें पाहिजे हें कै. हरीभाऊ लिमये यांचें मत अधिक ग्राह्य दिसतें.

**( ८ ) महाराजांचें चित्र**—मनूची हा युरोपियन प्रवासी महाराजांना भेटला होता. तो म्हणतो "राजा जयसिंगाचे तंबूंत आपण पत्याचा डाव खेळत असतांना शिवाजीमहाराज आले. पुरंदरच्या तहाच्या वाटाघाटी या वेळीं सुरू होत्या. जयसिंगानें महाराजांना दक्षिणचे सुभेदार करूं व सुखरूप परत पोंचवूं असें वचन दिल्यावरच महाराज आग्र्याकडे जाण्यास तयार झाले." जयसिंगाच्या गोड बोलण्यानें महाराज फसले वगैरे वर्णन मनूचीनें दिलें आहे. ( Vol II पान १३६।१३७ ) शिवाजीमहाराजांचें हल्लींचें चित्र प्रथम त्यानें आपल्या पुस्तकांत युरोपांत प्रसिद्ध केलें.

मनूचीनें तें येथें एका मूळ चित्रावरून काढून घेतलें व स्वत: महाराजांना पाहिलें असल्यामुळें त्याला हें काम चांगलें करतां आलें याबद्दल सर्व महाराष्ट्राला कृतज्ञता वाटेल यांत शंका नाहीं.

**४ परिणाम**—शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक व तद्विषयक कांहीं गोष्टी यांची हकीकत येथवर दिली आहे. समारंभाचा एकंदर खर्च एक कोटी ४२ हजार होन झाला असें सभासदानें म्हटलें आहे. 'शिवराज' या नवीन संज्ञेनें लोक महाराजांना आतां ओळखूं लागले. ' छत्रपति ' या पदवीनें बादशाहीच्या बरोबरीची नवी सत्ता निर्माण झाली हें जगजाहीर झालें. मराठी साम्राज्याच्या पुढल्या वैभवाचा खरा आरंभ राज्याभिषेकामुळें द्विगुणित झालेल्या मराठ्यांच्या उत्साहभरापासून झाला यांत शंका नाहीं. कोकणांत सिद्दी व पोर्तुगीज यांच्या सत्तेला वचक बसला. इंग्रज तहानुसार व्यापार करूं लागले व महाराजांना तोफा वगैरे सामान पुरवूं लागलें. विजापूरकरांना चांगला आधार सांपडला व गोवळकोंडेकरानीं महाराजांना भेटण्यास बोलावून त्यांचें अप्रतिम स्वागत केलें व खंडणी देऊन मोगलापासून संरक्षण मागितलें. मोंगलसेनांची धावपळ सुरू झाली व मोगल व मराठे यांच्या महायुद्धाची तयारी सुरू झाली. हिंदुस्थानच्या इतिहासाच्या मुख्य मुख्य घडामोडी दक्षिणेंत होऊं लागल्या व राजकारणांत उत्तरेपेक्षां दक्षिणदेशाला अधिक महत्त्व चढूं लागलें.

नवीन राजशक पाळण्याइतक्या महत्त्वाचा हा अभिषेक प्रसंग होता याविषयीं आतां कोणी शंका काढीत नाहीं. किंबहुना याच प्रसंगामुळें हिंदुस्थानच्या एकंदर इतिहासांत जी क्रांति झाली तिचे परिणाम आजच्या कालापर्यंत पोंचत आहेत हेंहि आतां सर्वमान्य झालें आहे. महाराष्ट्राची पुढील भरभराट व त्याचें राजकीय वैभव, त्यानंतरच्या काळांत महाराष्ट्रानें स्वातंत्र्याकरितां दाखविलेली चिकाटी व अगदीं अलीकडे राष्ट्रीयत्वाचीं कामें करण्यांत महाराष्ट्रानें घेतलेला पुढाकार या सर्वांचें बीज राजशकानें आरंभ केलेल्या नवीन चळवळींत सांपडेल. नवी धडाडी, नवी शिस्त, व नवें चैतन्य त्या वेळीं मिळालें त्यांची परंपरा थोड्याफार अंशानें महाराष्ट्रांत अद्याप निवसत आहे आणि महाराष्ट्राचे उपकारक या नात्यानें महाराजांची पुण्यस्मृति अद्याप स्फूर्तिदायक होत असल्यास त्यांत आश्चर्य वाटण्यासारखें कांहींच नाहीं.

परंतु क्वचित् याच्या उलटहि एक मत इतिहासकार केव्हां केव्हां प्रतिपादित असतात. हें मत मांडतांना ते महाराजांविषयीं अनादर दाखवीत नाहींत. महाराजांचा पराक्रम व त्यांची महाराष्ट्रविषयींची कामगिरी कौतुकास्पद आहे ही गोष्ट ते आनंदानें मान्य करतात. परंतु दक्षिणेचा जो कांहीं फायदा झाला असेल त्याच्या किती तरी पट अधिक, एकंदर हिंदुस्थानचा, तोटा या नव्या राजकारणानें झाला आणि म्हणून शिवाजी महाराज झालेच नसते तर अधिक बरें झालें असतें असा किंचित् खेदाचा व पश्चात्तापाचा हा विचार आहे. त्यांच्यामतें ' हिंदुस्थानचा एकछत्री अंमल मोगल घराण्यामध्यें चांगला स्थैर्यानें राहिलेला होता. हिंदु व मुसलमान यांच्या मिलाफानें एक नवीन भारतीय संस्कृति निर्माण झाली होती व मोगल बादशहांच्या अमलाखालीं शांतता, भरभराट व प्रगति साधून बादशाही सत्तेचा बोज सर्व हिंदुस्थानच्या ऐक्याला फार उपयोगी पडण्यासारखा होता. परकी सत्तेला तोंड देण्याला बादशाही सत्ता पूर्वीप्रमाणें एकवटलेली व एकमुखी दिसली असती तर पुढलें परचक्र टळलें असतें. ( बॉंबे कॉनिकल कॉंग्रेस अंक १९२८ ). या ऐक्याचा, या इभ्रतीचा महाराजांनीं घात केला व प्रजेला व्यामोहांत टाकून दिलें. एका सत्तेच्या मार्गे सर्व लोकांच्या समुदायानें जाणें हें जाऊन अनेक लहान राजे, त्यांच्या विस्किळत सत्ता व प्रजाजनांचे लहान लहान समुदाय ही नवी परस्पर विरोधाची, क्वचित् अराजकतेची स्थिति मराठ्यांच्या राजकारणानें सुरू झाली. या बेकीनें हिंदुस्थानच्या राजकीय ऐक्याची घडी मोडली व विकलांग होऊन भारतासारखा संपन्न देश सहज परकीयांच्या हातांत पडला. सकृद्दर्शनीं या कल्पनेंत बराच सत्यांश आहे असें वाटतें, परंतु थोडा अधिक विचार केल्यास असें आढळून येईल कीं मोगल बादशाही सत्तेचें राजकीय ऐक्य हें इतकें बद्धमूल किंवा स्थाइक केव्हांच नव्हतें. मोंगल अंमलाचे दोष दाखविण्याचें हें स्थल नाहीं. परंतु औरंगजेबाच्या धोरणानें होणाऱ्या क्रांतीच्यापूर्वींच बादशाही सत्तेला उतार लागला होता, ही गोष्ट इतिहासप्रसिद्ध आहे; इतकेंच सांगितलें म्हणजे पुरें आहे. महाराजांना मोगलांचें अंकित राहून सुद्धां पुष्कळ कार्यभाग करता येण्याचें दिवस राहिलें नव्हते. इतिहासाचा प्रवाह असाच कांहीं नव्या वळणानें चालला व रायगडला जी अभिषेकाची परिस्थिति प्राप्त झाली, तिच्यापासून परावृत्त होणें शक्यच नव्हतें. स्वतःचा, दक्षिणेच्या लोकांचा व

एकंदर हिंदुस्थानचा त्यांतच तरणोपाय होता असा तत्कालीन समाजाचा समज होता व म्हणूनच त्यांनीं मराठी अंमलाला आपली उघड संमति दिली. हिंदी सत्ता फुटकळ स्वरूपांत जी आज बरीच शिल्लक आहे त्याचें श्रेय महाराजांच्या नव्या चळवळीला दिलें पाहिजे व या दृष्टीनें पाहतां महाराजांच्या अभिषेकाचा काल हा राष्ट्राच्या भाग्योदयाचा काल होय हें कबूल केल्यावांचून गत्यंतर नाहीं.

---

## पुरवणी.

**फोंड्यावर हल्लाः**—राज्याभिषेकाचा समारंभ झाल्याचें ऐकून आदिलशाही अधिकाऱ्यांचा जळफळाट होणें स्वाभाविक होतें, व ते कुरापतहि काढण्याच्या विचारांस लागले. हें पाहून महाराजांनीं आणाजीपंतास फोंड्यावर हल्ला करण्यास पाठविलें. त्यांत त्यास प्रथम यश आलें नाहीं; व किल्लेदारानें सावध होऊन सुभेदाराची मदत मागविली. तेव्हां मराठ्यांचें सैन्य कोल्हापूरबेळगांव मार्गानें कुडाळडा गेलें व जलमार्गानें ४० गलबतें वेंगुर्ल्याकडे रवाना झालीं. नंतर २हजार घोडदळ व ७००० पायदळ फोंड्याकडे जाऊन एप्रीलमध्यें वेढ्यास सुरुवात झाली. किल्लेदार महमदखान याच्याजवळ चार महिन्यांपेक्षां अधिक रसद शिल्लक नव्हती आणि विजापूर अगर गोवे येथून मदत मिळण्याचीहि आशा नव्हती. तरीहि खानानें कांहीं वेळ किल्ला लढविला. पोर्तुगीजांनीं मध्यंतरीं किल्ल्यांत रसद पोंचविल्याचा संशय आला तेव्हां मराठ्यांनीं त्यांना धमकी दिली ( ले० १७११ ); व एवढ्यावर तें काम निभलें. रुस्तुमजमा फोंड्याच्या मदतीसाठीं निघाला अशी बातमी आली ( ले० १७४३ ). तथापि मराठ्यांनीं वेढ्याचें काम नेटानें चालूंच ठेविलें. त्यांनीं दोन माऱ्याच्या जागा ताब्यांत घेऊन खंदक भरून काढला; आणि जो तटावर शिडीच्या सहायानें चढून जाईल त्या प्रत्येकाला अर्धा शेर सोन्याचें कडें बक्षीस द्यावयाचें असें ठरवून ५०० तोडे करविले. शेवटीं १७ एप्रिल ( वैशाख २ ) रोजीं सुरुंग उडविण्यांत आला, व मराठ्यांचें निशाण किल्ल्यावर फडकूं लागलें. बहलोलखान मदतीसाठीं मिरजेपर्यंत आला होता. परंतु मराठ्यांनीं वाटा अडविल्यामुळें त्याला पुढें येतां आलें नाहीं. इतक्यांत फोंडा मराठ्यांनीं घेतल्याची बातमी आल्यामुळें तो विजापुरास परत गेला; व पुढें त्यानें मराठ्यांशीं तह केला ( ले० १७५८ ).

---

# प्रकरण १५ वें

## दक्षिण दिग्विजय.

शिवाजीच्या सर्व मोहिमांत विशेष यशस्वी व कीर्ति वाढविणारी अशी मोहीम म्हटली तर ती शेवटची कर्नाटकची स्वारी होय. महाराजांनीं राज्याभिषेक करवून घेऊन छत्रपतिपद मिळविलें. परंतु त्या पदाची मान्यता याच कर्नाटकाच्या राजकारणामुळें जगाला जाहीरपणें पटविण्याचें कार्य, हिंदुस्थानांतील तीन प्रमुख पातशहांतील, एकाला आपण होऊन पत्करावें लागलें. सतत पंधरावीस वर्षें झुंजूनहि मोंगल व आदिलशहा यांना कायमचा पायबंद, निदान जिंकलेल्या मुलुखांत तरी, देणें व मिळविलेलें राज्य कायमचें टिकविणें हें ( मोगली सैन्याला उत्तर हिंदुस्थानांतून व विजापुरी सैन्याला दक्षिणेंतून मुबलक पैसा व लोकांची भरती मिळत राहिल्यामुळें ) अशक्य झालें होतें. उत्तर हिंदुस्थानांतील मदत, औरंगझेब काबुलकंदाहारच्या लढाईंत गुंतल्यानें, सध्यां कांहींशी कमी झाली होती. व शिवाजीला मोंगलाविरुद्ध लढून त्यांचा बराच मुलूख आक्रमितां आला. पण विजापुरकरांची तशी स्थिति नव्हती. विजापुरकरांनीं दक्षिणेंतील सर्व बारिकसारिक राज्यें उलथींपालथीं केल्यानें त्यांना दक्षिण कर्नाटकांत त्यांचें सर्व लक्ष वेधील असा शत्रुच राहिला नव्हता. उलट त्यांना वाटेल तसा पैसा उकळणें बरेंच सोपें जात होतें. विजापुरकरांना कायमचा पायबंद द्यावयाचा तर त्यांना कर्नाटकांत प्रबळ शत्रु उत्पन्न करणें व अशा तऱ्हेनें आघाडीवरून मराठ्यांचे हल्ले व पिछाडीवरून कर्नाटकांकडील हल्ले झाल्यास विजापुरकरांचा कोंडमारा होऊन आदिलशाहीच्या समाप्तीला फारसा विलंब लागणार नाहीं ही गोष्ट स्पष्ट दिसत होती. आदिलशहाचे कर्नाटकांतील सरदार आदिलशहाविरुद्ध सारखी बंडाळी करीतच होते. परंतु ते एकछत्राखालीं जमण्यास तयार नव्हते. या सर्वांना एकाच अंमलाखालीं आणून आदिलशाही प्रथम उलथून पाडावयाची व सांप्रत मराठ्यांना जें वरून मोंगल व खालून आदिलशहा यांच्या माऱ्यांत दोन्हींकडे अवधान ठेवून राजकारण साधावें लागत होतें ती अडचण दूर करण्यासाठीं खालून मारा करणाऱ्या

शत्रूला कायमचें लंगडें करून टाकून नंतर उत्तर हिंदुस्थानांतून येणाऱ्या मोगलांची खालीं उतरण्याची वाटच बंद करावयाची हें या मोहिमेंतील राजकारण होतें व तें कसें यशस्वी झालें हें विजापुरकरांच्या चळवळीचा या पुढील व पूर्वींचा इतिहास ताडून पाहिल्यास तेव्हांच स्पष्ट होतें.

हें राजकारण पुष्कळ दिवसांपासून शिजत होतें. मुख्यत: हें राजकारण निराजी रावजी, प्रल्हाद निराजी व शामजी नाईक पुंडे यांनींच मादण्णा-अकण्णांच्या साहाय्यानें सिद्ध केलें. रघुनाथपंताचा याच्याशीं मुळींच संबंध दिसत नाहीं. रघुनाथपंताची असलें राजकारण शिजवण्याइतकी पात्रता, त्याच्या इतर वागणुकीवरून, मुळींच सिद्ध होत नाहीं. बखरींच्या भरमसाट विधानांखेरीज त्यास आधार नाहीं. धन्याचा पडता काळ पाहून त्याच्या-विरुद्ध उठणें हा त्याचा स्वभाव दिसतो. संभाजीविरुद्धहि उठून त्यानें कर्नाटकाचा हिशेब देण्याचें नाकारलें. परंतु त्या जबरदस्तानें त्याला कर्ना-टकांतच कैद करून ठेवलें होतें. नंतर मनधरणी करून व सर्व झडती दिल्यावार त्याला मजमु दिली, परंतु कारभार दिला नाहीं. सारांश, अस्सल कागदपत्रांत रघुनाथपंताच्या या मोठ्या कामगिरीचा म्हणजे राजकारण तयार केल्याचा उल्लेख येत नाहीं. इतरांचा येतो. यावरून रघुनाथपंतानीं हें राज-कारण शिजविलें नाहीं यांत शंका नाहीं. जर मादण्णांचा व त्यांचा स्नेह असता तर एकोजींचें राज्य कुतुबशाही छत्राखालीं यापूर्वींच नेऊन ठेवलें असतें. उलट एकोजी व त्याची सर्व कारकून मंडळी शिवाजीवर प्रत्यक्ष हल्ले चढवीत होती हें विसरून चालणार नाहीं.

" शिवाजी मोठें सैन्य घेऊन इ. स. १६७६ च्या (सप्तेंबर) अखेरीस कर्नाटकाच्या स्वारीवर निघाला होता. बार्सिलोर, होनावर इत्यादि किनाऱ्या-च्या लगतचा प्रांत घेण्याचा त्याचा बेत ( रायगडास ) जाहीर झाला होता. "[१] परंतु " तो किनाऱ्याकडे खालीं न जातां घाटापलीकडे बाला-घाटांत गेला. बंकापुरनजीक बेळगांव आणि तेथून पांच दिवसांच्या अंतरा-वर अलिकडे असलेला वायेम रायिम (?) अशा दोन किल्ल्यांना त्यानें ( ६ आक्टोबर १६७६ पूर्वी ) वेढे घातले. विजापूर प्रांतांत खूप उपद्रव दिला. "[२] परंतु या कर्नाटकाच्या स्वारीच्या मूळ उद्देशांत व स्वारीच्या

१ मुं. ते सुरत २-१०-१६७६, आर्म व्हॉ. ११४५ पृ. ६१.
२ मुं. ते सुरत ६-१०-१६७६, आर्म व्हॉ. ११४-५ पृ. ६३.

हालचालींत नंतर बराच बदल झाला. विजापूरच्या उमरावांत आपापसांत भांडणें लागल्यानें मोगली बहादरखान स्वारी करण्याच्या तयारींत होता.[3] म्हणून "गोवळकोंडेकरांच्या मदतीनें शिवाजीचा आदिलशाहाशीं तह झाला. शिवाजीकडे कोल्हापूर पलीकडील कृष्णातीरापर्यंतचा कांहीं मुलूख राहावा आणि त्यानें तीस लक्ष रुपये पेशकस व दरसाल एक लक्ष होनांची खंडणी द्यावी अशीं कलमें ठरलीं."[4] परंतु जुलै महिन्यांत हा मोगलांविरुद्ध या तीघांनीं केलेला तह एकदोन महिन्यांतच बहलोलखानानें मोडला. शिवाजीनें व गोवळकोंडेकरांनीं मोगलाविरुद्ध बहलोलला प्रत्यक्ष मदत केली होती. परंतु बहलोलनेंच, आपली कोणत्याहि तऱ्हेची हलाखी झाली नसतां, बहादुरखानाकडे नजरनजराणे देऊन आपल्यास मदत करणारांविरुद्ध बोलणें लावलें.[5] यामुळें ते दोघे रागावले व शिवाजीनें अर्थातच विजापुरी मुलखावर सप्तेंबरांत स्वारी केली. तेव्हां मोगल व बहलोल एक झाल्यास गोवळकोंडेकर पेचांत येतील यासाठीं बहलोलच्या विश्वासघाताचें पारिपत्य करण्याची मसलत नोव्हेंबर १६७६ नंतर सुरू झाली व शिवाजी-नेंच मध्यंतरीं मोगलांशीं तह करून टाकला. बहादुरखानाचा बहलोलनें पराभव केल्यामुळें खानाला त्याच्याशीं तह करणें कठीण होतें. उलट बह-लोलनें केलेल्या पाडावानंतर शिवाजीशीं तह करणें बहादुरखानाला सोपें पडत होतें. शिवाजीनें मोगलांशीं तह करून विजापुरावर हत्यार उचललें. हंबीरराव यास गदग प्रांतांत रवाना केलें. "हुसेनखान मायणा यासि व राजश्री हंबीरराव यासी गदग प्रांतें यालगदगजवळ पाडाव केला. हुसेन-खान धरिला. दोन हजार घोडे व हाती पाडाव जाले. येथेंच नागोजी बिन सर्जाराव जेधे यास हुसनखानानें हतीवरून तीर मारून ठार केलें."[7] ही जानेवारीच्या सुरुवातीची हकीकत झाली. या वेळीं बहलोलच्या विरुद्ध

३ वें. ह. ३१-५-७३ डाग रजिस्टार पृ. ११०.

४ रा. ते सु. २४-७-१६७६.

५ डच रे. भा. ३४ नं ८४४—२८-११-१६७६.

६ सु. ते मुं. ५-१२-७६ फे. रे. सु. भा. ८९ पृ. ९०-९१
मुं. ते सु. ५-१२-७६ ऑर्म ११४५ पृ. ७४

७ जे. श. ८ जे. श.

गोवळकोंडेकरांशीं चाललेली शिवाजीची मसलत सिद्ध झाली व शिवाजी फेब्रुवारींत कर्नाटकच्या स्वारीवर निघाला. शिवाजीच्या कर्नाटकच्या स्वारीचा रोख, क्षेत्र व हेतु हे सर्वच बदलले.

शिवाजीनें मालोजी घोरपडे यांस १६७७ च्या मार्च महिन्याचे सुरवातीस पत्र लिहिलें आहे त्यावरून कर्नाटकच्या मोहिमेचा हेतु अगदीं स्पष्ट होत आहे. तो लिहितो कीं " हालीं आदिलशाही बहलोलखान पठाणांनीं घेतली. पादशहा लहान लेकरूं. नांव मात्र. ते आपले कैदेंत ठेविले आहेत आणि तख्त व छत्र विजापूरचा कोट पठाणानें कबज केला आहे. कांहीं गुबारून मिळाला नाहीं. ऐशियास दक्षिणचे पादशाहीस पठाण जाला हे गोष्टी बरी नव्हे. पठाण बळावला म्हणजे एका उपरी एक कुली दक्षिणियांचीं घरें बुडवील. कोणास तगों देणार नाहीं. यैसें आम्हीं समजोन हजरत कुतुबशाहा पादशहा यांशीं पहिलेपासून रुजुवात राखिली होती. त्यावरून सांप्रत हजरत कुतुबशाहांनीं मेहेरबानी करून ' हुजूर भेटीस येणें ' म्हणून दस्तखत मुबारक व दस्त-पंजियानसी फर्मान सादर केला. त्यावरून आम्ही येऊन हजरत कुतुबशाहाची भेटी घेतली. भेटीचे समई पादशाही आदब आहे कीं शिरभोई धरावी, तसलीम करावी. परंतु आम्ही आपणावरी छत्र धरिलें असे, ही गोष्ट कुतुबशाहास मान्य होऊन शिरभोई धरणें व तसलीम करणें हें माफ केलें. पादशहा तिकडून आले; आम्ही इकडून गेलों. पादशहांनीं बहुतच इज्जती होऊन, गळ्यास गळा लावून भेटले. आम्हांस हातीं धरून नेऊन जवळीं बैसविलें. कितीएक मेहेरबानी जाहीर केली. आम्हींही जैसी रुजुवात करून ये तैसी केली. आणि कुतुबशाहाचा व आपला घरीं बरेपणा करून घेतला. याउपरि राजकारणाविषयीं हजरत कुतुबशाहांनीं महादण्णापंतास व आम्हांस एकचित्त करून ऐसा तह केला कीं जो काय उभयवर्गीं तह व्हावा तो आपण कबूल करावाच. ऐसा कुल मनसबा व मदार आम्हांवरी टाकिला आहे, कीं ' आपली पातशाही जितकी वाढवूं ये तितकी वाढविणें. पठाणाची नेस्तनाबूद करणें. दक्षणेची पादशाही आम्हां दक्षणियांच्या हातीं राहे तें करावें ' म्हणून. त्यास हा मनसुबा ये प्रसंगीं आमचे हाता आलिया उपरि आम्हीं हाच विचार केला कीं, जे कांहीं आपले जातीचे मराठे लोक आहेती ते आपल्या कटांत घेऊन कुतुबशाहासी त्यांची रुजुवात करावी. दोलत देवावी, त्यांचे हातें पादशाही काम

घेऊन बादशहाची दराज करावी. आणि तुम्हां लोकांच्या दौलताहि चालेत, घरें राहेत, तें करावें........ऐशियास तुम्हीं कदाचित् ऐसा विचार कराल कीं आदिलशाहीचे आपण दो पिढींचे वजीर आणि आतां विजापुराकडून कुतुबशाहींत राजे याचें बोलें कसे जावे? तरी जे समयीं खवासखान धरिला विजापूरचा कोट पठाणें घेतला, विजापुरचा पादशहा धाकटा आहे त्याला कैदेंत ठेविलें, तेच समई पादशाही बुडाली. विजापूर पठाणाचे हातास गेलें. आतां आदिलशाही कैची! आणि उगीच तुम्ही तेथें आपली आदिलशाही आहे म्हणोन गुंतून राहिले आहां. जरी पठाणाचीच चाकरी करून राहों म्हणाल, तरी पठाण कांहीं तुम्हास थोर दौलत देणार नाहीं. आणि पठाणास तरी हजरती कुतुबशाहा व आम्ही तमाम दखणी मिळोन चालोन घेऊन बुडवितच आहों. तुम्हीं मराठे लोक आपले आहां. तुमचे गोमटें व्हावें म्हणून पष्टच तुम्हांस लिहिलें असे." यावरून स्वारीचा उद्देश स्पष्टच होत आहे.

"शिवाजी बारा हजार स्वार घेऊन वेंगुर्ल्याकडील घाटाच्या बाजूकडून गेल्या मार्चांत गोवळकोंड्याच्या राज्यांत येऊन दाखल झाला; तो ४ मार्च रोजीं सुलतानाच्या भेटीस गेला. त्यावेळीं त्याचा चांगला सत्कार झाला."[१०] "सुलतानाची त्याची भेटी झाली तेव्हां राजे लोकांच्या वहिवाटीप्रमाणें त्यानें स्वतंत्र दरवाजानें प्रवेश केला. भेटीच्या प्रसंगीं त्याच्याकरितां विशेष आसन तयार केलें होतें."[११] "शिवाजीजवळ १२ हजार पायदळ व २४ हजार घोडदळ होतें. कुतुबशाहाची भेटी घेऊन तो पादशहाचे आणखी सैन्य बरोबर घेऊन मार्चांतच चंजीकडे स्वार होऊन निघाले." त्यावेळीं त्यांचेजवळ २० हजार घोडेस्वार व ४० हजार पायदळ होते. त्याच्या सैन्याच्या आघाडीचे सुमारें ५ हजार घोडेस्वार मद्रासपासून ८–९ कोसांवरील निपाणी व कलत्रीवरून गेले. नंतर ते चार कोसांवरील कांजिवरमला ९ मे रात्रीं येतील असा अंदाज होता. परंतु तें सैन्य २॥ कोसां-

---

९ सरस्वतीमंदीर-इ. मं. पृ. ९७.

१० जे. श. डा. र. पृ. ३११३–२२-१--१६७७.

११. १६७६–डचाचा फॅ. ऑ. मा. २६८ पृ. १–११.

१६७७–जून १९ सें. जॉ. दे कं. ऑ. क. भा. २७ नं ४२६६.

वरील पेडापोलम येथें १ मेलावर येऊन थोडा वेळ राहिलें"[१२] ते तेथें १४मे पर्यंत मद्रासच्या जवळ २–३ कोसांच्या अंतरावर तळ देऊन राहिलें.[१३]

तेथून शिवाजीनें वेलूरला ता. २५ मे पूर्वींच जाऊन वेढा घातला होता.[१४] "शिवाजी गोवळकोंड्याच्या सुलतानाच्या म्हणजे मादण्णाच्या बोलावण्यावरून कर्नाटकांत आला. गोवळकोंड्याच्या मुलखांत त्याचा इतका अंमल चालत होता कीं, राजाला मिळावयाचा कर तो सर्व आपल्या लोकांकडून वसूल करी. आणि राजाचे हवालदार व इतर मोठे अधिकारी होते त्यांना आपल्या मनाप्रमाणें शासन करी.[१५] जिंजी, वेलूर, यमनगोंडा आणि पोर्टोनोवोच्या कर्नाटकाचा भाग विजापुरकरांच्या ताब्यांतून घेण्यासाठीं त्यांनीं शिवाजीला सेनापतिपद दिल्यामुळें एका अर्थानें त्यांना ह्या प्रांताचें स्वामित्व दिल्यासारखें झालें होतें. गोवळकोंड्याचा सरलष्कर मिर्झा महमद अमीन एक हजार घोडदळ व ४ हजार पायदळ घेऊन प्रथम शिवाजीबरोबरच होता. पुढें वेलूरचा वेढा चालू झाला. शेरखानहि त्रिवादीला ठाणें देऊन बसला होता. त्यामुळें त्याला दक्षिणेंतील नायकांवर चालून जातां आलें नाहीं.[१६] शिवाजीनें आपला तळ त्रिवादीजवळ दिला. ता. २६ जूनला रात्रीं शेरखान त्रिवादीहून तेवनापट्टणकडे पळून जाऊं लागला. पळून जाण्याच्या त्याच्या बेताची खबर कळून, तो पळून जात असतां, शिवाजीकडील कांहीं घोडेस्वार त्याच्या पाठलागावर निघाले. वाटेंत अकलनायकाचें अरण्य होतें. त्यांत शेरखान व त्याच्या पाठोपाठ मराठेहि शिरले. शेरखानाचे ५०० स्वारांनीं खडे राहून शिवाजीच्या लोकांना तोंड दिलें. रात्रीं दोन तास चांगलें युद्ध झालें. पुढें चंद्र मावळत चालला होता.[१६] तोंच शेरखान कांहीं घोडे, हत्ती वगैरे घेऊन त्या अरण्यांतून दक्षिणेकडे गेला. शिवाजीच्या लोकांनीं आणखी पाठलाग केला. त्यांनीं पहिल्या झगड्यांत शेरखानाचे २७० घोडे, २० उंटें, कित्येक बैल, तंबू, नगारे वगैरे पकडले.व शिवाजीचे दहा हत्ती पाडाव झाले. शेर-

१२ मे. जॉ. कन्स. ९-५-१६७७ फॅ. रे. १ पृ. ७.
१३ से. जॉ. कन्स. १४-५-१६७७-फे. रे. पृ. ७
१४ शि. ते लॅ. २५-५-१६७७. फॅ. रे. १७ पृ. १२.
१५ से. जॉ. कन्स. १९-६-१६७७ फॅ. रे १ पृ. १०.
१६ से. जॉ. ते कं. १९-६-१६७७ ओ. ३७- नं. ४२६१.

खानाच्या पाठीवर गेलेले लोक ता. २७ ला परत आले.त्यांनींहि शेरखानाचे २०० घोडे व २ हत्ती पकडून आणले. एकूण शेरखानाचे ५०० घोडे त्यांनीं धरले. शेरखान फक्त १०० स्वार घेऊन बोनागिरीवर पळाला. त्याचेमागें शिवाजीचे स्वार पाठलाग करीत गेले. शेरखानाचा सासरा त्रिवादी झुंझवीत राहिला. व शिवाजी खासा तेवनापट्टणच्या दक्षिणेस एका कोसांवर छावणी करून राहिला होता.[१७] " शिवाजीचें सैन्य शेरखानाचा पाठलाग करीत करीत पुनामलीवरून बोनागिरीपट्टमला गेलें. व तेथून शिवाजी तिरुमडवाड्यास जाऊन तळ देऊन राहिला. येथेंच ता. १६ जुलैच्या सुमारास मदुरेच्या नायकाकडून हेजीब आला होता. त्याच्याजवळ शिवाजीनें एक कोटी रुपये खर्चाकरितां मागितले. परंतु त्यानें, मदुरेच्या नायकास परत राज्य मिळवून दिलें तर ७लक्ष रुपये देतों, असें शिवाजीकडे कबूल केलें. [१८]

" शिवाजीनें प्रथम जिंजीस १५ हजार पायदळ व १६ हजार घोडेस्वार घेऊन वेढा दिला तेव्हां विजापुरी किल्लेदार नासीर महंमदखान यानें ७—८ हजार सैन्यानिशीं तो किल्ला लढविला. तथापि शेवटीं त्यानें तो व आसपासचा मुलुखहि घेतला. "

शिवाजीचा मुक्काम कावेरीतीरास आल्यानंतर शिवाजीनें एकोजीस पत्रें लिहिलीं कीं, "भले लोक आम्हांपाशीं पाठविणें." त्यावरून एकोजीनें कांहीं भले लोक शिवाजीकडे पाठवून दिल्हे. त्या भले लोकांसी "बहुता रीती घरोबियाचा वेव्हार बोलोन अर्धा वांटा बऱ्या बोलें द्या म्हणोन शिवाजीनें सांगोन पाठविलें. त्यांबराबरी शिवाजीतर्फेनें भले लोक जाऊन एकोजीजवळी जाऊन बहुतां रीती बोलले कीं, गृहकलह करूं नये. शिवाजी आपला अर्धा वांटा मागतात तो द्यावा ऐसे बोलिले. एकोजीनें कपटबुद्धि ऐसी मनी धरिली कीं, या समयांत बहुत थोर राजे जाले. खासां भेटीस येऊन हलभल नरमी बहुत दाखवावी, आणि शिवाजीचा वांटा बुडवावा ऐसी बुद्धि धरून वाटियाच्या निवाडियाचा तह न करितां एकोजी खासाच शिवाजीच्या भेटीस आला. "

शिवाजीचा मुक्काम तिरुमलवाड्यास असतांना म्हणजे जुलैच्या दुसऱ्या

---

१७ वद्यापाचे श्री. छा. चें वृत्त. २७-६-१६७७ फे. रे. २७ पृ. १६.जे.श.
१८ ने. र. ते लॅ. १६/७-१६७७ फॅ. रे. २७ पृ. १७-१८.
प्र. र. ड्डु. १६७७ पृ. २३४-१६-७-१६८०.

पंधरवड्यांत " एकोजी २००० स्वार घेऊन भेटण्याकरितां आला. शिवाजी तेरुपतोरा गांवापर्यंत त्याला सामोरा गेला. मुक्कामावर आल्यानंतर भेटी झाल्या. त्या उपरी, शिवाजीची एकोजीजवळ तक्रार अशी होती कीं, " आम्ही बहुता रीती तुम्हांसी बोलिलों कीं, आमचा अर्धा वांटा द्या. परंतु तुम्ही वांटा द्यावा हा विचार मनीं धराच ना. मग जरूर जाले कीं, तुम्ही धाकटे भाऊ, आपण होऊन आमचे भेटीस आलेस आणि तुम्हांला धरावें आणि वांटा मागावा, हे गोष्टी थोरपणाचे इज्जतीमध्यें ल्याख नव्हे. या निमित्य तुम्हांला चंजाउरास जावयाचा निरोप दिधला. तुम्ही चंजाउरास गेलेसी. याउपरी गृहकलह वाढऊं नये. वाढलियानें उभयपक्षी कष्टी होईजेत. यैसे जाणून शामजी नाईक व कोनेरीपंत व शिवाजी शंकर या हातीं मागते बहुता रीती सांगोन पाठविलें कीं, तुम्ही व आम्ही वांटे करून घेऊन परस्परें समाधानें राहूं. परंतु तुम्ही संधी न कराच. युद्ध करावें यैसेंच मनीं धरलें."[१९] शिवाजीनें लगेच जनार्दनपंत, शिवाजीपंत, कोनेरपंत व निळोजी नायक नांवांचा एक व्यापारी एवढ्यांना कैद केलें. नंतर मुक्काम वलिगुंडपुरम्ला गेला. तेथें रघुनाथपंत ४००० घोडेस्वार घेऊन आले. त्यांना सामोरे जाऊन शिवाजीनें त्यांचा सन्मान केला. त्यांना दोन दिवस राहवून घेऊन नंतर मदुरेच्या नायकाबरोबर तह करण्यास रवाना केलें. त्यांनीं ६ लक्ष होनांचा करार करून शिवाजीनें आपलें सैन्य परत घ्यावें असें ठरवून आले.[२१]" नंतर शिवाजीचा मुक्काम २७ जुलै ला " वलिगुंडपुराहून तुंदमगुर्तीला " (तोरगलाला) आला. तेथें अशी खबर आली कीं, एकोजी तुरुक लोकांच्या बुद्धीस लागून शिवाजीशीं झगडा करावा असे मनीं धरून आपली सारी जमेत एकवट करून पाठवीत आहे. ते वालगोडपुरास आले[१९]" "हें ऐकतांच शिवाजीनें जनार्दनपंताला सैन्य देऊन पाठविलें. व संतोजी नाईक व इतर मोठे लोक बरोबर घेऊन शिवाजी हिरुदाचलला देवदर्शनास गेला."
" इकडे शिवाजीच्या सैन्याचा व एकोजीच्या सैन्याचा थोर झगडा जाला. एकोजीचे लोक पराजय पावले. प्रतापजी राजे व भिवजी राजे व

---

१९ शि. ते. ए. मे. १६७८-इ. स. तं. प. ३६.

२० (अ) ने. रा. ते. लॅ. २७-७-१६७७ फॅ. रे. २७ पृ. १८--१९.
जे. शा. ब. डाग र. पृ. ३११३-२२-९-१६७७.

शिवाजी दबीर असे तिघे धरले व कितियेक लोक मारिले. कितियेक पळाले दाणादाण होऊन गेले.[१९] " नंतर "जनार्दनपंतानें येलवनसरला वेढा दिला. ता. २ आगष्टला येलाबनसोर किल्ला शिवाजीच्या हातीं पडला. जनार्दनपंतानें करार ठरवून किल्ल्यांतील लोकांना किल्ला सोडून जाण्यास भाग पाडलें. जनार्दनपंत, शिवाजीपंत व निळोजी नाईक हे शिवाजीबरोबरच राहिले.[२१] " शिवाजीनें आगष्ट महिनाअखेर जिंजी, तंजावर पिलकुंडा आदिकरून मजबूत किल्ले घेऊन आदिलशाही मुसलमानांचा मोठा पराजय केला. श्रीरंगपट्टणाहून त्यानें मोठी लूट नेली.[२२] "शेरखानाला स्थानभ्रष्ट केल्याबद्दल आणि कावेरीच्या अलिकडील एकोजीचा सर्व उषंडा प्रांत, जगदेवगड, चिंदंबर व ब्रह्माचल हा प्रांत कुल घेतला आणि कोल्हारास वेढा घातला. वेल्लूर व अर्णी या दोन्ही किल्ल्यांचे वेढे चालूच होते. ते पडण्यास दीर्घकालच लोटावा लागेल असा अंदाज होता. एकोजीनें मदुरा नायक, म्हैसूरनायक व रानटी लोक यांच्या साहाय्यानें शिवाजीच्या विरुद्ध लढण्याची खटपट चालविली होती.[२३] शेरखान लोदी मात्र आदियालैर नांवाच्या किल्ल्यांत दडून राहिला.[२४] मुसलमान लोकांना शिवाजीची बरीच दहशत बसली होती. तो येत आहे असें कळतांच ते बिनबोभाट किल्ला सोडून जात.[२५] कर्नाटकांत शिवाजीची एकसारखी प्रगतीच होत राहून सर्व ठिकाणीं तो किल्ले व तट बांधीत होता. एवढा मोठा गाजावाजा होऊनहि शेवटीं त्याचा भाऊ एकोजी, मदुरेचा नायक वगैरे राजे लोक आणि खुद्द विजापूरकर यांची त्याच्यापुढें मात्रा न चालल्यामुळें आतां त्याला विरोध करण्याची गोष्टच कोणी बोलत नाहींसें झालें.[२६] आक्टोबरच्या सुरुवातीस शिवाजीनें रघुनाथ नारायण यांचेकडे चंदीचा सुभा व लाख होन बक्षिस दिल्हे

---

२१ ने. रा. ते × लँ. २-८-१६७७ फे. रे. २७ पृ. २०.

२२ मुं. ते सु. २४--३८--१६७७ भॉ. ११४--६ पृ. ४७
मुं. ते क. ३१—१०—१६७७ ऑ. ३८ नं ४९८७

२३ से. जॉ. ते मुं. २४--८--१६७७ फॅ. रे. १० पृ. ४२

२४ का. वखार उतार पृ. ३११३ २२- ९ -१६७७.

२५ सु. ते कं. ३१--१०--१६७७ ऑ. ३८ व ४२८७.

२६ डाग रजिस्टर—३०-१०-१६७७ पृ. ३८६-७
डाग राजि. ३९५-९६—८-११-१६७७,

पंधरवड्यांत " एकोजी २००० स्वार घेऊन भेटण्याकरितां आला. शिवाजी तेरुपतोरा गांवापर्यंत त्याला सामोरा गेला. मुक्कामावर आल्यानंतर भेटी झाल्या. त्या उपरी, शिवाजीची एकोजीजवळ तक्रार अशी होती कीं, " आम्ही बहुता रीती तुम्हांसी बोलिलों कीं, आमचा अर्धा वांटा द्या. परंतु तुम्ही वांटा द्यावा हा विचार मनीं धराच ना. मग जरूर जाले कीं, तुम्ही धाकटे भाऊ, आपण होऊन आमचे भेटीस आलेस आणि तुम्हांला धरावें आणि वांटा मागावा, हे गोष्टी थोरपणाचे इज्जतीमध्यें ल्याख नव्हे. या निमित्य तुम्हांला चंजाउरास जावयाचा निरोप दिधला. तुम्ही चंजाउरास गेलेसी. याउपरी गृहकलह वाढऊं नये. वाढलियानें उभयपक्षी कष्टी होईजेत. यैसे जाणून शामजी नाईक व कोनेरीपंत व शिवाजी शंकर या हातीं मागते बहुता रीती सांगोन पाठविलें कीं, तुम्ही व आम्ही वांटे करून घेऊन परस्परें समाधानें राहूं. परंतु तुम्ही संधी न कराच. युद्ध करावें यैसेंच मनीं धरलें."[१९] शिवाजीनें लगेच जनार्दनपंत, शिवाजीपंत, कोनेरपंत व निळोजी नायक नांवांचा एक व्यापारी एवढ्यांना कैद केलें. नंतर मुक्काम वलिगुंडपुरमला गेला. तेथें रघुनाथपंत ४००० घोडेस्वार घेऊन आले. त्यांना सामोरे जाऊन शिवाजीनें त्यांचा सन्मान केला. त्यांना दोन दिवस राहवून घेऊन नंतर मदुरेच्या नायकाबरोबर तह करण्यास रवाना केलें. त्यांनीं ६ लक्ष होनांचा करार करून शिवाजीनें आपलें सैन्य परत घ्यावें असें ठरवून आले.[२१]" नंतर शिवाजीचा मुक्काम २७ जुलै ला " वलिगुंडपुराहून तुंदमगुर्तीला " (तोरगलाला) आला. तेथें अशी खबर आली कीं, एकोजी तुरुक लोकांच्या बुद्धीस लागून शिवाजीशीं झगडा करावा असे मनीं धरून आपली सारी जमेत एकवट करून पाठवीत आहे. ते वालगोडपुरास आले[१९] " " हें ऐकतांच शिवाजीनें जनार्दनपंताला सैन्य देऊन पाठविलें. व संतोजी नाईक व इतर मोठे लोक बरोबर घेऊन शिवाजी हिरुदाचलला देवदर्शनास गेला. " " इकडे शिवाजीच्या सैन्याचा व एकोजीच्या सैन्याचा थोर झगडा जाला. एकोजीचे लोक पराजय पावले. प्रतापजी राजे व भिवजी राजे व

१९ शि. ते. ए. मे. १६७८–इ. स. तं. प. ३६.

२० (अ) ने. रा. ते. लँ. २७–७–१६७७ फॅ. रे. २७ पृ. १८–१९.

जे. श. व. डाग र. पृ. ३११३·२२–९–१६७७.

शिवाजी दबीर असे तिघे धरले व कितियेक लोक मारिले. कितियेक पळाले दाणादाण होऊन गेले.[१९] ” नंतर “ जनार्दनपंतानें येलवनसरला वेढा दिला. ता. २ आगष्टला येलाबनसोर किल्ला शिवाजीच्या हातीं पडला. जनार्दनपंतानें करार ठरवून किल्ल्यांतील लोकांना किल्ला सोडून जाण्यास भाग पाडलें. जनार्दनपंत, शिवाजीपंत व निळोजी नाईक हे शिवाजीबरोबरच राहिले.[२१] ” शिवाजीनें आगष्ट महिनाअखेर जिंजी, तंजावर पिलकुंडा आदिकरून मजबूत किल्ले घेऊन आदिलशाही मुसलमानांचा मोठा पराजय केला. श्रीरंगपट्टणाहून त्यानें मोठी लूट नेली.[२२] “ शेरखानाला स्थानभ्रष्ट केल्याबद्दल आणि कावेरीच्या अलिकडील एकोजीचा सर्व उघडा प्रांत, जगदेवगड, चिदंबर व ब्रह्माचल हा प्रांत कुल घेतला आणि कोल्हारास वेढा घातला. वेलूर व अर्णी या दोन्ही किल्ल्यांचे वेढे चालूच होते. ते पडण्यास दीर्घकालच लोटावा लागेल असा अंदाज होता. एकोजीनें मदुरा नायक, म्हैसूरनायक व रानटी लोक यांच्या साहाय्यानें शिवाजीच्या विरुद्ध लढण्याची खटपट चालविली होती.[२३] शेरखान लोदी मात्र आदियालैर नांवाच्या किल्ल्यांत दडून राहिला.[२४] मुसलमान लोकांना शिवाजीची बरीच दहशत बसली होती. तो येत आहे असें कळतांच ते बिनबोभाट किल्ला सोडून जात.[२५] कर्नाटकांत शिवाजीची एकसारखी प्रगतीच होत राहून सर्व ठिकाणीं तो किल्ले व तट बांधीत होता. एवढा मोठा गाजावाजा होऊनहि शेवटीं त्याचा भाऊ एकोजी, मदुरेचा नायक वगैरे राजे लोक आणि खुद्द विजापूरकर यांची त्याच्यापुढें मात्रा न चालल्यामुळें आतां त्याला विरोध करण्याची गोष्टच कोणी बोलत नाहींसें झालें.[२६] आक्टोबरच्या सुरुवातीस शिवाजीनें रघुनाथ नारायण यांचेकडे चंदीचा सुभा व लाख होन बक्षिस दिल्हे

---

२१ ने. गा. ते × लँ. २-८-१६७७ फे. रे. २७ पृ. २०.

२२ मुं. ते सु. २४--३८--१६७७ मॉ. ११४--६ पृ. ४७
मुं. ते क. ३१--१०--१६७७ ऑ. ३८ नं ४९८७

२३ से. जॉ. ते मुं. २४--८--१६७७ फॅ. रे. १० पृ. ४२

२४ का. बखार उतार पृ. ३११३ २२-९-१६७७.

२५ सु. ते कं. ३१--१०--१६७७ ऑ. ३८ व ४२८७.

२६ डाग रजिस्टर—३०-१०-१६७७ पृ. ३८६-७
डाग राजि. ३९५-९६—८-११-१६७७.

व जनार्दनपंतास घेऊन सैन्यें परत फिरलीं. त्यांनीं आक्टोबरच्या २–३च्या आठवड्यांत ४००० घोडेस्वार घेऊन येऊन बंकापूरला वेढा घातला व गदग लक्ष्मेश्वर लुटलें. नंतर बेलवाडीस वेढा घातला.[२७] परंतु बाकीचें सैन्य हंबीररावांच्या स्वाधीन होतें, तें कर्नाटकांतच ठेविलें. आपलें हरवलेलें राज्य परत मिळवावें म्हणून एकोजी आणि त्याचे साथीदार तयारी करीतच होते. जिंजीकडील मुलुखांत ठेवलेला शिवाजीचा सेनापति व भाऊ संतोजी याचें ६००० स्वार व ६००० पायदळ एवढें सैन्य नोव्हेंबराचे सुरवातीस कांहीं दिवस तंजावरच्या एकोजीशीं ( ४ हजार स्वार व १० हजार पायदळ ) लढण्यांत गुंतलें होतें. सकाळपासून संध्याकाळपर्यंत युद्ध अहिरीपाशीं झालें. त्यांत संतोजीचा पराजय झाला व पाव कोसपर्यंत त्याचा शत्रूनें पाठलाग केल्यामुळें तो पाऊण कोसपर्यंत मागें हटला. छावणींत पोहोंचल्यावर ह्या पराजयाचे दूरवर परिणाम आणि आपली होणारी बदनामी याचा आपल्या बरोबरच्या सरदारांशीं विचार करून त्यांनीं लगेच पोषाख व खोगिरें चढविलीं. निराळ्या वाटांनीं जाऊन, शत्रूचे लोक त्या दिवसाच्या परिश्रमामुळें विश्रांति घेत बेसावधपणें पडलें असतां भर मध्यरात्रीं जाऊन त्यांनीं त्यांची भयंकर कत्तल केली. त्या छाप्यांत त्यांनीं १००० घोडे, ३ मुख्य सेनापति व सर्व तंबू वगैरे सामान मिळविलें. पेंढाऱ्यांनीं त्याशिवाय आणखी ५०० घोडे व किरकोळ लूट नेली, बाकीचे एकोजीचे लोक कावेरीपलीकडे तंजावराला पळाले.[२८] "शिवाजीनें एकोजीस सांगून पाठविलें होतें कीं पुढें तरी हट्ट न धरणें. याउपरी कितेक आमचे आम्हीं घेतले असे. अरणी, बेंगळूर, कोल्हार, होसकोट, सिरलकटे व किरकोळ जागे व चंजाऊर यैसे जे जागे तुमचे हातीं उरले आहेती ते आमचे लोकांचे हातीं देणें. आणि नकद पैके व जडाव व हाती व घोडे यांचा आरधा वांटा देणें. यैसा विचार करून आम्हांसी संधी करणें. तुम्ही यैसा संधी निर्मलपणें केलिया आम्ही आपणापासोन तुम्हाला तुंगभद्रेपलाड पनालेप्रांते तिन्ही लक्ष होनांची दौलत देऊन अथवा आम्हाजवळील दौलत तुम्हाला मानेना तरी कुतुबशहास अर्ज करून

२७ बे. श. मुं. ते सु. २९-१०-१६७७ फे. रे. सु. १०७ पृ. २७. से. जॉ. ते सु. २०-२९-११-१६७७– फ. रे. सु. २३-२४

२८ से. जॉ. ते सु. २०।२९-११-१६७७ फे. रे. १०७ पृ. २३-२४ से. जॉ. ते मुं. 1–१२-१६७७ फे. रे. १८ पृ. ७०-७१.

त्यापासून तुम्हाला ३ लक्षांची दौलत देववूं. या दोन्हीमधील येक मनी धरून मान्य करणें. हटाचे हाती न देणें. आपल्यांत आपण गृहकलह करावा आणि कस्टी व्हावें याचें कांहीं प्रयोजन नाहीं. याउपरी आमचा आपला संधी व्हावा येसी बुधी मनीं धरून वांटियाचा वेव्हार निर्गमून टाकणें. आणि सुखें आसणें. गृहकलह बरा नव्हे. आम्ही तरी वडीलपणें आजीवरी तुम्हांला सांगितलें. आतांही सांगतों. ऐकाल तरी बरें. तुम्हीच सुख पावाल. नायकाल तरी तुम्हीच कस्टी व्हाल."[२९] परंतु एकोजीनें ऐकलें नाहीं;तेव्हां हंबीररावानें त्याचा पाठलाग केला. एकोजीचीं एकंदर ३०००घोडीं व तीन हत्ती पाडाव केले व शेवटीं हंबीरराव त्रिवादीस बसून त्याला नामोहरम करूं लागला. तेव्हां एकोजीनें कोल्हारकोट हंबीररावास दिला व सल्ला केला.[२९] सल्ल्यांत एकोजीला कांहीं मुलुख परत दिला व त्यानें ३ लाख होन खंडणी ताबडतोब द्यावी असें ठरून एकोजीचें भांडण मिटलें.[३०] इकडे गदग प्रांतांत शिवाजीनें बेलवाडीस वेढा घातला होता तो ३-४ महिनें चालू राहिला. इ. स. १६७८ च्या फेब्रवारीच्या सुरुवातीस या किल्याचा वेढा चालूच होता. "शिवाजीच्या लोकांच्या सांगण्यावरून असें दिसतें कीं मोंगल किंवा दक्षिणी यांच्या हातून कधींहि झाला नाहीं असा मानहानिकारक पराजय त्याचा या ठिकाणीं झाला. ज्यानें आजपर्यंत इतकीं अनेक राज्यें जिंकून घेतलीं तो एका देसाई स्त्रीचें पारिपत्य करूं शकला नाहीं."[३१] बेलवाडीचा वेढा चालूं असतांच शिवाजी मे महिन्यांत रायगडीं परत आला. त्यानंतर हंबीररावानें कर्नाटकांत स्वारी चालू ठेवली होती. तारीख २२ जुलैला बेलूरचा किल्ला शिवाजीच्या हातीं आला. रघुनाथपंत व आनंदराव याणीं तो घेतला.[३२]

शिवाजीनें नासरखानापासून चंदीचा किल्ला अगदीं थोडक्याच वेळांत घेतल्यानें शिवाजीच्या सैन्याची तेथील लोकांना बरीच दहशत बसली होती. तो सर्वत्र यशस्वीच होत गेला. जणूं काय जगज्जेता म्हणून प्रसिद्धि व्हावी

---

२९ जे. श.

३० सें. जॉ. ते सू. २७ मे १६७८ फे. रे. १०७ पृ. ६०.

३१ रा. ते सु. २८-२-१६७८ फे. रे. सु. १०७ पृ. ६०

३२ जे. श.; ३२ जे. श.

याच महत्त्वाकांक्षेनें ["]ढला असें त्यावेळीं वाटूं लागलें होतें. जे इंग्रज पूर्वी शिवाजी चोरून हल्ले करितो लूटफाट करतो, परंतु समरांगणांतून पाठ दाखवून पळतो म्हणून १४–१५ वर्षांपूर्वी म्हणत असत तेच इंग्रज त्याला, या स्वारीची हकीकत सांगतांना "स्पेनमध्यें सीझर ज्याप्रमाणें आला, त्यानें पाहिलें आणि जिंकलें" तद्वत कर्नाटकांत शिवाजीचा पराक्रम झाल्याचें लिहूं लागले.[33] किल्ल्यावरील हल्ले चढविण्याच्या बाबतींतहि अलेक्झांडर धि ग्रेट इतकाच त्याचा हातखंडा असल्याचें सांगूं लागले. शिवाजी दुसरा सेर्टो-रिअस किंवा युद्ध कौशल्यामुळें प्रति हॉनिबॉलच असल्याचें प्रसिद्धपणें युरो-पिअन लोक बोलत असत.[33] सारांश, शिवाजीची कीर्ति या मोहिमेंत बरीच वाढली यांत शंका नाहीं.

शिवाजीनें जो मुलूख आक्रमिला त्याचा त्यानें पूर्णपणें बंदोबस्त केला. जे त्याला मिळाले त्यांनाच त्यानें तेथील अधिकार देऊन ठेविले. विशेषतः शहाजीचीं माणसें त्याला या कर्नाटकच्या स्वारींत बरीच उपयोगी पडलीं. संताजी भोसले, रघुनाथपंत वगैरे :माणसांनीं तिकडे आयुष्यच्याआयुष्य घालविलें असल्यानें तेथील लोकांना त्यांचेबद्दल आपलेपणा वाटला व सर्व कारभार सुरळीत चालू लागला. इतकेंच नव्हे तर शिवाजीनें कलासंपन्न व कारागीर माणसें मुद्दाम बरोबर घेतलीं होतीं. शिवाजीनें ॲबॉर्नला जे २२ सप्टें-बर १६७७ ला एक पत्र लिहिलें आहे त्यावरून शिवाजीच्या मोहिमेंतील व्यवस्थेचा बोध होतो. तो लिहितो कीं, "मीं कर्नाटकांत अनेक किल्ले जिंकले. कित्येक किल्ल्यांत मला नवीन बांधकामें करावयाचीं आहेत, मोठ्या तोफांचें गाडे कसे करावे आणि सुरुंग कसे लावावे हें जाणणारीं माणसें तुमच्याकडे असतील तर आम्हांला अशा लोकांची, विशेषतः सुरुंग लावून दगडी भिंती उडविणाऱ्या, कसबी लोकांची जरूरी आहे. गोव्याहून व वेंगुर्ल्याहून आलेले सर्व लोक कामामध्यें खपून जाऊन जेव्हां त्यांच्याकडे आणखी माणसांबद्दल मीं विचारणा केली तेव्हां ते सर्व चिनापट्टण व कली-कतकडे गेल्याचें त्यांनीं सांगितलें. तेव्हां आपल्या तिकडे चौकरी करून सुमारे २०–२५ किंवा निदान १०–१५ सुरुंगे (किंवा मिळतील तेवढे) पाठवावे. चांगला तनखा देऊन माझ्या अनेक किल्ल्यांवर त्यांना काम

३३ मुं. ते. कं. ४६-४-१६७८ व १४-२-१६७८ ऑ. कॉ. ३८नं. ४३१४

देईन. तसेंच एक जेस्विट इ. स १६७७ त लिहितो कीं, "शिवाजीनें जिंजीचे राज्य घेतल्यावर हिंदुस्थानांतील मुसलमानांचें बळ लक्षांत घेऊन, भविष्यत्कालीं त्यांच्या सर्व एकवटलेल्या सामर्थ्याचाहि प्रतिकार करितां यावा म्हणून त्यानें बंदोबस्त करण्यास सुरुवात केली. मुसलमानांना त्या राज्यांतून शिवाजीनें घालवून लावतांना आपला उद्देश सिद्धीस नेण्याकरितां निसर्गत:च दुर्गम असलेल्या जिंजी किल्ल्याची पुन: त्यानें डागडुजी केली. पहिले तट पाडून नवे तट व बुरुज असे कौशल्यानें बांधलें कीं, तें काम हिंदी लोकांचें नसून युरोपियांचेंच असावें असें वाटतें. कांहीं जुनें निरुपयोगी किल्ले पाडून त्यानें कित्येक नवे भुईकोट व डोंगरी किल्ले बांधले. पाश्चात्त्यांच्या पद्धतींचें अवलंबन करून त्यानें मोठें खडक फोडले, तलाव बांधले आणि युद्धोपयोगी इतर इमारती वगैरे रचना बनविल्या. या कारखान्यांवर त्यानें आपल्या प्रजेकडून जुलूम करून जमविलेली अपार संपत्ति खर्च केली" [३५] राज्याभिषेकासाठीं झालेला खर्च भरून काढण्याकरितां किंवा केवळ लूट मिळविण्याकरितां शिवाजीनें ही कर्नाटकाची मोहीम केली असें मानण्यांत कांहींच अर्थ नाहीं. असें स्पष्ट होत आहे. शिवाजीला आदिलशाही आणि विशेषत: पठाणी मुसलमानांचें प्राबल्य फोडून टाकावयाचें होतें व त्याला पठाणेतर सिद्दी वगैरे मुसलमानांनीं सहाय्यही केलें. कर्नाटकांत एक मोठी राज्यसंस्था स्थापून तिच्यायोगें आदिलशाहीला कायमची पंगू करून ठेवावयाची होती; तो त्याचा हेतु पूर्ण सफल झाला. मिळून कर्नाटकांत शहाजीनें जी मराठी राज्याची स्थापना केली होती व एकोजीनें वृद्धिस नेली होती ती शिवाजीनें इतकी प्रबळ करून ठेविली कीं, कोणतीही मुसलमानी सत्ता तिला सहज मोडूं शकली नाहीं.

या स्वारींतील गोवळकोंडेकर व शिवाजी यांच्यातील संबंधाबद्दल कांहीं लोकांच्या समजुतींत बराच मतभेद झालेला होता. वस्तुत: सर्वच मोहीम गोवळकोंडेकरांच्या संमतीनें झाली होती व त्यांचा व शिवाजीचा या बाबतींत केव्हांच बेबनाव अगर भांडण अथवा एकमेकांतील व्यवहाराबद्दल संशय आलेला दिसत नाहीं. गोंवळकोंडेकरांची या स्वारींत त्याला मदत

---

३४ शि. वे लें. २२–९–१६६७ फॅ. रे. २७ पृ. २१.

३५. हि. मि. जे. ले. पृ. १०-११ इ. स. १६७७.

झाली होती ही गोष्ट खरीच आहे. याचा अर्थ असा नाहीं कीं, शिवाजी गोंवळकोंडेकरांचा हस्तक झाला होता. स्वारी विजापूरकरांच्या हद्दींत चालू होती. खर्चासाठीं वगैरे गोंवळकोंडेकरांच्या हद्दींतील कांहीं मुलखांतला वसूल गोळा करावा असें ठरलेलें दिसतें. प्रत्यक्ष मदत घेण्यापेक्षां वसूल न देणाऱ्यांकडून वसूल घेऊन मदत घेण्यांत भागानगरकाराची कितीतरी सवलत व सोय साधली होती. उलट कर्नाटकच्या स्वारींत दोन्हीहि जोड सैन्यांचें आधिपत्य शिवाजीकडे देण्यांत आल्यानें शिवाजीला गोंवळकोंडेकरांकडून फितुरीमुळें दगा होण्याची भीति राहिली नव्हती. सारांश, एकंदर व्यवस्थेवरून शिवाजीनें पठाणी आदिलशाहींतील मुलुख घ्यावा व तो त्यानें आपल्याकडे ठेवावा व गोवळकोंडेकरांनीं कारोमांडेल किनाऱ्यावरील मुलुख आपल्या राज्याला जोडावा असा सरळ तह होता व तो दोघांनींही शेवटपर्यंत संभाळला. त्यामुळें एकमेकांत वांकडें येण्याचें कारणच राहिलें नव्हतें. शिवाजी कर्नाटकच्या स्वारीवरून रायगडीं परत आल्यानंतरहि गोंवळकोंडेकरांकडून तीन लक्ष होनांची जहागीर एकोजीला देऊं करतो व मोगल—कुतुबशहाचा तह होऊं शकत नाहीं; याचा अर्थ शिवाजी व गोंवळकोंडेकर यांचा एकमेकांशीं चालत असलेला सलोखा व विश्वास या व्यतिरिक्त इतर कांहीं करतांच येणार नाहीं.

शिवाजीच्या या कर्नाटकच्या स्वारीचें इंगित व त्याच्या यशापासून बळावणारें संकट किती भयंकर आहे याची त्यावेळचे शत्रूपक्षाला जाणीव कां नव्हती हाही एक प्रश्न यावेळीं विचार करण्यासारखा आहे. मोगल व शिवाजी, आदिलशाहा आणि कुतुबशाहा यांचे दरम्यान झालेल्या कित्येक तहाला औरंगझेबाकडून मान्यता येण्यापूर्वींच ते मोडले जात व अमान्य झालेले तह मान्यतेस पोहोंचत, असा हा दक्षिणचा मोगली कारभार चालू होता. अर्थात् मोगलांचे सरदार व दक्षिणेतील राजे यांच्यामधील शत्रूमित्रत्वाचे भाव समजून घेतले पाहिजेत. इ. स. १६७५ च्या मध्यापासून याबद्दल ठळक ठळक हालचालींची पहाणी केली तर ' इ. स. १६७५ च्या ऑगष्ट महिन्यांत शिवाजी व आदिलशहा यांचा तह होईलसें '[३६] वाटत होतें परंतु सप्टेंबरांत " नबाब बहलोलला, विजापूरच्या खवासखानें मोगली

---

३६ राजा ते मुं. १७·८-१६७५ फे. रे. मु. ८८ पृ. १००.

बहादरखानाशीं संगनमत करून शिवाजीचा नाश करण्याच्या सल्ल्यासाठीं बोलाविलें "[३७] परंतु " नोव्हेंबरच्या सुमारास मोगली बहादरखान याची औरंगझेबानें खरड काढल्यामुळें उन्हाळ्यांत शिवाजीची खोड मोडण्याचा निश्चय करून, त्यानें विजापुरीं खवासखानाच्या घराण्यांत शरीरसंबंध केला आणि आदिलशहा व शिवाजी यांचा तह अगदीं होण्याच्या बेतांत होता तो मोडण्यास लाविलें."[३८] परंतु लढाई सुरू झाल्यावर नोव्हेंबरांतच " मोगल सैन्य कल्याणजवळ आलें होतें. परंतु मोरोपंतानें त्यांना दहा हजार होन रोख पोहोंचविल्यामुळें तें कांहींही न करितां परत फिरलें."[३९] व शिवाजीचें विजापुराशीं युद्ध चालू राहिलें.[४०] इतक्यांत खवासखानाला बहलोलनें मारलें व आदिलशहाला ताब्यांत घेऊन तो राज्य करूं लागला.'[४१] शिवाजी आजारी पडला.[४२] तीन चार महिने आजारीपण झालें. इ. स. १६७६ च्या मेच्या सुमाराला बहादरखानानें विजापुरांतील गोंधळ पाहून त्याचेवर स्वारी केली."[४३] व " गोवळकोंडेकरांच्या मदतीनें शिवाजीचा विजापुरकरांशीं तह ठरला.[४४]" १ जूनला जोड सैन्यानें बहादुरखानाचा मोड केला.[४५] तेव्हां बहादुरखान बहलोलखानाला जवळ करून शिवाजीशीं लढण्याची तयारी करू लागला[४६] व बहलोलखानानेंहि शिवाजीविरुद्ध बोलणें लाविलें. दिलेलखान मोगली सैन्यास येऊन मिळाला, त्यामुळें विजापुरावर चालू केलेली स्वारी पुढें चालविणें भाग होतें. उलट शिवाजीनें बहलोलच्या विश्वासघातामुळें त्याचाच निकाल करण्याचा विचार करून डिसेंबरच्या सुर-

---

३७ राय. ते मुं. १५ ९-१६७५ फे. रे. १०७ पृ. १३६.

३८ मुं. ते. कं. २६-११-१६७५ ऑ. कॉ. ३६-४१३९.

३९ मुं. ते सु. ४-१२-१६७६ ऑ. ११४-४ पृ. १७१
डां. र. १४-१२-१६७६ पृ. ३४५.

४० जे. श.

४१ जे. श. राजा ते सु. ११-६-१६७६ फे. रे. सु. ८९ पृ. १०.

४२ जे. श. मुं. ते सु. १७-१-१६७६ ऑ. ११४-५ पृ. १२.

४३ सु. ते सें. जॉ. १-५-७६ भा. २८ पृ. ३५.

४४ राजा. ते. सु. २४-७-१६७६ फे. रे. सु. ८९ पृ. ६०-६१.

४५ जे. श.

४६ डच कं. रे. ३४-१८४४ ता. १८-११-१६७६.

वातीसच मोगलाशीं आपल्या देशावर स्वारी होऊं नये म्हणून तह केलें.व खंडणी पाठविली.[४८] हा तह बहादरखानानें घडवून आणला होता. याला बादशहाची संमति मिळाली नव्हती."[४९] इ.स. १६७७च्या मार्चाच्या सुरवातीस कुतुबशाहा व शिवाजी यांनीं आदिलशाहावर स्वारी करण्याचें ठरवून कर्नाटकची स्वारी सिद्ध केली. गोंवळकोंडेकरांचे मादण्णा व इब्राहीमखान विजापुराकडे गेले व शिवाजी कर्नाटकांत उतरला.[५०] बहादरखानहि विजापूरकरांवर स्वारी करीत करीत गुलबर्ग्यास गेला.[५१] जुलैच्या सुरवातीस गुलबर्गा व आगस्टच्या सुरवातीस नळदुर्ग घेतलें.[५२] अर्थातच मोगलांच्या हिताआड येणारें हें राजकारण औरंगजेबास न साहून बहादुरखानास तगीर करून दिलेरखानास औरंगजेबानें सुभा दिला.[५३] तेव्हां बहलोलखानानें दिलेर-खानाशीं तह करून दोघांनीं मिळून कुतुबशाहावर चालून जावें, त्यांचा मोड केल्यावर नंतर सर्वांनी मिळून शिवाजीवर चाल करून जावें. तो पुरा नम्र होईपर्यंत थांबूंच नये अशीं कलमें ठरलीं. शिवाजीनें सुद्धां कर्नाटकी आणि दख्खनी राजां-समवेत कुतुबशाहाशीं एकमत करण्याचा निश्चय केला. परंतु मोगलानीं तह करण्याचें कबूल केल्यास ठीकच, असें[५४] ठरलें. मोंग-लांनीं तहाच्या अटी सांगितल्या परंतु त्या मान्य न झाल्यामुळें त्यांचें युद्ध जुंपलें व सप्टेंबरांत दिलेरखानाचा पराभव होऊन तो नळदुर्गास पळाला. कुतुबशाहानें आणखी कुमक पाठविली व मोठें युद्ध होऊन मोंगल-विजापुरक-रांचें सैन्य पूर्ण मोड पावेल असा अंदाज होता. गोवळकोडेकरांच्या वतीनें

---

४७ सु. ते मुं. २४-१-१६७६ फे. रे. सु. ८९ पृ. ९०-९१.

४८ मुं. ते सु. ५-१२-१६७६ ऑ. ११४-५ पृ. ७४.

४९ मुं. ते सु. २०-१२-१६७६ ओ. ११४-५ पृ. ७८ सु. ते. के. १९-३-१६७७ ऑ. कॉ. ३७ नं. ४२७२.

५० का. डा. र. १-४-१६७७ पृ. ९८-९९.

५१ वीरराघवम्या ते लँ ३-७-१६७७ फॅ. रे. सें. जॉ. २७ पृ. १६.

५२ जे. घ.

५३ जे. घ.

५४ सु. वृ. ३-८-१६७७ ऑ. को. भा. १८ नं. ४२८३ गो. ते कॅ. २१-८-१६७७ फॅ. रे. के. जॉ. २७ पृ. २०-२१.

तहाचेंही बोलणें चालूं होतें. बहादरखानानें लांच घेऊन कुत्बशाहानें थोडेंसें लढावें, नंतर तह घडवून आणूं, असा सल्ला दिला होता.[५५] तेव्हां बहादुरखानाला ताबडतोब उत्तर हिंदुस्थानांत येण्याचा हुकूम दिलॉ.[५६] शिवाजी कर्नाटकचा बंदोबस्त करून आक्टोबरच्या सुरुवातीस तांतडीनें परत निघालॉ. नंतर कुत्बशहा व मोगल–विजापूरकराची लढाई झाली त्यांत प्रथम कुत्बशाहाच्या सैन्याला यश आलें. परंतु नंतर ता० २० आक्टोबरला त्याचा मोड झालॉ. परंतु पुन्हा नोव्हेंबरच्या अखेरीस लढाई झाली. त्या लढाईंत बहलोलला जखमा होऊन तोहि मरण पावला व त्याचें बरेंच सैन्य नाश पावलें व दिलेलाचीहि बिकट स्थिति झाली. बहलोलच्या विरुद्ध असलेला पक्ष जोरांत येऊन त्यानें आदिलशाहा ताब्यांत घेतला व गोवळकोंडेकर, दक्षिणी विजापुरी पक्ष व शिवाजी या त्रिवर्गांनीं मिळून मोगलाविरुद्ध एकजूट करून दिलेलखानाला दख्खनमधून हांकून काढण्याचें फेब्रुवारीच्या सुमारास ठरविलें व त्याप्रमाणें त्यांनीं दिलेलला हाकून काढलें. सारांश, वरील हकीकतीवरून शिवाजीनें पठाणेतर मुसलमान व इतर दक्षिणी यांची एकी राखूनच राजकारण राखलें होतें. यामुळें त्याला ही मोहीम अत्यंत यशस्वी करतां आली व ती मराठी राज्याचा इमला कायम राखण्यास कारण झाली.

**टीप**—वरील हकीकतींत फक्त अस्सल तत्कालीन कागदपत्रांचाच उपयोग केला आहे. बाकीच्यांचा विचार केला नाहीं.

---

५५. जे. श. गो. ते रॉ. जॉ. १९-९-१६७७ भा. २७ पृ. २०-२१.

५६ स्वा. कन्व १।१०।१६७६ फे. रे. सु. ४ पृ. ८५ मु. ते. के. १६।१।१६७८ आ. के. ३८–४३१४.

५७ जे. श.

५८ वी. रा. ते फो. जो. २९।१०।१६७७ फे. रे. २७ पृ. २४–२५.

५९ राजा ते. सु. ८।१२।१६७७ फे. रे. सु. १०७ पृ. ४१.
ग. ते सु. १६।१।१६७८ फे. रे. सु. १०७ पृ. ४७.

६० ग. ते सु. २३।१।१६७८ फे. रे. सु. १०७ पृ. ६९.

६१ मुं. ते कं. ८।२।१६७८ रा. अं. ६५।६६ पृ. ६९.
मुं. ते सु. २१।२।१६७८ फे. रे. सु. १०७–४९.
राजा. ते सु. २८।२।१६७८ फे रे. सु. १० पृ. ६०.

# प्रकरण १६ वें.

## जालनापूरची स्वारी.

१ विजापुरांतील परिस्थिती—अबदुल करीम बहलोलखान हा मरून अदवानी प्रांताचा सुभेदार सिद्दी मसाउदखान हा श. १५९९ मध्यें कुतुबशहाच्या मदतीनें विजापूर येथील सर्वाधिकारी बनला होता. मसाऊदखानाचा हस्तक व्यंकटाद्री व अबदुल करीमखान यांच्या मदतीनें कुतुबशहास दिलेरखानाशीं तह घडवून आणावयाचा होता. सिद्दी मसाऊद हा जरी सर्वाधिकारी झाला होता तरी आदिलशाही दरबारांतील तंटे कांहीं कमी होण्याचें चिन्ह दिसेना. उलट ते वाढावयासच लागले. सिकंदर आदिलशहा हा अगदीं अल्पवयी व प्रधानांच्या हातांतील बाहुलें होता. मसाउदखान हा दक्षिणी पक्षाचा असल्यामुळें पठाण पक्षाचे सरदार शहरांत उघड दंगा करूं लागले होते. व पठाण सैन्यानें तर कहरच उडवून दिला. अशा प्रकारच्या अनेकविध भानगडीमुळें तो अगदीं त्रस्त होऊन गेला होता. इतक्यांत दिलेरखानानें पूर्वीं झालेले स्नेहसंबंधाचे करार मदार मोडून विजापूर जिंकून घेण्याचा उद्योग आरंभिला ( १६०१ श्रावण ). विजापूरच्या उत्तरेस ४० मैलावर धोलखेड येथें श्रावण वद्यांत ( १८ आगस्ट ) भीमा उतरून त्यानें विजापुराविरुद्ध आपल्या मोहिमेस सुरुवात केली. त्याच्या यां हालचालीनें अगदीं भिऊन जाऊन सिद्दी मसाऊदखानानें शिवाजीकडे मदतीची याचना करण्यास हिंदूराव नांवाचा आपला वकील पाठविला. याचनेच्या पत्रांत ‘ पातशाहीची आतां धडगत दिसत नाहीं; आपण पातशाहीचे पुरातन व खानदानीचे मनसबदार आहांत; या वेळीं मदतीस धावून येणें आपलें कर्तव्य आहे,’ इत्यादि मजकूर त्यानें स्पष्टपणें शिवाजीस लिहिला आहे. महाराजांनीं मदत ताबडतोब केली. आपला वकील विसाजी नीळकंठ याच्याबरोबर दिलेल्या पत्रांत ते म्हणतात कीं, ‘आपण किल्ला तेवढा सांभाळावा; गनीमाची कही कावाड मारून काढून गनीम उखळून काढतों.’ जेधे शकावलींत हा आदिलशहाशीं सल्ला १६०१ च्या कार्तिक महिन्यांत झाला अशी नोंद आहे व त्याच महिन्यांत जालनापूर मारलें असाहि उल्लेख

आहे. ( कार्तिक महिना २४ आक्टोबर पासून २३ नोव्हेंबर १६७९ इ. पर्यंत येतो. )

**२ जालनापूरची स्वारीः**—मराठ्यांशीं कुरापत काढून दिलेरखानानें संभाजीस पाठीशीं घातलेंच होतें व तसेंच स्वराज्यांतील भूपाळगड हा किल्ला श. १६०१ च्या वैशाखांतच घेतला होता. त्याचप्रमाणें आतां विजापूरकरांचें सैन्य आपल्या पदरीं ठेवून व विजापूरकरांचा मुलूख लुटून जाळून दिलेरखानानें विजापूरकराविरुद्ध मोहिमेस सुरुवात केली. यावेळीं विजापूरकरावर फारच मोठा कठीण प्रसंग उभा राहिला होता असें म्हटलें पाहिजे; व पुढें दिलेल्या हकीकतीवरून जी विजापूरकरांना मदत मिळाली असें दिसून येईल ती जर न मिळती किंवा कांहीं अंशानें कमी मिळती तर ७।८ वर्षांनीं पुढें जो प्रसंग दक्षिणच्या शाह्यांवर ओढवला तो या वेळींच ओढवला असता. हा दुर्धर प्रसंग ओळखून 'सर्व दक्षिण्यांनीं एकत्र होऊन उत्तरेस तोंड द्यावें' असा विचार करून सिद्दी मसाउदानें मराठ्याप्रमाणेंच गोवळकोंड्यास कुतुबशहाची मदत मागितली असावी. वीर राघवय्या मद्रासच्या डे. गव्हर्नरास पाठविलेल्या पत्रांत ( ले. २२१२ ) असें स्पष्ट म्हणतो कीं, विजापुरकरांनीं कुतुबशहाकडे मदत मागितली. परंतु त्यांनीं ती उघडपणें न देतां दिलेरखानाच्या भितीस्तव शिवाजीकडे गुप्तपणें पैसा पाठविला; व सैन्याची उभारणी करण्यास सांगितलें. त्याप्रमाणें शिवाजीनें विजापूरच्या लोकांस मदत केली. इकडे महाराजांनीं मदत मागितल्याबरोबर आपल्या सैन्याच्या दोन टोळ्या केल्या. त्यांपैकीं एक विजापुरास पाठवून देऊन एका टोळीनिशीं महाराज स्वतः विजापूरच्या पश्चिमेस सेलगूर नांवाच्या गांवीं थांबले. (सेलगूर हें पन्हाळा व विजापूर या दरम्यान मध्यावर आहे.) तेथें त्यांनीं विचार केला कीं, 'गनीम कट्टा; त्याहीमध्यें पठाणजाती, यासी हुन्नरेची युक्ति करून तो खजिल होऊन नामोहरम होय तो हुनर करावा, म्हणून ऐसी तजवीज केली कीं, त्याचे मुलकांत फौजेचा पैसावा करून ओढा लावावा" या विचारें करून तेथूनच ते उत्तरेस मोगलांचे मुलखाकडे वळले. तसेंच विजापूरास अगोदर जी फौज पाठविली होती ती बोलावून घेऊन त्या टोळीसहि मोगलाईंत धुंदी करावयास पाठवून दिलें. ( १६०१ कार्तिक

शुद्ध, ४ नोव्हेंबर १६७९ ). आपण मुसळें आलमेलें या मार्गानें व दुसरी टोळी आनंदराव याच्या आधिपत्याखालीं माण सामोलें या मार्गानें अशा मोगलाईंत स्वाऱ्या काढल्या.

**३ जालनापूरची लूट**—अशा रीतीनें एकदा दौडीस सुरुवात झाली कीं तिचा वेग काय विचारावा ! १०।१२ दिवसांचें आंत जालनापुरास पोहोंचून जालनापूर चार दिवस सावकाश लुटलें. महाराजांच्याच शब्दांत तें असें आहे 'दिलेरखानास ती गांवाचे अंतरें सोडून भीमा नदी उतरून तहत जालनापूरपावेतों मुलूख तख्त ताराज करीत चाललों. जालनापूरास जाऊन चार दिवस मुक्काम करून पेठ मारिली. बहुत मालमत्ता लागली. जालनापुरास, म्हणजे औरंगाबादेहून चार गांवें ते जागां, शहाजादा (मोअज्जम) असतां त्याचा हिसाब न धरितां पेठ लुटली. सोनें, रुपें, हत्ती, घोडे यांखेरीज मत्ता बहुत सांपडली.' जालनापूर लुटल्याच्या तारखा यदुनाथ सरकार अदमासानें १६–१८ नोव्हेंबर देतात त्या बरोबर दिसतात. परत येतांना वाटेंत औरंगाबादेहून शहाजाद्याच्या हुकुमानें रणमस्तखान, असफखान, ज्याबितखान वगैरे सरदार ८।१० हजार सैन्यानिशीं शिवाजीमहाराजास आडवे आले. या ठिकाणीं युद्धाचा शेवट कसा झाला हें सांगणें अवघड आहे. महाराजांच्या जवळ अपार मालमत्तेनें ओथंबलेले उंटे, हत्ती, घोडे वगैरे जनावरें अनेक होतीं. त्यांना सुरक्षितपणानें देशी पोंचविण्याचें अवघड काम यावेळीं करावयाचें होतें; मोगलाच्या सैन्यावर नुसता हल्ला चढवून विजय संपादन करावयाचा येवढेंच काम असतें तर तें सोपें होतें; परंतु हात गुंतून पडल्यामुळें ज्याप्रमाणें कांहीं एक काम करतां येत नाहीं त्याप्रमाणेंच ह्या जड सामानाच्या योगानें अडचण उपस्थित झाली होती. ह्या वेळीं महाराजांच्या उपयोगी बहीरजी जासूद पडला असें सभासद म्हणतो. त्यानें रात्रंदिवस खपून आड डोंगरवाटेनें महाराजांना सुरक्षितपणें पट्टागड येथें आणून पोहोचते केलें. इकडे मोगली सैन्य शिवाजीच्या सैन्याची वाट पाहात बसलें व नंतर फजीत पावून तें निघून गेलें असें बखरकार म्हणतात. महाराजांच्या स्वतःच्या पत्रांत 'रणमस्तखान व आसफखान व जाबितखान असेच आणिक पांच सात उमराऊ आठ दहा हजार स्वारांनिशीं आले. त्यांत शहाबाजीच्या हुनरें जैसी तंबी करून ये तैशी तंबी करून घोडे व हत्ती पाडाव करून पटियास आलों. मागतीं लष्कर मुलुखांत धुंदी करावयास पाठविलें' असे शब्द आहेत

( १६०१ कार्तीक शेवट ). या युद्धांत महाराजांचा पाच हजारी सरदार सिधोजी निंबाळकर हा तोफेच्या गोळ्यानें पडला.

**४ पट्टा येथें विश्रांति**—महाराज पट्टा येथें येऊन पोहोंचतांच सिद्दी मसाउदखानाची किताबती पुन्हां आली असावी असें वाटतें. त्यांत त्यानें महाराजांनीं केलेल्या स्वारीबद्दल पुष्कळ धन्योद्गार दिले असून इतका त्रास पोहोंचला तरी दिलीर येथून उखळत नाहीं तेव्हां स्वतः विजापुरास येऊन, मदत करून, पातशाही राखिली पाहिजे अशा अर्थाचा मजकूर असावा. त्यावरून महाराज पट्टयाहून उठून पन्हाळ्यास आले.

**५ विजापुरास मदत**—पट्टयांत असतांना त्याचें नांव बदलून विश्रामगड असें नवें नांव ठेविलें अशी एक आख्यायिका आहे. विजापुरास जाऊन आदिलशहाची भेट घेण्याचा त्यांचा विचार होता. पण जवळच्या मंडळींनीं ( विशेषतः मोरोपंतांनीं ) तो मोडून काढला असें बखरकार म्हणतात. पन्हाळ्यास येऊन व सैन्यरूपानें व द्रव्यरूपानें मुबलक साहाय्य विजापूरच्या किल्ल्यांतील लोकांस पावविलें. व दिलेरखानास चोहोंबाजूंनीं घेरून त्याची रसद बंद करून टाकिली. औरंगाबादेहून त्याचे मदतीस रणमस्तखान व बाजे उमराव सैन्यासह आले होते. त्यांनाहि 'मारून गर्दीस मिळवून पिटीत' औरंगाबादेपावेतों नेलें व मोगलांचीं धरणगांव, चोपडा, मलकापूर इत्यादि समृद्ध शहरें याच वेळेला लुटलीं. ( मार्गशीर्ष शुद्ध श. १६०१=डिसेंबर १–१६७९ ). पंतप्रधान मोरोपंत पेशवे यांनींहि इकडे मोगलाचे बागलाणांतील अहिवंतगड, नादेरवागड हे बळकट किल्ले काबीज केले व मुलूख लुटून वैराण केला. महाराज या वेळीं रायगडावर किंवा पन्हाळ्यावर असावेत.

**६ विजापूरचा वेढा उठला**—इतका बळकट शह मोगली मुलखांत पोंहोंचविला तरी दिलेरखान विजापूरचा वेढा उठविण्याचा आपला हट्ट कांहीं सोडीना. पण त्याचें नशीब त्याच्या आड आलें. पातशाही दरबारांत दिलेरखानाचा उत्कर्ष सहन न होणारी मंडळी होतीच. त्यांपैकींच दक्षिणचा सुभेदार शहाजादा मोअज्जम हा एक होता. त्यानें बादशहाकडे दिलेरखानाच्या कागाळ्या सांगण्याचा सपाटा चालू ठेविला होता. पहिल्या प्रथम बादशहानें विजापूर जिंकण्याची स्वतःच आज्ञा कल्यामुळें शाहाजाद्याच्या कागाळ्यांकडे त्यानें दुर्लक्ष केलें. तरी शहाजाद्यानें दिलेरखानास, कोणी द्रव्याची मदत देऊं नये, तसेंच सैन्य कोणीहि पुरवूं नये, अशा अर्थाचीं

पत्रें सगळीकडे लिहून ठेविलीं होतीं. दिलेरखान ह्या कोणत्याहि अड चणींस न जुमानतां विजापूरचा वेढा तसाच बळकट घालून बसला होता. पुढें महाराजांनीं जालनापूर व इतर गांवें जेव्हां लुटलीं तेव्हां शहाजाद्यानें बादशहाकडे दिलेरखानाविषयीं आणखी कागाळ्या करण्यास सुरुवात केली. 'दिलेरखान सर्व सैन्य व पुष्कळसा पैसा घेऊन विजापुरास उगीच माशा मारीत बसला आहे. इकडे पश्चिमेस सुरतेपासून तों पूर्वेस बाळापूर-कारंज्यापर्यंतचा मुलूख शिवाजीच्या सैन्यानें बेचिराख करून टाकला, अगणीत लूट घेऊन मराठे गेले. त्यांचा प्रतिकार करण्यास मजजवळ सैन्य, पैसा, सेनापती कांहीं शिल्लक नाहीं,' इत्यादि कागाळ्या त्यानें औरंगजेबाकडे पुन्हां केल्या. त्यावरून पातशहा संतापून जाऊन त्यानें दिलेरखानास विजापूरचा वेढा उठवून शिवाजीचा बंदोबस्त ताबडतोब करण्याचा हुकूम दिला. त्यानें अदिलशहाशीं म्हणजे मसाऊदखानाशीं तह करून विजापूरचा वेढा उठविला ( १६०१ माघ. ). महाराजांच्या पत्रांत याविषयीं पुढीलप्रमाणें लिहिलें आहे. " जालनापूर मारलें, रणमस्तखान नामोहरम केला. हें वर्तमान पातशहास वाकाइ बहाल जाले. बादशहाहि बहुत खजील होऊन आहादीवर आहादी दिलेरखानास आले. ये जागीं मुलूख खराब करून गडकोट व देश कबज करून वोढा लाविला; आणि लवाजमा धरून वरचेवरी कही कावाड मारून गनीम जेर केला. दिलेरखानासहि ऐसें कळोन आलें कीं, येथें राहिल्यानें आपली शाही कुल बुडवितील हें पुरतें जाणून विजापूर सोडून कोस दोन कोस करून चालिला. ऐसा गनीम जेर जेर करून खट्टा करून उखळिला. "

**७ शेवटचे दिवसः**—विजापूरचा वेढा उठविल्यावर दिलेरखान दक्षिणेस अदवानी, कोपल वगैरे प्रांताकडे निघून गेला. तिकडे जनार्दनपंत हणमंते त्या प्रान्ताचे शिवाजीचे सुभेदार यांची व त्यांची गांठ पडून त्याचा त्यांनीं तेथें पूर्ण पराभव केला. त्याच्याबरोबर विजापूरचा सरदार सर्जाखान महाराजांनीं जिंकलेला प्रांत विजापुराकडे परत घ्यावा, याकरितां गेला होता त्याचाहि पराभव झाला. इकडे पन्हाळ्यावरून पळून गेलेल्या संभाजीस परत आणण्याची महाराजांची खटपट चालूच होती. त्या खटपटीस यश येऊन दिलेरखानावर रुसून संभाजी १६०१च्या मार्गशीर्षांतच परत पन्हाळ्यास आला होता. महाराजांनीं पन्हाळ्यावर पौष

वद्य सप्तमीस मंगळवारीं जाऊन त्याची भेट घेतली. त्यास नानाप्रकारचा उपदेश करूत तेथें त्यास ठेविलें. व आपण उठून रायगडीं आले. रायगडीं आल्यावर राजारामाची मुंज फाल्गुन वद्य द्वितीयेस केली; व फाल्गुन वद्य दशमीस प्रतापराव गुजर याच्या कन्येबरोबर राजारामाचा विवाह लाविला. राजारामाच्या विवाहाचा सोहाळा आटोपण्याचे अगोदरच म्हणजे चैत्र शुद्ध प्रतीपदेस महाराजांच्या शेवटल्या आजारास सुरवात झाली. व चैत्र शुद्ध पौर्णिमेस शनिवारी मध्यान्हीं सूर्य आला असतां ही विभूति दिवंगत झाली व येथेंच ग्रंथ आटोपला ! ( ता. ३ ए. १६८० )

---

## प्रकरण १७ वें.

## उपसंहार.

शिवाजी–चरित्रांतील मुख्य मुख्य प्रसंगांचा त्रोटक वृत्तान्त येथवर प्रकरणशः सांगितला. आतां या ठिकाणीं या थोर पुरुषाच्या चरित्राचें सार सांगून त्यावरून सुचणाऱ्या कित्येक विचारांचा थोडक्यांत उल्लेख करावयाचा आहे.

शिवाजी या व्यक्तीची गणना जगांतील अत्यंत थोर पुरुषांत केली पाहिजे ही गोष्ट आतां सर्वमान्य होत चालली आहे. तथापि प्रत्येक थोर पुरुषाच्या थोरवीचें स्वरूप निराळें असतें; त्याअर्थी शिवाजी–चरित्राचें विशिष्ट रहस्य तत्कालीन ऐतिहासिक दृष्टीनेंच आपणांस शोधून काढिलें पाहिजे. थोर पुरुष हे जरी ' थोर असतात ' तरी ते देखील 'पुरुष म्हणजे माणसेंच असतात' अशी एका मार्मिक ग्रंथकारानें कोटी केली आहे. तिचा अर्थ असा कीं, थोर पुरुषांचे प्रारंभींचे तरी पुष्कळसे व्यवहार इतरे जनांप्रमाणेंच चाललेले असतात; पण योग्य संधि येतांच ते इतरांची वाट न पाहातां संकटांत उडी घेऊन काळाच्या ओघास अशी कलाटणी देतात कीं ओघाची दिशा पार बदलून जाते. असा बदल होणें इष्ट आहे, असें पूर्वीच्याहि लोकांना

वाटत असतें; पण तो बदल कसा घडवून आणावा या विषयीं त्यांची मति चालत नाहीं; चालली तरी कृति करण्याचें धाडस होत नाहीं आणि कदाचित् प्रयोग केला तरी त्यांत यश येत नाहीं. पण थोर पुरुषांना नेमका उपाय सुचतो; तो ते बेधडकपणें कृतींत आणतात आणि यशस्वी होतात. म्हणजे स्फूर्ती व धडाडी हे त्यांचे विशिष्ट गुण असतात; व यशस्वीपणा हें त्याच्या प्रयत्नाचें आवश्यक असें बाह्य लक्षण असतें. मात्र असे कांहीं थोडे गुण सोडले असतां समकालीन समाजांत अनेक गुणांचा परिपोष झालेल्या व्यक्ति तयार असाव्या लागतात. म्हणजे त्यांना थोर पुरुषांच्या कामगिरीचे सहकारी होऊन त्यांच्यामागें टिकाव धरतां येतो. याचाच अर्थ, प्रथम अनेकांना जाणवणारें संकट समाजावर ओढवतें; नंतर थोर पुरुष संकटाचा परिहार करितात आणि त्या योगानें समाजाची कर्तबगारी व उमेद यांची वाढ होते. असा याविषयींचा पायरी पायरीनें घडणारा क्रम असतो. शिवाजी–चरित्रासंबंधीचा हा क्रम येथें दाखविला पाहिजे.

ज्ञानेश्वरांच्या वेळीं महाराष्ट्रांत धर्माचीं गहन तत्त्वें लोकांना समजावून देण्याची जी परंपरा सुरू झाली तिनें, धर्मविचारानें प्राप्त होणारें जीवन लोकांना मिळूं लागलें; व वारकरी पंथानें त्या कार्याचा प्रसार करण्याचें काम व्यवस्थितपणें चालू ठेवलें. पण राजकारणाचा पायाशुद्ध विचार करणारा पुरुष त्या वेळीं कोणी निघाला नाहीं; व यादवांचें राज्य नष्ट झाल्यामुळें विचारी हिंदूंचा जिवंत राजकारणाशीं संबंधच तुटला. त्यांतल्यात्यांत विजयनगरच्या राज्याची राक्षसतागडीच्या युद्धांत वाताहत झाल्यापासून तर हिंदूंना, आपलें असें राज्ययंत्र, साऱ्या आर्यावर्तांत राहिलें नाहीं. राज्ययंत्र बादशहाच्या मालकीचेंच असावयाचें आणि हिंदूंनीं फार तर त्यांच्या पदरीं क्षुद्र शिपाइगिरी करावी, शेती करून पोट भरावें किंवा धर्माच्या तात्त्विक विचारांत गुंगून रहावें, अशी स्थिती आली. अशा वेळीं अकबरानें दक्षिण जिंकण्याचा व दक्षिणेंतील शाह्यांनीं विजयनगरच्या नष्टप्राय साम्राज्याचा विस्तीर्ण मुलूख पचविण्याचा कार्यक्रम सुरू केला. अशा वेळीं मोंगली सत्ता एकसूत्री असल्यामुळें जबरदस्त बनली; आणि दक्षिणेंत पांच चार शाह्या असल्यामुळें त्यांच्यांत बखेडा चालू राहिला. यामुळें मोंगलांच्या धाडीला अडविण्यासाठीं दक्षिणेंतील शाह्यांची जूट कशी बनवावी हें राजकारणांतलें गूढ त्या वेळच्या मुत्सद्यांना सोडवावयाचें होतें. तें सोड-

विण्याची खटपट मलिकंबरानें आपल्या ह्यातींत कांहींशी केली; आणि तो मरण पावतांच त्याची निजामशाही मोगलांनीं गिळंकृत केली. त्यानंतर शहाजीनें नवी निजामशाही उभी केली; तीहि त्याला तीन वर्षांपेक्षां अधिक वेळ टिकवितां आली नाहीं. यानंतर २० वर्षें मोगल थांबले होते. पण आदिलशाही व कुतुबशाही घेण्याचा प्रयत्न पुनः मोगलांनीं केला तर त्या वेळीं त्यांना कसें अडवावयाचें या प्रश्नानें दक्षिणेंतील सर्व मुत्सद्यांची बुद्धि कुंठित झाली होती. राजकीय संकटाचें स्वरूप हें अशा प्रकारचें होतें.

त्यांतच धार्मिक संकटाची भर मधून मधून पडत होती. शहाजहानाच्या व औरंगजेबाच्या कारकीर्दींत 'मुसलमानी धर्माचा प्रसार करणें हें राज्यकर्त्यांचें कर्तव्य आहे' ही विचारसरणी सुरू झाली व दक्षिणेंतील सुलतानहि मधून मधून त्या विचारसरणीचें अवलंबन करूं लागले. यामुळें आपलें राज्य नसलें तरी धर्मचिंतनानें आत्मोद्धार करून घ्यावा असें म्हणणाऱ्या हिंदु समाजावर यावनी धर्मप्रसाराच्या कल्पनेनें उद्वेग वाटण्याचे प्रसंग येऊं लागले. या संकटाचा परिहार करण्यास मुसलमानाप्रमाणेंच हिंदूंचेंहि एक स्वतंत्र व बलाढ्य राज्य पाहिजे येथवर कल्पनेची धांव गेली असण्याचा संभव आहे. पण त्याचा पुरावा सांपडत नाहीं. एवढें मात्र खरें कीं, मोगल, निजामशहा व आदिलशाहा यांच्यामध्यें चाललेल्या धुमश्चक्रींत व दुष्काळादिकांच्या आपत्तींत लोकांचे जे हाल होत ते पाहून समर्थासारख्या विरक्त पुरुषाचें अंतःकरण दुःखानें भरून येई; व या संकटांतून सुटका होण्यास परमेश्वरावांचून अन्य तरणोपाय नाहीं असें त्यांना वाटत असे. अशा रीतीनें यावनी राज्यांतील युद्धाची धुमश्चक्री व त्यांची धर्मप्रसाराची भावना व हिंदूंची धर्मरक्षणाची इच्छा यांचा विरोध निर्माण होऊन तो वाढू लागला. मिळून दक्षिणेतील सुलतानांना मोगलांच्या आघाताचें राजकीय संकट पडलें होतें आणि हिंदूंना "आपल्या धर्माचा वाली कोणीच दिसत नाहीं तेव्हां हें कलियुग सुरू झालें" या निराशेनें ग्रासलें होतें. हेंच निराळ्या शब्दांत सांगावयाचें तर दाक्षिणात्य सुलतानांची जूट घडून येणें अशक्य दिसत असल्यामुळें मोगली संकटानें राजकारणी लोकांची बुद्धि कुंठित झाली होती; आणि जबरदस्त असा एकहि हिंदू राजा साऱ्या भरतवर्षांत दिसत नसल्यामुळें यवनाक्रांत पृथ्वी झाली या देखाव्यानें हिंदूंची मनें निराशाग्रस्त झालीं.

मिळून शिवकालीन दाक्षिणात्य समाजावर ओढवलेल्या राजकीय व धार्मिक निराशेचें स्वरूप हें असें भेसुर होतें.

अशा स्थितींत शिवाजी महाराजांनीं प्रथम जहागिरीची व्यवस्था लावून आणि नंतर शेजाऱ्यांचा बंदोबस्त करून मावळ व जावळी आणि पुणें, सुपें व चाकण हा प्रदेश ताब्यांत घेतला व सैन्य पदरीं ठेवलें. महाराज या सैन्याच्या जोरावर सभोंवतालच्या मुलखांत 'मसलती' करीत असतां विजापूरचे मुत्सदी व मोंगली सुभेदार औरंगजेब हे मोठमोठ्या व्यापक राजकारणाच्या घडामोडींत गढून गेले होते. औरंगजेब हा विजापूर व गोवळकोंडे येथील, सुलतानांना जमीनदोस्त करण्याचा विचार मनांत घोळवीत होता; तेव्हां आदिलशाही व कुतुबशाही मुत्सदी आणि योद्धे कर्नाटकांतील 'नष्ट साम्राज्याचें' मढें फाडून खाण्याच्या नादांत होते. त्यांना मावळासारख्या लहान व भिकार मुलखांत काय चाललें आहे यावर विशेष लक्ष ठेवण्याची आवश्यकताच भासली नाहीं. त्यांच्या मतें हा सरहद्दीवरचा मुलूख आपल्या ताब्यांत असला काय किंवा मोंगलांना द्यावा लागला काय त्याची विशेष मातब्बरी नाहीं. अशा वेळीं मोंगल व विजापूरकर या दोघांनींहि उपेक्षिलेला, मुसलमानी अम्मल विशेष न बसलेला, पोर्तुगीज जंजिरेकर, इंग्रज, डच वगैरे परकी व कृष्णाजी बांदलसारखे पुंड यांनीं व्यापलेला हा मुलूख होता; त्यावर मुसलमानांचें राज्य जवळजवळ नव्हतें अशी वस्तुस्थिती होती. त्या मुलखांतून देशावरच्या अगर उत्तरेकडल्या साम्राज्यांना धक्का पोचल्याचें एकहि उदाहरण घडलें नव्हतें. यामुळें त्यांत डोंगरांच्या व दऱ्याखोऱ्यांच्या आश्रयानें बलिष्ठ होत चाललेल्या शिवाजीच्या हालचालींकडे लक्ष देण्याची बुद्धि त्या वेळच्या बादशहांना झाली नाहीं. इतक्यांत औरंगजेबानें महमद आदिलशाहा मरण पावतांच विजापूरचें राज्य बुडविण्याच्या कार्यक्रमास हात घातला; व विजापूरचें राज्य बुडणार अशीं लक्षणें दिसूं लागलीं. अशा वेळीं आपण कोणत्या पक्षाकडे असावें हा प्रश्न शिवाजीमहाराजांना सोडविणें भाग होतें. अर्थात् या वेळीं महाराजांचें सामर्थ्य बाल्यावस्थेंत होतें; औरंगजेब व आदिलशाहा यांच्या मानानें त्याची महती विशेष नव्हती; फक्त या बलवानांच्या भांडणांत आपला चुराडा उडूं नये व जमल्यास त्या भांडणाचा फायदा घेतां यावा एवढाच मर्यादित प्रश्न महाराजांना सोडवावयाचा होता. यामुळें महाराजांनीं

मोंगलांचें जुन्नर लुटून पैसा मिळविला आणि पुढें दोघांच्या तंट्यांतला कल्याणभिवंडीकडलाहि प्रांत ताब्यांत घेतला; आणि सैन्यभरतीचें कार्य जोरानें चालू ठेवलें. यामुळें औरंगजेब व आदिलशाहा या दोघांचाहि त्यांच्यावर रोष झाला. पैकीं औरंगजेब स्वतः पादशहा बनण्यासाठीं उत्तरेकडे गुंतल्यामुळें एक अडचण दूर झाली. आणि विजापुरांत पक्षभेद माजल्यामुळें शिवाजी व अफजल यांच्यांतील तंटा पक्षभेदाच्या दृष्टीनें पाहण्यांत येऊं लागला. अशा वेळीं अफजलाच्या हातून हिंदूच्या धार्मिक भावना दुखविण्याचा अन्यापारेषु व्यापार झाला आणि नंतर लौकरच त्याचा अंत झाला. यामुळें या वेळेपासून शिवाजीमहाराज हे धर्मरक्षणार्थ अवतरलेले पुरुष आहेत असें हिंदू लोक म्हणू लागले व महाराजांच्या विरुद्ध जाण्यांत फायदा नाहीं व त्यांचा स्नेह ठेवणें इष्ट आहे असें म्हणणाऱ्या रुस्तुमजमासारख्याच्या पक्षाचें बळ विजापुरांत वाढत चाललें. यानंतर मोंगलाकडून शाइस्तेखानापासून जयसिंगापर्यंत जे सुभेदार दक्षिणेंत आले त्यांनीं आपला मुख्य शत्रु शिवाजी कीं विजापूरकर या प्रश्नाचें निश्चित उत्तर मनाशीं ठरविलेलें नव्हतें. यामुळें कधीं विजापूरकराशीं तर कधीं औरंगजेबाशीं सलोख्याचें धोरण पत्करून महाराजांना बाल्यावस्थेंतलें स्वतंत्र स्वराज्य वाढविण्यास वेळ मिळवितां आला. या अवधींत स्वातंत्र्य पुकारण्याची त्यांनीं घाई केली नाहीं. मात्र फौज वाढवून, द्रव्यबळ संपादन करून, जवळच्या माणसांची उमेद वाढवून आणि आपल्या कार्यास परमेश्वराचें साहाय्य आहे असा विश्वास निर्माण करून त्यांनीं एका नव्या राज्याचा देखावा लोकांच्या डोळ्यास परिचित करून ठेवला. अफजल व शिद्दी जोहार यांच्यांशीं दोन हात करून यश मिळविल्यानंतर ते विजापूरकरांचे शाब्दिक अंकितत्व पत्करण्यास तयार होते. कारण त्यांचें भांडण शब्दासाठीं नव्हतें. आणि नंतर जयसिंगाच्या वेळीं मोंगल व विजापूर-दरबार आपल्या विरुद्ध जूट करीत आहेत असें दिसतांच त्यांनीं मोंगलांचें अंकितत्व पत्करलेंहि. आणि त्यानंतर कैदेचा प्रसंग आला तरी मोंगलांविषयींचा राग दिसूं न देतां सल्ला केला; आणि शक्ति वाढविण्यास फुरसत घेऊन पुनः तयारी होतांच समोरासमोर युद्धाचा डाव खेळून मोगलांना व विजापूरकरांना एकसारखेंच नामोहरम केलें. अशा रीतीनें आपलें राज्य भक्कम पायावर प्रस्थापित झाल्यानंतर केवळ भेदनीतीवर अवलंबून न राहतां उघड चढाई करून शत्रूंचा पराभव करून दाखविला.

शेवटीं धर्माच्या संरक्षणार्थ हे नवें राज्य आहे असें म्हणणाऱ्यांच्या हातून राज्याभिषेक करून घेतला. पण त्याच वेळीं आदिलशाही व कुतुबशाही यांच्यांशी संगनमत करून दाक्षिणात्यांनीं औरंगजेबाशीं कसें तोंड द्यावयाचें हा प्रश्न सोडविण्यास हात घातला. म्हणजे 'दक्षिणेंत मुसलमानांचें राज्य असूं नये,' असा महाराजांच्या राजकारणाचा निष्कर्ष निघत नाहीं. तर त्यांत 'एखादें बरोबरीचें व बलिष्ठ असें हिंदु राज्य असलें तर तें आम्हांस पाहिजे व त्याच्याशीं सहकार्य करण्यास आम्ही तयार आहों' असें दाक्षिणात्य सुलतानाकडून महाराजांना म्हणवावयाचें होतें; व त्यांनींहि नाहीं होय, म्हणत या गोष्टीस कबुली दिली.

दक्षिणेंत हिंदूंचें एक व मुसलमानांचीं एकदोन अशीं स्वतंत्र राज्यें असावीं व दोघांनींहि मोगली सत्तेशीं झगडण्याचें ध्येय मान्य करावें ही कल्पना मान्य होत चालली तेव्हां दक्षिणेंत हिंदु व मुसलमान यांच्यामधील भेदभावाची तीव्रता, शिवशाहीच्या अखेरीस, आपोआप कमी झाली. मुसलमानांनीं जबरदस्तीनें धर्मप्रसार करण्याची कल्पना सोडून द्यावी, अशाविषयीं उपदेश करीत राहण्यापेक्षां हिंदूंचें स्वतंत्र राज्य उभारण्यानें, जबरीनें धर्मप्रसार होण्याचें, संकट आपोआप नाहींसें होणार होतें. सारांश, दक्षिणेंतील राजकीय व धार्मिक अशा दोनहि संकटांना 'स्वराज्य स्थापन करून हिंदू राजानें छत्रपति बनणें' हीच तोड होती. ती करून दाखविल्यामुळें दक्षिणेंतील हिंदूंची कित्येक शतकांपासून कोमजलेली वृत्ति पुनः उल्लसित झाली. यामुळें पुढें औरंगजेबाला आदिलशाही व कुतुबशाही रसातळास नेतां आली; तरी मराठशाही बुडविणें अशक्य आहे असें त्याच्या प्रत्ययास आलें. यावरून महाराष्ट्रांत हिंदू छत्रपतीचें राज्य किती थोड्या अवधींत किती खोलपर्यंत बद्धमूल होऊं शकलें याचा प्रत्यय येतो. सारांश, योग्य वेळीं व प्रसंगानुसार उपाययोजना करून महाराजांनीं स्वराज्याचें बीज पेरलें व त्याची जोपासना होण्यास अवसर मिळवून देऊन त्याचा चांगला वृक्ष झालेला त्यांनीं आपल्या हयातींत पाहिला.

असें हें स्वराज्य उभारल्यानंतर पुढें समाजांत धर्म, नीति, विद्या वगैरेंचा परिपोष आपोआपच होण्याजोगा होता. उत्तम राज्य चालू असलें म्हणजे त्यांतील लोकांची नीतिमत्ता सुधारते, धर्मास तेज चढतें, विद्येकडे लक्ष लागतें आणि लोकांची भरभराट होते. यासाठीं असें स्वतंत्र राज्य उभारणें

व टिकविणें याविषयींचीच काळजी मुख्यत्वेंकरून राज्यसंस्थापकांना वहावयाची असते. आणि यासाठींच त्यांच्याकडे पाहतांना स्वराज्याच्या उभारणीची राजकीय दृष्टिच तेवढी त्यांना लावणें योग्य असतें. महाराजांना ठार करण्यासाठीं अफजलखानाची स्वारी आली असतांहि त्यांनीं त्याला 'प्रथम इषारा' दिला नाहीं त्याअर्थीं ते Chivalrous नव्हते म्हणजे कपटी होते असें एका ग्रंथकारानें ध्वनित केलें आहे, तें अप्रयोजकपणाचें दिसतें. 'धूर्तेषु धौर्त्यं सुधिया विधेयम्' या न्यायानें त्या वेळीं सर्व राजकारणी लोक वागत होते व महाराजांनींहि तसें वागणें प्राप्त होतें. महाराज हे नीतीचा किंवा chivalry चा उपदेश करणारे प्रचारक होते असें गृहीत धरणेंच चुकीचें आहे. त्याचप्रमाणें त्यांनीं एखादें शुद्धिकार्य केलें किंवा राजव्यवहार-कोश करविला म्हणून ते शुद्धिकार्याचे अगर भाषाशुद्धीचे कट्टे भोक्ते होते असें प्रतिपादन करणें ही अतिशयोक्ति आहे. या सर्व गोष्टी करण्याच्या कल्पना अनेक विचारी लोकांच्या डोक्यांत घोळूं लागल्या व त्यांचा प्रयोग करून पाहण्यास स्वराज्यानें वाव मिळाला इतकेंच म्हणतां येईल. या बाब-तींत राज्यकर्ते या नात्यानें महाराजांनीं कोणताहि आग्रह धरल्याचें दिसत नाहीं. संस्कृत कोश केल्यावर देखील त्यांतले फार थोडे शब्द त्यांच्या हयातींत रूढ झाले व खुद्द राजशकाच्या गणनेचा निर्देश अभिषेकोत्तर अस्सल पत्रांतून देखील नियमानें येत नाहीं. सारांश, ज्याला नवें राज्ययंत्र उभारावयाचें असेल त्याला अनेक सुधारणा एकाच वेळीं हातीं घेण्याची सोय नसते. नीति, धर्म, लेखनपद्धति, राज्यव्यवस्था वगैरे अनेक बाबतींत परंपरागत पद्धति बहुतांशीं मान्य करून क्रमाक्रमानें त्यांत सुधारणा घडून येईल असें म्हणून कालावर नजर द्यावी लागते.

महाराजांनीं आपलें राज्य लष्करी पद्धतीनें उभारलें आणि धर्मास प्राधान्य दिलें, यामुळें व्यापाराची अगर उद्योगधंद्याची वाढ झाली नाहीं व धर्माच्या कल्पनेनें जातिभेदास तेज चढलें व त्यामुळें हा स्वराज्यांचा डोलारा म्हणजे वाळवंटच्या सारवणासारखा क्षणभर टिकणारा देखावा होता व त्याला चिरस्थाईपणा येणें शक्य नव्हतें असाहि कित्येकांनीं आक्षेप घेतला आहे. त्यावरून आक्षेपकांच्या मतें व्यापारवृद्धि अगर जातिभेदांचा विध्वंस झाल्या-वांचून राज्य उभारणें निरुपयोगी आहे इतकेंच ठरेल. शिवाजीमहाराजांना व्यापारवृद्धीसाठीं अगर जातिभेद मोडण्यासाठीं राज्य उभारावयाचें नव्हतें.

किंवा लोकांच्या धार्मिक व व्यावहारिक कल्पना तात्त्विक दृष्ट्या बदलाव्या हें त्यांचें जीवितकार्यहि नव्हतें. थोर पुरुष देखील आपलें कार्य कांहीं थोड्या विशिष्ट बाबतींपुरतेंच करूं शकतो. सर्वच ठिकाणीं नवीनपणा व सर्वच बाबतींत एकदम सुधारणा करण्याची घाई थोर पुरुषांना देखील करतां येत नाहीं. समाजाला क्रमाक्रमानेंच एकेक गोष्ट अंगवळणीं पाडीत जावें लागतें. नाहींतर प्रत्येक सुधारणेगणिक मतभेद निर्माण करीत गेल्यास थोर पुरुषाला अनुयायी मिळण्याचीहि पंचाईत पडेल. सारांश, थोर पुरुष हे आधुनिक दृष्टीनें प्रत्येक बाबतींत सुधारणा घडवून आणणारे होते किंवा नाहीं या दृष्टीनें त्यांची तपासणी करणें ऐतिहासिक पद्धतीस धरून होणार नाहीं.

स्वतंत्र स्वराज्य स्थापण्याचे कामीं महाराजांना शेवटीं यश आलें, यावरून आपल्या जीवित-कार्याची स्पष्ट कल्पना महाराजांना लहानपणापासून होती व प्रारंभापासून त्यांनीं आपल्या आयुष्यक्रमाचें ध्येय ठरवून ठेवलें होतें इत्यादि कल्पना बऱ्याच लेखकांनीं मांडल्या आहेत. पण त्या साधार दिसत नाहींत. मावळांतले बांदलासारखे पुंड मलिकंबरादिकांचा अंमल जुमानीत नव्हते, पण त्यांची दृष्टि मावळापलीकडे जात नव्हती; आणि शहाजी-सारख्या शिलेदाराला व्यापक दृष्टि असून मुसलमानी सत्तेचें पांघरूण डोक्यावर असल्यावांचून आपलें निभणार नाहीं असें वाटत असल्यामुळें स्वतंत्र हिंदु-राज्याचा प्रयोग करण्यास त्याचें मन धजत नव्हतें. महाराजांचा निकट संबंध मावळाशींहि आला आणि शहाजीशींहि आला. मुसलमानी अंमलाची छाप जेथें फार थोडी व पुंडपणा हा जेथला नित्यक्रम तेथें त्यांचीं पहिलीं वर्षें गेल्यामुळें त्यांच्या स्वावलंबनी वृत्तीचा चांगला परिपोष झाला आणि शहाजीच्या कैदेमुळें आलेल्या आपत्तीनें त्यांना आदिलशाही दरबारांतील घडामोडीवर बारीक लक्ष ठेवण्याची आवश्यकता पटविली. पुढें औरंगजेबाच्या उलाढालीमुळें दिल्लीदरबारापर्यंतच्या राजकारणांत लक्ष घातल्यावांचून गत्यंतर नाहीं हेंहि त्यांना समजून आलें. अशा प्रकारें मावळावरून, जावळीपर्यंत, आणि जावळी-वरून विजापूर व दिल्लीपर्यंतच्या व्यापक राजकारणांत क्रमानें लक्ष घालून त्याचा फायदा कसा करून घ्यावयाचा हा प्रश्न त्यांना स्वसंरक्षणार्थ सोड-वावा लागला. प्रारंभीं तरी त्यांच्या हालचाली संरक्षक स्वरूपाच्या व मर्या-दित दृष्टीच्या होत्या. आणि भेदनीतीवर त्यांना भिस्त ठेवावी लागे. पण

मावळासारख्या लहानशा भागांत कां असेना पण, विजापूर व दिल्ली येथील सत्ताधाऱ्यांच्या हर्षविषादास न जुमानतां, स्वतंत्रपणें जगतां येतें हा प्रत्यक्ष अनुभव आल्यानंतर या स्वराज्यांतील लोकांच्या अंत:करणांतील आत्मश्रद्धा बळावली आणि चढाई हेंच बचावाचें उत्तम साधन, या नवीन व उच्च धोरणाचा अंगीकार त्यांना करतां आला; आणि शेवटीं तर दक्षिणेंतील इतर शाह्यांचे आपण संरक्षक आहों हें सिद्ध करण्याची जबाबदारी पत्करतां आली.

एकंदरींत समालोचनाच्या दृष्टीनें असें म्हणतां येईल कीं, शिवाजीमहाराजांच्या हालचाली सुरू होण्यापूर्वी महाराष्ट्र देश होता, मराठे लोक होते व मराठी भाषाहि होती; पण महाराष्ट्र किंवा मराठा या शब्दानें त्या वेळी कांहीं विशेष, मनांत भरण्यासारखा, अर्थ लोकांच्या मनांत येत नव्हता. स्वराज्याच्या किंवा मऱ्हाष्ट राज्याच्या स्थापनेनें महाराष्ट्र या शब्दांस विशेष प्रकारचें तेज चढलें व मराठे लोकांना आपल्या शिरावर कांहीं विशेष जबाबदारी आहे या संदेशाची जाणीव उत्पन्न झाली. पूर्वी बारगिरी किंवा शिलेदारी करून मराठे सरदारांनीं आपल्या तरवारीचें पाणी अनेक युद्धप्रसंगीं लोकांच्या निदर्शनास आणलें होतें, मुत्सद्दी या नात्यानें निजामशाहींत त्यांनीं पेशवाईचीं पदें मिळविलीं होतीं; आणि मराठी भाषा व मराठी लिपी यांनीं केवळ अंगच्या बळावर प्राप्त करून घेतलेलें पद लक्षांत घेतलें असतां आजहि आश्चर्य वाटतें. स्वराज्य अस्तित्वांत येण्यापूर्वी महाराष्ट्रांत विचारी, कर्तृत्ववान् व राजकारणी पुरुषांची परंपराच होऊन गेली व त्यांच्या प्रयत्नानें महाराष्ट्रांतील लोकांची मनोभूमिका, स्वातंत्र्याच्या पवित्र मंत्राचा स्वीकार करण्यास व ती जबाबदारी उचलण्यास, लायख झाली होती हा न्या. रानडे यांचा निष्कर्ष लक्षांत घेण्यासारखा आहे. ज्ञानेश्वरापासून तुकारामापर्यंतच्या संतांनीं अंत:करणांत* पवित्र

* कोणतेंहि महत्कार्य सिद्ध होण्यास प्रथम एकप्रकारचें विशिष्ट वातावरण निर्माण व्हावें लागतें. या वातावरणांत कार्यसिद्धीसाठीं काम करणारीं सर्व माणसें एकसूत्रीपणानें वागणारीं असावीं लागतात. अशा तऱ्हेचा एकसूत्रीपणा निर्माण होण्यास एका व्यक्तीची छाप इतरांवर विलक्षण तऱ्हेची पडावी लागते. एकाद्या माणसाचें सामर्थ्य अलौकिक आहे, दैवी स्वरूपाचें आहे अशी भावना सर्वत्र फैलावल्याशिवाय महत्कार्याला लागणारी संघटित परिस्थिती निर्माण होऊं शकत

भावना जागृत ठेवल्या. त्यांनीं चैतन्य व धर्माचें आदरस्थान कायम ठेऊन लोकांना जें जीवन दिलें आणि जें वाङ्मय निर्माण केलें त्याच्या वाचनानें व मननानें आजहि मराठी लेखकांना स्फूर्ती मिळत आहे. उत्तम भाषेचा नमुना पहावयाचा असेल तर संतांच्याच ग्रंथांकडे धाव घ्यावी लागते. मराठी लिपीचा तर अंगभूत जोर असा होता कीं, दक्षिणेंत राज्य केलें मुसलमानांनीं आणि फैलाव झाला मोडी लिपीचा ! विजापुरास परदेशी मुसलमानी पक्षाचा पहिल्यापासून जोर होता, तरी देखील त्याचवेळी दरबारांतील राजपत्रापासून तों तहत गांवकामगारापर्यंतचें सर्व लिहिणें मोडी लिपींत झालें पाहिजे असा हुकूम निघाला. एवढेंच नव्हें, तर सर्रास मोडीचा प्रघात रूढ झाला आणि फर्डेशाही मोडी लेखकांना निजामशाही व आदिलशाही दरबारांत कानावर लेखणी ठेऊन मोठमोठ्या अधिकारावर नांदू दिल्यानें आपला राज्यशकट सुरळितपणें चालण्यास फार मदत होते हा अनुभव येऊन गेला. या लेखकांचें व मराठी सरदारांचें जाळें आदिलशाही सुलताना भोंवतीं सहजासहजी व सफाईनें असें कांहीं पसरत गेलें कीं त्यांचें दसर न कळत, पण बहुतांशीं, मराठीनें हस्तगत केलें. अकबराचा वकील विजापुरास आला व दरबारांत राजकारणी प्रश्न त्यानें काढले तेव्हां विजापूरच्या सुलतानानें त्यांचीं उत्तरें मराठींत देण्यास प्रारंभ केला ! आणि याविषयीं चर्चा निघाली तेव्हां 'मला फारशी बोलण्यास अडचण पडते; मी मराठींत बोलेन ' असें सरळ शब्दांत त्याला सांगावें लागलें. सारांश, या भागांत राज्य करणाऱ्या सुलतानांना देखील मराठी भाषा व मोडी लिपी यांचा अंगीकार केल्यावाचून भागूंच नये असें स्थान या भाषेनें व लिपीनें प्राप्त करून घेतलें होतें. आणि गुणग्राही मालकाची कामगिरी बजावतांना जिवाची तमा न धरतां लढणें म्हणजे काय याचा प्रत्यय आणून देणारे शेकडों वीर शिवशाहीपूर्वी महाराष्ट्रांत होऊन गेले होते हें मागें सांगितलेंच आहे. पण हा भाषेचा, हा लिपीचा व हा पराक्रमाचा प्रसार महाराष्ट्रांत अनेकांच्या हातून

---

नाहीं. एखाद्या व्यक्तीच्या मनांत एखादें दुर्घट महत्कार्य आपण करूच करूं असा दृढ आत्मविश्वास निर्माण होण्यास धार्मिक भावनेचा अत्यंत उपयोग होतो. धार्मिक भावनेचें स्वरूप बुद्धीला पटण्यासारखें किंवा आकलन करितां येण्यासारखें कदाचित् नसेल पण त्याच्या विलक्षण कार्यशक्तीबद्दल बिलकुल शंका उत्पन्न होण्याचें कारण नाहीं. ( प्रगति ता. १०।३।३० चा अंक )

आपोआप झाला; हेतुपुर:सर कोणीं एकानें तो घडवून आणला नाहीं. यामुळें त्या प्रयत्नांत एकसूत्रता नव्हती. ‘ मी मराठी भाषा बोलणार ’ असें सांगणारा सुलतान संतांचें ग्रंथ जाणत नव्हता किंवा मोडी लिहिणारा कारकून आपण स्वराज्याच्या इमारतीचा एक महत्त्वाचा खांब उभारीत आहों हेंहि ओळखीत नव्हता. पण एवढें खरें कीं, अनेक कर्तबगार पुरुष महाराष्ट्रांत उत्पन्न झाल्यामुळें कोणी मराठी भाषेला दरबारांत आणून सोडली. कोणी लिपी फर्डेशाही बनविली आणि कोणी मराठ्यांच्या तरवारीला पाणी पाजून सज्ज केली. यामुळें दहा बाजूनें राज्याचीं आवश्यक अंगें उभीं झालीं. मात्र एका ‘ स्वराज्या’च्या अभावीं या सर्व गोष्टी जागोजाग आपापल्या ठिकाणीं थबकून उभ्या होत्या इतकेंच. त्यांच्यात ऐक्य घडवून आणणारा जिवंत धागा नव्हता. यामुळें त्या असून नसल्यासारख्या झाल्या होत्या. पण त्या तयार होत्या हें विसरतां येत नाहीं; आणि याचमुळें शिवाजीमहाराजांना स्वराज्याची कल्पना सुचतांच तिची सिद्धता झपाट्यानें होऊं शकली. किंवा डफनें म्हटल्याप्रमाणें वणवा पेटला व झपाट्यानें वाढला. ‘ हे मऱ्हाष्ट्र राज्य आहे. याप्रीत्यर्थ मी व माझे पांच मुलगे आधीं खर्ची पडूं ’ असें जेध्यानें सांगताच इतर देशमुखांनीं ‘ आमचाहि तोच विचार आहे. ’ एवढ्या एका वाक्यांत आपलें मनोगत सांगून त्यांना एकदम कामास लागतां आलें. व दहा पांच वर्षांत शत्रूंच्या डोळ्यादेखत स्वराज्य उभारण्याचें काम पुरें केलें. आणि लगेच त्यांनीं दक्षिणेंतील व्यापक राजकारणाच्या कामास हात घातला; व दिल्लीच्या अखिल भारतीय साम्राज्याच्या कल्पनेपेक्षां हिंदू व मुसलमान यांचीं स्वतंत्र राज्यें कायम राहून त्यांनीं बरोबरीच्या नात्यानें बाह्य संकटाशीं झगडण्यासाठीं एकोपा करणें यांत आपला तरणोपाय आहे, या व्यापक राजकीय तत्त्वाचा शोध लागला. या तत्त्वाच्या शोधानें मराठ्यांना कसा आत्मप्रत्यय येत गेला व त्यांच्या अंत:करणांत उच्च वीरश्रीचें वारें संचरत गेलें हें पहाण्यासारखें आहे. स्वराज्यांतील शिपायांनीं अत्यंत शिस्तीनें वागलें पाहिजे व ‘ रयतेस काडीचा आजार द्यावया गरज नाहीं ’ आणि देतील तर त्यांत ‘ मराठ्यांची इज्जत वाचणार नाहीं ’ असा उपदेश करणारें महाराजांचें पत्र वाचलें, ‘ ब्राह्मण म्हणून कोण मुलाहिजा करतो ? ’ हा त्यांचा प्रश्न लक्षांत घेतला किंवा ‘ मराठा होऊन ब्राह्मणावर हत्यार ’ चालविणाऱ्या विषयींचा त्यांचा संताप वाचून पाहिला म्हणजे स्वराज्य हें

रामराज्याप्रमाणें सुराज्य व्हावें यासाठीं त्यांची कशी तळमळ चालली होती हें स्पष्ट दिसतें. या तळमळीमुळें मराठ्यांना राज्य हातीं आलें तरी इमारती बांधण्याची अगर विलास करण्याची बुद्धी सुचली नाहीं; उलट ते साध्या रहाणीचे व उच्च विचाराचे भोक्ते बनले. महाराष्ट्र राज्य अस्तित्वांत असल्यामुळें महाराष्ट्र धर्म या शब्दाच्या अर्थांत अनेक प्रकारच्या नव्या नव्या कर्तव्याचा अंतर्भाव होऊं लागला; तथापि शिवकालीन स्वराज्यवाद्यांना महाराष्ट्र शब्दाची पुरी व्याख्या लक्षांत आली होती असें म्हणतां येणार नाहीं. त्या वेळच्या परिस्थितींत महाराष्ट्राच्या एका भागानें आपलें कर्तव्य ओळखून आपल्या पुरतें उदाहरण घालून दिलें. आज महाराष्ट्र तिभंगला आहे; पण महाराष्ट्र शब्दाची पुरी व्याप्ती लक्षांत आली आहे. तेव्हां अखिल महाराष्ट्रांत ऐतिहासिक भावना जागृत करण्यानेंच मालोजी, शहाजी व शिवाजी यांच्या चरित्राची माहिती मिळविण्याच्या कामाची पूर्तता होणार आहे असें दिसत आहे. करितां हें काम पार पाडण्यासाठीं अखिल महाराष्ट्रांतील विद्यावंत लोक झटतील अशी आशा करण्यास हरकत नाहीं.

## परिशिष्ट.

# भोसले घराण्याची पूर्वपीठिका.

---

( ले०–चिंतामण विनायक वैद्य )

शिवाजीमहाराज भोसल्यांचे कुळांत जन्मले असून भोसले कुळ क्षत्रिय शिसोदे कुळ आहे याबद्दल हल्लीं वाद नाहीं. गागाभट्टानें शिवाजीमहाराजांस वैदिक विधानें राज्याभिषेक केला त्यावेळेसच त्यानें आपली या कुळाच्या क्षत्रियत्वाबद्दल खात्री करून घेतली. कारण त्यावेळीं हल्लींप्रमाणें कलियुगांत दोनच वर्ण, ब्राह्मण व शूद्र, आहेत असें कित्येक लोक प्रतिपादित होते. राजपुतान्यांतील रजपूत राजघराण्यांत वैदिक आचार व उपनयनादि संस्कार चालू होते, त्यामुळें तिकडे फारसा वाद होत नव्हता; पण महाराष्ट्रांत मराठ्यांसंबंधानें वाद चालू होता. त्यांच्यांत कर्मलोप बहुतेक झाला होता व शिवाजीमहाराजांचीहि मुंज झालेली नव्हती. पण गागाभट्टानें धर्मशास्त्रानुसार असा विचार केला कीं कर्मलोपानें वर्णलोप होत नाहीं, कुविवाहानें शूद्र स्त्रिया केल्या असल्या तरच वर्णलोप होईल. तेव्हां भोसल्यांची कुळपरंपरा कशी आहे याचा त्यानें शोध करविला आणि भोसले कुळाचा संबंध उदेपूरच्या राणा लक्ष्मणसिंहाच्या वंशांत उत्पन्न झालेल्या दिलीपसिंगाशीं पोहोंचतो याची त्यानें सिद्धता करून घेतली. त्यावेळीं जी वंशावळ चिटणिसांनीं ( बाळाजी आवजीनीं ) उदेपुराहून आणली ती व हल्लीं ज्या कित्येक वंशावळी साताऱ्च्या प्रतापसिंहमहाराजांनीं वगैरे तयार करविल्या आहेत त्या मी पुढें देत आहें. त्यांवरून दिलीपसिंहाच्या कुळांत शिवाजीमहाराज उत्पन्न झाले हें निःसंशय सिद्ध होतें.

बाळाजी आवजीनें ही वंशावळ कृत्रिम जोडली असा कित्येकांचा संशय होता. परंतु कै. राजवाड्यांनीं राधामाधवचंपू काव्य छापिलें त्यावेळीं हा संशय निवृत्त झाला. शहाजीमहाराजांच्या वेळींच हा संबंध प्रसिद्ध होता असें स्पष्ट आहे. जयराम कवीनें म्हटलें आहे "महीच्या महेंद्रामध्यें मुख्य राणा वळीपास

त्याच्या कुळीं जन्म जाणा। तयाच्या कुळीं माळ भूपाळ झाला। जयानें" इ.। सर्व क्षत्रिय राजकुळांत मुख्य राणा ( उदेपूरच्या राजांसच राणापद लावितात ), त्याच्या कुळांत दिलीपास ( वलीपास हें चुकीनें लिहिलें किंवा वाचलें गेलें आहे ) जन्म आला, त्याच्या कुळांत माळभूप ( शिवाजी महाराजांचा आजा) जन्मला असा या श्लोकाचा अर्थ आहे. मालोजी हीन कुळाचा म्हणून शहाजीस लुकजी जाधवाची बायको मुलगी देईना ही कल्पना बखरकारांच्या डोक्यांत नवीन उत्पन्न होऊन त्यांनीं त्याजवर प्रचण्ड काव्यखंड रचिलें. पण त्याचें खण्डन शिवभारतावरून झालेंच आहे. मालोजी वारल्यानंतरच शहाजींचें लग्न झालें आणि लुकजी जाधवानें त्यांस प्रेमानें आपली मुलगी दिली असा खरा इतिहास आतां सिद्ध झाला आहे. मालोजीनें मशिदींत डुकरें टाकलीं नाहींत आणि निजामशहानें मध्यस्थी करून लग्न लाविलें नाहीं.

मालोजीच्या कुळास हीन समजते तर त्यास निंबाळकराची कन्या दीपाबाई कशी दिली असती याचाहि विचार अतिशयोक्ति करणारे बखरकार करीत नाहींत. मराठ्यांच्या म्हणजे मराठे क्षत्रियांच्या शहाण्णव कुळींच्या यादींत प्रमुख क्षत्रिय घराणीं म्हटलीं म्हणजे जाधव ( यादव ), निंबाळकर ( पवार ), चव्हाण ( चौहान ) इत्यादि आहेत; आणि हे निःसंशय क्षत्रिय असून मध्ययुगीन काळांत उत्तरेकडील क्षत्रियांशीं यांचे शरीरसंबंध नेहमीं होत हें मी मध्ययुगीन भारत भा. १।२।३ यांत दिलेल्या इतिहासांत जीं अनेक उदाहरणें दिलीं आहेत त्यांवरून स्पष्ट आहे. किंबहुना शेलार हें मराठे कुळ उत्तरेस हल्लीं नाहीं, तरीहि त्याचा समावेश चंद्रभाटाच्या क्षत्रिय ३६ कुळांच्या यादींत आहे ( छंदक सिलार अभीयर ). शिवाय या शिलाहारांच्या शिलालेखांत व ताम्रशासनांत त्यांस स्पष्टपणें क्षत्रियकुलोत्तंस म्हटलें आहे. हा विषय जास्त विस्तारानें मी कित्येक निबंधांत ( मराठ्यांचें क्षत्रियत्व इ. ) मांडला आहे, सबब येथें जास्त विस्तार करीत नाहीं. भोसल्याचे पूर्वज महाराष्ट्र देशांत आल्यानंतर त्यांचे विवाहसंबंध येथील मराठे कुळांशीं झाले तरी, ज्या अर्थी ही निंबाळकर इत्यादि कुळें क्षत्रिय आहेत त्या अर्थी त्यांच्या क्षत्रियत्वास यत्किंचित् बाध येत नाहीं. मुसलमानांच्या अमदानींत त्यांच्यांत कर्मलोप झाला

आणि त्यामुळें ब्राह्मणांनीं, विशेषतः वाईच्या कर्मठ ब्राह्मणांनीं, "कलावाद्यन्तयोः स्थितिः" कलीमध्यें दोनच वर्ण आहेत हें बंड हटवादीपणानें माजविलें. पण हल्लीं अनेक इतिहासाचें दाखले उपलब्ध झाल्यानें या बण्डाचें निराकरण झालें आहे आणि वरील वाक्य निर्मूळ आहे असें सिद्ध आलें आहे. ( मध्ययु. भा. भाग २ पृ. ९२–९७ ).

मराठे क्षत्रिय आहेत व शिवाजी महाराजांचें कुल रजपूत शिसोदे कुल आहे. या दोन गोष्टी कपोल–कल्पित नसून इतिहाससिद्ध आहेत हें प्रथम ठरल्यानंतर आपल्यास शिवाजीच्या पूर्वजांविषयीं म्हणजे मालोजीच्या पूर्वींच्या पूर्वजांविषयीं काय ऐतिहासिक रीतिची माहिती मिळते हें पाहणें मुख्यतः या विषयांत महत्त्वाचें आहे. अगोदर आपण ज्या वंशावळी प्रसिद्ध व अप्रसिद्ध मिळण्यासारख्या आहेत त्या देऊं. चिटणिसानीं जी वंशावळ आणली म्हणून प्रसिद्ध आहे ती, कोल्हापूर येथें किंवा सातार्‍यास प्रतापसिंहानें जी तयार केली ती, तंजावर येथील शिलालेखांत जी दिली आहे ती, चौथी जिंतीकर भोसले हल्लीं ग्वाल्हेरीस नोकर आहेत त्यांनीं मला दिली ती, अशा चार वंशावळी येथें देऊं म्हणजे त्यांचा तुलनात्मक विचार करतां येईल. पहिल्या तीन वंशावळी डोंगरे यांनीं आपल्या पुस्तकांत दिल्या आहेत त्यावरून व इतरत्र जे उतारे दिले आहेत त्यावरून पुढील कोष्टक तयार केलेलें आहे व तेथें ज्या टिपा जेथें दिलेल्या आहेत त्याहि तेथें देतों. रायबहादूर गौरीशंकर ओझा–प्रसिद्ध रजपूत इतिहाससंशोधक–यांनीं नुकताच जो उदेपूरचा इतिहास हिंदींत छापला आहे त्यांत लक्ष्मणसिंहाच्या वंशांत पुढें शिवाजी जन्मास आला ही गोष्ट तिकडील भाटांच्या लेखांवरूनहि नमूद केली आहे. लक्ष्मणसिंहाचा धाकटा पुत्र अजयसिंह, त्याचा पुत्र सज्जनसिंह, हमीर राजा झाल्यानें दक्षिणेंत आला. त्याच्या वंशांत शिवाजीमहाराज 'मेवाड के ख्यातों कें कथानुसार' झाले असें गौरीशंकर आपल्या नवीन इतिहासांत खण्ड २ पृ. ५१४ वर म्हणतात. तेव्हां या वंशावळीस लक्ष्मणसिंहापासून आरंभ केला जातो तें युक्तच आहे; आणि सर्वांचा शेवट मालोजी–शिवाजीमहाराजांचे आजे–यांशीं होतो हें तर साहजिकच आहे.

# शिवाजीमहाराजांच्या वंशावळी.

| १ कोल्हापूर टॉड वगैरे वरून | २ चिटणीस | ३ तंजावर शिलालेख | ४ जिंतीकर भोंसले |
|---|---|---|---|
| १ लक्ष्मणसिंह, अभय इ. १३०३ | १ लक्ष्मणसिंग | १ एकोजी-शंभुपर्वताजवळ | |
| २ सजनसिंह इ. १३१० सोंद्वाड्यास आले. | २ सजनसिंह | २ शरभजी दक्षिणेंत आले. | |
| ३ दिलीपसिंह | ३ दिलीप | ३ महासेन | |
| ४ शिवजी | ४ सिंहजी | ४ एकशिव | |
| ५ भोसजी | ५ भोसाजी | ५ रामचंद्र | |
| ६ देवराजजी | ६ देवराजजी इ. १४१५ दक्षिणेंत आले | ६ भीमराज | |
| ७ उग्रसेन | ७ इंद्रसेन | ७ एकोजी २ | |
| ८ माहुलजी | ८ शुभकृष्ण | ८ वराह | |
| ९ खेळोजी | ९ रूपसिंह (भूमिन्द्र) | ९ एकोजी ३ | |
| १० जनकोजी | १० घोपजी | १० ब्रह्माजी | |
| ११ संभाजी | ११ वरवटजी उर्फ खेळकर्ण खेळोजी | ११ शहाजी-उमाऊ | १ बसटजी दक्षिणेंत आले. |
| १२ बाबाजी | १२ जयकर्ण | १२ अंबाजी-रेवाऊ | २ नागोजी श. १३७९ |
| १३ मालोजी | १३ संभाजी | १३ परसोजी | ३ व्यंकोजी |
| १४ शहाजी | १४ बाबाजी | १४ बाबाजी-रेवाऊ | ४ बाबाजी विठोजी श. १४३० |
| १५ शिवाजी इ. १६३० | १५ मालोजी | १५ मालोजी-उमा | ५ मालोजी |
| | १६ शहाजी | १६ शहाजी | ६ शहाजी |

सदरहु वंशावळींतील एक एक पूर्वजांचा काय इतिहास मिळतो तें आपण पाहूं. शिवाजीमहाराजांचा आजा मालोजी याविषयीं शिवभारतांत असें म्हटलें आहे कीं तो महाराष्ट्रांत राज्य करीत होता आणि पुणें गावीं रहात असे. ( १-४५ स पुण्यदेशे धर्मात्मा निवासमकल्पयत् ). पुण्याचा मोकासा त्याकडे असावा. निजामशाहीकडून हा मोकासा होता, याचें कित्येकांस नवल वाटेल. पण पुणें प्रांत निजामशाहींत मोडत होता. निजामशाही व आदिलशाही यांची सरहद्द मुख्यत: भीमा होती, परंतु उगमाजवळ नीरेपर्यंत निजामशाहीची हद्द होती. निजामशाही मोंगलांनीं व विजापुरकरांनीं बुडविली तेव्हां पुणें प्रांत विजापुराला मिळाला आणि तो शहाजीला पुन्हां मोकासा दिला गेला. सरहद्दीवरील डोंगराळ प्रांत बहुधा मराठे सरदारांकडे दिले जात. मात्र मुख्य किल्ला बादशाहीकडे राही. या न्यायानें कोंढाणा आणि पुरंदर हे पुणें प्रांतींचे किल्ले बादशहांच्या ताब्यांत असत. 'त्यावेळीं देवगिरी किल्ल्याचा आश्रय करून निजामशहा पृथ्वीचें राज्य करीत होता' असें शिवभारत म्हणतें (१-५९) व त्याच्या पदरीं जाधव वगैरे अनेक मराठे मांडलिक सरदार होते ( १-६० ). मालोजीपासून शिवभारतांत हकीकत आहे हें ठीकच आहे. हा मोठा सरदार फौजबंद असून यानें शंभु महादेवाजवळ तळें बांधलें आणि वेरूळच्या घृष्णेश्वराचें देऊळहि बांधलें. हल्लींचें देऊळ मात्र अहिल्याबाईनें बांधलेलें आहे. शिसोदे वंशांत कुळदैवत महादेव आहे. कारण शिसोदे ऊर्फ गुहिलोत वंशाचा संस्थापक बापा रावळ उदेपूर राज्यांतील एकलिंग महादेवाच्या प्रसादानें उत्कर्ष पावला असा वंशेतिहास आहे ( मध्य.भा. भा. २ पृ. ११३ ). एकलिंगाचें फार मोठें संस्थान उदेपूर राज्यांत अजूनहि आहे.

भोंसल्यांच्या कुळांत राजे ही संज्ञा बहुधा सर्वांस लागते. मालोजी राजे भोसले असा नेहमीं उल्लेख येतो. शहाजीला जास्त वैभव व अधिकार मिळला तेव्हां महाराज म्हणूं लागले. मराठ्यांतील क्षत्रिय कुळांत राजे हें उपपद लावण्याचा प्रघात फार जुना दिसतो. कारण शबरभाष्यांतसुद्धां ( इ. स. ४०० ) 'आन्ध्रेषु पुररक्षणमकुर्वत्यपि राजशब्दो व्यवह्रियते' असा शेरा आहे आणि त्याप्रमाणें आन्ध्र देशांत राजु उपपद अजून लावतात. आंध्र आणि महाराष्ट्र एक असें समजून हा आन्ध्र शब्द भाष्यकार उपयोजितो असें कुमारिलाचें वार्तिक यावर आहे, आणि यावरून महाराष्ट्रांत हाच प्रचार इ. स. ७०० पासून चालू आहे. राजे भोसले, राजे महाडिक वगैरे प्रयोग महाराष्ट्रांत दृष्टीस पडतात. ही पदवी कोणी बादशहानें मालोजीला दिली होती असें मानण्याचें प्रयोजन नाहीं

आणि याच कारणानें मालोजीचा बाप बाबाजी याचा उल्लेख कागदपत्रांत बाबाजी राजे असा येतो.

मालोजीच्या बायकोचें नांव उमाबाई असें कागदपत्रांतून आढळतें ( ले. ४९८ ). वरील वंशावळींतही तेंच नांव दिलेलें आहे. हें नांव दोनतीनदां आलें आहे. दीपाबाई हें दुसरें नांव माहेरचें असावें; ती निंबाळकरांची लेक होती हें वर सांगितलेंच आहे.

मालोजी श. १५२८ च्या सुमारें वारला असें उपलब्ध कागदांवरून ( ले. ३७० रा.खं. १५) निश्चित ठरतें. तो ५० वर्षांच्या वयाचा असतां वारला असें धरलें तर त्याचा जन्म श. १४७८ हा येतो. मल्हाररामरावकृत बखरींत जन्म श. १४७२ व मृत्यु १५४२ (शेडगावकर बखर) दिला आहे म्हणजे तो ७० वर्षांचा असतां मेला. हें असंभाव्य बखरीस योग्य असें आहे. त्याचा बाप बाबाजी याचा जन्म यापूर्वी वीस वर्षे धरला तर तो श. १४५८ त ठरतो. बाबाजी राजे भोसले यास पांडे पेडगांवची जहागीर होती हें ले. ३६७ वरून सिद्ध आहे. हें पेडगांव भीमा नदीच्या उत्तर तीरीं असून विजापुरची हद्द पलीकडे लागते. सरहद्दीवर जोरदार सरदार पाहिजे या कारणानें हा गांव त्यास मिळाला असावा. हा गांव मीं पाहिला आहे. तो फारच मोठा असून हल्लीं अगदीं वैराण निवडुगांनीं भरलेला आहे. येथें औरंगजेबाचा पुढें मोठा तळ पडलेला होता. त्यानें एक किल्ला तेथें बांधलेला आहे. येथें एक प्राचीन सुंदर देऊळ आहे.

मालोजीला पुष्कळ वर्षे पुत्र नव्हता यावरून बखरकार त्यास ७० वर्षांचा मानतात. पण उशिरा म्हणजे ६०।६५ वर्षी नव्हे. शिवाय श. १५२८ त तो वारला होता हें निश्चित आहे तेव्हां त्याचा जन्म या वयानुसार १४५८ श. म्हणजे १५३६ वर्षी येतो. बाबाजीचा उपरोक्त लेख १५११ चा आहे. ग्रँटडफ इ. स. १५७७ (श. १४९९) तो २५ वर्षांचा असतां जाधवाच्या शिफारशीनें नोकर झाला असें लिहितो तें अर्थात् चुकीचें आहे. त्यापूर्वींच बाबाजी मोठा सरदार होता. हें निश्चित आहे.

चारी वंशावळींत बाबाजीचें नांव आहे. यापूर्वींचे पुरुष मात्र त्यांत भिन्न भिन्न दाखविले आहेत. बाबाजीच्या बायकोचें नांव रेवाऊ. आऊ हा प्रत्यय कर्नाटकी आहे. तो बाईच्या ऐवजीं आहे ( शब्द बाई संस्कृतोत्पन्न वई—वती अशा परम्परेनें निघालेला दिसतो ). बाबाजीच्या बापाचें नांव व. १ व. २

मध्यें संभाजी असें दिलें आहे. वं. ३ मध्यें परसोजी आणि वं. ४ मध्यें व्यंकोजी असें आहे. बाबाजीपर्यंत म्हणजे श. १४६८ ( इ. १५३६ ) पर्यंत वंशलेखकांची माहिती साधार आहे. यापुढें कल्पना बऱ्याच चालल्या असें दिसतें. पण लक्ष्मणसिंहापासून तिन्ही वंशावळींत पिढ्या सारख्याच दिसतात म्हणजे १२ वा बाबाजी पहिलींतील दुसऱ्या तिसऱ्यांत १४ वाच आहे. दर पिढी २० वर्षांची धरली तर बाबाजीस सोडून ११ पुरुष किंवा १३ धरले तर २२० अगर २६० वर्षांपूर्वी लक्ष्मणसिंह येतो; म्हणजे श. १२३८ किंवा १२०८ हें वर्ष लक्ष्मणसिंहाचें येतें. पहिल्या वंशावळींत त्याचा इ. स. १३०३ म्हणजे श. १२२५ दिला आहे. अर्थात् या तिन्ही वंशावळी स्थूलमानानें इतिहासांत मानण्या-लायक आहेत. लक्ष्मणसिंहाचा मेवाडच्या राज्यावरील काळ रा. ब. गौरीशंकर यांनीं १३०३ हाच दिला आहे. प्रत्येक पिढीच्या नांवाचा विश्वसनीय पुरावा मिळावा म्हणून मीं भोसल्यांचे वेरूळचे उपाध्ये यांजकडची माहिती मिळवि-ण्यांचा प्रयत्न केला पण तो सिद्धीस गेला नाहीं. रा. शंकर श्रीकृष्ण देव यांना या विषयाबद्दल जी माहिती मिळाली त्यांनीं ती रामदास—रामदासी व. ६ अं. ६१—६२ यांत छापिली आहे. त्यांतहि बाबाजीपासून पुढें बरोबर वंशावळ दिली आहे. बाबाजीपूर्वी १५।२० नांवें दिलीं आहेत; पण त्यांचा संबंध बाबाजीशीं काय होता हें दाखविलें नाहीं. ही कदाचित् एखाद्या स्वतंत्र शाखेची मंडळी असेल. हें गूढ अद्याप उकललें नाहीं, तेव्हां बाबाजीच्या पूर्वी-च्या नांवांची चर्चा ज्यास्त करणें अशक्य आहे.

तंजावरच्या शिलालेखांत बाबाजीच्या पूर्वजांचीं नांवें देतांना प्रारंभच एको-जीपासून केला आहे. या शिलालेख—लेखकास पूर्वीची कांहींच माहिती नव्हती असें दिसतें. तंजावरचा वंश एकोजीपासून फिरतो. हा शहाजीचा धाकटा पुत्र असून शिवाजी महाराजांचा धाकटा भाऊ होता. शिवाजीचा आणि याचा भाऊबंदकीचा तंटा झाला होता हें प्रसिद्ध आहे. लेखकानें एकोजी वंशावळींत पूर्वींचे तीन घातले आहेत; आणि एकोजी पहिला हाच वंशस्थापक लक्ष्मण-सिंह याच्या जागीं दिला आहे. मद्रासेकडील कित्येक मंडळी कोठेंच अडत नाहींत हा त्यांचा गुण आहे; पण इतर वंशावळींच्या तुलनेनें ही वंशावळ ध्यानांत घेण्यासारखी नाहीं, ही गोष्ट नमुद करून आपण दुसऱ्या वंशावळींचा यापुढें विचार करूं.

वं. १ व २ यांचा प्रारंभ लक्ष्मणसिंह राणा यांजपासून झाला आहे. त्याचा धाकटा मुलगा सजनसिंह हा अधिकारी नसल्यानें इ. १३१० मध्यें सोंदवाड्यांत

आला असा उल्लेख आहे. अनधिकारी राजपुत्र देशान्तर करून राज्य स्थापीत; त्याप्रमाणें सोंदवाडा म्हणजे माळव्याचा एक भाग ज्यांत सोंदिये नांवाची लुटारू जात राहते तेथें तो गेला. त्याचा पुत्र दिलीप दोहोंतही एकच आहे. याचा नातू भोसाजी दोहोंत असून त्याचा पुत्र देवराजजी इ. स. १४१५ त दक्षिणेंत आला असा शेरा दिलेला आहे. ही गोष्ट संभवनीय दिसते. दुर्गादेवीकृत दुष्काळ महाराष्ट्रांत इ. स. १३९६ ते १४०८ पर्यंत होता. त्यावेळीं नर्मदेपासून दक्षिणेस कृष्णेपर्यंत बहामनी राज्याचा अम्मल असून बेदर ही राजधानी होती. हजारो गांव उजाड होऊन पाटिलक्या नष्ट झालेल्या होत्या, अशा वेळीं पाटिलकी राज्य संपादन करून कित्येक रजपूत कुळें महाराष्ट्रांत येऊन राहिलीं असावीं. उत्तरेकडील प्रांताचें मुख्य ठिकाण दौलताबाद देवगिरी हें होतें, याच्याच आसपास देवराज व त्यांचे वंशज येऊन राहिले आणि म्हणूनच भोसल्यांची प्रथम वसति वेरूळ प्रांतांत झाली. असा निश्चय होतो.

येथें भोसले या उपनांवाच्या व्युत्पत्तीचा विचार करूं. मराठींत 'ला' प्रत्यय 'चा' या अर्थी कित्येक शब्दांत दिसतो. 'देसला' शब्द देशाचा अधिकारी या अर्थानें प्राचीन लेखांत आढळतो. गोखला म्हणजे गोखचा राहणारा असा अर्थ होईल. तेव्हां सन्मानार्थानें देसले गोखले हें उपनांव अनेकवचनीं आढळतें. देवराजजी जेव्हां दक्षिणेंत आला तेव्हां त्याच्या कुळाला भोसले हें उपनांव चालू होणें शक्य आहे. पण भोसला म्हणजे 'भोसाजीचा' पुत्र अगर वंशज असा अर्थ घ्यावयाचा किंवा स्थलवाची भोस शब्द घ्यावयाचा ? के. राजवाडे यांनीं भोसगांवचा अशा अर्थानें हा शब्द व्युत्पादिला आहे. हैदराबादेंत पैठण प्रांतांत भोस, भोसें, भोसेगांव अशीं तीन गांवें आहेत. पण जोंपर्यंत त्या गांवांची पाटलकी भोसल्यांकडे आहे किंवा होती हें सिद्ध झालें नाहीं तोंपर्यंत ही ग्राममूलक व्युत्पत्ति निश्चयात्मक ठरत नाहीं. याबद्दलहि मीं शोध चालविला आहे. भोसल्यांच्या कुळाची जास्त माहिती वेरूळ प्रांतांत पुष्कळ चौकशी केल्याशिवाय लागावयाची नाहीं. या प्रान्तीं मुसलमान झालेले कित्येक भोसले आहेत असें एक टिपण न्यायमूर्ति केशवराव जज्ज हैद्राबाद, यांनीं इतिहास-मंडळासमोर वाचलें होतें. असो; भोसगांवची ही व्युत्पत्ति सिद्ध न झाली तरी भोसाजीचे वंशज अशी व्युत्पत्ति लागेल. पण भोसाजी हें नांव काल्पनिक भोसले शब्दावरून बनविलें आहे किंवा हें नांव खरोखरच रजपूत लोकांत आहे हेंहि पाहिलें पाहिजे. या विषयींहि मीं चौकशी सुरू केली आहे, परंतु अद्याप उत्तर मिळालेलें नाहीं.

देवराजजीनंतरच्या चारपांच पिढ्यांच्या नांवांत बराच फेरबदल दिसतो. पण वरवटजी किंवा बरडजी हें नांव तिन्ही वंशावळींत दिसतें. याचेंच नांव खेळकर्ण अथवा खेलोजी असें दिलेलें आहे. वरवटजीचा पुत्र नागोजी जिंतीकर वंशावळींत दिलेला आहे आणि इतर वंशावळींत जनकोजी व जयकर्ण असा दिला आहे. माझ्या समजुतीनें नागोजी हे नांव जास्त संभवनीय दिसतें. कारण हें नांव वेरुळच्या उपध्यायापासून मिळविलेल्या यादींत आलें आहे (रामदास-रामदासी किता).नागोजी हें नांव इतर कोणत्याहि ठिकाणीं भोसल्यांच्या वंशावळींत नाहीं हें खरें; याचा उलगडा आपल्यास आणखी पुराव्यानंतर होईल. नागोजीचा पुत्र व्यंकोजी हाच बाबाजीचा बाप आहे पण इतर वंशावळींत संभाजी ( १ व २, ) आणि तंजावर वंशावळींत परसोजी दिला आहे. तेव्हां बाबाजीच्या बापाचें नांव काय हा महत्त्वाचा प्रश्न आपल्यापुढें आहे. बाबाजीच्या बापाचें नांव मालजी ( मालोजीचें पूर्वरूप ) असावें असा संशय एक नकल खरीदपत्र जिंतीकर भोसले यांनीं मला दिलें (तें पुढें उल्लिखित होणार आहे) यावरून वाटतो. हें खरेदीपत्र श. १४७१ चें असून विश्वसनीय दिसतें. बाबाजी राजे भोसले यांचा एक कागद ले. नं. ३६७ राजवाडे खंड १५ मध्यें शके १५१९ चा प्रसिद्ध झाला आहे. तेव्हां श. १४७१ त खरेदी घेणारा मालजी हा बाबाजीपुत्र माळोजी नव्हे. बाबाजीच्या पूर्वजांच्या वंशवृक्षांत मालोजीचें नांव आढळत नाहीं. शिवाय दुसऱ्या शाखेंतहि असें नांव असणें शक्य आहे. एकंदरींत बाबाजीच्या बापाचें नांव संभाजी, परसोजी, व्यंकोजी, व मालजी (देवांनीं वेरूळच्या उपाध्याकडून मिळविलेल्या नांवांत मालजी नांव बाबाजीपूर्वींच आढळतें ) असें चार प्रकारें दिलेलें आढळतें. तेव्हां निश्चित माहिती वंशावळीकारांस नाहीं असेंच म्हणावें लागतें. बाबाजीपासून वंश प्रसिद्ध व ज्ञात आहे. (अर्थात् श. १५१९ इ. स. १६०० पासून.)

यानंतर या कुळाविषयींची इतर माहिती नमूद करूं. ही माहिती नवीन सांपडलेल्या ९६ कुळींच्या यादीवरून व इतर पुराव्यावरून देतां येते. भोसल्यांचें कुळ सूर्यवंशी आहे. शिसोदेहि सूर्यवंशी म्हणून प्रसिद्ध आहेत. अलीकडच्या यादींत कोठें ब्रह्मवंश किंवा सोमवंश ( जिंतीकर वंशवृक्ष ) दिलेला आहे, तो केवळ चुकीचा होय. या कुळाचा वेद सामवेद दिला आहे. भोसल्यांची गादी ( वं. १ व २ मध्यें ) चितोड दिली आहे तीच योग्य आहे. अलीकडील (३ व ४) यादींत उदेपूर दिलेली असते ती अर्वाचिन आहे. मूळ

शिसोद्यांची गादी चितोडगडच होय. पूर्वीच्या दोन यादींत यांचें गोत्र कौशिक दिलें आहे. हें गोत्र मूळ शिसोद्यांचें नव्हे. महाराष्ट्रांत विज्ञानेश्वराच्या मिताक्षरे-प्रमाणें ( इ. ११०० सु. ) क्षत्रियांना गोत्र नाहीं, त्यांनीं पुरोहितांचें गोत्र घ्यावें असा सिद्धांत चुकीचा प्रचलित झाला त्यामुळें भोसले महाराष्ट्रांत येऊन राहिले, तेव्हां त्यांचे प्रथम पुरोहित कौशिक गोत्राचे असावे आणि म्हणून हें गोत्र चालू झालें, तें शाहूमहाराजांच्या लेखांतहि नमूद आहे. भोसल्यांचे पुरोहित राजोपाध्ये हे मागूनचे ठरतात, कारण त्यांचें गोत्र कौशिक नाहीं. भीमथडी प्रांतांत भोसल्यांची वस्ती झाली त्यावेळचे हे उपाध्ये असावेत. कारण पेडगांवा-जवळच अरवी हा राजोपाध्यांचा मूळ गांव भीमातीरीं आहे. तेथें मुद्गलेश्वराचें प्रसिद्ध स्थान आहे हें ध्यानांत येतें.

भोसल्यांच्या ज्या उपकुळी जुन्या दोन याद्यांत दिल्या आहेत त्यांत शिर-साट हें नांव आलें आहे. रुक्मिणी–स्वयंवरांत ' शिरसाट मोरे ' वगैरे नांवें मराठ्यांच्या राजनामावळींत आलीं आहेत, परंतु तेथें भोसल्याचें नांव आलेलें नाहीं यावरून पूर्वी मला अशी शंका उत्पन्न झाली होती कीं श. १४०० पर्यंत भोसले दक्षिणेंत आलेले नव्हते. परंतु शिरसाट हे भोसलेच असल्यानें ही शंका राहत नाहीं. शिरसाटांचें उपकुळ त्यावेळीं विशेष प्रसिद्ध असावें इतकेंच सिद्ध होतें.

भोसल्यांचा दक्षिणेंत कसा प्रसार झाला हें पाहूं. मूळ वसति त्यांची इ. स. १४०८ सुमारें दौलताबाद ( देवगिरी ) प्रान्तांत झाली असें वर दाखविलें आहे. यावेळीं बेदरास बादशाही होती आणि देवगिरीस सुभेदारी होती. पुढें महंमद गावान एक कर्तृत्ववान् कारभारी झाला. त्यानें केलेले प्रान्ताचे सुभेदार स्वतंत्र होऊन देवगिरी येथें उत्तरमहाराष्ट्रांत निजामशाही इ. स. १४९८ ( श. १४२० ) चे सुमारें स्थापन झाली. या निजामशाहीच्या अमलांत भोसले सरदार पुढें आले व विशेषतः भीमथडीच्या प्रान्तांत म्हणजे आदिलशाहीच्या सरहद्दीवर हे भोसले अनेक ठिकाणचे मोकादम ( पाटील ) झाले. जिंतीकर भोसल्यानीं ( जिंती भीमाकांठींच आहे ) जी खरीदपत्राची नकल दिली आहे, ती या सोबत छापली आहे; तीवरून असें दिसतें कीं मालजी राजे भोसले हे जिंतीचे मुकादम पूर्वीच होते. त्यांनीं मुकादमी काकडे याजपासून अर्धी खरेदी घेतली होती. पुढें काकड्यांच्या भाऊबंदांनीं तक्रार करून एका काकड्यास ठारहि मारलें, तेव्हां बाकीची सर्व मोकादमी १२०० होनांस विकून त्याचा लेक गांव सोडून

बेल. यावरून मराठे लोक गांवच्या पाटिलकीबद्दल कसे प्राण देत हें दिसतें. भोसल्यांना वेरूळ प्रान्तीं पाटिलक्या दुर्गादेवी दुष्काळानंतर सहज मिळाल्या पण भिमथडी प्रांतांत त्यांनीं पैशाच्या आणि फौजबंदीच्या जोरावर निजामशाही आमदानींत मिळविल्या. कित्येक मुकासे सरकारांतून फौजेच्या खर्चास मिळालेले दिसतात. राजवाडे खण्ड १५ ले. ३६८ मध्यें मालोजी व विठोजी यांस सरगुऱ्हो म्हटलें असून कित्येक गांव 'दरवजे मुकासा' दिले असल्याचा दाखला आहे. सरगुऱ्हो हा शब्द "गिरोह" म्हणजे जमाव त्याचा मुख्य अशा अर्थाचा असून सरकारी फौजेचा अधिकारी अशा अर्थाचा वाचक नाहीं. पाश्चात्य देशांतील (Feudal System) किंवा इकडील सरंजामी व्यवस्थेनुरूप आपली फौज ठेवून सरकारी नोकरी करणाऱ्या लोकांपैकीं मालोजी भोसले होता व तिच्या खर्चाकरितां हे गांव तैनात केले होते. हीं गांवें नगर जिल्ह्यांतलि व हल्लींच्या मोगलाईंतलि म्हणजे पूर्वीच्या निजामशाहींतलिच आहेत. ले. ३६८, ३६९, ३७०, ३७१ खं. १५ यांत दिलेली, पैठण तालुक्यांतील व अहमदाबाद कसबे आधारसूल परगने कचरड देखील जातेगौ (किल्ले व कोट सुद्धां) गौडगौ (गाऊ) वगैरे आहेत. यावरून निजामशाहींत मराठे सरदारांचा किती मान होता व त्यांतहि मालोजी भोसले याचा किती होता ही गोष्ट व्यक्त होते. हल्लींहि भोसल्यांचीं कित्येक गांवें जिंती, शेडगांव वगैरे या प्रांतांत आहेत.

मुकादमी खरीदपत्राची नकल.

[ श. १४७१ आश्वीन शु. १०
[ इ. १५४९ आक्टो. १०

श्री नकल ता.

खरीदपत श्री सके १४७१ सोम नाम संवछरे आश्वीन शुा विजया दसमी वार मंगळवार ते दिवसी राजश्री मालजी राजे भोसले मोकदम कसबे जिंती यांसी कमाजी काकडे बिन माव पा काकडे मोकदम कस्बे मार पो कडवली ता सुा खमसईन तिसा मया कारणे खरीदपत लेहून दिलें येसी जे आपले वडील माव पाटील याणी तुम्हास निमी मोकदमी नाव नागर मोहरप दिधली होती त्यावर खेळोजी काकडे याचे (लेक) कान्होजी काकडे व पाच सात काकडे यानी उत्पाद करून बदमतीने आपले वडील माव पाटील मारिले त्यावरी आपणासी दिसोन आले की हे आपणास वाचो देत नाहींत. याकरितां जरूर जाणोन आपण तुम्हापासी येऊन आपले खुशीने रजावंदीने

खुशखरिदी पेशजी निमे व हली (आपण दिघली नि) मी यसी दरोबस्त मोकदमी नाव नांगर व कुल बाब हक दक मान मानूक कस्बे मारींची तुम्हास दिली आसे त्यास तुम्हापासोन आपण खुशरजा होन १२०० बाराशें रोख घेतले व घोडी एक घेतली आणि सदरहू खरीदपत तुम्हास लेहून दिल्ही असे तुह्मी कस्बे मारी घर वाडा बाधोन मोकदमी लेकराचे लेकरी खाणे आपण खुशरजा वतन दिल्हे आसे त्यास कोणी आपले भाउबंद काकडे नेदीगर गोष्टी सांगेल तरी ती बातिल आसे त्यास कुलस्वामींची व पूर्वजाची अणिगा आसे व वाराणसीस गोहत्या व ब्रह्महत्या केल्याची आण आसे हे खरीदपत लिहून दिले सई देखील × × लती वली आसलच्या येकूनतीस

निा गणेश विनायक कुलकर्णी

साकई बाई काकडी कस्बे मार महादजी शटी बिन दम शट भोसले को मार

नरसोजी सोवजी झारक चोगुले लखमोजी बिन रामजी सर्जेराव चोगुले को मार

बाबे भूतजी काकडे चौगुले को मार

लखम नाक बिन क ... नाक महार को मार